Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्

पुस्तक संख्या ..... ह०म / ४

पञ्जिका संख्या ३०५५०

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

किंमत ४ रुपये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

३०५१०

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CHECKED 1973

Initial

ऋते ज्ञानान्न मुक्तिः

६० म
४

३०५१०

गुरुकुल पुस्तकालय कांगड़ी.

स्ताक प्रमाणीकरण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास

(अतिप्राचीन कालापासून इ. स. १००० पर्यंत)

लेखक :

प्रा. रं. ना. गायधनी एम्. ए.
प्राध्यापक स. प. कॉलेज व पुणें विद्यापीठ, पुणें.

डॉ. व. ग. राहूरकर एम्. ए., पीएच्.डी.
पुणें विद्यापीठ, पुणें.

कॉंटिनेंटल् प्रकाशन, टिळक रस्ता, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथमावृत्ति : १९५५
सर्वाधिकार सुरक्षित
किंमत चार रुपये

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉंटिनेंटल् प्रकाशन, टिळक रस्ता, पुणें २
मुद्रक : म. ना. चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय; टिळक रस्ता, पुणें २

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कार

स्वातंत्र्योत्तर कालांत भारतीय लोकांच्या मनांत आपल्या देशाच्या प्राचीन संस्कृतिविषयीं मोठें कुतूहल निर्माण व्हावें हें साहजिकच होतें. भारतीय नेतेहि हल्लीं संस्कृत विद्या आणि प्राचीन भारतीय संस्कृति या विषयांबद्दल विशेष प्रकारची आस्था दाखवीत आहेत. एक काळ असा होता कीं जेव्हां या विशिष्ट ज्ञानक्षेत्रांत परकीय विद्वानांची कामगिरीच प्रकर्षानें डोळ्यांत भरण्यासारखी होत होती. अर्थातच तिची जाणीव या विषयांचे जे विशेष अभ्यासक होते त्यांच्यापुरतीच मर्यादित होती. अलिकडे मात्र अनेक भारतीय संस्था आणि पंडित या क्षेत्रांत बहुमोल आणि सुफल-दायि असें संशोधन करीत आहेत. आणि त्या संशोधनाची माहिती वर्तमानपत्रद्वारा–अगदीं स्थूल स्वरूपांत कां होईना–मधून मधून सामान्य लोकांपर्यंत पोंचत आहे; व अशा प्रकारें, आधींच जागृत झालेलें या विषयांसंबंधींचें त्यांच्या मनांतील कुतूहल अधिक उत्कट होत आहे. अशा वेळीं, साधारणपणें सुजाण अशा मनुष्यास प्राचीन भारतीय संस्कृतीचें सम्यग्ज्ञान व्हावें म्हणून त्या विषयावर निरनिराळ्या प्रादेशिक भाषांत ग्रंथ निर्माण होणें क्रमप्राप्तच होतें. प्रा. गायधनी आणि डॉ. राहूरकर यांचा हा प्रस्तुत ग्रंथ एका अर्थीं अशा प्रकारचाच आहे. तरीहि, या ग्रंथांतील कांहीं भाग जे मीं वाचले आहेत त्यांवरून या ग्रंथाचा ‘अयं विशेषः’ म्हणून असें सांगतां येईल कीं, भारतीय विद्येच्या (Indology) क्षेत्रांत अगदीं अद्ययावत् झालेलें संशोधन शक्य तोंवर लक्षांत घेऊन त्याच्याच अनुरोधानें-पण त्याबरोबरच त्यामुळें आपल्या ग्रंथास पंडिती जडता येणार नाहीं अशी दक्षता बाळगून–लेखकांनीं आपल्या विषयाचें प्रतिपादन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. म्हणजेच असें कीं, विशेषज्ञ आणि सामान्य जिज्ञासु अशा दोन्ही प्रकारच्या वाचकांचें समाधान व्हावें असा हेतु त्यांनीं मनांत बाळगला आहे.

इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टि हा आधुनिक ज्ञानसाधनेचा एक प्रमुख विशेष समजला पाहिजे. राजे किंवा राजपुरुष यांचीं वैयक्तिक चरित्रें म्हणजेच इतिहास ही संकुचित कल्पना आतां मागे पडली आहे. अखिल समाजाचें सांस्कृतिक जीवन हा आतां इतिहासाचा मुख्य विषय झालेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. केवळ सनावळ्या पाठ केल्या म्हणजे इतिहासाचें शिक्षण झालें असें आतां कोणी मानीत नाहीं. कालगणनेला इतिहासांत महत्त्व नाहीं असें म्हणणें अर्थातच चुकीचें ठरेल. पण एखादी घटना कोणत्या सालीं घडली या प्रश्नापेक्षां ती कोणत्या सामाजिक परिस्थितींतून निर्माण झाली या प्रश्नाकडे आतां इतिहासकारांचें अधिक लक्ष जात आहे. इतिहासविषयक या नवीन दृष्टीची जाणीव प्रस्तुत ग्रंथाच्या लेखकांस निश्चितपणें आहे. आणि तिचा प्रत्ययहि वाचकांस वारंवार येतो. पण निरनिराळ्या ऐतिहासिक घटनांचा परिस्थितिसापेक्ष असलेला विकासक्रम त्यांनीं अधिक कटाक्षानें स्पष्ट करावयास पाहिजे होता असें मात्र म्हणावेसें वाटतें.

इतिहास हा विषयच असा आहे कीं, त्यांतील कांहीं प्रश्नासंबंधीं विद्वानांचें एकमत होणें जवळजवळ अशक्य असतें. कारण त्या प्रश्नांसंबंधीं उपलब्ध असलेल्या साधनांवरून वेगवेगळीं अनुमानें काढणें शक्य असतें. भारताच्या प्राचीन इतिहासांत तर असे प्रश्न अनेक आहेत. त्या प्रश्नांचें विवेचन करतांना प्रा. गायधनी व डॉ. राहूरकर यांनीं कुठल्याहि प्रकारचा आग्रह किंवा अभिनिवेश दाखविलेला नाहीं ही गोष्ट योग्यच आहे. पण कांहीं प्रश्नांसंबंधीं तरी साधकबाधक पुरावा लक्षांत घेऊन लेखकांना आपलें मत अधिक ठामपणें मांडतां आलें असतें असें वाटल्यावांचून राहात नाहीं. अर्थात्, एकंदर विषयाची व्याप्ति आणि संकल्पित ग्रंथाची अपरिहार्यपणें निश्चित करावी लागलेली मर्यादा या गोष्टीमुळें त्यांना आपलें प्रतिपादन पुष्कळ ठिकाणीं आखडतें घ्यावें लागलें असणें अशक्य नाहीं.

प्रा. गायधनी व डॉ. राहूरकर हे दोघेहि भारतीय विद्येचे साक्षेपी अभ्यासक आहेत. प्रस्तुत ग्रंथ लिहितांना त्यांनीं परिश्रमहि पुष्कळच घेतले आहेत हें स्पष्ट दिसतें. त्यामुळें ज्यांच्यासाठीं मुख्यतः हा ग्रंथ लिहिला आहे ते वाचक या ग्रंथाचें स्वागतच करतील असा मला विश्वास वाटतो.

पुणें विद्यापीठ,
पुणें ७.
३१-७-५५

रामचन्द्र नारायण दांडेकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

प्राचीन भारताच्या राजकीय व सांस्कृतिक इतिहासाची वाचकांना सुबोध माहिती करून देण्यासाठीं प्रस्तुतचा ग्रंथ लिहिला आहे. इतिहासलेखन सांस्कृतिक दृष्टिकोनांतून केलें जावें हें मत आतां सर्वमान्य झालें आहे. त्या दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथांत प्राचीन भारताच्या सांस्कृतिक जीवनावर भर दिलेला आहे. इतिहासांतील विविध घटनांचें केवळ वर्णन किंवा निवेदन न करतां त्या घटनांमागील पार्श्वभूमि विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्यें मतभिन्नता असणें स्वाभाविक आहे. सामाजिक शास्त्रामध्यें कोणतेंही मत अंतिम सत्य म्हणून निरपवादपणें मांडणें शक्य नसतें. भारताचा प्राचीन इतिहास हा अद्यापिही बराचसा अज्ञात आहे. या इतिहासांतील कित्येक घटनांचे स्थलकालनिर्णय अद्यापही निर्विवादपणें प्रस्थापित झालेले नाहींत. ठिकठिकाणीं उत्खनन व संशोधन होत असून त्यामुळें जुन्या विचारांना धक्के बसत आहेत. थोडक्यांत, आपल्या ज्ञानांत रोजची सारखी भर पडत आहे. त्यामुळें अशा इतिहासांत निरनिराळे वाद व मतें यांचा उल्लेख टाळणें अशक्य असतें. पण त्यामुळें सामान्य वाचकांचा गोंधळ होतो. म्हणून विद्वत्तेला थोडीशी मुरड घालूनही हा ग्रंथ सुबोध करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळें या ग्रंथांत कांहीं दोष निर्माण झाले असतील याची लेखकांना जाणीव आहे. पण त्याचें कांहीं समर्थन करण्याची जरुरी नाहीं.

पुणें विद्यापीठानें कला व शास्त्र शाखांतून मराठी माध्यमाचा पुरस्कार करण्याचें योजिलें असून त्याची अंमलबजावणी चालू शैक्षणिक वर्षापासून होत आहे. या अभिनंदनीय उपक्रमाचें यश विद्यापीठाच्या अभ्यासक्रमानुसार मराठींत लिहिलेल्या क्रमिक पुस्तकांवर प्रायः अवलंबून आहे. पुणें विद्यापीठाच्या कलाशाखेंतील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ‘Ancient Indian History and Culture’ या विषयाचा अभ्यास करावा लागतो. अशा विद्यार्थ्यांसही क्रमिक पुस्तक म्हणून उपयोगी पडावें ही दृष्टि ग्रंथलेखनांत ठेवली आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवेदन

त्यामुळेंच भारताच्या प्राचीन इतिहासाचा कालखंड इ. स. १००० पर्यंतच आणून ठेविला आहे. भारतीय संस्कृतीचा बाह्यविस्तार व संस्कृतीचीं वैशिष्ट्यें यावर स्वतंत्र प्रकरणें लिहून हा विषय परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेंच सहा प्रमाणित नकाशे व चित्रें घालून ग्रंथाची उपयुक्तता वाढविली आहे. सुरुवातीस विस्तृत विषयानुक्रमणिका व शेवटीं विशेष नांवांची सूची जोडून संदर्भ शोधण्याची सोय करून दिली आहे.

हा ग्रंथ लिहितांना पूर्वसूरींचा भरपूर उपयोग करून घेतला आहे. तळटीपांतून त्यांचा उल्लेख करणें अवघड होईल म्हणून टाळलें. परंतु त्या सर्वांचें कृतज्ञतापूर्वक ऋण मान्य करण्यास लेखकांस आनंद व अभिमान वाटतो. अर्थात् ग्रंथांतील प्रमादांमध्यें पूर्वाचार्यांचा कांहींही वांटा नसून त्याबद्दल लेखकच सर्वस्वी जबाबदार आहेत विद्वानांनीं या ग्रंथांतील दोषस्थलें दर्शविल्यास पुढील आवृत्तींत सुधारणा करण्यास त्यांचा साभार उपयोग केला जाईल असें सविनय आश्वासन देतों.

पुणें विद्यापीठांतील संस्कृत विभागाचे प्रमुख व भारतीय संस्कृतीचे एक गाढे अभ्यासक व संशोधक डॉ. रा. ना. दांडेकर यांनीं आपल्या बहुविध कार्यव्यग्रतेंतून फुरसत काढून या ग्रंथास पुरस्कार लिहून दिल्याबद्दल आम्ही त्यांचें अत्यंत आभारी आहोंत.

या ग्रंथांत घालण्यासाठीं आवश्यक ते नकाशे सुबक रीतीनें करून दिल्याबद्दल चित्रकार श्री. सोवनी यास धन्यवाद दिले पाहिजेत. तसेंच ग्रंथाच्या प्रकाशनाची सर्व जबाबदारी स्वीकारून आम्हास उपकृत केल्याबद्दल कॉंटिनेंटल प्रकाशन संस्थेचे मालक व आमचे मित्र श्री. अनंतराव कुळकर्णी यांचेही आभार मानतों.

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना या ग्रंथाचा उपयोग झाल्यास आमचा हा प्रयत्न यशस्वी झाला असें मानतां येईल.

नागपंचमी, शके १८७७.
पुणें

र. ना. गायधनी
व. ग. राहूरकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

अनुक्रमणिका

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण पहिलें—(विषय–प्रवेश) पृ. १ ते ५.

संस्कृति म्हणजे मूळ स्थितींत घडवून आणलेला इष्ट बदल—कोणत्याही मानवगटानें निर्माण केलेली देशकालविशिष्ट जीवनपद्धति म्हणजे संस्कृति—निसर्ग व मानव यांच्या संघर्षांतून संस्कृति निर्माण होते—आध्यात्मिक व भौतिक उन्नति हीं व्यापक अर्थानें एकाच संस्कृतीचीं अंगें होत—प्रांझ् ब्रोस याच्या मतें संस्कृतीचीं तीन अंगें—लोकशाहीच्या नव्या युगांत इतिहास हा लोकांचा, लोकांनीं घडविलेला असला पाहिजे म्हणजेच तो सांस्कृतिक इतिहास असला पाहिजे—भारताचा विस्तार व भारतीय संस्कृतीचा अतिभारतीय विकास.

प्रकरण दुसरें—(प्राचीन इतिहासाचीं साधनें) पृ. ६ ते ८.

भौतिक साधनें—१ जुन्या वस्तूंचें व वास्तूंचें अवशेष, २ नाणीं, ३ आलेख (Inscriptions). वाङ्मयीन साधनें—४ धार्मिक वाङ्मय (वेद, धर्मसूत्रें, स्मृति, अर्थशास्त्र, रामायण, महाभारत इ.), ५ लौकिकवाङ्मय (अठरा पुराणें, उपपुराणें, राजवंश, चरित्रें, पाली दीपवंश, महावंश; कल्हणाची राजतरंगिणी, बाणभट्टाचें हर्षचरित इ. ऐतिहासिक ग्रंथ; काव्यें व नाटकें यांतील उल्लेख), ६ परकीय प्रवाशांनीं लिहिलेलीं वर्णनें.

प्रकरण तिसरें—(अश्मयुगीन भारत) पृ. ९ ते १५.

१ जुनें अश्मयुग—प्राथमिक अवस्थेंत मानवाचीं हत्यारें व अवजारें मुख्यतः लाकूड, हाडें व पाषाण यांपासून बनविलेलीं असत. या युगांत भारतांत मनुष्यवस्ती होती— गोदावरी, नर्मदा, साबरमती यांच्या खोऱ्यांत अवशेष—हत्यारासाठीं काळा कठीण बिलोरी दगड वापरीत—जीवन भटकें, एकाकी व रानटी—लोक भारतीय अनार्य व आदिद्रविड —खुजे, चपट्या नाकाचें, बसक्या चेहऱ्याचें.

२ नवें अश्मयुग—काळ्या रंगाच्या अग्निजन्य खडकाचा वापर—पटाशी, आऱ्या, तासणी, कुऱ्हाडी, मुसळें इत्यादि हत्यारें व अवजारें,—मातीचीं भाजलेली भांडीं— अन्न शिजविणें—पूर्वींच्या गुहेसारखीं घरें—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकार, मासेमारी, फासेपारधी इत्यादि जीवनवृत्ति होती—पशुपालन—शेतीचा शोध—प्रगतीचीं पावलें—प्रेतें पुरण्याची पद्धत—पितृपूजा, लिंग-पूजा, वृक्षपूजा, सर्पपूजा, मूर्तिपूजा सुरू झाल्या. या संस्कृतीचें वारस पूर्वेकडील नाग, काचार, खाशी लोक, गोंड, संथाळ, शबर, मुंड, ओरायन, कुरुंब इ. जमाती होत.

प्रकरण चौथें—(सैन्धव संस्कृति) पृ. १६ ते २७.

सिंध, काठियावाड, राजपुताना, भावलपूर, अफगाणिस्तान व बलुस्तान येथें व विशेषतः मोहेंजोदारो व हराप्पा येथील अवशेष महत्त्वाचें—नगररचना—गृहरचना—ड्रेनेज—स्नानगृह—लोकांची राहाणी—व्यवसाय—व्यापार—मनोविनोदनें—मुद्रा व लिपि, धर्म व समजुती—कालनिर्णय—या संस्कृतीचे निर्माते—आर्यपूर्व द्रविड किंवा पणि हे असावेत—या संस्कृतीनें आपला वारसा भारताला दिला आहे.

प्रकरण पांचवें—(ऋग्वेद-काळ) पृ. २८ ते ६३.

नव्या युगाचा आरंभ—आर्यांचें मूलस्थान—पाश्चात्य पंडित, लो. टिळक, मॅक्समुल्लर, दास, पावगी इत्यादींचीं मतें—विंक्लेअरचें बोगोझ-कोई येथील उत्खनन—आर्यांचें आगमन – राजकीय घटना—जीवनाला स्थैर्य—वैदिक आर्यांची राजकीय व सामाजिक क्षेत्रांत प्रगति. भरत व तृत्सु यांच्या गटांचें नेतृत्व सुदास् राजाकडे व पौरोहित्य वसिष्ठाकडे—यांच्याविरुद्ध पुरु, अनु, द्रुह्यु, यदु व तुर्वश हे पंचजन आणि पक्थ, भलान, अलिन, विषाणिन् व शिव हे पांच अनार्य राजे यांनीं चढाई केली. या दाशराज्ञ युद्धांत सुदासाचा विजय. आर्य-अनार्य या सांस्कृतिक संघर्षांत आर्य यशस्वी—सांस्कृतिक संघर्षाचें रूपांतर संस्कृतिसंगमांत झालें. राजकीय अवस्था—सामाजिक संस्था—राजाला लोकमत मानावें लागे—आर्यांची राहाणी—आहार – कुटुंबव्यवस्था—स्त्रियांचा सामाजिक दर्जा—वैवाहिक विधि—शिक्षण पद्धति—वर्णव्यवस्था—कला व शास्त्रें यांतील प्रगति— मनोविनोदनाची साधनें—आर्यांची आर्थिक परिस्थिति—व्यापार-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदीम—उद्योगधंदे, (सुतारकाम, धातुकाम, विणकाम, कातडकाम इ.) —नीतिकल्पना व तत्त्वज्ञान—मरणोत्तर जीवन—यज्ञसंस्था—आर्यांचा धर्म—देवदेवता—ऋग्वेदाचा काल.

प्रकरण सहावें—(वैदिक वाङ्मय) पृ. ६४ ते ७४.

संहिता—ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद – ब्राह्मणें म्हणजे यज्ञशास्त्रग्रंथ—उपनिषदें—भारतीय विचारांवर विलक्षण छाप—वेदांगें—शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त छंद व ज्योतिष.

प्रकरण सातवें—(ब्राह्मण–युग) पृ. ७५ ते ९९.

आर्यांचीं प्रादेशिक राज्यें—राजकीय परिस्थिति—सामाजिक परिस्थिति—वर्णव्यवस्था—आश्रमव्यवस्था— गृहांतर्गत आयुष्य—विवाहसंस्था—अंत्यसंस्कार—आर्थिक परिस्थिति—कला व शास्त्रें—धर्मकल्पना—तत्त्वज्ञान—कालमर्यादा.

प्रकरण आठवें—(आर्ष काल) पृ. १०० ते ११२.

रामायण—कथावस्तु—सांस्कृतिक महत्त्व—राजकीय परिस्थिति—सामाजिक परिस्थिति—महाभारत—महत्त्व—समाज—राजकीय परिस्थिति—धर्मकल्पना—भगवद्गीता.

प्रकरण नववें—(मगध साम्राज्याचा उदय) पृ. ११३ ते १२१.

खिस्तपूर्व सहावें शतक—राजकीय परिस्थिति—अवन्ती, वत्स, कोसल, वृज्जि संघराज्य, मगध येथील राज्यें—अजातशत्रु—नंदवंश—महापद्म नंद व त्याचे वंशज.

प्रकरण दहावें—(परकीय आक्रमणें) पृ. १२२ ते १२७.

इराणी आक्रमण व परिणाम—ग्रीक आक्रमण—शिकंदराची स्वारी—स्वारीचे परिणाम.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण अकरावें—(नवीन धर्मपंथांचा उदय) पृ. १२८ ते १४१.

पार्श्वभूमि—मक्खली गोशाल, संजय बेलहत्थिपुत्र, केशकंबली इ.—गौतमबुद्ध—त्याची शिकवण—बौद्धसंघ--बुद्ध व समाज–धर्मसभा–धर्मग्रंथ—धर्मप्रसाराचीं कारणें—वर्धमान महावीर—त्याची शिकवण —जैन धर्मग्रंथ—जैनधर्माचा इतिहास.

प्रकरण बारावें—(मौर्यपूर्वकालाचा सांस्कृतिक इतिहास) पृ. १४२ ते १४६.

राज्यव्यवस्था—सामाजिक स्थिति—आर्थिक परिस्थिति - वाङ्मय.

प्रकरण तेरावें (मौर्यकाल) पृ १४७ ते १५७.

प्रास्ताविक – चंद्रगुप्त मौर्य—बिंदुसार—सम्राट् अशोक—कलिंगयुद्ध——अशोकाचा धर्म व धर्मप्रचार—राज्यव्यवस्था—योग्यता --अशोकानंतरचे मौर्यराजे—मौर्यसत्तेच्या विनाशाचीं कारणें.

प्रकरण चौदावें—(मौर्यकालाचें समालोचन) पृ. १५८ ते १७०.

राज्यव्यवस्था—गुणदोष—सामाजिक स्थिति --धार्मिक परिस्थिति——आर्थिक स्थिति—लिपी, शिक्षण व वाङ्मय -शिल्प व कला.

प्रकरण पंधरावें—(अराजक काल) पृ. १७१ ते १८०.

शुंग घराणें,—अग्निमित्रादि दहा राजांनीं ११५ वर्षे राज्य केलें—कण्व घराणें—ग्रीकांच्या स्वाऱ्या—पार्थियन (पल्हव) लोकांच्या स्वाऱ्या—कलिंग देशचा राजा खारवेल.

प्रकरण सोळावें--(शक व कुशान यांच्या स्वाऱ्या) पृ.१८१ते१९२.

शक (सिथियन) लोकांच्या स्वाऱ्या—शक वर्षगणना—विक्रमसंवत्—पश्चिम भारतांतील सत्रप शक—भूमक क्षहरात – नहपान क्षहरात—दीनिकाचा मुलगा ऋषभदत्त—कार्दमक चष्टन—कार्दमक रुद्रदामन्—कुशानांच्या स्वाऱ्या—पहिला व दुसरा कॅडफिसस—कनिष्क—कनिष्काची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मोपासना—धर्मपरिषद्—विद्याश्रय—कनिष्काचा मृत्यु—हुविष्क—पहिला वासुदेव.

प्रकरण सतरावें—(दाक्षिणेंतील राज्यें) पृ. १९३ ते २०२.

आंध्र (आंध्रभृत्य) सातवाहन घराणें—गौतमीपुत्र शातकर्णी—पुलुमायी शालिवाहन—यज्ञश्री शातकर्णी—तामीळ राज्यें—करिकाल चोल—सेंगुत्तुवन चेर—नेदुंजेलियन पांड्य.

प्रकरण अठरावें—(अराजक कालाचें समालोचन) पृ. २०३ते२३८.

राजकीय सिद्धांत—राज्यव्यवस्था—धार्मिक परिस्थिति—वैदिक धर्म — बौद्धधर्म — महायान व हीनयान–जैनधर्म — भागवत धर्म — शैवपंथ — इतर पंथ – सामाजिक परिस्थिति — जातिसंस्था —जातिसंस्थेचे गुणदोष—समाजजीवन — आर्थिक परिस्थिति—नाणीं—शिक्षण — लेखनकला—अभ्यासक्रम—वाङ्मय – कपिल, पतंजली, कणाद, गौतम, जैमिनी, बादरायण, यांचीं षड्दर्शनें – बौद्ध वाङ्मय—अश्वघोष—नागार्जुन – प्राकृतग्रंथ—शंगम् वाङ्मय—धार्मिक गुहाशिल्प—दगडावरील उथळ नक्षीकाम—गांधारदेशीय शिल्पकला — मथुरादेशीय शिल्पकला—वेंगीशिल्प—चित्रकला—अजिंठा—' टेराकोटा ' आकृति—विविध भांडीं.

प्रकरण एकोणिसावें—(गुप्त साम्राज्य) पृ. २३९ ते २५३.

राजकीय परिस्थिति—पहिला चंद्रगुप्त—अखंडविजयी समुद्रगुप्त—वैभवशाली दुसरा चद्रगुप्त–पहिला कुमारगुप्त—स्कंदगुप्त—शेवटचें गुप्त राजे—गुप्तसत्तेच्या विनाशाचीं कारणें—हूणलोक—माळव्याचा यशोधर्मन्—वाकाटक घराणें—इतर राज्यें.

प्रकरण विसावें—(गुप्त कालाचें समालोचन) पृ. २५४ ते २७४.

राज्यव्यवस्था—धार्मिक परिस्थिति—शैवपंथ, शाक्तपंथ यांचा हिंदुधर्मांत समावेश—बौद्धधर्माचा राजाश्रय तुटला—चार बौद्ध तत्त्वदर्शनें—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्तिपूजा, बुद्धाच्या व बोधिसत्त्वांच्या मूर्ति—जैनधर्म—राजाश्रय तुटला —तीर्थकरांच्या पूजेमुळें मूर्तिपूजा रूढ झाली—प्राकृत भाषांची वाढ—सामाजिक परिस्थिति—जातिसंस्था प्रगत झाली—ब्राह्मणांचें महत्त्व वाढलें—अस्पृश्यतेची वाढ—स्त्रियांचा वेदाध्ययनाधिकार नष्ट—विवाह हें जीवित-ध्येय—स्त्रीधनाची वाढ—स्त्रियांना अधिक आर्थिक हक्क मिळाले—एकंदरींत समाज सुखी. आर्थिक परिस्थिति—शेतकी व तदनुषंगिक उद्योगधंदे—वेगवेगळीं पिकें—कापडांचे विविध प्रकार—अंतर्गत व बाह्य व्यापाराची भरभराट—एकूण आर्थिक सुबत्ता होती. शिक्षण व वाङ्मय - शिक्षण मुख्यतः ब्राह्मणांच्या हातीं असे—बौद्धविहारांतून शिक्षणप्रसार—धंदेशिक्षण, कलाशिक्षण, इतर शास्त्रांचें ज्ञान—संस्कृत भाषेला राजाश्रय त्यामुळें तिला राष्ट्रभाषेचा दर्जा प्राप्त झाला. भारताचा संस्कृतिवृक्ष या काळांत मोहोरला होता. पुराणें व उपपुराणें याच काळांत लिहिलीं गेलीं. अनेक स्मृतिग्रंथ, तत्त्वज्ञानग्रंथ निर्माण झाले.—कविकुलगुरु कालिदासाचें वाङ्मय—विशाखदत्ताचें मुद्राराक्षस-भारवीचें किरातार्जुनीय —दंडीचें दशकुमारचरित व काव्यादर्श, सुबंधूचें वासवदत्ता हें गद्यकाव्य, पंचतंत्र, अमरसिंहाचें नामलिंगानुशासन, वाग्भटाचा अष्टांगसंग्रह, वराहमिहिराचा पंचसिद्धांतिका, पालकाप्याचा हस्त्यायुर्वेद व शालिहोत्राचें अश्वशास्त्र—आर्यभटाचा ज्योतिषग्रंथ, वसुबंधूचा अभिधर्मकोश—बुद्धपलित, चंद्रकीर्ति, आर्यशूर हे ग्रंथकार—दीपवंश व महावंश हे पाली भाषेंतील सिलोनी इतिहासग्रंथ—उमास्वाति व सिद्धसेन हे जैन ग्रंथकार—कलाविलास—स्थापत्य, शिल्प व चित्र या कलांमध्यें विशेष प्रगति—शिल्पकलेचा प्रकर्ष-धातूच्या ओतकामांत आश्चर्यकारक प्रगति. अजंठा बाघ व सिगिरिय येथील चित्रकला—नाणीं विविध प्रकारचीं—समुद्रगुप्त व चंद्रगुप्त यांचीं नाणीं—सांस्कृतिक उत्कर्षाचीं कारणें.

प्रकरण एकविसावें—(गुप्तोत्तरकाल-) पृ. २७५–२८७.

वर्धन घराणें—हर्षवर्धन—साम्राज्याची वाढ—वर्धन घराणें हें भारतीय धर्मसाहिष्णुतेचें उदाहरण होय.—हर्ष हा साहसी योद्धा, कुशल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सेनानी, विद्वानांचा आश्रयदाता व अभिजात कवि होता.—राज्यव्यवस्था—अनेक अधिकाऱ्यांचा उल्लेख—जमिनींच्या उत्पन्नाचा निम्मा भाग राज्यकारभारासाठीं खर्च—राज्यव्यवस्था त्या परिस्थितींत उत्तम—हर्षोत्तर भारताचा इतिहास—माळव्याचा यशोवर्मन्—काश्मीरचा मुक्तापीड—बंगालचें पाल घराणें—दक्षिणेंतील चालुक्य घराणें—महाराष्ट्रांतील राष्ट्रकूट घराणें—कांचीचें पल्लव घराणें—पांड्य घराणें.

प्रकरण बाविसावें (गुप्तोत्तर काळाचें समालोचन) पृ. २८८ ते ३११

राजकीय सिद्धांत—धार्मिक परिस्थिति—हिंदुधर्माला विशाल सामाजिक स्वरूप—शैववैष्णव पंथांत उपपंथ—धार्मिक क्षेत्रांत गुरूला देवत्व—बौद्ध धर्म—उतरती कळा—बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचीं कारणें—बौद्ध धर्माचें परिणाम—जैनधर्म—भारतीय तत्त्वज्ञान, तर्कशास्त्र, स्थापत्य, शिल्प, चित्रकला, संस्कृत वाङ्मय, कन्नड व तामीळ वाङ्मय यांत महत्त्वाची भर—इतर धर्म—सामाजिक परिस्थिति—जातिव्यवस्था दृढमूल—विवाहसंस्था—स्त्रियांचा दर्जा व हक्क—सामाजिक एकता खुरटली—आर्थिक परिस्थिति—शिक्षण व शैक्षणिक संस्था—विविध विद्यापीठें—बौद्ध व जैन विहार—वाङ्मय—भवभूति—महावीर चरित उत्तररामचरित—मालतीमाधव—भट्टनारायणाचें वेणीसंहार—राजशेखर विद्धशालभंजिका व कर्पूरमंजरी—माघाचें शिशुपालवध, भट्टीचें भट्टिकाव्य, भर्तृहरीचें शतकत्रय, अमरूचें अमरुशतक, बाणभट्टाची कादंबरी—चंपूकाव्यें—भर्तृहरीचा वाक्यप्रदीप, जयादित्य व वामन यांची काशिकावृत्ति—वाग्भटाची अष्टांगहृदयसंहिता—गणित व ज्योतिष—ब्रह्मगुप्त—मानसार—शिल्पशास्त्रग्रंथ—आनंदवर्धनाचा ध्वन्यालोक, धनंजयाचें दशरूपक, शुक्रनीति, प्रभाकर मीमांसक, कुमारिलभट्ट—शंकराचार्यांची कामगिरी—वाचस्पतिमिश्र—वाक्पतिराजाचा गौडवहो तामीळ भक्तिकाव्यें—भक्तिवेद—नालायिर प्रबंध हा वैष्णवांचा वेद. चिनी प्रवासी—ह्यूएनत्संग व इत्सिंग—कला विलास—लेणीं, कोरीव शिल्प, मंदिरें, मूर्ति, चित्रकला यांची प्रगति—दक्षिणेकडील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बांधीव देवळें--विमानशिखर व गोपुरें--ओतीव मूर्तिकला--खजुराहो येथील देवळें, विश्वनाथ मंदिर, काश्मीरांतील मार्तंड येथील सूर्यमंदिर – भुवनेश्वर मंदिर – वेरूळची लेणीं व चित्रकला--पुदुकोटा येथील पल्लव-कालीन चित्रकला—दहाव्या शतकांतील बंगाली चित्रकला.

प्रकरण तेविसावें (बृहत्तर भारत) पृ. ३१२ ते ३३२

भारताच्या पूर्वकिनाऱ्यावरून भारतीय व्यापारी, धर्मप्रसारक व धाडसी वीर आग्नेय आशियांतील सुवर्णद्वीपास जात—मलायांतील शैलेंद्रांचें साम्राज्य—सुमात्रा (श्रीविजय)—बोरोबुदूर येथील स्तूप—जाव्हा (यवद्वीप)—हिंदुधर्माचें वर्चस्व—बाली (बलिद्वीप)—कौंडिन्य—हिंदु व बौद्ध धर्म—बोर्निओ—वैदिक धर्म—समाजरचना मनुस्मृतीप्रमाणें—भारतीय धर्माची पूर्ण छाप—बोरोबुदुर शिल्प—चंपा (अनाम) फूनान—कौंडिन्य—भारतीय छाप—कांबोडिया (कंबुज देश)—कंबु स्वायंभुव—श्रुतवर्मन्—इंद्रवर्मन्—राजेंद्रवर्मन्—दुसरा सूर्यवर्मन्— अंगकोर थोम—अंगकोर वाट—सयाम (श्यामदेश) येथें बौद्ध धर्माचें प्राबल्य होतें—ब्रह्मदेश – सिलोन — अफगाणिस्तान—मध्य आशिया—चीन—टोंकिन—तिबेट, कोरिया, जपान.

प्रकरण चोविसावें (संस्कृतीचा वारसा व वैशिष्ट्यें) पृ. ३३३ ते ३४०.

ग्रीस व भारत खिश्चॅनिटी व भारत—जगाला दिलेला वारसा—आशियांतील अनेक भागांत वैचारिक क्रांति—शांततापूर्ण सहजीवनाचा आदर्श—व्यक्ति व समाज यांचा अविरोध विकास—जागतिक लोक-कथांचा भारतीय पाया—गणितशास्त्र, आयुर्वेद, रसायनशास्त्र यांचें भारतीय ज्ञान—उत्कृष्ट व मूल्यवान् वाङ्मय – अध्यात्म व तत्त्वज्ञान—भारतीय संस्कृतीचीं वैशिष्ट्यें—समन्वयाची प्रवृत्ति,– सर्वसंग्राहकता—सहिष्णुवृत्ति — प्रगतिशीलता,—अनेक साम्राज्यांचे उदयास्त हे या संस्कृतीनें पाहिले आहेत. म्हणूनच दिला ‘ सनातन संस्कृति ’ असें गौरवितात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण पहिलें

विषय-प्रवेश

संस्कृति :

संस्कृतिसारख्या भाववाचक शब्दाची निश्चित व्याख्या करणें दुर्घट आहे. संस्कृति म्हणजे संस्कार, मूळ स्थितींत घडवून आणिलेला इष्ट बदल, असा कोशगत अर्थ आहे. संस्कृति शब्दाचा वापर व्यापक व मर्यादित अशा दोन अर्थांनीं व्यवहारांत केला जातो. व्यापक अर्थानें संस्कृतीची व्याख्या अशी देतां येईल : कोणत्याही मानवगटानें निर्माण केलेली देशकालविशिष्ट जीवनपद्धति म्हणजे संस्कृति होय. मनुष्य व्यक्तिशः व समुदायशः स्वतःवर व बाह्य विश्वावर संस्कार करून जी निर्मिति करतो तिचाही अंतर्भाव या संस्कृतींत होतो. निसर्ग व मानव यांच्या संघर्षातून संस्कृतीचा जन्म होतो. प्रतिकूल निसर्गाला मानव आपल्या बुद्धिसामर्थ्यानें इष्ट वळण देतो, म्हणजे निसर्गावर संस्कार करतो व संस्कृति साकार होते. मनुष्य व भोंवतालचें विश्व मिळून निसर्ग होय. या निसर्गावर संस्कार करूनच मानवाची जीवितयात्रा सफल होते. निसर्गावर विजय मिळविण्याची मानवी धडपड अखंड चाललेली असते. जीवन सफल करण्यासाठीं आत्मिक सामर्थ्यांचा विकास व वैश्विक शक्तींवरील स्वामित्वाची प्राप्ति या मानवी क्रिया अव्याहत सुरू असतात. त्यामुळें संस्कृति व प्रकृति (निसर्ग) यांमध्यें विरोधाभास निर्माण होतो. पण अनंतसंस्कारक्षम निसर्गातील सुप्त बीजाचाच विकास मानवी संस्कारानें केला जातो. संस्कृतिसुद्धां कालांतरानें मानवाची प्रकृति बनते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जीवन सफल करण्यासाठीं मनुष्यावरही संस्कार करावें लागतात. मनुष्याच्या शरीराला वळण लावणें, त्याच्या इंद्रियांचें दमन करून तीं आत्मवश करणें, त्याच्या मनाचा विकास करून त्यांतील स्वार्थी, दुष्ट प्रवृत्तींचा नाश करून सत्प्रवृत्तींची वाढ करणें व त्याची ज्ञानशक्ति वाढविणें या क्रियांस संस्कृति किंवा आध्यात्मिक संस्कृति (Spiritual Culture) म्हणण्याची प्रथा आहे. मनुष्यांतील पाशवी वृत्तींचा नाश करून त्याला देवत्वाप्रत नेणें हें संस्कृतीचें प्रधान कार्य आहे. हे संस्कार घडविण्यासाठीं निर्माण केलेले संकेत व संस्था, तसेंच सुसंस्कृत मनाचा आविष्कार करणारी कृति वा निर्मिति, या सर्वांचा समावेश संस्कृतींत होतो. (Culture is the sum total of a people's institutions, customs and arts) धर्म व तत्त्वज्ञान, नीति व कायदा, विद्या, कला व वाङ्मय, सद्गुण व शिष्टाचार यांच्या समुदायाला संस्कृति म्हणतां येईल. नैसर्गिक कामवासनांचें नियमन करण्यासाठीं विवाह व कुटुंबसंस्था निर्माण होते. लोभप्रवृत्तीच्या नियमनासाठीं खाजगी मालमत्ता (Private property) ही संस्था अस्तित्वांत येते. मनुष्याच्या स्वभावांत अधोगतीला व प्रगतीला नेणाऱ्या प्रवृत्ति भरलेल्या आहेत. पारंपरिक अनुभवाच्या संचयांतून प्रत्येक गटाचीं जीवनमूल्यें निर्माण होतात. त्यांच्या निकषावर प्रत्येक प्रवृत्तीची इष्टानिष्टता ठरवून इष्टांची वाढ व अनिष्टांचें दमन करावें लागतें. हीं जीवनमूल्यें चिरंतन असतात, पण प्रत्येक मानवगटाला त्यांचा शोध करून ती गटांत रुजवावीं लागतात. हा मूल्यस्थापनांचा इतिहास म्हणजे मानवजातीचा इतिहास होय.

भौतिक शक्तींचें नियमन करून त्यांना मानवाच्या सुखासाठीं राबविणें, नैसर्गिक रानटी राहणींतून प्रगत होणें यांस सुधारणा (Civilization) किंवा भौतिक संस्कृति (Material Culture) म्हणण्याची प्रथा आहे. मानवी जीवनाच्या भौतिक साधनसामुग्रीस भौतिक संस्कृति म्हणतां येईल. सुधारणा म्हणजे उपभोगाच्या साधनांचा विकास व त्यांच्या संख्येंतील वाढ होय. जीवन सुखी व समृद्ध करणाऱ्या बाह्य परिस्थितीची वाढ सुधारणेंत अभिप्रेत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनुष्य व बाह्य विश्व हा फरक काल्पनिकच आहे. वस्तुतः मनुष्य स्वतः विश्वापासून अलग नाहीं. मानव व निसर्ग यांच्या परस्परांवर क्रिया व प्रतिक्रिया अव्याहत रीतीनें होत असतात. तसेंच बाह्य विश्वावर संस्कार करतांना मनुष्यावरहि संस्कार होतात. त्यामुळें भौतिक व आध्यात्मिक या संस्कृतीच्या दोन बाजू आहेत, त्यांच्यांत पूर्ण पृथक्त्व नाहीं. व्यापक अर्थानें आध्यात्मिक व भौतिक भागांचा बोध एकाच संस्कृति (Culture) या शब्दानें होतो. संस्कृति शब्दानें पुढील गोष्टी अभिप्रेत आहेत. जीवनाच्या विविध शाखांत मानवानें केलेली प्रगति, रानटी अवस्थेंतून नागरी जीवनाकडे केलेली वाटचाल, उद्योगव्यवसायामध्यें घडवून आणिलेल्या सुधारणा व वाढ, सामाजिक व राजकीय क्षेत्रांत केलेले विविध प्रयोग, भौतिक शक्तींवर मिळविलेले विजय व त्यांना राबविण्यासाठीं निर्माण केलेलीं साधनें, तसेंच भावना व श्रद्धा यांच्या मूल्यांचा विकास, धर्म व नीति, विचारशीलता व तत्त्वज्ञान.

फ्रांझ् बोस (Franz Boas) यानें संस्कृतीच्या तीन बाजू सांगितल्या आहेत :

(१) निसर्ग आणि मानव यांच्यांतील विविध संबंध, अन्नाचें अर्जन व रक्षण, आश्रय तयार करणें व रक्षणाचीं साधनें निर्माण करणें, निसर्गांतील वस्तु उपयुक्त स्वरूपांत परिवर्तित करून वापरणें नैसर्गिक परिस्थितीचा उपयोग व नियंत्रण करणें किंवा त्यांच्या योगानें नियंत्रित होण्याचे विविध मार्ग शोधून काढणें. (२) माणसामाणसामधले संबंध. एकाच गटांतील व्यक्तींचे पारस्परिक संबंध आणि भिन्न गटांतील व्यक्तींचे अन्योन्य संबंध यांचें नियमन करणारी व्यवस्था. कुटुंब, गण, जाति, अनेक सामाजिक गट यांचीं बंधनें यांत समाविष्ट होतात. दर्जा व वजन यांच्यामुळें उत्पन्न होणारी उच्चनीचतेची परंपरा यांत येते. लैंगिक व वयोजन्य संबंध यांत येतात. राजकीय व धार्मिक संघटना, युद्धकाल व शांतिकाल यांतील सामाजिक गटांचे संबंधही यांत येतात. (३) माणूस व निसर्ग आणि माणसामाणसांमधील संबंध यांच्या योगानें मनुष्याच्या मनांत विशिष्ट प्रकारच्या प्रतिक्रिया उत्पन्न होतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचें स्वरूप बौद्धिक वा भावनाप्रधान असतें. विचार, भावना व क्रिया या रूपांनीं ती प्रतिक्रिया व्यक्त होते. नैतिक, धार्मिक व सौंदर्यविषयक मूल्यें यांत येतात. या सर्वांचा समुच्चय संस्कृति शब्दानें अभिप्रेत असतो. म्हणजे संस्कृति ही जीवनव्यापी कल्पना आहे. मानवी जीवन म्हणजे मानवी संस्कृति. सांस्कृतिक इतिहास म्हणजे मानवी जीवनाचा इतिहास.

इतिहास :

आर्षकालीं इतिहास म्हणजे विभूतींचीं चरित्रें अशी कल्पना होती. त्यामुळेंच रामायण-महाभारतासारखीं इतिहास–काव्यें निर्माण झालीं. राजेशाही व सरंजामशाही यांच्या जुन्या जमान्यांत इतिहास हा मुख्यतः लढाया व तह, वंशावळ्या व सनावळ्या यांनीं भरलेला असे. राजकुटुंब व सरंजामदार यांच्याव्यतिरिक्त इतिहासांत दुसरी व्यक्ति क्वचितच आढळे. राजवाड्यांतील हेवेदावे व कारस्थानें, राजांचें ऐश्वर्य व विलास यापलीकडे इतिहासकाराची दृष्टि जात नसे. पण लोकशाहीच्या नव्या युगांत इतिहासाच्या कल्पनाही लोकाभिमुख झाल्या आहेत. इतिहास हा लोकांचा, लोकांनीं घडविलेला इतिहास असला पाहिजे. त्यांत लोकांच्या सामाजिक व धार्मिक स्थितीचा, त्यांनीं स्थापन केलेल्या संस्थांचा, अर्थार्जनासाठीं त्यांनीं केलेल्या उद्योगांचा, त्यांच्या कलात्मक अभिव्यक्तींचा, सारांश, लोकांच्या जीवनाचा सर्वांगीण परामर्ष त्यांत असला पाहिजे. म्हणजेच तो सांस्कृतिक इतिहास असला पाहिजे ही कल्पना आतां रूढ झाली आहे.

आमुचा भारत :

प्राचीन भारताचा विस्तार आजच्या भारताच्या सीमांपलीकडे झालेला होता. वेदकालीन आर्यांच्या सप्तसिंधूंत काबूल (कुभा) व स्वात (सुवास्तु) या नद्यांचा अंतर्भाव होत होता. कौरवांची माता गांधार (अफगाणिस्थान) देशाची राजकन्या होती. सम्राट् श्रीहर्षाचा मित्र भास्करवर्मा हा कामरूप (आसाम, मणिपूर, त्रिपुरा) देशाचा राजा होता. सम्राट् अशोकाच्या कालापासूनच सिलोन भारतीय संस्कृतीचा एक घटक झालेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्राचीन भारत हिंदुकुश पर्वतापासून आराकान पर्वतापर्यंत पूर्वपश्चिम पसरला होता. उत्तरेस हिमालयापासून दक्षिणेस हिंदी महासागरापर्यंत त्याचा विस्तार होता. भारतीय संस्कृतीनें याही भौगोलिक मर्यादा ओलांडल्या होता. भारताच्या सांस्कृतिक वसाहती आग्नेयेस फिलिपाईन्सपर्यंत पसरल्या होत्या. प्राचीन भारताच्या सांस्कृतिक इतिहासांत या बृहत्तरभारताची माहिती अभ्यासकाला घ्यावी लागेल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण दुसरें

प्राचीन इतिहासाचीं साधनें

भारताच्या प्राचीन इतिहासाचीं साधनें* विपुल व विविध आहेत. त्यांत प्रवरा कांठच्या उत्खननांत सांपडलेल्या ओबडधोबड दगडी हत्यारांपासून अजिंठ्याच्या सुबक लेण्यांपर्यंत, अशोकाच्या शिलालेखापासून बाणभट्टाच्या हर्षचरितापर्यंत सर्वांचाच समावेश होतो. त्या सर्वांचें भौतिक व वाङ्मयीन साधनें असे दोन विभाग आहेत. भौतिक साधनांत (१) पुराण वस्तूंचे अवशेष, (२) नाणीं, व (३) आलेख हीं महत्त्वाचीं साधनें आहेत.

(१) प्रागैतिहासिक माहितीसाठीं पुराण अवशेष हाच इतिहासकारांचा आधार असतो. माणसांचे व प्राण्यांचे सांगाडे, त्यांनीं बनविलेलीं दगडी व धातूचीं हत्यारें, मातीचीं भांडीं, जुन्या वास्तूंचे अवशेष या सर्वांवरून तत्कालीन संस्कृतीचें दर्शन आपणांस होतें. उत्खनन होऊन सांपडलेल्या अशाच अवशेषांवरून भारताच्या एका अज्ञात संस्कृतीची माहिती जगास झाली हें सुप्रसिद्धच आहे. अवशेष सांपडलेल्या भूस्तरावरून त्याअवशेषांनीं व्यक्त झालेल्या संस्कृतीचा कालनिर्णय करणेंहि सोपें जातें. (२) नाणीं (Numismatics) नाण्यांच्या विविध धातू व त्यांवरील कारागिरी यावरून सांस्कृतिक प्रगतीची कल्पना येते. नाण्यांच्यामुळें काळाचा बोध फार स्पष्ट रीतीनें होतो. नाण्यांवरील मुद्रांवरून राजांचीं नांवें व बिरुदें, तसेंच तत्कालीन पोषाख व देवता यांचीही माहिती मिळते. भारतांतील ग्रीक व पार्थियन राजवंशांचा इतिहास नाण्यांमुळेंच उजेडांत आला. (३) आलेख (Inscriptions) शिलालेख, धातुलेख, पत्रें, जुन्या भिंतींवर, दारांवर, वस्तूंवर व नाण्यांवर लिहिलेले विविध आलेख यांचा उपयोग इतिहासाच्या अभ्यासकास होतो. कागदाच्या शोधापूर्वी लिहिण्यासाठीं लोक विटांचा, दगडांचा, व पानांचा उपयोग करीत. नांव चिरंतन करण्यासाठीं शिलालेख व ताम्रपट लिहिले गेले. या शिलालेखांच्या साहाय्यानें अनेक राजांना इतिहासांत स्थान प्राप्त

---

* तक्ता पान आठवर पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झालें आहे. खारवेल, रुद्रदामन् व यशोधर्मन् यांचे शिलालेख याचीं उत्तम उदाहरणें आहेत. अशोकाचे शिलालेख व समुद्रगुप्ताचा शिलालेख इतिहासांत अपूर्व आहेत. दक्षिणेकडील मंदिरांतून आढळणारे चोलकालीन शिलालेख दक्षिण भारताच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीवर उत्तम प्रकाश पाडतात. बरेचसे आलेख प्रशस्तीच्या स्वरूपाचे असल्यानें त्यांची सत्यता अन्य पुराव्यानें पडताळून पाहावी लागते.

वाङ्मयीन साधनांचें वर्गीकरण पुढीलप्रमाणें करतां येईल : (४) धार्मिक—हिंदूंचें वेदवाङ्मय, धर्मसूत्रें व स्मृति, अर्थशास्त्र व रामायण—महाभारत यांमधून इतिहासाच्या जुळणीला खूपच मदत मिळते. बौद्ध व जैन धर्मग्रंथांतूनही इतिहासाचीं साधनसामुग्री विखुरलेली आहे. (५) लौकिक वाङ्मय—अठरा पुराणें व तितकींच उपपुराणें यांमधून आढळणाऱ्या राजवंशावळी, वंशेइतिहास व राजर्षिचरित्रें, पाली दीपवंश व महावंश बखरी, कल्हणाची राजतरंगिणी, बाणभट्टाचें हर्षचरित इ. ऐतिहासिक ग्रंथ, काव्यें व नाटकें यामधून येणारे उल्लेख यांचाही उपयोग इतिहासकाराला होतो. (६) परदेशी प्रवाशांनीं लिहून ठेविलेलीं इतिवृत्तें. अलेक्झांडरच्या स्वारीपासून राजनैतिक प्रतिनिधी किंवा यात्रेकरू असे अनेक ग्रीक, चिनी व मुसलमान प्रवासी येथें येऊन गेले. त्यांनीं येथील परिस्थिति समक्ष पाहिली व अनुभविली. निःपक्षपाती परदेशस्थांनीं लिहिल्यामुळें त्यांची माहिती बरीचशी अविकृत आहे; मेगॅस्थिनीसचें ‘ इंडिका ’, ह्युएनत्सांगचें प्रवासवर्णन इ. इतिहासाचीं अनुपम साधनें आहेत.

या सर्व साधनांमध्यें कमीजास्त गुणदोष आहेत. त्यामुळें त्यांच्यावरून मिळणारी माहिती परस्परांशीं पडताळून मगच विश्वसनीय मानतां येते. वाङ्मयीन साधनें काव्यात्म असल्यानें त्यांमधून बरीचशी अतिशयोक्ति आढळते. तसेंच बहुतेकांतून कालानुक्रमाची सुसंगति ठेवली गेली नाहीं. त्यामुळें कालविपर्यय होऊन अनेक घोटाळे होतात. परकीय स्वाऱ्यांनीं कित्येक मौलिक साधनें कायमचीं नाहींशीं झालीं आहेत. त्यामुळें इतिहासांत अधून मधून अज्ञात कालखंड निर्माण झाले असून संपूर्ण, सुसंगत इतिहास लिहिण्याचें कार्य बरेंच दुर्घट झालें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

भारतीय इतिहासाचीं साधनें



Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण तिसरें

अश्मयुगीन भारत

१ जुनें अश्मयुग :

आद्य मानवाच्या जन्मापासून सांस्कृतिक इतिहासाची सुरुवात होते. उत्क्रान्तवादाच्या नियमाप्रमाणें विकास होत पशुयोनींतून मानव जन्माला आला. या विस्तीर्ण जगाच्या पाठीवर पहिल्या मानवाचा जन्म कोणत्या देशांत झाला हा प्रश्न मनोरंजक असला तरी अशास्त्रीय आहे. कारण मानवाच्या जन्मकालीन पृथ्वीची मांडणी आज शिल्लक उरलेली नाहीं. अनेक उत्पातांनीं पृथ्वीचा नकाशा संपूर्ण बदलून गेलेला आहे. आद्य मानवाचा जन्म कोठेंही झाला असला तरी आपल्या जीवनासाठीं त्याला निसर्गशक्तीशीं महान् संघर्ष करावा लागला. घनदाट अरण्यें, विस्तीर्ण दलदलीचे भूभाग, अजस्र व क्रूर पशुसंघ या सर्वांमुळें त्याचें जीवित सदैव धोक्यांत असे. शारीरिकदृष्ट्या मानव हा अत्यंत दुबळा प्राणी आहे. त्यामुळें सुरुवातीस त्यानें पशूंची शिकार करण्याऐवजीं पशूच त्याची शिकार करीत. त्यांच्यापासून स्वसंरक्षण करण्यासाठीं मानवाला आपल्या बुद्धीनें हत्यारें बनविणें वा इतर कांहीं योजना करणें भागच होतें. आत्मिक सामर्थ्याची वाढ व वैश्विक शक्तीवर प्रभुत्व मिळविणें ही मानवाची मूलभूत गरज होती. सुखोपभोगांसाठीं मानवानें निसर्गावर संस्कार केलेले नसून जगण्यासाठीं आवश्यक म्हणूनच जीवनसंघर्ष केला. याच संघर्षातून संस्कृतीचा उदय झाला.

प्राथमिक अवस्थेंत मनुष्याचीं हत्यारें व अवजारें मुख्यतः लांकूड, हाडें व पाषाण यांच्यापासून बनविलेलीं असत. त्यांचे अवशेष आजही उत्खननांतून मिळतात. त्यावरून तत्कालीन मानवीं संस्कृतीचें अनुमान करावें लागतें. त्या कालखंडास 'अश्मयुग' असें अन्वर्थक नांव देतात. हा काल सुमारें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सहा लाख वर्षांचा असल्यानें अभ्यासाच्या सोयीसाठीं त्याचें जुनें अश्मयुग (खिस्तपूर्व सुमारें ६००,००० ते २०,०००) व नवें अश्मयुग (खिस्तपूर्व २०००० ते खिस्तपूर्व ५०००) असे दोन विभाग करतात.

जुन्या अवशेषांवरून भारतामध्यें जुन्या अश्मयुगांत मनुष्यवस्ती होती असें निश्चितपणें समजते. असें अवशेष आंध्र, हैदराबाद व मद्रास प्रांतांत विस्तृत ठिकाणीं आढळले आहेत. गोदावरी, नर्मदा, साबरमती यांच्या खोऱ्यांतही असे अवशेष मिळाले आहेत. वायव्य हिंदुस्थानांत उत्खननामध्यें त्यांचा पुरावा मिळाला आहे. गंगानदीच्या खोऱ्यांत मात्र असे अवशेष अद्याप मिळाले नाहींत. जुन्या अश्मयुगांतील भारतीयांचीं हत्यारें व अवजारें लांकडें, पशूंचीं हाडें व दगड यांचीं असत. हत्यारांसाठीं भारतीय माणूस काळा कठीण बिलोरी दगड (Quartzite stone) विशेषत्वानें वापरीत असे. दक्षिणेच्या पठाराच्या बाजूस असा खडक विपुलतेनें आढळतो. त्यामुळें पूर्वघाटामध्यें मनुष्यवस्तीच्या खुणा प्रामुख्यानें आढळतात. पशूंना मारण्यासाठीं, झाडें तोडण्यासाठीं व कंदमुळें खणण्यासाठीं मानव विविध प्रकारचीं हत्यारें व अवजारें बनवी. त्यामध्यें परशु, भाल्यांचीं पातें, घर्षणी, कुदळी, घण, बाणांचीं अग्रें इत्यादि विविध आयुधें सांपडतात. अशीं हत्यारें शिलांना छाटून अगर शिलांच्या टवक्यापासून हातानें बनवीत. त्यामुळें तीं अगदीं ओबडधोबड व कामचलाऊ असत. हत्यारांना धार लावणें, दांड्यासाठीं भोंक पाडणें किंवा दगड घडविणें या कला माणसाला अद्याप अवगत झाल्या नव्हत्या. त्याचें जीवन भटकें, एकाकी व रानटी होतें. अन्नासाठीं व शिकारीसाठीं तो दूरवर भटकत राही. एका ठिकाणीं तो कधींच राहात नसे. हिंस्र पशूंच्या भीतीनें तो डोंगराच्या कपारी व गुहा यांमध्यें आश्रय घेत असे. कंदमुळें व शिकार यांवर तो उदरनिर्वाह करी. मेलेल्या जनावरांचें व क्वचित् माणसांचें मांसही खाण्यास तो कचरत नसे. या युगाच्या उत्तर कालांत माणसाला विस्तव पाडण्याची कला अवगत झाली. लांकडावर लांकूड घांसून किंवा गारगोटीच्या साहाय्यानें तो अग्नि निर्माण करूं लागला. अशा रीतीनें निसर्गशक्तीवर ताबा मिळवून शास्त्रीय प्रगतीचा पाया या युगांत घातला गेला. विस्तवाच्यामुळें हिंस्र प्राण्यांपासून बचाव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याची सोय झाली. अग्नि माणसाचा रक्षक व मित्र बनला. परंतु अन्न शिजविण्यासाठीं मानवाला अग्नीचा उपयोग करतां येत नसे; कारण, त्याच्याजवळ कोठलींच भांडीं नव्हतीं. मेलेल्या वा शिकार केलेल्या जनावरांचें मांस तो कच्चेंच अगर विस्तवावर भाजून खात असे. अन्न-संग्रहाचें ज्ञान नसल्यानें शिकार न मिळाल्यास त्यास अनेक दिवस उपाशी राहावें लागे. जनावरांचीं कातडीं वाळवून तो त्यांचा वस्त्रासारखा उपयोग करी. तशा रानटी अवस्थेंतही अंगभूषा करण्याची आपली हौस तो पानें, फुलें, गवत व पिसें यांनीं पूर्ण करी. पशुपक्ष्यांच्या आवाजांच्या अनुकरणानें त्याची भाषा बनली. शब्द व हावभाव यांनीं परस्पर व्यवहार होत असे. भटक्या वृत्तीमुळें व दुर्लंघ्य नैसर्गिक अडचणींमुळें परस्परविनिमय फारसा होतच नसे. बल्लारी, एडकळ व घाटशिला येथील अश्मयुगीन शिला-चित्रांवरून त्याच्या धर्मकल्पना पिशाच्चवाद व जादुविद्या यांवरच आधार-लेल्या होत्या असें दिसतें. भीतींतून त्याच्या धर्माचा उदय झाला. ज्या ज्या वस्तूची त्याला भीति वाटे तेथें तेथें अमानुष पिशाच्चांचें अस्तित्व कल्पून त्यांना संतुष्ट ठेवण्याचा तो प्रयत्न करी. त्यासाठीं बळी देण्याचीही कल्पना रूढ होती. मेलेल्या माणसांचीं प्रेतें तशींच सडत टाकीत, यावरून पितृपूजेची कल्पना अद्याप त्याला नसावी असें वाटतें.

वर वर्णिलेली प्रगति करण्यास मानवास लक्षावधि वर्षें लागलीं. कारण अनुभवांचा संचय व संक्रमण करण्याची व अशा रीतीनें जुन्या पिढ्यांच्या अनु-भवानें शहाणपणा शिकण्याचीं साधनें त्यावेळीं अत्यंत तोकडीं होतीं. या युगांतील भारतीय अनार्य व आदिद्रविड असून ते निग्रो वंशाचे असावेत. दक्षिण भारतांतील कादीर, पाणियन, शोलाग, इरूल, वेद्द इत्यादि रानटी जमाती या भारतीयांचेच वंशज होत. हे लोक खुजे, चपट्या नाकाचे, बसक्या चेहऱ्याचे, जाड ओठांचे व राठ केसांचे असून रानटी अवस्थेंत पर्वतांच्या दऱ्याकपाऱ्यांतून व जंगलांतून राहतात.

२. नवें अश्मयुग :

भारतीय मानवाची ही प्रगति अखंडित सुरूच होती. कालांतरानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याच्या ज्ञानांत वाढ झाली; त्याच्या हाताला कसब आलें; हत्यारांसाठीं अधिक चांगल्या दगडाची तो निवड करूं लागला; दगड घडवून त्यांना आकर्षक आकार देऊं लागला. त्याच्या जीवनाचें एक नवीन पर्व सुरू झालें. त्या कालखंडास नवें अश्मयुग असें म्हणतात. भारतांत ही सर्व प्रगति क्रमशः होत गेली. जुन्या युगांतून नव्या युगांत जातांना कसलाच खंड पडला नाहीं. हा बदल कोणत्याहि बाह्य उत्पाती घटनांनीं झाला नसून उत्क्रान्तीनेंच घडून आला. भारताच्या बहुतेक प्रांतांत नव्या अश्मयुगाचे अवशेष सांपडले आहेत.

या युगांतील भारतीय प्रामुख्यानें काळ्या रंगाचा अग्निजन्य खडक (Traprock) वापरीत. तो चिवट असल्यानें त्याला घडविण्यास व विविध आकार देण्यास सोपें जात असे. सांपडलेल्या अवशेषांत दगडाच्या पटाशी, आऱ्या, तासणी, कुऱ्हाडी, कोयते, भाल्यांचीं पातीं, मुसळें, घण, कुदळी बाणांचीं अग्रें इत्यादि विविध हत्यारें व अवजारें आहेत.

मानव या युगांत मातीचीं भांडीं करण्यास शिकला. नदीपात्रांतील चिकण मातीला हातानें विविध आकार देऊन विविध उपयोगांसाठीं भांडीं होऊं लागलीं. कालांतरानें तीं भट्टीमध्यें भाजून पक्कीं करण्याची कला मानवाला अवगत झाली. तीं भांडीं साधीं वा रंगीत असत. भांड्यांवर ओली असतांच कोरून नक्शी काढीत किंवा मातीची नक्शी लावीत; विविध प्रकारची माती वापरून, कमीजास्त प्रमाणांत भट्टींत भाजून व वेगवेगळे रंग लावून कुंभार विविध प्रकारचीं, आकाराचीं व रंगाचीं भांडीं करीत असे. कालांतरानें चाकाचा शोध लागून ही कुंभारी कला अधिक रेखीव झाली.

भांड्यांच्या बनावटीमुळें अन्न शिजवून खाण्याची सोय झाली. मातीचें घडे, थाळ्या व मडकीं यांच्या खापऱ्या, पाटे–वरवंटे, उखळ, मुसळ, जातीं यांच्या अवशेषांवरून त्या काळीं पाककलाही चांगलीच प्रगत झाली असावी असें दिसतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अश्मयुगीन माणसें गुहांचा आश्रय सोडून आतां मोकळ्या जागेंत संचार करूं शकत होतीं. तीं गुहेंसारखींच घरें बांधण्यास शिकलीं होतीं. त्यांचीं घरें म्हणजे लांकडांच्या, काटक्यांच्या अगदीं साध्या झोपड्या असत. तीं घरें पानांनीं शाकारीत. कित्येकदां बांबूंच्या भिंती उभारून त्या शेणामातींनीं सारवीत. भिंतींवर कित्येकदां रंगांनीं चित्रेंही काढीत. अशा पांच-दहा झोंपड्यांच्या वाड्या असत व त्या वाड्यांभोंवतीं सांवरीचीं अगर कांटेरीं झुडपांचीं कुंपणें घालीत.

शिकार, मासेमारी, फासेपारधी ही त्यांची जीवनवृत्ति होती. पुढें जनावरें माणसाळवून त्यांना पाळण्याचा व्यवसाय सुरू झाला. कुत्रा, गाई-म्हशी, शेळ्या-मेंढ्या, डुकरें यांचें कळप पाळून गुराखीवृत्तीनें लोक राहूं लागले. पण शिकार व पशुपालन या वृत्ति अशाश्वत असतात. शिवाय जीवनाचा सर्वच वेळ त्यामध्यें व्यतीत होतो. कालांतरानें शेतीचा शोध लागला. उत्पन्नाचें निश्चित साधन माणसाला उपलब्ध झालें. पुढें पुढें माणसाला निरनिराळीं तृणधान्यें, कडधान्यें, डाळी वगैरेंची लागवड करतां येऊं लागली. अनुभवांतीं शेतीला पाणी पुरविण्यासाठीं पाटबंधारे बांधण्याचें ज्ञान माणसाला झालें. विहिरी खणून मोटेच्या साहाय्यानेंही शेती होऊं लागली. शेतीचा शोध मानवी जीवनांत क्रांतिकारी ठरला. शेतीमुळें अन्नाचें विपुल व निश्चित उत्पादन होऊं लागल्यानें माणसाला जीवनाच्या इतर क्षेत्रांत सुधारणा घडवून आणण्यास फुरसत व सामर्थ्य प्राप्त झालें व प्रगतीच्या दिशेनें माणसाचीं पावलें भराभर पडूं लागलीं. शेतीमुळें वस्तुविनिमयाची आवश्यकता भासून देवघेव व व्यापार सुरू झाला. व्यापारामध्यें वस्तूंच्या देवघेवीबरोबरच विचारांचाही विनिमय होऊं लागला. अनुभवांचें संक्रमण होऊन संस्कृतीची वाढ झाली.

दूधदुभत्याचे पदार्थ, मध व धान्यापासून तयार केलेले मद्यार्क व ताडीसारखे मादक पदार्थ यांचा वापर मानवी जीवनांत त्या काळीं सुरू झाला. पोशाक अत्यंत साधा असे. पशूंची कातडीं वापरीत असत. तसेंच झाडांचीं वल्कलें व पानें यांचाही वापर होई. वल्कलें व कातडीं वापरण्याचा प्रघात

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीयांत इतका दृढमूल झाला आहे कीं, वानप्रस्थाश्रमी माणसानें वल्कलेंच वापरावींत असा धर्मनियम झाला. मौंजीबंधनामध्यें ब्रह्मचाऱ्याला अद्यापही हरिणाजिन वापरावें लागतें. पशूंच्या केंसांपासून बुरणुसें विणीत. तसेंच लोंकर विणून कपडे करीत असत. शेती सुरू झाल्यावर कापसाची लागवड होऊन कापसाच्या धाग्यांपासून कापड तयार करण्याचा शोध मानवाला लागला. मानवाची प्रसाधनलालसा तेव्हांही दिसून येते. गुंटकल येथील उत्खननांत एक अश्मयुगीन हस्तिदंती फणी सांपडली आहे. त्यावरून केश-भूषेची कल्पना येते. गोमेद, सूर्यकांत, चंद्रकांत इत्यादि विविध प्रकारचे स्फटिक, गारगोटी, शिंपा, कवड्या व कालांतरानें सोनें यांचा वापर अलंकारासाठीं करीत. सोनार व जवाहिऱ्या यांच्या कसबामध्यें खूप प्रगति दिसून येते. सुतारही औतें व शेतीचीं अवजारें, नावा व तराफे तयार करीत. समाजामध्यें श्रमविभागणी होऊन धंद्यांचें वर्गीकरण होऊं लागलें.

या युगांत प्रेतें पुरण्याची पद्धति रूढ झाली. मरणाची कल्पना नसल्यानें मेलेल्या माणसाचा आत्मा दूरवर प्रवासास गेला असेल अशी समजूत होती. अशा माणसाचें मृत शरीर नीट जपून ठेवण्यासाठीं पुरीत. तेथेंही त्याला सुख लाभावें म्हणून थडगें बांधीत. त्याला तहानभूक लागेल म्हणून नियमितपणें अन्नपाणी घालीत. अशा रीतीनें मृत पूर्वजांची पूजा (पितृपूजा) सुरू झाली. मेलेल्या माणसाच्या आत्म्यानें इहलोकीं परत येऊन मागें जिवंत राहिलेल्या कुटुंबियांना त्रास देऊं नये म्हणून मृत माणसाच्या सर्व वस्तू त्याच्याबरोबरच पुरून टाकीत. स्वत्वाची कल्पना वाढल्यावर कांहीं कांहीं जमातींत जनावरें व मृत माणसाची बायको यांना सुद्धां पुरण्याची प्रथा पडणें स्वाभाविकच होतें. कांहीं कांहीं जमातींत थडग्याऐवजीं एक वा अनेक दगड दफनाच्या जागीं उभें करीत. अशी प्रथा वेगवेगळ्या स्वरूपांत जगभर सर्वत्र आढळून येते. या आत्म्याच्या कल्पनेबरोबरच, पुनर्जन्म व सुखदुःखविवेक व कर्मविपाक यांच्या अस्पष्ट कल्पनाही माणसाला येणें स्वाभाविक होतें. दगडांच्या विशिष्ट आकारांमुळें वा योगायोगानें अनुभवास आलेल्या गोष्टींमुळें त्यांच्या ठिकाणींही दैवी शक्ति असल्याची कल्पना रूढ झाली; व या सर्वजीववादांतूनच लिंगपूजा व वृक्ष-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूजा, सर्पपूजा, मूर्तिपूजा सुरू झाल्या. दगडाबद्दलची ही कल्पना इतकी दृढमूल आहे कीं, आजही देवळांतून दगडाच्याच मूर्ति बसवितात. संन्याशानें मृण्मयपात्रें व काष्ठपात्रेंच वापरावींत, धातुपात्रें वापरूं नये. असे नियम रूढ झाले. देवतांना संतुष्ट करण्यासाठीं त्यांना अन्न व पेय अर्पण करीत. प्रसंगीं पशुपक्ष्यांचें बलिदान करीत व नरबळीही देत. जादूटोणा, मंत्रतंत्र यांचा पगडा रानटी मनावर तेव्हांच बसतो. दृष्ट लागणें, चेटूक करणें, शांतिक करणें इत्यादि अंध समजुती रूढ झाल्या.

या संस्कृतीचे व वंशाचे वारस भारतांत आजही अवशिष्ट आहेत. पूर्वेकडील नाग, काचार, खाशी लोक, गोंडवनांतील गोंड, संथाळ, शबर, मुंड जमाती, दक्षिणेकडील ओरायन, कुरुंब्र इत्यादि जमाती या अश्मयुगीन संस्कृतींत वावरत असतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण चौथें

सैन्धव संस्कृति

अश्मयुगाचा विकास कालांतरानें धातुयुगांत झाला. उत्खननांवरून दक्षिण भारतांत अश्मयुगाची परिणति लोहयुगांत झाल्याचें दिसतें. उत्तरेकडेही हीच परिस्थिति असावी अशी कल्पना बरेच दिवस होती. अश्मयुगाचा शेवट व आर्यांची संस्कृति यांमध्यें बराच अज्ञात कालावधि होता. भारताचा इतिहास या कालखंडांत अज्ञानांधकारांत बुडालेला होता. परंतु १९२१ सालापासून सिंध, पंजाब व बलुचिस्तान यांमध्यें केलेल्या उत्खननांवरून एका नव्या अज्ञात संस्कृतीचा शोध लागला. त्या संस्कृतीला सैंधव संस्कृति असें स्थलवाचक नांव दिलें जातें. या नव्या संस्कृतीचे अवशेष सिंध, काठियावाड, राजपुताना, भावलपूर, अफगाणिस्तान व बलुचिस्तान एवढ्या विस्तीर्ण भूप्रदेशांत सांपडले आहेत. या संस्कृतीचा उत्कर्षकाळ दर्शविणारे अवशेष लारखाना जिल्ह्यांतील डोकरी स्टेशनपासून सात मैलांवर मोहेंजोदारो व पंजाबांतील मॉटगोमरी जिल्ह्यांतील हराप्पा येथें सांपडले आहेत.

नगररचना :

सांपडलेल्या अवशेषांवरून सिंधु नदीच्या खोऱ्यांत ख्रिस्तपूर्व चौथ्या सहस्रकांत एक विशाल नागरी संस्कृति भरभराटीस आली होती असें दिसतें. मोहेंजोदारो व हराप्पा येथें त्याच ठिकाणीं जुन्या अवशेषांवर लागोपाठ सात वेळां नवीन वस्ती झाल्याचा औत्खनिक पुरावा मिळतो. परंतु प्रत्येक वेळीं शहराच्या जुन्या नकाशाबरहुकूम नवीन वस्ती झाली आहे. शहर वसवितांना नगररचनेकडे प्रामुख्यानें व काळजीपूर्वक लक्ष दिलेलें आढळतें. दोन्ही ठिकाणीं नगराच्या पश्चिमेस एका उंचवट्यावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भव्य किल्लेवजा जागा आहे; व तिच्या आसपास गांवठाण, औद्योगिक विभाग, कामगारांच्या वाड्या वसविलेल्या आहेत. गांवांतील रस्ते पूर्व-पश्चिम वा दक्षिणोत्तर असून ते एकमेकांना काटकोनांत छेदतात. गांवाची लहान-मोठ्या पेठवार विभागणी केलेली आहे. अनेक शतकांच्या अस्तित्वांत रस्त्यांवर खाजगी बांधकामाचें अतिक्रमण झाल्याचा पुरावा मिळत नाहीं. रस्ते सरळ व लांबवर असून त्यांची रुंदी ९ ते ३४ फुटांपर्यंत आहे. त्यामुळें औद्योगिक शहराच्या वाढत्या वाहतुकीस ते प्रशस्त वाटतात. सिंधूच्या सपाट खोऱ्यामुळें प्रशस्त नगररचना करण्यास सोपें झालें होतें. सर्वच रस्ते कच्चे आहेत. त्यावरून पावसाळ्यांत तेथें घोटाभर चिखल तर उन्हाळ्यांत घोटाभर धूळ होत असावी. नद्यांच्या खोऱ्यांत दगडाचा अभाव असल्यानें बहुधा पक्के रस्ते करतां आले नाहींत. रस्त्यांच्या वळणांवर इमारतींचे कोपरे काढून त्यांना वर्तुळाकार दिला आहे. त्यामुळें एकदम वळण घेतांना अपघाताची भीति नसे.

गृहरचना :

सर्व बांधकाम पक्क्या भाजलेल्या विटांचें केलेलें आहे. सर्वत्र सांपडलेल्या प्रमाणशीर (११" × ५$\frac{१}{८}$" × २$\frac{१}{२}$") विटांच्या आढळावरून नागरी विटांचा पुरवठा सरकारनियंत्रित असावा असें दिसतें. स्नानगृहाच्या बांधकामांत लहान विटा वापरीत व सर्व बांधकाम कोठेंही पाणी मुरणार नाहीं इतकें पक्कें करीत. सर्वत्र चिकण मातीचा चिखल बांधकामासाठीं वापरलेला आहे. त्यामुळें उत्तरकालीन लोकांना गिलावा काढून जुन्या विटा मोकळ्या करतां आल्या व नवीन बांधकामांस वापरतां आल्या. अशा प्रकारें जुन्या ओस पडलेल्या शहरांच्या विटा चोरण्याची प्रवृत्ति प्राचीनकालीं सर्व पश्चिम आशियाई लोकांत आढळून येते. विशिष्ट कामासाठीं चुना व श्वेतमृत्तिका यांचाही वापर करीत. बांधकामांत एक आडवा व एक उभा अशा पद्धतीनें विटांचे थर रचीत.

सर्व इमारती बाहेरून अत्यंत साध्या दिसतात. बाहेरून घरांना गिलावाही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केलेला नाहीं. त्यामुळें रस्त्यावरून जातांना आजूबाजूस भयाणता वाटते. रस्त्याच्या बाजूला कोणत्याही इमारतीला खिडक्याही नाहींत. शक्यतोंवर घरांचीं प्रवेशद्वारें मुख्य रस्त्यावर न ठेवितां बाजूच्या बोळांत ठेवीत. जणूं त्या भयाण भिंतींच्या आड आपली संपत्ति दडविण्याचीच मालकाला काळजी असे. सामान्यतः प्रत्येक घरांत मधोमध चौक व बाजूला खोल्या असत. प्रवेशद्वाराजवळच देवडीवर पहारेकऱ्याची खोली असे. सामायिक भिंतींचा वाद होऊं नये म्हणून प्रत्येक घर दुसऱ्यापासून अलग असे. दोन घरांमधील बोळीच्या दोन्ही बाजूंस उंच भिंती बांधलेल्या असत. हेतु हा कीं, बोळ-गंडीचा फायदा घेऊन भामट्यानें घरांत शिरूं नये. बहुतेक घरें दुमजली असत. वरच्या मजल्यावर जाण्यासाठीं विटांचे जिने असत. जिन्याला लांकडी पायऱ्या लावीत. घरांना माळवदी छपरें असत. आढ्यावर बांबू, फळ्या व तराटें पसरून त्यांवर जमीन घालीत. क्वचित् सभोंवतीं भिंत बांधून गच्ची करीत. पावसाचें पाणी वाहून जाण्यासाठीं मातीचे पन्हळ लावीत. उष्ण प्रदेशांत रात्रीच्या वेळीं झोंपण्यास अशा माळवदी घरांचा फार उपयोग होतो. तुळया, चौकटी व दारें लांकडांचीं असत. मोहेंजोदारो येथें बहुतेक घरांत पाण्यासाठीं आड असत. गल्लोगल्लीं सार्वजनिक विहिरी असत. सर्व विहिरी विटांनीं मजबूत बांधलेल्या असत. सांडपाणी विहिरींत मुरूं नये म्हणून आजूबाजूला विटांची फरसबंदी केलेली असे. प्रत्येक घरांत मोरी व स्नानगृहें असत. अशीं स्नानगृहें सामान्यतः रस्त्याच्या बाजूला असत. बाहेरील भिंत व स्नानगृह यांच्यामध्यें मोरी ठेवीत. भिंतींतून नहर काढून सांडपाणी तळमोऱ्यांत सोडण्याची व्यवस्था असे. स्नानगृहांना एका बाजूस उतरती फरसबंदी असे, व त्यांतील बांधकाम पक्कें करीत. त्यामुळें पाणी मुरण्याची भीति नसे. पक्की चुनेबंदी करून वर दाट डांबराचा थर देत. खोल्यांतून स्वयंपाक करतांना शेगड्या वापरीत. अन्यथा मधल्या चौकांत स्वयंपाक करीत. तळमजल्यावर स्नानगृहें, कोठीघर व स्वयंपाकघर असे. वरच्या मजल्यावर राहण्याझोंपण्याची व्यवस्था असे. एकंदर अवशेषांचें वर्णन करतांना सर जॉन मार्शल लिहितात कीं :, आपण जणूं लँकेशायरच्या औद्योगिक विभागांतून चाललों आहोंत असा येथें भास होतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गरिबांची व कामगारांची वस्ती शहराच्या बाहेर एका बाजूस असे. कामगारांच्या चाळीसारख्या दिसणाऱ्या कांहीं इमारतींचे अवशेष सांपडले आहेत. अशा चाळींतून प्रत्येक कुटुंबाला १०′ × १३′ अशा दोन खोल्या मिळत. अशाच कामगार विभागाशेजारीं हराप्पा येथें दळण्याच्या जागा बांधलेल्या सांपडल्या. जमिनींत एक मोठें लांकडी उखळ सांपडलें. त्यामध्यें मोठ्या मुसळांनीं धान्य कांडीत व कुटून पीठ करीत. त्याच्यापलीकडे १५०′ × २००′ एवढें विस्तृत धान्याचें गुदाम बांधलेलें आहे. या कामगार वस्तीपलीकडे कुंभार, धातुकाम करणारे व इतर गरिबांचीं घरें असत.

ड्रेनेज :

या शहरांचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे सांडपाणी गांवाबाहेर वाहून नेण्यासाठीं केलेली ड्रेनेजची व्यवस्था होय. प्रत्येक बोळांत व रस्त्यावर विटांनीं बांधलेलीं नहरें आहेत, व त्यांत आजूबाजूच्या घरांतील सांडपाणी तळमोऱ्यांतून आणून सोडलें जाई. घाणीमुळें नहरें तुंबून सांडपाणी रस्त्यांवर वाहूं नये म्हणून ठिकठिकाणीं मलवापी असे. त्यामध्यें घाण सांचल्यावर ती काढून साफ केली जाई. नहरें साफ करतां यावींत म्हणून त्यांवर मोठाल्या विटांचीं झांकणें घालीत. सर्व सांडपाणी शहराबाहेर नदीच्या पात्रांत सोडण्याची व्यवस्था असे. ही सर्वच व्यवस्था स्वच्छता व आरोग्य या दृष्टीनें परिपूर्ण आहे.

स्नानगृह :

किल्लेवजा भागांत एक प्रशस्त बांधीव तलाव आहे. तलाव ४०′×२४′×८′ इतका मोठा असून दोन बाजूंनीं आंत उतरण्यासाठीं पायऱ्या आहेत. लहान मुलांच्या सोयीसाठीं पायऱ्यांजवळ तलावाची खोली कमी केलेली आहे. तलाव पक्क्या विटांनीं चुन्यामध्यें बांधलेला असून वरून श्वेतमृत्तिका व डांबर यांचे पक्के थर दिलेले आहेत. तलाव साफ करण्यासाठीं तळमोऱ्या ठेवलेल्या आहेत. तलावाच्या चोहोंबाजूंस ओवऱ्या असून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांपैकीं तीन बाजूंला कपडे बदलण्यासाठीं लहान खोल्या आहेत. तलावांत पाणी भरण्यासाठीं पूर्वेच्या बाजूस मोठी विहीर आहे.

या स्नानगृहाच्या पलीकडे २३०'×८०' अशा एका विशाल इमारतीचे अवशेष आहेत. तेथील खोल्यांच्या बांधणीवरून ती इमारत सचिवालय अगर विद्यालय असावें. त्याच्या दक्षिणेस वीस खांबी एक चौरस दिवाण-खाना आहे.

या दोन्ही शहरांतील वास्तुकाम साधें, वैविध्यरहित व अनाकर्षणीय आहे. त्यामध्यें सौंदर्यापेक्षां भक्कमपणाकडे अधिक लक्ष दिलेलें आढळतें. एकंदर व्यापारी शहराच्या व्यापारी वृत्तीला साजेसेंच बांधकाम आहे. एकंदरींत रेखीव नगररचना, उत्कृष्ट ड्रेनेजपद्धति, शहरांतील कचरा हालविण्याची व्यवस्था, रस्त्यांवरील दिवाबत्तीची सोय, इत्यादि विविध गोष्टींवरून हीं सर्व कामें कसोशीनें करणारी शासनसंस्था तेथें दीर्घकाल अस्तित्वांत असावी असें दिसतें.

लोकांची राहणी :

तेथें सांपडलेल्या इतर अवशेषांवरून तत्कालीन लोकांच्या जीवनावर उत्तम प्रकाश पडतो. स्त्रीपुरुषांचा पोषाख अगदीं साधा व मामुली असे. पुरुष कमरेभोंवतीं धोतर नेशीत व डाव्या खांद्यावरून उजव्या हाताखालीं उपरण्यासारखें वस्त्र वापरीत. स्त्रिया गुडघ्याइतका घागरा घालीत व वरतीं एक वस्त्र पांघरीत. स्त्रियांच्या डोक्यावर पंखाकृति शिरोभूषण असे. पायांत कांहींही घालण्याची पद्धत नसावी. बहुतेक सर्व कपडे कापूस विणून करीत. आंगरख्यावर पुष्कळदां भरतकाम करीत असत. याखेरीज लोंकर, ताग व इतर वस्त्रेंही वापरीत.

पुरुष कल्लेदार मिशा व सुळसुळीत दाढी राखीत. दाढी ठेवण्याच्या विविध फॅशन्स होत्या. कित्येकदां मिशा कापून टाकीत. डोक्यावर केंस वाढवून त्यांची निगा राखीत. वेगवेगळ्या तऱ्हेनें भांग पाडीत व केंसांचे पेड आगवळानें मागें बांधीत. क्वचित् डोक्यावरही केंसांची गांठ आणीत. केंस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चापून बसविण्यासाठीं आंकड्यांचा सर्रास उपयोग करीत. हस्तिदंती कंगवे केंसांत खोवून ठेवण्याचीही रीत असे. स्त्रिया सौन्दर्यप्रसाधनाकडे विशेष लक्ष पुरवीत. विविध अंगराग, चूर्णें व काजळ यांचा भरपूर उपयोग करीत. ब्राँझचे गुळगुळीत आरसे वापरीत. एका सौंदर्यमंजूषेंत कानकोरणीं, लहान चिमटे, टांचण्या इत्यादि वस्तू सांपडल्या.

अलंकारांनीं शरीरभूषा करण्याची स्त्रीपुरुषांना सारखीच आवड दिसून येते. शरीर रंगवीत, गोंदवीत व अलंकारांनीं भूषवीत. सोनें, चांदी, सुवर्णरौप्य, तांबें, ब्राँझ्, हिरे, माणकें, मोतीं, मणि इत्यादि विविध वस्तूंचे अलंकार करीत. अनेक सरांच्या कंठमाला, मुक्ताहार, कडीं, अंगठ्या, बाजूबंद इ. सारेच स्त्रीपुरुष वापरीत. कमरपट्टे, कर्णफुलें, मुगड्या, डूल, पैंजण, नाकांतील चमकी इ. अलंकार स्त्रिया वापरीत. अलंकारांची विविधता व त्यांतील कसब पाहतां त्या काळीं सोनाराची कला बरीच प्रगत झालेली दिसते. गरिबांचे अलंकार चिनीमाती, शिंपले, कवड्या, मणि, फेअन्स (Faience) इत्यादिकांचे असत. स्त्रियांमध्यें दंडापर्यंत बांगड्या घालण्याची पद्धत दिसून येते.

गहूं, जव, दूधदुभतें, भाजीपाला, फळफळावळ, विविध पशूंचें मांस व मासे, खेंकडे,कांसव यांच्यापासून विविध पदार्थ खाण्यासाठीं त्यांच्या स्वयंपाकघरांतून तयार करीत. उखळ, मुसळ, पाटावरवंटा, जात्याच्या तळ्या इत्यादि-कांच्या अवशेषांवरून पाकशास्त्राची संपन्नता दिसते. मातीचीं विविध प्रकारचीं भांडीं बनवीत. कांहीं रंगविलेलीं तर बरीचशीं साधींच दिसतात. रंगवितांना दाट तांबडा रंग देऊन त्यावर काळ्या रंगानें विविध आकृत्या, चित्रें व देखावे रंगवीत. सर्व भांडीं चाकावर घडविलेलीं व पक्कीं भाजलेलीं असत. त्यावरून कुंभारी कला बरीच प्रगत झालेली दिसते. भांड्यांच्या घडणींत कलेपेक्षां उपयोगालाच प्राधान्य दिलेलें आढळतें. प्रत्येक गोष्टींत उपयोगाच्या दृष्टीनें पाहण्याची मारवाडी वृत्ति हा जणूं तेथील लोकांचा **स्थायीभावच होता.**

पुस्तकालय
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवसाय :

दगडाचें पाथरवटी काम पुष्कळ चांगलें होत असे. हस्तिदंती कोरीव काम काळजीपूर्वक करीत. शिंपल्यांचें जडावकाम फार लोकप्रिय होतें. गवंडी व सुतार, सोनार व जवाहिऱ्या यांच्या कामांतही चांगलें कसब दिसून येतें. मातीच्या चात्यावरून सूतकताई चांगली तेजींत होती. विणकर-कोष्टयांचा धंदाही ऊर्जितावस्थेंत होता. भारतांतून परदेशांतही सुती कापडाची निर्यात होई. धातूंच्या ओतकामाच्या कलेंतही चांगली प्रगति झाली होती. तांबटलोक पटाशी, सुऱ्या, वस्तरे, भाल्याचीं पातें, मच्छीमारीसाठीं गळ, तलवारी व विविध प्रकारचीं भांडीं तयार करीत.

नद्यांच्या खोऱ्यांतील गाळाची सुपीक जमीन, दुबार पुरांमुळें सहजसुलभ होणारा पाणीपुरवठा व शहरांतून होणारी वाढती मागणी यांमुळें शेतीचा व्यवसाय मोठ्या प्रमाणावर चालत असला पाहिजे. गहूं, जव, घेवडा, वाटाणा व इतर द्विदल धान्यें, तीळ, राई, कापूस, ऊंस इत्यादि विविध उत्पन्न शेतींतून काढीत. सिंधू नदीचें खोरें पूर्वी मोसमी वाऱ्याच्या पट्टयांत येत असल्यानें तेथें पाऊसही आतांपेक्षां पुष्कळच जास्त असे. हराप्पा व मोहेंजोदारो येथील सरकारी धान्य-गुदामांच्या अवशेषांवरून शेतीचा व्यवसाय सरकारनियंत्रित असून त्यास भरपूर सरकारी साह्य मिळत असावें. शेतीबरोबरच पशुपालनाचा व्यवसायही करीत. गाई, म्हशी, शेळ्या, मेंढ्या पाळीत असत. बैल, रेडा, उंट व हत्ती यांचा भारवाहनासाठीं उपयोग करीत. शेळ्या व डुकरें मुख्यतः मांसासाठीं पाळीत. कुत्रा, मांजर हे प्राणीहि घरांतून पाळीत. हरिण, सांबर, माकड, वाघ इत्यादि प्राणीहि लोकांना माहीत होते. घोडा हें जनावर या संस्कृतीच्या उत्कर्षकालांत आढळत नाहीं.

व्यापार :

या खोऱ्यांतील वैभव मुख्यतः व्यापारावर अवलंबून होतें. शहरांतील वाडे, सुरक्षिततेची घेतलेली काळजी इत्यादि गोष्टींवरून शहरांतून व्यापारी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्गाचा भरणा बराच असावा. विस्तृत प्रमाणावर सांपडलेल्या मुद्रिकांवरूनही हीच गोष्ट सिद्ध होते. अंतर्गत व्यापार जनावरांच्या पाठीवर ओझीं लादून जमीनमार्गानें चाले. शिवाय नद्यांच्या प्रवाहांतून नौकानयनही करीत. बैलांच्या गाड्या मालाची नेआण करीत. व्यापारी तांडे मालवाहतूक करीत. नद्यांच्या सान्निध्यामुळें लोक दर्यावर्दीपणांत हुषार असत. पश्चिमेकडील देशांशीं खुष्कीवरून व समुद्रमार्गे व्यापार चाले. मार्गावर ठिकठिकाणीं व्यापाऱ्यांच्या वसाहती पसरल्या होत्या. खुद्द सुमेर, ऊर, लागाश इत्यादि ठिकाणीं भारतीय व्यापाऱ्यांचीं अडत दुकानें व पेढ्या असल्याचे अवशेष सांपडले आहेत. खुद्द सिंधूच्या खोऱ्यांत सांपडलेल्या अवशेषांवरून या ठिकाणीं आयात होणाऱ्या मालाची कल्पना येते. काश्मीरहून सांबरशिंगें, देवदार, शिलाजित ; अफगाणिस्तानांतून आकाशमणि, वैडूर्य ; इराणहून चांदी, जस्त व शिसें ; मध्यआशियांतून जेडाईट ; काठेवाडांतून शिंपले, गोमेद, लालगार, शिष्रधातू व इतर शिलारत्नें; राजपुतान्यांतून तांबें व चांदी, सूर्यकांत मणि, हिरवी गारा, लाल गारा व इतर माणकें ; म्हैसूरहून सोनें व पाचू सिंधू नदीच्या खोऱ्यांत आणलेलें आढळतें. यावरून दूरवरच्या व्यापारी संबंधाची कल्पना येते.

व्यापारी देवघेवीसाठीं दगडी वजनें वापरीत. लहान वजनें द्विगुणांश व वरचीं वजनें दशांश पद्धतीचीं होतीं. एकही खोटें वजन सांपडलें नाहीं. यावरून तत्कालीन उच्च व्यापारी नीतीची कल्पना येते. मोजण्यासाठीं दशांश पद्धतीच वापरीत. तेथील फूट १३·२ इंचांचा होता.

मनोविनोदनें :

सोंगट्या व बुद्धिबळें यांचे खेळ फार लोकप्रिय होते. रंजनासाठीं व देवाराधनेसाठीं स्त्रीपुरुष सारख्याच उत्साहानें नृत्य करीत. नृत्याला गायनवादनाचीही साथ देत. शिकार, बैलांच्या झुंजी, फांसेपारधी, गळ टाकून मासेमारी हे प्रकार मनोविनोदनासाठीं करीत. लहान मुलांचीं विविध व कल्पक खेळणीं सांपडलीं आहेत. मातीची गाडी, शाडूचे विविध पशुपक्षी, शिट्या, खुळखुळे, हलत्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानेचा बैल, हलत्या हाताचें माकड इत्यादि मजेदार खेळणीं सांपडलीं आहेत. पिंजऱ्यांतून पाळीव पक्षीही ठेवीत.

अग्निमांद्य, अपचन, मधुमेह, यकृताचे रोग, संधिवात इत्यादीसाठीं शिलाजित वापरीत. अपस्मार, फेंपरें यांवर शंखकिडा व कान, नाक, घसा यांच्या रोगांवर म्हाकूल माशाचीं हाडें देत. साबरशिंग, लिंबाऱ्याचा पाला, हळद यांचाही औषधी उपयोग केला जात असे.

मुद्रा व लिपी :

या काळांतील शेंकडों मुद्रा किंवा शिक्के या दोन शहरांतील उत्खननांत सांपडले आहेत. ते सर्व चौरस वा चौकोनी आहेत. प्रत्येक मुद्रेवर एका बाजूस चित्राकृति व एका वा दोन्ही बाजूंस चित्रलिपींतील आलेख आहे. या मुद्रा कशासाठीं वापरीत याचा अद्याप पूर्ण खुलासा झाला नाहीं. तथापि त्यावरील कोरीव काम चांगल्या कसबाचें आहे.

हराप्पा येथील लिपींत २५० वर्ण आढळले आहेत. सुमेरियन लिपींत ९०० वर्ण आहेत. भाषा व लिपी प्रगत होतांना त्यांतील वर्णमाला लहान होत जातात. यावरून हराप्पा येथील लिपी खूपच प्रगत झालेली आहे. या लिपीमध्यें एक हजार वर्षांच्या काळांत कांहींच फरक पडला नाहीं यावरून तत्कालीन लोकांचें पुराणमतवादित्व दिसून येतें. ती लिपी उजवीकडून डावीकडे व दुसऱ्या ओळींत डावीकडून उजवीकडे लिहिली जात असावी. मोठाले सार्वजनिक आलेख किंवा इतर वाङ्मय उपलब्ध नसल्यानें या लिपीवरून तेथील संस्कृतीचा फारसा बोध होण्याची आशा नाहीं.

धर्म व समजुती :

तेथें सांपडलेले शिक्के, मुद्रा, मातीच्या व शाडूच्या मूर्ति इत्यादिकांवरून त्यांच्या धार्मिक समजुतींची कल्पना येते. कोणत्यातरी देवीची उपासना तेथील लोक करीत. अशा देवीच्या पुष्कळ मूर्ति सांपडल्या आहेत. त्यावरून घरोघरीं तिची पूजा होत असावी. एका शिक्क्यावर देवतेच्या पोटांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाड उगवलेलें चितारलें आहे. त्याच्या मागील बाजूस एक भक्त कोयत्यानें एका स्त्रीला बळी देत असल्याचा देखावा आहे. हें चित्र पृथ्वीमातेचें असून धनधान्याच्या समृद्धीसाठीं शेतकरी पृथ्वीदेवतेला बळी अर्पण करीत असावेत. शक्ति, काली अम्बा, कराली, चामुण्डा इत्यादि विविध स्वरूपांत देवीची उपासना आजही हिंदुधर्मांत रूढ आहे. दुसऱ्या एका मुद्रिकेवर तीनमुखी पुरुषाकृति असून त्यानें शृंगाकृति शिरोभूषण घातलेलें आहे. तो पुरुष ऊर्ध्वलिंग असून मांडी घालून ध्यानस्थ बसला आहे. त्याच्या चोहों-बाजूस हत्ती, वाघ, म्हैस व गेंडा असून पायाखालीं हरिण आहे. या ठिकाणीं योगीराज पशुपति शंकराचें मूळस्वरूप असल्याचा प्रत्यय येतो. दुसऱ्या दोन मुद्रिकांवरून ही देवता संततीची अधिष्ठात्री असावी असें दिसतें. मुद्रिके-वरील आलेखावरून या देवाचें नांव **आन** असावें. तो पुरुषोत्तम, उत्पत्ति-स्थितिलयकर्ता, सर्वज्ञानी, सर्वसाक्षी दयाघन असावा. त्याला मुंडकान (त्र्यंबक) व मीनकान (मीनाक्ष) अशीं नांवें होतीं. सर्प व त्रिशूळ हीं त्याचीं चिन्हें होतीं. शिवाची लिंगपूजाही करीत. दगडांच्या व रूप्यांच्या विपुल आढळावरून योनिपूजाही प्रचलित होती.

वृक्षपूजा, पशुपूजा, सर्पपूजा करीत असल्याचा पुरावा मुद्रिकांवरून मिळतो. विविध उपचारांनीं केलेली पार्थिव पूजा व ध्यानचिंतनानें केलेली मानसपूजा अशा दोन्ही पद्धति रूढ होत्या. धर्मामध्यें स्नानाला फार महत्त्व असावें. देवतांना संतुष्ट करण्यार्थी नवस करण्याची प्रथा असावी. नवस फेडण्यासाठीं बळी देत. धर्मविधींत नृत्यालाही महत्त्व असावें. अद्यापपर्यंत कोठल्याही देवळाचे अवशेष सांपडले नाहींत. पण समाजावर धर्माचा व धर्माचार्यांचा प्रभाव खूपच असावा. त्यामुळें तेथील जीवनांत सनातनी प्रवृत्ति स्पष्ट दिसते. कित्येकांच्या मतें तेथील राजसत्ताही धर्माचार्यांच्या आधीन होती.

प्रेतविसर्जनाच्या तीन पद्धति होत्या. (१) दफन—थडग्यामध्यें मृताला निजवीत व त्याच्याभोंवतीं त्याचे अलंकार, आयुधें व सौंदर्यप्रसाधनें पुरीत. (२) अंशदफन—मृताचें शरीर पशुपक्ष्यांनीं खाल्ल्यावर त्याचीं हाडें गोळा करून पुरीत. (३) दहनोत्तर दफन—मृताचें दहन केल्यावर त्याच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अस्थि एका मृण्मय पात्रांत ठेवून तें पुरीत, व रक्षा नदीपात्रांत विसर्जन करीत.

कालनिर्णय :

या संस्कृतीचा काळ ठरवितांना खालील गोष्ट ध्यानांत घेणें आवश्यक आहे. मोहेंजोदारो येथें निरवशेष जमीन अद्यापिही लागली नाहीं. तळपाण्यामुळें पुढील उत्खनन थांबवावें लागलें आहे. वरची जमीन व तळपाणी यांच्यामध्यें एकावर एक असे सात थर आढळले आहेत. त्यावरून तेथील वस्ती नव्या अश्मयुगापासूनची असण्याचा संभव आहे. सामान्यतः जमिनीचा एक थर तयार होण्यास एक हजार वर्षांचा कालावधि लागतो. या हिशेबानें सिंधु संस्कृति सात हजार वर्षांपूर्वींची असण्यास हरकत नाहीं. परंतु नद्यांच्या पुरामुळें जमिनीची धूप लवकर होत असावी व म्हणून पांचशें वर्षांच्या कालावधींत एक थर बनत असावा. डॉ. मार्शल या संस्कृतीचा उत्कर्षकाल खिस्तपूर्व ३२५० ते २७५० असा ठरवितात. मेसापोटेमियांतील उत्खननांत सिंधुसंस्कृतीच्या मुद्रा सांपडल्या आहेत. त्यावरूनही हाच कालावधि निश्चित होण्यास मदत होते. सिंधु संस्कृतीच्या चार-पांच अवस्था उत्खननांत आढळल्या आहेत. आम्री येथील अवशेष खिस्तपूर्व ४००० वर्षांपूर्वींचे असावेत, तर झुकार व झांगर येथील अवशेष २५०० ते २००० या कालावधींतील असावेत.

संस्कृतीचे निर्माते :

या संस्कृतीचे निर्माते कोण? सांपडलेल्या अवशेषांवरून कांहींच निश्चित अनुमान काढतां येत नाहीं. चार भिन्न मानववंशांचे अवशेष सांपडले आहेत. त्यावरून मोहेंजोदारो हें व्यापारी शहर असल्यानें येथें भिन्नदेशीय, भिन्नवर्णीय समाज राहात असावेत एवढें सिद्ध होतें. बऱ्याच विद्वानांच्या मतें सैंधव संस्कृतीचे जनक आर्यपूर्व द्राविडवंशीय लोक असावेत. अनेक इतिहासकार ऋग्वेदांत उल्लेखिलेल्या पणि, व्रात्य, वाहीक, नाग इत्यादि जमातींचा संबंध सिंधु संस्कृतीशीं जोडतात. फादर हेरास यांच्या मतें, पणि हे ऋग्वेदांत कंजूष व्यापारी, मूर्तिपूजक, लिंगपूजक म्हणून वर्णिलेले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत व सैंधव संस्कृतींत तशा वर्णनाचे लोक आढळतात. त्यावरून सैंधव लोक आर्यपूर्व असावेत. ते पुढें लिहितात कीं, हेंच पणि व्यापाराच्या निमित्तानें पश्चिम आशियांत गेले व तेथें फिनीशियन या नांवानें प्रसिद्धीस आले. पणि नांवाचा संस्कृतांत वणिज् असा अपभ्रंश झाला व काठेवाड गुजराथमधील पणि लोकांचे वंशज बनिया नांवानें प्रसिद्धी पावले.

सिंधु खोऱ्यांत सुखवादी, भौतिक नागरी संस्कृति विकसित झालेली दिसते. शृंगधारी पुरुषदेवता, योग व संन्यास यांवर भर, देवीचा पंथ, लोखंड व घोडा यांचा अभाव, धर्माचार्यनियंत्रित राजसत्ता, उद्योग व व्यापार यांचें महत्त्व इत्यादि विविध प्रमाणांवरून ती अनार्य संस्कृति आहे असें विद्वानांचें मत पडतें. परंतु याबद्दल अंतिम निर्णय सध्यां तरी देणें धाडसाचें ठरेल.

विनाशाचीं कारणें :

या संस्कृतीचा अस्त कोणत्या कारणानें झाला असेल असा प्रश्न सहजच उद्भवतो. नद्यांच्या पुरांमुळें ही संस्कृति वाहून नेली असेल काय? जीवित व वित्त यांची अपार हानि होऊन या भौतिक संस्कृतीचा विनाश होणें संभवतें. कदाचित् भूकंपादि उत्पातामुळेंही ही संस्कृति जमिनींत गाडली गेली असेल किंवा परकीय भटक्या लोकांच्या आक्रमणामुळें या संस्कृतीचा विध्वंस झाला असेल. विनाशाचें निश्चित उत्तर देतां येणें अशक्य आहे. या संस्कृतीनें आपला वैभवशाली वारसा नवभारताला ठेविलेला आहे. पंडित नेहरूंनीं म्हटल्याप्रमाणें सैंधव संस्कृति ही भारतीय इतिहासाचें सुवर्णाक्षरांनीं लिहिलेलें पान आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण पांचवें

ऋग्वेद काल

नव्या युगाचा आरंभ :

भारतभर ज्या सनातन संस्कृतीचें अनुस्मरण व अनुसरण होतें त्या संस्कृतीचें प्रथम दर्शन आपणांस वैदिक वाङ्मयांत मिळतें. सैंधव संस्कृतीच्या गूढ अस्तानंतर भारतीय इतिहासांतील पुढील महत्त्वाचा टप्पा म्हणजे वैदिक आर्यांचें भारतांत आगमन व त्यांच्या संस्कृतीचा प्रसार होय. तौलनिक भाषाशास्त्रानें संस्कृत, झेंद, ग्रीक, लॅटिन इत्यादि विविध युरोभारतीय भाषांत शब्दसाम्य व कल्पनासाम्य शोधून काढलें आहे. समान शब्दसंपत्तीवरून समान जीवनदृष्टीचें अनुमान सहजच काढतां येतें. या विविध भाषा बोलणाऱ्या लोकांचे पूर्वज कधींतरी एकत्र राहात असावेत म्हणूनच या विविध लोकांत आजही भाषा, कल्पना, आचार इत्यादि बाबतींत विलक्षण साम्य आढळतें. एकभाषी व एकदेशी म्हणूनच ते पूर्वज समान संस्कृतीचे व एकवंशीय असावेत व त्यांना 'आर्य' असें गौरवपर नांव होतें.

आर्यांचें मूलस्थान :

या युरोभारतीय पूर्वजांचें मूलस्थान कोठें असावें याबद्दल विद्वानांत विविध मतांतरें दिसतात. ऋग्वेदांत येणाऱ्या प्रदीर्घ उषःकालाच्या वर्णनावरून कै. लोकमान्य टिळकांनीं असा तर्क केला कीं, आर्य लोक मूळचे उत्तर ध्रुवाकडील असून कालांतरानें ते दक्षिणेकडे सरकले. संस्कृतीच्या साधर्म्यावरून कित्येक पाश्चात्य पंडितांनीं मध्य युरोप हें आर्यांचें मूलस्थान कल्पिलें आहे. सुप्रसिद्ध जर्मन पंडित मॅक्समुल्लर यानें आर्यांचें मूळ वसतिस्थान मध्य आशिया मानलें आहे; तर श्री. दास व पावगी या भारतीय पंडितांनीं भूशास्त्रदृष्ट्या मानवोत्पत्तीला आर्यावर्त हीच भूमि अधिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योग्य असल्यानें येथेंच आर्यांचीं मूळ वसाहत असणें अगदीं स्वाभाविक आहे असा निर्वाळा दिला आहे. निर्णायक पुराव्याच्या अभावीं यांतील ग्राह्याग्राह्यता ठरविणें कठीण आहे. आर्य लोक बाहेरून भारतांत आले अशी सर्वसामान्य समजूत आहे. जर्मन संशोधक ह्यूगो विंक्लेर (Hugo Winclair) यानें १९०७ सालीं आशिया मायनरमध्यें बोगाझकोई (Boghazkoi) येथें केलेल्या उत्खननांत इष्टिकालेख सांपडले आहेत. त्या आलेखांत मित्र, वरुण, इंद्र व नासत्य (आश्विनौ) यांचें आवाहन केलेलें आहे. हा आलेख खिस्तपूर्व १४०० च्या सुमाराचा आहे. त्यावरून वैदिक आर्यांचें अस्तित्व त्या सुमारास तेथें असावें असें निश्चित अनुमान निघतें.

आर्यांचें आगमन :

मूलगृहांतून निघाल्यावर युरोभारतीय लोकांच्या निरनिराळ्या शाखा निरनिराळ्या प्रदेशांत परिभ्रमण करीत गेल्या. त्यापैकीं एक टोळी आग्नेयेस अफगाणिस्तानांत आली. ते लोक पारशी व भारतीय लोकांचे पूर्वज होत व म्हणूनच या दोन लोकांत विलक्षण संस्कृतिसाम्य आढळतें. या टोळींत पुढें फाटाफूट झाली व त्यापैकीं एक भाग पूर्वेकडे भारतांत शिरला. आर्यांच्या या प्रवासांत त्यांचीं बायकामुलें व गुरावासरांचें कळप त्यांच्याबरोबर होते. भारतांत बारा महिने दुथडी भरून वाहाणारें सिंधु नदीचें अफाट पात्र, तिच्या दोन्ही तीरांवर दूरवर पसरलेलीं चराऊ कुरणें, आसमंतांत फळाफुलांनीं नटलेला रमणीय निसर्ग असें अपूर्व वैभव पाहिल्यावर आर्यांनीं आपली भटकेगिरीची वृत्ति सोडली व ते येथेंच वसाहती करून राहूं लागले. कालांतरानें आर्यांच्या इतर अनेक टोळ्या हिंदुस्थानाकडे लोटल्या. वसाहती वाढत चालल्या तसा मूळचा प्रदेश अपुरा पडूं लागला. तेव्हां धाडशी आर्य आणखी पुढें पूर्वेकडे निघाले. त्या भागांत त्यांचा अनार्यांशीं झगडा झाला. पण आर्यांच्या गुणश्रेष्ठतेमुळें इतरांस हार खावी लागली, व आर्यांचा प्रसार भारतभर होऊं शकला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजकीय घटना :

अनार्यांना जिंकणें, वसाहती करणें व आर्यसंस्कृतीचा प्रसार करणें हे तीन उद्देश भारतीय आर्यांसमोर होते. सप्तसिंधु प्रदेशाची सुपीकता, जलविपुलता, नियमित ऋतुमान व उत्साहदायी सूर्यप्रकाश इत्यादि गोष्टी आर्यांना फार आवडल्या; व त्या प्रदेशांत आर्यांच्या अनेक वसाहती स्थापिल्या गेल्या. पशुपालनाबरोबरच ते आतां शेतीभाती करूं लागले. त्यामुळें त्यांच्या जीवनाला स्थैर्य आलें, व त्याचा परिणाम त्यांच्या धार्मिक आचारविचारांवर व वाङ्मयावरही झाला. त्यांच्या पूर्वजांनीं रचलेले अनेक मंत्र भटक्या जीवनांत विस्कळित झाले होते. त्यांचें आतां संस्करण व संहितीकरण झालें. त्यामध्यें जुन्याबरोबरच नवीन मंत्रांचीही रचना झाली. या संहितीकरणांत निसर्गपूजा, पितृपूजा व वीरपूजा यांच्या मंत्रांचीं स्वतंत्र ऋग्वेदसंहिता बनविली गेली. उरलेल्या जारणमारणादि मंत्रांचा समावेश अथर्ववेदसंहितेंत झाला.

या संहिताकालांत वैदिक आर्यांची राजकीय व सामाजिक क्षेत्रांत भरपूर प्रगति झाली होती. पूर्वीच्या टोळ्यांचें आतां प्रादेशिक राज्यांत रूपांतर होत होतें. त्यांत पुरु, अनु, द्रुह्यु, यदु व तुर्वश या प्रमुखांच्या आधिपत्याखालील राज्यें होतीं. या पांच राज्यांचें राजकीय वर्चस्व त्यावेळीं इतकें वाढलें कीं, सप्तसिंधूंतील आदिवासी सोडून इतर सर्व समाजाला ‘ पंचजन ’ असें म्हटलें जाऊं लागलें. याच वेळीं ‘ भरत ’ नांवाच्या एका नव्या टोळीनें मुसंडी मारून सरस्वती व दृशद्वती या नद्यांच्या दुआबांत आपलें राज्य स्थापिलें. त्यांच्या सुदास् या कर्तबगार राजानें सर्व आर्य राज्यें भरतांच्या राजकीय वर्चस्वाखालीं आणण्याची महत्त्वाकांक्षा बाळगली. त्यानें मुत्सद्देगिरी करून भरतांचें पौरोहित्य तृत्सुजमातींचा कर्तबगार पुरोहित वसिष्ठ यास देऊन तृत्सूंचें लष्करी साहाय्य मिळविलें. या डावपेंचामुळें भरत व तृत्सु यांचा एक बलाढ्य राजकीय व लष्करी गट बनला. सुदास् राजाचें नेतृत्व व वसिष्ठांचें पौरोहित्य ही भरतांना उपयुक्त ठरलीं.

या घटनेमुळें भरतांचा मूळचा पुरोहित विश्वामित्र रागावून शत्रूला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाऊन मिळाला. त्यानें पंचजनांची एकजूट घडवून भरतांना शह देण्याचें ठरविलें. आणखी पांच (पक्थ, भलान, अलिन, विषाणिन् व शिव) अनार्य राजांशीं बोलणीं करून दहा प्रमुख राजांचा भरतविरोधी संघ बनविला व सुदास् राजावर चढाई केली. दाशराज्ञसंघ व भरत यांच्यामध्यें घनघोर लढाई होऊन सुदास् राजाचा जय झाला व भरतांना राजकीय वर्चस्व प्राप्त झालें. हें वर्चस्व दीर्घकाळ टिकल्यामुळेंच कदाचित् या देशाला '**भारतवर्ष**' हें नांव पडलें असावें. या ऐतिहासिक दाशराज्ञ युद्धाचे उल्लेख ऋग्वेदांत वारंवार येतात.

भरतांच्या बिकट परिस्थितीचा फायदा घेण्यासाठीं विश्वामित्रानें प्रेरित केलेले शिग्रु, अज, यक्षु या यमुनेच्या पश्चिमेकडील अनार्य जमातीही भेद या सेनापतीच्या आधिपत्याखालीं पूर्वेकडून भरतांवर चालून गेल्या. पण सुदास् राजानें चपळाई करून यमुना नदीच्या तीरांवर त्यांचाही निःपात केला.

शंबर नांवाच्या दुसऱ्या अनार्य राजानें आपल्या दुर्गम किल्ल्यांत राहून आर्यांच्या प्रदेशांत धुमाकूळ घातला. चाळीस वर्षें त्यानें आर्यांच्या प्रतिकाराला दाद दिली नाहीं. पण शेवटीं त्याचाही बीमोड झाला. पुरूंचें राज्य सप्तसिंधु प्रदेशांत फार नांवाजलेलें होतें. दुर्गह, गिरिक्षित्, पुरुकुत्स असे एकापाठोपाठ अनेक कर्तबगार राजे त्या वंशांत होऊन गेले. पुरुकुत्स दाशराज्ञ युद्धांत मारला गेला. त्याचा पुत्र त्रसदस्यु मोठा शूर योद्धा होता. अनार्यांना तो आपला कर्दनकाळ वाटे इतका त्याचा दरारा होता. महायुद्धानंतर क्षीण झालेले पुरु व भरत हे वंश एकत्र होऊन त्यांच्या ऐक्यांतून 'कुरु' हें नवीन राष्ट्र उदयाला आलें. उत्तर वैदिक कालांत ब्राह्मण धर्माचा उत्तर भारतामध्यें प्रसार करण्यांत या कुरूंचा मोठाच वांटा होता.

आर्यांच्या भारतांतील आगमनाला येथील आदिवासींनीं कडाडून विरोध केला. त्यामुळें रक्तरंजित जमिनीवरच आर्यांना आपलें ठाण मांडावें लागलें. या आदिवासींना ऋग्वेदांत 'दस्यु' किंवा 'दास' म्हणत. ते कृष्ण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्णाचे, बसक्या नाकाचे व विलक्षण भाषा बोलणारे होते. आर्यांच्या यज्ञ-संस्थेविषयीं त्यांना आदर नव्हता. आर्यांच्या देवतांचा ते उपहास करीत व आर्यांच्या दृष्टीनें ते धर्मलंड होते. ते लिंगोपासक असून खोट्या देवांना भजत असत. जादूटोणा व इतर अघोरी वाममार्गाचा ते अवलंब करीत. त्यांच्यांतील पणि हें आर्यांचीं गुरेंढोरें पळवीत. ते व्यापारउदीम करीत व तटबंदी केलेल्या गांवांतून राहात. आधुनिक काळांतील 'जिप्सी' लोकांशीं त्यांची तुलना करतां येईल; कारण, व्यापार व दरवडा हीं कार्यें ते एकाच वेळीं करीत. त्यांच्या वल नांवाच्या पुढाऱ्याला आर्यांच्या इंद्रानें ठार केल्याचा उल्लेख ऋग्वेदांत येतो. अनार्यांतील शिव व विषाणिन् या लोकांनीं दाशराज्ञ युद्धांत भाग घेतल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. सृंजय राजा चायमान अभ्यावर्तिन् यानें हरियूपीय येथील अनार्यांचा नाश केल्याचा उल्लेख ऋग्वेदांत आहे.

या सर्व वर्णनावरून आर्यांचे विरोधक सैंधव संस्कृतीचे लोक असावेत. आर्य–अनार्य हा झगडा केवळ राजकीय कलह नसून दोन विरोधी संस्कृतीं-मधील तो संघर्ष होता. त्यांत राजकीय दृष्ट्या शेवटीं आर्य यशस्वी झाले. येथील मूळच्या कांहीं अनार्य जमाती समूळ नाहींशा झाल्या, तर कांहीं पूर्वेस व दक्षिणेकडे सरकल्या. त्यांचीं 'पुरें' आर्यांनीं आपल्या ताब्यांत घेतलीं वा नाहींशीं केली. कांहीं जमाती आर्यांना शरण आल्या व आर्यांच्या वर्चस्वाखालीं नांदूं लागल्या. आर्यांच्याकडील प्रभावी लोखंडी हत्यारें, वेगवान् घोडे व वर्चस्वाला सोयिस्कर अशा सामाजिक संस्था यांच्यापुढें अनार्यांचा राजकीय क्षेत्रांत टिकाव लागला नाहीं. परंतु सांस्कृतिक क्षेत्रांत मात्र आर्यांना आपलें संपूर्ण वर्चस्व ठेवतां आलें नाहीं. त्यांनीं आपली भाषा, धर्म, सामाजिक संस्था इत्यादिकांची छाप जित अनार्यांवर पाडण्याचा प्रयत्न केला. पण जित व जेते यांच्या साहचर्यानें जितांच्या संस्कृतीचाही आर्यांवर परिणाम झाला. खरें म्हणजे आर्यांनीं अनार्यांच्या संस्कृतीचें समूळ उच्चाटन करण्याचा कधींच प्रयत्न केला नाहीं. उलट, आपल्या उदाहरणानें व सहवासानें आपल्या उन्नत संस्कृतीची छाप अनार्यां-वर पाडून शांततेच्या मार्गानें अनार्यांना सुसंस्कृत करण्याचा—सहजीव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाचा—मार्ग आर्यांनीं अनुसरला. अनार्यांच्या चांगल्या गोष्टी आर्यांनीं स्वीकारल्या वा त्यांना नवीन वळण दिलें. त्यामुळें या सांस्कृतिक संघर्षाचें रूपांतर संस्कृति संगमांत झालें. इतरांना आपल्यांत सामावून घेण्याची प्रकृति व प्रवृत्ति भारतीय संस्कृतींत पुढेंही अनेकदां दिसून आली आहे. चिरंजीवी भारतीय संस्कृतीचें तें एक वैशिष्ट्यच झालें आहे.

राजकीय व्यवस्था :

आर्यांची सर्वांत लहान सामाजिक संस्था म्हणजे 'कुल' किंवा कुटुंब. या कुटुंबाचा प्रमुख म्हणजे वडील असत. सर्वसामान्यपणें या कुटुंबांत तीन पिढ्या एकत्र राहात असाव्यात. अशीं अनेक कुलें मिळून एक 'ग्राम' बनत असे. हीं सर्व कुटुंबें एकत्र राहण्यास एक सामाजिक बंधन उपयोगी पडत असे. तें म्हणजे सर्वांच्या जनावरांचें खिल्लार (गोष्ठ = गोत्र) एकत्र असे. पण सर्वांत प्रमुख बंधन एकाच पूर्वजाचें असे. लढाईच्या वेळीं 'ग्राम' हा एक सैन्याचा विभाग होत असे. या ग्रामाच्या अधिकाऱ्यास 'ग्रामणी' म्हणत. ग्रामसंस्थेच्या वर 'विश्' नांवाची एक संस्था असे. अनेक ग्रामें मिळून एक 'विश्' होई व त्याच्या प्रमुखास 'विश्पति' म्हणत. सर्वांत मोठी राजकीय संस्था म्हणजे 'जन'—ज्याला हल्लींच्या भाषेंत 'राष्ट्र' असें म्हणतां येईल. सर्वसामान्यपणें 'जन' शब्द एखाद्या राजाच्या आधिपत्याखालीं असलेल्या लोकांना लावीत. आर्यांच्या निरनिराळ्या समूहांत मात्र एकी असे, कारण त्यांचा शत्रु समान होता.

राज्यव्यवस्थेंत राजा हा प्रमुख सत्ताधारी होता. बहुधा राज्य वंशपरंपरेनेंच चाले. कांहीं ठिकाणीं राजा समितीकडून निवडला जाई. राजाचा अधिकार कधींही अनियंत्रित नव्हता. त्याला लोकमताला योग्य तो मान द्यावाच लागे. लोकमत 'समिति (प्रजामंडळ)' किंवा 'सभा' (कार्यकारी मंडळ) यांच्या द्वारें प्रकट होत असे. स्वतःच्या राजाबद्दल लोकांना अतिशय अभिमान वाटत असे. विशेषप्रसंगीं लोक राजाला नजराणे देत असत. कधीं कधीं युद्धासाठीं अनेक राजे आपापले संघ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बनवीत असत. राजाचे पुरोहित हे त्याचे सल्लागार म्हणून असत, व त्याला विजय मिळवून देण्यासाठीं आपल्या मंत्रप्रभावाचाही उपयोग करीत. ऋग्वेदकाळीं राजाची जामिनीवर मालकी नव्हती. न्यायनिवाड्याचें काम राजा आपल्या सल्लागारांच्या मदतीनें करी. प्रजेमध्यें व शत्रूकडे होणाऱ्या हालचालींची माहिती हेरांकडून राजास कळे. सामान्यतः प्रत्येक राज्य स्वतंत्र असे. जवळच्या राज्याशीं सलोखा ठेवण्यापलीकडे एरवीं त्यांचा फारसा संबंध येत नसे. सर्व आर्य जमातीवरच संकट कोसळल्यास सर्व आर्य राजे एकत्र येत. लहान राज्यांत अधूनमधून कुरबुरी किंवा चकमकीही होत असत.

राजा हा प्रजेनें निवडलेला असल्यामुळें त्याच्याबद्दल प्रजेच्या अपेक्षा अर्थात् अधिक असणार. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलांत १७३ व्या सूक्तांत राज्याभिषेकप्रसंगीं प्रजेनें व्यक्त केलेल्या अपेक्षा चित्रित झाल्या आहेत—

"हे राजा, आम्हीं तुला उदयाला आणलें आहे. तूं आमचा राजा हो. तूं नित्य व स्थिर रहा. तूं सर्वांचा राजा असावास अशी इच्छा सर्व लोक करोत. राजा, तूं येथेंच अस. च्युत होऊं नकोस. इंद्राप्रमाणें पृथ्वीवर स्थिर रहा व राष्ट्राचें संरक्षण कर."

आर्यांची राहणी :

आर्य मनुष्य शरिरानें उंच व धिप्पाड दिसे. त्याचा वर्ण गोरा असून डोळे काळेभोर असत. नाक सरळ व चिंचोळें असे. डोक्यावर विपुल केंस असत. वाणी शुद्ध व स्पष्ट असे. हिंदुस्थानांत आल्यावर मात्र आर्यांचें हें शुद्ध स्वरूप टिकूं शकलें नाहीं. येथील मूळच्या लोकांशीं त्यांचे रोटीबेटी व्यवहार सुरू झाले. त्यामुळें या दोन्ही वर्णांचें मिश्रण झालें व म्हणूनच गंगायमुना खोऱ्यांतील आर्य हे शुद्ध आर्य रक्ताचे नव्हेत. पंजाब, राजपुताना व सिंधुनदीचा कांठ एवढ्याच भागांत फक्त शुद्ध आर्यवंशीय सांपडूं शकतील. ऋग्वेदांत जो नद्यांचा उल्लेख येतो त्यावरून गंगानदीपर्यंत पोहोंचण्याच्या आधीं ते सिंधुनदीच्या कांठीं व पंजाबांतच विशेषतः राहात असावेत असें वाटतें. वितस्ता (जेहलम), असिक्नी (चिनाब), परुष्णी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(रावी), सरस्वती, विपाश् (बियास), शुतुद्री (सतलज), यमुना, गंगा या नद्यांचा एकत्र उल्लेख ऋग्वेदांत आढळतो. कुभा (काबुल), सुवास्तु (स्वात) याही नद्यांचा उल्लेख आढळतो. यावरून पूर्व काबुलिस्तानांतही ते कांहीं काळ राहात असावेत असें वाटतें.

ऋग्वेदांत घर याअर्थी गृह, दम, पस्त्या, अस्त व हर्म्य असे शब्द आढळतात. यांपैकीं पस्त्या व हर्म्य म्हणजे घराला लागूनच गुरें बांधण्यासाठीं जे सोपे तयार केलेले असत ते. घराला पुढें व मागें असे दोन दरवाजे असत. प्रत्येक आर्यांच्या घरांत प्रज्वलित अग्नीसाठीं कुंड असे. घरें बांधण्याकडे दगडाचा उपयोग फारसा केला जात नसे. सिंधु संस्कृतीच्या लोकांशीं संबंध आल्यानंतर आर्यांच्या गृहरचनेंत फरक पडला असावा. कारण ते लोक अधिक सुधारलेले असावेत असा मोहेंजोदारोच्या उत्खनना-वरून संशय येतो. घरें बांधण्याकडे विटांचा उपयोग या वेळेपासून पुढें चालू झाला असावा. आर्यांच्या वसतिस्थानांना अनार्यांपासून नेहमींच भीति असे. त्यामुळें घराभोंवतीं व मैदानाभोंवतीं तटबंदी करून खंदक खणीत असत. शहरें व लोखंडी तटबंदी यांचेही उल्लेख ऋग्वेदांत सांपडतात.

आर्यांच्या पोशाखांत बहुधा दोन किंवा तीन वस्त्रें असत व तीं बहुधा कापूस किंवा लोकरीचीं असून निरनिराळ्या रंगांचीं असत. वसिष्ठ कुलां-तील आर्य शुभ्र वस्त्रें (श्वित्यञ्चः) नेशीत असें म्हटलें आहे. बाहुभूषणें, कंकणें, कर्णभूषणें व नूपुर हे अलंकार प्रचारांत असावेत. पुष्पप्रसाधनाही करीत असावेत. पुरुष केसांची चूडा डोक्यावर बांधीत. वसिष्ठ डोक्यावर उजव्या बाजूला चूडा बांधीत (दक्षिणतस्कपर्दीः).

आर्यांचा आहार :

ऋग्वेदांत वारंवार येणारा 'यव' शब्द सर्व धान्यांना लागू पडतो. तांदुळाचा व गव्हाचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. धाना, तीळ व सातु इ. धान्यें प्रचारांत होतीं. धान्य प्रथम चाळणीनें चाळून, जात्यानें दळून किंवा दगडांनीं कुट्टन त्याचें पीठ करीत व तें दुधांत कालवून त्याची भाकरी बनवून ती भाजून खात असावेत. जेवणांत दूध, दहीं, तूप इत्यादि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जिनसांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जाई. ताक करण्यासाठीं 'मन्था' म्हणजे रवी वापरीत. फळें व भाजीपाला यांचाही जेवणांत उपयोग होई. ज्या भांड्यांत अन्न शिजवावयाचें त्यास 'पचन' असें म्हणत. भांडीं तांब्याची, लोखंडाचीं, लांकडांचीं व मातींचीं असत. आर्य मांसाहारही करीत. कांहीं विशेष प्रसंगीं मांसाहार करण्याचा प्रघात होता. विशेषतः बैलाचें मांस भाजून, शिजवून खात. गाय ही अवध्य मानली होती म्हणूनच तिला अघ्न्या असें म्हणत. 'निरपराध, अदितिरूप गाईची हिंसा करूं नका' असा स्पष्ट उल्लेख आढळतो. प्रमुख पेय दूध हेंच असे. मद्यपान, सुरा हें एक दुर्व्यसन आहे असें समजलें जाई. मद्य धान्यापासून बनवीत असावेत.

वेदवाङ्मयांत सोमवल्लीच्या रसाचा वारंवार उल्लेख आला आहे. यावरून सामान्यपणें असें समजलें जातें कीं, सोमरस हें वैदिक आर्यांचें एक आवडतें मद्य असावें. प्रत्यक्ष सोम ही कोणती वनस्पति असावी हा प्रश्न अद्याप अनिर्णित व विवाद्यच आहे; तरी ऋग्वेदांत सोमरस तयार करण्याची जी पद्धति सांगितली आहे, तीवरून तें मद्य असावें अशी शंकादेखील येत नाहीं. बाल्ख प्रदेशाजवळ असणाऱ्या मूजवत् पर्वतावर उगवणाऱ्या एका वनस्पतीचा हा रस होता. प्रथम ही वनस्पति उखळ व मुसळ यांच्या साहाय्यानें कुटली जात असे. नंतर त्यांत पाणी मिसळून तो चोथा पिळून रस काढला जात असे. मग तो देवाला अर्पण केला जाई. या सोमरसांत दूध, दहीं, मध किंवा यव मिसळीत. कढविणें किंवा अर्क काढणें या क्रियांचा कोठेंही उल्लेख नाहीं. पारशी लोकांच्या धर्मग्रन्थांत 'हाओम' (म्हणजेच सोम) हें मादक पेय असल्याचा कोठेंच उल्लेख नाहीं. सोम न मिळाल्यास विकल्प म्हणून 'थोरमयाळ' व 'अर्जुन' या वनस्पति सुचविल्या आहेत. त्याही मादक नाहींत. 'सोमासाठीं उपयोजिलेल्या पर्यायशब्दांचा अभ्यास केल्यास तें एक उत्साहवर्धक व पुष्टिवर्धक पेय होतें असेंच सिद्ध होतें. दारूचा परिणाम म्हणून ऋग्वेदांत 'दुर्मद' शब्द येतो, तर सोमाचा परिणाम म्हणून 'मद' शब्द येतो. आयुर्वेदांत सोमाचा औषधी वनस्पति म्हणून उल्लेख आहे. नवव्या मंडलाची देवता सोम ही आहे. इंद्राला सोमपान विशेष प्रिय होतें असा उल्लेख आहे. यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोमरस हें यज्ञकृत्यास व विशेषतः पौरोहित्यास उपयोगी पडणारें पेय असून तें सर्वसाधारण पेय कधींच नव्हतें असें दिसतें. एक तऱ्हेचा धार्मिक प्रहर्ष (Religious orgy) किंवा आनंदोत्कर्ष निर्माण करण्यासाठींच पुरोहित-वर्ग सोमपान करीत असावा.

आर्यांची कुटुंबव्यवस्था :

'नना' व 'तत' हीं आईबापांना लावण्यांत येणारीं लाडकीं नांवें असत. पितापुत्रांचा संबंध प्रेमळ असे. लहान वयांत मुलावर पित्याची सत्ता असे; पण मुलगा वयांत आल्यावर बाप त्याच्यावर घराची जबाबदारी सोपवीत असे. सामान्यतः एकत्र कुटुंब-पद्धति अमलांत होती. तीन पिढ्या एकत्र राहात असाव्यात. कुटुंबांतील मंडळी विभक्त होण्याच्या वेळीं उत्पन्नाच्या वांटण्या होत. गृहकर्मे पार पाडण्याची जबाबदारी थोरल्या मुलावर असल्यामुळें त्याला उत्पन्नांत थोडा अधिक वांटा मिळे. अविवाहित मुलीला मिळकतींत वांटा मिळूं शके. निपुत्रिकाची मिळकत मुलीच्या मुलाकडे जात असे. दत्तक घेण्याची पद्धत रूढ होती, पण औरस संततीच उत्तम असा समज होता. गृहाची अंतर्व्यवस्था व अपत्यसंगोपन हीं स्त्रीचीं मुख्य कर्तव्यें मानण्यांत येत असत. याशिवाय दळणें, विणणें, शिवणें इ. कामें स्त्रियाच करीत. अतिथिसत्कार हें आर्यांचें एक वैशिष्ट्य होतें. अग्नि हा सर्वश्रेष्ठ अतिथि समजला जाई.

आर्य स्त्रियांचा सामाजिक दर्जा :

स्त्री ही घराची स्वामिनी मानली जात असे. ती म्हणजे घराचें सर्वस्व. 'जाया इद् अस्तम्' असें विश्वामित्र (३-५३-४) म्हणतात ते याच अर्थानें. घरच्या कर्त्या पुरुषानें होमहवनादि कृत्यें करावयाचीं असत; तथापि यजमान व त्याची पत्नी या दोघांनीं मिळून हीं धर्मकृत्यें केलीं पाहिजेत असा स्पष्ट निर्बंध होता. यावरून असें दिसतें कीं, स्त्रियांची योग्यता ऋग्वेदकाला-नंतरच्या स्मृतिकारांच्या कालांतल्याइतकी कमी मानली जात नव्हती. मेजवान्या, नृत्य वगैरे प्रसंगीं स्त्रिया समाजांत कांहीं आडपडदा न ठेवतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वावरत. स्त्रिया सुशिक्षित होत्या. विवाह न करतां आपलें जीवन आध्यात्मिक विचारांत घालवावयाचें एखाद्या स्त्रीनें मनांत आणल्यास तिला तशी परवानगी मिळे. ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांच्या कर्त्या स्त्रिया आहेत, यावरून त्यांचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें. लोमशा, घोषा, इंद्राणी, विश्ववारा, अपाला, इ. मंत्ररचना करणाऱ्या स्त्रियांचीं नांवें ऋग्वेदांत आढळतात. त्यांच्या सूक्तांतून स्त्रीजीविताच्या विविध अवस्था वर्णिलेल्या आढळतात. उदा.–अविवाहित, वयस्क, कुमारी, नवोढा, प्रेमळ पतिव्रता, सवतीमत्सर करणारी सवत, सुखोपभोग इच्छिणारी स्त्री, रोगजर्जर स्त्री, संतुष्ट स्त्री, वीरमाता, युद्धांत पतीला मदत करणारी (उदा.–मुद्गलानी, विश्पला), धार्मिक स्त्री (उदा.–गोधा), स्वामिनिष्ठ दूती (उदा.–सरमा) इ. सर्व विद्यांचें शिक्षण स्त्रियांना दिलें जाई. त्या विदथांत (सभा) भाग घेत, यज्ञांत भाग घेत व सूक्तेंही रचीत असत. अज्ञान म्हणजे दौर्बल्य व ज्ञान म्हणजे सामर्थ्य हें आर्यांना ठाऊक असल्यामुळें त्यांनीं ज्ञानाचीं कवाडें स्त्रियांनाही उघडीं ठेवलीं होतीं. वेश्याव्यवसायाचा उल्लेख आहे, परंतु वेश्या समाजांत प्रतिष्ठा पावलेल्या नव्हत्या. सतीची चाल अस्तित्वांत नव्हती. विधवांना पुनर्विवाहाची परवानगी नव्हती तरीही नियोगाच्या रूढीनें त्यांचा प्रश्न सोडविला गेला होता.

आर्यांचे वैवाहिक विधि :

विवाहाच्या बाबतींत एकपत्नीत्व व बहुपत्नीत्व असे दोन्ही प्रकार होते; पण बहुपत्नीत्वाची चाल राजे, क्षत्रिय व श्रीमंत लोक यांतच फक्त रूढ होती. विवाह–संस्था धार्मिक व अतिशय पवित्र मानली जात असे. वंशाचें सातत्य राखणें हा विवाहाचा दैवी हेतु समजला जात असे. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांत ८५ व्या सूक्तांत आर्यांच्या विवाहपद्धतीचें व दांपत्यजीवनाचें सुंदर वर्णन आलें आहे. विवाह हा एक पवित्र संस्कार आहे आणि दोन जीवांच्या परस्पर साहचर्यांतून दिव्य प्रेम निर्माण व्हावें असा संकेत तेथें स्पष्ट दिसतो. "नववधूच्या रूपानें हें पहा मांगल्य येत आहे. कुलवृद्धांनो, त्याला आशीर्वाद द्या. सौभाग्यासाठीं मी तुझें पाणिग्रहण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करतों. आपण शेवटपर्यंत सहजीवन घालवूं " असे विचार प्रकट केले गेले आहेत. द्वेषरहित, समतोल, प्रेमळ असणें हें सहजीवनाचें रहस्य समजलें जाई. सामान्यपणें विवाहाला पित्याची संमति लागे व व्यक्तिशः स्वयंवरालाही आडकाठी नसे. बंधुभगिनींच्या विवाहाला परवानगी नसे. एकाच गोत्रांतील लग्नांना संमति नसे. या पद्धतीला गोत्रबाह्य-विवाह म्हणत. गोत्रान्तर्गत विवाहपद्धति ऋग्वेदांतील आर्यांना मान्य नसावी असें दिसतें. पुत्र देण्यासाठीं वारंवार देवांची प्रार्थना केली जात असे; मात्र 'मुलगी दे' अशी प्रार्थना कोणीही केलेली आढळत नाहीं. विवाह प्रौढ वयांतच होत. लग्न करण्याबद्दल स्त्रीवर जरी सक्ति नव्हती तरी विवाह करून पतिगृहीं जाणें हेंच स्त्रीचें खरें कर्तव्य समजलें जाई. हुंडापद्धति आजच्या स्वरूपांत नव्हती. गोधनाच्या स्वरूपांत साहाय्य दिलें जात असे. विवाहविधि अग्नीला साक्षी ठेवून वधूगृहीं मोठ्या थाटानें साजरा होई. समारंभानंतर पिता आपल्या मुलीला पतीच्या घरीं पाठवीत असे. पति पत्नी मोठ्या समारंभानें गृहप्रवेश करीत. वधूवरांचें आयुष्य सुखासमाधानाचें व दीर्घ असावें यासाठीं देवांची प्रार्थना करीत.

आर्यांची शिक्षणपद्धति :

उपनयन विधि करून मुलाला गुरुगृहीं वयाच्या पांचव्या किंवा आठव्या वर्षी शिक्षणासाठीं पाठविण्यांत येई. तेथें तो १२ वर्षें शिक्षण घेई. शिक्षणांत मुख्य स्थान धर्माला असून इतर व्यवसायांचें ज्ञानही गुरुगृहींच मिळत असे. शिक्षण देण्याकरितां गुरूनें कांहीं द्रव्य घेण्याची पद्धति नव्हती. गुरूच्या घरीं असतांना शिष्याला सर्व प्रकारचीं कामें करावीं लागत. गुरु-शिष्याचें नातें अत्यंत प्रेमाचें असून गुरु शिष्याला आपल्या पोटच्या मुलांप्रमाणें वागवी. मुलींनाही गुरुगृहीं शिक्षण मिळे. बुद्धि तीक्ष्ण करणें व चारित्र्य सुधारणें हें शिक्षणाचें ध्येय होतें. हें गायत्रीमंत्रावरून सिद्ध होतें. "आम्ही त्या सवितृ देवाच्या अत्यंत तेजस्वी तेजाची आराधना करतों कीं जीमुळें आमच्या बुद्धींना चालना मिळेल." (ऋ. ३-६२-१०) मुलांप्रमाणें मुलींचीहि मुंज करून त्यांना शिक्षणासाठीं गुरूकडे पाठवीत असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व शिक्षण संपल्यावर विद्यार्थी आपल्या कुवतीप्रमाणें दक्षिणा देऊन गुरूंच्या अनुमतीनें स्वगृहीं जाई.

आर्यांची वर्णव्यवस्था :

आर्यांची समाजरचना ही कांहीं वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक समूहांची बनलेली होती. या सामाजिक समूहांना 'वर्ण' असें म्हणत. हे वर्ण सुरुवातीस त्या त्या लोकांच्या विशिष्ट कार्यावरून पडलेले असत. पण पुढें पुढें ते वंशपरंपरेनें ठरले जाऊं लागले. ऋग्वेदामध्यें आर्यसमाजाचें जें चित्र दिसतें त्यांत, खरें पाहिलें असतां, वर्ण, जाति यांचा मागमूसही नाहीं. ऋषित्व हें त्यावेळीं समाजांतील कोणत्याहि थरांतील व्यक्तीस प्रयत्नानें साध्य करून घेतां येत असे. स्त्रियादेखील 'ऋषिका' असत. कवष ऐलूष नांवाच्या समाजाच्या हीन थरांत जन्मलेल्या व्यक्तीस तप करून ऋषित्व प्राप्त करून घेतां आलें व समाजांत त्याला मानमान्यता मिळाल्याचा उल्लेख सांपडतो.

आर्य भारतांत आले व त्यांनीं सप्तसिंधूंत वसाहत केली तेव्हां व्यावसायिक दृष्टीनें त्यांच्यांत अनेक गट पडले होते. या लोकांपैकीं बरेच लोक लढाऊ वृत्तीचे होते. कांहीं पौरोहित्याचें काम करणारे होते. या दोन्ही प्रकारच्या लोकांचे उल्लेख 'क्षत्र' व 'ब्रह्मन्' या शब्दांनीं होत. यांपैकीं क्षत्र म्हणजे भरत, पुरु, सृंजय, यदु वगैरे क्षत्रिय टोळ्यांचा बोध होई, तर 'ब्रह्मन्' यानें वासिष्ठ, विश्वामित्र भरद्वाज, अत्रि, गृत्समद, वामदेव इत्यादिकांचा उल्लेख होई. याखेरीज शेती व व्यापार उदीम पाहाणारा एक गट असे; यांना 'विश्' अशी संज्ञा असे. याप्रमाणें प्राचीन ऋग्वेदांतील आर्य समाजांत व्यवसायावर आधारलेले तीन गट होते. यांपैकीं 'ब्रह्मन्' हा गट विशेषतः यज्ञ, मंत्रतंत्र, औषधपाणी आणि शिवाय राजकारण व मुत्सद्देगिरी यांत गढलेला असे. वसिष्ठ, विश्वामित्र, भरद्वाज इत्यादि पुरोहित क्षत्रिय राजांना सल्लामसलत देत असल्याचे उल्लेख ऋग्वेदांत आहेत. योद्धे हे विशेषतः राजवंशांतील असत. शांततेच्या काळांत त्या त्या गटांचें खडें सैन्य म्हणजे हे क्षत्रियच असत. या दोन गटांखेरीज राहिलेला गट इतर उद्योगधंदे, व्यापार व शेती यांकडे लक्ष

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देई. समाजांतला बराच मोठा गट या व्यवसायांत गुंतलेला असे. यांना 'विश्' असें म्हणत.

ह्या तिन्ही गटांचें सामाजिकदृष्ट्या मोकळेपणानें दळणवळण चाले व व्यवसाय केव्हांही बदलतां येत असे. रोटीबेटी व्यवहाराला तर या गटांत कांहींच आडकाठी नव्हती. म्हणजे हे सगळे वर्ण त्यावेळीं गुणांवर व कर्मांवर आधारलेले असत. त्यांच्यांत जातीचा तुटकपणा आलेला नव्हता. व्यवसाय सामान्यपणें पितृपरंपरेनें ठरविला जाई; पण ऋग्वेदकालीन समाजाच्या बाबतींत पितृपरंपरेचा व्यवसाय लक्षांत घेतला जात नसे असें दिसतें.

परंतु पुढें जेव्हां गौरवर्णी आर्यांनीं कृष्णवर्णी दस्यूंना जिंकले व त्यांना आपले दास केले तेव्हां एक सामाजिक समस्या निर्माण झाली. एकीकडे आर्यांना आपलें वांशिक श्रेष्ठत्व टिकून राहावें असें वाटे, तर दुसरीकडे जिंकलेल्या दस्यूंना स्वतःच्या समाजांत सामावून घेणें अवश्य होतें. यांतून आर्यांनीं असा मार्ग काढला. अनार्यांना त्यांनीं दास म्हणजे गुलाम म्हणून आपल्या समाजांत स्थान दिलें. सामाजिक पुनर्रचना व ऐक्य या दृष्टीनें आर्यांनीं या बाबतींत मोठेंच धाडस केलें होतें. पण दुर्दैवानें या परिस्थितमुळें कृष्णवर्णी अनार्यांच्या नशीबीं कायमचें दास्य आलें. ते आर्यांमध्यें सामावले गेले खरे, परंतु आडपडदा राहिला. त्यांना 'शूद्र' ही संज्ञा प्राप्त झाली व समाजांतील हलकीं कामें त्यांच्या वांट्यास आलीं. अशा रीतीनें जन्मास आलेल्या चार वर्णांचा उल्लेख ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत आला असावा.

आर्यांची कला व शास्त्रें यांतील प्रगति :

ऋग्वेदकालीं संगीत बरेंच प्रचारांत असावें असें वाटतें; इतकेंच नव्हे तर त्याची प्रगतीही बरीच झाली असावी. ऋग्वेदाची रचनाच छंदोबद्ध आहे, यावरून आर्यांची गानप्रियता व्यक्त होते. वेबरच्या मताप्रमाणें सप्त स्वरांचा उगम मूळ भारतांत असून तेथून ते इराणांतून पाश्चात्यांच्या कानांवर गेले असावेत. कांहीं वाद्येंही या काळांत निर्माण झालीं होतीं. तंतुवाद्य, वायुवाद्य, आघातवाद्य असे वाद्यांचे तीन प्रकार होते. दुंदुभि, वेणु, वीणा,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्करी हीं वाद्यें प्रचारांत होतीं. गर्गर हें चर्मवाद्य होतें. बकुर हें युद्धाच्या वेळीं वाजविण्याचें वायुवाद्य होतें. वाण हें तंतुवाद्य होतें. 'सामन्' म्हणजे गाण्याच्या सुरावर म्हणण्याचा मंत्र. यावरून भारतीय संगीतशास्त्राचा उगम सामवेदांतही आढळून येतो.

समारंभप्रसंगीं किंवा आनंदोत्सव प्रसंगीं लोक एकत्र जमत असत; याला 'समन' असें म्हणत. यावेळीं नृत्यें होत असत. नृतू (नर्तकी) असा एक शब्द ऋग्वेदांत आला आहे. "अलंकार घातलेल्या व अभिनय करणाऱ्या नर्तकीप्रमाणें उषा प्रकट होते." असें एका ऋचेंत म्हटलें आहे. नृत्याच्या वेळीं ठेका धरून झांज वाजवीत असत.

ऋग्वेदकाळीं लेखनकला माहीत होती कीं नाहीं हें सांगणें कठिण आहे. कारण तिचा उपयोग करीत असत किंवा नसत याबद्दल निश्चित कोठेंही माहिती मिळत नाहीं. वेदमंत्र गुरुकडून शिष्यानें घ्यावयाचे व मुखोद्गत करावयाचे असल्यामुळें लेखनकलेला फारसें महत्त्व दिलें नसावें असें वाटतें.

काव्यकलेमध्यें आर्यांनीं बरीच प्रगति केली होती. निसर्गदृश्यांचें त्यांनीं दैवतीकरण केलें व त्यांची आराधना करण्यासाठीं सुमधुर शब्दरचना केली. गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज, वसिष्ठ, कण्व या कवींच्या कित्येक पिढ्यांत कवित्व होतें असें दिसतें. कविता रचण्यांतील कौशल्य तर बऱ्याच वरच्या दर्जाचें होतें. 'सुतारानें रंधून एखादी सुबक वस्तु तयार करावी, किंवा विणकरानें उत्तम वस्त्र विणावें, अथवा वधूनें नट्टापट्टा करावा तसें मी सूक्त करीत आहें' असे वैदिक आर्य कवि म्हणत. उषा देवतेवरील कवनें म्हणजे भावगीतांतील टपोरे मोतींच. या सूक्तांचा ताजेपणा व माधुर्य अवर्णनीय व अवीट आहे—"ही पहा, ही जगाची सम्राज्ञी उषा आपलें वस्त्र फडफडवीत जात आहे. ही सुंदरी उषा स्वर्ग आणि पृथ्वी यांना जाग आणीत आहे—" अशीं काव्यें वाचतांना एखाद्या आधुनिक भावकवीचें काव्य आपण वाचीत आहों असा भास होतो. वरुणसूक्तें भक्तिरसपरिपूर्ण आहेत. युयुत्सु परंतु निसर्गप्रिय आर्य कवि आपल्या सौंदर्याच्या कल्पना उषा देवतेंतूनच प्रकट करीत असावा असें वाटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनोविनोदनाचीं साधनें :—आर्यांच्या करमणुकीच्या साधनांपैकीं **द्यूत** हें साधन सार्वत्रिक प्रचारांत होतें. ऋग्वेदांत द्यूतकाराचा पश्चाताप व्यक्त करणारें एक सुंदर सूक्त आहे. (१०.३४). यावरून द्यूत खेळण्यांत लोक बेहोष होत असत व त्यासाठीं भांडणें, कर्जबाजारीपणा, निंदा, व्यसन, सर्वनाश इत्यादि अनर्थ ओढवत असत असें दिसतें. फांसे खेळतांना फसवेगिरीही चाले. चार फांशांनीं द्यूत खेळलें जाई व हे फांसे विभीदक नांवाच्या वृक्षाच्या फळांचे करीत असावेत. पापप्रवृत्ति वाढविणाऱ्या गोष्टींत विभीदकाचा उल्लेख केला आहे. (सुरा मन्युर्विभीदको अचित्तिः = दारू, राग, द्यूत व अविवेक). " द्यूत खेळूं नको; शेतीच कर (अक्षैर्मा दीव्य: कृषिमित् कृषस्व) " अशी वरील सूक्ताची सुरुवात आहे.

रथस्पर्धा हें मनोरंजनाचें दुसरें साधन होतें. या रथांच्या शर्यतीपासून दुहेरी फायदा होत असे. प्रेक्षकांची करमणूक होई व युद्धासाठीं लागणाऱ्या रथ हांकण्याच्या कौशल्याचीही वाढ होई. **कोडीं** घालणें (ब्रह्मोद्य) व त्यांचीं उत्तरें देणें हेंही करमणुकींतच मोडे. **शिकार** हे राजपुत्र व योद्धे यांचें मनोरंजनाचें साधन होतें. शिकारीसाठीं धनुष्यबाण, पिंजरे व जाळीं यांचा उपयोग करीत. सिंह, हरीण, डुक्कर, हत्ती, रेडे या प्राण्यांची शिकार विविध प्रकारांनीं करीत. पक्षी पकडून पाळण्याची हौस आर्यांना फार होती.

शास्त्रांतील प्रगति— **वैद्यकशास्त्रा**त आर्यांनीं बरीच प्रगति केलेली असावी. कांहीं रोगांसंबंधीं त्यांना चांगलें ज्ञान होतें. यक्ष्मा म्हणजे क्षयरोग हा फार भयंकर समजण्यांत येई. कावीळ व अति मद्यपानामुळें होणाऱ्या रोगांचा उल्लेख ऋग्वेदांत आहे. रक्तस्राव न करतां जखम शिवून बरी करण्याचा व लोखंडी पाय जोडण्यासंबंधींचा उल्लेख अश्विन्-सूक्तांत सांपडतो. आंधळ्याला दृष्टि देणें, बुडालेल्याला वांचविणें, भाजलेल्याला बरें करणें, अशक्ताला सशक्त करणें इत्यादि गोष्टी अश्विदेव करीत असल्याचे उल्लेख आहेत. दूषित पाण्यापासून होणाऱ्या शिपद नांवाच्या रोगाची माहिती आर्यांना होती. रोगनाशक व रोगजंतुनाशक अनेक वनस्पति आर्यांना माहीत असून त्यांचा ते भरपूर उपयोग करीत. औषधांच्या जोडीला प्रार्थना व मंत्रविद्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांचाही ते उपयोग करीत. विषारी प्राण्यांच्या विषबाधेपासून मुक्त होण्यासाठीं, वाईट स्वप्नांचा व अपशकुनांचा परिणाम टाळण्यासाठीं मंत्रांचा उपयोग करीत.

ऋग्वेदांत **गणितशास्त्राच्या** दृष्टीनें परार्धापर्यंतच्या सर्व संख्या, गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी यांचा उल्लेख आहे. **ज्योतिषशास्त्रांतही** बरीच प्रगति झाली होती. वर्षाची विभागणी बारा महिन्यांत करण्यांत आली होती. प्रत्येक महिना तीस दिवसांचा होता. तेराव्या अधिक महिन्याचाही उल्लेख सांपडतो. सूर्यग्रहणासंबंधींचा महत्त्वाचा उल्लेख पांचव्या मंडलांत आहे. स्वर्भानु नांवाच्या राक्षसाने अंधारानें सूर्यास झांकून टाकलें. तेव्हां अत्रि ऋषींनीं मंत्र म्हणून त्याची सुटका केल्याचा व अत्रीखेरीज इतर कोणालाही हें साधलें नाहीं असा उल्लेख आढळतो. (अत्रयस्तमन्वविन्दन् न हि अन्ये अशक्नुवन्). हें सूर्यग्रहण खि पू. ३९२८ या वर्षीं झालें असावें असें डॉ सेनगुप्त या पंडितानें गणितशास्त्राच्या आधारें मांडलें आहे. ऋतूंचा उल्लेख पुरुषसूक्तांत आढळतो.

आर्यांची आर्थिक परिस्थिति :

प्राचीन आर्यांचा प्रमुख व्यवसाय म्हणजे लढाईचा होता. या लढायांत पशुधनाची लूट ते मिळवीत असत. पायीं किंवा घोड्याच्या रथांतून ते युद्ध करीत. अंगांत ते चिलखत घालीत असत. धनुष्यबाण, भाला, परशु हीं त्यांचीं प्रमुख शस्त्रें असत. म्हणजे सुरवातीस आर्य भटकेगिरीच करीत. पुढें गुरांची निपज हा त्यांचा प्रमुख धंदा बनला. गुरांमध्यें सर्वांत अधिक लक्ष बैलाकडे असे. घोड्यालाही बरेंच महत्त्व असे. देवांना आळविण्यासाठीं रचलेल्या सूक्तांत बैल, गाई, घोडे यांची पुन्हा पुन्हा मागणी केलेली आढळते. मूळच्या रहिवासी लोकांत निरनिराळ्या तटांत जीं भांडणें होत तीं सर्व गाईबैलांच्यासाठीं असत व यावरूनच ‘ लढाई ’ला मूळचा शब्द ‘ गोधनाची इच्छा (गविष्टिः) ’ असा योजिला आहे. गोधन हें अतिश्रेष्ठ धन अशी त्याची स्तुति केली आहे. वांसराकडे धांवत जाणाऱ्या गाईचें हंबरणें म्हणजे मधुर गान होय असें प्राचीन लोक मानीत. भरद्वाज ऋषींनींच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रथम प्राचीनकाळीं अस्तित्वांत असलेल्या गोवधाला आळा घातला असला पाहिजे. गोसंरक्षण व गोसंवर्धन या दृष्टींनीं भरद्वाज ऋषींनीं वैदिककाळांत बरीच वैचारिक क्रांति घडवून आणली असली पाहिजे. पिण्याकडे विशेषतः धारोष्ण दुधाचा उपयोग केला जाई. बैलांचा उपयोग रथ व नांगरण्यासाठीं करीत. घोड्याचा उपयोग लष्करी कामासाठीं होई आणि शेळ्या व मेंढ्या यांपासून त्यांना कांतडीं व लोंकर मिळे.

आर्यांचा व्यापारउदीम :

फायद्यासाठीं दूर देशांत व्यापार चालू असल्याचे उल्लेख ऋग्वेदांतील सूक्तांत आढळतात. विनिमयानें वस्तूंची देवाणघेवाण होत असे; पण पुढें पुढें गायींचा उपयोग पैशासारखा होऊं लागला. निष्क हेंही एक प्रचलित सोन्याचें नाणें असावें. समुद्रावरही व्यापार चालत असावा; कारण समुद्राचा उल्लेख ऋग्वेदांत वारंवार येतो. ऋग्वेदांत एका सूक्तांत (१.११६.३) अश्विदेवांनीं शंभर वल्ह्यांच्या जहाजाच्या साहाय्यानें (शतारित्र) भुज्यूला वांचविल्याचा उल्लेख आहे. दहाव्या मंडलांतील एका सूक्तांत (१०-१२६-–५) पूर्व व पश्चिम समुद्रांचा उल्लेख आहे. नौकानयनाचे उल्लेख जागोजाग आढळतात.

आर्यांचे उद्योगधंदे :

आपण वर पाहिलेंच आहे कीं, ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे आर्यांचे तीन वर्ण होते व हिंदुस्थानांत झालेल्या अनार्यांबरोबरच्या झगड्यांतून चौथा शूद्र वर्ण तयार झाला. या त्रैवर्णिकांचीं निरनिराळीं कामें ठरलेलीं असत. कोणासही समाजसेवेपैकीं कोणतेंही अंग पत्करण्याचा अधिकार होता; व त्यावरून त्याची जात ओळखली जाई; जन्मावरून नव्हे. मुळांत आर्यांच्या गरजा फार कमी होत्या. सिंधु, गंगा, यमुना या नद्यांच्या कांठची जमीन अत्यंत सुपीक असल्यामुळें व आर्य लोक स्वतः अत्यंत कल्पक व कष्टाळू असल्यामुळें त्यांना अन्नधान्याची कमतरता कधींच भासली नाहीं. सामान्य गरजा सहजासहजीं भागूं लागल्या. नंतर इतर गरजा भासूं लागल्या. पूर्वींच्या शेती व गोपालन या उद्योगाबरोबर इतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उद्योग निर्माण झाले. श्रमविभागाचें तत्त्व अंमलांत येऊन कारागिरांचे अनेक प्रकार उदयास आले.

शेती व गुरें पाळणें या दोन व्यवसायांवर आर्यांचा उदरनिर्वाह मुख्यतः होत असे. शेतांत खत म्हणून जनावरांच्या शेणाचा उपयोग करीत. जमीन चांगली नांगरून, कोळपून तींत बीं पेरलें जाई. शेताला लागणारें पाणी विहिरींतून काढीत व कांहीं ठिकाणीं कालवेही काढलेले होते. 'खनित्रिम' व 'स्वयंज' असे पाण्याचे दोन प्रकार असत ते यामुळेंच. वर्षांतून साधारण दोन पिकें काढीत. धान्य निघाल्यावर तें स्वच्छ जमिनीवर पसरून बैलांकडून त्याची मळणी होत असे. धाना, यव, सातु, तीळ इ. धान्यें पेरीत. चौथ्या मंडलांतील ५७ वें सूक्त शेतीविषयक असून त्यांत नांगर (लांगल), जुपण्या (वस्त्र), चाबूक (अष्ट्रा), फाळ (फाल) नांगरलेली जमीन (सीता) यांचे उल्लेख आहेत.

सुतारकाम :

सर्व धंद्यांमध्यें लांकूडकाम करणाऱ्या सुताराला (तक्षा) अधिक मान मिळत असे. रथ, गाड्या, नांवा इत्यादि वस्तु तो तयार करीत असे. लांकूड कापणें, सांधे जोडणें, चाकें कातणें हीं सर्व कामें सुतार करी. घरें बांधतांना लागणारें सर्व लांकूडकाम सुतारच करी. झाडाचा बुंधा पोखरून त्याची नाव तयार करीत.

धातुकाम :

सोनें, रुपें, तांबें व लोखंड या धातूंचा शोध आर्यांस ऋग्वेदकाळींच लागला होता. सोनें नदीच्या पात्रांत सांपडे. लोखंडापासून पोलाद तयार करून त्याचा व्यवहारांत सार्वत्रिक उपयोग करीत. विशेषतः पोलादाचीं उत्तम शस्त्रें तयार होत. सुऱ्या, तलवारी, कुऱ्हाडी, बाणांचे व भाल्याचे फाळ इत्यादि आयुधें पोलादाचीं व तांब्याचीं असत. सोन्याचांदीचे अलंकार (खादि, निष्क, रुक्म, कुरीर, न्योचनी इ.) सोनार तयार करीत. श्रीमंत लोक सोन्याचांदीचे दागिने वापरीत. गरीब लोक तांब्याचे वापरीत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडीं, हार, कर्णफुलें इत्यादि दागिने प्रचारांत होते. सोन्यासाठीं वैदिक कवींनीं देवांची प्रार्थना केली आहे. श्रीमान् यजमानापासून आपणांस सोनें मिळावें अशी त्यांची इच्छा असे.

रत्नांचा अलंकार करण्याकडे उपयोग करीत. हिमालय पर्वत व बाल्हीक देश या प्रदेशांत रत्नें सांपडत. मोतीं विपुल असल्यामुळें घोड्यांच्या गळ्यांत मोत्यांच्याच माळा घालीत.

विणकाम :

यावेळच्या आर्यांस कापूस व लोंकर या दोन्ही वस्तु माहीत होत्या. त्यांपासून सूत कांतून तें विणण्याची कला त्यांस अवगत होती. विणण्याचें काम विशेषतः स्त्रिया करीत असाव्यात. सुताचा धागा घट्ट व मजबूत व्हावा म्हणून त्यास खळ लावीत. शिवण्याच्या सुईचा उल्लेख एका ऋचेंत आला आहे. गुंडाळण्याचें (वासस्) व पांघरण्याचें (अधिवासस्). अशीं दोनच वस्त्रें वापरीत असल्याचें ऋग्वेदावरून कळतें. मरुत् देव हरणाचें कांतडें वस्त्रासारखें वापरीत, तर कांहीं मुनि मळकट रक्तवर्णी वस्त्रें वापरीत असल्याचा उल्लेख आहे. अत्क (घट्ट बसणारें वस्त्र) द्रापि (झग्यासारखें वस्त्र), पेशस् (वेलबुट्टी काढलेलें वस्त्र), वाधूय (वधूचें वस्त्र) इत्यादि उल्लेख आढळतात. सुवासस् आणि सुवसन या शब्दांवरून पोषाख नीटनेटका असण्याबद्दल त्यावेळीं कटाक्ष असावा असा तर्क करतां येतो. शिप्र नांवाचें शिरस्त्राण युद्धप्रसंगीं वापरीत. दोर विणण्याचे उल्लेख ठिकठिकाणीं आढळतात. गवत व वेत यांपासून चटया व आसनें तयार करीत.

कांतडकाम :

दृति (पखाल, मोट), चर्म (कमावलेलें कांतडें) यांचे उल्लेख आढळतात. त्यावरून हा व्यवसाय बरेच लोक करीत असावेत. पादत्राणांचा उल्लेख ऋग्वेदांत नाहीं. धनुष्याची दोरी, भाते, हस्तत्राण यासाठीं कांतड्याचाच उपयोग करीत. कधीं कधीं रथही कांतड्यानें मढविलेले असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर वर्णन केलेल्या व्यवसायाखेरीज इतरही व्यवसाय पुष्कळ होते. बाप जो धंदा करीत असे तोच सामान्यपणें मुलगा पुढें चालवीत असे. त्यामुळें कारागिरींतील कौशल्य पिढीजात होऊन बसे. मात्र याचा अर्थ उद्योगस्वातंत्र्य मुळींच नव्हतें असें नाहीं; कारण बापाचा धंदा आवडेल तरच मुलानें तो करावा अशी सवलत होती. उद्योगस्वातंत्र्याची कल्पना देणारा एक मनोरंजक उतारा ऋग्वेदांत आढळतो—

"कारुरहं ततो भिषगुपलप्राक्षिणी नना ।
नानाधियो वसूयवो अनु गा इव तस्थिम ॥

मी एक कवि आहें, माझे वडील वैद्य आहेत, माझी आई धान्य कांडते. अशा तऱ्हेनें जसे गाईच्या मागें गोवारी धांवतात, तसे आम्ही निरनिराळे व्यवसाय करून पैशाच्या मागें धांवतों... "

आर्यांच्या नीतिकल्पना व तत्त्वज्ञान :

वरुण हें नीतीचें आधिदैवत मानलें जात असे. देवता अंतरिक्षांतून मानवांच्या हालचालींचें निरीक्षण करीत असतात असें ऋग्वेदांत वारंवार म्हटलें आहे. योग्य मार्गापासून किंवा कर्तव्यापासून च्युत करणारें—अधःपात करणारें तें पाप अशी त्यांची कल्पना असावी; कारण, पाप, अघ, एनस्, अंहस्, निर्ऋति या शब्दांची व्युत्पत्ति 'उच्च पातळीवरून अधःपतित होणें' हीच क्रिया सुचवितात. पाप हें महाभयंकर समजून तें नाहींसें करण्यासाठीं वरुणाची प्रार्थना करण्यांत येई. पापी मनुष्यावर वरुण पाश टाकतो. मनुष्य केवळ स्वतःच्याच पापाला जबाबदार असतो असें नव्हे, तर पूर्वजांनीं केलेल्या पापासही तो जबाबदार असतो. मद्यपान, क्रोध, द्यूत, अविवेक हीं पापाचरणाचीं कारणें समजलीं जात असत. गरिबाला दान देणें, भुकेलेल्याला अन्न देणें, सेवकास चांगलें वागविणें, अतिथीला विन्मुख न धाडणें इत्यादि सदाचरणाचे नियम ऋग्वेदांत सूचित केले आहेत.

'धर्म' या शब्दानें ज्या भावनेचा व सदाचरणाचा बोध होतो ती भावना आणि आचरण यांचा निर्देश 'ऋत" या शब्दानें ऋग्वेदांत केला आहे. निसर्गामध्यें व मानवामध्यें नियमितता व सुसूत्रता आणण्याचें काम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'ऋत' म्हणजे सत्यच करतें. देव हे 'ऋतावान्' व 'ऋतावृध' असतात. या ऋताच्या मार्गानें जाणाऱ्याचें देव कल्याण करतात असे उल्लेख ऋग्वेदांत आहेत.

मरणोत्तर जीवन :

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलांत मरणोत्तर जीवनासंबधीं कांहीं विचार व्यक्त झाले आहेत. सर्व देव अमर आहेत व ते आपल्या पूजकांना अमरत्व देण्यास तयार असतात असें म्हटलें आहे. मनुष्य मेल्यावर त्याचा पार्थिव देह मातींत मिळून जातो पण आत्मा अमर राहातो. मृताचे पितर त्याच्यासाठीं दुसरें स्थान शोधून ठेवितात. हेंच यमाचें निवासस्थान. तेथें अखंड प्रकाश, न आटणारें पाणी, आनंद व सुख असतें. येथें आत्म्याला तेजस्वी रूप प्राप्त होतें.

अमर देवांप्रमाणेंच परलोकीं गेलेल्या पितरांबद्दल आर्यांनीं आदर व्यक्त केला आहे. श्राद्धप्रसंगीं यम आणि अग्नि यांच्याबरोबर सर्व पितरांना सोम व हवि सेवन करण्याकरितां पाचारण केलें जातें. हे अमर मृतात्मे आपल्या संततीची काळजी वाहतात व यज्ञप्रसंगीं यजमानास संतति, संपत्ति व आशीर्वाद देतात अशी कल्पना रूढ होती.

पापी, दुष्ट व वरुणाच्या आज्ञा मोडणारे अशा लोकांना परलोकीं स्थान नाहीं. त्यांच्या देहाबरोबर त्यांचा आत्माही खोल गर्तेंत जातो. तेथें निर्ऋति नांवाची देवता असते. यमाचा दूत म्हणून कपोत हा या पापी आत्म्यांना या अंधकारमय व दुःखमय अशा निवासस्थानीं आणतो. तेथें अधार्मिक, यज्ञ न करणारे, असत्य बोलणारे, आचारहीन असे लोक राहातात. अगदीं क्वचित् प्रसंगीं 'आम्हांला अमरत्व दे' अशाही प्रार्थना केलेल्या आढळतात उदा.—'ददात नो अमृतस्य प्रजायै।' किंवा 'तत्र माममृतं कृधि।' इ. अनेक योनींतून फिरणें, पुनर्जन्म, कर्म इत्यादि कल्पनांचे ओझरते उल्लेख ऋग्वेदांत आले आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्वसामान्यपणें ऋग्वेदांतील आर्यांचा धर्म प्रवृत्तिपर होता. 'जीवन हें जगण्यासाठीं—उत्तम रीतीनें जगण्यासाठीं आहे' हें त्यांचें ध्येयवाक्य होतें. त्यांच्या तत्त्वज्ञानविषयक कल्पना या सृष्टयुत्पत्तिविषयक सूक्तांत आढळतात. जगाचें कोडें उलगडण्याचे कांहीं प्रयत्न त्या सूक्तांतून केले आहेत. हें सर्व जग देवांहून श्रेष्ठ अशा कोणा उत्पादकाकडून निर्माण झालें असावें, आणि तो उत्पादक म्हणजे पुरुष, विश्वकर्मा, हिरण्यगर्भ किंवा प्रजापति या नांवांनीं उल्लेखिला जातो. ऋग्वेदांतील प्रसिद्ध अशा पुरुषसूक्तांत असें म्हटलें आहे कीं, देवांनीं विराट् पुरुषाला बळी दिला व त्याच्या अवयवांपासून बहुविध सृष्टि निर्माण केली. कांहीं ठिकाणीं पाणी हें सर्व सृष्टीचें मूळ बीज असें म्हटलें आहे. हिरण्यगर्भ प्रथम जन्मला व त्यानें सर्व पृथ्वी निर्मिली असें कांहीं ठिकाणें म्हटलें आहे. नासदीय सूक्तांत विश्वोत्पत्तिपूर्वीच्या काळाचें वर्णन आहे :

"तेव्हां असत् नव्हतें, सत् नव्हतें, व्योम नव्हतें, मृत्यु नव्हता, अमरत्व नव्हतें, रात्र, दिवस यांचें ज्ञान नव्हतें, त्यावेळीं तें (आदितत्त्व) मायेशीं एकरूप होऊन वर्तत होतें. त्याहून श्रेष्ठ दुसरें कांहींही नव्हतें."

याप्रमाणें निरनिराळ्या नांवांखालीं विश्वकर्त्याची कल्पना ऋग्वेदांतील बहुतेक तात्त्विक सूक्तांत आढळते. उत्पादक तत्त्वाला अद्याप नांव न देतां नुसतें 'एक' असें म्हटलें आहे. तेव्हां सृष्टींत आपणांस जें जें भासतें व दिसतें, ज्यांना आपण निरनिराळे देव समजतों ते सर्व, त्या सर्व कल्पना एकाच एकजिनसी तत्त्वाच्या विकृति होत. भासमान होणारें नानात्व सर्व मिथ्या आहे, या कल्पना ऋग्वेदांतील सूक्तांत प्रादुर्भूत होऊं लागल्या होत्या हें उघड आहे. या कल्पनांचा स्पष्ट व स्वच्छ उल्लेख 'एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति, अग्निं यमं मातरिश्वानमाहुः ।' (ऋ. १-१६४-४६) (विश्वात्मा एकच असून त्यालाच ज्ञाते अग्नि, यम, मातरिश्वा अशीं नानाप्रकारचीं नांवें देतात) यांत आढळतो. 'सर्व विश्वांत एकच आत्मा भरून राहिला आहे' ही अद्वैतवाद्यांची कल्पना याप्रमाणें ऋग्वेदाच्या तात्त्विक सूक्तांत आढळते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्यांची यज्ञसंस्था :

देवतांना संतुष्ट करण्याचें व देवता आणि भक्त यांचे स्नेहसंबंध उत्पन्न करण्याचें साधन म्हणजे भक्तांनीं देवांना कांहीं गोष्टी अर्पण करणें व देवतांची उपासना करणें. अर्थात् या गोष्टी केल्यानंतर देवतांकडून आपणांस कांहीं गोष्टी प्राप्त व्हाव्यात अशी भक्तांची इच्छा असणें स्वाभाविक आहे. परंतु भक्तांनीं अर्पण केलेल्या या गोष्टी स्वर्गांतील देवापर्यंत नेऊन कोण पोहोंचविणार ? तर, साहाजिकच ज्याच्या ज्वाळा उंच आकाशापर्यंत भिडूं शकतात अशा देवतेचें स्वरूप दिल्या गेलेल्या अग्निदेवाकडेच हें काम दिलें गेलें. तसें पाहिलें तर यज्ञीय अग्नि ही युरोभारतीय (Indo-European) संस्था आहे. पर्शुभारतीय (Indo-Iranian) काळांत यज्ञाचे विधि, पुरोहितवर्ग या गोष्टींची वाढ झाली. हवि अर्पण करणें हें यज्ञांतील मुख्य कर्म. या हवींमध्यें दूध, तूप, धान्य, मांस व सोम या वस्तूंचा समावेश होतो. ऋग्वेदकाळची यज्ञपद्धति साधी होती. मात्र सोमयाग फार क्लिष्ट होता. यज्ञांत होता, अध्वर्यु, उद्गाता व ब्रह्मा असे चार प्रमुख ऋत्विज असत. होता सूक्तें म्हणत असे किंवा स्वतः तयार करीत असे. अध्वर्यु स्वतःच्या हातांनीं यज्ञीय विधि करीत असे, उद्गाता सामें गात असे व ब्रह्मा अध्यक्षाचें काम करी. याशिवाय आणखीही अनेक मदतनीस असत.

ऋग्वेदकालीं यज्ञाची प्रक्रिया जरी पुढील ब्राह्मणग्रंथांत वर्णिल्याप्रमाणें बिकट नव्हती, तरी उगाच कोठेंतरी अग्नि पेटवून त्यांत कांहीं तरी टाकावें असा प्रकार नव्हता. यज्ञोपासना दोन प्रकारची होती. एक " गृह्ययज्ञ ". हा घरोघर प्रातःकालीं व सायंकाळीं होत असे. ह्याच गार्हपत्य अग्नि. ह्या अग्नीमध्यें मंत्रोच्चारपूर्वक भक्तिभावानें आहुति देत. दुसरा प्रकार म्हणजे वर उल्लेखिलेला अध्वर-याग. याला ' सात होते ' लागत असत.

देवांची उपासना यज्ञद्वारें होत असल्याकारणानें देवतांच्या प्रत्यक्ष मूर्ति करून त्यांची पूजा करण्याची कांहींच आवश्यकता नव्हती. म्हणून मूर्तिपूजा त्याकाळीं अस्तित्वांत नव्हती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपासनाप्रवण वैदिक वाङ्मयांत 'सोम' ह्या वनस्पतीइतकें महत्त्व दुसऱ्या कोणत्याच वनस्पतीला नाहीं. उपासनेमध्यें बाह्यक्रिया म्हणजे अग्नी-मध्यें घृताहुति अर्पण करणें. कांहीं प्रसंगीं सोमरसही अर्पण करीत. आपल्या आर्य पूर्वजांची वसती ज्यावेळेस हिंदुस्थानच्या सरहद्दीवर म्हणजे गांधारादि देशांत किंवा त्याही पलीकडे कोठें तरी थंड ठिकाणीं होती तेव्हां अग्न्युपासना प्रचलित असावी. परंतु हिंदुस्थानसारख्या उष्ण प्रदेशांत अग्न्युपासना टिकणें अशक्य असल्यामुळें ती ऋग्वेदमंत्रकालींच आचरणांतून लुप्त झाली असावी व तिची जागा सोमसंस्थेनें घेतली असावी. संपूर्ण नववें मंडल हें 'पवमान सोम' या देवतेच्या स्तुतिपर आहे सोमाचा रस पिळून तो अर्पण करण्याच्या क्रियेला 'सवन' म्हणतात. ही सवनें दिवसा-तून तीन असतात. पार्शी लोकांच्या अवेस्त्यामध्यें सोम उपासनेचा निर्देश असून तेथें त्याला 'हाओम' असें म्हटलें आहे. अश्वमेध व दर्शपूर्णमास इत्यादि यज्ञही ऋग्वेदकाळीं प्रचारांत होते.

ऋग्वेदकाळीं मनुष्ययज्ञ प्रचारांत होता कीं नाहीं याबद्दल वाद आहे. ऋग्वेदांतील पुरुषसूक्तांत पुरुषमेधाची कल्पना आहे. यावरून पुरुषमेधाचा प्रचार हिंदुस्थानांत येण्यापूर्वीचा असावा. मात्र पुरुषमेधाचें जें वर्णन आहे त्यावरून पुरुषाचा प्रत्यक्ष वध करीत नसावेत. ते फक्त यूपाला बांधले जात असावेत; व निरनिराळ्या देवतांना औपचारिकपणें अर्पण केल्यानंतर त्यांना मुक्त केलें जात असावें. ऐतरेय ब्राह्मणांतील शुनःशेपाच्या कथेवरून असेंच अनुमान निघतें.

प्रार्थनेनें देव प्रसन्न होतात व त्यांची शक्ति वाढते अशी आर्यांची कल्पना होती, म्हणूनच 'घृत व मध यांहून मधुर अशी प्रार्थना म्हणा' (ऋ. ८-२४-१०) असें आवाहन एक वैदिक ऋषि म्हणतो. याप्रमाणें ईश्वराविषयींची आपली कृतज्ञताबुद्धि वैदिक आर्य दोन तऱ्हांनीं प्रकट करीत होते—एक म्हणजे प्रार्थनेनें आणि दुसरें म्हणजे प्रत्यक्ष कृतीनें म्हणजेच यज्ञ करून.

या यज्ञसंस्थेमुळें अनेक फायदे आर्यांना झाले. पैतृक परंपरा (गोत्रप्रवर)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राखली गेली. नृत्य, संगीत, शिल्पकला, प्राणिशास्त्र हीं वाढीस लागलीं. व्याख्यानासाठीं जी मंडळी एकत्र जमत त्यांची बौद्धिक करमणूक होई. या बौद्धिक वादविवादांत पुढील तत्त्वज्ञानाचीं बीजें पेरलीं गेलीं. आर्य-अनार्य यांच्या धार्मिक एकीकरणाला संधि मिळाली. समाजाच्या विस्ताराचें व लोकसंग्रहाचें काम सुकर झालें. वैदिक राष्ट्रें लहान लहान टोळ्यांसारखीं होतीं त्यास यज्ञसंस्थेनेंच एकत्र जोडलें.

ऋग्वेदांतील आर्यांचा धर्म :

ऋग्वेदांतील सूक्तांपैकीं बहुतांश सूक्तें धार्मिक स्वरूपाचीं आहेत. त्यांत धर्माचें कांहीं ना कांहीं स्वरूप प्रतिबिंबित झालेलें असतें. एवढें मात्र खरें कीं, त्यावरून आर्यांच्या धर्माचें नेमकें स्वरूप सांगतां येणें कठिण आहे. सर्वसामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, आपले पूर्वज आर्य हे बाल्ख प्रदेशांत राहात असतांना व पुढें सप्तसिंधूकडे सरकत असतांना त्यांनीं जी सूक्तरचना केली त्यांत त्यांच्या धर्माचीं तीन वैशिष्ट्यें दिसतात; **विश्वात्मक देवतेचें पूजन, अग्निपूजन व वीरपूजन.**

आर्य हे निसर्गाच्या सान्निध्यांत वावरत असल्यामुळें स्वाभाविकपणें निसर्गाची विशालता व तेजस्विता यांचा त्यांच्या धर्मकल्पनांवर परिणाम झाला. त्यामुळें आकाश हा आपला पिता [द्यौः पितर = (Roman) Jupiter] आहे अशी कल्पना त्यांच्या सूक्तांत दिसते. तसेंच, या विश्वव्यवस्थेच्या पाठीमागें एक नियत अशी शक्ति आहे म्हणूनच जग हें सुव्यवस्थित असून त्यांत गोंधळ नाहीं अशी त्यांची धारणा होती. ही नियत शक्ति म्हणजेच ऋत (अवेस्तन अश) व ही शक्ति असणारा देव म्हणजे **असुर वरुण.** तेव्हां द्यौः व वरुण यांच्या पूजनांतून आर्यांची विश्वात्मक पूजा व्यक्त होत असे. आर्यांच्या धर्माचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे अग्न्युपासना. वेद व अवेस्ता या ग्रंथांत ही विशेषतः आढळून येते. आर्य आक्रमक वृत्तीचे व युयुत्सु होते. त्यांचें आक्रमण थोपविण्याचा प्रयत्न इतर टोळ्या करीत होत्या. या टोळ्यांशीं—दास व वृत्र—टक्कर देण्याचें काम आर्यांनीं इंद्राच्या सेनापत्याखालीं केलें व शत्रूंचा पराभव करून त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सप्तसिंधूत प्रवेश केला. त्यांच्या सांस्कृतिक जीवनाला वळण देणाऱ्या या विजयामुळें त्यांनीं इंद्राला देवतेचें स्वरूप देऊन वीरपूजा सुरू केली.

ज्यावेळीं युरोपांत वेदांच्या अभ्यासास सुरुवात झाली त्यावेळीं वैदिक आर्यांचा धर्म रानटी स्वरूपाचा (Primitive) असावा अशीं तर्कटें पुढें मांडलीं जात होतीं. तसेंच आर्य हे अर्धवट सुधारलेले व अर्धवट रानटी होते असेंही कांहीं लोक म्हणत. परंतु वेदांचा जसजसा सूक्ष्म अभ्यास होऊं लागला, तसतसा हा गैरसमज दूर होऊन आर्य हे बरेच सुधारलेले व पुढारलेले होते व त्यांचें वाङ्मय, त्यांतील अलंकार व वृत्तें इत्यादि गोष्टीं-वरून आर्यांचा धर्म हा रानटी अवस्थेंतील नव्हता हें सिद्ध होत आहे. एक गोष्ट मात्र खरी; या आर्यांच्या धर्माबरोबर अनार्यांचे इतर कांहीं उपासना पंथ (शिश्नदेव, यति, मुनि, रक्षस्) अस्तित्वांत असल्यामुळें ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांत त्यांचा निर्देश केला गेला आहे.

ऋग्वेदांतील आर्यांच्या धर्माचें दुसरें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची **व्यवहारो-पयोगी प्रवृत्तिपरता.** वैदिक धर्ममार्ग अगदीं साधा, स्पष्ट व उन्नति-कारक आहे. आपण होऊन कोणाचाही द्वेष न करणें परंतु मनानें व शरिरानें रोगरहित व शक्तिमान् असणें; पुत्रपौत्र पराक्रमी व्हावेत अशी आकांक्षा बाळगणें; ईश्वरावर निष्ठा ठेवून न्यायानुवर्ती राहाणें; युद्ध उपस्थित झालें असतां पराक्रमानें विजय संपादन करणें; सत्पात्रीं अन्न किंवा इतर साहाय्य देऊन यथाशक्ति परोपकार करणें हा आर्यांचा सद्धर्म-मार्ग होता. ते म्हणत, " हे देवा, आमच्यांतील व्याधि दूर होवोत, दुर्बुद्धि नष्ट होवो, द्वेषबुद्धि नाहींशी होवो; वाटेंतील धोंड बाजूस सारावी त्याप्रमाणें आमच्यांतील पापबुद्धि लयास जावो. " देवाण-घेवाण हें तत्त्व त्यांच्या धर्मांत होतें; पण तेवढेंच म्हणजे त्यांचा धर्म होता असें म्हणणें अतिशयोक्तीचें होईल. पापनिर्मुक्ति, अमृतत्व, भद्र, शर्म, आनंद याही गोष्टी त्यांनीं देवापाशीं मागितल्या आहेत. अर्थात् मागणीचा मोठा भाग भौतिक सुखाचा होता. 'तेजस्वी, प्रवृत्तिपर' असें त्यांच्या धर्माचें स्वरूप होतें.

ऋग्वेदांत पुरोहितांना बरेंच महत्त्व होतें असें दिसतें. यज्ञीय विधीमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरोहितांचाच प्रामुख्यानें भाग असे. देव व राजे लोक यांची सांगड घालून देण्याचें काम त्यांच्याकडे होतें. आपल्या आश्रयदात्या यजमानांतर्फे ते देवांना आळवीत व यज्ञ करीत आणि त्यांना अपेक्षित यश मिळवून देत असत. यामुळें ऋग्वेदांतील धर्म हा समाजांतील वरच्या थरांतील लोकांचा (कवि, राजे, पुरोहित, योद्धे) धर्म होता. सर्वसामान्य लोकांचा धर्म म्हणजे किरकोळ क्षुद्र विधि, जादूटोणा इत्यादि असे; तर ऋग्वेदांतील धर्म हा श्रीमंत, राजेरजवाडे व त्यांचे आश्रित पुरोहित यांचा असे. या धर्मांत निराशावादाला कोठेंही स्थान नाहीं. जीवनाविषयीं किंवा धर्माविषयीं कधींहि तिरस्कार व्यक्त केलेला नाही. एकंदरींत जीवन सुंदर व रमणीय असून तें जगण्यासाठीं दीर्घायुष्य मिळावें अशीच इच्छा प्रत्येकानें व्यक्त केली आहे.

देव व भक्त यांचे संबंध अत्यंत सलोख्याचे व मित्रत्वाचे असत. इंद्र हा भक्तांना विपुल द्रव्य देणारा तर अग्नि हा त्यांचा जिवलग मित्र. वरुण, आदित्य व अदिति या नीतिदेवता होत्या. पापनिर्मुक्ति व पापासाठीं शिक्षा याच देवता करीत. वरुणाशीं तर आर्यभक्तांचें बरेच सलगीचे संबंध असावेत.

नैतिदृष्ट्या ऋग्वेदांतील आर्यांचा धर्म बराच पुढारलेला होता असें म्हणावयास हरकत नाहीं. सुरा, द्यूत, क्रोध, अविवेकी वर्तन यांपासून अलिप्त राहण्याचा आदेश देणाऱ्या आर्यांची नैतिक पातळी उच्च दर्जाची असावी यांत शंका वाटत नाहीं. ‘ धर्म ’ हा शब्द प्रचारांत आला होता व त्याचा अर्थ विश्वाचें व व्यक्तिशः मानवाचें नियंत्रण करणारी नैतिक शक्ति असा होता. वरुणाचे कायदे (धर्माणि) अवश्य पाळले पाहिजेत अशी धारणा होती. जगामध्यें ऋताची म्हणजे सत्याची स्थापना व अनृताचें, असत्याचें, दुराचरणाचें उच्चाटन हें काम वरुणादि देवता करतात. एक ऋषि म्हणतो, “ सूज्ञ लोकांस हें ठाऊक असतेंच कीं, या जगांत सत्य व असत्य वचनांचा झगडा चालू असतो. त्यापैकीं जें सत्य व सरळ असतें त्याचें परमेश्वर रक्षण करतो व असत्याचा नाश करतो. ”

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्यांच्या देवदेवता :

वैदिक दैवतेतिहासांत निसर्गातील घटनांना मानवी गुण चिकटविले जाऊन देवत्व प्राप्त झालें ही क्रिया स्पष्टतेनें पाहावयास सांपडते. पुष्कळ बाबतींत देव आणि त्याचें नांव या दोघांचा भौतिक आधार अत्यंत पारदर्शक आहे; किंबहुना अनेक स्थळीं मानवी गुणांचा अध्यारोप प्राथमिक स्थितींत दृष्टीस पडतो. उदाहरणार्थ, उषस् हें प्रातःसंध्येचें नांव असून उषस् ही मानवी गुणांचा पातळ बुरखा घेतलेली देवीही पण आहे. तसेंच जेव्हां अग्नि हें देवाचें नांव म्हणून येतें, तेव्हां या देवाच्या व्यक्तित्वांत भरलेलीं जड मूळतत्त्वें स्पष्ट ओळखूं येतात.

मनुष्याच्या सभोंवार असणारे सर्व नैसर्गिक पदार्थ व घडणाऱ्या घटना हीं सचेतन व दैवी आहेत, ही फार प्राचीन काळापासून चालत आलेली श्रद्धा वैदिक दैवतसृष्टीच्याही बुडाशीं आहे. मनुष्याच्या मनावर भीतीचें दडपण टाकणारी किंवा त्याचें बरेंवाईट करण्यास समर्थ म्हणून मानली जाणारी प्रत्येक गोष्ट वैदिक काळांत अर्चनेचा व प्रार्थनेचा विषय बनली होती. द्यावापृथिवी, पर्वत, नद्या, वनस्पति वगैरे दैवी शक्ति म्हणून पूजिल्या जात. तसेंच घोडा, गाय आणि इतर प्राणी आराधिले जात. अस्त्रें, रथ, दुंदुभि, नांगर; तसेंच सोम कुटण्याचे पाटे, यूप इत्यादि उपकरणीं, यांसारख्या मनुष्यनिर्मित वस्तूंचेंसुद्धां अर्चन होई.

वेदांतील देव अत्यंत बलवान् पण माणसेंच आहेत. त्यांच्या मनोवृत्ति व त्यांचे हेतु माणसासारखेच असल्याचें दिसतें. मात्र सर्वच वैदिक देवता निसर्गशक्तींच्या निदर्शक आहेत हा सिद्धांत चुकीचा आहे. पुणें विद्यापीठांतील विश्वविख्यात् संशोधक डॉ. रा. ना. दांडेकर म्हणतात कीं, वैदिक दैवतशास्त्र हें विकसनशील आहे, गतिमान् आहे. वेदकालीन सांस्कृतिक इतिहासांतील स्थित्यंतराबरोबर वैदिक दैवतशास्त्रांतही अपरिहार्यपणें स्थित्यंतरें घडून आलीं असलीं पाहिजेत. वरुण, इंद्र, विष्णु या देवतांचा विकास असाच म्हणजे ' विकसनशील दैवतशास्त्रानुसार ' झाला असावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वैदिक देवांमध्यें विशिष्ट वैयक्तिक गुण थोडेफार असतात, पण हे फारच थोडे असून सर्व देवांना सामान्य असेच गुण त्यांत फार असतात.

ऋग्वेदमंत्ररचनाकाल जसा संपत आला तशी निसर्गघटनांवर मानवी गुणांचा अध्यारोप करण्याची वृत्ति वाढत गेली व ह्या वृत्तीच्या योगानें तत्कालीन बहुदेवतामतांतून एक प्रकारचें 'एकेश्वरवादी' मत व थोड्याबहुत प्रमाणांत 'सर्वत्र ईश्वरवादी' मत (एकं सद् विप्रा बहुधा वदन्ति ।) उदयाला येऊन ऋग्वेदाच्या शेवटच्या मंडलांत या मताचें प्रतिबिंब आहे. देवतांच्या उपासनेखेरीज पितरांची उपासना व थोडीफार अचेतन वस्तूंची उपासनाही ऋग्वेदांत आढळते.

ऋग्वेदांतील देवतांमध्यें श्रेष्ठ कनिष्ठ भाव नाहीं. मात्र देवतांचा वैयक्तिक दृष्ट्या विचार करतांना तीच देवता सर्वश्रेष्ठ असें मानण्याचा प्रघात असावा. निरुक्तकार यास्काच्या म्हणण्याप्रमाणें पृथिवीस्थानीय, अंतरिक्षस्थानीय किंवा मध्यमस्थानीय व द्युस्थानीय असे वैदिक देवतांचे तीन प्रकार आहेत : पृथ्वी, अग्नि, सोम, बृहस्पति, नद्या इ. पहिल्या प्रकारांत मोडतात; इंद्र, रुद्र, वायु, पर्जन्य, आप इ. दुसऱ्या प्रकारांत मोडतात; द्यौः, वरुण, मित्र, सूर्य, सवितृ, पूषन् इ. तिसऱ्या प्रकारांत मोडतात. या प्रत्येक देवतेची थोडीफार माहिती असणें आवश्यक आहे.

इन्द्र :

ऋग्वेदीय दैवतशास्त्र हें संपूर्णतया इंद्रप्रधान असें दैवत-शास्त्र आहे आणि म्हणून जवळजवळ ऋग्वेदांतील $\frac{1}{4}$ सूक्तें या देवतेच्या वर्णना-विषयींचीं आहेत. या देवतेची मूळ कल्पना आर्य उत्तर ध्रुवाजवळ होते तेव्हांच सुचली. पुढें आर्य हिंदुस्थानांत आल्यावर या देवतेला राष्ट्रदेवतेचें रूप आलें. याचें कारण आर्यांचीं अनार्यांशीं वारंवार होणारीं युद्धें. इंद्र हा द्यौचा पुत्र आहे अशी कल्पना ऋग्वेदांत आढळते. त्याला सोमपान अतिशय प्रिय आहे; त्यामुळें त्याच्या अंगांत वीरश्रीचा संचार होतो. सोम-पानासाठीं व युद्धांत साहाय्यासाठीं त्याला नेहमीं आवाहन केलें जातें. इराणी लोकांच्या अवेस्ता ग्रंथांत 'आंद्र' हा एक दुष्ट राक्षस म्हणून वर्णिला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. वृत्रहन् (वृत्राला ठार करणारा) हें इंद्राचें प्रमुख बिरुद आहे. आकाश व पृथ्वी यांच्यापासून इंद्राचा जन्म झाल्याबरोबर तो खूप सोम प्याल्याचें वर्णन ऋग्वेदांत आहे. तो प्राचीन, तरुण, सर्वशक्तिमान् ,चपळ, युद्धप्रिय, सर्वविजेता, विद्वान् व अप्रतिहतशक्ति असल्याचें वर्णिलें आहे. वज्र हें त्याचें आयुध. सोमाच्या उत्साहांत तो शत्रूंना ठार करतो. वृत्र, अहि, शुष्ण, नमुचि, शंबर इत्यादि त्याचे शत्रू आहेत. त्यानें असुरांच्या पुरांचा नाश केला म्हणून त्याला पुरंदर म्हणतात.

त्याचीं तीन प्रमुख वैशिष्ट्यें म्हणजे (१) तो भौतिक शक्तीची प्रतीक देवता आहे; (२) आक्रमक आर्यांचा तो राष्ट्रीय सेनानी आहे; (३) वृत्रांशीं त्याचें कायमचें वैर आहे. आकृतिदृष्ट्या व प्रकृतिदृष्ट्या इंद्राच्या व्यक्तिमत्त्वांत मानवी अंशच उत्कटपणें अस्तित्वांत असलेले आपणांस दिसतात. प्रथम इंद्र हा पराक्रमी मानवी वीर होता. तो आर्यांची राष्ट्रदेवता बनला. या राष्ट्रदेवतेला पर्जन्यदेवतेचे व इतर कांहीं गुण चिकटविण्यांत आले.

अग्नि :

इंद्राच्या खालोखाल ऋग्वेदांत अग्निदेवतेचें महत्त्व आहे. अग्नि हा शब्द युरोभारतीय ignis या लॅटिन शब्दापासून आलेला दिसतो. याचीं तीन रूपें ऋग्वेदांत वर्णिलीं आहेत—पृथ्वीवर अग्नि, वातावरणांत वीज व आकाशांत सूर्य. दोन लांकडी तुकड्यांपासून म्हणजे अरणीपासून त्याचा जन्म झाला असें म्हटलें आहे. तो अंधार नाहींसा करतो, राक्षसांना भिववितो व प्रकाशाला आवाहन करतो तो सदा तरुण व प्राचीन पुरोहित आहे. त्याच्या दाढा तेजस्वी आहेत. घृत व लांकूड हें त्याचें अन्न. तो गृहपति आहे व विश्पति आहे. तो अत्यंत विद्वान् (कवि) आहे. देव व मानव यांच्यांतील तो अमर दूत आहे. देवांना यज्ञाकडे आणण्याचें काम त्याच्याकडे असतें. तो दस्यूंना दूर हांकलतो. कौटुंबिक जीवनाचा अग्नि हा मोठा आधार असल्यामुळें मानवाच्या मनांत त्याच्यासंबंधीं जिव्हाळ्याचें नातें उत्पन्न झालेलें दिसतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरुण :

अधिकारक्षेत्राचा विचार केला तर ऋग्वेदांत वरुण देवतेला फार मोठा मान आहे. 'असुर (महासामर्थ्यशाली)' हें वरुणाचें विशेष विरुद आहे. वरुण हा 'ऋता'चें म्हणजे वैश्विक धर्मांचें रक्षण करणारा आहे. जग सुरळित चालावें म्हणून वरुणानें घालून दिलेले नियम (व्रत) अबाध्य आहेत. तो सर्व उदकसमूहांचा शास्ता आहे. वरुणाच्या अंगीं असणाऱ्या विशेष शक्तीला 'माया' असें म्हणतात. तो अखिल विश्वाचा 'सम्राट्' आहे. मानवाच्या किंवा सृष्टीच्या जीवनांतील अल्पही घटना त्याच्या दृष्टींतून सुटत नाहीं. या कामीं त्याला त्याच्या अगणित हेरांचें (स्पश) साहाय्य होतें. विश्वांतील गोंधळ नाहींसा करून त्यांत सुसूत्रता आणण्याचें कार्य वरुणाचें 'ऋत'च करतें. वरुणाचें 'पाश' हें एक अनन्यसाधारण वैशिष्ट्य आहे, 'वैश्विक व मानवी जीववांतील नीतीचा महान् नियन्ता' हें त्याचें प्रमुख वर्णन होय. वरुणाचा जलाशीं निकटचा संबंध आहे. त्याला सिंधु-पति असें म्हटलें आहे. या कल्पनांवरून पुढें त्याला जलदेवतेचें स्वरूप आलें. ही देवता पर्शु–भारतीय कालांतील असावी; कारण अवेस्तांतील अहुरमझ्द हा गुणांच्या दृष्टीनें वरुणाशीं एकरूप आहे.

अश्विनौ :

विवस्वत् व सरण्यू यांचे हे मुलगे. ते वैद्य म्हणून ऋग्वेदांत प्रसिद्ध आहेत. संकटकाळीं न चुकतां मदत करणारे म्हणून त्यांची ख्याति आहे. अशक्ताला सशक्त करणें, बुडालेल्याला वांचविणें, गुदमरलेल्याला वांचविणें, आंधळ्याला दृष्टि देणें, लोखंडी पाय जोडणें इत्यादि आश्चर्यकारक कथा या अश्विनौसंबंधीं आल्या आहेत. ग्रीक डायस्कूरी देवतांशीं त्यांचें साम्य कल्पिलें जातें. पुढील वाङ्मयांत सुस्वरूप धन्वंतरी एवढेंच त्यांचें स्वरूप शिल्लक राहिलें आहे.

सूर्यदेवता :

ऋग्वेदांत सूर्यदेवतेचीं पांच रूपें दिसतात : सवितृ, सूर्य, मित्र, पूषन् आणि विष्णु. **सविता** : हा जगाला प्रेरणा व चेतना देणारा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. तो सोनेरी वर्णाचा असून सर्व प्राणिमात्रांवर देखरेख ठेवतो. प्रख्यात गायत्री मंत्र याच देवतेच्या स्तुतिपर आहे. सूर्य : हा प्रत्यक्ष तेजोगोल आहे. तो द्यौ आणि अदिति यांचा मुलगा आहे. तो सर्व जगाचें रक्षण करतो. तो चराचर जगाचा आत्मा आहे व मानवांना चेतना देतो. तो मित्रावरुणौ यांचा डोळा आहे. मित्र : हा वरुणाचा संबंधी असून तो सूर्याच्या हितकारी तेजाचें प्रतीक आहे. तो मानवांना कार्यप्रवृत्त करतो. पूषन् : ही मेंढपाळांची किंवा पशुपालांची देवता आहे. त्याला सर्व मार्ग माहीत असून त्यांवरील संकटें तो नाहींशीं करतो. तो हरवलेले पशु सांपडवून देतो आणि त्यांचें रक्षण करतो. सूर्या ही त्याची प्रेयसी आहे. विष्णु : देवतेचें प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे तिन्ही लोक व्यापून टाकणारीं त्याचीं तीन पावलें. इंद्राला वृत्राशीं युद्ध करण्यांत हा साहाय्य करतो. 'विष्णूच्या उच्च स्थानीं मधुर अमृताचा झरा आहे' असें त्याचें वर्णन केलें जातें. विष्णु ही वेदपूर्वकालीन 'आदिवासी' भारतीयांची सर्व प्रमुख देवता असावी. आर्यांचा आणि आदिवासी भारतीयांचा संस्कृति-संगम झाला त्यावेळीं या देवतेचा आर्यांनीं आपल्या देवतामंडळांत स्वीकार केला असावा, किंवा मुळांत वैदिक आर्यांपैकींच एका फार मोठ्या जमातीची विष्णु ही सर्वश्रेष्ठ देवता असावी असें डॉ. रा. ना. दांडेकर याचें मत आहे.

उषस् : उषस् म्हणजे उषःकाल देवता. निसर्गाचें काव्यमय वर्णन या दृष्टीनें ऋग्वेदांतील उषासूक्तें हीं अत्यंत बहारीचीं आहेत; किंबहुना पृथ्वीवरील इतर कोणत्याही वाङ्मयामध्यें उषासूक्ताहून अधिक रमणीय धार्मिक वर्णनपर काव्य सांपडत नाहीं. ती आकाशाची मुलगी व रात्रीची बहीण असून सूर्य हा तिचा प्रियकर आहे. ही जगाची तेजस्वी सम्राज्ञी चकचकीत सोन्याच्या रथांतून येते व सर्व मानवांना जागृत करिते. उषा सर्व दुष्ट स्वप्नें नाहींशीं करते व भुताखेतांना पळवून लावते. संपत्ति, संतति व दीर्घायुष्य देण्याविषयीं उषेची प्रार्थना केलेली आहे.

या देवतांखेरीज मरुत्, वायु, पर्जन्य, ऋभु, सरस्वती नदी, अशा अनेक देवतांची स्तुति ऋग्वेदांत आहे. एकूण देवतांची संख्या ३३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्याचें परंपरा सांगते. यांशिवाय समूह देवता (आदित्य, रुद्र), कनिष्ठ देवता (ऋभु इ.) इष्ट देवता (वास्तोष्पति इ.), युग्म देवता (इंद्रावरुण, सोमापूषन् इ.), भावमूलक व क्रियामूलक देवता (धातृ, त्वष्टृ, विश्वकर्मन्, मन्यु, श्रद्धा इ.)

ऋग्वेदांतील भक्तिमार्ग :

ऋग्वेदसंहितेच्या काळांत गाई, घोडे, रथ दीर्घायुष्य व शूरवीर पुत्र इत्यादि गोष्टींनाच पुरुषार्थ मानलें जात होतें हें अनेक सूक्तांतील प्रार्थनांतून स्पष्ट दिसून येतें. आपल्या सभोंवतालच्या जगांत आपल्यावर सत्ता गाजविणाऱ्या दृष्ट व अदृष्ट अशा अनेक सामर्थ्यवान् देवता आहेत व त्यांची योग्य मार्गानें आराधना केली असतां त्या आपणांस प्रसन्न होऊन इष्ट फलें देतात व अनिष्ट गोष्टींचें निवारण करतात अशी सर्वसाधारण समजूत वैदिक आर्यांच्या प्रार्थनांवरून स्पष्ट दिसतें. यज्ञयाग करून देवतांना हविर्भाग अर्पण करणें व स्तोत्रें गाणें, उत्तमांत उत्तम सोमरस अर्पण करणें व सुंदरांत सुंदर स्तोत्रें देवतेला अर्पण करणें—थोडक्यांत म्हणजे यज्ञादि मार्गांनीं देवतांचें आराधन व स्तोत्रांनीं आवाहन करणें हाच ऋग्वेदांतील आर्यांचा भक्तिमार्ग होता. प्रा. वेलणकर म्हणतात कीं, ही भक्ति भोगी अथवा प्रवृत्तिमार्गी आहे आणि 'ददात मे अमृतस्य प्रजायै' किंवा 'तत्र माममृतं कृधि' अशी अमृतत्व प्राप्त करून घेण्याबद्दल प्रार्थना क्वचित् आढळते.

समारोप :

ईश्वरभक्ति, न्याय, दया, पावित्र्य इत्यादि शारीरिक वर्तनक्रम व मानसिक वृत्ति यांचा अंतर्भाव ऋग्वेदांतील आर्यांच्या ऋत-कल्पनेंत होत होता. त्यांच्या भक्तीचा जिव्हाळा, अंतःकरणाची तळमळ व तल्लीनता या गोष्टी त्यांच्या सूक्तांतून दिसतात. अधार्मिक व दुष्ट यांचा नाश व्हावा व भक्त पापनिर्मुक्त व्हावा अशीं प्रार्थना ते वारंवार करीत. ईश्वरभक्ति, न्यायानुवर्तित्व, पराक्रम, मानसिक पावित्र्य, सत्पात्रीं दान हें ऋग्वेदांतील आर्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्माचें स्वरूप आहे. त्यांचे अध्यात्मपर विचार औपनिषद तत्त्वज्ञानाचीं बीजें आहेत.

ऋग्वेद सूक्तांत दिसून येणारें आर्यसंस्कृतीचें स्वरूप पाहतां त्यांत भारतीय आर्य लोक चपल, आनंदी व स्वाभिमानी होते. यांची राहणी साधी पण आजच्या मानानें कांहींशीं रानटी होती. त्यांच्या तत्त्वज्ञानांत निराशावादाला कोठेंही स्थान नाहीं. जीवनाविषयीं व कर्माविषयीं तिरस्कार व्यक्त केलेला नाहीं. एकंदरींत जीवन सुंदर व रमणीय असून तें जगण्या-साठीं दीर्घायुष्य मिळावें अशीच प्रत्येकानें इच्छा व्यक्त केली आहे. पुढील वैदिक वाङ्मयांत वारंवार आढळून येणारा भारतीय लोकांचा दुबळा, निर्जीव निवृत्तिपर स्वभाव ऋग्वेदीय आर्यांना मुळींच आवडत नाहीं.

तथापि हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, ऋग्वेदीय आर्यांची संस्कृति अत्युच्च होती किंवा अतिशय साधी व निर्व्याज होती हीं दोन्हीही मतें अतिशयोक्तीचीं आहेत. कारण, ऋग्वेदसूक्तांत फसवेगिरी, चोरी, दरोडे, अगम्यगमन, व्यभिचार इत्यादि गोष्टींचाही उल्लेख आढळतो. परंतु ' ऋग्वेदकाळ अत्यंत जुना होय ' या गोष्टीला विरुद्ध जाणारा हा पुरावा नव्हे हें लक्षांत ठेवलें पाहिजे. समाजशास्त्र हें मानवी प्राणी दुष्ट राक्षस होते असे मानीत नाहीं किंवा सर्वांशीं निर्दोष व धुतल्या तांदुळासारखे होते असेंही मानीत नाहीं. समाजशास्त्र एवढेंच जाणते कीं, सांस्कृतिक स्थितीच्या निरनिराळ्या पायऱ्या पायऱ्यांनीं मनुष्यप्राणी रानटी स्थितींतून अर्धवट सुधारलेल्या व तेथून पूर्ण सुधारलेल्या स्थितींत जातो. तेव्हां ऋग्वेदकाळांतले आर्य साधेभोळे गोपाल होते असें मानण्याचें किंवा ते अतिशय रानटी अथवा अतिशय सुधारलेले होते असेंही मानण्याचें कारण नाहीं.

ऋग्वेदाचा काल :

ऋग्वेदाच्या काल–निर्णयाच्या बाबतींत विद्वान् संशोधकांच्या मतांत शेंकडयाचाच नव्हे तर सहस्रांचासुद्धां फरक पडलेला आढळतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्री. अविनाशचंद्र दास यांच्या मतें ऋग्वेदरचनेचा काळ खि. पू. २५००० वर्षें तर मॅक्समुल्लरसारखे विद्वान् तो खि. पू. १२०० इतका अलीकडे आणतात. हीं दोन्ही मतें आतां अतिशयोक्तिपूर्ण म्हणून त्याज्य ठरविलीं गेलीं आहेत. इ. स १८९३ सालीं याकोबी यानें बॉन (जर्मनी) येथें व कै. बाळ गंगाधर टिळक यांनीं हिंदुस्थानांत (पुणें येथें) ज्योतिर्विषयक माहितीच्या आधारें हा काळ ठरविण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. कार्तिक महिन्यांत वसंतारंभ येणें ही परिस्थिति खि. पू. २५०० च्या सुमारास येते. हा काल म्हणजे ब्राह्मण ग्रंथांचा आरंभकाल. मार्गशीर्ष महिन्यांत वसंतारंभ येणें ही परिस्थिति वेदग्रंथांत दिसते. हा काल खि. पू. ४५०० चे सुमारात येतो. कै. लोकमान्य टिळक या आधारावर वेदग्रंथांतील कांहीं सूक्तांचा काल खि. पू. ६००० वर्षें मागें नेतात, तर तिकडे याकोबी ऋग्वेदऋचांचा आरंभ खि. पू. ४५००मानतो. भारतीय युद्धाचा काळ खि. पू ३१०१ (चिं. वि. वैद्य) म नला व अत्रि ऋषींना दिसलेलें सूर्यग्रहण खि. पू ३९२८ सालीं झालें हें खरें धरलें, तर ऋग्वेदाचा काल खि. पू. ४५०० ते २५०० इतका ठरतो आणि आपणांस उपलब्ध झालेल्या ऋग्वेदाचें संकलन या कालाच्या उत्तरार्धांत झालें असें म्हणतां येईल. हिंदुस्थानच्या इतिहासाच्या दृष्टीनें पाहतां वैदिक वाङ्मय खिस्तपूर्व तिसऱ्या सहस्रकांतलें आहे, आणि ऋग्वेदांतील आर्यांची संस्कृति खि. पू. चौथ्या सहस्रकांतील आहे हें मत आतां बुल्हर व इतर पंडितांनीं बऱ्याच खात्रीलायकपणें सिद्ध केलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण सहावें

वैदिक वाङ्मय

आम्हां भारतीयांच्या व त्याचप्रमाणें बऱ्याच युरोपियनांच्या सामान्य पूर्वजांची माहिती देणारे प्राचीनतम अवशेष या नात्यानें वैदिक वाङ्मयाला जगाच्या वाङ्मयांत अग्रस्थान द्यावें लागेल; आणि ही गोष्ट यूरोपीय पंडितांनींही मान्य केली आहे. हिंदूंचें ज्ञान, विचार व भावना यांना वेदांमुळेंच निश्चित स्वरूप राहिलें आहे. भारतीय वाङ्मयांत वेद हे प्राचीनतम असल्याकारणानें भारतीयांचा आध्यात्मिक जीवनक्रम व संस्कृति यासंबंधींचें यथार्थ ज्ञान वैदिक वाङ्मयाच्याच अभ्यासानें मिळेल. 'वेद' या शब्दाचा अर्थ 'ज्ञान' असा आहे. वेद म्हणजे कांहीं विशिष्ट कालांत रचलेला ग्रंथ-समूह नव्हे, तर तें एक असें ग्रंथभांडारच आहे कीं, ज्याची वाढ होण्यास कित्येक शतकें लागलीं. अनेक शतकेंपर्यंत पिढ्यानुपिढ्या मौखिक परंपरेनें तें चालत आलें आणि त्यामुळें आज अनेक सहस्र वर्षांनंतरही तें जसेंच्या तसें कानामात्रेचाही फरक न पडतां राहिलें आहे. मात्र वेदांच्या उत्पत्तीची आठवण बुजल्यामुळें आपल्या प्राचीन पूर्वजांनीं वेद हे अपौरुषेय म्हणजे मनुष्यनिर्मित नसून परमेश्वरनिर्मित आहेत असें मानलें. वेद हे अत्यंत प्राचीन धर्माचे निदर्शक ग्रंथ होत ही जशी लौकिक भावना तसेंच तें ऐतिहासिक सत्यही आहे. भारतीय संस्कृतिरूप हिऱ्याचे अनेक पैलू आपणांला वेदवाङ्मयांत आढळतात. ज्याला आपण 'विशाल हिंदुधर्म' म्हणून सध्यां म्हणतों, त्यांतील समाजव्यवस्थेचे व आचारव्यवस्थेचे इ. कांहीं नियम जरी आज परिवर्तित झालेले असले, तरी त्या धर्माचीं बीजें आपल्याला वेदवाङ्मयांतच सांपडतात.

वैदिक संस्कृत भाषा ही जोमदार व विकास पावलेली भाषा आहे; इतकेंच काय, पण आजच्या संस्कृत भाषेंत न आढळणारे असे प्रयोग व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धातूंचीं रूपें वैदिक संस्कृतांत आढळतात. महाभारतकालीं देखील वैदिक वाङ्मय हें अतिशय प्राचीन समजलें जात असे. तेव्हां केवळ प्राचीनत्वामुळें देखील वेदाला पूज्यत्व येणें अगदीं अपरिहार्य आहे. वेदांचा केवळ तत्त्वज्ञान विषयक भाग, ज्याला उपनिषदें असें म्हणतात, त्यांचें वैदिक वाङ्मयांतील स्थान अगदीं स्वतंत्र महत्त्वाचें आहे.

आजच्या भारतीय समाजांस वेदवाङ्मय हा एक ' बहुमोल पैतृक वारसा ' प्राप्त झाला आहे. त्यामुळें भारताला व सर्व जगाला अत्यंत प्राचीन भाषेचें, प्राचीन धर्माचें आणि प्राचीन सामाजिक स्थितीचें द्योतक म्हणून वेदांचें महत्त्व आहे. वेदांचें हें ऐतिहासिक व समाजशास्त्रीय महत्त्व जगास पटलेलें असल्यामुळें इत:पर याच दृष्टीनें त्याचा अभ्यास होईल.

वेदवाङ्मयाचे तीन वर्ग :

आज ज्याला आपण वेद किंवा वैदिक वाङ्मय म्हणतों त्यांत तीन प्रकारच्या ग्रंथांचा अंतर्भाव होतो. प्रत्येक वर्ग कांहीं स्वतंत्र ग्रंथांचा झालेला आहे. यांपैकीं कांहीं आज उपलब्ध आहेत व कांहीं कालाच्या उदरांत नाहींसे झाले आहेत. हे तीन वर्ग याप्रमाणें आहेत :—

(१) संहिता—या शब्दाचा अर्थ संग्रह. यांत स्तोत्रें, प्रार्थना, मंत्रप्रयोग, आशीर्वादात्मक सूक्तें, यज्ञविधीसंबंधींचें मंत्र यांचा अंतर्भाव आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद या त्या चार संहिता आहेत.

(२) ब्राह्मणें—हीं ब्राह्मणें म्हणजे मोठेमाठाले गद्य ग्रंथ आहेत. यांजमध्यें देवादिकांच्या कथा, यज्ञासंबंधीं विचार व यज्ञीय विधींचें व्यावहारिक व आध्यात्मिक महत्त्व हा भाग येतो.

(३) आरण्यकें व उपनिषदें—अरण्यांत राहणाऱ्या यति, संन्यासी इत्यादि लोकांचे परमेश्वर, जगत् व मनुष्य या त्रयीसंबंधाचे विचार यांत आहेत. भारतीयांचें प्राचीनतम तत्त्वज्ञान यांत सांपडतें. वेदांचा शेवटचा भाग म्हणून व वैदिक कर्मांपासून होणाऱ्या श्रेष्ठ ज्ञानाचा संग्रह म्हणून यांना ' वेदान्त ' असें सार्थ नांव मिळालें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर सांगितल्यापैकीं कोणत्या तरी वर्गांत मोडणारा व त्यामुळें कोणत्या तरी वेदांत अंतर्भूत होणारा प्रत्येक ग्रंथ 'वैदिक' समजला जातो. हे ग्रंथ जरी निरनिराळ्या काळांत झाले असले, तरी या सर्वांना एकरूपता आणणारी गोष्ट म्हणजे श्रौतस्मार्त हिंदुधर्माचा पाया या सर्व ग्रंथांवर मिळून रचलेला आहे.

(१) संहिता

ऋग्वेद :

ऋग्वेदसंहिता किंवा ज्याला सामान्यतः ऋग्वेद (अनेक ऋचांचा वेद) असें म्हणण्यांत येतें तो ग्रंथ, किंवा त्या ग्रंथांतील बराच भाग वैदिक वाङ्मयांतील प्राचीनतम व अत्यंत महत्त्वाचा होय ही गोष्ट निर्विवाद होय. पतंजलीच्या काळीं ऋग्वेदाच्या एकंदर एकवीस शाखा झाल्या होत्या. या एकवीस पोटशाखांचे मिळून मुख्य पांच गट झाले असून शाकल, बाष्कल, आश्वलायन, शांख्यायन व मांडूकेय अशीं त्यांचीं नांवें आहेत. प्रस्तुतचा आपला ऋग्वेद हा शाकल्य पाठाचा असून त्यावरच सायणाचार्यांचें 'वेदार्थ-प्रकाश' नांवाचें सुप्रसिद्ध भाष्य आहे.

ऋग्वेद हा समग्र ग्रंथ सूक्तबद्ध व छंदोबद्ध म्हणजे पद्यमय आहे. या ग्रंथांत १० मंडलें आहेत. अत्यंत व्यवस्थित रीतीनें शब्द नि शब्द व अक्षर नि अक्षर अचूक मोजदाद करून आजपर्यंत सुरक्षित जतन करून ठेवलेला हा ग्रंथ जगांतील वाङ्मय-इतिहासांत अपूर्व आहे. या ग्रंथांत अनेक ऋषींचीं सूक्तें असून तीं एकमेकांपासून फार दूर अशा निरनिराळ्या काळांत रचलीं गेलीं. यांपैकीं प्राचीनतम सूक्तें मंडलें २ ते ७ या भागांत आहेत. या मंडलांना एकेका ऋषीच्या नांवाखालीं मोडणारीं गोत्रमंडलें म्हणतात. गृत्समद, विश्वामित्र, वामदेव, अत्रि, भरद्वाज आणि वसिष्ठ हे ऋषि आणि त्यांच्या परंपरेंतील लोक हे मंडलें २–७ यांचे अनुक्रमें मंत्रद्रष्टे होत. आठव्या मंडलांत कण्व व अंगिरस् यांच्या शाखांचीं सूक्तें आहेत. मंडलें १, ९, १० यांत प्रत्येक सूक्त वेगवेगळ्या कुळांतील ऋषींचें आहे व यांत कांहीं स्त्रियांचींही सूक्तें आहेत. नवव्या मंडलांतील सर्व सूक्तें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'सोम' देवतेला उद्देशून आहेत. त्यामुळें त्यांचा सोमयज्ञाशीं निकटचा संबंध येतो. संहितेंत सर्वांत अर्वाचीन सूक्तें पहिल्या व दहाव्या मंडलांत आढळतात. इंद्र, अग्नि, वरुण, उषस्, मरुत्, वायु, अश्विनौ इत्यादि आराध्य देवतांशीं ऋग्वेदांतील ऋषि फार आपुलकीनें वागतात. सर्व-सामान्यपणें भौतिक सुखासाठीं व सुखी दीर्घायुष्यासाठीं व कधीं कधीं अमृतत्वासाठीं ते देवांना आळवीत असत. कांहीं सूक्तें यज्ञविषयक आहेत; कांहीं संस्कारविषयक आहेत; कांहीं अध्यात्मविषयक सूक्तें विश्व व विश्वोत्पत्ति-विषयक आहेत. कांहीं आख्यान सूक्तें (उदा. पुरूरवस्, उर्वशी) आहेत तर कांहीं मांत्रिकी सूक्तें (मंडूकसूक्त) आहेत. यांशिवाय कांहीं लौकिक सूक्तें आहेत (उदा. पश्चात्तप्त द्यूतकार) व कांहीं दानस्तुति-सूक्तें म्हणजे यज्ञ करविणाऱ्या राजांच्या उदारतेची स्तुति करणारीं आहेत. ऋग्वेदांतील कांहीं सूक्तांची रचना कृत्रिम आहे यांत शंका नाहीं. पण अनेक सूक्तें उत्कृष्ट काव्यांत मोडूं शकतात हेंही विसरून चालणार नाहीं. कांहीं उत्कृष्ट सुभाषितेंही ऋग्वेदांत आढळतात. उदा. (१) जो केवळ अप्पलपोटेपणानें खातो तो केवळ पापरूप होय; (२) उद्योगी मनुष्यच यशस्वी होतो; देव आळशाशीं मैत्री करीत नाहींत; (३) मूळ तत्त्व एकच असून ज्ञाते लोक त्याला निरनिराळ्या स्वरूपांत पाहातात; (४) ऋग्वेदांतील शेवटचें सूक्त— "आपणां सर्वांचा विचार आणि योजना एकच असूं द्या; अंतःकरणें एकसारखीं—एकाच भावनेनें—परिपूर्ण असूं द्या. तसेंच तुमचें मनही सारखें एकाच ध्येयाकडे लागलेलें असूं द्या, म्हणजे तुम्हांला पाहिजे असेल ती गोष्ट सहजसाध्य होईल."

यजुर्वेद :

या संहितांतील मंत्र (यजुस्) हे व्यावहारिक उपयोगाच्या दृष्टीनें म्हणजे यज्ञकर्मामध्यें उपयोगी पडतील अशा प्रकारें एकत्र केले आहेत. यज्ञामध्यें 'अध्वर्यु' नांवाच्या पुरोहिताला यज्ञीय विधि करीत असतांना तोंडानें लहान लहान गद्यमय व कांहीं मोठालीं गद्यपद्यमय स्तोत्रें म्हणावीं लागतात. त्यांनाच 'यजुस्' म्हणतात. यजुर्वेदांत हे सगळे मंत्र, यज्ञीय कर्में, त्यांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नियम व विवेचन यांचा समावेश आहे. व्याकरणकार पतंजलि म्हणतो कीं, यजुर्वेदाच्या एकशें-एक शाखा आहेत. शुक्ल व कृष्ण हे यजुर्वेदाचे दोन भेद आहेत. आतांपर्यंत यजुर्वेदाच्या सहा संहिता उपलब्ध झाल्या आहेत : काठक, कपिष्ठलकठ, मैत्रायणी, तैत्तिरीय, (कृष्ण) कण्व, वाजसनेयि (शुक्ल).

कृष्णयजुर्वेदांत यज्ञांचें वर्णन जितकें पूर्ण आहे तितकें इतर संहितांत नाहीं. वाजसनेयि संहितेंत चाळीस अध्याय असून त्यांत दर्शपूर्णमास, पिण्ड-पितृयज्ञ, अग्निकर्म, चातुर्मास्य यज्ञ, सोमयज्ञ, अग्निचयनविधि, सौत्रामणि-याग, अश्वमेधयाग, पुरुषमेधयज्ञ, अत्यंत महत्त्वाचें असें ईशोपनिषद् इतक्या गोष्टी आहेत. सूत्ररूप प्रार्थना, गद्यमय अभिचार मंत्र, ब्रह्मोद्यें (धार्मिक कोडीं), रुद्रोपासना, अक्षरोपासना हींही ठिकठिकाणीं आढळतात.

केवळ साहित्यग्रंथ या दृष्टीनें यजुर्वेदसंहिता नीरस आणि कंटाळवाण्या वाटल्या तरी, वैदिकधर्माबद्दलच नव्हे तर धर्म या विषयाच्या सामान्य शास्त्रावरील आधारग्रंथ म्हणून यजुर्वेदाचा उपयोग होईल. प्रार्थनापद्धतीचा आरंभ व वाढ यासंबंधीं माहिती यजुर्वेदांतच सांपडेल. भारतीय लोकांत जे नंतरचे उपासनापंथ व तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ निर्माण झाले त्यांचें ज्ञान होण्यास या संहितांचें ज्ञान आवश्यक आहे; कारण, यजुर्वेद समजल्याशिवाय ब्राह्मण-ग्रंथ समजणें अशक्य, आणि तें समजल्याशिवाय आरण्यकें व उपनिषदें समजणें अशक्य आहे.

सारांश, यजुर्वेदांत यज्ञसंस्था परिसीमेला पोहोंचली होती व यज्ञाचें बारीकसारीक विधि यांना फार महत्त्व आलें होतें. अश्वमेध किंवा पुरुष-मेध यांत आलेलीं नांवें जातिनिदर्शक नसून व्यवसायनिदर्शक आहेत. समाजशास्त्राच्या अभ्यासकाला उपयुक्त असा समाजाचा चित्रपटच या वर्णनांत मिळतो. यजुर्वेद हा यज्ञकर्मवेद आहे. वाजसनेयि संहितेंत अश्वमेधयज्ञाचें कारण सांगितलें आहे:—

" हे ब्रह्मन्, ब्रह्मतेजानें युक्त असे ब्राह्मण या राष्ट्रांत निर्माण होवोत. या राष्ट्रांत शूर, तिरंदाजींत प्रवीण, मृगयेंत निपुण व महारथी असा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षत्रिय निर्माण होवो. येथें भरपूर दूध देणारी गाय, गाडी चांगली ओढणारा बैल, वेगवान् घोडा व दक्ष गृहिणी निर्माण होवो. ''

सामवेद :

सामवेदाच्या एके काळीं अनेक संहिता होत्या, पण त्यांपैकीं फक्त एकच आज आपणांस उपलब्ध आहे. या संहितेंत दोन भाग आहेत : एक 'आर्चिक' म्हणजे ऋचांचा किंवा सामांचा संग्रह, आणि दुसरा 'उत्तरार्चिक' म्हणजे 'दुसरा ऋचासंग्रह'. या दोन्ही भागांत ज्या ऋचा आहेत त्या बहुतेक सर्व ऋग्वेदांत आलेल्याच आहेत. या ऋचांपैकीं बहुतेक 'गायत्री' किंवा 'प्रगाथ' छंदांत आहेत. या छंदांमध्यें केलेल्या ऋचा गाण्याच्या सुरावर म्हणण्याचा प्रथमपासूनच हेतु असावा.

सामवेदांतील आर्चिक व उत्तरार्चिक यांमधील शब्द हे केवळ साधन-भूत आहेत. मूळ साध्य म्हणजे गाण्याचे राग. हे राग शिकविणें हाच दोन्ही भागांचा हेतु आहे. यांचें शिक्षण घेतलेल्या पुरोहितास 'उद्गाता' म्हणत. 'साम' याचा मूळ अर्थ 'स्वर' किंवा 'छंद' असा आहे. ऋचेवरून राग उत्पन्न होतो म्हणून ऋचेला 'सामयोनि' म्हणतात. आर्चिक म्हणजे ५८५ रागांचें एक गाण्याचें पुस्तकच होय. उत्तरार्चिकांत एकंदर ४०० गानें आहेत. पुस्तकांत सप्त स्वरांकरितां एक ते सात आंकडे वापरले आहेत. सामवेद गातांना हातांच्या व बोटांच्या चलनानें निरनिराळ्या स्वरावर जोर देतात. सामवेदांतील रागांमध्यें कांहीं अद्भुत जादूची शक्ति होती असें मानीत. अभिचारकर्मांत निरनिराळ्या सामांचा उपयोग करीत असावेत. त्यामुळें सामघोषाला कांहीं वैदिक ग्रंथांत हीन लेखलें आहे. 'ओंकार' उपासनेला सामवेदांत महत्त्व आलेलें दिसतें.

सारांश, यज्ञकर्म व अभिचार यांचा इतिहास समजण्यास सामवेदाचा उपयोग आहे. भारतीय संगीतशास्त्राचा इतिहास जाणण्यास सामगानें फारच महत्त्वाचीं आहेत. वाङ्मयाच्या दृष्टीनें मात्र आपणांस या संहितेचा कांहीं उपयोग नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अथर्ववेद :

अथर्ववेदांत अभिचारमंत्र आहेत. हा अथर्वन् लोकांचा वेद आहे. प्राचीन कालीं अग्निउपासक पुरोहितास अथर्वन् असें म्हणत. भारतीय वाङ्मयांत या वेदाचें अतिशय जुनें असें नांव म्हणजे ' अथर्वांगिरस ' (अथर्व्यांचा व आंगिरसांचा वेद). अथर्वन् मंत्र सुखकारक व पवित्र आहेत, तर त्याच्या उलट आंगिरस हे मंत्र पीडाकर आहेत.

या वेदाचीं वीस कांडें आहेत व ह्यांपैकीं १९ वें व २० वें हीं कांडें अलीकडे जोडलेलीं असावींत. २० व्या कांडांतील बहुतेक सर्व सूक्तें ऋग्वेदसंहितेंतूनच घेतलीं आहेत. शिवाय अथर्ववेदाचा जवळजवळ $\frac{1}{3}$ भाग ऋग्वेदावरूनच घेतला आहे.

अथर्ववेदांतील देवता या निव्वळ ' राक्षससंहारक ' बनल्या आहेत. अनिष्टशांति, इष्टपूर्ति व शत्रुपीडा हा अथर्ववेदाचा हेतु आहे. जादूटोण्याविषयीं त्रैविद्य पुरोहितांच्या मनांत एक प्रकारचा तिटकारा उत्पन्न झाल्यामुळें पवित्र धर्मग्रंथांत त्याचा समावेश करण्याचें पुष्कळदां टाळलेलें आढळतें. असें जरी असलें, तरी सांस्कृतिक दृष्ट्या अथर्ववेदाला फार मोठें महत्त्व आहे. अथर्ववेदांतील रोग बरे करण्याचीं सूक्तें (भैषज्य सूक्तें) म्हणजे आयुर्वेदाचा मूळ आरंभ होय. आयुर्वेद हा अथर्ववेदाचाच एक भाग आहे असें सुश्रुत म्हणतो. वनस्पति, कृमिनाश इत्यादि गोष्टींचें मनोरंजक वर्णन या वेदांत आढळतें. काम, स्मर इत्यादि देवतांविषयींचे मंत्र हें कामशास्त्राचें मूळ होय. राजाच्या निवडीच्या वेळचे विधि, राज्याभिषेकाचे विधि, युद्धांत जय मिळविण्याचे विधि यांत असल्यामुळें अर्थशास्त्राचा उगमही येथेंच दिसतो. गृह्यसूत्रांत वर्णिलेल्या संस्कारांचें बीज यांतच सांपडतें.

अथर्ववेदांतील तत्त्वज्ञान, ब्रह्मविषयक कल्पना या ऋग्वेद व उपनिषदें यांतील कल्पनांच्या मधील दुव्यासारख्या वाटतात. समाजांतील उपेक्षित भाग सामावून घेण्याची वृत्ति यांत आहे. (उदा. व्रात्यस्तोम).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुख, शांति व संकटनिवारण या मंत्रांमुळें अथर्ववेदाचा धर्म हा जीवन सुखी करणारा धर्म आहे. गोपूजनाला अथर्ववेदांत बरेंच महत्त्व आलें आहे. अथर्ववेदसंहितेला जें विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे तें खालील गोष्टींमुळें होय. भूतपिशाच्चें, राक्षस यांसबंधीं सर्वसामान्य समाजाच्या काय समजुती होत्या याबद्दलचें यथार्थ ज्ञान मिळविण्यास हें अमूल्य साधन आहे. हें ज्ञान मानववंशशास्त्र व देवाविषयक कल्पनांचा इतिहास यांच्या अभ्यासकास महत्त्वाचें आहे. मनुष्यजातीचा बौद्धिक इतिहास जाणूं इच्छिणाऱ्या शास्त्रज्ञाला अथर्ववेदाचें ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. ब्रह्मवेद, क्षत्रवेद, भैषज्यवेद हीं अथर्ववेदाचीं आणखी कांहीं नांवें आहेत.

ब्राह्मणें :

वेदग्रंथांनंतर वैदिक वाङ्मयाचा दुसरा मोठा संग्रह म्हणजे ब्राह्मण-ग्रंथांचा. भारतीय बौद्धिक संस्कृतीच्या इतिहासांत या ग्रंथांची थोरवी फार मोठी आहे. त्यामुळें संशोधकाना हे ग्रंथ हृदयंगम वाटले तरी सामान्य सुशिक्षिताला ते रुक्षच वाटतात. भारतीय लोकांचें अलीकडच्या काळांतील धार्मिक व तात्त्विक वाङ्मय आकलन करण्याच्या कामीं या ग्रंथांचीच कांस धरणें जरूर पडतें. शिवाय, सामान्य धर्मशास्त्राच्या दृष्टीनेंही यांचें फार महत्त्व आहे. यज्ञयाग व पौरोहित्य यांच्या इतिहासाचें ज्ञान करून घेण्यास ब्राह्मणग्रंथ प्रमाणभूत आहेत.

‘ ब्रह्म ’ याचा अर्थ यज्ञकर्मामधील एखाद्या मुद्यावर एखाद्या विद्वान् याज्ञिकानें केलेलें विवेचन. या विवेचनांचा संग्रह म्हणजे ‘ ब्राह्मण ’. जग-दुत्पत्तिविषयक गोष्टी व जुनीं कथाख्यानें या ग्रंथांत असलीं तरी यज्ञयागा-शिवाय चर्चेचा दुसरा विषय नाहीं. थोडक्यांत म्हणजे ब्राह्मणें याचा अर्थ ‘ यज्ञशास्त्रग्रंथ ’ असा होतो.

प्रत्येक वेदापासून व त्याच्या शाखांपासून पुष्कळ ब्राह्मणग्रंथ तयार झाले. उदा. ऋग्वेदाचीं ऐतरेय व कौषीतकी (शांखायन), सामवेदाचीं पंचविंश (ताण्ड्य), षड्विंश व जैमिनीय, कृष्णयजुर्वेदाचें तैत्तिरीय व शुक्ल यजुर्वेदाचें शतपथब्राह्मण व अथर्ववेदाचें गोभिल ब्राह्मण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या ग्रंथांत यज्ञ हा इष्टसिद्धीचें साधन नसून तो स्वतःच एक उच्चतम जीवितसाध्य बनला आहे. 'प्रजापति हा यज्ञ आहे' हें वाक्य ब्राह्मण-ग्रंथांत पुष्कळ ठिकाणीं येतें. प्रत्येक यज्ञकर्म येथें फार विस्तारानें सांगितलें आहे. एखादें कर्म उजव्या अंगाला करावें कीं डाव्या, दर्भाचें टोंक उत्तरेला धरावें कीं ईशान्येला, इत्यादि गोष्टींचा येथें विस्तृतपणें विचार केला आहे. ज्या कल्पनांचा आरण्यकें व उपनिषदें यांत विकास झालेला आहे अशा कल्पनांची ब्राह्मणग्रंथांतून अगोदरच सिद्धता होती. अथर्ववेद, यजुर्वेद व सामवेद यांचा शेवटचा संग्रह व ब्राह्मणवाङ्मयाचा प्रारंभींचा संग्रह समकालीन असावेत. या ग्रंथांतून मुख्यतः कुरूंचा व पांचालांचा प्रदेश उल्लेखिला जातो. हा प्रदेश 'ब्राह्मवर्त' म्हणून प्रसिद्ध आहे. ब्राह्मणांतील कथा या उपलब्ध असलेल्या भारतीय गद्य इतिहासाचीं फार जुनीं उदाहरणें होत. ब्राह्मणांतील तर्कवितर्कांच्या रुक्ष वाळवंटांत या कथा म्हणजे पुष्करिणीसारख्या वाटतात. ब्राह्मण वाङ्मय निर्माण व्हावयास १००० वर्षांचा अवधि लागला असावा.

आरण्यकें :

ब्राह्मणग्रंथांच्या शेवटच्या भागास 'आरण्यकें' असें म्हणतात. कारण, या आरण्यकांतील मंत्र फक्त अरण्यांतच शिकवावयाचे असतात. वानप्रस्था-श्रमांत अरण्यवासी असतांना अध्ययन करण्याचे ग्रंथ म्हणजे आरण्यकें. या आरण्यकांमधील मुख्य विषय म्हणजे यज्ञयाग व त्याचें विधिवत् आचरण यांचे नियम इत्यादि नसून यज्ञाचीं मूलतत्त्वें, त्यांतील गूढार्थ व तत्त्वज्ञान हे होत. ब्राह्मणग्रंथाच्या जितक्या शाखा तितक्याच आरण्यकांच्याही आहेत.

उपनिषदें :

उपनिषद् हा शब्द उप + नि + सद् म्हणजे जवळ बसणें या धातूपासून निघाला आहे. याचा मूळ अर्थ गूढज्ञानाची शिक्षा घेण्यासाठीं छात्रानें अध्यापकाच्या अगदीं निकट बसणें हा होय. म्हणून 'एकांत बैठक' असा अर्थ झाला. उपनिषदांतील तत्त्वज्ञानाचा एक विशिष्ट संप्रदाय आहे असें म्हणतां येणार नाहीं. उपनिषदें हीं वास्तविक ब्राह्मणग्रंथांची अंशभूत अंगेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होत. आरण्यकें व उपनिषदें यांना ' वेदान्त ' असें म्हणतात; कारण, एक तर ते श्रुतीचा किंवा वेदांचा ' शेवटचा भाग ' आहेत आणि वेदांचें ' अंतिम ध्येय ' त्यांत सांगितलें आहे. वेबरच्या मतें एकूण २३५ उपनिषदें असावींत; पण मुक्तिकोपनिषदांत एकूण १०८ उपनिषदें असल्याचा उल्लेख आहे. यांत ईश, केन, कठ, प्रश्न, मुण्ड, माण्डूक्य, तित्तिरि, ऐतरेय, छांदोग्य, बृहदारण्यक, कौषीतकी आणि श्वेताश्वतर हीं बारा उपनिषदें जुनीं समजलीं जातात.

ईश्वरविषयक व तत्त्वज्ञानविषयक असे उपनिषदांतील मजकुराचे दोन मुख्य भाग पडतात. ब्रह्म आणि आत्मा यांच्या स्वरूपाचें विवरण हें उपनिषदाचें प्रमुख प्रतिपाद्य आहे. त्यांत अनेक आख्यायिका व संवाद आहेत. सृष्टीच्या उत्पत्तीविषयींचे निरनिराळे विचार उपनिषदांत आढळतात. ' तत् त्वं असि ' हा उपनिषदांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. विश्वांतील आत्मा, जगदुत्पत्ति, पुनर्जन्म व मोक्ष हे उपनिषदांतील चर्चेचे मुख्य विषय होत. पुढें पुढें तर अल्ला व खंडोबा यांवर उपनिषदें लिहिलीं आहेत.

उपनिषदांतील विचार अतिमानव नसून संपूर्णपणें मानवी आहेत. उपनिषदांनींच पुढें आपल्या तत्त्वज्ञानात्मक पंथांना व आचारांना आधार दिला. प्रख्यात पाश्चात्य तत्त्वज्ञ शॉपेनहॉएर म्हणत असे कीं, " प्लेटो, कान्ट व उपनिषदें हे माझे मार्गदर्शक होत.... जिवंतपणीं व मृत्यूनंतर उपनिषदांनींच माझ्या जीवाची तळमळ नाहींशी केली. "

भारतीयांच्या विचारांवर उपनिषदांइतकी छाप कशाचीच पडली नाहीं. भगवद्गीता ही तर उपनिषदांचें सार आहे असें म्हटलें जातें. शंकर, रामानुजादि आचार्यांनीं आपलीं तत्त्वज्ञानें उपनिषदांवरच आधारलीं आहेत. मानवाच्या अंतःकरणांतील सत्यशोधाची जिज्ञासा उपनिषदेंच तृप्त करूं शकतील. उपनिषदांचा काळ हा खिस्तपूर्व ५०० च्या पूर्वींचा असावा. जगाचें आजचें तत्त्वज्ञान ' एकेश्वरवादाकडे ' झुकत आहे. हें जर खरें असेल तर २।३ हजार वर्षांपूर्वी हिंदूंचें हेंच तत्त्वज्ञान होतें असें स्वाभिमानानें म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वेदांगें :

शिक्षा, कल्प, व्याकरण, निरुक्त, छंद व ज्योतिष हीं वेदांचीं षडंगें होत. या वेदांगाचा प्रारंभ ब्राह्मणग्रंथांत व आरण्यकांत झालेला दिसतो. शिक्षण देण्यास व ध्यानांत ठेवण्यास सुलभ जावें म्हणून निरनिराळ्या शास्त्रांवर ' सूत्रग्रंथ ' रचण्यांत आले.

यज्ञयागादि नियमांचे मंत्र ध्यानांत ठेवण्यासाठीं जे सूत्रग्रंथ लिहिले गेले त्यांस कल्पसूत्रें म्हणतात. यांपैकीं ज्यांत श्रौतसंस्कार आले आहेत त्यास श्रौतसूत्रें व गृह्यसंस्कार आले आहेत त्यांस गृह्यसूत्रें म्हणतात. धर्मसूत्रें हीं कल्पसूत्रांचाच एक भाग असून धर्म या शब्दांत न्यायतत्त्वें, कर्म, स्मृति, विधि व चारही वर्णांचे अधिकार यांचा समावेश होतो. शुल्बसूत्रें हीं कल्पसूत्रांचाच एक भाग असून भारतीय भूमितीवरील ते अतिप्राचीन ग्रंथ होत.

शिक्षेसंबंधाचीं सूत्रें कल्पसूत्रांइतकीं तरी जुनीं असावीं. ' शिक्षा ' याचा अर्थ स्पष्ट उच्चार करून आघात वगैरे देऊन संहिता म्हणणें असा आहे. संहितापाठाशिवाय पदपाठ निराळा आहे. पदपाठावरून संहितापाठ कसा तयार करावयाचा हें प्रातिशाख्यांत दिलें आहें.

यास्काचें निरुक्त ही निघण्टु या शब्दकोशावरील टीका आहे. पिंगल याचा छंदःशास्त्रावरील ग्रंथ व वेदाङ्गज्योतिष हा ज्योतिःशास्त्रावरील लहानसा पद्यमय ग्रंथ हे वेदांगासंबंधींचे जुने ग्रंथ होत. व्याकरणावरील जुनीं वेदांगांचीं पुस्तकें आज उपलब्ध नाहींत. आरण्यकांतून आपणांस क्वचित् ठिकाणीं व्याकरणांतील पारिभाषिक शब्द आढळतात. पाणिनीच्या व्याकरणांत वेदभाषेचा विचार प्रामुख्यानें केला नसून केवळ एक उपांग ह्या दृष्टीनें केला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण सातवें

ब्राह्मण युग

ऋग्वेदकाळांत आर्यांनीं राजकीयदृष्ट्या व सांस्कृतिकदृष्ट्या सप्तसिंधु प्रदेशावर विजय मिळविला व नंतर पूर्व आणि दक्षिण दिशेकडे आर्यांचा प्रदेश वाढूं लागला. या काळांत विशेषतः ब्राह्मणवर्गाचें वर्चस्व सामाजिक व धार्मिक क्षेत्रांत होतें. व आर्यसमाजांत ब्राह्मणांना विशेष महत्व आलें होतें. म्हणून या कालास 'ब्राह्मणकाल' असें यथार्थतेनें म्हणतां येईल. आपण पांचव्या प्रकरणांत पाहिलें कीं, ऋग्वेदकाळांत आर्यांनीं सिंधूपासून यमुनेपर्यंतचा सर्व प्रदेश पादाक्रांत केला आणि निरनिराळ्या राज्यांची स्थापना केली. या राज्यांवर राजांची सत्ता आनुवंशिकतेनें चालत असे. हे राजे कधीं कधीं आपापसांत तर कधीं कधीं आर्यांच्या शत्रूविरुद्ध युद्धें करीत. यामुळें लहान लहान राज्यांचें मोठ्या राज्यांत विलीनीकरण झालें, व बलाढ्य अशीं प्रादेशिक राज्यें उदयास आलीं. त्याचबरोबर आर्यांच्या संस्कृतीचाही प्रसार सगळीकडे होऊं लागला. पूर्वेकडे यमुनेपर्यंत व दक्षिणेकडे विंध्य प्रदेशांत त्यांनीं शिरकाव केला. आर्यांच्या पुरोहितांनीं या जिंकलेल्या प्रदेशांतील लोकांवर आपली भाषा, धर्म, सभ्यता व संस्कृति यांचा प्रभाव पाडून त्यांना आर्यसंस्कृतींत समाविष्ट करून घेतले; पण हा सांस्कृतिक विजयसुद्धां केवळ आर्यांचाच होता असें म्हणतां येणार नाहीं. कारण, जरी येथील आदिवासी लोकांनीं आर्यांच्या श्रेष्ठ संस्कृतींतील कांहीं गोष्टी आत्मसात् केल्या, तरी त्यांची भाषा, त्यांचा धर्म व कल्पना, सामाजिक आचार यांचाही परिणाम आर्यसंस्कृतीवर होऊन तिचें स्वरूप संकुल व समावेशक बनलें. त्यामुळें जागतिक इतिहासांत सहसा न घडलेली गोष्ट येथें घडली ती म्हणजे आर्यांच्या सांस्कृतिक विस्ताराबरोबरच सांस्कृतिक देवाणघेवाण होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समावेशक अशी आर्यसंस्कृति तयार झाली व या देशांत उदारता, सौजन्य व पावित्र्य या सद्‌गुणांचें ती प्रतीक बनली.

याच कालांत सहाव्या प्रकरणांत वर्णिलेल्या ऋग्वेदोत्तर वैदिक वाङ्मयाचा उदय झाला. आर्य राजांचे विजय हे विशेषतः पुरोहितांच्या मुत्सद्देगिरीवर व डावपेंचावर अवलंबून असत. या ब्राह्मण पुरोहितांनीं या विजयाचें श्रेय ऋग्वेदांतील देवतांना दिलें आणि या देवतांवर प्रार्थना व यज्ञयाग यांमुळें आपण प्रभाव पाडूं शकतों असें त्यांनीं लोकांच्या प्रत्ययास आणलें. व यामुळें पुरोहितांचें वर्चस्व वाढलें. ऋग्वेदकालांतील साध्यासुध्या धर्माचें रूपांतर केलें गेलें व यज्ञसंस्थेचें महत्त्व वाढत जाऊन सर्व समाजावर ब्राह्मणवर्गाचें राजकीय व सांस्कृतिक वर्चस्व प्रस्थापित केलें गेलें. या वर्चस्वाचें चित्र मागील प्रकरणांत वर्णिलेल्या ऋग्वेदोत्तर वेदवाङ्मयांत प्रतिबिंबित झालें आहे.

ऋग्वेदकालाच्या शेवटीं शेवटीं आर्यांच्या सांस्कृतिक उन्नतीचें केंद्र सरस्वती व दृषद्वती यांच्या दोआबांत होतें. भरतांचें हें वसतिस्थान होतें. यालाच मनूनें ‘ ब्रह्मावर्त ’ असें म्हटलें आहे. हाच भाग पुढें ‘ कुरुक्षेत्र ’ म्हणून प्रसिद्धीस येऊन या कालांत ब्राह्मणी संस्कृतीचें केंद्र बनलें आहे. ही कुरूंची भूमि पुढें आग्नेयेकडे यमुना नदीपर्यंत पसरली. ब्राह्मणग्रंथांत ‘ मध्य-देशा’चा उल्लेख वारंवार होतो. या मध्यदेशांत कुरु, पांचाल, वश, उशीनर इत्यादि लोक राहात असत. या मध्यदेशाच्या उत्तरेस उत्तरकुरु व उत्तरभद्र नांवाचे देश होते. कुरुपांचालाच्या पूर्वेस कोसल, विदेह व मगध नांवाचे देश होते. यांपैकीं कोसल म्हणजे अलीकडील औध व विदेह–मगध म्हणजे उत्तर व दक्षिण बहार हे प्रदेश होत. याच्याही पूर्वेकडे अंग (पूर्व बहार) नांवाचा प्रदेश होता. दक्षिणेकडे मात्र ज्यांच्यावर आर्यसंस्कृतीची छाप पडलेली नव्हती असे कांहीं देश होते. यांपैकीं आंध्र, पुंड्र, पुलिंद, शबर व निषाद हे प्रमुख होते. या निरनिराळ्या देशांखेरीज कांहीं प्रमुख शहरांचाही उल्लेख येतो. आसंदिवत् ही कुरु देशाची राजधानी होती. जनमेजय हा कुरूंचा राजा येथें राज्य करीत असल्याचा उल्लेख ब्राह्मणग्रंथांत येतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar



पृष्ठें : ३० व ७७–७८

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याशिवाय कांपिल्य (पांचालांची राजधानी), कौशांबी व काशी हीं प्रमुख शहरें होतीं.

आर्यांचीं प्रादेशिक राज्यें :

या ब्राह्मणकालांतील आर्यांचें प्रमुख प्रादेशिक राज्य म्हणजे कुरु-पांचालांचें होतें. ऋग्वेदांतील योद्धे भरत यांची आतां नांवनिशाणी शिल्लक नव्हती. कारण, सामर्थ्यशाली अशा पुरूंच्या व विशेषतः कुरूंच्या टोळींत ते आतां विलीन झाले होते. कुरु हे कदाचित् उत्तरेकडून आलेले आर्य असावेत. या कुरूंच्या कुरुश्रवण नांवाच्या राजाचा उल्लेख 'त्रासदस्यव (त्रसदस्यूचा मुलगा)' म्हणून ऋग्वेदांत येतो. परीक्षित् राजाच्या कारकीर्दीत कुरूंच्या राज्याची भरभराट होती. तक्षक नांवाच्या नागांच्या पुढाऱ्यानें त्याला ठार केलें. या परीक्षिताचा वंशज जनमेजय यानें एक सर्पसत्र व अश्वमेध केल्याचा उल्लेख येतो. हें सर्पसत्र म्हणजे नागांवर मिळविलेल्या विजयाचें चिन्ह असावें. जनमेजयानंतर कुरुवंशाची फारशी माहिती मिळत नाहीं.

पांचालांचें राज्य कुरूंच्या पूर्वेस होतें. त्याचा विस्तार म्हणजे अलीकडील बरेली, बदाऊन, फरुखाबाद हे संयुक्त प्रांतांतील प्रदेश होत. या पांचालांचें पहिलें नांव क्रिवि असें होतें. या पांचालांचे कांहीं प्रमुख राजे म्हणजे क्रैव्य, सत्रसह, दुर्मुख, प्रवहणजैवालि (उपनिषत्कालीन तत्त्वज्ञ) हे होत. कांपिल्य, कौशांबी व परिवारक हीं पांचाल राज्यांतील प्रमुख शहरें होतीं.

कुरु व पांचाल हे लोक शुद्ध आर्यवंशाचे असावेत. कारण, त्यांची संस्कृति, सभ्यता, वागणूक श्रेष्ठ प्रतीची होती. सर्व वैदिक वाङ्मयाचें संहितीकरण करणारे लोक त्यांचे पुरोहित होते. आरुणि, श्वेतकेतु, प्रवहण जैवालि यांच्यासारखे श्रेष्ठ तत्त्वज्ञ त्यांच्यांत होते. महाभारतामध्यें कुरु व पांचालांचें जें वैर चित्रित झालें आहे तें याच्या पुढील काळांतील असावें. ब्राह्मणग्रंथांत जेथें राज्याभिषेकोत्सवाचें वर्णन आहे तेथें राजाचा परिचय 'हे कुरूंनो, हे पांचालांनो व हे कुरुपांचालांनो' असें लोकांना संबोधून केलेला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वश व उशीनर या लोकांचा उल्लेख कुरुपांचालांबरोबर होतो, पण या लोकांना फारसें महत्त्वाचें स्थान नसावें. मत्स्य लोकांचाही उल्लेख येतो. आजच्या जयपूरच्या आसपास हे लोक राहात असावेत. ध्वसन् द्वैतवन या मत्स्यांच्या राजानें अश्वमेध केल्याचा उल्लेख येतो. महाभारतामध्यें मत्स्यांनीं पांचालांना मदत केल्याचा उल्लेख आहे.

कुरुपांचालांच्या आणखी पूर्वेकडे कोसल व विदेह यांचीं प्रादेशिक राज्यें होतीं. कोसल हे मुळांत आर्य नव्हते पण आर्यसंस्कृतीची छाप त्यांच्यावर पडून तेही आर्य झाले. औध हा त्यांचा प्रदेश व अयोध्या ही त्यांची राजधानी असावी. विदेह हे हल्लींच्या उत्तर बहार प्रदेशांत राहात असत. विदेह व कोसल यांची सीमारेषा म्हणजे सदानीरा (हल्लींची गंडकी) नदी. कोसलानंतर विदेहावर आर्यसंस्कृतीची छाप पडली असावी असें विदेघ माथव राजाच्या ब्राह्मणग्रंथांतील कथेवरून वाटतें. जनक हा विदेहाचा सर्वश्रेष्ठ राजा. मिथिला ही त्याची राजधानी असून सीता ही त्याची मुलगी होती. उपनिषदांमध्यें तत्त्वज्ञ म्हणून याचाच उल्लेख दिसतो. याज्ञवल्क्य व श्वेतकेतु हे ब्राह्मण तत्त्वज्ञ याच्याकडे ज्ञानप्राप्तीसाठीं येऊन राहिले होते. कोसल, विदेह व काशी या लोकांचें जातुकर्ण्य या पुरोहिताच्या पौरोहित्याखालीं एके काळीं सख्य असावें. रामायणामध्यें कोसल व विदेह यांच्या राजांचे वैवाहिक संबंध प्रस्थापित झाल्याचें दिसतें.

ज्यांच्यावर आर्यसंस्कृतीचा प्रत्यक्ष परिणाम घडूं शकला नाहीं असे लोक म्हणजे पूर्वेकडील मगध लोक (द. बहार). हे मगध लोक गायक होते व आर्यांशीं त्यांचें शत्रुत्व होतें. येथें आर्यांना बराच मोठा विरोध झाला. कारण, ह्या मगध लोकांची संस्कृति आर्यांहून बरीच भिन्न होती. त्यांना व्रात्य किंवा जातिबाह्य समजत; व व्रात्यस्तोमासारखा धार्मिक विधि केल्यावरच त्यांना आर्य समजत असत. मगधांचे राजे हे आपणांस कुरूंचे व वसु चैद्याचे वंशज म्हणवीत. गिरिव्रज ही त्यांची राजधानी होती. (महाभारतामध्यें मगधांचा राजा जरासंध याची राजधानी हीच असल्याचा उल्लेख आहे.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या प्रमुख प्रादेशिक राज्याखेरीज मध्यदेशाच्या उत्तरेस उत्तरकुरु व मद्र लोक राहात असत. अगदीं उत्तरेकडच्या टोकाला केकय नांवाची टोळी असून अश्वपति हा त्यांचा राजा होता. त्यांच्याच शेजारीं बाल्हीक नांवाचे लोक राहात असत. दक्षिणेकडे आंध्र लोक होते. अगदीं पूर्वेकडे पूर्व बहार व बंगाल प्रदेशांत अंग लोक राहात असत.

राजकीय परिस्थिति :

राजा ही संस्था कशी निर्माण झाली यासंबंधीं ऐतरेय ब्राह्मणांत (१.१.१४) एक कथा आली आहे. देवदानवांच्या युद्धांत देवांचा पराभव होऊं लागला तेव्हां देवांनीं एक राजा निवडला व त्याच्या साहाय्यानें दानवांवर विजय मिळविला. येथें आवश्यकतेंतून राजपद निर्माण झालें व प्रजेच्या अनुमतीनें राजा निवडला जात असे असें सुचविलें आहे. त्याच ग्रंथांत आणखी एके ठिकाणीं (८.४.१२) सर्वांत श्रेष्ठ गुण असलेल्या व्यक्तीस राजा निवडल्याचा उल्लेख आहे. कधीं कधीं राजाची निवड परमेश्वरानें केली असें म्हटलें जात असे, तर शतपथब्राह्मणांत (९-१-६—२४) मात्स्यन्यायानें प्रजेंत गोंधळ माजूं नये म्हणून राजा व राज्य यांची आवश्यकता असल्याचें सांगितलें आहे. आर्यांच्या टोळ्यांचीं रूपांतरें वर सांगितल्याप्रमाणें प्रादेशिक राज्यांत होऊं लागल्यावर राजा व राज्यसंस्था यासंबंधींचे विविध विचार प्रगट केले जाऊं लागले.

शिवाय, त्यावेळीं केल्या जाणाऱ्या अश्वमेध व राजसूय यज्ञांच्या वर्णनावरून असें म्हणतां येतें कीं, राजे लोक सम्राट् होण्याची महत्त्वाकांक्षा बाळगीत. ऐतरेय ब्राह्मणांत सम्राट्, भोज, विराट्, राजन्, एकराट्, सार्वभौम असे राजांचे निरनिराळे प्रकार वर्णिले आहेत. यावरून मोठमोठीं राज्यें, साम्राज्यें त्यावेळीं अस्तित्वांत असावींत असें दिसतें. ऐतरेय ब्राह्मणांत राजसूय यज्ञाच्या वेळीं राज्याभिषेक झालेल्या अनेक राजांचा उल्लेख आहे. या अनेक राजांपैकीं प्रत्येकानें दिग्विजय केल्याचें वर्णिलें आहे. यावरून राजे लोक प्रत्यक्ष दिग्विजय करण्याऐवजीं दिग्विजयाची केवळ आकांक्षा व्यक्त करीत असावेत असें दिसतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजपद हें वंशपरंपरा चालत असावें. कारण, 'राजपुत्र' असे उल्लेख वारंवार येतात. राजाची निवड बहुधा प्रजा (विश्) च करीत असे. एखादा राजा अयोग्य असल्यास त्याच्या जागीं दुसऱ्या योग्य माणसाची निवड केली जात असे. राजकारणांत या काळीं प्रजेला फार मोठें महत्त्व होतें. अथर्ववेदांत (३-४) राजा व प्रजा यांचें ऐकमत्य असो अशी इच्छा व्यक्त केली आहे.

ऋग्वेदकालाप्रमाणेंच याही कालीं राज्यकारभारावर प्रजेची देखरेख असे व ही देखरेख सभा व समिति या दोन प्रजातंत्र संस्थांकडून होत असे. "सभा व समिति या दोन प्रजापतीच्या मुली मला एकोप्यानें मदत करोत" अशी राजानें शतपथ ब्राह्मणांत (४.१.४.१-६) प्रार्थना केली आहे. राजा व प्रजा हे दोन्हीही दैवी अंश आहेत असें या शतपथब्राह्मणांतील उल्लेखांत सुचविलें आहे.

त्या वेळच्या सभेचें नेमकें स्वरूप काय होतें हें जरी आज सांगणें कठिण असलें, तरा 'न्यायदान करणारी जनतेची पंचायत' असा त्याचा अर्थ असावा. ज्या ज्या वेळीं ही 'सभा' भरे त्या त्या वेळीं एक यज्ञ केला जात असे. द्यूत, वादविवाद, करमणूक, सामाजिक कार्य इत्यादि कामेंही या सभेंत केलीं जात असावीत. 'सभासद' व 'सभाचर' या शब्दांवरून सभेचें प्रमुख काम न्यायदानाचेंच असावें असें वाटतें. 'सभापति', 'सभापाल' यांचाही उल्लेख यजुर्वेद व तैत्तिरीय ब्राह्मणांत येतो. सारांश, राजकीय कार्यापेक्षां न्यायदानाचेंच कार्य सभेंत होत असावें. त्यामुळें स्वाभाविकपणें स्त्रियांना 'सभेंत' स्थान नसे.

'समिति' व 'सभा' यांमधील नेमका फरक सांगतां आला नाहीं तरी सर्वसामान्य धोरण व कायदा यांवर समितींत चर्चा होत असावी. सभेपेक्षां समितीचें स्वरूप मोठें असावें. परंतु या दोन्ही प्रजातंत्र संस्था असूनही राजाचे अधिकार हळूहळू वाढतच होते. कारण, प्रादेशिक राज्यें वाढत होतीं व वंशपरंपरा राजपदप्राप्ति होऊं लागली. राज्य व प्रजा यांचें संरक्षण करणें हें राजाचें मुख्य कर्तव्य असे. निरनिराळ्या प्रादेशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यांत नेहमीं भांडणें होत असल्यामुळें राजा हा पराक्रमी व बलाढ्य असावा अशी जनतेची अपेक्षा होती.

याप्रमाणें केवळ विशिष्ट राजकीय परिस्थितीमुळें राजसत्ता वाढूं लागली व पुढें पुढें तर राजा हा दैवी अंश आहे असें समजलें जाऊं लागलें. परंतु येथें एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवली पाहिजे कीं, सर्व व्यवहारांत धर्माचा (Sacred Law) पगडा विशेष असल्यामुळें राजा व प्रजा यांच्या हातून सहसा मर्यादेचें उल्लंघन केलें जात नसे.

या धर्माचा अर्थ लावणें हें विशेषतः पुरोहिताच्या हातांत असे. हा पुरोहित राजाचा प्रमुख सल्लागार असल्यामुळें राजा प्रजेच्या इच्छेविरुद्ध वागत नसे. राजे विशेषतः क्षत्रिय वर्गांतील असत. ते स्वतः ज्ञानसंपन्न असत. तत्त्वज्ञानविषयक वादविवादांत ते भाग घेत. त्यांचे शिष्य ब्राह्मण देखील असत. शुक्ल यजुर्वेदांत (१०.२७) राजाला खालीलप्रमाणें उपदेश केला आहे : "आजपासून शास्ता या दृष्टीनें बलवान् व दुर्बळ अशा सर्व लोकांना निःपक्षपातीपणें व प्रामाणिकपणें न्याय दे. जनहितासाठीं तूं सतत खटपट करावीस व सर्व संकटांपासून प्रजेचें संरक्षण करावेंस." या काळांत क्षत्रियांची व विशेषतः राजेलोकांची प्रतिष्ठा ब्राह्मणांहूनही अधिक झाली होती असें दिसतें.

राजाचे मदतनीस म्हणून अनेक अधिकाऱ्यांचा उल्लेख येतो. ग्रामणी (हल्लींचा गांव-पाटील) हा बहुधा वैश्य असे. राजपरिवार व सरदार हे राजन्य म्हणजे लढाऊ वर्गांतील असत. सैन्यावरील सर्व अधिकारी याच वर्गांतील असत. सेनानी हा सैन्याचा सेनापति असे. संग्रहीतृ हा राजाचा खजिनदार व भागदुघ हा कर वसूल करणारा असे. सूत हा खाजगी अधिकारी असून तो सारथ्याचें काम करी. याशिवाय क्षतृ, पालागल, तक्षा, रथकार इत्यादि किरकोळ अधिकाऱ्यांचेही उल्लेख मैत्रायणी संहितेंत आढळतात. स्थपति हा बहुधा मुख्य न्यायाधीश किंवा राज्याच्या एखाद्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भागाचा प्रमुख असावा. कारण, सूत्रवाङ्मयांत ' निषादस्थपति ' नांवाच्या अधिकाऱ्याचा उल्लेख आहे. स्थपतिखेरीज इतर सर्व अधिकाऱ्यांना ' रत्निन् ' असें म्हणत. सूत व ग्रामणी यांना ' राजकृत् ' असें म्हणत. महिषी, राजपुत्र, राजभ्राता, पुरोहित, सूत, ग्रामणी, क्षत्तृ, संग्रहीतृ या खेरीज ' अष्ट–वीर ' म्हणजे आठ प्रमुख अधिकाऱ्यांचाही उल्लेख येतो. प्रजेकडून धान्यस्वरूपांत मिळणाऱ्या करांतून राज्यकारभाराचा खर्च भागविला जात असावा. प्रजा (विश्) हा राज्याचा आधार होय हा विचार मात्र प्रमुखपणें या वाङ्मयांत आढळतो.

सामाजिक परिस्थिति :

राजकीय व सांस्कृतिक उन्नतीबरोबरच आर्यांच्या समाजव्यवस्थेंत या काळांत बराच फरक पडला. हिंदुस्थानांत येण्यापूर्वी तसेंच ऋग्वेद-काळांत आर्यांमध्यें वर्ण नव्हते. पंजाबांत आल्यावर आर्यांचा अनार्यांशीं संबंध आला. आर्यांनीं अनार्यांवर विजय मिळवून त्यांना सांस्कृतिकदृष्ट्या ' शूद्र ' म्हणून आपणांत सामावून घेतलें. आर्यांचा वर्ण गोरा तर अनार्यांचा काळा, यामुळें दोन वर्ण निर्माण झाले. अनार्यांशीं युद्ध करून वसाहती पुढें रेटणाऱ्या शूर व धैर्यवान् लोकांचा एक वेगळा वर्ग निर्माण झाला. त्याला ' क्षत्रिय ' हें नांव मिळालें. समाजाचा योगक्षेम शेती, उद्योगधंदे, व्यापार या मार्गानें करणारांचा जो वर्ग तयार झाला त्यांना ' वैश्य ' म्हणूं लागले. यज्ञयागासाठीं देवतांचा आराधना करणारा विद्वान् लोकांचा वर्ग तयार झाला; तो वर्ग म्हणजे ' ब्राह्मणवर्ग ' होय.

आर्यांच्या तिन्ही वर्णांत लग्नाचें किंवा व्यवसायाचें बंधन आरंभीं नव्हतें. क्षत्रियास देखील निश्चय केल्यास ब्राह्मण होतां येत असे. शूद्रांचा मात्र सेवा हाच एकमेव व्यवसाय ठरला होता. सारांश, त्रैवर्णिक आर्यांचा वर्ण जन्मा-पेक्षां कर्माप्रमाणें ठरत असे. कोणासही समाजसेवेपैकीं कोणतेंही अंग पत्करण्याचा अधिकार होता व त्यावरून त्याची जात ओळखली जाई. या प्रत्येक वर्णाच्या लोकांचीं कामें ठरलेलीं असत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्राह्मण :

अध्ययन, अध्यापन, यजन, याजन, दान, प्रतिग्रह हीं ब्राह्मणांचीं कर्तव्यें होतीं. वेद मुखोद्गत करून ते जतन करण्याचें काम ब्राह्मणांचें होतें. अध्ययन व अध्यापन यांत ब्राह्मणांचा बहुतेक वेळ जात असल्यामुळें त्यांच्या उदर-निर्वाहाची जबाबदारी इतरांवर म्हणजे विशेषतः राजेलोकांवर होती. यजन म्हणजे यज्ञ करणें. प्रत्येक गृहस्थाश्रमी ब्राह्मणानें स्वतः घरीं अग्नि ठेवून पूजा व याग करावा असा दंडक असे. याजन म्हणजे क्षत्रिय व वैश्य या वर्णांचे जे लोक यज्ञ करतील त्यांच्या यज्ञांत पुरोहिताचें काम करणें. चरितार्थ चालण्यासाठीं दान घेणें व स्वतः दान करणें हेंही ब्राह्मणांचें एक कर्तव्य होतें.

क्षत्रिय :

अध्ययन, यजन (यज्ञ करणें) व दान देणें हीं क्षत्रियांचीं तीन प्रमुख कर्तव्यें असून त्यांचें विशिष्ट काम म्हणजे प्रजापालन, प्रजारक्षण व युद्ध हें होतें. यज्ञ करणें, विद्या शिकणें व दान देणें हीं जरी क्षत्रियांचीं कर्तव्यें असलीं तरी तीं त्यांच्या उपजीविकेचीं साधनें नव्हतीं. वेदविद्याध्ययनांत पुढें क्षत्रिय मागें पडले. शस्त्रधारण हें विशेषतः क्षत्रियांचें व प्रसंगीं सर्व जातींचें कर्तव्य असे. क्षत्रियांनीं याचना करूं नये. कठिण प्रसंगीं शेती व गोरक्षण करावें अशी सवलत होती.

वैश्य :

यज्ञ करणें, विद्या शिकणें व दान देणें हीं कर्तव्यें वैश्यांनाही मोकळीं होतीं; परंतु त्यांचीं विशिष्ट कर्तव्यें म्हटलीं म्हणजे कृषि, गोरक्षण व वाणिज्य. आर्यांच्या वसाहतींची वाढ होत जाऊन सिंधु, गंगा, यमुना या नद्यांच्या सुपीक प्रदेशांवर त्यांची सत्ता स्थापन झाल्यामुळें शेती व गोरक्षण हे दोन धंदे विशेष भरभराटीस आले. जमीन तयार करणें, बीं पेरणें, पिकें काढणें, धान्य गोळा करणें या कामांत वर्षांतील सर्व दिवस मोडत असत. सुपीक प्रदेशांत विस्तीर्ण चराऊ कुरणें असल्यामुळें गोरक्षणाचा स्वतंत्र धंदा झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्यांना मुळांतच पशुपालनाची आवड असल्यामुळें पशूंची निगा राखणें हें वैश्यांचें एक कर्तव्य ठरलें. आपल्याजवळच्या आवश्यकतेपेक्षां अधिक वस्तू दुसऱ्यास देऊन त्याच्या मोबदल्यांत आपणांस हव्या असणाऱ्या वस्तू दुसऱ्याकडून घेणें यांतून व्यापार (वाणिज्य) उदयास आलें.

शूद्र :

हा वर्ण सर्वस्वीं आर्येतरांचाच होता. त्यामुळें आर्यांचीं कर्तव्यें व शूद्रांचीं कामें अगदीं निराळीं होतीं. विद्या शिकणें, यज्ञ करणें, दान देणें हीं त्रैवर्णिकांचीं कर्तव्यें करण्याचा शूद्रांस अधिकार नव्हता. ते जित असल्यामुळें आर्यांचे दास होते व त्यामुळें तिन्ही वर्णांची सेवा हें एकच कर्तव्य त्यांना सांगितलें होतें. पुढें पुढें शेती करण्याची शूद्रांना परवानगी मिळाली. तसेंच कालांतरानें अमंत्रक यज्ञ करण्याची त्यांना अनुमति मिळाली.

या चार वर्णांशिवाय पुढें कांहीं कालानंतर एकमेकांच्या संबंधामुळें संकर-जाती निर्माण झाल्या. सूत, वैदेह, मागध हीं संकर (त्रैवर्णिक) जातींचीं उदाहरणें असून या प्रत्येक जातीचीं स्वतंत्र कर्तव्यें सांगितलेलीं असत. आर्यांचा शूद्रांशीं संबंध येऊन आयोगव, निषाद, चांडाळ इ. जाती निर्माण झाल्या. या हीन जातींच्या परस्पर संबंधांतून पुढें सैरंध्र, श्वपाक व पुक्कस आदि जाति निर्माण झाल्या. आजमितीस हिंदुस्थानांत सुमारें ३५० निरनिराळ्या जाती आहेत.

चातुर्वर्ण्य संस्था ही आर्यांनींच उत्पन्न केलेली संस्था होय. जेव्हां ते सर्व देशभर पसरूं लागले त्यावेळीं निरनिराळ्या संस्कृतीच्या लोकांशीं त्यांचा संबंध आला. राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या आर्यांनीं या इतर लोकांवर विजय मिळविला; परंतु त्यांच्या मूळ संस्कृतीला धक्का न लावतां तिचीं कांहीं वैशिष्ट्यें आर्यांनीं आपल्या संस्कृतींत सामावून घेतलीं व आर्य आणि अनार्य यांचें सांस्कृतिक एकीकरण घडवून आणलें. चातुर्वर्ण्य या संस्थेच्या अस्तित्वामुळेंच आर्य व अनार्य यांच्यांतील सांस्कृतिक संघर्ष टाळतां आले. भारतीय संस्कृतीला जो थोडा काळ शांततेचा लाभला तो या संस्थेमुळेंच होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आश्रमव्यवस्था :

समाजांतील प्रत्येक व्यक्तीची मनःप्रवृत्ति व कर्तृत्व यावर आर्यांची आश्रमव्यवस्था आधारलेली आहे. समाजामध्यें सुसंगत जीवन जगतां यावें, भांडणतंटे होऊं नयेत, अर्थव्यवस्था सुरळीतपणें चालावी, या हेतूंनीं आश्रमव्यवस्था अस्तित्वांत आणली गेली. याचा अर्थ असा नव्हे कीं, वैयक्तिक उन्नति व पूर्णता यांकडे दुर्लक्ष केलें गेलें. त्यावेळच्या समाजधुरीणांनीं हें निश्चित ओळखलें होतें कीं, वैयक्तिक जीवन व सामाजिक जीवन यांचा मेळ घालतां न आल्यास मानवी जीवन अपूर्ण राहील. म्हणून बालवयांत विद्यार्जन, तरुणवयांत कुटुंबव्यवस्था, उतारवयांत समाजसेवा व शेवटच्या दिवसांत सर्वसंगपरित्याग करून परमेश्वरचिंतन हेंच सामान्यपणें प्रत्येक व्यक्तीचें जीवन असावें असें ठरवून या जीवनक्रमास आर्यांनीं रेखीव स्वरूप देऊन जी एक व्यवस्था निर्माण केली ती म्हणजेच आश्रमव्यवस्था होय. या व्यवस्थेचा उद्देश प्रत्येक व्यक्तीचें आयुष्य रेखीव, सुसंघटित व सुरळीत चालून त्यास ऐहिक व पारमार्थिक जीवनाचा आनंद मिळवितां यावा हा आहे. आयुष्याचे चार निरनिराळे भाग करून त्यांस त्यांनीं स्वतंत्र नांवें दिलीं व त्या प्रत्येक भागांत कोणतें कर्म करावयाचें तें सांगून टाकलें.

ब्रह्मचर्याश्रम :

मुलगा ७।८ वर्षांचा झाल्यावर उपनयनविधि (मुंज) होऊन मुलाचा या आश्रमांत प्रवेश होई. येथून पुढें बारा किंवा अधिक वर्षें गुरुगृहीं राहून त्यास विद्या संपादन करावी लागे. वैदिक काळीं अध्यापनाचें कार्य ब्राह्मणच करीत असल्यामुळें अशा विद्वान् गुरूकडे जाऊन विद्याभ्यास करावा लागे. या ठिकाणचें मुख्य शिक्षण धार्मिकच असे. परंतु वेदविद्येबरोबर इतर विद्याही त्या ठिकाणीं शिकविल्या जात. " गुरूच्या घरांतील काम शिष्यानें करावें व काम झाल्यावर अध्ययन करावें. शिष्यानें शुचिर्भूत व कार्यदक्ष असावें. गुरूच्यानंतर निजावें व आधीं उठावें. शास्त्रांत सांगितल्याप्रमाणें ब्रह्मचर्याचे सर्व नियम पाळावेत " अशी त्या वेळच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुकुलाची शिस्त असे. ब्राह्मण विद्यार्थी भिक्षा मागत. क्षत्रियास व वैश्यास भिक्षा वर्ज्य होती. गुरूची मर्जी सदैव सांभाळावी लागे. गुरुपत्नी व गुरुपुत्र यांसही मान द्यावा लागे. शिक्षण चालू असतांना कोणासही घरीं जातां येत नसे. शिक्षण किंवा भोजन यासाठीं कांहींही द्यावें लागत नसे. विद्यार्थ्यांनें आपला अभ्यासक्रम संपविल्यावर त्यास घरीं जाण्यास अनुमति मिळे. या वेळच्या समारंभास 'समावर्तन' असें म्हणत. यावेळीं गुरु आपल्या शिष्यांना 'सत्यं वद । धर्मं चर । स्वाध्यायान्मा प्रमदः । मातृदेवो भव । पितृदेवो भव । आचार्यदेवो भव ।' इत्यादि उपदेश करी. विद्यार्थी गुरूचें ऋण स्मरून त्यास गुरुदक्षिणा देत; परंतु या बाबतींत सक्ति नव्हती. दररोज तीन वेळां स्नान करून सूर्य, अग्नि व इतर देवतांचें पूजन विद्यार्थ्यांस करावें लागे. क्षत्रियांस वेदविद्येशिवाय धनुर्विद्या, राजनीति, दंडनीति यांचें शिक्षण ब्राह्मण गुरूच देत असत. वैश्यांना कृषि, शिल्प, व्यापार यांचें शिक्षण दिलें जाई. ज्योतिष, वैद्यक इ. निरनिराळ्या विद्या ब्राह्मण प्रथम स्वतः शिकत व नंतर इतरांस शिकवीत. विद्येंतील प्रावीण्याबद्दल राजांकडून ब्राह्मणांस मोठी दक्षिणा मिळत असे.

गृहस्थाश्रम :

विद्याभ्यासानंतर गुरूच्या अनुमतीनें या आश्रमाचा स्वीकार करावा असा नियम असे. विवाह करून प्रत्येकानें आपला संसार निराळा मांडून, अग्निपूजा व अतिथिसेवा करून कुटुंबपोषण करावें हा गृहस्थाश्रमाचा मुख्य धर्म होय. "गृहस्थानें केंव्हांही केवळ आपल्याच उपयोगासाठीं अन्न शिजवूं नये व पशूंची व्यर्थ हिंसा करूं नये. दिवसा, पूर्वरात्रीं किंवा उत्तररात्रीं निजूं नये. अतिथीचा सदैव सन्मान करावा. यजन, अध्ययन व दान करावें. ब्रह्मचारी व संन्यासी यांस अन्नदान करावें. स्वतंत्र धंदा करून किंवा राजापाशीं याचना करून जें द्रव्य मिळेल त्यांतून कुटुंबपोषण व यज्ञयागादिक क्रिया कराव्यात" असे नियम असत. या आश्रमाच्या योग्य पालनानें धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारीही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरुषार्थांची प्राप्ति होते अशी धारणा असल्यामुळें याला विशेष महत्त्व असे. वृद्धापकाळीं आपल्या पुत्रावर कौटुंबिक जबाबदारी टाकून आपण संसारांतून मुक्त व्हावें असा दंडक असे.

वानप्रस्थाश्रम :

ही संन्यासाश्रमाची पूर्वतयारी होय. गृहस्थाश्रम संपवून व संसार मुलांबाळांच्या स्वाधीन करून मनुष्यानें वनांत जावें. बायको जिवंत असल्यास तिला बरोबर घेऊन जावें. ' वानप्रस्थ ' याचा अर्थ वनांत प्रास्थित झालेल्या मनुष्याचा जीवनक्रम. या आश्रमांत कांहीं वर्षे देहाचे क्लेश सोसण्यास मन तयार झाल्यावर केवळ परमेश्वरचिंतन करण्यासाठीं शेवटच्या आश्रमाचा स्वीकार करावा असा नियम असे.

संन्यासाश्रम :

संन्यास घेण्याचा अधिकार प्रथम त्रैवर्णिकांस असे. पुढें तो फक्त ब्राह्मण वर्गापुरता मर्यादित झालेला दिसतो. याचें मुख्य कारण म्हणजे या आश्रमांतील कष्टमय जीवन हेंच असावें. भगवीं वस्त्रें, मुंडन, त्रिदंडधारणा व कमंडलु घेणें हीं संन्यासाचीं बाह्य अंगें होत. " संन्याशानें सर्वांशीं सदयतेनें वागावें; सर्व इंद्रियें ताब्यांत ठेवावीं; कोणीं अन्न आपण होऊन आणून दिलें तरच तें घ्यावें; जरुरीपेक्षां अधिक मागूं नये. ओसाड घर, अरण्य, वृक्षाची सावली, नदीतीर अशा एकांत जागीं राहावें; एका ठिकाणीं शक्य तों एक दिवस मुक्काम करावा; संग्रह मुळींच करूं नये; अहिंसा, ब्रह्मचर्य, सत्य, सरळपणा, अक्रोध, अनसूया (द्वेष न करणें), दम, चहाडी न करणें हीं व्रतें प्रमुखपणें पाळावींत; अन्न व वस्त्र यांशिवाय इतर कोणत्याही गोष्टीचा स्वीकार करूं नये; आपण होऊन कोणास उपदेश करूं नये; गतगोष्टींचा शोक करूं नये " इत्यादि या आश्रमाचे नियम असत.

ही आश्रमव्यवस्था ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या त्रैवर्णिकांनाच फक्त लागू होती. परंतु या आश्रमांचें योग्य रीतीनें पालन करण्यासाठीं मनोनिग्रहाची अत्यंत आवश्यकता असल्यामुळें प्रारंभीं जरी ही व्यवस्था उत्तम ठरली तरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हें सामर्थ्य जसजसें कमी पडत गेलें तसतशी आश्रमव्यवस्था मोडकळीस आली.

आर्यांच्या वर्णव्यवस्थेवर आज जोराची टीका होत आहे; तरी पण मुळांत जाऊन पाहिलें तर ही संस्था सुरू करण्यांत आर्यांचा सद्धेतूच दिसून येतो. वर्णाची निश्चिति जन्मावर नसून कर्मावर होती, ही गोष्ट ध्यानीं घेणें आवश्यक आहे. त्रैवर्णिक आर्यांस आपला वर्ण बदलतां येत असे ही गोष्ट ध्यानीं घेतल्यास वर्णव्यवस्थेला नांवें ठेवणें कठिण जाईल. वर्ण कर्मावरून न ठरतां जन्मावरून ठरूं लागल्यानंतर व जातिसंस्था वाढल्यानंतर आतां वर्णव्यवस्थेचा उदो उदो करणें योग्य नव्हे. उपमेंत बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, वर्णव्यवस्थेचा उगम नदीसारखा आहे. मुळांत करंगळीएवढी असणारी पाण्याची धार पुढें जशी प्रचंड नदीचें रूप धारण करते, तशी आर्य व आर्येतर या भेदांतून उत्पन्न झालेली वर्णव्यवस्था पुढें प्रचंड व विस्तीर्ण झाली. आश्रमव्यवस्थेचें स्वरूप याच्या अगदीं उलट आहे. उपमा द्यावयाचीच झाली तर आश्रमव्यवस्थेला एखाद्या सरोवराची देतां येईल. मुळांत त्याचें स्वरूप मोठें व रमणीय होतें, परंतु कालांतरानें हें सरोवर आटत जाऊन आज तें ज्वळजवळ कोरडें पडलें आहे.

गृहान्तर्गत आयुष्य :

वर्णधर्म आणि आश्रमधर्म यांमुळें आर्यांच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनाचें नियमन होत असे. त्याचप्रमाणें जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या व्यक्तीच्या आयुष्यावर नियमन गृह्य-धर्मांमुळें ठेवलें जात असे. व्यक्तीच्या आयुष्यांतील प्रत्येक महत्त्वाच्या घटनेच्या प्रसंगीं कांहीं विशिष्ट संस्कार केले जात. यांपैकीं जातकर्म, नामकरण, चूडाकर्म, उपनयन, विवाह, अग्न्याधान, गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, अन्त्येष्टि आणि श्राद्ध हे प्रमुख संस्कार होत. गृह्यसूत्रांमध्यें या सर्व संस्कारांची माहिती दिली असून कांहीं सूत्रोक्त संस्कार आजपर्यंत चालत आले आहेत व कांहीं नष्ट झाले आहेत. गर्भाधान हा गर्भधारणेसंबधींचा विधि आहे. पुंसवन मुलगा होण्यासाठीं स्त्रीवर करावयाचा संस्कार होय. सीमंतोन्नयनानें सुलभ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसूतीची इच्छा व्यक्त केली जाते. जातकर्म हा मूल जन्मल्याबरोबर करावयाचा संस्कार आहे. मूल जन्मून दहा दिवस झाल्यावर नामकरण संस्कार करून त्याचें नांव ठेवलें जात असे. तिसऱ्या वर्षी चूडाकर्म (जावळ) हा संस्कार केला जात असे. आठव्या, नवव्या किंवा बाराव्या वर्षी उपनयन हा अत्यंत महत्त्वाचा संस्कार केला जात असे. यावेळीं मुलाच्या गळ्यांत यज्ञोपवीत (जानवें) घालून त्याला गुरूकडे पाठविलें जात असे. या संस्कारानंतर त्याचा जणूं आध्यात्मिक पुनर्जन्म होत असल्यामुळें त्याला 'द्विज' असें म्हणतात. या संस्कारानें वेदाभ्यासाचा व गायत्रीमंत्रपठणाचा अधिकार त्यास प्राप्त होतो. बारा वर्षें गुरुगृहीं राहून व वेदाभ्यास संपवून परत आल्यावर त्याचा विवाह होत असे. या संस्कारामुळें कांहीं पवित्र कर्तव्यें करण्याचा अधिकार त्याला प्राप्त होतो. मरणोत्तर प्रेतदहनाच्या वेळीं अंत्येष्टि हा संस्कार केला जात असे. मरणोत्तर पितरांना सद्गति लाभावी म्हणून श्राद्ध हा विधि केला जातो.

यांशिवाय देवयज्ञ, पितृयज्ञ, असुरयज्ञ, मनुष्ययज्ञ व ब्रह्मयज्ञ हे पंचमहायज्ञ रोजचे विधि म्हणून प्रत्येक घरांतील कर्त्या माणसास करावे लागत. सायंप्रातर्यज्ञ, पौर्णिमा व अमावस्येच्या इष्टि, वार्षिक यज्ञयाग यांचीही माहिती गृह्यसूत्रांत आहे. प्रत्येक व्यक्ति सुसंस्कृत करणें व 'संस्कृति' समाजामध्यें मुरविणें हें महत्त्वाचें काम या संस्कारांनीं केलेलें आहे. संस्कार म्हणजे सद्‌गुणांचा आविष्कार, विकसन व संवर्धन. व्यक्तीच्या आचरणाला विशिष्ट आणि इष्ट वळण देणें हें संस्कारांचें कार्य. अशा महत्त्वाच्या भारतीय संस्कारांची प्रत्यक्ष, रूढ कर्तव्यात्मक माहिती गृह्यसूत्रांत आली आहे. प्राचीन भारतीयांचा आचार कसा होता हें या ग्रंथांवरून समजतें.

या ग्रंथांत दिलेले मंत्र व विधि यांचें इन्डो–जर्मन लोकांच्या मूळ चालीरीतींशीं बरेंच साम्य आढळतें म्हणून या ग्रंथांचें विशेष महत्व आहे. ग्रीक, जर्मन, रोमन व स्लाव्ह लोकांतील लग्नविधि व भारतीय लग्नविधि यांचें साम्य पाहिल्यास भाषासादृश्याप्रमाणेंच आचार-विचारांचेंही सादृश्य त्यांत होतें असें वाटूं लागतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विवाहसंस्था :

ब्राह्मणकालांत या संस्थेला विशेष महत्त्व आलें होतें. आर्यांच्या जीवितांत या संस्कारास अत्यंत महत्त्व होतें. कारण, यावरच गृहस्थाश्रम व त्यांतील महत्त्वाचें कर्तव्याचरण अवलंबून होतें. पत्नीशिवाय कोणताही धार्मिक विधि पूर्ण समजला जात नसे. त्यावेळीं सर्वसामान्यपणें एकपत्नीत्व रूढ होतें. परंतु राजेरजवाडे व श्रीमंत व्यापारी यांच्यांत बहुपत्नीत्वाची चाल असावी. या कालांत विवाहावर अनेक बंधनें घातलीं गेलीं व तीं बंधनें अटळ बनूं लागलीं. ऋग्वेदकालांत गोत्रबाह्य मुलीशीं किंवा मुलाशीं विवाह करीत. ब्राह्मणकालांत तर हा नियमच बनला व सगोत्र विवाह बेकायदा समजला जाऊं लागला. परंतु याबरोबरच आपल्या वर्णांतील मुलामुलींशींच विवाह करावा असाही नियम बनला गेला. असवर्ण-विवाह जरी बेकायदा समजले नाहींत तरी समाजांत त्यांना मान्यता नव्हती. तरी पण असवर्ण विवाह होत असत व समाजांतील विचारवंत अशांपैकीं फक्त अनुलोम विवाहास (वरानें आपल्याहून हीन वर्णाच्या वधूशीं विवाह करणें) मान्यता देत, पण प्रतिलोम विवाहाला त्यांची कधींच मान्यता नसे.

ऋग्वेदकालामध्यें वधूवरांना एकमेकाची निवड करण्याची संपूर्ण मुभा होती. पण ब्राह्मणकालांत वधूला हा हक्क राहिला नाहीं. आतां तिला यासाठीं वडीलधाऱ्या माणसावर अवलंबून राहावें लागलें. कोणाही योग्य वराला देणगी म्हणून कन्या अर्पण केली जाऊं लागली. कन्या विवाहयोग्य (ऋतुकाल प्राप्त झालेली) झाल्याबरोबर तिचा विवाह होऊं लागला. विवाहाचे आठ प्रकार ठरले होते. यांपैकीं ब्राह्मविवाह सर्वश्रेष्ठ समजला जाई. या प्रकारांत पिता आपली कन्या उत्तम शील असलेल्या विद्वान् वरास सालंकृत अर्पण करी. ज्यांत कन्याविक्रय होई अशा विवाहांना आसुरविवाह म्हणत. गांधर्वविवाहांत वधूवरांचें परस्पर प्रेम व अनुमति यावरच भर असे. वडीलधाऱ्या माणसांची अनुमति यांत घेतली जात नसे.

विवाहाचे सर्व धार्मिक विधि व उत्सव वधूगृहींच होत असत व तेथेंच वराला पाचारण केलें जात असे. बारीक सारीक विधींत बरेच फरक असले

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तरी, सर्वसामान्यपणें कन्यादान, विवाहहोम, पाणिग्रहण, अग्नि-परिणयन, अश्मारोहण, लाजाहोम आणि सप्तपदी एवढे विधि तरी सर्वत्र होत. विवाह हा एक संस्कार आहे, करार नव्हे, अशीच त्यावेळची भावना होती.

अन्त्यसंस्कार :

मृत्यूनंतर माणसाची काय अवस्था होते यासंबंधीं असणाऱ्या धार्मिक कल्पनांवर सर्व अंत्यसंस्कार आधारलेले होते. मृत्यूनंतर प्रेतावर कांहीं संस्कार केले जात व नंतर तें प्रेत ताटीवर ठेवून स्मशानांत नेलें जाई व तेथें विधिमंत्रपूर्वक त्याचें दहन होई. प्रेतदहन ही सर्वसामान्य पद्धत असली तरी संन्यासी व दोन वर्षांखालील मुलें यांचीं प्रेतें पुरीत असत. प्रेतदहनानंतर घरीं परतल्यावर मृताचे नातेवाईक अशौच पाळीत. तिसऱ्या किंवा दहाव्या दिवशीं मृताच्या अस्थि गोळा करीत. दरवर्षी 'श्राद्ध' (श्रद्धेनें दिलेलें) करून 'मृतात्म्यास सद्‌गति मिळो' अशी इच्छा व्यक्त केली जात असे. मृत्यूनंतर एक वर्षानें 'सपिंडीकरण' नांवाचा विधि केला जाई व या विधीनंतरच मृताला इतर पितरांमध्यें स्थान मिळे अशी समजूत असे. पितृपूजेची द्योतक अशीं इतरही अनेक श्राद्धें वेळोवेळीं करीत.

ब्राह्मणकालीन आर्थिक परिस्थिति :

आपण पांचव्या प्रकरणांत पाहिलें कीं, ऋग्वेदकाळीं शेती हा सर्व अर्थव्यवहाराचा पाया होता. हीच परिस्थिति ब्राह्मणकालींही कायम होती. ग्रामीण जनता शेती, पशुपालन इत्यादि व्यवसाय करी. नांगरटीच्या पद्धतींत या वेळेपर्यंत बऱ्याच सुधारणा झाल्या होत्या. नांगराचा अगडबंब आकार बदलून तो सुटसुटीत केला गेला. पिकांच्या वाढीसाठीं खतांचा उपयोग केला जाऊं लागला. गहूं, जव, तांदूळ, तीळ, वाटाणे व इतर तेलबिया, कापूस, ऊस, विविध फळें व भाज्या हीं मुख्य पिकें असत. शेतीचा धंदा वैश्यांच्या हातांत असे व शूद्र हे शेतावर व घरीं कष्ट करीत.

औद्योगिक क्षेत्रांत व लहानसहान उद्योगधंदे आणि व्यापारउदीम या क्षेत्रांत या काळीं बरीच प्रगति झाली होती. यजुर्वेदांत प्रतीकात्मक नरमेधाचे वेळीं जमणाऱ्या शिल्पकार, कलाकार यांची एक मोठी जंत्री दिली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. त्यांत पारधी, कोळी, पशुपालक, रथकाम, धातुकाम करणारे. धोबी, दोऱ्या वळणारे, रंगारी, विणकर, कुंभार इत्यादींचें वर्णन आहे. या यज्ञप्रसंगानें सर्व समाज एकत्रित केला गेल्यामुळें समाजाचा एक विशाल चित्रपट या वेळीं दिसत असे. हे लहानसहान औद्योगिक व्यवसाय संकर जातींत निर्माण झालेल्या लोकांकडून केले जात. आंतरवर्णीय विवाहामुळें अशा लहानसहान अनेक जाति निर्माण झाल्या होत्या.

व्यापार-उदीम विशेषत: 'वणिक्' लोकांच्या हातांत असे. धान्य, कापड, भांडीं, जवाहीर इत्यादींचा व्यापार ते करीत. या व्यापाऱ्यांचे संघ असत व या संघावरच्या अधिकाऱ्यास 'श्रेष्ठिन्' असें म्हणत. सावकारी, व्याज-बट्टा यासंबंधीं कायद्याचे नियम ठरविले गेले होते. वस्तूंच्या किंमतीवर राज्य-संस्थेची देखरेख असे व त्यांत वेळोवेळीं चढउतार होत असे. मालाच्या बाबतींत भेसळ करणें, लांडीलबाडी करणें यावर कडक उपाययोजना केली जाई. व्यापाऱ्यांच्या नफ्याच्या प्रमाणांत त्यांच्याकडून कर घेतला जाई.

ऋग्वेदकालीन विनिमयाची पद्धत या काळांत पार नाहींशी होऊन कांहीं विशिष्ट नाणीं प्रचारांत आलीं होतीं. आतां निष्क ह्या सोन्याच्या नाण्याचें निश्चित स्वरूप ठरलें गेलें. ३२० रती सोनें या नाण्यांत असे. शतमान या नाण्याची किंमत १०० कृष्णाल इतकी होती. आतां विविध प्रकारचे धातू प्रचारांत आले होते. ऋग्वेदकालीं सोनें व अयस् हे धातु प्रचारांत होते. आतां चांदी, कथील व जस्त यांचाही वापर होऊं लागला व त्यांचीं विविध नक्षीकामाचीं भांडीं बनूं लागलीं. कृष्णायस् (लोखंड) व ताम्रायस् (तांबें) हा फरक स्पष्ट झाला. भाला, तलवारी इत्यादि शस्त्रास्त्रांसाठीं या धातूंचा उपयोग होई. शिल्पकारांचीं उपकरणीं याच धातूंपासून करीत.

कला व शास्त्रें :

ऋग्वेदकालांत काव्यशास्त्र प्रगत झालें होतें, पण ब्राह्मणयुगांत तें मागें पडलें असावें. कारण, प्राचीन ब्राह्मणग्रंथांत कांहीं अवतरणात्मक गाथाच फक्त काव्यांत आहेत. आख्यान, इतिहास व पुराणें हे ग्रंथ पोवाडेवजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असून ते ' गाथा ' व ' नाराशंसी ' विभागांत मोडतात. ' सुपर्णाध्याय ' हें एवढेंच एक नांव घेण्यासारखें कथासंग्रहरूप काव्य या कालांत झालें. मात्र महाकाव्यांतील आख्यानें व कथा यांसाठीं भरपूर खाद्य या कालांत तयार झालें. ब्राह्मणग्रंथांत शुन:शेपाख्यानासारख्या गद्यपद्यमिश्रित कथा भरपूर आहेत. या कथा म्हणजे जागतिक कथावाङ्मयाचें उगमस्थानच होत.

लेखनकला प्रगत होत होती पण तिला फारसें उत्तेजन दिलें जात नसे. गुरुशिष्य व पितापुत्र यांमध्यें मौखिक पद्धतीनें विद्यादान होत असे. ब्राह्मणग्रंथामध्यें ' अक्षर ' या कल्पनेसाठीं ' वर्ण ' हा शब्द उपयोजिला जात असे; यावरून लिहिण्यासाठीं एखादा विशिष्ट रंग (वर्ण) त्याकाळीं वापरीत असावेत. संगीतशास्त्राला बरेंच उत्तेजन मिळत असे. कांहीं वैदिक पुरोहित ऋग्वेदांतील ऋचा विशिष्ट रागांत व तालांत म्हणत. यालाच ' सामगान ' असें नांव होतें. धंदेवाईक गवयाला 'मगध' ही संज्ञा होती. काव्यमय आख्यानांचें गायन करणाऱ्यांना ' गाथिनः ' असें म्हणत. मृदंग व मुरली हीं वाद्यें प्रचारांत आलीं होतीं. शिल्पकला, बांधकाम, भांडीं तयार करणें, चित्रकला यांचा प्रत्यक्ष उल्लेख नसला तरी त्या कला प्रचारांत असाव्यात असें वाटतें. नृत्य व अभिनय यांची या कालांत बरीच प्रगति झाली होती; कारण, धार्मिक विधींमध्यें देव आणि पुरोहित यांचेंही वर्णन त्या कलांचें ज्ञान त्यांना असावें असें सुचवितें.

ध्वनिशास्त्र, व्याकरणशास्त्र, छंदःशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र हीं शास्त्रें वेदाध्ययनाच्या अनुषंगानें प्रगत होत होतीं. गणितशास्त्र व भूमितिशास्त्र यांची प्रगति शुल्बसूत्रांत दृष्टीस पडते. महत्त्वमापनाचे नियम, वेदीची रचना व अग्निकुंडाची रचना यांची माहिती या ग्रंथांत आहे. शुल्ब याचा अर्थ मोजण्याची काठी. शास्त्रांच्या इतिहासाच्या दृष्टीनें भारतीय भूमितीवरचे हे अतिप्राचीन ग्रंथ फार महत्त्वाचे आहेत. ज्योतिषशास्त्रांत तर विशेष प्रगति झाली होती. ऋग्वेदकालांत अधिक मासाचा उल्लेख होता, तर आतां या कालांत पांच वर्षांनीं एक ' अधिक मास ' असा बदल होऊन ऋतुमान व वर्षें यांचा मेळ बसविला गेला. वर्षांतील बारा महिने हे सहा ऋतूंमध्यें समसमान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विभागले गेले. आकाशाचें मोजमाप चंद्राच्या २७ नक्षत्रांतील भ्रमणावर ठरूं लागलें. बारा महिन्यांना नक्षत्रांचीं नांवें मिळालीं.

वैद्यकशास्त्र व शस्त्रवैद्यक या शास्त्रांतही प्रगतीचीं पाउलें पडत होतीं. अनेक रोगांचीं माहिती व त्यांवरील उपचार ह्यासंबंधींचे उल्लेख आढळतात. विविध ज्वर, आमांश, कावीळ, गळू, ओकाऱ्या, संधिवात, महारोग, यांचें त्यावेळीं ज्ञान असे. डोळ्यांचे निरनिराळे विकार माहीत होते. धंदेवाईक वैद्य हे सर्व पुरोहित होते. जादूटोणा व वनस्पतींचा उपयोग हे रोग बरे करण्याचे उपाय असत. प्राचीनकालीं यज्ञांत पशु मारले जात, त्यामुळें प्राणिशरिराचें ज्ञान व शस्त्रवैद्यककला हीं वाढीस लागलीं. सर्पविद्या शास्त्रांत सर्पाविषयींचें ज्ञान व त्याच्या विषावर तोडगे सांगितलें आहेत.

धर्मकल्पना :

ब्राह्मणकालांत धर्मकल्पनांत खूपच फरक पडला होता. ऋग्वेदकालीन अग्निपूजेनें आतां यज्ञाचें व सत्रांचें भव्य स्वरूप धारण केलें होतें. प्रार्थनांनीं देवतांना संतुष्ट करून त्यांच्या कृपेनें इहपर सुखोपभोग मिळवावा ही कल्पना आतां मागें पडली. यज्ञविधीला महत्त्व प्राप्त होऊन त्याचा विस्तार होत गेला. ऋग्वेदकालीन देवता अद्यापही प्रचारांत होत्या. परंतु भक्तांच्या इच्छा पूर्ण करण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत आहे हें लोकांस आतां पटेनासें झालें. यज्ञामुळें देवांना तें सामर्थ्य प्राप्त होतें; इतकेंच नव्हे, तर देवांनाही यज्ञ करावे लागतात. विश्वोत्पत्ति करण्यासाठीं प्रजापतीनें यज्ञ केला. देवांनीं यज्ञ केल्यामुळें इंद्र वृत्रासुराला मारूं शकला अशा कल्पना रूढ झाल्या. यज्ञ हीच सर्वश्रेष्ठ शक्ति असून यज्ञामुळें यजमानाला अपूर्व सामर्थ्य प्राप्त होतें, व त्या सामर्थ्याच्या जोरावर तो देवांकडून आपल्या इच्छा पूर्ण करवून घेऊं शकतो. त्यामुळें यथाविधि यज्ञाची पूर्तता करण्यास महत्त्व प्राप्त झालें. यज्ञविधींत थोडीशीही चूक झाली तरी त्याचे विपरीत परिणाम यजमानास भोगावे लागतात. त्यामुळें यज्ञकर्म हें पुरोहितावांचून करणें अशक्य झालें. ब्राह्मण पुरोहितांच्या हातीं यामुळें एक मोठेंच शस्त्र आलें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व तें स्वतांला भूदेव म्हणवून घेऊं लागले. यजमानाच्या इच्छा यज्ञ यथाविधि करून पूर्ण करणें हें आंतां पुरोहिताच्या हातांत होतें. विपुल दक्षिणा देऊन त्यांना संतुष्ट करावें तेव्हां कोठें यज्ञाचें फळ यजमानास प्राप्त होई. त्यामुळें यज्ञ ही मोठ्या खर्चाची बाब होऊन सामान्य माणसाच्या आटोक्याबाहेर गेली.

यज्ञाच्या वाढत्या महत्त्वाबरोबरच यज्ञांतील मंत्रांनाही महत्त्व आलें. कारण, त्या मंत्रांमध्येंच अशी अतिमानुषशक्ति आहे कीं, ज्यायोगें मानवाला निसर्ग व देवता यांवर आपला प्रभाव पाडतां येतो. त्या मंत्रांचें सशास्त्र अध्ययन करण्यास महत्त्व येऊन त्यासाठीं सर्व वेळ द्यावा लागे. वेदाध्ययन हा स्वतंत्र व्यवसाय झाला. इतर व्यवसायांप्रमाणेंच तोहि वंशपरंपरेनेंच चाले, व त्यामुळें यज्ञकर्म करणारा पुरोहित वर्ग समाजांत निर्माण झाला. या पुरोहिताला पूर्वींच्या वसिष्ठादि पुरोहितांप्रमाणें वेदाध्ययन व राजकारण जमेनासे झाले. तथापि, आपल्या मंत्रसामर्थ्याच्या बळावर तो वर्ग आपला उच्च सामाजिक दर्जा टिकवूं शकला.

यज्ञाच्या या महत्त्वामुळें विविध कामनांच्या पूर्तींसाठीं नवनवीन यज्ञ कल्पिले गेले, व यज्ञसंस्था विशाल पण गुंतागुंतीची बनली. यज्ञांचें नित्य, नैमित्तिक व काम्य असे तीन प्रकार करण्यांत येतात. यांपैकीं नित्य व नैमित्तिक हे आवश्यक असून काम्ययाग त्या त्या इच्छापूर्तीसाठीं करावयाचे असतात. विवाहाबरोबरच प्रत्येक गृहस्थानें अग्न्याधान करून आहिताग्नि बनावयाचें असतें. घरामध्यें गार्हपत्य अग्नीची स्थापना करून त्यांत सांजसकाळ होम करावयाचा असतो. एकदां पेटविलेला अग्नि गृहस्थाच्या घरांत सतत कायम राखला पाहिजे. याखेरीज दक्षिण व आहवनीय हे अग्नि ठेवून त्यामध्यें प्रतिपदा व पौर्णिमा असा महिन्यांतून दोनदां दर्शपूर्णमास याग करावा. याखेरीज अग्रयणादि नैमित्तिक इष्टि गृहस्थानें केली पाहिजे. याखेरीज विविध कारणांसाठीं मोठाले श्रौतयज्ञ सांगितले आहेत. त्यांपैकीं अश्वमेध, पुरुषमेध इत्यादि कांहीं पशुयज्ञ असून वाजपेय, राजसूय, ज्योतिष्टोम इत्यादि कांहीं सोमयज्ञ आहेत. राजसूय व अश्वमेध हे साम्राज्य व राजैश्वर्य यांच्या प्राप्तीसाठीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षत्रियानें करावयाचे यज्ञ आहेत. स्वर्गप्राप्तीची इच्छा असणाऱ्यानें ज्योतिष्टोम करावयाचा असतो. अग्निचयन नांवाचा यज्ञवेदी बांधण्याचा एक विस्तृत यज्ञविधि सांगितला असून त्यामध्यें प्रतीकरूपानें विश्व व सृष्टिकर्ता प्रजापति हे एकच असल्याचें दाखविलें आहे. हे यज्ञविधि एक दिवसापासून एक वर्षपर्यंत चालणारेही असत. ते करण्यासाठीं अनेक पुरोहितांची मदत लागे व त्यांना खर्चही बराच येई.

यज्ञाच्या महत्त्वामुळें जुन्या देवतांचें महत्त्व कमी झालें व यज्ञाशीं संबंधित अशा सर्व गोष्टींना महत्त्व आलें. यज्ञीय पात्रांच्या अधिष्ठात्री देवता कल्पिण्यांत आल्या. यज्ञांतील स्रुवा, जुहु, चमस, दर्वी इत्यादींना देवता म्हणून संबोधण्यांत येऊं लागलें. तसेंच ऋग्वेदांतील इन्द्रवरुणांचें महत्त्व प्रजापति या नवीन देवतेस आलें. कारण, यज्ञ व प्रजापति यांचें ऐक्य कल्पिण्यांत आलें (यज्ञो वै प्रजापतिः ।) ही प्रजापति देवता ब्राह्मणकालाची वैशिष्ट्यबोधक देवता आहे. यज्ञामध्यें तंत्राला महत्त्व चढलें. जादूटोणा व मंत्रतंत्र यांचाही या कर्मकांडांत सर्रास उपयोग केला जात असे.

या यज्ञधर्मामुळें गृहस्थाश्रम हा प्रत्येकास आवश्यक झाला. कारण, गृहस्थालाच यज्ञकर्म करण्याचा अधिकार असे. विधुरावस्था प्राप्त झाल्यास दुसरें लग्न करून माणसानें आजन्म अग्निहोत्र चालू ठेवावें असा आदेश ब्राह्मणग्रंथांतून दिला गेला. या कर्मकांडाचें साध्य ऐहिक व पारलौकिक सुखोपभोग मिळविणें हें होतें.

याप्रमाणें यज्ञसंस्था जरी समाजांतील वरच्या वर्गाच्या लोकांच्या धर्माचें प्रतीक बनली, तरी सर्वसामान्य जनतेला तिच्याबद्दल आस्था वाटावी असें तिच्यांत कांहींही नव्हतें. अर्थशून्य बडबड व भावनाशून्य क्रिया हेंच तिचें स्वरूप होतें. त्यामुळें लोकांच्या भावनेला आकृष्ट करतील, त्यांच्या रोजच्या जीवनांत समरस होतील अशा नवीन देवता लोकप्रिय होण्याच्या मार्गावर होत्या. ऋग्वेदांतील रुद्र हा गौण देवता आतां शिव-महादेव या नवीन स्वरूपांत पुढें आली. ब्राह्मणकालीन सांस्कृतिक विनिमयांत अनार्यांच्या अनेक देवता व उपासना प्रकार आर्यांच्यामध्यें रूढ होऊं लागले. शिवो-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पासना ही त्यापैकीं होय. आर्य-अनार्यांच्या या संस्कृतिसंगमांत अनार्य शिव वैदिक रुद्राशीं एकरूप होऊन पावन झाला. अनार्यांच्या कल्पनांना आर्यसंस्कृतीचीं पुटें देऊन त्यांचें उदात्तीकरण करावयाचें व मग त्या आत्मसात् करावयाच्या हेंच या संस्कृतिसंगमाचें स्वरूप आहे. त्याचप्रमाणें विष्णु या देवतेला आतां प्राधान्य मिळालें. ब्राह्मणग्रंथांतून विष्णूचा यज्ञाशीं अभेद वर्णिला आहे. कांहीं अनार्य उपासनाही यास कारणीभूत असावी.

बहुजनसमाजाच्या धर्माचें स्वरूप या कर्मकांडापेक्षां निराळेंच होतें. भूत-प्रेत-पिशाचादि सत्त्वांच्या अस्तित्वावर त्यांचा विश्वास असे. शकुनापशकुन, जादूटोणा, भूतबाधा वगैरे गोष्टींमुळें त्यांच्या जीवनांत भीति निर्माण होई, व त्यांची शांति करण्यासाठीं मंत्रतंत्र, अभिचार, जादूटोणा, बलिदान इत्यादि प्रकार चालत. वृक्षपूजा, भूतपूजा, सर्पपूजा इत्यादि प्रकारही चालत.

तत्त्वज्ञान :

कर्मकांडाची याप्रमाणें भरभराट होत असतांनाच समाजांत त्याविरुद्ध प्रतिक्रिया निर्माण होऊं लागली होती. यज्ञविधि अगदीं यांत्रिक व निर्जीव होऊं लागले होते. यजमानाच्या श्रद्धापूर्ण भावनेपेक्षां त्याच्या बाह्य क्रियांनाच अधिक महत्त्व आलें होतें. त्यामुळें विधींतील थोड्याशाही चुकीनें विपरीत फल प्राप्त होई. यामुळें त्रासून जाऊन एक वैदिक ऋषि विचारतो कीं, आम्ही यज्ञ कशासाठीं करावयाचे ? जे यज्ञ करतात तेसुद्धां दुःख पावतात; पण जे यज्ञ करीतच नाहींत ते मात्र सुखांत असतात. शिवाय, यज्ञामुळें प्राप्त होणारें ऐहिक सुखोपभोग व स्वर्ग हे शाश्वत सुखाचा लाभ करून देत नाहींत. यज्ञामुळें प्राप्त झालेलें पुण्य क्षीण झाल्यावर पुनरपि या दुःखी संसारांत पडावेंच लागतें. त्यामुळें शाश्वत सुखप्राप्तीच्या मार्गाकडे विचारवंतांचें लक्ष लागलें. यज्ञकर्मांत होणारी हिंसा, पुरोहित वर्गाचें औद्धत्य याविरुद्धही प्रतिक्रिया होऊं लागली. या सर्वांचा परिपाक उपनिषदांतील सुंदर तत्त्व-ज्ञानांत झाला.

या ब्रह्मजिज्ञासेची पकड भारतीय मनावर त्यावेळीं इतकी बसली होती कीं, त्यांत याज्ञवल्क्य, श्वेतकेतु, शांडिल्य इत्यादि ब्राह्मणांबरोबर अश्वपति

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केकय, प्रवाहण जैवली, जनक वैदेह इत्यादि क्षत्रिय राजे, गार्गी वाचक्नवी, सुलभा, मैत्रेयी इत्यादि स्त्रिया, कवश ऐलूष, गाडीवान रैक्व, सत्यकाम जाबाल इत्यादि हीनवर्णीय अशी सर्व थरांतील मंडळी या झंझावातांत ओढली गेली. या ज्ञानाच्या पवित्र क्षेत्रांत ब्राह्मण–अब्राह्मण हा भेद राहिला नाहीं. गौतम ब्राह्मण विनयानें प्रवाहण राजाचा शिष्य बनला, तर जनश्रुति राजा आत्मज्ञान देण्यासाठीं रैक्व या अब्राह्मण गाडीवानाची याचना करूं लागला.

उपनिषद् याचा शब्दार्थ ज्ञानार्जनासाठीं गुरूजवळ बसणें असा आहे. अशा वेळीं गुरूनें शिकविलेली गुह्य विद्या म्हणजेच उपनिषद्. या विद्येतून मानवी मतीला गुंग करणाऱ्या गहन तत्त्वज्ञानाचा उहापोह केलेला आहे. विश्व, ईश्वर व मानव यांचें स्वरूप व परस्परसंबंध यांचा विचार त्यांत आहे. कोणतेंही विशिष्ट तत्त्वज्ञान शिकविण्यासाठीं उपनिषदें रचलेलीं असून शाश्वत विश्वसत्याचा शोध करण्याचा भारतीयांनीं केलेला आर्त प्रयत्न व त्यांतून स्फुरलेले हृदयस्पर्शी ओजस्वी विचार उपनिषदांत ग्रथित केलेले आहेत.

मानवाचा विचार करतां शरीर, इंद्रियें, प्राण हे सर्व नश्वर असून त्यापलीकडे आत्मा हें शाश्वत तत्त्व आहे. तो अमर असून चैतन्यमय आहे. अज्ञानाच्या उपाधीनें तो कर्मबंधांत अडकतो व जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत सांपडतो. प्रत्येकाला आपापल्या कर्मानुसार सुखदुःखें भोगावीं लागतात. विश्वाकडे पाहिल्यास त्यांत आढळणारें नानात्व याच्या बुडाशीं ब्रह्म नांवाचें शाश्वत तत्त्व आहे. त्या ब्रह्मापासून विश्वोत्पत्ति होते व त्यांतच हें विश्व शेवटीं विलीन होतें. आत्मा व ब्रह्म एकच आहे हा औपनिषदिक तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. (ऐतदात्म्यमिदं सर्वम् ।) ‘ तत्त्वमसि ’ (तें ब्रह्मतत्त्व तूंच आहेस) असा आरुणीनें श्वेतकेतूला उपदेश केला आहे. ब्रह्मन् म्हणजेच आत्मन् सच्चिदानंदस्वरूपी आहे. हें एकत्वाचें ज्ञान झालें म्हणजे कर्मबंध नष्ट होतात व मुक्ति मिळते. (विद्ययाऽमृतमश्नुते ।) (ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति ।) हें ज्ञान संसारांत राहून होत नाहीं. त्यासाठीं सर्वसंगपरित्याग करून त्या आत्म्याचेंच मनन–निदिध्यासन केलें म्हणजे आत्मसाक्षात्कार होतो. मोक्षप्राप्ति हेंच प्रत्येकाचें अंतिम व इष्ट ध्येय आहे.

जोंपर्यंत हें ज्ञान प्राप्त होत नाहीं तोंपर्यंत माणूस संसारचक्रांत फिरत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहतो. मृत्यूनें जीवाचा अंत होत नसून कर्माप्रमाणें तो दुसऱ्या देहांत उत्क्रांत होतो. ज्यानें पुण्यकर्म केलें असेल त्याला चांगल्या योनींत जन्म प्राप्त होतो. ज्यानें दुष्कर्म केलें असेल त्यास पापयोनींत जन्म मिळतो. (पुण्येन वै कर्मणा पुण्यो भवति पापः पापेन ।) ज्ञानप्राप्तीसाठीं यज्ञकांड निरुपयोगी आहे. (प्लवा ह्येते अदृढा यज्ञरूपाः ।) उपनिषदांतून सदाचार, आत्मसंयम, दानधर्म, विनय इत्यादि सद्‌गुणांचा उपदेश केलेला आढळतो. पण एकंदरींत ऐहिक जीवनाबद्दल उपनिषदांतून तुच्छताबुद्धि आढळते. कारण, ऐहिक जीवनानें अमरत्वाची, शाश्वत सुखाची, मोक्षाची प्राप्ति कधींच होणार नाहीं. हें जाणूनच कठोपनिषदांत नचिकेतानें सर्व ऐहिक सुखें नाकारून आत्मज्ञान देण्यासाठीं यमाजवळ आग्रह धरला.

सर्व भारतीय तत्त्वज्ञानाचा उपनिषदें हा पाया आहे. जीवनाचें कोडें उलगडण्याचा अत्यंत प्रांजळ व जिज्ञासू प्रयत्न उपनिषदांमध्यें केलेला आहे. अद्वैतवाद हेंच जर आजच्या युगाचें तत्त्वज्ञान असेल, तर तीन हजार वर्षांपूर्वी भारतीयांनीं हेंच तत्त्वज्ञान मांडलें होतें, व या अद्वैतवादापलीकडे अजूनही शास्त्रज्ञांना जातां आलें नाहीं. उपनिषदें हा भारतानें जगाला दिलेला अमोलिक ठेवा आहे.

ब्राह्मणयुगाची कालमर्यादा :

ऋग्वेदकालाप्रमाणेंच ब्राह्मणकालाची किंवा ब्राह्मणयुगाची कालमर्यादा ही त्यावेळचें वाङ्मय, सामाजिक व धार्मिक क्षेत्रांतील प्रगति या गोष्टी विचारांत घेऊन मगच ठरवाव्या लागतील. या कालाची प्राचीनांत प्राचीन मर्यादा खि. पू. १२०० ही ठरवितां येईल; कारण, यानंतर झालेल्या वेदवाङ्मयांत ऋग्वेद व तत्कालीन संस्कृति यांचा उल्लेख आढळतो. अलीकडील मर्यादा खि. पू. ६०० ही ठरविली आहे; कारण, बौद्धधर्म हा ब्राह्मणधर्माच्या अस्तित्वाचा पाया गृहीत धरतो. सहाशें वर्षांच्या या प्रदीर्घ काळांत ब्राह्मणकालीन संस्था, धर्म, तत्त्वज्ञान, भाषा व वाङ्मय यांची भरभराट होती. ब्राह्मणयुग वैभवाच्या शिखरावर असतांनाच बौद्धधर्माचा उदय झाला; कारण, या वैभवाच्या काळींच त्यांच्या दुर्बलतेचीं, अधोगतीचीं, परस्परकलहाचीं बीजें ब्राह्मणकालांत पेरलीं गेलीं होतीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण सातवें

आर्ष काल

सर्व भारतीय वाङ्मयाचा उगम वेदांत शोधणें हें आतां ठरून गेलें आहे. महाकाव्येंहीं त्याला अपवाद नाहींत. ऋग्वेदांतील संवादसूक्तांत महाकाव्याचीं बीजें सांपडतात. ब्राह्मण ग्रंथांतील गाथा व नाराशंसी यांनींही महाकाव्यांना भरपूर वाङ्मय पुरविलें आहे. रामायण व महाभारत या महाकाव्यांची बांधणी अशीच वर्षांनुवर्षें होत आली असली पाहिजे. वैदिक वाङ्मय हें पुरोहित वर्गानें निर्माण केलेलें, तर महाकाव्यें हीं 'सूत' नांवाच्या भाटांनीं निर्माण केलेलीं आहेत. रामायणांत लव व कुश हे रामाचे मुलगे रामचरित्राचें गान करीत हिंडत असल्याचा उल्लेख आहे, तर महाभारतांत संजय हा सूतच धृतराष्ट्राला युद्धाची हकीकत सांगत आहे. परंतु हीं दोन्ही महाकाव्यें त्यांच्या मूळ स्वरूपांत आपणांस मिळालीं नसून त्यांत वेळोवेळीं भर पडत गेली आहे. त्यामुळें धर्म, तत्त्वज्ञान, नीतितत्त्वें यांचे ते सांस्कृतिक ज्ञानकोशच बनले आहेत.

रामायण :

रामायण हें एक आर्ष महाकाव्य आहे. आर्ष म्हणजे ऋषिप्रणीत. आर्षग्रंथ प्रमाण मानण्याची पद्धत असते, याचें कारण ग्रंथकार ऋषि हा प्राचीन नियमांचा प्रवर्तक असतो. कवि वाल्मीकीनें इतिहास म्हणूनच हें काव्य लिहिलें व स्वतः राम राज्यावर असतांनाच लिहिलें. काल्पनिक कथा म्हणून रामायण लिहिलें असतें तर लेखकानें तें प्रथमच सांगितलें असतें. रामायणांत वर्णिलेलीं स्थळें, प्रांत, पर्वत व नद्या, कित्येक त्या तर कित्येक दुसऱ्या नांवानें अद्यापि आहेत. रामाच्या राहण्यामुळें कित्येक स्थलांना पावित्र्य आलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामायणांत वर्णिलेल्या गोष्टी नेमक्या केव्हां घडल्या हें सांगणें कठिण आहे. रामायणकथेचा अंतर्भाव खुद्द महाभारतांत एक उपाख्यान म्हणून केला आहे. त्यावरून सौतीच्या पूर्वीं बराच काल ही कथा प्रचलित असावी. रामायणांत कुलपरंपरेला सर्वश्रेष्ठ मानीत, तर महाभारतांत राष्ट्र व समाज या कल्पनांचा ऊहापोह केला आहे. यामुळें महाभारताचा काल जर खि. पू. ३०३१ असेल तर रामाचा काल याच्या पूर्वींचा असला पाहिजे.

या घटना घडल्यानंतर जवळ जवळ तीन हजार वर्षांनीं त्या लिहून काढल्या असाव्यात. कारण, बुद्ध आणि मनु यांचा उल्लेख रामायणांत येतो. इ. सनाच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शतकांत रामायणाचें लेखन पुरें झालें असावें असें कांहीं विद्वानांचें मत आहे.

सध्यां उपलब्ध असलेलें रामायण जसेंच्या तसें एकट्या वाल्मीकीनेंच लिहिलें असावें असें म्हणवत नाहीं. यांत बराच भाग प्रक्षिप्त म्हणजे मागाहून घुसडलेला असावा. सीतात्यागानंतर सीता बारा वर्षेंपर्यंत वाल्मीकीच्या आश्रमांत होती. त्यावेळीं तिची हकीकत ऐकून वाल्मीकीला हें महाकाव्य स्फुरलें असावें.

रामायणाची कथावस्तु :

दशरथाला म्हातारपणीं राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न असे चार मुलगे झाले. जनक राजाची मुलगी सीता इजबरोबर रामाचा विवाह झाला. रामाला राज्याभिषेक होण्याच्या प्रसंगीं भरताची आई–रामाची सावत्र आई–कैकेयी हिनें मंथरा दासीच्या सांगण्यावरून दशरथानें तिला पूर्वीं देऊं केलेले वर मागितले. रामाला चौदा वर्षें वनवास व भरताला अयोध्येचें राज्य अशा दोन गोष्टी तिनें दशरथाजवळ मागितल्या. बापाचें वचन पाळण्यासाठीं राम वनवासाला गेला व त्याच्याबरोबर सीता व लक्ष्मण हींही गेलीं. या गोष्टीचा भरताला राग येऊन तो रामाला परत आणण्यासाठीं वनांत गेला. रामानें दिलेल्या पादुका सिंहासनावर ठेवून भरतानें चौदा वर्षें राज्यकारभार पाहिला. लंकेचा राजा रावण यानें कपटानें संधि साधून सीतेला पळवून नेलें. वानरांचें साहाय्य घेऊन रामानें लंकेवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वारी केली व रावणास ठार मारून सीतेसह तो पुन्हा अयोध्येस येऊन राज्य करूं लागला. सीतेविषयींचा लोकापवाद ऐकून रामानें तिला तपोवनांत सोडलें. तेथेंच तिला लव व कुश असे जुळे मुलगे झाले. वाल्मीकीनें त्यांना शिक्षण देऊन तरबेज केलें. या दोघांनीं रामाच्या अश्वमेध यज्ञाला अटकाव केल्यामुळें रामाची व त्यांची ओळख पटली. सीतेनें मात्र आपलें विशुद्ध चारित्र्य सिद्ध करण्यासाठीं धरणी दुभंग करवून तींत ती अदृश्य झाली.

रामायणाचें सांस्कृतिक महत्त्व :

आम्हां भारतीयांचें भाग्य थोर म्हणून रामायणासारखा ग्रंथ आमच्या देशांत निर्माण झाला. चरित्राचें पावित्र्य, विचारगांभीर्य, उदात्त ध्येय, वर्णनांतील वैविध्य, रमणीयता व विस्तार या गुणांनीं युक्त असलेलें दुसरें काव्य जागतिक वाङ्मयक्षभारांत सांपडणें कठिण आहे. सदाचरणानें या जगांत ज्यांना कीर्ति प्राप्त झाली आहे, अशा सत्पुरुषांचीं चरित्रें लोकांपुढें मांडून त्यांना शिक्षण देणें हा महर्षि वाल्मीकींचा हें काव्य लिहिण्यांतील हेतु असावा. प्रजापालनतत्पर राजा, उत्कृष्ट योद्धा, खरा कर्मयोगी, संकटकालींही निर्भय राहाणारा, निःस्वार्थी, साधु पुरुष इत्यादि सद्‌गुणांनीं युक्त असलेलें रामचरित्र जगांत अनुपमेय आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

'रामराज्य' या शब्दाचा अर्थ 'उत्कृष्ट राज्य' असा होऊन बसला आहे. 'ज्या ठिकाणीं राम हा राजा नाहीं तें राष्ट्र नव्हे; परंतु तो ज्या ठिकाणीं राहील तें जरी अरण्य असलें तरी तें राष्ट्र होईल' असें वर्णन वसिष्ठांनीं केलें आहे. वैयक्तिक सद्‌गुणांचे सर्वोत्कृष्ट आदर्श वाचकांपुढें ठेवणें हें वाल्मीकीऋषींचें उद्दिष्ट असल्यामुळें, त्यांनीं रामायणांतील एकेक व्यक्ति एकेका सद्‌गुणाची पराकाष्ठा दर्शविणारी दाखविली आहे. रामाचा धीरोदात्त एकवचनीपणा, सीतेची अढळ पतिनिष्ठा, लक्ष्मणाचें अलोट बंधुप्रेम, भरताचा निःसीम स्वार्थत्याग, मारुतीची स्वामिनिष्ठा ह्या वैयक्तिक सद्‌गुणांच्या परम सीमा आहेत. रामायणाचें हें सांस्कृतिक महत्त्व लक्षांत घेत ां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'आदिकाव्य हें रामायण' किंवा 'नाना सकाम कथा सृष्टीवरी । राम कथेची न पावती सरी ॥' असें गिरिधरस्वामींनीं जें म्हटलें आहे तें यथायोग्य आहे असेंच वाटतें. जगांतील सर्व प्रमुख भाषांत रामायणाचीं भाषांतरें झालीं आहेत. प्रो. विल्यम म्हणतात, 'संस्कृत साहित्यांतील रामायण हा एक अद्वितीय हिरा आहे. कोणत्याही कालीं व स्थलीं एवढें सुंदर काव्य पाहावयास सांपडणार नाहीं.'

रामायणकालीन राजकीय परिस्थिति :

अयोध्येची राज्यव्यवस्था ही खरीखुरी राजप्रजासत्ताक होती. कोणतीही महत्त्वाची गोष्ट करण्याआधीं प्रजेला तिचें अगोदर निवेदन करणें हें राजाचें कर्तव्य असे. रामाला यौवराज्याभिषेक करतांना दशरथानें अशी परिषद् बोलाविल्याचा उल्लेख आहे. या परिषदेंत लोकनायक असत. त्यामुळें प्रजेचा राजसत्तेवर दाब असे. प्रजानुरंजन हें राजाचें प्रमुख ध्येय असे. "ज्याप्रमाणें आपल्या भावांशीं आपण वागतां त्याप्रमाणें आपल्या प्रजांशीं सदोदित वागणें हा आपला धर्म आहे" असा निरोप सीतेनें रामाला पाठविला आहे अरण्यांतही प्रजापालनाचें कर्तव्य रामानें सोडलें नव्हतें. राजा व प्रजा यांमधील परस्परप्रेमाचे सूचक असे प्रसंग रामाच्या वनवासप्रसंगीं आढळून येतात.

अराजक राष्ट्र हें त्यावेळीं अनर्थपूर्ण व अमंगल मानलें जात असे हें जरी खरें असलें, तरी राजाला पदच्युत करण्याचा अधिकार प्रजेला होता. राजाच्या पश्चात् त्याच्या वडील मुलाकडे राज्य जात असे. पतीच्या पाठीमागें स्त्रीलाही हे अधिकार त्यावेळीं प्राप्त होत असावेत असें दिसतें; कारण, सीता वनांत जाण्यास निघाली असतां वसिष्ठ म्हणतात, "सीतेनें वनांत जाण्याचें कारण नाहीं. रामाचें प्रकृत आसन सीता घेईल."

रामायणकालीं गंगायमुना खोऱ्यांत अनेक लहान लहान राज्यें होतीं. या राज्यांतील संबंध त्या काळीं सलोख्याचे होते. या सुमारास विंध्य पर्वत ओलांडून आर्य दक्षिणेकडे सरकूं लागले होते. राम दंडकारण्यांत म्हणजे दक्षिण हिंदुस्थानांतच आला होता. रावणवध हें आर्यांच्या दक्षिणदिग्वि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जयाचें प्रतीक आहे. राम इकडे येण्याच्या आधीं अगस्तीनें इकडील वाट शोधून आश्रम स्थापन केला होता. अनार्यांना आर्यांच्या या नवीन वसाहतींचें कार्य सहन होईना म्हणून ते ऋषींना त्रास देत असत. दक्षिणेंतील बहुतेक भाग अरण्यमय असून वानर व राक्षस यांनीं व्यापलेला होता. वानर हे पशु नसून आर्यांपक्षां कमी सुधारलेली एक मानवजात होती. त्याचप्रमाणें राक्षस ही एक अनार्य जात असावी व रावण हा त्यांचा आर्य राजा असावा

चतुरंग सेनेचा निर्देश रामायणांत आहे. मुख्य शस्त्रें बाण, मुद्गर, चक्र, तोमर, गदा, मुसळ, शूल हीं होतीं. अस्त्रांचेही उल्लेख असून तीं ते विविध मंत्रांनीं अभिमंत्रित करून सोडीत. अनेक अस्त्रांचा व दगड फेकण्याच्या यंत्राचाही (गोफण ?) उल्लेख आहे. शतघ्नी नांवाचें एक यंत्र ' लोखंडी, तीक्ष्ण व भयंकर ' म्हणून वर्णिलें आहे.

सामाजिक परिस्थिति :

वर्णव्यवस्थेच्या संरक्षणाचें कार्य राजसत्तेकडेच असल्यामुळें त्यांच्यामध्यें परस्परद्वेषाचा उद्भव झाला नव्हता कांहीं (चांडाळ, निषाद इ.) संकर जातींचा उल्लेख रामायणांत येतो. देवालय व देवागार यांच्या उल्लेखावरून मूर्तिपूजा त्यावेळीं असावी असें वाटतें. गजारोहण, अश्वारोहण, रथचर्या व धनुर्वेद स्थापत्य या शास्त्रांचा उल्लेख आहे. याशिवाय अनेक कारागिरांचे उल्लेख येतात. तुन्नवाय (कोष्टी) यांचा निर्देश असून कापसाचीं व रेशमाचीं बारीक व हलकीं वस्त्रें वापरीत. वाक्या, बाजूबंद नूपुर या स्त्रियांच्या अलंकारांचा उल्लेख येतो. रत्नमाला, हार, हेमसूत्र, रशना व अंगठ्या यांचें वर्णन आहे. निष्क या सोन्याच्या नाण्याचा उल्लेख आला आहे.

नृत्य, गायन, वादन, चित्रकला या कलांत पुरुषांप्रमाणें स्त्रियाही निपुण असत. स्वयंवरपद्धति रूढ होती. अष्टविवाह पद्धतींचा उल्लेख असून ब्राह्मविवाह श्रेष्ठ मानीत. ' पति हा स्त्रियांचा देव आहे ' अशा तऱ्हेचे विचार सीतेनें अनसूयेस सांगितले आहेत. बहुपत्नीत्वाची चाल रूढ असली तरी एकपत्नीत्वाचा गौरव होत असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ज्योतिष, स्वप्न, उत्पात, शकुन, निमित्त, लक्षण, दिव्य इत्यादि गोष्टींवर लोकांचा विश्वास असे. दारू, द्यूत हीं दोन व्यसनें बोकाळलीं होतीं. साखर, मध, द्राक्षें, खजूर, मोहाचीं फुलें यांपासून दारू करीत. द्यूताचा एक निंद्य व्यसन म्हणून उल्लेख आहे

स्त्रियांच्या उदार अंतःकरणाचें चित्र रामायणाइतकें प्राचीन वा अर्वाचीन ग्रंथांत क्वचित् रेखाटलें असेल. रामायणांत सीतेच्या बरोबरीचें पात्र सुमित्रा आहे. स्त्रिया सुशिक्षित होत्या यावरून त्यांच्या शिक्षणाची वेगळी सोय केलेली असावी. पुरुषांप्रमाणें स्त्रियाही वेदाध्ययन करीत असत. गार्गी, सीता, तारा या मंत्रवेत्त्या स्त्रिया होत्या असे उल्लेख आढळतात. शिक्षणाच्या बाबतींत उन्नत स्थिति असूनही स्त्रिया परिषदांतून पुरुषांच्या बरोबरीनें भाग घेत असल्याचें रामायणांत दिसत नाहीं. पतीमागें जिवंत राहाणें अशक्य व अनुचित वाटून स्त्रिया सती जात असत. पोषणाचा स्त्रीवर भर न ठेवण्यांत तिचें चारित्र्य शुद्ध राहावें हाच हेतु होता. स्त्रीची योग्यता कुटुंबांत पुरुषांच्या बरोबरीची आहे आणि म्हणूनच राम वनांत निघतेवेळीं वसिष्ठ ऋषींनीं रामाच्या अभावीं सीतेला राज्याभिषेक करावा अशी कल्पना सुचविली होती.

आजही भौतिकतेच्या शिखरावर आरूढ झालेल्या जगासमोर भारतीयांनीं मान ताठ करून उभे राहाण्यासारखे जे कांहीं अनन्यसामान्य विशेष आहेत त्यांत भारतानें श्रीरामचंद्रासारखा ‘ मर्यादा–पुरुषोत्तम ’ व रामायणासारखा ऊर्जस्वल ग्रंथ यांची निर्मिति केली हा प्रमुख विशेष होय. कर्तव्यासाठीं कर्तव्य, चारित्र्यासाठीं चारित्र्य, नीतिमत्तेसाठीं नीतिमत्ता जेथें असते त्या समाजाचें म्हणजे रामराज्याचें हें सुवर्णचित्र आहे. असा समाज उत्पन्न करावयाचा असेल तर तो कोणत्या पद्धतीनें निर्माण करतां येईल हें महर्षींनीं रामयाणांत स्पष्ट केलें आहे.

महाभारत :

महाभारत हें हिंदूंचें दुसरें एक पूज्य व प्राचीन ‘आर्ष’ महाकाव्य आहे. दोन हजार वर्षांपूर्वींचा हा एक प्रचंड विश्वज्ञानकोशच म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतवर्षांत दुष्यन्तपुत्र भरताचे वंशज धृतराष्ट्र व पंडु असे दोन भाऊ होते. धृतराष्ट्राच्या शंभर पुत्रांना कौरव व पंडूच्या पांच पुत्रांना पांडव असें म्हणत. पंडूच्या मृत्यूनंतर पांडवांना सुईच्या अग्राएवढीदेखील भूमि न देण्याविषयीं कौरवांनीं खटपट केली. त्यासाठीं दुर्योधनानें युधिष्ठिराला द्यूताचें निमंत्रण देऊन लबाडीनें त्याला सर्वस्व हरावयास लावून पांडवांना बारा वर्षे वनवासास व एक वर्ष अज्ञातवासास पाठविलें. तेरा वर्षांनंतर पांडवांनीं आपल्या राज्याची मागणी केली. श्रीकृष्णानें शिष्टाई केली पण त्याचा उपयोग न होऊन कौरव-पांडवांचें तुंबळ युद्ध होऊन कौरवांचा नाश झाला व पांडवांना राज्य मिळालें, असें महाभारताचें कथानक आहे. याचीं १८ पर्वें असून शिवाय 'हरिवंश' नांवाचें १९ वें खिलपर्व आहे.

वेद आणि पुराणें यांची रचना करणारा किंवा संपादक म्हणून प्रसिद्ध असलेल्या व्यास महर्षींनींच मूळ ग्रंथ 'जय' हा रचिला असावा. यांत ८००० श्लोक होते व त्यांत नर-नारायणांचा म्हणजे कृष्णार्जुनांचा विजय हाच विषय होता. नंतर वैशंपायनानें त्यांत थोडी भर घालून त्याला २४००० श्लोकांचें 'भारत' बनविलें व नंतर सौतीनें आणखी वाढाव करून सध्याची एक लक्ष श्लोकांची 'शतसाहस्त्री' संहिता म्हणजे 'महाभारत' बनविलें.

या काव्याच्या रचनेचा काल खि. पू. ३०० ते ४०० यांमधील असावा असें आजचे चिकित्सक संशोधक समजतात. प्रत्यक्ष भारतीय युद्धाची घटना केव्हां घडली असावी याबद्दल फार मतभेद आहेत खि. पू. १५०० हा भारतीय युद्धाचा सर्वसंमत काल असावा असें वाटतें.

महाभारताचें सांस्कृतिक महत्त्व :

रामायणांत वैयक्तिक सद्गुणांच्या आदर्शाचें दिग्दर्शन केलें आहे, तर महाभारतांत समाजधर्म व राष्ट्रधर्म यांचें विवेचन आहे. महाभारत हा केवळ वीरकथांचा संग्रह नसून तो एक हिंदूंचा धर्मग्रंथ आहे. भारतीय संस्कृतीनें मानवीं ध्येयें म्हणून मानलेल्या धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या पुरुषार्थ–चतुष्टयाचा यांत ऊहापोह केला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मेचार्थे च कामे च मोक्षे च भरतर्षभ ।
यदिहास्ति तदन्यत्र, यन्नेहास्ति न कुत्रचित् ॥ आदिपर्व.

जगांतील व्यवहारांत अंतर्भूत होणाऱ्या सर्व नीतितत्त्वांचा महाभारतांत समावेश झालेला असल्यामुळेंच 'व्यासोच्छिष्टं जगत् सर्वम्' असें म्हटलें जातें. राजधर्म, नीतिधर्म या शांतिपर्वांतील विभागांत राजनीतिविरील चिरंतन मूल्याचीं तत्त्वें ग्रथित केलीं आहेत. सूक्तिरत्नांची तर महाभारत ही एक खाणच आहे. कुरुयुद्धाचा सूत्रधार श्रीकृष्ण यानें महाभारतांतील भगवद्गीतेंत उपदेशिलेलें तत्त्वज्ञान, राजनीति व व्यवहारज्ञान यांचा कायमचा ठसा हिंदु संस्कृतीवर उमटला आहे. भारतीयांचा शतकानुशतकांचा इतिहास या दृष्टीनें तो एक राष्ट्रीय ग्रंथच आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. महाभारताची सर्वसंग्राहक वृत्ति ही हिंदूंच्या उदारतेची साक्ष देते. विस्ताराच्या दृष्टीनें 'इलियड' व 'ओडिसी' या दोन्ही महाकाव्यांना एकत्र करून जेवढा ग्रंथ होईल त्याच्या आठपट तरी महाभारत मोठें आहे. रामायणापेक्षां तें चौपट मोठें आहे. तो एक ग्रंथ नसून एक विशाल ग्रंथालय आहे. आर्यांचें तत्त्वज्ञान, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यवहार-शास्त्र, इतिहासशास्त्र इत्यादि सर्व शास्त्रांचें एकत्र विस्तारपूर्वक दिग्दर्शन करणारा हा महान् सांस्कृतिक ज्ञानकोशच होय. जगांतील बहुतेक सर्व भाषांतून त्याचीं भाषांतरें झालीं आहेत. भारतांतील अनेक वीरपुरुषांना या ग्रंथानें स्फूर्ति देऊन कार्यप्रवण केलें आहे.

महाभारतकालीन समाज :

खि. पू. ३००० पासून इ. स. ३०० पर्यंतच्या कालांतील आर्यांच्या सामाजिक जीवनाचें प्रतिबिंब आपणांस महाभारतांत पाहावयास सांपडतें. या काव्यमय इतिहासांत आर्यांचे सामाजिक, राजकीय, नैतिक व धार्मिक आचारविचार आढळून येतात.

या कालांत जातींची संख्या वाढलेली होती. वर्णसंकरोत्पन्न जातीकडे थोडेसें उपेक्षावृत्तीनेंच पाहिलें जात होतें हें सूतपुत्र कर्णाच्या रूपानें पाहावयास सांपडतें. विवाह व व्यवसाय यासंबंधींचीं बंधनें बरींच कडक झालीं होतीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूळच्या कर्तव्याशिवाय ब्राह्मण इतरही व्यवसाय करूं लागले. क्षत्रिय वेद-पठण कमी करूं लागले, वैश्यांनीं अध्ययन सोडलें, शूद्रांसंबंधींचे निर्बंध सैल झाले होते. गुरुगृहीं शिक्षण घेण्याची प्रथा जाऊन क्षत्रियांनीं गुरूलाच आपल्या घरीं ठेवून घेण्याची प्रथा रूढ झाली होती. अग्निपूजा हें गृहस्थाश्रमांतील कर्म कसोशीनें पाळलें जाई. धृतराष्ट्रानें सपत्नीक वानप्रस्थाश्रम स्वीकारल्याचा उल्लेख आहे.

लिहिणें, वाचणें व धर्मज्ञान हे स्त्रीशिक्षणाचे मुख्य विषय होते. क्षत्रिय स्त्रियांना गायन, नृत्य, वादन इत्यादि कलांचें शिक्षण मिळे. नियोग पद्धतीचे दोष ध्यानांत आल्यामुळें पातिव्रत्याचें महत्त्व समाजाला पटविण्यासाठीं द्रौपदी, दमयंती, सावित्री इत्यादि आदर्श होते. मुलीनें अविवाहित राहूं नये असा दंडक होता. बहुपत्नीकत्वाची चाल या काळीं रूढ होती. विवाहाच्या ब्राह्म. गांधर्व, आसुर, राक्षस, आर्ष, प्राजापत्य, दैव व पैशाचें या आठ प्रकारापैकीं ब्राह्म, आर्ष, गांधर्व, आसुर व राक्षस हे विवाह रूढ होते. पण लावून विवाह होत व या समारंभाला ' स्वयंवर ' असें म्हणत. चांद्रवंशीय आर्यांत मातुलकन्याविवाह (मामाच्या मुलीशीं विवाह) रूढ होता (उदा. अर्जुन–सुभद्रा). मुलींच्या विवाहाची वयोमर्यादा त्याकाळीं अधिक असावी. एका स्त्रीनें अनेक पति करण्याची एक विचित्र चाल महाभारतांत आढळते. हिमालयाच्या बाजूनें आलेल्या चांद्रवंशीय आर्यांत ही चाल होती. मात्र हे सर्व पति एकाच कुटुंबांतील असावेत असा नियम होता. ही चाल हिंदुस्थानांत रूढ होऊं शकली नाहीं.

तत्कालीन आहारव्यवस्थेचा विचार केल्यास असें आढळेल कीं, आत्यंतिक हिंसेकडून अहिंसेकडे जाणाऱ्या समाजाचें चित्र आपणांस पाहावयास सांपडतें. मांस खाणारे ब्राह्मण, मधुपर्क समारंभांत बैल मारणारे आर्य. तसेच गाईबैलांची हिंसा करणें हें पाप आहे असे म्हणणारे व पशुबळीऐवजीं पिठाचा बळी द्यावा हें म्हणणारे आर्य अशा अनेक प्रगत आहारकल्पना आढळतात. दारूच्या दुष्परिणामाविषयीं यादवनाशाची गोष्ट विस्तारानें सांगितली आहे. कच-देवयानी आख्यानांत ' दारूच्या एका थेंबानें ब्राह्मणाचें ब्राह्मणत्व नष्ट होईल ' असें सुचविलें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंतरीय (नेसण्याचें) व उत्तरीय (पांघरण्याचें) अशीं दोन वस्त्रें पुरुष वापरीत. डोक्याला उष्णीष म्हणजे पागोटें असे. स्त्रियाही दोन लांबट वस्त्रें वापरीत. श्रीमंतांचे कपडे रेशमी असत. लांकडाच्या व कांतड्याच्या वाहणा वापरीत.

सोन्याचांदीचे अलंकार अंगावर आढळून येत. गाई, घोडे, हत्ती यांच्या अंगावरहा अलंकार घालीत. मुकुट, कुंडलें, हार, केयूर, कडीं, बिंदी, कांची, नूपुर इत्यादि विविध अलंकार असत. द्यूत, वेश्यागमन व शिकार हीं व्यसनें रूढ होतीं. द्यूताचें आव्हान न स्वीकारणें कमीपणाचें समजत.

महाभारतकालीन राजकीय परिस्थिति :

या कालीं कोसल, विदेह, कुरु, पांचाल, मत्स्य, गांधार, भोज, मालव, सिंधु, कांबोज इत्यादि अनेक राज्यें होतीं. तीं स्वतंत्र असून त्यांच्यांत वारंवार युद्धें चालत पंजाबपासून कोसल विदेहापर्यंत सूर्यवंशीय राजे, व गंगाखोऱ्यापासून मध्यभारतापर्यंत चांद्रवंशीय राजे होते. राजापेक्षां विद्वान् ब्राह्मण श्रेष्ठ मानला जात असे. पौर व जानपद यांचेंही नियंत्रण राजसत्तेवर असे. गंभीर प्रसंगीं विद्वत्सभा बोलावीत. सम्राट राजा राजसूय यज्ञ करी. पांडवांनीं हा यज्ञ केला होता. धर्मशास्त्रांत व राजनीतींत सांगितलेल्या नियमांची निःपक्षपातीपणें अंमलबजावणी करणें हें राजाचें कर्तव्य असे. लोकसभेचा सल्ला व अधिकार न मानणाऱ्या राजाला गादीवरून काढून टाकण्याचा अधिकार ऋषींचा आहे असें महाभारतांत म्हटलें आहे.

अनुशासनपर्वांत प्रत्येक राजाला आठ मंत्री असावेत असें सांगितलें आहे. इतर १४–१८ अधिकारी असत. कार्यपटु राजानें बोलण्यांत मृदु पण हृदयांत क्षुरधारेप्रमाणें तीक्ष्ण असावें, असें सांगितलें आहे. स्वार्थाकरितां राष्ट्राचें नुकसान करणाऱ्यांना प्रेतावरील किडे म्हटलें आहे. वसूल धान्याच्या किंवा सोन्याच्या रूपानें घेत. उत्पन्नाच्या एक-दशांश भाग कर म्हणून द्यावा लागे. महाभारतांतील शांतिपर्वांत राजधर्म व आपद्धर्म या प्रकरणांत कुठल्याहि आत्यंतिक विचारप्रणालीच्या आहारीं न जातां, किंवा व्यावहारिक मध्यबिंदूपासून न ढळतां न्याय-अन्याय, हिंसा-अहिंसा, सुख-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुःख, पाप-पुण्य यांची जी चर्चा आढळते ती अन्यत्र सांपडणें कठिण आहे; आणि विशेष आश्चर्याची गोष्ट म्हणजे हजारों वर्षांपूर्वी रचलेल्या या ग्रंथांत गोंविलेलीं प्रमेयें केव्हां केव्हां आपल्या सभोंवारच्या आजकालच्या परिस्थितीस इतकीं बेमालूम लागू पडतात कीं, हा एक प्राचीन ऋषींनीं प्राचीन कालास अनुलक्षून लिहिलेला ग्रंथ आहे याचाही विसर पडतो

न्यायालयांत राजाच्या मदतीस ४ ब्राह्मण, ८ क्षत्रिय, २१ वैश्य व ३ शूद्र असत. लांच घेऊं नये याबद्दल विशेष आग्रह धरला जात असे. अपराधी श्रीमंत असेल तर दंड, गरीब असेल तर कैद, दुष्ट असेल तर फटके देत. हत्या करणारे, आग लावणारे, चोर यांचा वध केला जाई.

आपलें स्वातंत्र्य टिकविण्यासाठीं प्रत्येक राजा जागरूक असे. शत्रूंस कसें जिंकावे, मित्र कसे मिळवावेत, मांडलिक राजांशीं कसें वागावें याबद्दलच्या सूचना अत्यंत मार्मिक व परिपूर्ण आहेत. सैन्यरचना, युद्धाचे प्रकार यांत प्रगति झाली होती.

व्यापार व उद्योगधंद्यांच्या वाढीसाठीं एक स्वतंत्र खातें असे. शेती, व्यापार व पशुपालन हे तीन मुख्य धंदे होते. शेती सुधारणें हें राजाचें प्रमुख कर्तव्य असे. तलाव, तळीं, कालवे यांची सोय केली जाई. शेतकऱ्यास बीं-बियाणें व चार महिन्यांचें धान्य सरकारांतून मोफत मिळे. समुद्रावरून परदेशांशीं व्यापार चाले. वस्त्रें विणणें, रंग तयार करणें, बांधकाम (उदा. मयसभा, लाक्षागृह) यांत प्रगति झाली होती. व्यापार मुख्यतः वैश्यांच्या हातीं असून वजनें व मापें रूढ झालीं होतीं.

धर्मकल्पना :

आर्षकालाच्या सुरुवातीस मूर्तिपूजा अस्तित्वांत नसावी असें वाटतें. महाभारतांत ३३ वैदिक देवतांचा उल्लेख आहे आर्षकालाच्या शेवटीं यांचें पूजन होत असे. या देवतांपैकीं शिव व विष्णु यांचें महत्त्व खूपच वाढलें. विष्णु व कृष्ण हे एकरूप समजत असत. शिवोपासनेला नंतरच्या काळांत विशेष प्राधान्य आलें शिवमूर्तीमध्यें आर्य व अनार्य धर्मकल्पनांचें मिश्रण झालें होतें. आर्यांचा शिव हा देखणा, जटाधारी व अर्धनग्न होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनार्यांची लिंगोपासना या शिवमूर्तींत मिसळली गेली. विष्णु हा जगाचें रक्षण करणारा तर शिव हा संहारकर्ता. यांत सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाची भर पडून त्रिमूर्ति उदयास आली. या त्रिमूर्तींचा अनार्य देवतेशीं संबंध आल्यावर तिचें दत्तात्रेयांत रूपांतर झालें. स्कंद हा देव शिवाच्या गणांचा सेनापति या स्वरूपांत पूजिला जाऊं लागला. हीहि देवता आर्यानार्य कल्पनांच्या संगमांतून निर्माण झाली असावी. दुर्गा ही संहारदेवता म्हणून आर्षकालाच्या शेवटीं प्रसिद्धीस आली.

नैमित्तिक कर्मांपैकीं श्राद्ध, बलिदान (आलोक-दान), सत्पात्रीं दान, उपवासव्रतें यांचा उल्लेख आढळतो. आर्षकालाच्या शेवटीं अहिंसातत्त्वाला विशेष महत्त्व आलें होतें. स्वर्गारोहणपर्वांत त्या काळच्या स्वर्ग व नरक या कल्पना आढळतात. धर्माच्या किंवा सदाचाराच्या कल्पनेला जीवितांत श्रेष्ठ मानलें जात असे. चारित्र्यावर आर्षकालांत विशेष भर दिला जात असे.

भगवद्गीता :

आर्षकालीन तत्त्वज्ञानाचा विचार करतांना महाभारतांतील भगवद्गीता चटकन् डोळ्यापुढें येते. भगवद्गीतेचें तत्त्वज्ञान म्हणजे भारतीय संस्कृतीनें विचारांच्या ब्रावर्तीत गांठलेला शाश्वत असा परमोच्च बिंदु होय. ज्ञान-मूलक भक्तिप्रधान कर्मयोग असें या तत्त्वज्ञानाचें सूत्ररूपानें वर्णन करतां येईल. गीतेचें तत्त्वज्ञान प्रवृत्तिपर आहे हें खरें आहे, पण या प्रवृत्तींतूनही मोक्ष गांठतां येतो असें सांगून श्रीकृष्णानें जीवनांतील नैराश्य झाडून टाकलें आहे. गीताप्रणीत धर्म हा मानवधर्म होय असें म्हटल्यास त्यांत अति-शयोक्ति होणार नाहीं. आसक्ति सोडली तरच कर्में करून देखील त्यांचा लेप मनुष्यावर बसत नाहीं आणि हें लोकसंग्रहासाठीं म्हणजे जगाला सन्मा-र्गाला लावण्यासाठीं करावयाचें. संन्यासापेक्षां कर्मयोग श्रेष्ठ असें जें गीतेनें म्हटलें आहे त्यांत या दोहोंपैकीं कोणत्याही एका गोष्टीची निंदा किंवा स्तुति करावयाची नसून त्यांची सांगड घातल्यास श्रेयस्कर होईल असें सुचविलें आहे. गीतेनें मोक्षाचीं दारें सर्वांना सताड उघडीं केलीं. सर्वभूतीं परमात्मा असें सांगून गीतेनें समतेसाठीं आध्यात्मिक पाया तयार केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आत्मा अमर आहे हें सांगून तिनें सत्यनिष्ठ युयुत्सूला स्फूर्ति दिली. युद्धाला उभे राहिल्यानंतर 'मी माझ्या बांधवांना कसें मारूं?' असा मोह अर्जुनाला झाला तेव्हां 'फलाची आशा न धरितां तुझें कर्तव्य तूं कर' असा उपदेश श्रीकृष्णानें केला, तोच या ग्रंथाचें सार आहे. मोठमोठ्या पंडितांना गुंगविणारे आत्मविद्येचे सिद्धांत अत्यंत स्पष्टपणें, थोडक्यांत व प्रासादिकपणें मांडणारा, भक्ति-ज्ञान-कर्मांचा सुंदर समन्वय घालणारा, संसारदुःखांनीं त्रस्त झालेल्यास चिरशांति देऊन त्यास धर्माचरणाचें निष्काम कर्मयोगी स्वरूप सांगणारा गीतेसारखा सुबोध व सुंदर ग्रंथ जागतिक वाङ्मयसंभारांत आढळणें कठिण आहे. यामुळें गीतेला हिंदुधर्माचा प्रमाणभूत ग्रंथ मानतात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण नववें

मगध साम्राज्याचा उदय

ख्रिस्तपूर्व सहावें शतक :

ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकापासून भारताचा सुसंगत इतिहास उपलब्ध होतो. ऐतिहासिक घटनांचा निश्चित कालनिर्णय याच काळापासून करतां येतो. देशाच्या सांस्कृतिक इतिहासाचीं विविध दालनें अभ्यासकास खुलीं होतात. आर्ष कालांतून ऐतिहासिक कालांत प्रवेश केल्याचें समाधान मिळतें. बौद्ध व जैन धर्मांचा उदय, मगधाची साम्राज्याच्या दिशेनें वाटचाल, परकीय आक्रमणें इत्यादि महत्त्वाच्या घटना या मौर्यपूर्व कालखंडांत घडल्या आहेत. इतिहासाचीं विविध साधनें उपलब्ध असल्यानें प्रत्येक घटनेची सत्यासत्यता पडताळून पाहतां येते. हिंदु पुराणें, बौद्ध व जैन धर्मग्रंथ, जातककथा, सिंहली इतिहास–दीपवंश व महावंश–ग्रीकांच्या ग्रंथांतील उल्लेख इत्यादि वाङ्मयीन पुराव्याबरोबरच, शिला, शिलालेख, नाणीं इत्यादि साधनेंही उपलब्ध होतात.

राजकीय परिस्थिति :

वाङ्मयीन पुराव्यावरून उत्तर भारतांत ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकामध्यें सर्वत्र लहान लहान राज्यें व गणराज्यें विखुरलेलीं होतीं. प्रबल मध्यवर्ती सार्वभौम सत्तेच्या अभावामुळें या राज्यांत नेहमींच हेवेदावे व चुरस असे. परस्परांवर आक्रमण व लढाया या नित्याच्याच गोष्टी होत्या; याच सुमारास ग्रीस देशामध्येंही अशीच राजकीय परिस्थिति उपलब्ध होती. बौद्ध, जैन व हिंदु ग्रंथांत मिळून ऐशींवर राज्यांचीं नांवें आढळतात. त्यापैकीं मगध (पाटणा व गया जिल्हे), कोसल (लखनौ व फैझाबाद), अवंती (माळवा),

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वत्स (अलाहाबाद व बांदा जिल्हे), हीं चार राज्यें व वृज्जि (विदेह, लिच्छवी, ज्ञातृक, वृज्जि इत्यादि आठ राष्ट्रांचें संघराज्य), शाक्य, मल्ल हीं गणराज्यें मौर्यपूर्व कालखंडांत प्रामुख्यानें चमकतात. गणराज्यांनीं भारताला नवीन धर्मसंस्थापक दिले, तर वरील चार राज्यांत साम्राज्यसंपादनाची स्पर्धा होऊन त्यांत मगधाचें राज्य यशस्वी झालें. भारताच्या ऐतिहासिक कालांत चक्रवर्ती साम्राज्य स्थापण्याचा पहिला मान मगधाला मिळाला, व अनेक राजवंशांच्या उलथापालथी झाल्या, तरी सुमारें एक हजार वर्षें मगध हीच भारतांतील सार्वभौम सत्ता राहिली. त्यामुळें भारताचा राजकीय इतिहास हा मुख्यत्वेंकरून मगध साम्राज्याचा इतिहास या स्वरूपांत खिस्तोत्तर पांचशें वर्षांपर्यंत आपणांस दिसून येतो.

अवन्ती :

या कालांत पश्चिम भारतामध्यें अवन्तीचें बलाढ्य राज्य होतें. खिस्तपूर्व सहाव्या शतकांत महासेन चण्डप्रद्योत राजा माळव्यावर राज्य करीत होता. उज्जयिनी ही सुप्रसिद्ध नगरी त्याची राजधानी होती. सुपीक प्रदेश, व्यापारी मार्गावरील मोक्याचें स्थान, कर्तबगार राजे यामुळें अवंतीचें राज्य कांहीं काळ फार प्रबळ झालें, व सत्तास्पर्धेच्या राजकारणांत प्रसिद्धीस आलें. प्रद्योतानें आपली कन्या वासवदत्ता वत्सराज उदयन यास दिली व दुसरी कन्या मथुरेचा (शूरसेन) राजा सुबाहु यास दिली. या राजकारणी विवाहांनीं त्यानें आपलें राजकीय वर्चस्व वाढविलें. त्याचा दरारा इतका वाढला कीं, मगधचा राजा अजातशत्रु यानें आपली राजधानी राजगृह या नगरीभोंवतीं भक्कम तटबंदी बांधून काढली. प्रद्योतानें गौतमबुद्धास फार आदरानें वागविलें व स्वतःही बौद्धधर्म स्वीकारून बौद्धधर्मप्रसारास उत्तेजन दिलें. अवंती देश लवकरच बौद्धांचा आश्रयस्थान झाला. पण प्रद्योतानंतरचे राजे कमकुवत निघाल्यानें अवंतीला उतरती कळा लागली व कालांतरानें तें राज्य मगधाच्या साम्राज्यलालसेला बळीं पडलें.

वत्स :

वत्सदेशावर पौरववंशाचें राज्य अनेक शतकें होतें. तें अत्यंत समृद्ध व भरभराटलेलें असून तेथील कापड प्रसिद्ध होतें. खिस्तपूर्व सहाव्या शतकांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



षोडश महाजानपद

(ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांतील भारत)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदयन हा वत्सदेशाची राजधानी कौशांबी (सध्यांचें कोसम् नांवाचें खेडेगांव) येथें राज्य करीत होता. या उदयनाबद्दल अनेक आख्यायिका प्रसिद्ध आहेत. अनेक संस्कृत नाटक-कादंबऱ्यांचा उदयन नायक बनला आहे. यावरून उदयनाची लोकप्रियता अजमावतां येते. यामुळेंच शेजारच्या प्रद्योत राजाशीं त्याचें वितुष्ट आलें व त्याचा शेवट प्रद्योताची कन्या वासवदत्ता हिचा विवाह उदयनाबरोबर लावण्यांत झाला. मगध देशाची राजकन्या पद्मावती हिच्याशींही त्यानें विवाह केला होता. उदयनानें गौतमबुद्धाला उदार आश्रय दिला. कौशांबीजवळ गौतमानें चार बौद्ध विहार स्थापन केले होते. उदयनाच्या मृत्यूनंतर वत्सदेशाचा इतिहास उपलब्ध नाहीं.

कोसल :

आर्षकालामध्यें अयोध्येचें राज्य फार महत्त्व पावलें होतें. तदुत्तरकालीं श्रावस्ती येथें इक्ष्वाकु वंशाची दुसरी शाखा उदय पावली. खिस्तपूर्व सातव्या शतकांत या राज्याचा विस्तार खूप वाढला, व तेथील राजे सार्वभौमपदासाठीं स्पर्धा करूं लागले. पन्नास वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर काशीचें राज्य जिंकण्यांत कोसलांना यश मिळालें. थोड्याच काळांत शाक्य व कालाम यांच्या गणराज्यांवरही कोसलाची अधिसत्ता स्थापित झाली. इतरही छोटीं राज्यें कोसलांच्या आक्रमणांला बळीं पडलीं. बुद्धाच्या काळीं प्रसेनजित् हा कोसलांचा राजा होता. त्याचें शिक्षण प्रसिद्ध तक्षशिला विद्यापीठांत झालें होतें. कुशल सेनानी व कर्तबगार मुत्सद्दी असा त्याचा लौकिक होता. त्यानें आपली बहीण मगध देशाचा राजा बिंबिसार यास देऊन त्याचा स्नेह संपादिला. विवाहामध्यें कोसला देवीला काशी नगरीचें उत्पन्न जन्मभर लावून देण्यांत आलें होतें. पुढें बिंबिसार व कोसलादेवी यांच्या मृत्यूनंतर प्रसेनजितानें तें उत्पन्न देण्याचें बंद केलें. त्यामुळें त्याचें अजातशत्रूशीं भांडण जुंपलें. साम्राज्यलालसा या भांडणाच्या मुळाशीं होती. बऱ्याच लढायांनंतर तह होऊन उभयतांचें सख्य झालें. प्रसेनाजितानें वादग्रस्त काशी नगरी व आपली मुलगी अजातशत्रूला देऊन जणूं मगधाची अधिसत्ताच मान्य केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसेनजिताला गौतमाबद्दल फार आदर वाटत असे. गौतमाच्या शाक्य-कुलाशीं आपला संबंध यावा म्हणून त्यानें शाक्य राजकन्येशीं विवाह करण्याचें ठरविलें. परंतु उद्दाम शाक्य लोकांनीं राजकन्या म्हणून एका दासकन्येशींच त्याचा विवाह लावून दिला. या अपमानाचा सूड पुढें राजपुत्र विदूदभ यानें घेतला. बौद्ध परंपरेप्रमाणें विदूदभ यानें मंत्र्यांच्या साहाय्यानें बापाविरुद्ध बंड उभारून श्रावस्तीची गादी बळकावली. निर्वासित झालेला राजा प्रसेनजित् आपला भाचा अजातशत्रु याची मदत मागण्यासाठीं मगधाकडे पळाला; पण तो राजगृह राजधानीस पोहोंचतांच मरण पावला. गादीवर आल्यावर विदूदभानें शाक्य गणराज्यावर हल्ला चढवून शाक्य जमातीची खूप कत्तल केली व आपल्या बापाच्या फसवणुकीचा अघोर सूड उगविला. शाक्यराष्ट्र यानंतर नामशेष झालें. कोसलाचाही यानंतरचा इतिहास उपलब्ध नाहीं. मगधाच्या आक्रमक साम्राज्यवादास तें राज्य लवकरच बळी पडलें.

वृज्जि संघराज्य :

या संघराज्यांत आठ जमाती असून त्यांपैकीं लिच्छवी प्रमुख होती. याची राजधानी वैशाली हें मोठें समृद्ध शहर होतें. लिच्छवींचें शेजारच्या कोसलांशीं व मल्लांशीं सख्य होतें. जैन परंपरेप्रमाणें वैशालीच्या चेटक राजाची कन्या बिंबिसारास दिली होती. त्याचीच दुसरी कन्या त्रिशला ज्ञातृकुलांतील सिद्धार्थास दिली होती. त्याचा पुत्र प्रसिद्ध जैन धर्मसंस्थापक महावीर होय. पण मगधाबरोबरचें सख्य फार काल टिकलें नाहीं. अजातशत्रूच्या आक्रमक साम्राज्यवादास लिच्छवी व इतर गणराज्यें लवकरच बळीं पडलीं.

मगध :

भारताच्या प्राचीन इतिहासांत मगध देश अनेक गोष्टींमुळें प्रसिद्धीस आला होता. ऋग्वेदकालीं कीकत या श्रीमंत अनार्य जमाती येथें राहात. ब्राह्मण ग्रंथांतून मगधाचा तिरस्कारपूर्वक उल्लेख आढळतो. यावरून अनार्य संस्कृतीचें एक प्रबल केंद्र म्हणून तत्कालांतही मगधाची प्रसिद्धी होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्षकालामध्यें तेथें जरासंधाची आसुरी अधिसत्ता होती. या पूर्वभारतांतच गणराज्यांचा उत्कर्ष झाला. येथेंच नवीन धर्मांचे प्रणेते जन्मास आले व त्यांनीं मानवतावादाचे धडे समाजाला दिले.

खिस्तपूर्व सहाव्या शतकांत मगधावर शैशुनाग घराणें राज्य करीत होतें. या घराण्यांतील पहिला प्रसिद्ध पुरुष म्हणजे बिंबिसार (खि. पू. ५४७–४९५) होय. जैनग्रंथांतून याचा श्रेणिक या नांवानें उल्लेख येतो. तो अत्यंत कर्तबगार व धोरणी मुत्सद्दी होता. मगधाची जमीन सुपीक व समृद्ध होती. बारमाही नद्यांमुळें शेतीला भरपूर पाणीपुरवठा व नौकानयनाची सोय होत असे. आसपासच्या जंगलांत पुष्कळ हत्ती सांपडत. मगधाचा व्यापारही चांगला चाले. या सर्व गोष्टी लक्षांत घेऊन मगधाचें राजकीय वर्चस्व वाढविण्याची महत्त्वाकांक्षा बिंबिसारानें बाळगली. त्यानें शेजारच्या अंग राज्यावर (भागलपूर व मोंघीर जिल्हे) स्वारी करून तें राज्य मगधास जोडलें. अंगदेशाची राजधानी चंपा ही भारतांतील एक प्रसिद्ध व्यापारी पेठ होती. या विजयामुळें मगधाचें महत्त्व खूप वाढलें व मगध साम्राज्याचा पाया घातला गेला. बिंबिसारानें दूरदृष्टि ठेवून तत्कालीन अनेक राजघराण्यांशीं विवाहसंबंध जोडले. त्याची पहिली बायको कोसलादेवी ही कोसलेश्वर प्रसेनजिताची बहीण होती. या विवाहांत त्याला काशीनगरी आंदण मिळाली. लिच्छवी राजकन्या चेल्लना ही त्याची दुसरी बायको होती. याखेरीज त्यानें विदेह व मद्र देशांच्या राजकन्यांशींही विवाह केले होते. यामुळें मगधाचें आसन स्थिर झालें व त्याची अधिसत्ता वाढली. गांधार देशाचा राजा पुक्कुसाति यानें आपला वकील मगधाच्या दरबारीं पाठवून बिंबिसाराशीं सख्य जोडलें. अवन्तीच्या प्रद्योत राजाशींही त्याचें स्नेहाचे संबंध होते.

गौतम व महावीर या दोन्ही धर्मसंस्थापकांशीं त्याचे संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे होते. यानें स्वतः बौद्धधर्म स्वीकारून बौद्धसंघाला प्रसिद्ध वेळुवनाची देणगी दिली. इतकेंच नव्हे तर, मगधाचा राजवैद्य जीवक यांस गौतमाच्या शुश्रूषेसाठीं पाठविलें व सर्व भिक्षूंना मगधाच्या राज्यांत तरीचा कर माफ केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यानेंच गिरिव्रज या जुन्या किल्ल्याच्या पायथ्याशीं राजगृह ही नवीन राजधानी वसविली. हा अत्यंत कर्तबगार राजा असल्यानें त्याचा आपल्या सर्व अधिकाऱ्यांवर अत्यंत वचक असे. व्यवस्थेच्या सोयीसाठीं राज्य-कारभाराचीं निरनिराळीं खातीं असून प्रत्येकावर स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक होई. सर्व राज्यकारभार अत्यंत चोख व दक्षतेनें हांकला जाई. याची कारकीर्द दीर्घ पण यशस्वी झाली. बौद्धकथेवरून असें समजतें कीं, याचा पुत्र अजातशत्रु यानें बापाचा खून करून मगधाची गादी बळकावली; पण या कथेवर विश्वास ठेवतां येत नाहीं.

अजातशत्रु (खि. पू. ४९५–४६३):

बिंबिसाराचा पुत्र अजातशत्रु बापासारखाच महत्त्वाकांक्षी व कर्तबगार होता. गादीवर आल्याबरोबर त्यानें आपलें साम्राज्य वाढविण्यासाठीं जोराच्या हालचाली सुरू केल्या. मगधाच्या वाढत्या वर्चस्वामुळें कोसल देशाशीं त्याचा खटका उडणें अटळच होतें. तशांत बिंबिसाराच्या मृत्यू-नंतर कोसलेश्वर प्रसेनजितानें मगधाला पूर्वीप्रमाणें काशीचें उत्पन्न देण्याचें थांबविलें. तेव्हां दोन राज्यांत बरेच दिवस लढाया होऊन शेवटीं अजात-शत्रूनें कोसलेश्वराला नमविलें, व काशीचें राज्य व आपली कन्या अजात-शत्रूला देऊन मगधाशीं तह करणें प्रसेनजिताला भाग पाडलें. उत्तरेकडे वैशालीचें लिच्छवी राष्ट्र जोरावर होतें. अनेक लहानलहान गणराज्यांचा एक संघ बनवून लिच्छवी हे त्या संघराज्याचे पुढारी बनले होते. वैशा-लीच्या चेटक राजानें काशी व कोसल येथील राजांशींही संधान बांधलें होतें. मगधाच्या वाढत्या आक्रमक वृत्तीला तें जणूं आव्हानच होतें. त्यामुळें प्रचंड संघर्ष निर्माण झाला. संघराज्याची शक्ति त्यांच्या एकोप्यांत होती. तेव्हां समोरासमोर लढण्यापेक्षां शत्रूमध्यें दुफळीचीं बीजें पेरून त्याचा नायनाट करण्याचा अजातशत्रूनें घाट घातला, व त्यासाठीं त्यानें वस्यकार या आपल्या प्रधानाला वेषांतर करवून वैशालीस पाठवून दिलें. वैशाली गंगानदीच्या उत्तरेस असल्यानें राजगृहामधून लढ्याचीं सूत्रें हालविणें कठीण पडूं लागलें. म्हणून अजातशत्रूनें गंगा व शोण या दोन नद्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संगमावर एक नवीन किल्ला उभारला. तोच प्रसिद्ध पाटलीपुत्र राजधानीचा आरंभ होय. या ठिकाणीं गौतमबुद्ध एकदां आला असतां त्यानें पाटलीपुत्र शहर आर्यावर्ताची राजधानी होईल व व्यापारधंद्याचें केंद्र बनून भरभराटीस येईल असें भविष्य वर्तविलें होतें.

योग्य वेळीं अजातशत्रूनें वैशालीवर हल्ला चढविला. दुफळीमुळें लिच्छवी राष्ट्र मगधाच्या प्रबळ शक्तीपुढें टिकाव धरूं शकलें नाहीं, व पूर्वभारतांतील गणतंत्रें लवकरच मगधाच्या साम्राज्यतृष्णेस बळी पडलीं. मगधाचें साम्राज्य हिमालयापासून विन्ध्यापर्यंत दक्षिणोत्तर पसरलें. अजातशत्रु उत्तरेकडे गुंतला असतां अवंतीच्या प्रद्योत राजानें मगधाविरुद्ध उचल खाल्ली. तेव्हां अजातशत्रूनें आपली राजधानी राजगृह या नगरीस भक्कम तटबंदी बांधवून घेतली व मगधाच्या शत्रूला कोठेंच शिरकण्यास वाव ठेविला नाहीं. अजातशत्रूच्या या धडाडीच्या आक्रमक वृत्तीमुळें त्यानें मगधाच्या साम्राज्याचा भक्कम पाया घातला.

बापाप्रमाणेंच अजातशत्रूचेही बुद्ध व महावीर यांच्याशीं प्रेमाचे संबंध होते. बुद्धाच्या मृत्यूनंतर (खि. पू. ४८७) राजगृह येथें भरलेल्या पहिल्या धर्मसंगीतीला (बौद्धधर्म परिषद्) त्यानें सर्व प्रकारचें साह्य दिलें. बुद्धाचे मृतावशेष राजगृह येथें पुरून त्यावर एक भव्य स्तूप यानें बांधिला. अजातशत्रूनें दक्षिणेवरही स्वारी करण्याची तयारी केली होती; पण त्याच्या अपमृत्यूनें (खि. पू. ४६३) तें कार्य अपुरें राहिलें.

अजातशत्रूच्या मृत्यूनंतर झालेल्या राजांच्या बाबतींत बौद्धग्रंथ व पुराणें यांच्या माहितींत खूप तफावत आढळते. अजातशत्रूचा मुलगा दर्शक (किंवा नागदर्शक) यानें सुमारें चोवीस वर्षें राज्य केलें. याच्या कारकीर्दींत महावीराचा मृत्यु झाला. दर्शकानंतर त्याचा मुलगा उदयिन् (उदयिभद्र) हा गादीवर आला. अवन्तीच्या पालक राजानें वत्सराज्य जिंकून प्रद्योतांची अधिसत्ता वाढविली. त्यामुळें मगधाला धोका निर्माण झाला. म्हणून उदयिभद्रानें मगधाची राजधानी राजगृहाहून हालविली व गंगा-शोण संगमावर अजातशत्रूनें जो किल्ला बांधला होता तेथें नेली. नव्या राजधानीस तो कुसुमपुर म्हणत असे. तीच सुप्रसिद्ध पाटलिपुत्र नगरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होय. बौद्धग्रंथांतून यानंतर शैशुनाग घराणें मगधाच्या गादीवर आलें असा उल्लेख आहे. पुराणामध्यें शिशुनाग हा बिंबिसाराचा पूर्वज म्हणून वर्णिला आहे व तेंच बरोबर वाटतें.

नंदवंश : नंदिवर्धन (खि. पू. ४२३–३८३) :

उदयिभद्रानंतर नंदिवर्धन गादीवर आल्याचा उल्लेख पुराणामध्यें आहे, व तो शैशुनाग वंशाचाच होता असें जरी पुराणांतरी आढळतें, तरीही नंद या नांवावरून व इतर प्रमाणांवरून तोच नंद वंशाचा संस्थापक असावा असें दिसतें. याच्या कारकीर्दींत अवन्तीशीं झगडा होऊन त्यांत मगधाचा विजय झाला. अशा रीतीनें उत्तर भारतामध्यें मगधाच्या सत्तेला विरोध करणारा प्रद्योतांचा वंश कायमचा विनाश पावला व मगधाचें साम्राज्य निष्कंटक झालें. नंदिवर्धनानें आपल्या नांवानें नवीन कालगणना सुरू केली त्यासच नंदसंवत् म्हणतात.

महापद्म (खि. पू. ३८३–३४०) :

पुराणें व जैन व ग्रीक ग्रंथ यांमधून महापद्मनंद हा शूद्र स्त्रीपासून जन्मलेला असल्यानें अकुलीन होता असे उल्लेख आढळतात; तर अन्यत्र तो न्हाव्यापासून राणीला झालेला अनौरस पुत्र म्हणून त्याची हेटाळणी केलेली आहे. पण नंदवंशामध्यें महापद्म हा एक असामान्य राजा होऊन गेला. त्यानें गंगानदीच्या खोऱ्यांतील सर्व राज्यें जिंकून मगधाला जोडलीं. पुराणामध्यें त्याला ‘ सर्वक्षात्रियांतक ’ ‘ एकराट् ’ अशी सार्वभौमवाचक विशेषणें लाविलेलीं आहेत. हाथीगुंफा शिलालेखावरून त्यानें कलिंगदेशही पादाक्रांत केल्याचें समजतें. त्यानें कलिंगदेशांतून अपार संपत्ति व एक जैन मूर्ति आणली. गोदावरी नदीच्या कांठावरील नांदेड (नव नन्दडेरा) या ग्राम नामावरून महापद्मानें दक्षिणेवरही स्वारी केली होती व बराच मुलूख पादाक्रांत केला होता असें दिसतें. हा अत्यंत धनलोभी व जुलमी होता. त्याच्या अपार संपत्तीचें वर्णन पुष्कळ ठिकाणीं आढळतें. अशा रीतीनें महापद्मनंद हा भारतांतील पहिला साम्राज्यसंस्थापक ठरला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंदवंशज :

यानंतर झालेले नंदवंशीय राजे अल्पायुषी व कमकुवत होते. शेवटचा नंदराजा धनानंद हा एक महत्त्वाकांक्षी परंतु जुलमी राजा होता. त्यानें प्रजेवर नाना तऱ्हेचे कर बसवून बराच पैसा उकळला. सोन्याच्या एकूण नऊ राशी त्यानें पुरुन ठेविल्या असल्याचा उल्लेख आढळतो. धनाच्या या लोभामुळेंच त्याला धनानंद असें नांव पडलें. शकदाल नांवाचा त्याचा कर्तृत्ववान् प्रधान होता. ग्रीक इतिहासकार नंदाच्या प्रचंड लष्करी सामर्थ्याचें वर्णन करतांना लिहितात कीं, नदांच्या खड्या सैन्यांत दोन लाख शस्त्रसज्ज पायदळ, २०,००० घोडदळ, ३००० हत्ती व २००० रथ नेहमीं तयार असत. याच लष्कराच्या जोरावर नंदराजे अनियंत्रित सत्ता उपभोगूं शकले. पण या लोभीपणामुळेंच प्रजा त्याच्या जुलमाला कंटाळली व नंदांचा द्वेष करूं लागली. नंदांनीं जैनधर्माला उत्तेजन दिलें तेंही प्रजेस आवडलें नाहीं. यामुळें चंद्रगुप्त मौर्यानें नंदांचें राज्य उलथून पाडलें. धनानंदाचा व इतर नंदवंशीयांचा वध करून खि. पू. ३२३ च्या सुमारास मगधाची गादी बळकाविली.

शिशुनाग व नंद घराण्याचा इतिहास हा भावी मौर्य साम्राज्यसूर्याच्या उदयापूर्वींचा संधिप्रकाश ठरला. साम्राज्यसत्तेच्या चढाओढींत मगधराज्य यशस्वी झालें. त्याचीं कारणें शोधतांना असें दिसतें कीं, शिशुनाग व नंद घराण्यांतील अनेक महत्त्वाकांक्षी व कर्तृत्ववान् राजांचे परिश्रम त्यास कारणीभूत आहेत. मगधाचें भौगोलिक स्थानही महत्त्वाचें आहे. गंगा व शोण गडक, गोग्रा इत्यादि नद्यांमुळें मगध सुपीक व समृद्ध देश बनला आहे. नद्यांमुळें परचक्रापासून स्वाभाविक संरक्षण व नौकानयनाची सोय झाली आहे. बौद्ध व जैन धर्मासारख्या एकेश्वरी पंथांच्या प्रसारानें साम्राज्य-वर्धनास मदत झाली. मगध देश कर्मठवादापासून अलिप्त राहिल्यानें धार्मिक व राजकीय क्षेत्रांत नवें धाडस करण्यास व नवनवीन विजय मिळविण्यास मगध राष्ट्राला शक्य झालें. पश्चिमेकडील हखमनोशिय (Achamemid) साम्राज्याच्या भरभराटीमुळेंही मगधाला साम्राज्य स्थापण्याची व वाढविण्याची स्फूर्ति मिळाली असणें शक्य आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण दहावें

परकीय आक्रमणें

१ इराणी आक्रमण :

गंगा नदीच्या खोऱ्यांत मगधाच्या आधिपत्याखालीं एक भारतीय साम्राज्य जन्माला येत असतांना वायव्येकडे निराळाच इतिहास घडत होता. हिंदुकुशापासून कुरुक्षेत्रापर्यंतच्या विस्तीर्ण भागांत अनेक स्वातंत्र्यप्रिय जमाती व छोटीं छोटीं राज्यें नांदत होतीं. भारताचा खुष्कीवरून इराणमार्गें पश्चिमेकडील देशांशीं मोठा व्यापार वेदोत्तरकालीं चालत असावा. ख्रिस्तपूर्व सहाव्या शतकांत इराणमध्यें कैकुश्रू (ख्रि. पू. ५५८–५३०) यानें हखमनोशिय या आर्यवंशाची अधिसत्ता स्थापन केली. त्यानें लवकरच आपले हातपाय पूर्वेकडे पसरण्यास सुरुवात केली. त्यानें गांधारावर स्वारी करून कापिशी नगरीचा विध्वंस केला. याच आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठीं गांधार देशाच्या पुक्कसाति राजानें बिंबिसाराकडे मदतीची याचना केली होती. कोणा भारतीय राजानें बरीच खंडणी देऊन आपला वकील कैकुश्रूच्या दरबारीं पाठविल्याचा उल्लेख झेनाफनच्या ग्रंथांत आहे.

भारतावर इराणी अधिराज्य खरेंखुरें कैकुश्रूचा नातू दरायस (ख्रि. पू. ५२२–४८६) या प्रसिद्ध सम्राटानें स्थापिलें. त्याच्या बेहिस्तून (ख्रि. पू. ५१९) येथील आलेखांत गांधाराचा इराणी साम्राज्यांत समावेश होत असल्याचा उल्लेख आहे. त्याच्या दुसऱ्या आलेखांत-पर्सेपोलिस व नक्षी रुस्तुम येथील (ख्रि. पू. ५१६) हिंदचा उल्लेख आहे. त्यावरून ख्रि. पू. ५१६ च्या सुमारास दरायस राजानें तक्षशिला व पश्चिम पंजाब हे प्रांत काबीज केले असावेत. हिरोडोटस या ग्रीक इतिहासकाराच्या लिखाणावरून असें दिसतें कीं, सिंधु नदीचें खोरें मिळून इराणी साम्राज्याचा विसावा प्रांत बनला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. तो प्रांत सर्व साम्राज्यांत अत्यंत समृद्ध व दाट लोकवस्तीचा होता. हा एकटा प्रांत इराणच्या सम्राटाला एक लक्ष स्टार्लिंग पौंड इतक्या किंमतीचें सोनें दरसाल खंडणीदाखल देत असे; व साम्राज्याच्या उत्पन्नाच्या एक-तृतीयांश उत्पन्न एकट्या या भारतीय प्रांताकडून मिळत असे. खि. पू. ५१७ च्या सुमारास दरायसच्या आज्ञेवरून स्कायलॅक्स नांवाच्या शूर सेनानीच्या आधिपत्याखालीं बरीच मोठी फौज ओहिंदपासून नदीमार्गें पाठवून सिंधु नदीच्या मुखापर्यंतचा बहुतेक प्रदेश आपल्या राज्यांत सामील करून घेतला. दरायसचा पुत्र व वारस क्षयार्ष (Xerxes) (खि. पू. ४८६–४६५) याच्या कारकीर्दींतही इराण्यांची सत्ता भारतीय प्रांतावर अबाधित राहिली. एक भारतीय सैन्यविभाग इराण्यांच्या बाजूनें ग्रीस राष्ट्राविरुद्ध लढल्याचा उल्लेख आहे. प्लाटीच्या लढाईत (खि.पू.४७९) इराणी सम्राटाचा पराभव होऊन इराणी साम्राज्याला उतरती कळा लागली, व लवकरच भारतीय प्रदेशांतील स्वातंत्र्यप्रिय जमातींनीं इराणी साम्राज्याचें जोखड फेकून दिलें.

परिणाम :

भारतीय प्रांतांवर इराणी अधिसत्ता एक शतकभरच टिकली; परंतु भारतीय जीवनावर इराणी संस्कृतीचा पुष्कळच ठसा उमटला आहे. (१) इराणी साम्राज्यामुळें भारताचा पश्चिम आशिया, युरोप व आफ्रिका येथील देशांशीं घनिष्ठ संबंध वाढून परस्परांशीं व्यापारी संबंध येऊं लागले. व्यापाराबरोबरच सांस्कृतिक देवघेव सुरू झाली. (२) वायव्य भारतांत खरोष्ट्री लिपीचा प्रसार झाला. (३) मौर्यकालीन शिल्पकलेवर इराण्यांची छाप पडली आहे. प्रजेला उद्देशून शिलालेख कोरणें, प्रजाजनांच्या सुखासाठीं रस्ते बांधणें, रस्त्याच्या दुतर्फा झाडें लावणें, विहिरी खणणें, माणसें व जनावरें यांच्या शुश्रूषेसाठीं दवाखाने उघडणें इत्यादि अनेक बाबतींत मौर्यांच्यापुढें इराण्यांचा आदर्श असल्याचें दिसून येतें. (४) इराणी साम्राज्याचा विजेता व वारसदार म्हणून ग्रीक बादशहा अलेक्झांडर यास भारतावर चाल करून येण्याचा मोह झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रीक आक्रमण : शिकंदराची स्वारी :

मॅसिडोनियाचा राजा दुसरा फिलिप याचा मुलगा अलेक्झांडर किंवा शिकंदर हा खि. पू. ३५६ या वर्षीं जन्मला. बापाच्या खुनानंतर तो विसाव्या वर्षीं गादीवर आला. मॅसिडोनियाच्या अधिसत्तेविरुद्ध ग्रीक संस्थानांनीं केलेल्या बंडाव्याचा त्यानें ताबडतोब बींमोड केला. तो अत्यंत धाडसी, महत्त्वाकांक्षी व युद्धखोर होता. नंतर त्यानें मोडकळीस आलेल्या इराणी साम्राज्यावर हल्ला चढविला. खि. पू. ३३१ मध्यें अरबेलाच्या प्रसिद्ध लढाईंत इराण्यांचा धुव्वा उडवून तो इराणी साम्राज्याचा मालक बनला. त्यामुळें त्याला जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. ग्रीक संस्कृतीचा विजयध्वज सर्वत्र फडकवावा व सर्वत्र तिचा प्रसार करावा अशी इच्छा त्यानें बाळगली व त्याचे पाय भारताकडे वळले.

यावेळीं भारताची राजकीय परिस्थिति मोठी शोचनीय होती. वायव्य भारतांत लहानमोठीं दीडशें राज्यें असून तीं सर्व स्वतंत्र होतीं. त्यांतील कांहीं प्रजासत्ताक, कांहीं श्रेष्ठ जनसत्ताक, तर कांहीं राजसत्ताक होतीं. या सर्वांवर प्रबळ अशी कोणतीच अधिसत्ता नव्हती. त्यामुळें सर्व राज्यांची आपापसांत भांडणें व लढाया चालत. त्यांच्या वैयक्तिक हेवेदाव्यामुळें त्यांची परकीय शत्रूविरुद्ध एकजूट होऊं शकली नाहीं व या फुटीर वृत्तीचा शिकंदराला चांगलाच फायदा मिळाला.

खि. पू. ३२७ च्या मे महिन्यामध्यें हिंदुकुश ओलांडून शिकंदर गांधारदेशांत शिरला. तक्षशिलेच्या राष्ट्रद्रोही आंभी राजानें शेजारच्या झेलमाधीश पौरवाविरुद्ध शिकंदरची मदत मागितली व वरीच खंडणी पाठवून शिकंदराला बॅक्ट्रियांतून मुद्दाम भारतांत बोलाविलें. शिकंदरानें प्रथम काबूल व पंजकोर नद्यांच्या मुलखांतील पर्वतीय गणराज्यें जिंकण्याचें ठरविलें. या स्वातंत्र्यप्रिय जमातींनीं ग्रीकांना जोराचा विरोध केला. स्वात नदीच्या खोऱ्यांत अश्वक जमातीनें घनघोर लढा दिला, व लढतां लढतां सर्व वीर पुरुष धारातीर्थीं मरण पावले. पुष्कलावतीच्या (चारसद्दा) अष्टक राजानें आपल्या किल्ल्यांतून तीस दिवस लढा दिला. लढाईंत तो मारला गेल्यावर शिकंदरानें त्याचें राज्य आंभीच्या संजयनामक सरदारास दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काफिरिस्तानांतील मशकावतीची वीर राणी क्लिओफिस हिनें शिकंदराशीं कित्येक दिवस मोठ्या निकरानें सामना दिला. तिचा पराभव करून ग्रीकांनीं भारतीय सैन्याची मोठी कत्तल केली.

खि. पू. ३२६ च्या उन्हाळ्यांत ओहिंदजवळ सिंधु नदी ओलांडून शिकंदरानें भारतभूवर पाय ठेवला. देशद्रोही आंभीनें त्याचें स्वागत केलें. तक्षशीलेला शिकंदरानें मोठा दरबार भरवून आपल्या ऐश्वर्याचें व औदार्याचें प्रदर्शन केलें. अनेक लहानमोठ्या राजांनीं नजराणे पाठवून शिकंदराची अधिसत्ता मान्य केली. झेलम व चिनाब यांच्या दुआबांत पौरवांचें प्रसिद्ध राज्य होतें. त्याच्या तेजस्वी व मानी राष्ट्राभिमानानें ग्रीकांपुढें शरणागति पत्करण्याचें नाकारलें. परकीय आक्रमणाला प्रतिकार करण्यासाठीं त्यानें अनेक भारतीय राज्यांना आवाहन केलें व ग्रीकांना झेलमच्या पलीकडेच रोखून धरण्याचें ठरविलें. शिकंदर आपल्या अफाट सैन्यानिशीं पूर्वतीरावर तळ ठोकून झेलम नदीवर उतार मिळण्याची वाट पाहात बसला. नदीच्या पुरामुळें व पलीकडे असलेल्या पौरवांच्या सैन्यामुळें दोन महिनपेर्यंत ग्रीक सैन्य झेलमच्या पश्चिम तीरावर अडकून पडलें. शेवटीं शिकंदरानें शत्रूला फसविण्याचें ठरविलें. आपल्या तळाच्या उत्तरेस सतरा मैलांवर प्रवाहांतील एका बेटाच्या आश्रयानें आपल्या निवडक सैन्यानिशीं शिकंदर नदीपार झाला. त्या अंधाऱ्या रात्रीं तुफानी पावसामुळें पौरवांस शिकंदरच्या या हालचालीची माहिती उशीरा मिळाली. त्यानें ताबडतोब ५००० सैन्यानिशीं आपल्या मुलास ग्रीकांचा प्रतिकार करण्यास पाठवून दिलें. पण त्याचा शिकंदरापुढें निभाव लागला नाहीं व त्यांत तो ठार झाला. पुढें झेलमच्या कांठीं कारीच्या मैदानावर ग्रीक व भारतीय सैन्याचा घनघोर संग्राम झाला. रात्रीच्या पावसानें जमीन निसरडी झाली असल्यानें भारतीय तिरंदाजांना आपलीं मोठालीं धनुष्यें वापरतां आलीं नाहींत. त्यांतच चिखलांत चाकें रुतून भारतीय रथ निकामी झाले. झालेल्या धुमश्चक्रींत पौरव जखमी होऊन शत्रूच्या हातीं पडला. (खि. पू. जुलै ३२६) व त्याच्या सैन्याची दाणादाण उडाली. पौरवाला शिकंदरापुढें युद्धकैदी म्हणून उभे केल्यावर पौरवाची भव्य व रुबाबदार शरीरयष्टि व बाणेदारपणा यांनीं संतुष्ट होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिकंदरानें त्यास सोडून दिलें व त्याचें राज्य त्यास परत देऊन त्याच्याशीं सख्य जोडलें. नंतर अभिसार (पूंच व नौशेरा जिल्हे) येथील राजानेंही खंडणी देऊन शिकंदराचें मांडलिकत्व पत्करलें.

शिकंदरानें नंतर पूर्वेकडे कूच केलें. रावीच्या कांठावरील कठांच्या गण-राज्यानें त्यास तीव्र प्रतिकार केला. त्यांत १७००० कठ योद्धे धारातीर्थी पतन पावले. याप्रमाणें पंजाबांतील राज्यें जिंकीत व नद्या ओलांडीत शिकंदर बियास नदीच्या तीरावर येऊन पोहोंचला. सततच्या लढायांमुळें ग्रीक सैन्य थकलें होतें. पूर्वेकडे नंदांचें अतिबलाढ्य राज्य असल्याच्या वार्ता त्यांच्या कानीं आल्या होत्या व त्यामुळें त्यांचा धीर खचला होता. त्यांनीं पुढें कूच करण्याचें नाकारलें. त्यामुळें नाइलाज होऊन शिकंदर माघारीं वळला. झेलमवर मोठें आरमार सज्ज करून त्यामध्यें बसून शिकंदर खि. पू. नोव्हेंबर ३२६ च्या मध्यास सिंधुमार्गें परत फिरला. मार्गामध्यें शिबि, क्षुद्रक व मालव या गणराज्यांनीं एक लक्ष सैन्यानिशीं शिकंदराशीं सामना दिला. तेथील एका लढाईंत खुद्द शिकंदर जखमी झाला, पण शेवटीं त्या गणराज्यांचा धुव्वा उडाला. अर्जुनायन जमातीनेंही प्रखर प्रतिकार केला. पण पराभव अटळ पाहून बायकामुलांसह अग्निप्रवेश करून जोहार केला. सिंध प्रांतांत यावेळीं राष्ट्रभक्त ब्राह्मणांचें वर्चस्व होतें. त्यांनीं प्रांतांतील सर्व जमातींना ग्रीकांविरुद्ध चेतवून दिलें, व त्यामुळें शिकंदराला ठिक-ठिकाणीं लढे देऊन आपला मार्ग आक्रमावा लागला. खि. पू. ३२५ च्या सप्टेंबरमध्यें शिकंदरानें भारतभूमि सोडली व मकराणच्या वाळवंटांतून तो बाबिलोनला गेला. मार्गामध्यें त्याला अनेक कष्ट भोगावे लागले. सरते शेवटीं ताप येऊन तो खि. पू. ३२३ जूनमध्यें बाबिलोन येथें मरण पावला. भारतामध्यें शिकंदराचा मुक्काम एकोणीस महिने होता.

परत जातेवेळीं शिकंदरानें पौरवाला बियास नदीपर्यंत पंजाबांत जिंक-लेल्या मुलुखाचें आधिपत्य दिलें. अभिसार हा स्वतंत्र ग्रीक प्रांत बनविला. झेलमच्या पश्चिमेकडील मुलुखावर आंभी यास नेमलें, व दक्षिण पंजाबांत फिलिप व सिंधमध्यें पायथान या ग्रीक सेनानींना नेमलें. ठिकठिकाणीं ग्रीक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वसाहती स्थापून तेथें प्रबळ सैन्य विखरून ठेविलें. भारताला ग्रीक संस्कृतीची दीक्षा देण्याची शिकंदराची महत्त्वाकांक्षा होती.

स्वारीचे परिणाम :

शिकंदराच्या स्वारीचा भारतावर फारसा कांहींच परिणाम झाला नाहीं. भारतीय वाङ्मयांत या स्वारीचा मागमूसही दिसत नाहीं. शिकंदराच्या मृत्यूनंतर सहा वर्षांनीं चंद्रगुप्त मौर्यानें वायव्य भारत जिंकून ग्रीकसत्तेचा शेवट केला. शिकंदराच्या स्वारीपासून कांहीं लष्करी धडेही भारतीयांनीं घेतले नाहींत. सीमाप्रांतांतील छोट्या राज्यांचा त्यानें धुव्वा उडविला, पण भारतांतील प्रबळ अशा नंदाच्या सत्तेशीं सामना देण्याचें त्यानें टाळलें. त्यामुळें शिकंदराला भारत-विजेता म्हणणें चूक आहे. त्याची स्वारी नुसती वावटळ ठरली. तो आला आणि गेला. भारतीय जीवनावर त्याच्या स्वारीचा कांहींच परिणाम झाला नाहीं. त्याच्या स्वारीचे अप्रत्यक्ष परिणाम म्हणजे वायव्य भारतांतील लहान लहान राज्यें नष्ट झाल्यानें मौर्यांच्या सत्तेखालीं भारताचें एकीकरण करण्यास चंद्रगुप्तास सुलभ झालें. परकीय आक्रमणापुढें छोटीं राज्यें टिकाव धरूं शकत नाहींत. त्याकरितां एक प्रबळ सार्वभौम सत्ता भारतांत अस्तित्वांत येणें आवश्यक आहे. अशी विचारवंतांची खात्री पटली. (१) भारताचा पश्चिमेकडील देशांशीं जवळचा संबंध येऊन व्यापार वाढला. (२) बॅक्ट्रियामध्यें ग्रीकांची सत्ता कायमची स्थापन झाल्यामुळें तद्द्वारां भारतीय संस्कृतीवर जे परिणाम घडले ते अप्रत्यक्षपणें शिकंदराच्या स्वारीचेच परिणाम होत. (‘Whatever Hellenistic elements in Indian civilization can be detected were all indirect consequences of Alexander's Invasion'—Smith.)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण अकरावें

नवीन धर्मपंथांचा उदय

पार्श्वभूमि :

उपनिषदांच्या शिकवणीनें वैदिक कालोत्तर भारतांत एक नवीन वैचारिक युग निर्माण झालें. ऐहिक जगाकडून अध्यात्ममार्गाकडे लोकांचीं मनें आकर्षिलीं गेलीं. विचारस्वातंत्र्याची वाढ झाली. आत्मा, ऐहिक दुःखें, मोक्ष इत्यादि कल्पनांनीं लोकांचीं मनें भारलीं गेलीं. ब्राह्मणांचें किचकट कर्मकांड आचरण्यास कठीण होऊं लागलें व बुद्धीलाही पटेनासें झालें. औपनिषदिक तत्त्वज्ञानानें आचांडाल सर्वांना ज्ञानाचीं दारें उघडून दिलीं होतीं व त्यामुळें जनतेंत विचारक्रांति घडत होती. ब्राह्मणांचें धार्मिक व सामाजिक वर्चस्व, यज्ञयागांचें व कर्मकांडाचें वाढतें व जुलमी स्तोम यामुळें एक प्रकारचा धार्मिक असंतोष धुमसत होता. त्यांतच आनिर्बंध विचारसरणीमुळें आचारविचारांत अतिरेक होत होता. लोकांच्या आध्यात्मिक दुःखांवर उपाय सांगणारे अनेक स्वयंसिद्ध आचार्य जनतेच्या आर्ततेचा फायदा घेऊन तिच्या वैचारिक गोंधळांत भर टाकीत होते. संन्यास व भोगवाद, कर्मवाद व अक्रियावाद, ज्ञानवाद व कर्मकांड, नास्तिकवाद व देववाद, गूढवाद व अज्ञेयवाद इत्यादि अनेक विचारप्रवाह खळाळून वाहात होते. या परस्परविरोधी विचारप्रणालीमुळें सामान्य माणूस गोंधळून गेला होता. सत्य व शक्य यांची निवड त्यास करतां येईना. त्याला सोप्या व सुगम मार्गाची आर्तता होती. याच पार्श्वभूमीवर कांहीं नांवें धार्मिक इतिहासांत झळकतात.

मक्खली गोशाल हा आजीवक पंथांचा अग्रणी होता. वैदिक कर्मकांडविरोधी संन्यासमार्गी अशी त्याची शिकवण होती. तो अक्रियावादाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कर्ता होता. जन्ममरणाच्या चक्रानें भौतिक व आध्यात्मिक उन्नति होत असते. त्यांत व्यक्तीच्या कर्मानें कांहींच बदल होत नाहीं. त्यामुळें कर्मकांड निरर्थक आहे असें त्याचें सांगणें होतें. पण हें तत्त्व मान्य केलें तर नैतिक क्षेत्रांत अनवस्था उत्पन्न होईल. कोणत्याही कृत्याबद्दल कोणालाच जबाबदार धरतां येणार नाहीं व नैतिक आचरणाची जरुरीच राहणार नाहीं. तथापि हा पंथ बुद्धपूर्वकालीं बराच लोकप्रिय होता. सम्राट् अशोक व त्याचा नातू दशरथ यांनीं आजीवकांसाठीं मगधामध्यें विहार खोदविल्याचे उल्लेख आहेत.

संजय बेलहत्थिपुत्र हा अज्ञेयवादी होता. सर्व शास्त्रविधानें विवक्षित क्षेत्रांतच प्रमाण असतात. त्यांची अतिव्याप्ति केल्यास अनवस्था होते. यानेंच प्रथम स्याद्वाद मांडिला.

अजित केशकंबली हा शुद्ध भोगवादी होता. यज्ञीय पशुहिंसा व श्राद्धकर्म इत्यादिकांवर त्यानें जोराचा हल्ला चढविला. सुप्रसिद्ध चार्वाक हा भौतिक सुखवादी होता. आत्मा, स्वर्ग इ. थोतांडें असून यज्ञ व संन्यास हीं दोन्हीही मूर्खपणाचीं आहेत. मृत्यूनंतर जीव नष्ट होतो. अदृष्टाच्या आशेनें दृष्ट सुखांचा त्याग करणें वेडेपणाचें आहे. वैदिक धर्मातील गूढवादावर त्यानें हल्ला चढवून बुद्धिवादाची कांस धरण्याचा उपदेश केला.

याशिवाय नानाप्रकारचे संन्यासी, जटिल, परिव्राजक, योगी इत्यादि विविध प्रकारची अतिरेकी देहदमनाची शिकवण देत होते. याच पार्श्वभूमी-वर गौतमबुद्ध व महावीर यांनीं आपलें कार्य केलें.

गौतमबुद्ध—(खि. पू. ५६७–४८७).

बुद्धधर्माचा संस्थापक सिद्धार्थ गौतम हा कपिलवस्तूंच्या शाक्य जमातीचा राजा शुद्धोदन याचा मुलगा होय. त्याचा जन्म कपिलवस्तूच्या परिसरांतील लुम्बिनीग्राम या खेड्यांत झाला. जन्मल्यानंतर लौकरच त्याची आई मायादेवी वारली, व त्या बालकाचें संगोपन तिची बहीण व सवत असणाऱ्या गौतमीनें मोठ्या प्रेमानें केलें. सिद्धार्थाला लहानपणापासून एकांतांत विचार करण्याची आवड होती. इतर मुलांप्रमाणें खाण्यांत वा खेळण्यांत त्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आजिबात लक्ष नसे. त्याच्या या विरक्त वृत्तीमुळें त्याच्या आईबापांना अत्यंत काळजी वाटत असे. त्यांनीं सिद्धार्थाला अत्यंत लाडांत वाढविलें. पुढें योग्य वेळीं यशोधरा नामक एका सुंदर युवतीशीं त्याचा विवाह करून दिला. त्याला जगांतील दुःख दिसूं नये म्हणून त्याच्यासाठीं सर्व सुखसोयींनीं युक्त असा सुंदर राजवाडा बांधून देण्यांत आला. गायक, वादक, नर्तकी व इतर अनेक सुखसाधनें त्याच्या दिमतीला देण्यांत आलीं. पण एके दिवशीं त्यानें चार दृश्यें पाहिलीं. एक जराजर्जर माणूस कांठीवर वांकून कष्टानें चालला होता. माणसाला म्हातारपणाचें दुःख भोगावें लागतें हें सिद्धार्थास समजलें. एक व्याधिग्रस्त माणूस आप्तांनीं परित्यक्त केलेला असा रस्त्यावर पडला होता. जीवाला व्याधींनीं दुःख होतें तें गौतमानें पाहिलें. एक प्रेत नेतांना त्यानें पाहिलें. माणसाचा शेवट मृत्यूनें होतो हें ज्ञान गौतमास झालें. एका विरक्त संन्याशाला पाहिल्यावर त्याच्या समाधानी वृत्तीची छाप गौतमावर पडली. जगांतील दुःखाचा परिहार करण्यासाठीं आपणही सर्वसंगपरित्याग करून कांहीं मार्ग शोधून काढावा असे विचार गौतमाच्या मनांत घोळूं लागले. पुढें त्यास राहुल नांवाचा पुत्र झाला. तो संसारांत अधिकच जखडला गेला. शेवटीं वयाच्या २९ व्या वर्षी एका मध्यरात्रीं सर्व सुखें, सुदर पत्नी व मोहक पुत्र यांना टाकून तो राजवाड्याच्या बाहेर पडला, (महाभिनिष्क्रमण) व भगवीं वस्त्रें परिधान करून आत्म्याच्या शांतीसाठीं गुरुचा शोध करूं लागला. वैशालीच्या आलार कालाम याचें शिष्यत्व पत्करून खूप योगसाधना केली, पण समाधान न झाल्यानें तो परत फिरला. नंतर राजगृहाजवळ उद्दक रामपुत्र या साधूजवळ राहून बरेच आत्मक्लेश भोगले. शेवटीं सात वर्षे हिंडूनही मनःशांति न मिळाल्यानें तो गयेजवळ उरुवेला वनांत तप करण्यासाठीं गेला. तेथें एका वटवृक्षाखालीं ४९ दिवस समाधि लावून बसल्यानंतर त्याला सत्याचा शोध लागला. खऱ्या धर्माचा बोध झाला. गौतम बुद्ध झाला.

नंतर तो वाराणशीला गेला. तेथें त्यास त्याचे पांच पूर्वसहाध्यायी भेटले. सारनाथच्या मृगदावामध्यें त्यानें पहिलें प्रवचन दिलें व आपल्या नवीन मार्गाचा उपदेश त्यांना केला व नवीन धर्माचें प्रवर्तन केलें. (धर्मचक्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रवर्तन). पुढें तो मगधापासून अवंतीपर्यंत खूप हिंडला. विविध मतांचें खंडण करून त्यानें आपल्या धर्माची दीक्षा लोकांना दिली. त्याला समाजाचा चांगला पाठिंबा मिळाला. गरीब, श्रीमंत, उच्चनीच असा भेदाभेद न करतां त्यानें सर्वांस आपल्या धर्माचीं दालनें खुलीं केलीं. तत्कालीन अनेक राजे त्याचे चहाते बनले. याप्रमाणें दीर्घकाल धर्मप्रसार करून खि पू.४८७या वर्षीं कुशीनगर येथें त्याचें महापरिनिर्वाण झालें. मृत्यूनंतर त्याचे अवशेष आठ राजांत विभागून देण्यांत आले. प्रत्येकानें त्या अवशेषांवर स्तूप उभारून बुद्धाची स्मृति जिवंत ठेवली.

बुद्धाची शिकवण :

बुद्धाच्या शिकवणीचें सार त्यानें उपदेशिलेल्या चार प्रमुख तत्त्वांत आहे. (आर्य चत्वारि सत्यानि). (१) जगांत अनंत दुःख आहे. प्रत्येक गोष्टीपासून दुःख प्राप्त होतें. जरा, रोग, मृत्यु, वियोग, निराशा इत्यादि अनेक कारणांनीं जीवित दुःखमय होतें. (दुःख) (२) या सर्व दुःखाला मूळ आहे. या सर्व दुःखाचें मूळ अविधा आहे. अज्ञानामुळें प्रत्येक गोष्टीबद्दल तृष्णा, आसक्ति किंवा आशा निर्माण होते. या तृष्णेमुळें जीव संसारचक्रांत अडकतो व अनंत यातना भोगतो. [दुःखसमुदय] (३) हें सर्व दुःख टाळतां येण्यासारखें आहे. विषयोपभोगांची आसक्ति सोडली, तृष्णेचा त्याग केला कीं जन्ममरणाचा फेरा चुकतो व दुःखापासून मुक्तता होते. ज्या गोष्टीला आदि आहे तिला अंत असतोच. (दुःखनिरोध) (४) या आसक्तीचा त्याग करण्यासाठीं पुढील मार्गाचा अवलंब केला पाहिजे. [आर्य अष्टांगमार्ग] (अ) सम्यक् श्रद्धा–संसार दुःखमय आहे हें जाणून चार तत्त्वांवर निष्ठा पाहिजे. (आ) सन्यक् विचार–रागद्वेषापासून अलिप्त राहणें. कोणाचेंही वाईट चिंतू नये. (इ) सम्यक् वाक्–कोणालाही दुःख होईल असें बोलूं नये. परनिंदा करूं नये. नेहमीं खरें बोलावें. (ई) सम्यक् शील–नेहमीं सदाचार ठेवावा. लोभ, मोह टाळावेत. हिंसा करूं नये. चोरी, छिनाली, परस्त्रीगमन करूं नये. (उ) सम्यक् वृत्ति–चांगल्या मार्गानें पैसा मिळवावा. व्यवसायांत शुद्धता व नीति असावी. (ऊ) सम्यक् प्रयत्न–

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्कर्में करावींत. (ए) दक्षता, मनोनिग्रह, इंद्रियनिग्रह करण्यास शिकावें. (ऐ) सम्यक् समाधि—चिंतनामध्यें काल घालवावा.

उपनिषदांच्या आत्मवादामुळें अहंकार व ममता निर्माण होऊं लागली, म्हणून बुद्धानें अनात्मवाद शिकविला. कोठेंही स्थिर आत्मतत्त्व नसून प्रत्येक वस्तु अनेक अनित्य क्षणांनीं बनलेली असते. त्यामुळें सर्व अनित्य आहे. एका क्षणीं असलेली वस्तु दुसऱ्या क्षणीं नाश पावते. साधर्म्यालाच आपण तद्रूप समजतों. सर्व अनित्य असल्यानें दुःखमय आहे. कशापासूनही शाश्वत सुखाचा लाभ होऊं शकणार नाहीं. गौतमाचा कर्म व पुनर्जन्म यावर विश्वास होता. प्रत्येक जीव आपल्या पूर्वकर्मांचें फळ भोगतो. कर्मा-मुळें पुनर्जन्म व दुःख प्राप्त होतात. ईश्वरी कृपेनें मानवी सुखदुःखांत फेरबदल होऊं शकतो अशी शिकवण वैदिक कर्मकांडानें दिली होती. पण त्यामुळें विधींचें स्तोम माजून सदाचाराचें महत्त्व कमी झालें होतें. म्हणून बुद्धानें कर्मवादाचा पुरस्कार करून प्रत्येक कृत्याची जबाबदारी व्यक्तीवर टाकून उपभोगाशिवाय कर्मनिष्कृति होत नाहीं असें प्रतिपादन केलें. माण-साची आंतरिक सुधारणा व नैतिक आचरण यावर बुद्धाचा भर होता. प्रत्येक व्यक्तीनें स्वतःची उन्नति करून घेतली पाहिजे. आत्मा, ईश्वर, मोक्ष यांच्या तात्त्विक वादविवादापासून कसलीच फलनिष्पत्ति होणार नाहीं हें जाणून बुद्धानें त्याबद्दल मौन बाळगलें. आत्यंतिक भोग वा आत्मक्लेश, हिंसा वा अहिंसा, ज्ञान वा कर्म अशा सर्व अतिरेकीपणापासून बुद्धानें आपला मार्ग दूर ठेविला होता. म्हणून त्यास तो अभिमानानें मध्यम मार्ग (मध्यमा प्रतिपद्) म्हणत असे. अक्रोधानें क्रोध जिंकावा, साधुत्वानें असाधूस व औदार्यानें लोभास जिंकावें, प्रत्येकानें आपलें शील उच्च ठेवावें, संन्यस्त वृत्तीनें राहावें व तत्त्वचिंतन करावें, पाप करूं नये, पुण्य-कर्में करावींत व चित्तशुद्धि करावी हें बुद्धाच्या शिकवणीचें सार आहे. प्रज्ञा, शील व समाधि हीं बौद्धधर्माचीं त्रिरत्नें आहेत.

दुःखग्रस्त व्यक्तीस आशेचा नवीन संदेश पोहोंचविणें हेंच आपलें जीवितकार्य गौतमानें ठरविलें, व त्याकरितां तो ठिकठिकाणीं हिंडला. आपला संदेश प्रत्येकास समजावा म्हणून त्यानें मगधाची लोकभाषा पाली-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मधून प्रवचनें देण्यास सुरुवात केली. प्रवचनें शक्य तितकीं सोपीं, गोष्टींनीं नटलेलीं व बहुजनसमाजास आकर्षक होतील अशी तो काळजी घेत असे. त्याच्या धर्मांत सर्वांनाच सारखा प्रवेश मिळत असे. वेश्या वा दास, कुंभार वा खाटीक, ब्राह्मण वा शूद्र सर्वांना त्यानें आवाहन केलें.

बौद्धसंघ :

आपलें कार्य चिरंतन चालू राहावें म्हणून बुद्धानें भिक्षुसंघाची स्थापना केली. बुद्धाचे अनुयायी दोन प्रकारचे असत: (१) उपासक: संसारांत राहून गौतमाच्या शिकवणींचें आचरण करणारे. (२) सर्वसंगपरित्याग करून निर्वाणप्राप्तीची साधना करणारे. भिक्षूचें जीवन नियमांनीं बांधलेलें असे. प्रत्येक भिक्षूनें अहिंसा, सत्य व ब्रह्मचर्य पाळावें; चोरी व मद्यपान यांपासून अलिप्त राहावें; अवेळीं भोजन करूं नये; नाचगाण्यास जाऊं नये; सौंदर्यप्रसाधनांचा मोह टाळावा; गाद्यागिर्द्यांवर झोंपूं नये, व चांदी, सोनें यांचें दान घेऊं नये. मोह, अनाचार, भ्रष्टता यांपासून दूर गिरिकंदरांत वा विहारांत राहावें. संघाची घटना लोकशाही पद्धतीची होती. प्रत्येक विहारांत राहणाऱ्या भिक्षूंमध्यें समानता असे, व सर्वांच्या सहविचारानें कोणतीही गोष्ट केली जाई. दर पंधरवड्यास विहाराची सभा भरे. तेथें प्रत्येकानें आपल्या पापांचा कबुलीजबाब द्यावयाचा असे. प्रत्येक गुन्ह्याबद्दल अपराध्यास शिक्षा देण्याचा अधिकार संघास असे. स्त्रियांना संघामध्यें प्रवेश देण्यास बुद्धाचा प्रथम विरोध होता, पण नंतर त्यानें स्त्रियांना भिक्षुणी होऊन संघांत येण्याची परवानगी दिली.

बुद्ध व समाज :

प्रचलित ब्राह्मणधर्माविरुद्ध बुद्धानें बंड पुकारलें नव्हतें. कर्मकांडामुळें वैदिक धर्मांत नैतिक शैथिल्य आलें होतें. तें घालविण्याचा गौतमानें प्रयत्न केला. केवळ जन्मानें ब्राह्मण्य मिळत नसून ब्राह्मणानें आदर्श नैतिक आच-रण ठेवलें पाहिजे यावर बुद्धाचा कटाक्ष होता. ब्राह्मण व भिक्षु सदाचरणी असले तर सारखेच मानार्ह आहेत असें तो मानी. बुद्धानें जातिव्यवस्थेवरही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हल्ला केला नाहीं. ऐहिक जग अनित्य असल्यानें सामाजिक विषमतेला तो महत्त्व देत नसे. मरणोत्तर सर्वांनाच निर्वाण प्राप्त व्हावें हाच त्याचा प्रयत्न होता. मनुष्याच्या कर्मानुसार त्याला उच्चनीच जन्म प्राप्त होतो असें तो म्हणत असे. त्यामुळें बौद्धधर्म हा ब्राह्मणांच्या वर्चस्वाविरुद्ध, जातिसंस्थेविरुद्ध झगडा होता असें म्हणणें चूक ठरेल. वेदांचें प्रामाण्य त्याला मान्य नव्हतें. यज्ञीय हिंसेचा तो निषेध करी. विधि, संस्कार, समारंभ, डामडौल यांचा त्याला तिटकारा वाटे. त्याच्या शिकवणीचा अप्रत्यक्ष परिणाम जातिभेदाची प्रखरता कमी करण्यांत झाला.

धर्मसभा :

लवकरच भारतांत बौद्धधर्मानें चांगलें मूळ धरलें. गौतमाच्या मृत्यूनंतर खि. पू. ४८७ या वर्षी राजगृह येथें पहिली बौद्धधर्म सभा भरली. अजातशत्रूनें या सभेस साह्य केलें. अनेक बौद्ध भिक्षु या सभेस आले होते. बुद्धाच्या शिकवणीचा संग्रह करून तिचें संगोपन करणें हें महत्त्वाचें कार्य या सभेनें केलें. बौद्धशिष्य आनंद व उपाली यांनीं गौतमाचीं धर्मावरील व विनयावरील वचनें म्हणून दाखविलीं, व अशा रीतीनें सुत्तपिटक व विनय-पिटक या दोन धर्मसंग्रहांची सुरुवात झाली.

गौतमाच्या परिनिर्वाणानंतर भिक्षूंच्या आचारांबद्दल संघांत मतभेद निर्माण झाले. विनयपिटकांतील नियमांविरुद्ध वैशालीचे भिक्षु वागूं लागले. म्हणून शंभर वर्षांनंतर खि. पू. ३८७ मध्यें दुसरी धर्मसभा वैशाली येथें भरली. या सभेनें वैशाली भिक्षूंचा निषेध केला. पण वैशालीच्या भिक्षूंनीं स्वतंत्र महासंगीति भरवून आपलेच आचार बरोबर असल्याचा ठराव केला. त्यामुळें स्थविर (सनातनी) व महासांघिक (सुधारक) असे दोन गट बौद्धधर्मांत निर्माण झाले.

धर्मग्रंथ :

बौद्ध लोकांचा मुख्य धर्मग्रंथ म्हणजे त्रिपिटक होय. यांत सुत्तपिटक, विनयपिटक व अभिधर्मपिटक असे तीन विभाग आहेत. सुत्तपिटकांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्धाच्या उपदेशाचें सार दिलें आहे. विनयपिटकांत भिक्षूंनीं पाळावयाचे नियम व संघव्यवस्थेचे नियम दिले आहेत. तिसऱ्या पिटकांत बौद्धतत्त्वज्ञानाचा उहापोह केलेला आहे. तीनही विभाग संग्राहक स्वरूपाचे असून पहिले दोन जुने व तिसरा कालांतरानें निर्माण झालेला आहे. सध्यां फक्त पाली भाषेंतील त्रिपिटकच संपूर्णपणें उपलब्ध आहे.

धर्मप्रसाराचीं कारणें :

बुद्ध, धर्म व संघ हीं बौद्ध धर्माचीं तीन रत्नें म्हणून समजलीं जातात. बौद्धधर्माच्या प्रसारास तीं उपयोगी पडलीं. (१) आदर्श नेता—गौतमाचें जीवन अत्यंत उदात्त होतें. बापाचा एकुलता एक आवडता पुत्र, लहानपणापासून अत्यंत सुखांत वाढलेला, असें असतांही इतरांना दुःखापासून मुक्त होण्याचा मार्ग शोधून काढण्यासाठीं त्यानें वैराग्य पत्करलें होतें. तरुण राजपुत्रानें जगासाठीं केलेला हा अनुपम त्याग आणि त्यासाठीं भोगलेल्या यातना व कष्ट यामुळें सामान्य लोकांचीं मनें भारून गेलीं. बुद्धाचें रुबाबदार शरीर, अमोघ वक्तृत्व व जगासाठीं स्वसुखावर तिलांजलि देण्याचें लोकविलक्षण धैर्य यामुळें त्याच्या शब्दाशब्दांतून तळमळ ओसंडत असे व त्या कळकळीच्या उपदेशानें लोक चटकन् त्याचे अनुयायी होत. गौतमाच्या मृत्यूनंतरही त्याचें उदाहरण लोकांवर विलक्षण छाप बसवीत असे. (२) साधी शिकवण—गौतमाची शिकवण अगदीं साधी व सामान्य जनांस समजण्यासारखी सोपी होती. त्याच्या शिकवणीचें सार म्हणजे सदाचरण करणें एवढेंच होतें. चांगलें कर्म केलें असतां चांगली गति मिळते, व तेंच प्रत्येकाचें ध्येय असावें हेंच त्याचें तत्त्वज्ञान. त्यामुळें उपनिषदांचें गहन तत्त्वज्ञान व ब्राह्मणांचें गहन कर्मकांड यांना कटाळलेले सामान्य लोक बौद्ध धर्माकडे वळले तर नवल कसलें? (३) लोकभाषेचा स्वीकार—बुद्धानें आपला धर्मप्रचार लोकभाषेंतच केला. मगधाची पाली ही त्यावेळची लोकभाषा होती. बौद्ध वाङ्मयही पालींतच लिहिलें गेलें. त्यामुळें सामान्य माणसासही त्यचें वाचन करून बौद्धधर्माचें चांगलें ज्ञान होई. बुद्धानें आपलीं प्रवचनें बहुजनसमाजास समजतील अशी, गोष्टी व दृष्टांत यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
पुस्तकालय गुरुकुल काँगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रूपानें दिली व बौद्ध भिक्षूंनीं तीच प्रथा चालविली. त्यामुळें बौद्धांची शिकवण अधिक परिणामकारक होई. (४) समानतेची वागणूक-वैदिक धर्मामध्यें ब्राह्मणांचें वर्चस्व होतें. स्त्रिया व शूद्र यांना धर्माधिकार कांहींच नव्हते. क्षत्रिय व वैश्य हेही हळूहळू शूद्रत्वाप्रत नेले जात होते जन्मजात जातिभेदामुळें सामाजिक विषमता वाढत होती. त्यामुळें बरेच लोक वैदिक धर्माला कंटाळले होते. बौद्ध धर्मात सर्वांनाच प्रेमाची, समानतेची व स्वातंत्र्याची वागणूक दिली जाई. बौद्ध धर्मात प्रत्येकाला आपली उन्नति करून घेण्यास पूर्ण वाव होता (५) वैदिक धर्माची गहनता-वैदिक धर्मामध्यें यज्ञमार्गाचें स्तोम इतकें माजलें कीं, सामान्य माणसाच्या तें आवांक्याबाहेर गेलें. यज्ञामध्यें धर्माच्या नांवाखालीं होणाऱ्या पशुहत्येनें सहृदय माणसांना शिसारी येई. विधि व संस्कार यामुळें धार्मिकतेस फांटा मिळून वैदिक धर्म आत्महीन यंत्रासारखा झाला होता. औपनिषदिक गहन तत्त्वज्ञान सामान्य माणसास समजत नसे. (६) संघ-बौद्धसंघांतून अनेक त्यागी व प्रभावी प्रसारक निर्माण झाले. दुःखी जगाला शांतीचा संदेश देण्याचें उदात्त कार्य करण्यासाठीं त्यांनीं अनेक हालअपेष्टांना टक्कर देऊन गौतमाचें जीवितकार्य पुढें चालविलें. त्यांची विनम्र वृत्ति, सदाचरण, त्याग, पावित्र्य या सर्वांचा लोकमनावर विलक्षण प्रभाव पडे. अनेक धर्मप्रचारक दुर्लंघ्य पर्वत ओलांडून परदेशांत गेले व अनेक अडचणींना तोंड देऊन त्यांनीं तेथें धर्मप्रसार केला. बौद्ध विहार म्हणजे पावित्र्याचीं, मांगल्याचीं व त्यागाचीं स्फूर्तिस्थानें ठरलीं. लोकशिक्षणाचें कार्य तेथें अव्याहत सुरू असे. (७) राजाश्रय-स्वतः गौतम राजघराण्यांतील असल्यानें त्यास इतर राजांचें साहाय्य सहज मिळूं शकलें. बुद्धाच्या हयातींतच शुद्धोदन, बिंबिसार इत्यादि राजांनीं बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. पुढें २५० वर्षांनीं सम्राट् अशोकानें राजाश्रय देऊन बौद्धधर्मप्रसार हें आपलें जीवितकार्य केलें. सर्वत्र धर्मप्रचारक पाठवून त्यांना सर्व तऱ्हेची मदत दिली. पुढें मिलिंद, कनिष्क व हर्ष अशा प्रख्यात राजांनीं बौद्धधर्म स्वीकारून धर्मप्रसारास साह्य केलें. (८) परिस्थितीशीं जुळतें घेण्याची हातोटी-जेथें जेथें बौद्धधर्मानें प्रवेश केला तेथें तेथें स्थानिक परिस्थितीशीं एकरूप होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाग्याचें विलक्षण सामर्थ्य बौद्धभिक्षूंनीं दाखविलें. भाषा, देवता, आचार या सर्वच बाबतींत बौद्धांनीं लोकप्रिय गोष्टी उचलल्या. त्यामुळें बौद्ध धर्मांत बरेंच परिवर्तन होत गेलें.तरीही बौद्धांनीं आग्रही सनातनीवृत्ति दाखविली नाहीं. त्यामुळें परदेशांत बौद्धधर्म खूपच लोकप्रिय झाला व अद्यापिही तेथेंच तो जिवंत आहे.

वर्धमान महावीर (ख्रि. पू. ५३९–ख्रि. पू. ४६७) :

जैनपरंपरेप्रमाणें महावीर हा जैनधर्माचा संस्थापक नसून चालू युगांतील एक प्रणेता होता. युगायुगांमध्यें असे चार प्रणेते होऊन गेले. त्यांस तीर्थंकर म्हणतात. त्यांपैकीं बावीस तीर्थंकरांचें अस्तित्व इतिहासकार मानीत नाहींत. तेविसावा तीर्थंकर पार्श्वनाथ हा महावीरापूर्वी २५० वर्षें होऊन गेला अशी जैनपरंपरा आहे. त्यानें परिव्राजकांचा एक संघ निर्माण केला होता. आत्मसंयम व तप यांवर त्याचा भर होता. परिव्राजकांसाठीं त्यानें चार नियम घालून दिले होते : (१) सत्य, (२) अहिंसा, (३) अस्तेय, व (४) अपरिग्रह.

जैनांचा चोविसावा तीर्थंकर वर्धमान महावीर हा ख्रि पू. ५३९ मध्यें वैशालीच्या कुंडग्राम या उपनगरांत जन्मला. त्याचा बाप सिद्धार्थ हा ज्ञातृक जमातीचा मुख्य होता; व आई त्रिशला ही लिच्छवींचा राजा चेटक याची बहीण होती. त्याचें लग्न यशोदा नामक सुंदर स्त्रीशीं झालें होतें व त्याला एक मुलगी झाली होती. त्याचे आईबाप पार्श्वनाथाच्या पंथाचे उपासक होते. त्याच्या मृत्यूनंतर त्यास ऐहिक सुखाबद्दल विरक्ति उत्पन्न झाली. वयाच्या तिसाव्या वर्षीं सुखाचा संसार सोडून तो संन्यासी बनला, व उग्र तपःसाधना करीत तो बारा वर्षें फिरला. दिगंबर वृत्तीनें रहावयाचें व आत्मक्लेश भोगावयाचे हेंच त्याचें जीवन बनलें. वयाच्या ४२ व्या वर्षीं त्याला केवल ज्ञानाची प्राप्ति झाली. इंद्रियांवर त्यानें जय मिळविला, म्हणून तो जैन महावीर या नांवानें प्रसिद्धीस आला. आपलें उर्वरित आयुष्य त्यानें धर्मप्रचारांत घालविलें. विदेह, अंग, मगध, कोसल इत्यादि देशांतून तो फिरला. त्याला पुष्कळच अनुयायी मिळाले. त्यांना जैन किंवा निर्ग्रंथ (संसारबंधनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोडणारे) म्हणतात. मगधाच्या शैशुनाग राजांनीं त्याला उदार आश्रय दिला. तो वयाच्या ७२ व्या वर्षी (ख्रि. पू. ४६७) पावा येथें मृत्यु पावला.

महावीराची शिकवण :

सम्यक् दर्शन, सम्यक् ज्ञान व सम्यक् चारित्र्य हीं जैन धर्माचीं तीन मुख्य तत्त्वें असून त्यांस त्रिरत्न म्हणतात. सम्यक् दर्शन म्हणजे महावीर सर्वज्ञानी व प्रमादातीत आहे यावर श्रद्धा ठेवणें. सम्यक् ज्ञान म्हणजे महावीराच्या शिकवणीचें ज्ञान करून घेणें. सम्यक् चारित्र्य म्हणजे त्याप्रमाणें आचरण करणें. प्रत्येक वस्तूंत आत्मा असून असे अनंत आत्मे या विश्वांत भरलेले आहेत. आत्मा शुद्ध स्वरूपांत ज्ञानी व मुक्त असतो. कर्माच्या बंधनानें तो जन्ममरणाच्या फेऱ्यांत अडकतो. जैनांची कर्माची कल्पना भौतिक आहे. कर्माचे अनंत सूक्ष्म कण असतात. आत्म्यानें कर्म केलें म्हणजे ते त्या आत्म्याला चिकटतात व अधोगतीला नेतात. या कर्मबंधांतून मुक्त होण्यासाठीं आत्म्यानें नवीन कर्मे करण्याचें थांबविलें पाहिजे, व तप करून जुनीं कर्मे जाळिलीं पाहिजेत. असें झालें म्हणजे केवल ज्ञान होऊन आत्मा मुक्त होतो. महावीर ईश्वराचें अस्तित्व मानीत नाहीं. हें विश्व अनादि असून प्रत्येक आत्म्याच्या कर्माप्रमाणें परिणत होत असतें. कर्मफल भोगल्यावांचून कोणाचीही सुटका होत नाहीं. जितका अधिक देहदंड तितकें जास्त कर्मक्षालन होतें. त्यामुळें व्रतोपवास, तपाचरण, आत्मक्लेश यांना जैनधर्मांत मोठें स्थान आहे. जीवित दुःखमय असल्यानें देहदंडानें शरीर झिजवून जीविताचा अंत करून घेणें जैनधर्मास संमत आहे.

सम्यक् आचार म्हणजे श्रमण व श्रावक (सामान्य जन) यांनीं पाळावयाचे नियम होत. दोघांसाठीं वेगवेगळे नियम आहेत. प्रत्येक साधूनें पंच महाव्रतें पाळलीं पाहिजेतः (१) अहिंसा—कायावाचामनेंकरून कोणालाही दुःख द्यावयाचें नाहीं हा जैनधर्माचा महत्त्वाचा दंडक आहे. जळीं, स्थळीं व हवेंत सर्वत्र आत्मे असल्यामुळें त्यांची हिंसा होऊं नये म्हणून साधूनें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फार दक्षतेनें वागलें पाहिजे. (२) सत्यं–साधूनें सत्याचाच विचार व उच्चार करावा. (३) अस्तेय–न दिलेली कोणतीही गोष्ट घेऊं नये. (४) अपरिग्रह–स्वार्थी, श्रीमंत वा सुखासक्त राहूं नये. कसलाही संचय करूं नये. (५) ब्रह्मचर्य–स्त्रीसंग करूं नये. व दिगंबर राहावें. पार्श्वनाथाच्या चतुः-सूत्रींत महावीरानें या दोन गोष्टींची भर घातली. याखेरीज तप, उपोसथ (पापकर्मांची कबुली), विनय, चिंतन व स्वाध्याय या गोष्टी त्यानें केल्या पाहिजेत. या आचारानें कर्मनाश होऊन कैवल्याची (मोक्षाची) प्राप्ति होते. प्रत्येक गृहस्थाश्रमी श्रावकानें प्राणिहिंसा, असत्य भाषण, चोरी, पर-स्त्रीशीं व्यभिचार व हावरटपणा या गोष्टी न करतां प्राणिमात्राला संरक्षण देणें, योग्य अहिंसक धंदा निवडून चरितार्थ चालविणें, दानधर्म करणें, उपवास पाळणें व साधुसेवा करणें इत्यादि गोष्टी श्रावकानें कराव्यात. एकंदरींत तत्त्वज्ञान व आचार या बाबतींत जैनांच्या कल्पना अप्रगत व कर्मठपणाच्या आहेत. जैनधर्म लोकप्रिय न होण्याचें हें प्रमुख कारण आहे.

जैनांच्या साधूंमध्यें ज्ञानानुरूप उच्चनीचता असते. त्यामुळें संघारामाचा कारभार लोकतंत्र नसतो. ज्ञानज्येष्ठ साधु हा संघारामाचा प्रमुख असतो. साधु व उपासक या दोघांचाही संघांत समावेश होतो. साधूंची सेवा करून त्यांचा चरितार्थ चालविण्याची जबाबदारी सर्व उपासकांवर असते.

जैन धर्मग्रंथ :

महावीरानें प्राकृत भाषेंतच लोकांना उपदेश केला. महावीराचा उपदेश त्याच्या शिष्यपरंपरेनें जतन करून ठेविला होता. त्याच्या शिकवणीच्या संग्रहास पूर्व म्हणत व त्यांची संख्या चौदा होती. महावीरानंतर १७० वर्षांनीं ही परंपरा खंडित झाली व फक्त दहा पूर्वेंच शिल्लक राहिले. तेव्हां त्यांचें संहितीकरण करून द्वादशांग तयार केलें गेलें. पुढें ही मौखिक परंपरा लोपूं लागल्यानें इ. स. ४५४ मध्यें वलभी येथें भरलेल्या धर्म-सभेनें त्या ग्रंथांचें स्वरूप पुनः निश्चित केलें. पण जैनांच्यापैकीं फक्त एक पंथच या ग्रंथांना प्रमाण मानतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जैनधर्माचा इतिहास :

महावीराचे तत्कालीन अनेक राजघराण्यांशीं आप्तसंबंध असल्यानें त्याला उदार राजाश्रय मिळाला. बिंबिसार व अजातशत्रु हे दोघेही त्याचे मित्र होते. उदायी हा जैन बनला. नंदराजे जैन धर्माचे पक्के अभिमानी होते. त्यानंतरही चंद्रगुप्त मौर्य, कलिंगाचा खारवेल यांनींही जैन धर्माचें अनुयायित्व स्वीकारल्याचें समजतें. चंद्रगुप्ताच्या काळीं उत्तरेमध्यें मोठा दुष्काळ पडला म्हणून भद्रबाहु या आचार्याच्या नेतृत्वाखालीं हजारों जैन दक्षिणेकडे म्हैसूर प्रांतांत येऊन राहिले. इकडे मगधांत उरलेल्या जैन साधूंनीं शुभ्र वस्त्रें नेसण्यास सुरुवात केली होती. पवित्र चौदा पूर्वांचा लोप होऊं लागला होता. म्हणून त्यांनीं एक परिषद् भरवून शिल्लक उरलेल्या दहा पूर्वांचें संहितीकरण करून बारा अंगें तयार केलीं. दुष्काळानंतर परतलेल्या जैन साधूंना मागधी साधूंचें वर्तन आवडलें नाहीं व जैनांत फूट पडली. या फुटींतून इ. स. पहिल्या शतकामध्यें श्वेतांबर व दिगंबर असे दोन पंथ निर्माण झाले. साधूनें विवस्त्र राहावें, स्त्रियांना या जन्मीं मोक्ष मिळत नाहीं, एकोणिसावा तीर्थंकर हा पुरुष होता, मूळचे धर्मग्रंथ अजिबात लुप्त झाले आहेत असें दिगंबर जैन मानतात. उलट, श्वेतांबर जैन साधूला श्वेत वस्त्र वापरण्याची मोकळीक देतात. स्त्रियांना या जन्मींच मोक्ष मिळूं शकेल, व परिषदेनें ठरविलेले धर्मग्रंथ प्रमाणभूत आहेत असें श्वेतांबर जैन मानतात.

या दुष्काळाच्या वेळीं कांहीं जैन कलिंग देशामध्यें राहावयास गेले. कालांतरानें तेथें त्यांना चेदिराजा खारवेल याचा पाठिंबा मिळून तेथें जैनधर्माची भरभराट झाली. अशाच देशांतरामुळें मथुरेला जैनांची वस्ती वाढली व मथुरा जैनधर्माचें एक केंद्र बनलें. अशोकाचा नातू संप्रति यानें जैनधर्मप्रसारार्थ माळवा, आंध्र व तामीळदेश येथें धर्मप्रचारक पाठविले. त्यांच्यामुळें त्या त्या भागांत जैनधर्माचा प्रसार झाला. नंतरच्या काळांत राजपुताना, गुजराथ व कर्नाटक येथें जैनधर्माचा प्रसार होऊन आजही या विभागांत जैनांची वस्ती शिल्लक आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपदेशक पाठवून धर्मप्रसार करण्याचा जैनांनीं फारसा प्रयत्न कधींच केला नाहीं. जैनधर्म शांततेचा पुरस्कर्ता असल्यानें हिरिरीनें परमतखंडण करून स्वधर्माचा प्रसार करणें हें जैन साधूंना कधींच मानवलें नाहीं. जैनांचा आचार कठीण असल्यानें तो लोकप्रिय होऊं शकला नाहीं. कालांतरानें जैनांनीं हिंदूंची मूर्तिपूजा, जातिभेद इत्यादि अनेक गोष्टी उचलल्या आहेत. जैनांच्या शिकवणीनें भारतांत अहिंसा वृत्तीची वाढ झाली. जैन तत्त्वज्ञान क्षात्रधर्मविरोधी असल्यानें जेथें जेथें जैनांचा प्रसार झाला तेथें तेथें क्षात्रवृत्तीचा लोप झाला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण बारावें

मौर्यपूर्व कालाचा सांस्कृतिक इतिहास

(अ) राज्यव्यवस्था :

या काळांत विविध प्रकारच्या राज्यपद्धति प्रचलित असल्याचें दिसतें. बरीचशीं राज्यें राजसत्ताक होतीं. शाक्य, मल्ल, लिच्छवी इत्यादि जमातींत महाजनसत्ताक पद्धति रूढ होती. शिबि, कठ, क्षुद्रक, मालव, अंबष्ठ इत्यादि जमातींत गणतंत्र व्यवस्था होती. अवन्ती, कोसल व मगध यांनीं साम्राज्य स्थापण्याचे विविध प्रयत्न केले व त्यांत मगधाची सरशी झाल्याचें आपण वाचलेंच आहे. राज्याराज्यांमध्यें बहुधा नेहमींच वैर असे. त्यांतून लढाईचे प्रसंग उद्‌भवत. लढ्याचें पर्यवसान पुष्कळदां विवाहसंबंधांत होई.

गणतंत्र राज्यांत सर्वांना समान राजकीय हक्क असत. अशा राज्याचा कारभार लोकनियुक्त प्रतिनिधीमार्फत चाले. प्रत्येक गणराज्यांत लोकसमिति असे. प्रतिनिधींची निवड करण्याचें व वेळोवेळीं त्यांना सल्लामसलत देण्याचें काम समिति करीत असे. समितीचें सर्व कामकाज पार्लमेंटरी पद्धतीनें चाले. गणराज्यांत खडें सैन्य नसे. वयांत आलेल्या प्रत्येक व्यक्तीवर राष्ट्ररक्षणाची जबाबदारी असे. या गणराज्यांच्या धर्तीवरच बुद्धानें आपल्या धर्मसंघाची उभारणी केली होती.

राजसत्ताक राजामध्यें राजेपद वंशपरंपरेनें चालत असे. या काळांत क्षत्रियेतर वर्णांचेही राजे होऊन गेले. राजा हा राष्ट्राचा प्रमुख असून सर्वतंत्रस्वतंत्र असे. त्याला सल्लामसलत देण्यासाठीं एक सभा असे. त्यांत मंत्री, सेनाप्रमुख व इतर कांहीं प्रतिष्ठित लोक यांचा अंतर्भाव होई. या सभेचा सल्ला राजावर बंधनकारक नसे. राज्यकारभाराच्या सोयीसाठीं विविध खातीं पाडून तीं निरनिराळ्या मंत्र्यांकडे सोंपविलेलीं असत. त्यांच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हाताखालीं महामात्र, सर्वार्थक इत्यादि लहानमोठे विविध अधिकारी असत. प्रांताधिपाला स्थपति म्हणत व त्या जागीं बहुधा राजपुत्राची नेमणूक होई.

लोकांवर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असे विविध कर लादून राज्याचें उत्पन्न मिळत असे. खेरीज, राजा स्वतः देशांतील मोठा जमीनदार असे. नद्या, पर्वत, जंगलें, कुरणें, खाणी इत्यादिकांवर राजाचें स्वामित्व असल्याचा नंदांनीं पुकारा केला व राज्याचें उत्पन्न वाढविलें. ग्रामणी हा राजसेवक असून राजाच्या वतीनें तो गांवकारभार पाही.

सैन्यामध्यें चतुरंग दल असून सेनापति हा त्याचा प्रमुख असे. धनुष्य-बाण, तलवार, भाला, गदा, परशु, शतघ्नी इत्यादि विविध शस्त्रें सैनिक वापरीत. सैनिकी पेशा सर्वांना खुला होता.

(ब) सामाजिक स्थिति :

जन्मजात जातिसंस्थेची या काळांत वाढच झाली. प्रत्येक जातीचा व्यवसाय व आचार निश्चित होऊं लागले. बौद्ध–जैनांच्या शिकवणीमुळें ब्राह्मणांच्या सामाजिक वर्चस्वाला धक्का बसला. तेव्हां तें वर्चस्व टिकविण्या-साठीं ब्राह्मण आपल्या नैतिक श्रेष्ठतेवर भर देऊं लागले. त्याचा परिणाम आहारविहाराच्या बाबतींत ब्राह्मणांवर नवीन निर्बंध पडण्यांत झाला. मांसाहार ब्राह्मणांना निषिद्ध झाला. विवाहासाठीं जातीच्या बाहेर फारसें जाण्याची प्रवृत्ति नव्हती. अनुलोम विवाहांना समाजमान्यता मिळे, पण प्रतिलोम विवाहाचा निषेध होई. प्रतिलोम विवाहाची संतति हीन जातीची समजली जाई. चांडालादि अनेक हीन जाति यावेळीं अस्तित्वांत होत्या. हीनजाति गांवाबाहेर राहात. त्यांना गांवांत फिरण्याची मुभा नसे. हीनजातीयांच्या स्पर्शानें विटाळ होतो ही कल्पना रूढ झाली होती. त्यामुळें अस्पृश्यता निर्माण झाली होती. नवीन धर्मपंथांनीं संन्यासमार्गाची शिकवण दिल्यामुळें समाजधारणेला धोका निर्माण झाला. म्हणून या कालांत आश्रमकल्पना जोरानें मांडली गेली. अपत्योत्पादन न करतां संन्यास घेतल्यास मोक्ष मिळणार नाहीं असें प्रतिपादन होऊं लागलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्त्रियांना शिक्षण देण्याची परंपरा या काळापर्यंत थोडीबहुत टिकून राहिली होती. नवीन पंथांनीं संन्यासधर्माचीं दारें स्त्रियांनाही खुलीं केल्यामुळें सामाजिक प्रतिक्रिया निर्माण झाली. स्त्रियांच्या समान हक्कांचें युग केव्हांच संपलें होतें. खुद्द गौतमबुद्धही संघामध्यें स्त्रियांना प्रवेश देण्यास सुरुवातीस तयार नव्हता. सामाजिक प्रतिक्रियेनें प्रत्येक स्त्रीला विवाह हा आवश्यक ठरविला गेला. त्यांची जबाबदारी पालकांवर टाकण्यांत आली. याचा परिणाम स्त्रियांच्या विवाहाचीं वयोमर्यादा अलीकडे ओढण्यांत झाला. तिचें शिक्षण बंद झालें. स्त्रीस्वातंत्र्याचा संकोच होऊं लागला.

आर्थिक परिस्थिति :

बहुतेक लोक खेड्यांत राहात व शेतीवर गुजराण करीत. बहुतेक शेतकऱ्यांचीं लहान लहान शेतें असत. मोठाले जमीनदार तुरळक असत. त्यांच्या जमिनी कुळांकडे खंडानें दिलेल्या असत. शेतीच्या उत्पन्नावर सरकारी कर असून तो जमिनीच्या मगदुराप्रमाणें कमीजास्त असे. सरकार-तर्फें सर्व कर ग्रामभोजक गोळा करी. जमिनीचे सर्व व्यवहार ग्रामभोज-काच्या अनुमतीनें करावे लागत. शेतीला पाणीपुरवठा, ग्रामसफाई इत्यादि सर्व बाबतींत गांवकरी लोक परस्पर सहकार्यानें वागत. शेतीखेरीज ग्रामीण विभागांत अनेक उद्योगधंदे चालत. श्रमविभागणी व धंद्याचें विशिष्टीकरण यांची चांगलीच प्रगति झाली होती. सोनार, सुतार, कुंभार, मालाकार, चांभार, खाटीक, शिकारी, कोळी, विणकर, न्हावी इत्यादि अनेक व्यवसाय खेड्यांतून चालत. प्रत्येक व्यवसायाची संघटना असे. व्यावसायिक नीतीची अंमलबजावणी करणें, व्यवसायांत संघर्ष टाळणें, मारक चढा-ओढीस प्रतिबंध करणें इत्यादि विविध कामें व्यावसायिक श्रेणी करीत असत. परस्पराविषयीं विश्वास, सहकार्याची वृत्ति व शिस्त यामुळें ग्रामीण जीवन पुष्कळ सुखाचें असे. चोरांचे सुद्धां संघ असत असे उल्लेख जातकां-तून आढळतात. कांहीं व्यवसाय कनिष्ठ मानले जात व ते करणाऱ्यांना हीन सामाजिक दर्जा मिळे.

अंतर्गत व आयातनिर्यात व्यापार मोठ्या प्रमाणावर चाले. भारतांतून तलम कापड, मलमल, रेशीम, हत्यारें, कलाबतूचें कापड, जरीचें कापड,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांबळीं, सुगंधी पदार्थ, हस्तिदंत, औषधें, विविध पशुपक्षी यांची निर्यात होत असे. ब्रह्मदेश, सिलोन, इराण, मध्य आशिया, बाबिलोन इत्यादि देशांशीं निर्यात व्यापार चाले. भडोच, शूर्पारक, ताम्रलिप्ती हीं मोठालीं व्यापारी बंदरें होतीं. श्रावस्ती, कौशांबी, उज्जयिनी, राजगृह, वैशाली, काशी, तक्षशिला, चम्पा, साकेत हीं मोठालीं व्यापारी शहरें होतीं. या शहरांना जोडणारे व्यापारी राजमार्ग अस्तित्वांत होते. वस्तुविनिमयांतून पैशाचा व्यवहार सुरू झाला होता. कार्षापण, पुराण, धरण, निष्क इत्यादि तांबें, चांदी, सोनें या धातूंचीं नाणीं प्रचारांत आलीं होतीं. या नाण्यांच्या एका बाजूस पशु, पक्षी, देव इत्यादिकांचा छाप असे व दुसऱ्या बाजूस नाणें पाडणाऱ्या श्रेणीचें व श्रेष्ठीचें चिन्ह असे. याशिवाय पुष्कळसा व्यवहार पतीवरच चाले. व्यापारासाठीं भागीदारी करीत वा संघ स्थापीत. मालाची नेआण करतांना व्यापारी समूह करून हिंडत. व्यापारी मार्गावर बरींच अरण्यें असल्यानें चोराचिलटांचा उपद्रव होत असे. मोठमोठ्या शहरीं व्यापाऱ्यांच्या श्रेणी (संघ) असत. संघाचा प्रमुख श्रेष्ठी असे. व्यापाऱ्यांतील तंटे मिटविणें, त्यांना मार्गदर्शन करणें, राजदरबारीं व्यापाऱ्यांचें प्रतिनिधित्व करणें इत्यादि कामें श्रेणी करीत.

वाङ्मय :

खि. पू. सातव्या शतकांत सुप्रसिद्ध व्याकरणकार पाणिनि होऊन गेला. त्यानें लिहिलेली अष्टाध्यायी हा संस्कृत व्याकरणाचा अपूर्व ग्रंथ आहे. सुमारें ४००० छोट्या सूत्रांनीं त्यानें संस्कृत भाषेला नियमबद्धता, कांटे-कोरपणा व बांधेसूदपणा आणून ठेविला आहे. धातूवरून शब्दसिद्धि करण्याचा अभिनव प्रयत्न त्यानें केला. खि. पू. ३५० च्या सुमारास कात्यायनानें वार्तिकग्रंथ लिहून पाणिनीच्या नियमांचें स्पष्टीकरण व पूरण केलें. सांख्य व योग या तत्त्वज्ञानांचे प्रवर्तक या सुमारासच होऊन गेले. अर्थ व काम या शास्त्रांवर पुष्कळ आचार्यांनीं विविध लेखन केलें आहे. त्यांपैकीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुष्कळांचीं नांवें मात्र कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून समजतात. बौद्ध व जैन यांचें धार्मिक वाङ्मयही या कालांत तयार होत होतें.

अयोध्या, काशी, उज्जयिनी, तक्षशिला इत्यादि प्रतिष्ठित विद्यास्थानें होतीं, व तेथें विविध शास्त्रांचे पारंगत आचार्य राहात. त्यांच्याकडे लांब-लांबचे विद्यार्थी विद्यार्जनासाठीं जात. धार्मिक शिक्षणाखेरीज लौकिक विद्याही तेथें शिकवीत. पाणिनि, बिंबिसाराचा राजवैद्यजीवक, कौटिल्य इत्यादि विद्वद्रत्नें तक्षशिलेच्या विद्यापीठाचीं भूषणें होतीं.

या कालांतील वास्तु वा शिल्प यांचे अवशेष सध्यां उपलब्ध नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण तेरावें

मौर्यकाल

[ख्रि. पू. ३२३ ते ख्रि. पू. १८७]

प्रास्ताविक :

भारताच्या इतिहासांत मौर्य वंशाच्या स्थापनेनें एका नवीन युगास आरंभ झाला. देशाच्या बऱ्याच मोठ्या भागावर प्रथमच एकछत्री साम्राज्याची स्थापना होऊन भारताचें राजकीय ऐक्य निर्माण झालें. परकीय आक्रमणाचा कलंक धुतला जाऊन हिंदुकुशपर्यंतचा प्रदेश भारतीय साम्राज्यांत सामील झाला. राज्यकारभाराचा एक थोर आदर्श निर्माण करण्यांत येऊन या खंडप्राय देशांत सुस्थिर राज्यकारभार सुरू झाला. भारतीय संस्कृति व धर्म यांचा भारताबाहेर प्रचार करण्याचा महान् प्रयत्न केला गेला. शांति, विश्वबंधुत्व व सांस्कृतिक सहजीवन या विशुद्ध भारतीय तत्त्वांचा जगभर प्रसार होऊं लागला.

या काळाच्या इतिहासाचीं विपुल व विश्वसनीय साधनें उपलब्ध आहेत. कौटिल्याचें अर्थशास्त्र, अशोकाचे शिलालेख व मेगॅस्थिनीस याचा ' इंडिका ' ग्रंथ हे तत्कालीन इतिहासावर चांगलाच प्रकाशझोत पाडतात. हिंदु पुराणें, बौद्ध व जैन धार्मिक वाङ्मय, मृच्छकटिक नाटक यांच्यामधूनही परस्पर विसंगत पण विविध माहिती मिळते.

चंद्रगुप्त मौर्य (ख्रि. पू. ३२२ ते ख्रि. पू. २९८):

या वैभवशाली युगाचा प्रवर्तक भारताचा पहिला ऐतिहासिक सम्राट् चंद्रगुप्त हा होता. या चंद्रगुप्ताच्या कुळाविषयीं परस्परविरोधी वृत्तांत आढळतात. शेवटच्या नंदराजाचा मुरा नांवाच्या दासीपासून झालेला तो

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दासीपुत्र होता असा विष्णुपुराणांत उल्लेख आहे. मृच्छकटिक नाटकांत चंद्रगुप्ताला वृषल व कुलहीन म्हणून म्हटलेलें आहे. पण मुरावरून मौर्य ही व्युत्पत्ति अपाणिनीय आहे. शिवाय बौद्ध ग्रंथांतून चंद्रगुप्त क्षत्रिय असल्याचा उल्लेख आहे. ग्रीक इतिहासकारही चंद्रगुप्ताला क्षत्रियच म्हणतात. त्यावरून तो क्षत्रिय असावा असें वाटतें. नेपाळ तराईमध्यें गौतमबुद्धाच्या काळीं मौर्यांचें गणराज्य असल्याचा उल्लेख बौद्धवाङ्मयांत येतो. त्यावरून चंद्रगुप्त मौर्यकुळांतील क्षत्रिय होता हें अनुमान सहजच निघतें.

या सुमारास मगधाचें नंदसाम्राज्य कळसास पोहोंचलें होतें. अगणित संपत्ति व अफाट सैन्य यांच्या जोरावर नंदराजे राज्यकारभार पाहात होते. पण जुलमी कारभार, आर्थिक पिळवणूक, राजांची शीलभ्रष्ट वागणूक यामुळें नंदराजे प्रजेंत अप्रिय झाले व असंतोष धुमसूं लागला. या असंतोषाचा फायदा घेण्याचें चंद्रगुप्तानें ठरविलें. तो नंदांच्या सैन्यांत वरच्या हुद्यावर अधिकारी होता. लष्करी उठावाचा त्याचा प्रयत्न फसला व त्यालाच राज्याबाहेर परागंदा व्हावें लागलें. या सुमारास सुदैवानें त्याची गांठ चाणक्य नांवाच्या धोरणी ब्राह्मण मुत्सद्याशीं पडली. तक्षशिलेच्या या विद्वानाचा नंदराजानें अपमान केला होता व त्याचा सूड घेण्याची घोर प्रतिज्ञा त्या ब्राह्मणानें केली होती. दोघांनीं पंजाबांत सैन्याची जमवाजमव सुरू केली. शिकंदर यावेळीं भारतांत होता. त्याचीहा मदत मिळविण्याचा चंद्रगुप्तानें प्रयत्न केला. पण चंद्रगुप्ताच्या स्वाभिमानी राष्ट्रीय वृत्तीमुळें ग्रीकांशीं त्याचें जमलें नाहीं. शिकंदराच्या स्वारीमुळें दुखावलेले अनेक योद्धे चंद्रगुप्ताला मिळाले. खि. पू. ३२५ मध्यें दक्षिण पंजाबचा ग्रीक सत्रप (राज्यपाल) फिलिप याचा खून पाडण्यांत आला. चंद्रगुप्त मुक्तिसेनेचा पुढारी बनला. पुढें खुद्द शिकंदर खि. पू. ३२३ मध्यें अचानक मरण पावला व त्याच्या साम्राज्याच्या वांटणीबद्दल त्याच्या सेनापतींत भांडणें सुरू झालीं. तेव्हां चंद्रगुप्तानें पौरवांशीं सख्य जोडलें. अनेक डोंगरी जमातींचीं मदत मिळविली व थेट पाटलीपुत्रावर चाल केली. नंदसैन्याचा पराभव झाला. धनानंदाला ठार मारून चंद्रगुप्तानें मगधाचें राज्य जिंकलें. (खि. पू. ३२२) लगेच चंद्रगुप्तानें जोराची मुसंडी मारून सिंधुनदीपर्यंतचा भारतीय प्रदेश ग्रीकांच्या जोखडाखालून मुक्त केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ग्रीकांचा विश्वासघात केल्याबद्दल सिंधचा ग्रीक सेनानी युडेमॉस यानें पौरवाचा खून करविला. चंद्रगुप्ताचा सहकारी व भावी प्रतिस्पर्धी ग्रीकांच्या रोषास बळीं पडल्यानें चंद्रगुप्ताचा मार्ग निष्कंटक झाला. त्यानें खि. पू. ३१७ मध्यें युडेमॉसचा पराभव करून त्याला भारताबाहेर हांकून लाविलें, व सिंध देश साम्राज्यास जोडिला. नंतरच्या काळांत त्यानें सौराष्ट्र, महाराष्ट्र, विदर्भ, आंध्र इत्यादि देश जिंकीत दक्षिणेंत म्हैसूरपर्यंत मुसंडी मारली. तामीळ वाङ्मयांत एका उपटसुंभ मौर्यानें तिनेवेल्लीपर्यंत आक्रमण केल्याचे उल्लेख येतात.

याप्रमाणें चंद्रगुप्त भारतामध्यें साम्राज्य वाढवीत असतां पश्चिमेकडील सेल्युकस निकेटर हा शिकंदराचा सेनापति वांटणीच्या भांडणांत यशस्वी झाला होता. शिकंदराचें आशियाई साम्राज्य त्याला मिळालें होतें. सवड मिळतांच सिंधूच्या पूर्वेकडील ग्रीकांचा मुलूख परत मिळविण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून त्यानें भारतावर स्वारी केली; पण भारत यावेळीं विस्कळीत नव्हता तर, मौर्य साम्राज्यामध्यें सुसंघटित होऊन सामर्थ्यशाली बनला होता. सिंधुनदीवरच ग्रीकांचा मार्ग रोखण्यांत येऊन त्यांचा पराभव झाला. काबूल, कंदाहार, हिरात व बलुचिस्तान हे सिंधूच्या पश्चिमेकडील चार ग्रीक प्रांत चंद्रगुप्ताला देऊन सेल्युकसला तह करावा लागला. शिवाय सेल्युकसनें आपली मुलगी चंद्रगुप्तास देऊन त्याच्याशीं सख्य जोडलें. चंद्रगुप्तानेंही ५०० हत्ती पुरवून सासऱ्याला मदत केली. सेल्युकसानें आपला वकील मेगॅस्थेनीस यास चंद्रगुप्ताच्या दरबारीं ठेवून मौर्य घराण्याशीं सतत मैत्री राखली.

चंद्रगुप्ताचें साम्राज्य आतां हिंदुकुश पर्वतापासून आसामपर्यंत व हिमालयाच्या पायथ्यापासून म्हैसूरपर्यंत पसरलें होतें. कलिंग देशच फक्त साम्राज्याबाहेर होता. मधूनमधून स्वायत्त मांडलिक राज्यें होतीं.

जैनपरंपरेप्रमाणें चंद्रगुप्त हा जैन धर्मानुयायी होता. चोवीस वर्षांच्या कारकीर्दीनंतर राज्यत्याग करून त्यानें संन्यासदीक्षा घेतली व तो दक्षिणेकडे निघून गेला व तिकडेच मेला. ही जैनपरंपरा खरी वाटत नाहीं. खि. पू. २९८ च्या सुमारास मगधांतच चंद्रगुप्ताचें देहावसान झालें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चंद्रगुप्त शूर सेनानी, धोरणी मुत्सद्दी व कार्यक्षम राज्यकर्ता होता. भारतांतील परकीय राज्य त्यानें धुळीला मिळविलें. बलाढ्य सेल्युकसचा पराभव करून ग्रीकांना भारतीय शौर्याचें पाणी दाखविलें; भारतांतील अनेक लहान-मोठीं राज्यें साम्राज्याच्या दावणींत एकत्र बांधलीं व देशाला शांति व सुरक्षा यांचा लाभ करून दिला. पाटबंधारे, रस्ते व दवाखाने यांची सोय करून प्रजेच्या सुखांत भर घातली. एकतंत्री सत्ता असतांही तिचा अनियंत्रितपणें वापर केला नाहीं. एक थोर साम्राज्यसंस्थापक म्हणून भारताच्या इतिहासांत त्याचें नांव अढळ आहे.

बिंदुसार (खि. पू. २९८ ते खि. पू. २७३) :

चंद्रगुप्तानंतर त्याचा सुलगा बिंदुसार गादीवर आला. बापाचें साम्राज्य त्यानें टिकवून धरलें. तक्षशिलेच्या जुलमी राज्यपालाविरुद्ध तेथील प्रजेनें बंड केलें. तेव्हां बिंदुसारानें राजपुत्र अशोकास तेथें पाठवून शांतता केली. सीरियाच्या ग्रीक राजाशीहीं त्यानें मैत्रीचे संबंध राखले. मेगॅस्थिनीसनंतर डिमॅकस हा ग्रीक वकील मौर्यदरबारीं आला. इजिप्तचा राजा टॉलेमीनेंही डायोनिसस हा आपला वकील भारतांत पाठविला होता. पंचवीस वर्षांच्या शांततामय कारकीर्दीनंतर बिंदुसार मरण पावला.

सम्राट् अशोक (खि. पू २७३ ते खि. पू. २३६)

पूर्ववृत्त :

बिंदुसाराला अनेक पुत्र होते. त्यांपैकीं अशोकानें आपली कर्तबगारी बापाच्या कारकीर्दींतच दाखविली होती. तक्षशिलेचें बंड त्यानें मोठ्या मुत्सद्देगिरीनें मोडून काढलें होतें. बापाच्या मृत्युसमयीं तो उज्जयिनीचा राज्यपाल होता. अशोकानेंच आपल्या मागून गादीवर यावें अशी बिंदुसाराची इच्छा होती. पण बिंदुसाराच्या मृत्यूनंतर ज्येष्ठ पुत्र सुषीम यानें गादी बळकाविली; पण अशोकानें त्याचा बंडावा मोडून काढला. या कामांत चार वर्षें गेलीं. त्यामुळें अशोकाचा राज्याभिषेक चार वर्षांनीं खि. पू. २६९ मध्यें झाला. कांहीं सिंहली ग्रंथांतून पुढील दंतकथा आढळते :

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बिंदुसाराला एकूण ९९ मुलें होतीं. त्याच्या मृत्यूनंतर वारशाबद्दल भांडणें झालीं. अशोकानें सर्व संभाव्य वारसदारांची कत्तल करून रक्तरंजित गादी मिळविली. पण ती कथा पूर्ण निराधार आहे. अशोक हा पूर्वायुष्यांत ब्राह्मण धर्मानुयायी होता व क्षत्रिय राजाला साजेसेंच त्याचें जीवन होतें. त्याला अनेक स्त्रिया होत्या. वडिलार्जित साम्राज्याचा त्यानें यथेच्छ उपभोग घेतला. मांसाच्या मेजवान्या, मद्याच्या मैफली, कलावंतिणींचें नाचगाणें व हौसेची शिकार यांचा भरपूर आस्वाद त्यानें घेतला.

कलिंगाचें युद्ध (ख्रि. पू. २६१) :

पूर्वकिनाऱ्यावरील कलिंगदेश अद्यापिही साम्राज्याबाहेर होता. तेथील बंदरांतून परदेशांशीं मोठा व्यापार चाले. त्यामुळें कलिंग समृद्ध व बलाढ्य देश बनला होता. अशोकाच्या आक्रमक स्वारीला कलिंगानें प्रखर विरोध केला. उभयपक्षीं खूप हानि झाली. खुद्द अशोकाच्या आलेखांत पुढील उल्लेख आहे. एक लाख लोक लढाईत मारले गेले. दीड लाखावर युद्ध-कैदी मिळाले. लढाईमुळें उद्भवलेल्या रोगराई व दुष्काळ यांनीं लाखो लोक मृत्युमुखीं पडले. अशोकानें कलिंग जिंकून मौर्य साम्राज्यास जोडला. मगध साम्राज्य आतां पश्चिमसमुद्रापासून पूर्वसमुद्रापर्यंत पसरलें. अगदीं दक्षिणे-कडील तामीळ राज्यें सोडून हिंदुकुश पर्वतापर्यंत सर्व भारत मौर्य आधिपत्या-खालीं आला. कलिंगाचें युद्ध हें अशोकाचें पहिलें व शेवटचेंच युद्ध ठरलें. अशोकाच्या जीवनांत, मगधाच्या राजकारणांत व जगाच्या इतिहासांत हें युद्ध युगप्रवर्तक ठरलें. आक्रमण व लढाया यांचा काल संपला. शांतता, समाजोन्नति व धर्मप्रसार यांचें युग निर्माण झालें. कलिंगयुद्धांतील कत्तल व विनाश यांचा अशोकाच्या मनावर फार परिणाम झाला व त्याला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप वाटूं लागला. त्यानें आपलें परराष्ट्रीय धोरण बदललें. लष्करी शक्तीनें विजय मिळविण्याऐवजीं प्रेमानें, धर्मानें इतरांना वश करावयाचें. अहिंसेचा, दयेचा धर्म सर्वत्र वाढवावयाचा हेंच त्याचें जीवितकार्य ठरलें.

अहिंसा व शांति यांच्या अधिष्ठानावर उभारलेल्या बौद्धधर्मानें अशोकाचें लक्ष वेधलें व तो शाक्य उपासक बनला. नृत्यगायनाच्या समाजाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाण्याचें त्यानें बंद केलें. शिकार अगर चैन यांसाठीं विहारयात्रा करावयाचें थांबविलें. दोन वर्षांनीं त्यानें बुद्धगयेला भेट दिली. उपगुप्त या विद्वान् भिक्षूच्या उपदेशानें तो भिक्षुगतिक बनला व भूतदया व सदाचार यांचा प्रचार करूं लागला.

अशोकाचा धर्म व धर्मप्रचार :

मस्की येथील शिलालेखांत अशोक शाक्य-उपासक असल्याचा उल्लेख आहे. भाब्रु येथील आलेखांत बौद्ध रत्नत्रयीचा उल्लेख असून भगवान् बुद्धाची शिकवण सद्धर्माची आहे असा गौरवपर उल्लेख आहे. त्यानें तिसरी बौद्धधर्म परिषद भरविली यावरून तो स्वतः बुद्धानुयायी होता याबद्दल संशय राहात नाहीं. पण त्याचा भर तत्त्वज्ञानावर नसून नैतिक आचरणावर होता. उपासना व विधि यांतूनच धार्मिकता व्यक्त होत नसून रोजच्या वागण्यांत तिचा प्रत्यय येतो. गुरुजनांबद्दल आदर व विनय, ब्राह्मण, श्रमण इत्यादींबद्दल आदर, नोकरचाकरांशीं वागतांना माणुसकी, औदार्य व दानधर्म या गोष्टी प्रत्येकानें केल्या पाहिजेत. अहिंसा, भूतदया, परमतसहिष्णुता, सत्य, शील, विशुद्ध चारित्र्य इत्यादि नैतिक गुणांचा त्यानें उपदेश केला.

अशोकानें स्वतांच्या वर्तनानें प्रजेला सदाचाराचें उत्तम उदाहरण घालून दिलें. भूतदयाप्रेरित होऊन त्यानें शिकार करण्याचें सोडून दिलें. राजवाड्यांत मेजवान्यांसाठीं अनेक पशुपक्षी दररोज मारले जात. ती संख्या कमी करीत त्यानें रोज एक हरिण व दोन मोर एवढ्यावर आणली, व दोन वर्षांत राजवाड्यांतील प्राणिहत्या संपूर्णपणें थांबविली. स्वतः खूप दानधर्म केला व इतरांना दानधर्म करण्यास उत्तेजन दिलें. रोग्यांसाठीं व पशूंसाठीं राज्यांत ठिकठिकाणीं दवाखाने उघडले, राजमार्गावर ठिकठिकाणीं विहिरी खोदल्या, रस्त्यांच्या दुतर्फा सांवलीसाठीं झाडें लावलीं, प्रवाशांच्या सोयीसाठीं धर्मशाळा, पाणपोया व अन्नछत्रें बांधलीं. लोकांनीं आपलें अनुकरण करावें अशी त्याची इच्छा असे.

या धर्माचा प्रसार करण्यासाठीं अशोकानें सारें राज्ययंत्र राबविलें. राज्यांतील भेरीघोष बंद करून धर्मघोष सुरू केला. यज्ञयागासाठीं वा नवस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



पृष्ठें : १२४ व १५२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फेडण्यासाठीं पशुहत्या करण्याची राजधानींत बंदी केली. मांसाहारासाठीं वापरल्या न जाणाऱ्या अनेक पशुपक्ष्यांच्या हत्येवर राज्यांमध्यें बंदी घातली. वर्षांतील कांहीं दिवशीं मासे पकडण्यास वा विकण्यास मनाई केली. राज्यांतील सर्व लहानमोठ्या अधिकाऱ्यांनीं या धर्माचा प्रसार करावा असें आज्ञापत्र काढलें. खि. पू. २५६ मध्यें धर्मसहामात्र व धर्मयुक्त या स्वतंत्र अधिकाऱ्यांची सर्वत्र नेमणूक केली. त्यांनीं प्रजेच्या सुखदुःखाची काळजी घेऊन कोणावरही अन्याय होत नाहीं, फौजदारी कायद्यांची निष्ठुरपणें अमलबजावणी होऊन टाळतां येण्यासारखें दुःख कोणावरही लादलें जात नाहीं याची काळजी घ्यावयाची असे. प्रजेमध्यें नीतिधर्माचा प्रचार करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. स्त्रीवर्गाच्या हिताच्या जपणुकीसाठीं खास स्त्री-महामात्र नेमले होते. अधिकाऱ्यांनीं आपापल्या विभागांत वारंवार फिरून प्रजेच्या गाऱ्हाण्यांची दखल घ्यावी व शक्य तेथें लोकांच्या तक्रारी दूर कराव्यात असा आदेश त्यानें सर्व अधिकाऱ्यांना दिला होता. बौद्ध संघांतील मतमतांतरें काढून टाकण्यासाठीं सरकारी प्रोत्साहनानें एक धर्मपरिषद् पाटलीपुत्र येथें भरविली (खि पू. २४०)

धर्माच्या सार्वत्रिक प्रसारासाठीं त्यानें राज्यांत ठिकठिकाणीं शिलालेख व स्तंभालेख कोरविले. त्या आलेखांतून अहिंसा, सत्य, विनय, धर्मसहिष्णुता, भूतदया, परोपकार, साधुता इत्यादि सद्‌गुणांचें प्रजेनें आचरण करावें असा उपदेश केलेला आहे. कांहीं आलेखांतून राजानें प्रजेच्या हितासाठीं वा धर्माच्या प्रचारासाठीं केलेल्या गोष्टींची माहिती आहे; तर कांहीं आलेखांत राज्यांतील अधिकाऱ्यांना आदेश दिलेले आहेत. त्या सर्व आलेखांतून अशोकाची धार्मिक उत्कटता, प्रजाहिताची तळमळ, उदात्त व्यक्तिमत्व चांगल्या प्रकारें प्रतीत होतें. हे आलेख म्हणजे अशोकाचें कोरीव आत्मचरित्रच होय. याशिवाय अशोकानें ८४००० स्तूप बांधल्याचा उल्लेख आहे; भिक्षूंसाठीं संघाराम, विहार, चैत्यगृहें दिलेलीं आहेत.

सद्धर्माचा प्रसार राज्याबाहेरही करण्याच्या उद्देशानें अशोकानें पश्चिमेकडे सीरिया, इजिप्त, सायरेन, कोरिंथ व मॅसिडोनिया, दक्षिणेस पांड्य, चोल, सीलोन इत्यादि दूरदूरच्या देशांत धर्मप्रचारक पाठविले. खि. पू.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२४० मध्यें भरलेल्या तिसऱ्या बौद्धपरिषदेनेंही देशांत व देशाबाहेर सर्वत्र प्रचारक पाठविले. खुद्द अशोकाचीं मुलें महेंद्र व संघमित्रा धर्मप्रचारासाठीं लंकेंत गेलीं होतीं. तेव्हांपासून सीलोन बौद्धधर्मी बनला आहे.

अशोकानें याप्रमाणें बौद्धधर्मास राजाश्रय देऊन त्याला विश्वधर्म बनविलें. तरीही तो धर्मवेडा नव्हता. त्याच्या ठिकाणीं पूर्ण धर्मसहिष्णुता होती. विद्वान् ब्राह्मणांचाही तो मान राखी, जैन श्रमणकांना मदत देई व आजीवकांसाठीं तर त्यानें गुहा खोदविल्या. अशोकाचा धर्म खऱ्या अर्थानें मानवधर्म होता. भूतदया व परोपकार हीं त्याचीं प्रमुख अंगें होतीं. विद्येप्रमाणेंच कलांनाही अशोकानें राजाश्रय दिला. अशोकाचे स्तूप व स्तंभ त्याच्या कलाप्रियतेचीं जिवंत स्मारकें आहेत.

अशोकाची राज्यव्यवस्था :

प्रजेची भौतिक, नैतिक व आध्यात्मिक उन्नति करून त्यांच्या इहपर सुखांत भर घालावयाची हें अशोकाचें ध्येय होतें. ‘सर्व प्रजाजन माझीं मुलें असून, ज्याप्रमाणें मी माझ्या मुलांच्या हितासाठीं झटतों, त्याप्रमाणें प्रजेच्याही हितासाठीं झटत असतों. प्रजेचा योग्य सांभाळ करण्यासाठींच कुशल अधिकाऱ्यांच्या स्वाधीन प्रजेला केलें आहे.’ कल्याणकारी राज्य निर्माण करण्यासाठीं तो झटत असे. प्रजासुखांत राजाचें सुख व प्रजा-हितांत राजाचें हित हें त्याचें ब्रीद होतें. प्रजेचीं दुःखें दूर करण्यासाठीं स्थानिक अधिकाऱ्यांना त्यानें पुष्कळ सत्ता दिली होती. प्रजेच्या अडी-अडचणी समजावून घेऊन त्या निवारण करण्यासाठीं अधिकाऱ्यांनीं तत्पर असावें अशी त्याची सदैव ताकीद असे. कोठेंही जुलूम, अन्याय अगर भ्रष्टाकार होऊं नये, अधिकारी प्रामाणिक, उत्साही व लोकहितदक्ष असावेत अशी तो काळजी घेई.

राज्यकारभाराच्या सोयीसाठीं साम्राज्याचे पुढीलप्रमाणें सहा विभाग पाडून प्रत्येकावर त्यानें एकेक राजप्रतिनिधी नेमला:(१) मूल विभाग (मगध) राजधानी पाटलीपुत्र. (२) वायव्य विभाग (हिंदकुश ते दिल्ली)–राजधानी तक्षशिला. (३) मध्य विभाग–उज्जयिनी (५) पूर्व विभाग (कलिंग)-तोसली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(५) दक्षिण विभाग–सुवर्णगिरी (६) पश्चिम विभाग–गिरनार. या विभागां-मध्यें लहानमोठे प्रांत असून त्यावर प्रादेशिक म्हणून प्रांताधिकारी असे. त्याखालीं राजुक (जिल्हाधिकारी), गोप (तहशीलदार) ग्रामणी असे स्थानिक अधिकारी होते. अशोकानें सत्तेचें पुष्कळच विकेंद्रीकरण केलें होतें. एका केंद्रसत्तेकडून एवढ्या अवाढव्य साम्राज्याचा कारभार चालविणेंच त्याकाळीं अशक्य होतें. राजाला सल्लामसलत देण्यासाठीं मंत्रि-परिषद् असे व अग्रामात्य हा तिचा मुख्य असे. विभागाच्या कुमारांनाही अशी मंत्रिपरिषद असे. कारभाराचीं वेगवेगळीं खातीं असून त्यांवर महामात्र नांवाचे अधिकारी असत. राज्यकारभारांत सर्वत्र एकसूत्रीपणा यावा म्हणून तो अधिकाऱ्यांच्या तीन वा पांच वर्षांनीं बदल्या करी. तसेंच अधिकाऱ्यांनीं आपापल्या मुलखांत नेहमीं फिरावें, प्रजेंत मिसळावें व लोकांचीं गाऱ्हाणीं दूर करण्याचा प्रयत्न करावा अशी त्याची आज्ञा असे. स्वतः अशोकही प्रजेच्या गाऱ्हाण्यांची दाद घेण्यास सदैव तत्पर असे. कोणालाही राजापर्यंत प्रवेश मिळे.

योग्यता :

हिंदुकुशपासून आसामपर्यंत व काश्मीरपासून तुंगभद्रेपर्यंत एवढ्या विशाल भारताचें राजकीय ऐक्य अशोकाच्या कारकीर्दींत सिद्ध झालें होतें. सीरिया, इजिप्त, मॅसिडोनिया, लंका व चीन अशा दूरच्या देशांचे वकील त्याच्याशीं स्नेहसंधि करण्यासाठीं त्याच्या दरबारांत आले होते. त्याच्या विस्तृत साम्राज्यांत कोठेंही बंडाळी माजली नाहीं. कलिंगाचा निकराचा प्रतिकार मोडून काढून त्यानें आपल्या युद्धकौशल्याची चुणूक दाखविली होती. कुशल सेनानी, धोरणी मुत्सद्दी व प्रजाहितदक्ष राज्यकर्ता या दृष्टीनें अशोक सर्वश्रेष्ठ होता. पण त्याहीपेक्षां सद्धर्माच्या प्रचारासाठीं त्यानें घेतलेले निष्काम श्रम व त्याचें विशुद्ध चारित्र्य यामुळें तो थोर व आदर्श राजा ठरला आहे. अशोक भारतालाच नव्हे तर जगालाही वंद्य ठरला आहे. मानवी इतिहासांत सर्वश्रेष्ठ राज-भिक्षु म्हणून अशोकाचें नांव अजरामर झालें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतरचे मौर्यराजे :

बत्तीस वर्षांच्या कारकीर्दीनंतर खि. पू. २३६ मध्यें अशोक मरण पावला. त्याला पुष्कळ स्त्रिया असून त्याचा पुत्रसंभारही मोठा होता. त्यांपैकीं बरेचसे अल्पायुषी व कांहीं नालायक निघाल्यानें अशोकानंतर कोण गादीवर आलें याचा निर्णय होत नाहीं. वाङ्मयीन परंपरेप्रमाणें अशोकाची तरुण व लाडकी राणी तिष्यरक्षिता दुराचारी निघाली. तिनें प्रेमविफलतेमुळें राजपुत्र कुणालाचे डोळे काढवून त्याला आंधळा केलें. कुणालाचा पुत्र दशरथ हा नंतर गादीवर आला. त्यानें नागार्जुनी डोंगरामध्यें आजीवकांसाठीं गुहा खोदविल्या. त्याच्या मागून संप्रति गादीवर आला. जैनधर्माचा पुरस्कर्ता म्हणून जैनपरंपरा त्याचा गौरव करते. यावेळीं साम्राज्यांतील प्रांत स्वतंत्र होऊन मौर्यसत्तेला उतरती कळा लागली. त्याच सुमारास बॅक्ट्रियांतील ग्रीकसत्ताही भारतावर झेप घालूं लागली होती. शेवटचा मौर्यराजा बृहद्रथ हा नालायक निघाला. त्याचा सेनापति पुष्यमित्र शुंग यानें बंड करून बृहद्रथाला ठार मारलें व मगधाची गादी बळकावली.

मौर्यसत्तेच्या विनाशाचीं कारणें :

(१) अशोकानंतरचे राजे दुबळें व नालायक निघाले. साम्राज्याची धुरा पेलण्याची कुवत त्यांच्या अंगीं नव्हती. वंशपरंपरा राजसत्तेंत कर्तृत्ववान् राजांची परंपरा राखणें कठीण असतें. राजसत्ताक पद्धतींत राज्याचें भवितव्य राजाच्या कर्तृत्वावरच अवलंबून असतें. तशांत राजपुत्रांतच वारसाबद्दल भांडणें होऊन मध्यवर्ती सत्ता दुर्बल झाली. (२) साम्राज्याच्या अफाट विस्तारामुळें एकमुखी सत्ता राखणें त्याकाळीं अशक्य होतें. सत्तेचें केंद्रीकरण अव्यवहार्य तर विकेंद्रीकरणानें मध्यवर्ती सत्ता दुर्बल होऊन साम्राज्य काबूंत ठेवणें दुरापास्त होतें. अशा स्थितींत साम्राज्याचा डोलारा फार काळ टिकणें शक्य नव्हतें. (३) जुलमी अधिकारी— दूरच्या प्रांताचे अधिकारी स्वार्थी व जुलमी निघाले. अशा जुलमामुळें प्रजेमध्यें मौर्यसत्तेबद्दल अप्रीति पसरली. पुढें मध्यवर्ती सत्तेच्या दौर्बल्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फायदा घेऊन अनेक स्वार्थी अधिकाऱ्यांनीं वेगवेगळा मुलुख बळकावला व ते स्वतंत्रपणें कारभार पाहूं लागले. त्यामुळें मौर्यसत्ता विस्कळीत झाली. (४) अशोकाचें धोरण—राजकारणामध्यें अशोकानें अहिंसा व शांतिवादाचा पुरस्कार केल्यानें सैन्याची कार्यक्षमता कमी झाली. धर्मप्रसारासाठीं सरकारी खजिना रिता करून सुसज्ज सैन्यदल ठेवण्याकडे त्यानें दुर्लक्ष केलें. तसेंच, बौद्धधर्माचा पुरस्कार करून ब्राह्मण धर्मानुयायांना त्यानें दुखविलें. यज्ञयाग, संस्कार, समारंभ यांवर बंदी घालून त्यांचा रोष ओढवून घेतला. बृहद्रथाचा खून झाल्यावर पुष्यमित्राविरुद्ध कोणींही हात उचलला नाहीं. पुष्यमित्रानें अश्वमेध करून यज्ञधर्माचें स्वातंत्र्य पुनः प्रस्थापित केलें. यावरून ही धार्मिक प्रतिक्रियाही मौर्यांच्या ऱ्हासास कारणीभूत असावी.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण चौदावें

मौर्यकालाचें समालोचन

(१) राज्यव्यवस्था :

मौर्यपूर्व कालांत मगधाच्या वाढत्या सत्तेनें गंगेच्या खोऱ्यांतील अनेक लहानमोठीं राज्यें जिंकून आपलें एकसत्ताक साम्राज्य स्थापिलें होतें. पश्चिमेकडे सिंधूच्या खोऱ्यांत अद्यापिही लहान लहान राजसत्ताक वा महाभिजनसत्ताक राज्यें विखुरलेलीं होतीं. पण या स्वायत्त राज्यांत अव्यवस्था, आपसांत कलह व बाह्य शत्रूपासून स्वसंरक्षण करण्याची असमर्थता हे दोष असल्यानें ग्रीकांच्या आक्रमणाला तीं सहज बळीं पडलीं. एकमुखी साम्राज्यच अंतर्गत सुव्यवस्था, शांतता व परचक्रापासून रक्षण करूं शकतें, हा इतिहासाचा बोध चाणक्य व चंद्रगुप्त यांनीं जाणला व एकतंत्री साम्राज्य स्थापण्याचे प्रयत्न केले. त्यांना यश येऊन मगधाचें साम्राज्य हिंदुकुशपासून तुंगभद्रेपर्यंत विशाल भारतावर स्थापन झालें. या साम्राज्याची चोख व्यवस्था लावण्यासाठीं चाणक्यानें कुशल राज्यव्यवस्था निर्माण केली. अर्थशास्त्र व मेगॅस्थिनीसचा वृत्तांत यावरून त्या राज्यव्यवस्थेची चांगली कल्पना येते.

राजा हा राज्यांतील सर्वश्रेष्ठ अधिकारी असून सर्व सत्ता त्याच्या हातांत केंद्रित झालेली असे. सर्व व्यवस्थेचा मध्यबिंदु व आत्मा राजा असे. त्याच्या ठिकाणीं उत्साह, कार्यक्षमता, ज्ञान व विजय इत्यादि गुणांची अपेक्षा असे. एकतंत्री सत्ता असूनही तिचें स्वरूप जुलमी हुकुमशाहीचें नव्हतें. धर्मशास्त्राचे नियम व प्रधानांचा सल्ला यामुळें राजसत्ता नियंत्रित असे. राज्यव्यवस्थेवर देखरेख ठेवणें, जातीनें सर्व गोष्टींची पाहणी करून प्रजेचीं दुःखें निवारण करणें व प्रजेचें अंतर्गत व बाह्य शत्रूपासून संरक्षण करणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हीं राजाचीं प्रमुख कर्तव्यें होतीं. प्रजेच्या सुखदुःखाशीं राजानें एकरूप व्हावें असा कौटिल्याचा सल्ला होता.

राजाला सल्लामसलत देण्यासाठीं मंत्रिपरिषद असे. पुरोहित हा तिचा मुख्य असे. या मंत्रिमंडळानें बहुमतानें घेतलेले निर्णय राजास पाळावे लागत. राजाला उपराज व युवराज मदत करीत. कारभाराच्या सोयीसाठीं विविध खातीं असून त्यांवर अमात्य, महामात्र, अध्यक्ष, युक्त असे लहान-मोठे अधिकारी असत.

साम्राज्याच्या संरक्षणासाठीं सुसज्ज खडें सैन्य असे. राजा स्वतः सैन्याचें नेतृत्व करी. सेनापति सैन्याची व्यवस्था पाही. सैन्याचे सहा विभाग असून त्या प्रत्येकाची व्यवस्था एकेका समितीकडे असे. (१) पायदळ–प्रत्येक सैनिकाजवळ मोठें धनुष्य व खड्ग असे. याखेरीज कांहीं सैनिकांजवळ भाले, बरची, तलवारी हीं आयुधें असत (२) घोडदळ–घोडेस्वाराजवळ दोन लांब भाले असत. घोड्याच्या खोगिरास रिकिबी नसत. (३) रथ. (४) हत्ती. (५) शिबंदी व वाहतुक. (६) आरमार. चंद्रगुप्ताजवळ ६,००,००० पायदळ, ३०,००० घोडेस्वार, ९००० हत्ती व ८००० रथ एवढें खडें सैन्य होतें. सैन्याला तिजोरींतून रोख पगार देण्यांत येई. सैन्याचें शिक्षण, शिस्त व मनोधैर्य वाखाणण्यासारखें होतें.

राज्याची जमाबंदी महसूल खात्याकडे असे. उत्पन्नाच्या मुख्य बाबी पुढीलप्रमाणें होत्या–जमीनमहसूल (जमिनीच्या मगदुराप्रमाणें उत्पन्नाच्या $\frac{1}{4}$ ते $\frac{1}{2}$ असे). आयातनिर्यात मालावरील जकाती, अबकारी कर, जंगलें, खाणी, सहकारी उद्योगधंदे यांचें उत्पन्न, पाणीपट्टी, चाकपट्टी, नौकाकर, व्यवसायकर, बाजारकर, परवाना फी, औद्योगिक कर, इ. खर्चाच्या पुढील बाबी होत्या : राजाचा खासगी खर्च, राज्यव्यवस्थेचा खर्च, संरक्षण, सार्वजनिक बांधकामें, सरकारी उद्योगधंदे, अनाथांना मदत, इ. इ. राज्याचें ध्येय कल्याणकारी असल्यामुळें प्रजेच्या सुखसोयींवर बराचसा पैसा खर्च होई. करवसुली रोख व धान्यरूपानें होई करआकारणी पद्धतशीर व प्रमाणशीर असे. जमाखर्चाचा हिशोब, नियंत्रण व देखरेख यांची उत्तम व्यवस्था असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करनियोजन, आरोग्य, संरक्षण, राष्ट्रीय उत्पन्न व इतर राजकीय कारणांसाठीं लोकसंख्येची गणना करीत असत. त्यासाठीं एक स्वतंत्र व कायमचें खातें होतें. या खानेसुमारींत विविध प्रकारची माहिती गोळा केली जाई व ती सर्व अद्यावत् राखली जाई. प्रत्येक गांवांतील अधिकाऱ्या-मार्फत गांवांतील लोकांची जात, वय, उद्योग, उत्पन्न, चारित्र्य इत्यादि सविस्तर माहिती मिळविली जाई.

राजा हा सर्वश्रेष्ठ न्यायाधीश असे. त्याच्या हाताखालीं वेगवेगळे अधिकारी व न्यायालयें असत. दिवाणी व फौजदारी अशा गुन्ह्यांसाठीं वेगळीं न्यायालयें असत. विवाह, वारसा, ऋण, ठेव, अतिक्रमण, औद्योगिक कलह, द्यूत, सीमावाद. करारभंग इत्यादि तंटे दिवाणी (धर्मस्थीय) कोर्टांत चालत. खून, दरोडे, मारामाऱ्या, व्यभिचार, चोरी, राजद्रोह, लांचलुचपत, लबाडी, भेसळ इ. गुन्हे, फौजदारी (कंटकशोधन) कोर्टांत चालविले जात. साक्षीपुराव्याची छाननी होऊन गुन्हेगारांना शासन होई. धर्म, व्यवहार, चारित्र्य, राजशासन असे चार प्रकारचे कायदे असून उत्तरोत्तर प्रमाण मानले जात. गुन्ह्यांना अनुसरून दंड, जप्ती, फटके, कारावास, विरूपीकरण, हातपाय तोडणें व फांशीं देणें अशा विविध शिक्षा असत. शिक्षा फार कठोर असल्यानें गुन्ह्यांचें प्रमाण बरेंच कमी असे. अशोकानें न्यायदानांत सौम्यता आणली होती. कोणावरही अन्याय होऊं नये याबद्दल दक्षता घेतली जाई.

परराष्ट्रीय धोरणांत विजिगीषु वृत्तीला प्राधान्य दिलें जाई. त्यामुळें नेहमींच थंड्या लढाईचें वातावरण असे. साम्राज्यवर्धनाच्या आड येणाऱ्या सर्व गोष्टी शत्रुवत् मानून त्यांचा कांटा काढला जाई. शत्रुमित्र संबंध प्रयोजनसापेक्ष असे. शत्रूचा निःपात करण्यासाठीं साम, दाम, भेद व दंड या चारी मार्गांचा अवलंब केला जाई. शत्रुराष्ट्रांत लांचलुचपत देऊन फितुरी निर्माण करावयाची, अंतस्थ कलह निर्माण करून त्याला कमजोर करावयाचें हा राजमान्य मार्ग होता. मौल, मैत्र, श्रेणिबल व आटविक असें चतुर्विध सैन्य लढाईसाठीं गोळा केलें जाई. किल्ले, तटबंदी, खंदक, बुरूज, मोर्चे, गुप्त द्वारें यांवर संरक्षणासाठीं भर दिला जाई. लढाईमध्यें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धर्मयुद्धाचे नियम पाळीत. मुलकी नागरिकांना दोन्ही बाजूंचे सानक सहसा त्रास देत नसत.

रस्ते तयार करणें व दुरुस्त ठेवणें, रस्त्यावर दुतर्फा झाडें लावणें, विहिरी खोदणें, धर्मशाळा, पाणपोया बांधणें, सरकारी इमारतींचें बांधकाम व डागडुजी करणें इत्यादिसाठीं स्वतंत्र बांधकाम खातें असे. कालवे, व पाटबंधारे तयार करणें, सुधारलेलें बीबियाणें पुरविणें, शेतकऱ्यांना उत्तेजन देऊन शेतीसुधारणा करणें यांसाठीं स्वतंत्र शेतीविभाग होता. जंगलांची निगा राखणें, जंगलांतील उत्पन्न वाढविणें इ. काम जंगल-विभागाकडे असे. याखेरीज वाहतूक, सार्वजनिक आरोग्य, वेश्या, द्यूत, पशुसंपत्ति, खाणी इत्यादींसाठीं स्वतंत्र अधिकारी असत.

सर्व कारभारावर देखरेख ठेवण्यासाठीं राजाला बारीकसारीक सर्व गोष्टींची माहिती मिळण्याची सोय असे. अधिकाऱ्यांचें वर्तन, राज्यांतील परके लोक व त्यांच्या हालचाली, शत्रूचे बेत व हालचाली, राष्ट्रद्रोह्यांच्या कारवाया इत्यादींची बित्तंबातमी हेरांकडून राजाला मिळे. या हेरांचें सर्वत्र जाळें विणलेलें होतें. त्याची व्यवस्था एका स्वतंत्र खात्याकडे असून हेरांना राजापर्यंत केव्हांही प्रवेश मिळे.

राज्याची विविध प्रांतांत विभागणी केलेली असून त्यावर राज्यपाल असत. महत्त्वाच्या प्रांतांवर राजघराण्यांतील पुरुषांची नेमणूक होई. मध्यवर्ती कारभाराप्रमाणेंच प्रांतिक कारभार चाले. मध्यवर्ती सत्तेनें आंखून दिलेल्या धोरणाप्रमाणें राज्यपालांना चालावें लागे. त्यांना अंमलबजावणीच्या बाबतींत अंतर्गत स्वायत्तता पुष्कळ होती. प्रांतांचे प्रदेश, जिल्हे, महाल व गांवें असे विभाग असत व त्यांवर प्रादेशिक, स्थानीय, गोप, ग्रामणी असे अधिकारी होते.

पाटलीपुत्र राजधानीच्या नागरी कारभाराचें वर्णन मेगॅस्थिनीसनें लिहून ठेविलें आहे. नगर–नियामकमंडळाच्या प्रत्येकीं पांच जणांच्या सहा समित्या होत्या : (१) मजुरीचे दर ठरविणें, कच्च्या मालाची शुद्धता राखणें, उत्पादित वस्तूंच्या किंमती ठरविणें इ. कामें एका समितीकडे होतीं. (२)

११

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परकीयांची व्यवस्था व हितसंबंध पाहणें व त्यांच्या हालचालींवर देखरेख ठेवणें इ. कामें दुसरी समिति करी. (३) जन्ममृत्यूची नोंद ठेवणें व खानेसुमारीची अद्यावत् माहिती ठेवणें इ. कामें तिसऱ्या समितीकडे होती. (४) उत्पादन, उद्योगधंदे व कारखाने यांचें नियंत्रण चौथी समिति करी. (५) वजनमापें, व्यापार, बाजार इ. वर पांचव्या समितीची देखरेख असे. (६) खरेदी-विक्री, करवसुली इ. कामें सहाव्या समितीकडे असत. आरोग्य व स्वच्छता, पाणीपुरवठा, सार्वजनिक बांधकामें, उद्यानें इ. गोष्टी नियामकमंडळ सामुदायिकरीत्या पाहात असे. राजधानीचें क्षेत्रफळ अठरा चौरस मैल असून भव्य प्रासाद, रम्य उपवनें, आकर्षक कारंजीं, उत्तुंग इमारती, सुखद नाटकगृहें इत्यादि सर्व सुखसोयींनीं समृद्ध असलेलें हें शहर इंद्रलोकींच्या अमरावतीप्रमाणें दिसत होतें. नगराभोंवतीं भक्कम तटबंदीचे व खोल खंदक होते.

गुणदोष :

(१) मुलकी व लष्करी कारभार स्वतंत्र होता. सेनाधिकाऱ्यांकडे मुलकी कारभार नसे. (२) अंमलबजावणी व न्याय या खात्यांची फारकत व न्यायसंस्थेचें स्वातंत्र्य. (३) अधिकाऱ्यांना रोख पगार देण्याची पद्धति. (४) राज्यकारभाराचीं विविध खातीं व श्रेणीवार अधिकारी वर्ग. (५) कायम स्वरूपाचें जनगणना खातें. (६) कार्यक्षम नोकरशाही. दोष : (१) फौजदारी कायद्याची कठोरता. (२) व्यक्तिस्वातंत्र्यावरील निर्बंध. (३) नोकरशाहीचें वर्चस्व.

सामाजिक स्थिति :

समाजामध्यें वर्णव्यवस्था रूढ झाली होती. ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांतील सामाजिक श्रेष्ठतेचा वाद अद्यापिही मिटला नव्हता. समाजाच्या दानधर्मावर अवलंबून राहावें लागत असल्यामुळें ब्राह्मणांच्या व क्षत्रियेतर राजवंशांच्या उदयामुळें क्षत्रियांच्या प्रतिष्ठेस धक्का बसला होता. वर्णसंकर वाढत्या प्रमाणावर होत असल्यानें नवीन जाती निर्माण होत होत्या. आनुवंशिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धंद्याची पद्धत व व्यावसायिक श्रेणी यांमुळें जाति व धंदा यांचा संबंध जडून धंद्यावरून जाती होऊन जातींचे धंदे ठरून जात. प्रतिलोम विवाहांना तीव्र विरोध असून अनुलोम विवाहांकडे कानाडोळा होई. तथापि आंतरवर्णीय विवाह सर्रास होत नव्हते. अस्पृश्यतेच्या कर्मठ कल्पना वाढल्या होत्या. पूर्वीप्रमाणेंच चांडालांना गांवाबाहेर राहावें लागे. त्यांच्या सांवलीनेंही विटाळ होई.

नवीन धर्मांनीं संन्यासाला उत्तेजन दिल्यामुळें समाजाच्या स्थायित्वाला धोका निर्माण झाला. म्हणून चाणक्यानें संन्यासधर्माचा स्वीकार करण्यावर नियंत्रणें घातलीं आहेत. संन्यास घेण्यापूर्वीं प्रत्येकाला निष्कर्जी असल्याची व बायकामुलांच्या योगक्षेमाची तरतूद केल्याची खात्री पटवून द्यावी लागे. आश्रमसमुच्चयाची व तीन ऋणांची कल्पना सूत्र ग्रंथांतून प्रामुख्यानें मांडली गेली. " व्यवस्थितार्यमर्यादः कृतवर्णाश्रमस्थितिः । त्रय्या हि रक्षितो लोकः प्रसीदति न सीदति ॥ " असा अर्थशास्त्राचा उपदेश आहे.

स्त्रियांच्या बाबतींत समाज अधिक सनातनी बनला. विवाहाची वयोमर्यादा ऋतुकालप्राप्तीपर्यंत खालीं आली. विवाह हेंच स्त्रीजीवनाचें ध्येय ठरल गेलें. सूत्रोक्त विवाहप्रकार प्रचलित होते. स्त्रीपुरुषसंबंधांत चाणक्याची दृष्टि प्रगतिपर वाटते. विवाहमोक्ष (कायदेशीर फारकत) ही कल्पना अर्थशास्त्रानें मांडली आहे. वेगवेगळ्या कारणांसाठीं नवराबायकोला अशी फारकत घेतां येई. नियोगाची पद्धत मागें पडून पुनर्विवाहाचा प्रश्न नव्यानें पुढें आला होता. तक्षशिलेच्या आसमंतांत कन्याविक्रय चाले व स्त्री नवऱ्याबरोबर सती जाई असा उल्लेख ग्रीक इतिहासकार करतात. गणिकांचा व्यवसाय सामाजिक आरोग्याच्या दृष्टीनें सरकारनियंत्रित होता. बालवयांत त्यांच्या शिक्षणाची, तारुण्यांत आरोग्याची व उतारवयांत योगक्षेमाची काळजी शासनसंस्था घेत असे. दारू व जुगार या व्यसनांचें नियंत्रण केलें होतें.

सामाजिक नीतिमत्ता वरच्या दर्जाची होती. सत्य व सद्‌गुण यांना समाजांत मान दिला जाई. लोक शांत, उद्योगी, कष्टाळु व प्रामाणिक होते. गुन्ह्यांचें प्रमाण फार थोडें होतें. ' भारतीयांचा परस्परांवर विश्वास असे. स्वतांचीं घरें व मालमत्ता ते सहसा कडयाकुलुपांत ठेवीत नसत. ' गुलामगिरीची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पद्धति रूढ होती, पण गुलामांना फार माणुसकीनें वागविलें जाई. पैसे भरून गुलाम स्वतांची मुक्तता करून घेऊं शके.

धार्मिक स्थिति :

बौद्धधर्म पूर्वभारतांत हळूहळू पसरत होता. अशोकानें राजाश्रय दिल्यामुळें त्याचें महत्त्व वाढलें व तो विजिगीषु बनला. अशोकाच्या प्रेरणेनें तिसरी धर्मसभा भरली व तिनें धर्मप्रसाराची योजना आंखली. भिक्षूंमध्यें धर्मप्रचाराचा नवीन उत्साह संचरला, व भारताबाहेर बौद्धधर्म वाढीस लागला. बौद्धविहारांना भरपूर देणग्या मिळूं लागून तेथील जीवन सुखी होऊं लागलें. त्यामुळें पुष्कळ लोक लोभानें भिक्षु होऊन विहारांत राहूं लागले. ब्राह्मण व इतर धर्मांच्यामुळें मूळ बुद्धाच्या शिकवणींत पुष्कळच फरक पडला होता. निर्वाण हें दूरचें ध्येय ठरून वैदिक स्वर्गकल्पना बौद्धांनीं स्वीकारली. सर्व वैदिक देवताही स्वीकारल्या. फक्त त्या बुद्धापेक्षां कनिष्ठ आहेत असें मानलें. चैत्य व स्तूप यांचें महत्त्व वाढून त्यांची पूजा होऊं लागली. मंत्रतंत्रादि लौकिक गोष्टीही बौद्धधर्मांत शिरल्या. बौद्धांमध्येंही ब्राह्मणांस बोलावून विवाहादि संस्कार करवून घेत.

बौद्धधर्माच्या पूर्वेकडील प्रसारामुळें जैनधर्म पश्चिमेकडे व दक्षिणेकडे हटला. चंद्रगुप्त व संप्रति यांनीं जैनधर्माला राजाश्रय दिल्याचें जैन मानतात. खि. पू. तिसऱ्या शतकांतच वस्त्रधारणेवरून जैनांमध्यें फुटीचीं बीजें पेरलीं गेलीं. त्यांच्यापैकीं एका पक्षानें पाटलीपुत्र येथें सभा भरवून नवीन जैन आगम निश्चित केला.

नवीन भाक्तिपंथांचें महत्त्व वाढीस लागून ते लोकप्रिय होऊं लागलें होते. शिव, विष्णु, स्कंद, गणेश, पार्वती या देवता भाक्तिपंथांत पुढें आल्या. त्यांच्या मूर्ति व देवळें असत व तेथें पूजाअर्चा चाले. या सर्व कारणांमुळें यज्ञयागांचा ब्राह्मणधर्म मागें पडूं लागला. मोठमोठाले पशुयज्ञ क्वचितच होऊं लागले, व स्मार्त धर्माची वाढ होऊं लागली. या स्मार्त धर्माचें स्वरूप सूत्रग्रंथांतून निश्चित केलें जात होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्थिक स्थिति :

देशांतील बहुसंख्य जनता शेतीवर उपजीविका करीत असे. शेतीच्या उन्नतीसाठीं सरकारी प्रयत्न केले जात. शेती, जंगलें, पाटबंधारे, जनावरें इ. साठीं स्वतंत्र खातीं होतीं. पाटबंधाऱ्यांनीं शेतीला पाणीपुरवठा केला जाई. सुधारलेलें बींबियाणें व खतें शेतकऱ्यांना पुरविलीं जात. बरीचशी शेती शेतकरी घरींच करी. पण लहानमोठे जमीनदार कुळें व दास ठेवूनही शेती करीत.

अनेक उद्योगधंदे भरभराटीस आले होते. खाणीं व जंगलें सरकारी मालकीचीं होतीं. मीठ व साखर तयार करणें व नाणीं पाडणें इ. कांहीं धंद्यांची मक्तेदारी सरकारकडे असे. प्रत्येक धंद्याचा संघ असून ज्येष्ठक किंवा प्रमुख हा त्याचा मुख्य असे. व्यावसायिकांच्या स्वतंत्र वसाहती असत. त्यांच्यावर सरकारी देखरेख असे.

या काळांत अंतर्गत व बाह्य व्यापारास उत्तेजन मिळालें होतें. अंतर्गत व्यापार नद्यांतून वा राजमार्गानें चाले. प्रत्येक मोठ्या गांवीं व्यापारी संघ असत. त्यांना श्रेणी म्हणत. कित्येकदां विशिष्ट व्यापार करणाऱ्यांचेही संघ असत. या श्रेणींना व्यापाराचें नियमन करण्याचा, व्यापाऱ्यांतील भांडणतंटा मिटविण्याचा अधिकार असे. सार्थवाहाच्या नेतृत्वाखालीं व्यापारी तांडे आपला माल घेऊन दूरवर फिरत. मार्गावरील संकटांना तोंड देण्यासाठीं त्यांच्याजवळ रक्षक असत. सरकारही त्यांना भरपूर संरक्षण देई. ज्या अधिकाऱ्याच्या विभागांत अशा तांड्याची लुटालूट होई त्याच्याकडून नुकसानभरपाई देवविली जाई. व्यापारासाठीं राजमार्ग बांधून त्यांवर सुखसोयी उपलब्ध करून देण्यासाठीं सरकार झटत असे. पाटलीपुत्र, श्रावस्ती, वैशाली, साकेत, काशी, तक्षशिला, उज्जयिनी, पैठण इत्यादि प्रमुख शहरें रस्त्यांनीं एकमेकांस जोडलीं होतीं. रोरुक, भृगुकच्छ, सोपारा, कल्याण, नीलकंठ, कावेरीपट्टण, मच्छलीपट्टण, ताम्रलिप्ति इ. निर्यात व्यापाराचीं मोठालीं बंदरें होतीं. भारतांतून सुती, रेशमी कापड, कलाबतू, मसाल्याचे पदार्थ, औषधी वनस्पति, रंग, मोतीं, हिरेमाणकें, मलमल, हस्तिदंत, कातडीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तांदूळ, चंदन, सुगंधी द्रव्यें इ. पदार्थ निर्यात होत. लिनन, कांचसामान धातू, रंग, सोनें, चांदी इ. आयात होई. व्यापारामध्यें लहानमोठ्या पाती असत. नाणीं प्रचारांत आलीं होतीं. निष्क, सुवर्ण, धारण, पुराण, कार्षापण, कांस, पाद, माषक, काकणिका इ. विविध नाण्यांचीं नांवें आढळतात. सरकारी टांकसाळींतून कोणालाही नाणीं पाडून मिळत. नाण्यांचा आकार, वजन व शुद्धता ठरलेली असे. याखेरीज वचनचिठ्या, आदेश, हुंडी इ. कागदी चलनही प्रचारांत होतें.

लिपी, शिक्षण व वाङ्मय :

लेखनकलेची चांगलीच वाढ झाली होती. सरकारी दप्तर ठेवण्याची पद्धति, शिलालेख व पत्रव्यवहाराचा उल्लेख यांवरून लेखनकलेची कल्पना येते. वायव्य भारतांत खरोष्ट्री लिपी प्रचलित असून इतरत्र ब्राह्मी लिपी वापरली जात असे. संस्कृत भाषा उच्चवर्णीयांमध्यें बोलली जात असली तरी विविध प्राकृत भाषा प्रचारांत होत्या. सरकारी भाषा म्हणून पाली भाषेस राजाश्रय मिळालेला दिसतो. बौद्ध व जैन धर्मग्रंथ प्राकृतांतच आहेत. लोकांमध्यें साक्षरता मोठ्या प्रमाणावर होती.

शिक्षणाची पारंपरिक पद्धतिच प्रचलित होती. बौद्ध व जैन विहारांतून लोकशिक्षणाला उत्तेजन मिळत असे. गुरुकुलें हींच तत्कालीन शिक्षणाचीं केंद्रें होतीं. शिक्षण ब्राह्मणांच्या ताब्यांत असून साधी राहाणी व उच्च विचारसरणी अशा निष्ठेनें शिक्षक राहात होते. त्यांना दारिद्र्याची खंत नसे वा मानाची हांव नसे. गुरुगृहीं विद्यार्थ्यांची सर्व सोय होत असे. शिक्षणोत्तर गुरुदक्षिणा दिली जाई. या काळांत बरींच शहरें शिक्षणाबद्दल नांवारूपास आलीं होतीं. तक्षशिलेचें शैक्षणिक स्थान अबाधित होतें. तेथें दूरदूरचे विद्यार्थी येत. तीन वेद व अठरा शिल्पें यांचें उच्च शिक्षण तेथें दिलें जात असे. कायदा, वैद्यक, शस्त्रविद्या, अश्वविद्या, गजविद्या, धनुर्विद्या इ. शास्त्रांचें सप्रयोग शिक्षण मिळत असे. काशी, अयोध्या, उज्जयिनी, श्रावस्ती हीं शहरेंही शिक्षणाबद्दल प्रसिद्ध होतीं. राजपुत्राला आन्वीक्षिकी (तत्त्वज्ञान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रयी (वेद) वार्ता (अर्थ) व दण्डनीति (शासनशास्त्र) शिकवावींत असें अर्थशास्त्र सांगतें.

उपनिषदांनीं सुरू केलेल्या वैचारिक मंथनांतून नवनवीन तत्त्वदर्शनें निर्माण झालीं. भौतिक सृष्टीची सत्ता मानून अणुवाद शिकविणारा कणाद, ज्ञानाची सत्यासत्यता पारखून तत्त्वज्ञान कसें मिळवावें तें सांगणारा गौतम, पुरुषप्रकृतीचें द्वैत मानून त्यावर विश्वाची उभारणी करणारा कपिल, श्रुतीचा कर्मविधिपर अर्थ लावण्यास शिकविणारा जैमिनि व औपनिषदिक विचारांतून तत्त्वज्ञान निर्मिणारा बादरायण यांचे सूत्रग्रंथ या काळाच्या आसपास झाले असावेत. अर्थ व कामशास्त्रांचे महान् आचार्य या काळांत होऊन गेले व त्यांनीं त्या शास्त्रांच्या वाढीस अप्रतिम मदत केली. त्यांपैकीं थोड्या लोकांचीं फक्त नांवेंच सध्यां उपलब्ध आहेत.

या काळांतील सुप्रसिद्ध ग्रंथ म्हणजे कौटिल्याचें ' अर्थशास्त्र '. पृथ्वीचा लाभ व पालन कसें करावें तें अर्थशास्त्र शिकवितें. अर्वाचीन राज्यशास्त्रापेक्षां अर्थशास्त्राचें क्षेत्र व्यापक आहे. राजाला उपयोगीं पडणारें विविध ज्ञान यांत ग्रथित केलें आहे. या ग्रंथांत (१) राजा, राजपुत्र, मंत्री व अध्यक्ष (खातेंप्रमुख) यांचे आवश्यक गुण व कर्तव्यें सांगितलीं आहेत. (२) शेती, व्यापार, उद्योग, न्याय व न्यायालयें, कायदे व रूढी, वर्ण, आश्रम, जाति व श्रेणी यांचे धर्म, मंत्रिपरिषद् व नगरसंस्था यांच्या कामकाजाचे नियम. (३) परराष्ट्रीय धोरण, युद्धनीति, सैन्य, हेर, दूत, सेनानायक व दण्डनायक इ. इ. असे विविध विषय यांत हाताळले आहेत. एका दृष्टीनें हा ग्रंथ राजकारणाचा विश्वकोश आहे. यांत पंधरा अध्याय व दीडशें प्रकरणें आहेत. हें निव्वळ दर्शन किंवा बखरवजा नसून राजनीतीचीं तत्त्वें व व्यवहार यांची सुरेख सांगड यामध्यें घातलेली आहे. संस्कृत वाङ्मयांत हा ग्रंथ अद्वितीय आहे. या ग्रंथाचा कर्ता कौटिल्य उर्फ चाणक्य उर्फ विष्णुगुप्त हा विद्वान् ब्राह्मण चंद्रगुप्ताचा सहकारी व प्रधानामात्य होता. तो अत्यंत धोरणी, मुत्सद्दी, धाडसबहाद्दर व पाताळयंत्री होता. राजकारणामध्यें धर्म किंवा नीति गौण आहे असे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो मानीत असे. त्यामुळें कौटिल्य म्हणजे कुटिलतेचा मेरुमणि असें समीकरण पुष्कळदां मांडण्यांत येतें. पण राजसत्तेचा कट्टा पुरस्कर्ता असूनही राजसत्ता एकतंत्री, अनियंत्रित असावी हें त्यास मान्य नव्हतें. राजानें मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानेंच चालावें असा त्याचा आदेश आहे. प्रजेच्या सुखदु:खांशीं राजानें एकरूप व्हावें. 'प्रजासुखे सुखं राज्ञः प्रजानां च हिते हितम् ।नात्मप्रियं हितं राज्ञ : प्रजानां च प्रियं हितम् ॥' असा शुद्ध लोकशाहीचा सिद्धांत त्यानें मांडला आहे. त्याचे सामाजिक विचार पुरोगामी होते. अर्थव्यवहारांत नफेबाजीविरुद्ध त्यानें इषारा दिला असून धंद्यांचें राष्ट्रीयीकरण करणें त्यास मान्य होतें. तो तक्षशिलेचा राहणारा असून तेथेंच त्याचें शिक्षण झालें. नंदाच्या दरबारांत अपमान झाल्यामुळें चंद्रगुप्ताला हाताशीं धरून त्यानें नंदवंशाचा समूळ उच्छेद केला व आपल्या अपमानाचा भीषण सूड उगविला.

पाणिनीच्या व्याकरणाची चिकित्सापूर्वक पूर्तता करणारा वार्तिक ग्रंथ कात्यायनानें याच काळांत लिहिला.

बुद्धाच्या पूर्वजन्मींच्या कथा सांगणाऱ्या जातक कथा या काळांत लिहून पूर्ण झाल्या. त्यांमधून बुद्ध हा एक अद्‌भुत पुरुष असल्याचें दिसतें. अत्यंत सुगम व सरस लोकभाषेंत सांगितलेल्या या कथा भारतीय लोकवाङ्मयांत फार महत्त्वाच्या आहेत. बौद्ध शिल्प व कला यांना त्यांनीं अनंत विषय पुरविले आहेत. त्यांतील पशुपक्ष्यांच्या गोष्टी आज जगांतील अनेक वाङ्मयांत आढळतात. कथावस्तु हा पाली ग्रंथ तिष्यभिक्षूनें लिहिला असून त्याचा अंतर्भाव अभिधर्मपिटकामध्यें केलेला आहे. बुद्धकालीन विविध तात्त्विक मतांचा परामर्श व खंडण त्यांत असल्यानें बौद्धधर्मेतिहासांत तो ग्रंथ महत्त्वाचा मानला जातो.

जैनाचार्य भद्रबाहु यानें कल्पसूत्र हा महत्त्वाचा प्राकृत ग्रंथ लिहिला. यानेंच चंद्रगुप्तराजाला जैनधर्माची दीक्षा दिली होती अशी जैन परंपरा आहे. अशोकाचे विविध आलेख हें स्फूर्तिप्रद अक्षरवाङ्मय आहे. त्यांची भाषा, विचार व त्यांमागील भावना या अनन्यसाधारण आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिल्प व कला :

मौर्यकालांतील शांतता, सुबत्ता व सुखासक्ति यांमुळें विविध कलांची भरभराट झाली. कलेचें माध्यम बदलून लांकडाऐवजीं दगडाचा वापर होऊं लागला. राजाश्रयामुळें शिल्पकला, मूर्तिकला, खोदकाम व नक्शीकाम यांत झपाट्यानें प्रगति झाली. या कालांतील अवशेष स्तूप, स्तंभ, गुहा व इमारती यांमधून दिसतात. धर्माचार्यांच्या मृत अवशेषांवर स्तूप उभारीत. सांचीचा प्रसिद्ध स्तूप अशोकानें बांधला अशी ख्याति आहे. एका भक्कम दगडी चबुतऱ्यावर भरीव घुमटाकार विटांचें काम केलें आहे. त्या स्तूपा-भोंवतीं चौथऱ्यावर प्रदाक्षिणामार्ग आहे. चौथऱ्याखालीं प्रदक्षिणामार्ग सोडून दगडी कठडे उभारले आहेत. अशोकानें एकूण ८४००० स्तूप बांधल्याची दंतकथा आहे.

मौर्यकालांतील उत्कृष्ट कलाकृति म्हणजे अशोकाचे स्तंभ होत. प्रत्येक स्तंभामध्यें एक अखंड दगडी खांब व त्यावर स्तंभशीर्ष आहे. खांब अग्नि-जन्य कुरुंद (Sandstone) पाषाणांतून कोरलेला असून ३० ते ४० फूट उंच आहे. तो वर्तुलाकार असून तळापासून माथ्यापर्यंत किंचित् निमु-ळता होत गेला आहे. हे स्तंभ इतके घोटीव व गुळगुळीत आहेत कीं, त्यांत तोंड पाहून घ्यावें. सारनाथ येथील स्तंभाच्या माथ्याच्या बाजूला पालथ्या कमळाचा आकार दिलेला आहे. खांबावर एक वर्तुलाकार चिरेबंदी असून तिच्या चार बाजूस हत्ती, बैल, घोडा व सिंह कोरलेले असून त्याशिवाय चोहोंबाजूंस चार धर्मचक्रें आहेत. या चिरेबंदीवर स्तम्भशीर्ष (Capital) म्हणून चारी दिशांस तोंड केलेले अजस्र आकाराचे चार सिंह पाठीकडून एकमेकांस चिकटून उभे आहेत. हे सर्व सिंह एकाच अखंड पाषाणांतून कोरलेले आहेत. हेंच अशोकचिन्ह सर्वसंग्राहक, प्रगतिशील व शांततावादी भारतीय गणराज्यानें राजमुद्रा म्हणून स्वीकारलें आहे. असे ३५–४० स्तंभ अशोकानें राज्यांत वेगवेगळ्या ठिकाणीं उभारले होते. त्या स्तंभांचा घोटीवपणा, सुबकता, प्रमाणशीरपणा, पशूंच्या मूर्तींतील जिवंतपणा, उदात्त कल्पकता व भव्यता आजही आदर्शवत् आहे. भारतीय शिल्पकला येथें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कळसास पोहोंचली आहे. प्रत्येक खांब ४०–५० टन वजनाचा भरेल. हे सर्व दगड चुनारच्या खाणींतून काढलेले आहेत. दोन हजार वर्षांपूर्वी आजकालचीं यांत्रिक साधनें उपलब्ध नसतांना हे चिरेबंद अवजड दगड खाणींतून काढून कसे घडविले असतील व दूरवरच्या त्या त्या ठिकाणीं कसे नेलें व उभारण्यांत आले हें एक गूढच आहे. यावरून तत्कालीन स्थापत्य-शास्त्राच्या प्रगतीची कल्पना येते.

अशोक व त्याचा नातू दशरथ यांनीं गयेजवळ बराबर डोंगरांत आजीवकांसाठीं विहार खोदले आहेत. अत्यंत कठीण अशा अग्निजन्य खडकांत हे विहार खोदलेले असूनही त्यांच्या आंतील बाजू आरशासारख्या घोटीव व गुळगुळीत आहेत. हे विहार म्हणजे तत्कालीन शिल्पकारांचे अविश्रांत श्रम, दृढ धर्मनिष्ठा व उत्कृष्ट कला यांचीं जिवंत स्मारकेंच आहेत.

मेगॅस्थिनीस व फाहेन या दोघांनींही पाटलीपुत्र येथील मौर्यांच्या राजवाड्यांची वारेमाप स्तुति केली आहे. राजवाड्यांतील सुबक नकशीकाम व बारीक कोरीव काम पाहून फाहेन लिहितो कीं, जगांतील कोणाही मानवी हाताला इतकी उत्कृष्ट कलाकृति निर्माण करतां यावयाची नाहीं. चंद्रगुप्ताचा दरबार हॉल एक हजार खांबांचा होता. यावरून त्याच्या विस्ताराची व भव्यतेची कल्पना येईल.

चंद्रगुप्ताच्या गिरनार येथील सुभेदारानें गिरनारच्या डोंगरांतील प्रवाह अडवून सुदर्शन तलाव बांधला. अशोकाच्या वेळेस त्यामध्यें सुधारणा करून त्यांतून शेतीला पाणीपुरवठा करण्याची उत्तम सोय केली गेली. त्या तलावाची रचना व पाणी सोडण्याची व्यवस्था आजच्याइतकीच आधुनिक होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण १५ वें

अराजक काल

(ख्रि. पू. १८८ ते इ. स. ३२०)

अशोकाचा मृत्यु ही गोष्ट जगाच्या इतिहासांतील एक महत्त्वाची गोष्ट आहे. त्याच्या मृत्यूनंतर थोडक्याच काळानें मौर्य घराणें लयास गेलें. मौर्य घराण्याचा शेवटचा सम्राट् बृहद्रथ हा अतिशय दुर्बल राजा होता. त्याच्या मंत्र्यांच्या हातांतील तो एक बाहुलेंच बनला होता. त्याचा सेनापति पुष्यमित्र यानें मोठ्या धूर्तपणानें राजाला सैन्याची पाहणी करण्यासाठीं बोलावून मारेकऱ्यांकडून त्याचा खून करविला (ख्रि. पू. १८८), व स्वतः गादी बळकाविली.

शुंग घराणें (ख्रि. पू. १८८ ते ख्रि. पू. ७२) :

पुष्यमित्र हा शुंग घराण्याचा पहिला राजा होय. याची राजधानी पाटलीपुत्र येथें होती. त्याला सैन्याचा चांगला पाठिंबा असल्यामुळें त्याची ३६ वर्षांची राजवट युद्धांनीं भरलेली आहे. या पुष्यमित्राचा वैदिक धर्माला पाठिंबा असावा असें पुराणांतील पुराव्यांवरून वाटतें. बाणाच्या वाङ्मयांत व कालिदासाच्या नाटकांत (मालविकाग्निमित्रम्) पुष्यमित्राचा व त्याच्या वंशजांचा उल्लेख आला आहे. पुष्यमित्राचा मुलगा अग्निमित्र यानें विदर्भावर स्वारी करून तो प्रांत शुंगांच्या साम्राज्याखालीं आणला. याच पुष्यमित्राच्या कारकीर्दीत ख्रि. पू. १७५ च्या सुमारास युक्राटिडीझ या बॅक्ट्रियन राजाचा नातलग मिनँडर या ग्रीक राजानें अलेक्झांडरप्रमाणेंच मोठ्या सैन्यानिशीं हिंदुस्थानवर स्वारी केली. त्यानें सिंध, सुराष्ट्र व पश्चिम किनाऱ्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील कांहीं भाग जिंकले. मथुरा शहर घेतलें. माध्यमिका व साकेत या नगरींना वेढे घातले व खुद्द पाटलीपुत्र राजधानीवर चालून जाण्याचा त्यानें बेत केला. परंतु लवकरच घनघोर युद्ध होऊन या ग्रीक राजाला हिंदुस्थानांतून बाहेर हांकलण्यांत आलें. युरोपीय सेनानायकानें जमिनीवरून स्वारी करून हिंदुस्थान जिंकून घेण्याचा केलेला हा दुसरा व शेवटचाच प्रयत्न होय. यानंतर पुष्यमित्रानें आपले गेलेले प्रांत परत मिळविले. या सर्व विजय नंतर वैदिक परंपरेप्रमाणें आपलें सार्वभौमत्व सिद्ध करण्यासाठीं पुष्यमित्रानें एक मोठा अश्वमेध यज्ञ केला व आपला नातु वसुमित्र याच्याबरोबर यज्ञीय अश्व देऊन त्यास दिग्विजयासाठीं पाठविलें. सिंध प्रांतांत यवनांचा व इतर कित्येक प्रांतांतील राजांचा पराभव करून व अजिंक्य ठरून वसुमित्र परत आल्यावर पुष्यमित्रानें अनेकांना निमंत्रणें पाठविलीं. यांत प्रसिद्ध व्याकरणकार पतंजलि हाही होता. याप्रमाणें त्यानें यज्ञाची सांगता केली.

बौद्धधर्माविरुद्ध सुरू झालेल्या वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या चळवळीचा निदर्शक म्हणून या अश्वमेध यज्ञाला फार महत्त्व आहे. बौद्ध वाङ्मयांत पुष्यमित्र हा बौद्धधर्माचा शत्रु म्हणून ओळखला जातो. त्यांच्या म्हणण्याप्रमाणें त्यानें बौद्धांचा छळही केला होता. बौद्ध ग्रंथांतील वर्णनाचा अतिशयोक्तीचा भाग सोडून दिल्यास छळाची गोष्ट निखालस खोटी असेल असें म्हणवत नाहीं. स्मिथ म्हणतो कीं, हिंदुधर्माभिमानी राजांनीं क्रोधानें असें केलें असण्याची शक्यता आहे. कारण बौद्ध व जैन मतांच्या अशोक इत्यादि राजांनीं त्या पंथांतील तत्त्वें अंमलांत आणण्याकरितां निर्दयपणानें लोकांवर सक्ति केली होती असें पाश्चात्य ग्रंथकार सांगतात. सर्वसामान्यपणें विचार केल्यास भरतखंडांत उभयपक्षीं छळाचीं उदाहरणें फार क्वचित् असून निरनिराळ्या संप्रदायाचे लोक बहुतेक सर्वत्र गुण्यागोविंदानें एकत्र नांदत असत असेंच दिसतें. इतकेंच काय, पण सरकारदरबारींही सांप्रदायिक भेदभाव आड न येतां सर्वांवर राजाची सारखीच कृपादृष्टि असे. याचाच परिणाम म्हणून वैदिक, जैन व बौद्ध यांचा त्रिवेणीसंगम होऊन समन्वयात्मक भारतीय संस्कृतीचें, हिंदु-संस्कृतीचें स्वरूप आज आपणांस पाहावयास मिळतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुष्यमित्राच्या राज्याचा विस्तार दक्षिणेस विदर्भ व नर्मदा नदीपर्यंत होता. पंजाबांत त्याचें अधिराज्य असलें तरी ग्रीकांना त्याला अद्याप तोंड द्यावें लागत होतें. ३६ वर्षें राज्य करून पुष्यमित्र खि. पू. १५२ मध्यें मरण पावला.

यानंतर अग्निमित्र राज्यावर बसला. बापाच्या कारकीर्दींतच अग्निमित्रानें स्वपराक्रमानें विदर्भ प्रांत जिंकला होता. मालविकाग्निमित्र या नाटकाच्या पुराव्यावरून विदर्भ राजपुत्र (यज्ञसेन) व त्याचा चुलतभाऊ माधवसेन याला तें राज्य अग्निमित्रानें विभागून देऊन वरदा नदी ही त्यांच्या राज्याची सरहद्द ठरविली होती असें दिसतें. परंतु ही कारकीर्द आठ वर्षांत आटोपून वसुज्येष्ठ हा राज्यावर आला व त्यानंतर सात वर्षांनीं वसुमित्र (अग्निमित्राचा मुलगा) राज्यावर आला व यानंतर दहा वर्षांनीं अंध्रक (२ वर्षें), पुलिंदक (३ वर्षें), घोष (३ वर्षें), वज्रमित्र (९ वर्षें) अशा चार शुंग राजांच्या कारकीर्दी अवघ्या सतरा वर्षांत संपल्या, यावरून त्या काळांत बऱ्याच धामधुमी व क्रांतिकारक घटना घडत असाव्यात. अग्निमित्रानंतरचा शुंग घराण्यांतील महत्त्वाचा राजा म्हणजे भागवत. यानें एकंदर ३२ वर्षें राज्य केलें. सध्यां ग्वाल्हेर संस्थानांत मोडत असलेल्या प्रदेशांत त्यानें एक मोठा स्तंभ उभारला. शुंगांचें व ग्रीक राजांचें पुढें बरेंच सूत जमलेलें दिसतें. भागवताकडे आलेल्या हेलिओडोरस या ग्रीक वकिलानें वैदिक धर्माचा स्वीकार केला असल्याची व त्याला महाभारताची गोडी लागल्याची माहिती मिळते. शुंग घराण्यांतील शेवटचा म्हणजे दहावा राजा देवभूमि (दहा वर्षें) हा अत्यंत व्यसनी व नीच होता. त्याचा मुख्य मंत्री कण्व घराण्यांतील वसुदेव नांवाचा ब्राह्मण होता. देवभूमि कांहीं निंद्य कर्म करण्यांत गर्क असतांना वसुदेवानें त्याचा खून केला. (खि. पू. ७३). देवभूमीबरोबरच शुंग घराण्याचें राज्य लयास जाऊन मगधावर कण्व घराण्याची सत्ता प्रस्थापित झाली.

शुंग घराण्याच्या दहा राजांनीं एकूण ११२ ते ११५ वर्षें राज्य केलें. या कारकीर्दीचा साकल्यानें विचार केल्यास असें म्हणतां येईल कीं, ग्रीकांना हुसकून लावून शुंगांनीं भारतीय इतिहासांत स्वतःचें नांव अजरामर केलें आहे. त्यांनीं स्वतः वैदिक धर्माचा स्वीकार करून त्याला उत्तेजन दिलें.

पुस्तकालय
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन होऊन भारताच्या सांस्कृतिक इतिहासाला उजळा मिळाला. या कारकीर्दींत वाङ्मय व कला यांना थोडी ऊर्जितावस्था प्राप्त झाली होती.

कण्व घराणें (खि. पू. ७३ ते खि. पू २७) :

आपण वर पाहिलेंच आहे कीं, शुंग घराण्यांतील शेवटचा दुर्व्यसनी राजा देवभूमि याला ठार मारून त्याचें राज्य बळकाविण्याकरितां त्याचाच ब्राह्मण प्रधान वसुदेव यानें कट केला होता. देवभूमि हा प्रथमपासूनच केवळ नामधारी राजा असून त्याच्या राज्याचीं सर्व सूत्रें त्याचा प्रधान वसुदेव याच्या हातीं होतीं. वसुदेव हा कण्व घराण्यांतील होता. त्यानें नऊ वर्षें राज्य केलें. वसुदेवानंतर कण्व घराण्यांत **भूमिमित्र** (चौदा वर्षें), **नारायण** (बारा वर्षें), **सुशर्मा** (दहा वर्षें) असे राजे झाले. म्हणजे कण्वांनीं पंचेचाळीस वर्षें राज्य केलें. या काळांत वैदिकधर्माला उत्तेजन मिळालें असलें पाहिजे. या घराण्यांतील शेवटचा कण्व राजा सुशर्मा यास आंध्र किंवा सातवाहन घराण्यांतील राजानें ठार मारून मगधावर आपली सत्ता चालू केली. (खि. पू. २७).

ग्रीक लोकांच्या स्वाऱ्या :

या प्रकरणाच्या आरंभीं ‘ अशोकाचा मृत्यु ही जगाच्या इतिहासांतील एक महत्त्वाची घटना आहे. ’ असें म्हटलें आहे तें अनेक अर्थांनीं खरें आहे. कारण या काळांत भारतांत प्रबल असा सम्राट् कोणीच झाला नाहीं. देशांत राजकीय उलथापालथी फार मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या, आणि उत्तर हिंदुस्थान हा एक दुर्बल प्रदेश होऊन बसला. प्रजेला सांभाळून सर्व देशाची एकतानता टिकविणें कोणास जमलें नाहीं. या अनागोंदीचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. हिंदुस्थानच्या पश्चिम सीमेवर परकीय लोकांची राज्यें होतीं. त्यांनीं या संधीचा फायदा घेतला व स्वाऱ्या करण्यास सुरुवात केली. ज्याला जेवढा लचका तोडतां येईल तेवढा त्यानें तोडला. मगधांचें विस्तृत साम्राज्य संकोचित होत होत फक्त राजधानीच्या प्रदेशापुरतेंच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मर्यादित झालें. अतःपर सतलज नदीच्या पलीकडील हिंदुस्थानचा इतिहास हा पश्चिम आशियांतील घडामोडींचा उपांग झाला, व गंगेच्या कांठचा हिंदुस्थान दक्षिणेकडील आंध्रांच्या वाढत्या सत्तेचा उपांग झाला. देश जवळ जवळ अराजक स्थितीस पोहोंचला. याचा अर्थ देशभर कोणी राजे नव्हतेच असें नव्हें, तर अनेक लहान लहान राज्यें पुन्हा देशभर स्थापन झालीं. ही स्थिति देशाच्या दृष्टीनें भयानक होती. ग्रीक, शक, कुशान, पार्थियन इत्यादि परकीय लोक या काळीं भारतांत शिरले. पण या सर्व यवनांचें भारतीभवन झालें—ते भारतीय होऊन गेले. यांपैकीं प्रथम भारतांत आलेल्या ग्रीकांचा विचार या प्रकरणांत व बाकीच्यांचा परामर्ष पुढील प्रकरणांत घ्यावयाचा आहे.

हिंदुस्थानांत येणारा पहिला ग्रीक राजा अलेक्झांडर याला चंद्रगुप्त मौर्यानें हिंदुकुश पर्वताच्या पलीकडे हांकलून दिलें, हें मागें आपण पाहिलेंच. अशोकाच्या वेळेपर्यंत ग्रीकांनीं पुन्हा डोकें वर काढलें नाहीं. परंतु त्याच्या मृत्यूनंतर बॅक्ट्रिया व पार्थिया येथील हेलेनी म्हणजेच ग्रीक संस्कृतीच्या राजांनीं व इतर रानटी जमातींनीं वायव्य सरहद्द प्रांतावर हल्ला करण्यास सुरुवात केली. अलेक्झांडरनंतर या दोन्ही प्रदेशांवर सेल्यूकस निकेटर हा राज्य करीत होता. खि. पू. २६२ च्या सुमारास त्याचा नातू अँटियोकस या मद्यपी व दुर्व्यसनी राजानें १५ । २० वर्षें राज्य केलें. परंतु अखेर डायोडोटसच्या नेतृत्वाखालीं बॅक्ट्रियन लोकांचें व आर्सेकीझ याच्या आधिपत्याखालीं पार्थियन लोकांचें, अशीं दोन बंडें होऊन तीं राज्यें स्वतंत्र झालीं. बॅक्ट्रियन लोकांचीं चांगलीं वसलेलीं शहरें एक हजार होतीं, तर पार्थियन लोक लाखो ठिकाणीं टोळ्या करून राहिलेले होते.

डायोडोटसनें स्थापलेलें बॅक्ट्रियन राज्य फारच थोडा वेळ टिकलें. खि. पू. २४५ मध्यें पहिला डायोडोटस वारला व त्याचा मुलगा दुसरा डायोडोटस यानें पंधरा वर्षें राज्य केलें. खि. पू. २२० मध्यें डायोडोटसविरुद्ध बंड करून मॅग्नीशियाचा पुढारी युथिडेमस या वेगळ्या घराण्यांतील माणसानें बॅक्ट्रियाचें राजपद मिळविलें. खि. पू. २०६ मध्यें अँटियोकस दि ग्रेट (खि. पू. २२३ ते १८७) या सीरियाच्या राजानें हिंदुकुश पर्वत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओलांडून काबूल खोऱ्यांत राज्य करणाऱ्या सुभगसेन नांवाच्या हिंदू राजाकडून बराच खजिना व कित्येक हत्ती जिंकून घेतले. अँटियोकसनें युथिडेमसचा मुलगा डिमिट्रिअसला आपला जांवई करून घेतलें. या जांवयानें सासऱ्याप्रमाणेंच खि. पू. १९० मध्यें हिंदुस्थानावर स्वारी करून काबूल, पंजाब व सिंध हे प्रांत जिंकले. परंतु डिमिट्रियसच्या स्वतःच्या प्रांतांत युक्राटिडीझनें बंड करून बॅक्ट्रिया बळकाविल्यामुळें तो हिंदुस्थानांतच राहिला.

यानंतर शुंगांच्या कारकीर्दींत म्हटल्याप्रमाणें डिमिट्रियसचा सेनापति व जांवई मिनँडर यानें खि. पू. १७५ च्या सुमारास हिंदुस्थानवर स्वारी करून पूर्वेकडे साकेतपर्यंत व दक्षिणेकडे भडोचपर्यंतचा प्रदेश हस्तगत केल्याचें आपण मागें पाहिलेंच आहे. त्यानें हिंदुस्थानांतील प्रांतावर अत्यंत न्यायीपणानें राज्य केलें असें इतिहासकार सांगतात. आमच्या या देशांतील वातावरणाचा गुणच असा आहे कीं, एखादाच अपवाद सोडून, येथें आलेले सर्व परकीय आमच्या देशाशीं समरस होऊन गेले. मिनँडरनें बौद्धधर्माचा स्वीकार केला. बौद्धवाङ्मयांत पालीभाषेंत 'मिलिंदपन्ह (मिलिंदाचे प्रश्न) हा ग्रंथ महत्त्वाचा असून त्यामुळें मिलिंदाचें म्हणजेच मिनँडरचें नांव अजरामर झालें आहे. काबूल प्रांतांत उद्भवलेलें बंड मोडण्यासाठीं मिनँडर गेला असतांना पुष्यमित्र शुंगानें सर्व प्रांत परत मिळविले व सिंधुनदीपर्यंत जाऊन त्यानें मिनँडरचा पराभव केला.

युक्राटिडीझ बॅक्ट्रियाकडे परत जात असतां त्याचा मुलगा अपोलोडोटस यानें त्याचा अमानुषपणें खून केला. पुढें हेलिओक्लीझ नांवाच्या युक्राटिडीझच्या दुसऱ्या मुलानें या खुनाचा सूड घेऊन बॅक्ट्रियावर थोडीं वर्षें राज्य केलें. हिंदुकुश पर्वताच्या उत्तरेकडील प्रदेशावर राज्य करणारा हेलिओक्लीझ हा शेवटचा ग्रीक राजा होय. मिनँडरच्या पश्चात् ग्रीक लोकांचा अंमल हिंदुस्थानांत जवळजवळ शंभर वर्षें टिकला.

पार्थियन (पल्हव) लोकांच्या स्वाऱ्या :

पार्थियनांचा पहिला राजा मिथ्राडेटीझ (खि. पू. १७१ ते १३६) हा फार पराक्रमी होता. बॅक्ट्रियाचा राजा युक्राटिडीझ याच्याशीं बरींच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षे तो समकालीन होता. त्यानें आपली सत्ता सिंधु नदीच्याही पूर्वेस वाढविली होती. तक्षशिला व मथुरा येथील क्षत्रप राजे पार्थियन म्हणजे पार्शियन राजांचे अंकित असले पाहिजेत. कारण त्यांनीं आपल्या नांवांना पर्शियन पदव्या लावल्या होत्या. या पार्थियन राजांपैकीं मौएझ हाच पहिला असावा. त्यानें ख्रि. पू. १२० च्या सुमारास पश्चिम पंजाब आपल्या सत्तेखालीं आणला. या सुमारास पार्थियन राजांना इराणांत रानटी लोकांशीं लढावें लागल्यामुळें हिंदुस्थानावरील त्यांचा अंमल शिथिल झाला. यानंतर मिथ्राडेटीझ दि ग्रेट यानें पंजाब व सीस्तान या प्रांताचीं सूत्रें स्वतः हातांत घेतलीं. ॲराकोशिया या प्रांताचा राजप्रतिनिधि ॲझेस याला त्यानें तक्षशिला प्रांतावर नेमलें. ॲझेसनंतर त्याचा मुलगा ॲझिलिसीझ यानें व नंतर त्याचा नातू दुसरा ॲझेस यानें राज्य केलें. इ. स. २० च्या सुमारास दुसऱ्या ॲझेसनंतर गोंडोफर्नेस राज्यावर आला व त्यानें सिंध आणि ॲराकोशिया हे प्रांत जिंकून घेतले. तो इ. स. ६० मध्यें मरण पावल्यावर त्याच्या राज्याचे विभाग होऊन पश्चिम पंजाबवर त्याच्या भावाचा मुलगा अब्दागसीझ राज्य करूं लागला आणि ॲराकोशिया व सिंध या प्रांतावर प्रथम आर्थाग्नीझ व नंतर पाकोरस यानें राज्य केलें.

इसवी सनाच्या पहिल्या शतकाच्या मध्याच्या सुमारास कुशान राजा वेम कॅडफिसस् यानें पंजाब प्रांत जिंकून घेतला. ॲराकोशिया व सिंध या प्रांतांचीही तीच गत झाली असावी. तथापि, सिंधु नदीच्या निरनिराळ्या फांट्यांमधील प्रदेशांत कांहीं लहान लहान पार्थियन राज्यें शिल्लक राहिलीं असावींत.

गोंडोफर्नेसच्या कारकीर्दींत प्रसिद्ध ख्रिस्ती मिशनरी सेंट थॉमस हा भारतांत आला. त्यानें आपल्या धर्माचा उपदेश इतक्या कळकळीनें व परिणामकारक रीतीनें केला कीं, खुद्द राजा, त्याचा भाऊ व इतर पुष्कळ लोक ख्रिस्ती बनले. त्यानंतर सेंट थॉमस दक्षिण हिंदुस्थानांत गेला व तेथें त्यानें आपल्या धर्माचा प्रसार केला. येथेंच त्याचा शांततेनें शेवट झाला असें हेराक्लिऑन दि ग्नॉस्टिक हा प्राचीन ग्रंथकार म्हणतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्थियनांचे हिंदुस्थानवर हल्ले होऊं लागल्यापासून पुढें सुमारें दोन शतकें हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवरील पंजाब व त्याच्या शेजारचा प्रांत काबूल व स्वात नद्यांचीं खोरीं या भागांवर ग्रीकांचीं लहान लहान राज्यें असून तीं पार्थियन सम्राटांच्या अंकित होतीं. मात्र त्या सर्वांना रुप्याचीं व ब्राँझचीं नाणीं पाडण्याचा अधिकार असे. ग्रीक राजांपैकीं शेवटचा हर्मैऑस याचा युएची अथवा कुशान जातीच्या लोकांचा मुख्य पहिला कॅडफिसस् यानें इ. स. ४० च्या सुमारास पराभव करून काबूल प्रांत युएची (कुशान) साम्राज्यास जोडला. या पहिल्या कॅडफिससनें नाणीं पाडलीं. त्यावर प्रथम ग्रीक राजा हर्मैऑस याचा मुखवटा व नंतरच्या नाण्यांवर सुप्रसिद्ध रोमन बादशहा ऑगस्टस् याचा मुखवटा काढला होता. परंतु अखेर त्यानें एका बाजूस हिंदी नंदीचें व दुसऱ्या बाजूस बॅक्ट्रियन उंटाचें चित्र असलेलीं नाणीं पाडलीं. या नाण्यांवरून प्रथम ग्रीक संस्कृतीचा अंमल होता तो नष्ट करून तेथें कुशान टोळ्यांनीं आपला अंमल बसविला हें सिद्ध होतें.

ग्रीक संस्कृतीचा भारतावर परिणाम :

व्हिन्सेंट स्मिथ म्हणतो कीं, अलेक्झांडरच्या स्वारीचा हिंदुस्थानावर म्हणण्यासारखा कांहींच परिणाम झालेला नाहीं. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर वीस वर्षांनीं सेल्यूकस निकेटर यानें सिंधु नदीच्या पूर्वेकडील अलेक्झांडरनें जिंकलेला प्रदेश परत मिळविण्याचा यत्न केला, परंतु तो फुकट गेला. इतकेंच नव्हे, तर चंद्रगुप्त मौर्यानें सिंधु नदीच्या पश्चिमेकडील प्रदेशही परत जिंकून घेतला. सेल्यूकसचा वकील मेगॅस्थेनीस यानें हिंदु समाजाचें जें चित्र रेखाटलें आहे त्यावरून हिंदु संस्कृतीवर थोडाफार इराणी संस्कृतीचा परिणाम झाला होता, पण ग्रीक संस्कृतीचा मुळींच झाला नव्हता असें स्पष्ट दिसतें. अलेक्झांडरच्या मृत्यूनंतर ८०।९० वर्षें मौर्य सम्राटांच्या पराक्रमामुळें हिंदुस्थानांत कोणाही परकीयांचा प्रवेश झाला नाहीं. मौर्यांच्या वेळीं भारतीय चित्रकला व सांचकाम यांवर हेलेनी अलेक्झांड्रियन नमुन्यांचा कांहीं परिणाम झाला आहे; परंतु हिंदु संस्कृतीच्या मूलप्रकृतीवर ग्रीक संस्कृतीचा कांहींच परिणाम झालेला नाहीं. ग्रीक नमुन्याच्या नाण्यांशिवाय परकीय अंमलाची कोणतीही खूण भारतांत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कलिंगदेशचा खारवेल :

मौर्यांचें साम्राज्य विलयास गेल्यावर आणखी एक बलाढ्य राज्य उदयास आलें, तें म्हणजें कलिंगाचें. अशोकाच्या मृत्यूनंतर कांहीं दिवसांनीं कलिंगांनीं आपलें साम्राज्य परत मिळविलें. सध्याचे पुरी व गंजम हे जिल्हे व ओरिसांतील कटक जिल्हा व त्याच्या उत्तरेकडील कांहीं प्रदेश एवढा कलिंग राज्याचा विस्तार होता. ख्रि. पू. पहिल्या शतकांत चेदी वंशांतील महामेघवाहन या उपशाखेच्या राजांचें राज्य कलिंगावर होतें. मात्र मौर्यांच्या स्वारीनंतरचा कलिंगाचा इतिहास बराच संदिग्ध आहे. ओरिसा येथील भुवनेश्वराच्या देवळाजवळील उदयगिरि टेकडिवर हाथिगुंफा नांवाची एक गुहा आहे. तेथील एका जीर्ण शिलालेखांत आपणांस चेदिवंशांतील पराक्रमी राजा खारवेल यासंबंधीं कांहीं माहिती मिळते. खारवेल हा कलिंगाच्या राजवंशांतील तिसऱ्या पिढीचा राजा होय; इतकेंच नव्हे तर वसु उपरिचर (चैद्य) या प्राचीन चेदिराजाचा तो वंशज आहे. भारतीय इतिहासांत महाराजा खारवेल ही प्राचीन विख्यात व्यक्ति होय. हाथिगुंफा प्रशस्तीवरून असें दिसतें कीं, खारवेलाच्या आयुष्याचीं पहिलीं पंधरा वर्षें राजपुत्राला योग्य अशा जीवनांत गेलीं. वाङ्मय, नाणीं, अर्थव्यवहार, राज्यव्यवहार, न्यायदान यांचा अभ्यास त्यानें यावेळेसच केला. सोळाव्या वर्षीं तो युवराज झाला. चोविसाव्या वर्षीं तो कलिंगाचा महाराजा झाला. ललाकवंशाच्या हस्तिसिंहाच्या नातवाच्या मुलीशीं त्यानें विवाह केला होता. खारवेल हा धर्मनिष्ठ जैन होता व त्याला 'भिक्षु-राज' असेंही म्हणत. पण तो धर्मांध नव्हता. अशोकाप्रमाणेंच सर्व धर्मपंथांना त्यानें आपल्या राज्यांत वाव दिला होता.

राज्यावर बसल्याबरोबर त्यानें दिग्विजयाची मोहीम काढली. शेजारच्या पश्चिमेकडील शातकर्णींचे व खारवेलाचे संबंध सख्यत्वाचे असावेत. राज्यावर बसल्यानंतर चौथ्या वर्षीं त्यानें विद्याधर राजाची राजधानी जिंकली, राष्ट्रिक व भोजक या वऱ्हाडांतील लोकांचा त्यानें पराभव केला. आठव्या वर्षीं बराबर या डोंगरावरील गोरथगिरी हा डोंगरी किल्ला त्यानें जिंकला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व गया जिल्ह्यांतील राजगीरवर हल्ला केला. या स्वाऱ्यांच्या दराऱ्यानें ग्रीक राजा डिमेट्रियस मथुरेला पळून गेला. अकराव्या वर्षीं मच्छलीपट्टम्‌ची राजधानी पृथूद त्यानें जिंकली. पुढील वर्षीं गंगा नदीच्या तीरावर मगधाचा राजा बृहस्पतिमित्र याचा पराभव करून, पूर्वींचा सूड म्हणून त्यानें अंग व मगध येथील बरीच लूट नेली. त्याच वर्षीं दक्षिणेकडील पाण्ड्यराजाचाही त्यानें पराभव केला.

खारवेल हा प्रजाहितदक्ष राजा होता. प्रजेच्या कल्याणासाठीं त्यानें अमाप द्रव्य खर्च केलें. तो स्वतः संगीतज्ञ असल्यामुळें अनेक नर्तकांना व गायकांना त्यानें उदार आश्रय दिला होता. नंदांच्या कारकीर्दींतील एक कालवा त्यानें रुंद केला. महाविजय–प्रासाद या नांवाचा एक उत्कृष्ट राजवाडा बांधवून त्यानें उध्वस्त राजधानीची पुनर्वसाहत केली. खंडगिरिं पर्वतावर (कुमारी पर्वत) त्यानें अनेक जैन लेणीं कोरलीं आहेत व जवळच पाभार नांवाचा एक विहारही बांधला आहे. त्यानें रुंद केलेल्या कालव्याचा काल शिलालेखांत (नन्दराज–त्रिवर्ष–शतोद्घाटित) असा उल्लेख असल्यामुळें 'नंदराजानंतर तीनशें वर्षांनीं' याचा अर्थ खि. पू. पहिलें शतक असा होतो आणि हाच खारवेलाचा काल असावा.

खारवेलाच्या मृत्यूनंतर कलिंगाची राजकीय परिस्थिति कितीही बिघडली असली, तरी भारतीय संस्कृतीचा प्रसार समुद्रापलीकडेही करण्यांत कलिंग-राज्यांतील प्रजेचा फारच मोठा वांटा होता असें म्हटलें पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण सोळावें

शक व कुशान यांच्या स्वाऱ्या

शक (सिथियन) लोकांच्या स्वाऱ्या :

मध्य आशियांतील आणि उत्तर युरोपांतील अनेक रानटी जातींनीं शेजारच्या सुधारलेल्या राष्ट्रांवर स्वाऱ्या करून त्यांना अनेक वेळां त्रास दिला. या सर्व टोळ्यांना सिथियन हें नांव लावण्यांत येतें. पर्शियन लोकांनीं या लोकांना ' शक ' हें नांव दिलें असावें. यांच्याविषयीं आपणांस ग्रीक ग्रंथकार व चिनी ग्रंथ यांतूनच थोडीफार माहिती मिळते. हे लोक प्रत्यक्ष तलवारीलाच देवता मानून तिची उपासना करीत. त्यांच्या चालीरीति अत्यंत घाणेरड्या व क्रूरपणाच्या असत. ते दिसण्यांत भयंकर असून त्यांच्या एकवटलेल्या सामर्थ्यापुढें कोणत्याही तत्कालीन सुधारलेल्या राष्ट्राचा निभाव लागणें शक्य नव्हतें. ज्युपिटर, अपोलो, व्हीनस, हर्क्युलिस, मार्स या त्यांच्या देवता होत्या. ते मनुष्यबळी देत. शत्रूंच्या मुंडक्यांचा नजराणा ते आपल्या राजास देत. चिनी ग्रंथकारानें यांना ' सोक ' असें म्हटलें आहे.

युएची अथवा कुशान लोकांना खि. पू. १७० च्या सुमारास चीनच्या वायव्य प्रांतांतून हांकलण्यांत आल्यामुळें ते पश्चिमेकडे सरकले. यानंतर खि. पू. १६० च्या अगोदर त्यांची जक्सार्टीझ (सिरदर्या) च्या उत्तरेस राहात असलेल्या शकांशीं गांठ पडून त्यांनीं शकांना दक्षिणेकडे हांकून दिलें. तेव्हां हे शक उत्तरेकडून अनेक मार्गांनीं हिंदुस्थानांत शिरले. पंजाबांतील तक्षशिला, यमुनेच्या कांठचें मथुरा नगर त्यांनीं हस्तगत केलें व तेथें आपलें आसन स्थिर केलें. त्यांनीं स्वतःला क्षत्रप ही पदवी घेतली.

शकांची दुसरी टोळी इ. स. च्या पहिल्या शतकांत दक्षिणेकडे घुसून सुराष्ट्र (काठेवाड) व्यापून राहिली व तेथें शक राजघराणें स्थापलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांचा अंमल इ. स. ३९० च्या सुमारास २ रा चंद्रगुप्त (विक्रमादित्य) जिंकून घेईपर्यंत तसाच कायम राहिला. शक राजा मॉएझ (खि. पू. २० ते इ. स. २२) यानें इराणच्या राजाशीं असलेले संबंध तोडून, ' राजाधिराज ' हें बिरुद घेऊन हिंदुस्थानच्या वायव्य सरहद्दीवर राज्य केलें. त्याचीं नाणीं पूर्वीच्या ग्रीक राजासारखीं होतीं. पुढें मॉएझनें गांधार प्रदेश आपल्या ताब्यांत आणला. याच्या कारकीर्दींत मथुरेपर्यंत (इ. स. १५) शकांनीं आपले हातपाय पसरले.

नाणकशास्त्राच्या आधारें असें म्हणतां येईल कीं, मॉएझनंतर ॲझेस (अय) (खि. पू. ५ ते इ. स ३०) हा महाराजाधिराज झाला. ॲझेस हा बहुधा स्पालिरिझेस्‌चा मुलगा व मॉएझ्चा जांवई असावा. यानंतर ॲझिलिझेस (इ. स. २८ ते ३०) यानें ॲझेसबरोबरच राज्य केलें. यानंतर दुसरा ॲझेस् (इ. स. ३५ ते ७९) हा राजा झाला असावा.

शक वर्षगणना :

ही वर्षगणना एखाद्या शकराजानें आपल्या राज्यरोहणापासून सुरू केली असावी किंवा शकानंतर झालेल्या लोकांनीं शकराजाच्या स्मरणार्थ ही गणना चालू ठेवली असेल. इतर ऐतिहासिक पुराव्यावरून जर असें सिद्ध करतां आलें कीं, इ. स. ७८ च्या सुमारास कनिष्क राज्य करीत होता, तर ही वर्षगणना त्याच्याच नांवानें सुरू झाली असें म्हणतां येईल. शक राजांच्या कालाविषयीं निश्चित माहिती मिळेपर्यंत शकगणना निश्चित कोणत्या राजाच्या स्मरणार्थ सुरू झाली हें सांगतां येणें कठिण आहे.

विक्रम संवत् :

कांहीं इतिहासकारांच्या मतें पहिला ॲझेस् यानेंच या संवताची सुरुवात केली (खि. पू. ५८); परंतु भारतीय परंपरेप्रमाणें माळव्यांतील विक्रमादित्यानें शकांवर मिळविलेल्या विजयाचें चिन्ह म्हणून हा संवत् सुरू केला असावा. या कालांतील इतिहासाविषयीं कांहींच निश्चित सांगतां येत नसल्यामुळें हा प्रश्न अनिर्णितच ठेवावा लागतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पश्चिम भारतांतील सत्रप शक :

पश्चिम भारताच्या बऱ्याच प्रदेशावर जवळ जवळ गुप्तकाळापर्यंत शक (सिथियन) राजे राज्य करीत होते. शेवटीं दुसऱ्या चंद्रगुप्तानें त्यांचीं राज्यें खालसा करून गुप्त साम्राज्यांत अंतर्भूत केलीं. या पश्चिमेकडील शक राजांना ' क्षहरात सत्रप ' असें म्हणत. सत्रप (संस्कृत–क्षत्रप, प्राकृत–छत्रप) म्हणजे प्रांताचा गव्हर्नर. हे शक राजे क्षहरात वंशाचे असून कनिष्काचे मांडलिक म्हणून राहात असावेत.

भूमक क्षहरात :

हा कुशानांच्या नैर्ऋत्येकडील प्रदेशावरचा पहिला सत्रप असावा. गुजरात आणि काठेवाड यांच्या किनाऱ्याच्या प्रदेशांत आणि माळवा, अजमीर व राजपुताना या प्रदेशांत त्याचीं नाणीं सांपडलीं आहेत. या नाण्यांवर खरोष्ठी आणि ब्राह्मी या दोन्ही लिपींतील मजकूर आढळतो. इ. स. १२४–२५ च्या सुमारास गौतमीपुत्र शातकर्णी या सातवाहन राजानें भूमकाच्या वंशजास ठार केलें व क्षहरातांचा प्रदेश आपल्या मुलुखास जोडला.

नहपान क्षहरात :

भूमकानंतर नहपान क्षहरात हा सत्रप झाला. नाणीं व शिलालेख यांतील उल्लेखांवरून नहपानाचा काल हा इ. स. ११९ ते १२५ असावा. पुढील कांहीं शिलालेखांत त्याचा महाक्षत्रप असा उल्लेख आहे. ' राजन् ' हेंही बिरुद त्याला लावलेलें आढळतें. यावरून तो जवळजवळ स्वतंत्र म्हणूनच राज्य करीत असावा असें दिसतें. नहपानानें तांबें व चांदी यांचीं नाणीं पाडलीं होतीं. तीं ग्रीकांच्या नाण्यासारखीं असून त्यांवर राजमुद्रा असे. नहपानाचीं नाणीं उत्तरेंत अजमीर येथें व दक्षिणेंत नाशिक येथें सांपडतात. त्याचा अमात्य अर्यमन् याचा शिलालेख जुन्नर येथें सांपडला आहे.

दीनिकाचा मुलगा ऋषभदत्त : (उसवदात)

याच्या नाशिक व कार्लें येथील शिलालेखांत ऋषभदत्तानें दिलेल्या देणग्यांचा उल्लेख आहे. दक्षिण गुजरात व उत्तर कोंकण यांवरही ऋषभ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दत्ताचा अंमल असावा. कपुर, प्रभास, भृगुकच्छ (भडोच), दशपुर (मंदसोर), शूर्पारक (सोपारा), पुष्कर, दमण, डहाणू येथेंही त्यानें कांहीं लोकोपयोगी कृत्यें केल्याचा उल्लेख शिलालेखांत आहे. त्यानें मालवांचा पराभव केल्याचाही उल्लेख आहे. नाशिक आणि पुणें हे जिल्हे प्रतिष्ठानच्या सातवाहनाकडून कदाचित् नहपानानेंच जिंकून घेतले असावेत. इ. स. १२४–२५ च्या सुमारास सातवाहन राजा गौतमीपुत्र शातकर्णी यानें नहपानास ठार केलें, व क्षहरातांचें राज्य त्यानें आपल्या राज्यास जोडलें. नाशिक जिल्ह्यांतील जोगळथेंबी येथें नहपानाच्या नाण्यांचा एक मोठा संग्रह सांपडला आहे. यावरून सातवाहन राजानें सत्रपांचा खजिना लुटून त्यांतून स्वतःचीं नाणीं पाडलीं असावींत असा तर्क वाहतो. नहपानाच्या मृत्यूनंतर क्षहरात वंश विलयास गेला असावा.

कार्दमक चष्टन—क्षहरातांच्या नंतर त्या प्रदेशावर शकांचा कार्दमक वंश सत्रप झाला. झामोटिकाचा मुलगा चंष्टन हा पहिला कार्दमक. जुन्या नाण्यांवर त्याला क्षत्रप व नवीन नाण्यांवर त्याला महाक्षत्रप असें म्हटलें आहे. याशिवाय ' राजन् ' हें बिरुद त्याला लावलेलें आढळतेंच. कुशानांचा मांडलिक म्हणून चष्टन सिंध प्रदेशांत राज्य करीत असावा. चष्टनाच्या नंतर त्याचा मुलगा जयदामन् हा क्षत्रप झाला व त्यानंतर त्याचा मुलगा पहिला रुद्रदामन् हा क्षत्रप झाला. शके ५२ (इ. स. १३०–३१) या वर्षीं चष्टन व रुद्रदामन् हे संयुक्त सत्रप असल्याचा उल्लेख कच्छ येथील अंधाऊ या शिलालेखांत आहे. या दोघांनीं सातवाहनापासून आपला जिंकलेला मुलख परत मिळविला असावा. जुनागड येथील रुद्रदामनच्या शिलालेखांत तो आकर, अवन्ति, अनूप, अपरांत, सुराष्ट्र, आनर्त यांवर राज्य करीत असल्याचा उल्लेख आहे. चष्टनाच्या जुन्या नाण्यांवर चंद्रकोर व चांदणी असून पुढें त्यांत डोंगराची भर पडली आहे. चष्टनाचें राज्य संपुष्टांत आल्यावर खरोष्ठी लिपीचा वापर बंद पडला. परंतु ग्रीको–रोमन धर्तीचें नक्षीकाम मात्र नाण्यांवर चालूच होतें.

कार्दमक रुद्रदामन् :

इ. स. १३० च्या नंतर चष्टनाचा नातू पहिला रुद्रदामन् महाक्षत्रप

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाला. जुनागडचा शिलालेख (इ. स. १५०–५१) हा त्याच्या इतिहासाविषयींचा एक निरपवाद पुरावा आहे. ऊर्जयत् (आधुनिक गिरनार) पर्वतावरील सुवर्णसिकता व पलाशिनी या नद्यांमुळें सुदर्शन सरोवराचा बांध फुटला होता. या तळ्याच्या पाण्यावरच सौराष्ट्राची शेती चाले. वादळामुळें हा बांध फुटला, तेव्हां कुलैपाचा मुलगा सुविशाख याच्या नेतृत्वाखालीं रुद्रदामननें हा बांध पुन्हा बांधविला. रुद्रदामननें दक्षिणापथाच्या शातकर्णींचा दोनदां पराभव केला होता. नाशिक व पुणें हे जिल्हे सोडून क्षहरातांच्या संपूर्ण प्रदेशावर रुद्रदामन्चें स्वामित्व होतें. दक्षिण पंजाबांतील यौधेयांचा त्यानें संपूर्ण पराभव केला होता. रुद्रदामन्च्या शिलालेखांत कोठेंही कुशानांचा स्वामी म्हणून उल्लेख नाहीं. यावरून तो आपला कारभार स्वतंत्रपणेंच पाहात असावा असें दिसतें. रोग, चोर, हिंस्र पशु व टोळधाडीचा त्याच्या राज्यांत कधींही त्रास झाला नाहीं असा त्याच्या शिलालेखांत उल्लेख आहे.

रुद्रदामन् हा विजेता व राज्यकर्ता होताच, परंतु याशिवाय त्यानें संस्कृतविद्येला आश्रय दिला. व्याकरणशास्त्र, राज्यशास्त्र, संगीतशास्त्र, तर्कशास्त्र व संस्कृत काव्य करणें यांत तो प्रवीण होता. कार्दमकांच्या कारकीर्दींत उज्जयिनी हें विद्येचें केंद्र बनलें होतें. रुद्रदामन् अनेक स्वयंवरांना उपस्थित होता व त्यानें अनेक राजकन्यांशीं विवाह केल्याचा उल्लेख आहे. शक हे हळूहळू येथील समाजाशीं एकरूप होत होते याचाच हा पुरावा आहे. कार्दमकांच्या मुली सातवाहन, इक्ष्वाकु व लिच्छवि घराण्यांत दिल्याचेही पुरावे सांपडतात.

रुद्रदामन्चा मुलगा दामजदश्री यानें बापाच्या कारकीर्दींत क्षत्रप म्हणून स्वतःचीं नाणीं पाडलीं. दामजदश्रीचा मुलगा जीवदामन् हा बापाच्यानंतर गादीवर बसला, पण त्याचा काका पहिला रुद्रसिंह यानें त्याला हुसकून लावलें. इ. स. १८०–८१ च्या सुमारास रुद्रसिंहानें नाणीं पाडलीं. रुद्रसिंहानंतर पुन्हां जीवदामन् महाक्षत्रप झाला. रुद्रसिंहाचा मुलगा रुद्रसेन (इ. स. २०५–२२३) हा क्षत्रप झाला. यानंतर संघदामन्, दामसेन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(इ. स. २२३ ते २३९) इत्यादि क्षत्रप झाले. रुद्रदामन्‌नंतरच्या महाक्षत्रपांची कारकीर्द विशेष नांवाजण्यासारखी झाली नाहीं.

कुशानांच्या स्वाऱ्या (इ. स. ४८ ते २२५):

खि. पू. १७५ च्या सुमारास चीनच्या वायव्य प्रदेशांतील युएची नांवाच्या लोकांना तुर्कांच्या हिउंग्नु नांवाच्या टोळीनें हांकून लावल्यामुळें युएची लोकांचा पांच ते दहा लाखांचा जमाव पश्चिमेकडे तृणयुक्त कुरणें शोधीत निघाला. नंतर त्यांनीं शकांचा जक्सार्टीझ (सिरदर्या) नदीच्या उत्तरेकडील प्रदेशांत पराभव केला. परंतु या युएचींचे पूर्वींचे पराभूत शत्रू वुसुन लोक होते. त्यांनीं युएचींचा पराभव करून त्यांना ऑक्झस (अमू दर्या) नदीच्या प्रदेशांत हांकलून दिलें. तेथें ऑक्झस नदीच्या दक्षिणेस बॅक्ट्रिया देशांत कायम वस्ती करून युएचींनीं आपलीं पांच राज्यें स्थापिलीं. खि.पू. १० च्या सुमारास ते चांगले स्थिरपद झाले होते.

पहिला कॅडफिसस् (इ. स. ४० ते ७८):

वरील पांच राज्यांच्या स्थापनेनंतर सुमारें १०० वर्षांनीं युएची जातीपैकीं कुशान नांवाच्या लोकांचा पहिला कॅडफिसस् हा इ. स. ४० च्या सुमारास राजा झाला. लोकसंख्येच्या वाढीमुळें कॅडफिससनें हिंदकुश पर्वत ओलांडून काश्मीर, गांधार, काबूल हा भारताचा प्रदेश जिंकून घेतला, व बॅक्ट्रियावर आपला नीट अंमल बसविला. यामुळें त्याचें साम्राज्य इराणपासून झेलम नदीपर्यंत पसरलें. त्याच्या नाण्यांवर रोमन राजमुद्रा होती. कुजुल-कस हें त्याचें एक बिरुद असावें; कारण, त्याच्या कांहीं नाण्यांवर 'कुजुलकसस कुशाणयवुगस सच ध्रम–थिदस (कुजुलकसस्य कुशानयवुगस्य सत्यधर्मस्थितस्य)' असा व इतर कांहीं नाण्यांवर '(महाराजसराजाति राजस कुयुल-कफस (महाराजस्य राजातिराजस्य कुयुल-कफस्य)' असे उल्लेख आढळतात. याच्याच कारकीर्दींत सिंधु नदीच्या पलीकडील ग्रीक व शकांचीं राज्यें कुशानांनीं जिंकून घेतलीं होतीं. पहिला कॅडफिसस् हा वयाच्या ८० व्या वर्षी मरण पावला असावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरा कॅडफिसस (इ. स. ७८ ते ११०):

यानंतर त्याचा मुलगा दुसरा कॅडफिसस वेम कॅडफिसस गादीवर आला. तोही मोठा पराक्रमी व धाडसी होता. त्यानें पंजाब प्रांत व काशीपर्यंत गंगानदीच्या कांठचा प्रदेश जिंकला. दक्षिणेस नर्मदा नदीपर्यंत त्याचा अंमल बसला असावा, आणि माळव्यांतील व पश्चिम हिंदुस्थानांतील शक क्षत्रप त्याचें प्रभुत्व मान्य करीत असावेत.

याच्याच कारकीर्दीच्या वेळीं पराक्रमी चिनी सेनापति पान-चौ यानें पश्चिमेकडील देशावर स्वारी करून चिनी सत्ता रोमन साम्राजाच्या हद्दीपर्यंत भिडविली. या संकटानें न डगमगतां दुसऱ्या कॅडफिससनें पान-चौ याच्या मुलीला मागणी घातली (इ. स. ९०). ती झिडकारली गेल्याबरोबर कॅडफिससनें आपल्या सेनापतीबरोबर ७० हजार घोडदळ देऊन चिनी सैन्याबरोबर लढाई केली; परंतु त्याचा पराभव होऊन त्यानें पान-चौ यास खंडणी दिली.

याच सुमारास रोमन साम्राज्य व हिंदुस्थान यांच्यामध्यें खुष्कीच्या मार्गानें व्यापार सुरू होऊन हिंदुस्थाननें पाठविलेलें रेशमी कापड, मसाल्याचे जिन्नस, मौल्यवान् रत्नें आणि रंग तयार करावयाचे पदार्थ या जिनसांबद्दल रोमन साम्राज्यांतून हिंदुस्थानांत पुष्कळ सोनें येऊं लागलें. त्यामुळें कॅडफिससला पुष्कळ सोन्याचीं नाणीं पाडतां आलीं. याचीं कांहीं नाणीं रोमच्या दोन ऑरींच्या (aurei) वजनाइतकीं आहेत. या नाण्यांच्या एका बाजूस द्विभुज शिवाची मुद्रा असे. डोक्यावर जटाजूट, डाव्या दंडावर व्याघ्रचर्म व उजव्या हातांत त्रिशूळ आणि परशु असें या शिवमुद्रेचें वर्णन आहे. खरोष्ठी लिपींतील या नाण्यांवरील अक्षरें 'महाराजस, राजाधिराजस सर्व लोगीश्वरस महिश्वरस विम कथफिसस त्रतरस (महाराजस्य राजाधिराजस्य सर्वलोकेश्वरस्य महीश्वरस्य वेमकडफिसस्य त्रातुः)' यांपैकीं महीश्वर या बिरुदाचा अर्थ माहेश्वर असा घेतला तर त्याचा अर्थ महेश्वराचा म्हणजे शिवाचा भक्त असा आहे. यावरून पहिला कॅडफिसस हा बहुधा बौद्धधर्मी तर दुसरा शैवपंथी असावा असें वाटतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कनिष्क—(अदमासें कारकीर्द इ. स. १२० ते १६२):

कनिष्क हा कुशान सम्राटांत सर्वश्रेष्ठ होय. त्याचें साम्राज्य मध्यदेश, उत्तरापथ, अपरांत यांवर पसरलेलें होतें. पूर्वेकडे बिहार, पश्चिमेकडे खुरासान, उत्तरेकडे खोतान व दक्षिणेकडे कोंकण या त्याच्या मर्यादा होत्या. तो बहुधा दुसऱ्या कॅडफिससनंतर गादीवर आला असावा. कनिष्काचीं कांहीं नाणीं संयुक्त प्रांतांत सांपडलीं आहेत. कनिष्काच्या बापाचें नांव वझेष्क असें असून कनिष्काचें राज्यारोहण व दुसऱ्या कॅडफिससचा मृत्यु यांत बराच काळ लोटलेला असावा. कनिष्काचीं नाणीं विपुल व अनेक प्रकारचीं सांपडत असल्यामुळें त्याची कारकीर्द बरीच मोठी होती असें दिसतें. कनिष्कानें आपल्या कारकीर्दीच्या आरंभासच काश्मीर जिंकून तेथें अनेक स्मारकें उभारलीं व तेथें आपल्या नांवाचें (कनिष्कपुरा) एक शहरही वसविलें. हें शहर अद्याप लहान गांवाच्या स्वरूपांत अस्तित्वांत आहे. कनिष्क व अश्वघोष समकालीन असावेत असें एका प्रचलित कथेवरून वाटतें.

कनिष्काची राजधानी पुरुषपुर म्हणजे आधुनिक पेशावर ही होती. अफगाणिस्तान व हिंदुस्थान यांना जोडणाऱ्या हमरस्त्याचें संरक्षण करण्यास योग्य अशा ठिकाणीं हें शहर वसलें होतें. या राजधानींत कनिष्कानें आपल्या उतारवयांत—तो बौद्ध संप्रदायाचा कट्टा पुरस्कर्ता बनल्यावर बुद्धावशेषावर एक उंच इमारत उभारली. ही इमारत कोरीव लांकडाची असून ती तेरा मजली व चारशें फूट उंच होती; आणि तिच्यावर चांगला मजबूत लोखंडी कळस होता. या इमारतीशेजारीं एक बौद्ध मठ होता. तेथें नवव्या शतकांतही बौद्ध विद्यादानाचें कार्य उत्तम प्रकारें चालू होतें. गझनीच्या महंमुदानें व त्यानंतरच्या सुलतानानें हें विद्यापीठ नष्ट केलें असावें.

कनिष्काचे अत्यंत महत्त्वाचे लष्करी पराक्रम म्हणजे काश्गर, यार्कंद आणि खोतान या चिनी सत्तेखालील प्रदेशावर त्यानें मिळविलेले विजय होत. यानंतर त्यानें चीनला खंडणी देण्याचें बंद केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कनिष्काची धर्मोपासना :

पूर्ववयांत युद्धादि निमित्तानें जीं रक्तपाताचीं क्रूर कृत्यें झालीं त्याबद्दल विषाद वाटून अशोकाप्रमाणेंच कनिष्कानेंही बौद्धसंप्रदाय स्वीकारला असावा असें दिसतें. कनिष्काच्या कारकीर्दींतील आरंभीचीं नाणीं ग्रीक भाषा, लिपि व देवता यांनीं युक्त आहेत; नंतरच्या नाण्यांवर पर्शियन भाषेचे ग्रीक लिपींत लिहिलेले लेख व ग्रीक, इराणी, हिंदु देवतांचीं चित्रें आहेत; व अखेर अखेरचीं नाणीं बुद्ध शाक्य मुनीच्या मूर्तींनीं युक्त असून त्यांवरील लेख ग्रीक लिपींत आहेत.

कनिष्काच्या वेळीं बुद्धाच्या मूर्ति अस्तित्वांत आल्या. या काळांत बौद्ध संप्रदायाचा जो महायानपंथ निघाला तो हिंदु, झरथुष्ट्री, ख्रिस्ती, ग्नॉस्टिक व हेलेनिक अशा अनेक पंथांच्या मिश्रणानें बनलेला होता. अलेक्झांडरची स्वारी, मौर्यांचें साम्राज्य आणि रोमन साम्राज्य यांचा परस्परांवर परिणाम झाल्यावर बौद्ध संप्रदायाला हें निराळें वळण लागणें अपरिहार्य होतें. या महायानपंथानें बुद्धाच्या देवतामूर्ति कनिष्काच्या साम्राज्यांत सर्वत्र स्थापन केल्या. कनिष्क बौद्धसंप्रदायी बनल्यावरही शिव आणि बुद्ध या दोघांचीही उपासना करीत असे.

पेशावर व नजीकच्या प्रांतांत म्हणजे प्राचीन गांधार प्रांतांत ज्या सुप्रसिद्ध मूर्ति सांपडल्या आहेत त्यांवरून नवा महायानपंथ, त्यांतील पौराणिक कथा आणि देवता यांची चांगली कल्पना येते. ही गांधारदेशीय मूर्तिकला ग्रीको-रोमन कलेची शाखा आहे असें स्पष्ट दिसतें. ख्रिस्ती सनाच्या दुसऱ्या शतकांत ही गांधारी मूर्तिकला अत्यंत उच्च दर्जास पोहोंचलेली होती.

धर्मपरिषद् (धम्मसंगीति)—कनिष्काच्या कारकीर्दींतील आणखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशोकाप्रमाणेंच त्यानें भरविलेली धम्मसंगीति होय. कनिष्क एका भिक्षूच्या मदतीनें बौद्ध सांप्रदायिक ग्रंथांचा अभ्यास करूं लागला. तेव्हां त्यांतील निरनिराळीं परस्परविरोधी मतें पाहून त्याच्या मनांत गोंधळ उत्पन्न झाला. तेव्हां आपला सल्लागार पूज्यपार्श्व याच्या संमतीनें कनिष्क राजानें बौद्ध सांप्रदायिक विद्वानांची सभा बोलाविली. त्या सभेंतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सर्व पंडित महायान पंथांतील सर्वास्तिवादी मताचे अनुयायी होते. या मंडळाच्या सभा काश्मीरच्या राजधानीजवळ कुंडलवन नामक मठांत भरल्या. त्यांत वसुमित्र अध्यक्ष आणि पाटलिपुत्र येथून आणविलेला सुप्रसिद्ध ग्रंथ-कर्ता अश्वघोष उपाध्यक्ष होता, व सभासद पांचशें होते. त्यांनीं अगदीं प्राचीनकाळापासूनच्या सांप्रदायिक ग्रंथांचें नीट परिशीलन करून बौद्ध तत्त्वांच्या तीन मुख्य विभागांवर मोठाले टीकाग्रंथ त्रिपिटक तयार केले. त्यापैकीं महाविभाषा नांवाचा बौद्ध तत्त्वज्ञानाचा ज्ञानकोशासारखा मोठा ग्रंथ अद्यापही चीनमध्यें आहे. हे टीकाग्रंथ ताम्रपटावर लिहून एका स्तूपामध्यें ठेवून देण्यांत आले आहेत.

विद्यांना आश्रय—कनिष्क हा विद्येचा मोठा आश्रयदाता होता. अश्वघोष, पार्श्व, वसुमित्र हे बौद्ध विद्वान् त्याच्या पदरीं होतेच. शिवाय संघरक्षित नांवाचा विद्वान् त्याचा पुरोहित होता. महायान पंथाचा एक मोठा प्रवक्ता नागार्जुन, प्रख्यात वैद्यक ग्रंथकार चरक हे त्याच्याच दरबारीं उदयास आले. माठर नांवाचा प्रख्यात राजकारणी मुत्सद्दी त्याचा प्रधान होता. ग्रीक स्थापत्य-शास्त्रज्ञ (Engineer) ॲजेसिलाऊस त्याच्याच पदरीं होता. या सर्वांनीं त्याच्या कारकीर्दींत धार्मिक, शास्त्रीय, तत्त्वज्ञानात्मक व कलात्मक प्रगतीस हातभार लाविला आहे.

राजतरंगिणींतील उल्लेख—कल्हणाच्या राजतरंगिणींत तुरुष्क वंशाच्या हुष्क, जुष्क व कनिष्क या तीन राजांनीं संयुक्तपणें काश्मीरवर राज्य केल्याचा उल्लेख आहे. या तिघांनीं प्रत्येकीं हुष्कपुर (हल्लींचें बारामुल्ला खिंडींतील उष्कूर), जुष्कपुर (हल्लींचें श्रीनगरच्या उत्तरेकडील झुकूर), कनिष्कपुर (बारामुल्ला—श्रीनगर रस्त्यावरील हल्लींचें कानिसपूर) हीं शहरें वसविलीं. या तिघांनीं काश्मीरांत अनेक विहार व चैत्य बांधले.

कनिष्काचा मृत्यु :

सुमारें ४३ वर्षें राज्य करून इ. स. १६२ च्या सुमारास कनिष्क मृत्यु पावला. त्यानें दिग्विजयाचें काम सुरू केलें असतां उत्तरेकडे दिग्विजय करण्याचें काम करण्याकरतां तो निघाला असतां तो आजारी पडला. तिकडे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचा खून झाला असावा असें वाटतें. कनिष्ककाल व इ. स. ७८ चा शककालारंभ एकच असावा असा कांहीं इतिहासकारांचा तर्क आहे. एखाद्या राजाच्या कारकीर्दीवरून कालगणना करणें ही कल्पना भारतांत परकीयांनींच आणली आहे. शक सत्रप हे प्रथम प्रथम कनिष्काचे मांडलिक असावेत. त्यामुळें त्यांनीं आपल्या सत्तासम्राटाच्या कालाला उद्देशून कालगणना करणें सहज शक्य वाटतें. गुजरात-काठेवाडांतील जैनांनीं ही शक–कालगणना दक्षिण हिंदुस्थानांत रूढ केली असावी.

हुविष्क (इ. स. १६२–१८२):

वासिष्क व हुविष्क हे कनिष्काचे मुलगे असावेत व तो युद्धावर गेला असतां ते उत्तर हिंदुस्थानांत राजप्रतिनिधि म्हणून काम करीत असावेत असा तर्क वाहतो. वासिष्काचीं नाणीं सांपडत नाहींत यावरून तो बापाच्या पूर्वी वारला असावा. कनिष्कानंतर हुविष्क सम्राट् झाला असावा. हुविष्काचीं जीं पुष्कळ नाणीं सांपडतात तीं तो साम्राज्याधिपति झाल्या-नंतरचीं असावींत. या वेळीं साम्राज्यांत काबूल, काश्मीर, मथुरा यांचा अंतर्भाव होत असावा. मथुरा येथील एका बौद्ध मठाला त्याचें नांव दिलें होते. कनिष्काप्रमाणें यानेंही बौद्धमठाला देणग्या दिल्या व ग्रीक, हिंदु व इराणी या तिन्ही संस्कृतींतील देवताचा पुरस्कार केला. हुविष्काच्या नाण्यांवर हेराक्लीझ, सरापो, स्कन्द, स्कन्दपुत्र विशाख, फेरो, अग्निदेवता व इतर देवता यांच्या मुद्रा आहेत, परंतु बुद्धाची प्रतिमा नाहीं. यावरून बौद्ध संप्रदायावर त्याची फार सखोल श्रद्धा नसावी हुविष्काचीं सोन्याचीं नाणीं उत्तम असून त्यांवर राजमुद्रा आहे.

पहिला वासुदेव (इ. स. १८२–२२०):

हुविष्कानंतर पहिला वासुदेव राज्यावर आला. हें राजाचें नांव पूर्णपणें हिंदु पद्धतीचें वैष्णवपंथी आहे. यावरून या परकीय राजांवर हिंदुस्थानांतील परिस्थितीचा किती लवकर परिणाम झाला हें स्पष्ट दिसतें. याच्या नाण्या-वरही शिवदेवतेची नंदीसह मूर्ति आहे. याचे पुष्कळसे शिलालेख मथुरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथें सांपडतात. याच्या कारकीर्दीत कुशानांच्या सत्तेला उतरती कळा लागली आणि त्या साम्राज्याचे विभाग पडले.

पंजाबमध्यें व काबूलवर कुशान राजांची सत्ता पुष्कळ काळ होती असें नाण्यांवरून दिसतें. चौथ्या शतकाच्या आरंभीं एका कनिष्क राजानें इराणां-तील ससन राजा दुसरा होर्मिझ्द याला आपली मुलगी दिली. इ. स. ३५९ मध्यें दुसऱ्या शापूरनें आमायडाच्या लढ्याच्या वेळीं हिंदुस्थानांतील हत्ती व कुशान सैन्य यांच्या मदतीनें रोमन सैन्यावर विजय मिळविला. कुशानांच्या नाण्यांवरील अग्निदेवतेच्या चित्रावरून तिसऱ्या शतकांत पंजाबचा इराणशीं संबंध असावा असें दिसतें. कुशान राजांच्या मंदिरांमधून असलेल्या ग्रीक, पर्शियन व हिंदु देवतांच्या मिश्रणाचा परिणाम बौद्ध व हिंदू या दोहोंवरही झाला असला पाहिजे. कनिष्कादि राजे जरी बौद्धपंथी होते तरी ते धर्मवेडे नव्हते. कनिष्कानें काश्गर, खोतान हे प्रांत जिंकल्यामुळें चीनमध्यें बौद्ध संप्रदायाचा प्रवेश होणें सुलभ झालें असलें पाहिजे. कुशानांचें शौर्य पाहिलें व त्यांनीं हिंदु संस्कृति किती लवकर आत्मसात् केली हें पाहिलें म्हणजे कुशान (युएची) व तुर्क हे मूळ एकाच जातीचे असावेत अशी शंका येते. कुशान व पुढील प्रकरणांत आलेलें आंध्र घराणें हीं घराणीं नष्ट झाल्यावर (अदमासें इ. स. २२०) च्या पुढे सुमारें एक शतकानें सम्राट् गुप्ताचें घराणें उदयास येईपर्यंतचा सर्व इतिहास अगदीं अज्ञात आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण सतरावें

दक्षिणेंतील राज्यें

आंध्र (आंध्रभृत्य) घराणें (सातवाहन) :

कण्वांच्या नंतर आंध्र घराणें राज्य करूं लागलें असें जरी पुराणांत सांगितलेलें असलें, तरी आंध्र घराणें खि. पू. २४० किंवा २३० पासूनच राज्य करीत होतें हें निर्विवाद आहे. सुशर्मा या शेवटच्या कण्व राजाला मारणारा आंध्र राजा आंध्र राजावलींतील ११, १२ किंवा १३ वा असावा. कण्व घराणें राज्यभ्रष्ट झाल्यानंतरचा आंध्र घराण्याचा इतिहास देण्यापूर्वी या घराण्याचा पूर्वेतिहासही देणें अवश्य आहे. चंद्रगुप्त मौर्यांच्या काळींच म्हणजे खि. पू. ३०० च्या सुमारासच द्रविड जातीचें व तेलगू भाषा बोलणारें आंध्रांचें राज्य हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्याकडे कृष्णा व गोदावरी या नद्यांमधील प्रदेशांत राज्य करीत होतें. लष्करी सामर्थ्याच्या बाबतींत चंद्रगुप्ताच्या खालोखाल त्यांचा क्रमांक होता. त्यांच्या राज्यांत ३० तटबंदी शहरें, अनेक गांवें, एक लाख पायदळ, २००० घोडदळ व १००० हत्ती होते. यांची राजधानी कृष्णेच्या कांठीं श्रीकाकुलम् येथें असावी. चंद्रगुप्त किंवा बिंदुसार यांच्या कारकीर्दींत हें आंध्रांचें राज्य मौर्यांचें मांडलिक राज्य बनलें असल्याचा अशोकाच्या शिलालेखांत (खि. पू. २५६) उल्लेख आहे. अशोकानंतर हें राज्य स्वतंत्र झालें असावें.

या स्वतंत्र झालेल्या आंध्रराज्याचा पहिला राजा **सिमुक** (इ. स. पू. २३५–२१२) होता. त्यावेळीं आंध्राची सत्ता इतक्या झपाट्यानें वाढली कीं, या नव्या घराण्यांतील दुसरा राजा **कृष्ण** याच्या वेळीं गोदावरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नदीच्या उगमाजवळचें नाशिक शहर व तेथपर्यंतचा सर्व मुलुख आंध्रराज्यांत सामील केला गेला होता.

आंध्रांचा तिसरा राजा कृष्णाचा पुतण्या श्रीशातकर्णी याची सत्ता कलिंगाचा राजा खारवेल यानें जुमानली नाहीं (खि.पू.२१८). यानंतरच्या सुमारें २०० वर्षांतील सत्तावीस आंध्र राजांच्या कारकीर्दींची कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. खि. पू. २७ च्या सुमारास वर सांगितल्याप्रमाणें कण्वांपैकीं शेवटला राजा सुशर्मा याला ठार मारून त्याचें उरलेंसुरलें राज्य आंध्रांनीं घेतलें.

आंध्र राजे आपणांस सातवाहन कुलांतले म्हणवीत व त्यांच्यापैकीं पुष्कळांना ' शातकर्णी ' हें नांव होतें. शातकर्णी (१०० कान असलेले) सातवाहन हीं बहुधा टोळ्यांचीं नांवें असावींत. पुढील काळांत या टोळ्यांनीं आंध्र देश (गोदा व कृष्णा यांच्या खोऱ्यांतील बेल्लारी जिल्हा) जिंकल्या-नंतर त्यांना आंध्र म्हणूं लागले असावेत. ' दाक्षिणापथाचे सम्राट् ' असाही त्यांचा उल्लेख होतो. परंतु याचा अर्थ विंध्यापलीकडील मध्यांच्या महाराष्ट्र व त्याच्या पूर्व-पश्चिमेकडील कांहीं भागाचे ते सम्राट् होते एवढाच होतो. वासिष्ठीपुत्र पुलुमायीच्या कारकीर्दींत आंध्राच्या प्रदेशाला 'आंध्रापथ' किंवा ' सातवाहनीय प्रदेश ' असें नांव पडलें असावें. आंध्र घराण्याचा सतरावा राजा हाल याचें नांव वाङ्मयाशीं संबद्ध असल्यामुळें त्याला विशेष महत्त्व आहे. महाराष्ट्रांतील प्राचीन भाषेंत लिहिलेला ' सप्तशती ' नामक ग्रंथ हालाचा म्हणून प्रसिद्ध आहे. तो खुद्द हालानें लिहिला असेल किंवा त्याला अर्पण केलेला असेल, असें डॉ भांडारकरांचें मत आहे. प्राकृत भाषेंतील इतर कांहीं ग्रंथ आंध्र घराण्यांतील राजांच्या नांवाशीं संबद्ध आहेत. यावरून आंध्रांच्या वेळीं त्यांच्या मुलुखांत संस्कृत भाषेंत शिष्ट वाङ्मय लिहीत नसत असें दिसतें. या हाल राजाच्या कारकीर्दींत उत्तरेस शकांची सत्ता वाढीस लागली.

सोयीच्या दृष्टीनें व मध्यवर्ती ठिकाण म्हणून आंध्रांनीं आपली पूर्वींची राजधानी बदलून ती प्रतिष्ठान किंवा पैठण या ठिकाणीं आणली. पुण्याच्या उत्तरेस जुन्नरपासून अठरा मैलांवर नाणेघाट नांवाचा एक प्रसिद्ध घाट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. या घाटांतून पूर्वी कोंकण व देश यांतील दळणवळण चालत असे. त्या घाटांतील डोंगरावर जे शिलालेख आहेत त्यांत सिमुक, कृष्ण, शातकर्णी, नागनिका राणी इत्यादि आंध्र राज्यकर्त्यांचा उल्लेख आहे. शातकर्णींचें लग्न नागनिका (नाग + अन्निका) नांवाच्या महाराष्ट्रीय स्त्रीशीं झालें होतें. त्यामुळें महाराष्ट्रांतील आंध्राच्या सत्तेला बळकटी आली असली पाहिजे. आपलें वैभव जगाला दाखविण्यासाठीं त्यानें दोन अश्वमेध यज्ञ केले होते. त्यानंतर आलेल्या आंध्र राजांनीं कण्व व उरलेल्या शुंग राजांची सत्ता नष्ट करून व मगधाची राजधानी पाटलीपुत्र हें नगर हस्तगत करून मगधावर कांहीं काळ आपली सत्ता स्थापन केली. यानंतर कुंतल शातकर्णी नांवाच्या राजाचा उल्लेख कामसूत्रांत आला आहे. याच सुमारास उत्तरेंत शकांची सत्ता वाढत होती. विशेषत: भूमक क्षहरात, नहपान क्षहरात इत्यादींचा प्रदेश दक्षिणेकडे वाढत होता. हे क्षत्रप राजे उत्तरेकडील कुशानांचे अधिकारी होते. या स्वाऱ्यांमुळें आंध्रांना मागें हटत हटत आपल्या पूर्वीच्या प्रांतांत येऊन राहावें लागलें. यानंतर आंध्रांचें पहिलें साम्राज्य जवळ जवळ नष्ट झालें. तें पुन्हा गौतमीपुत्र शातकर्णी व पुलुमायी शालिवाहन यांच्या वेळीं म्हणजे जवळ जवळ १०० वर्षांनीं ऊर्जितावस्थेस आलें.

गौतमीपुत्र शातकर्णी (इ. स. १०६ ते १३०):

आंध्र घराण्यांतील तेविसावा राजा गौतमीपुत्र श्रीशातकर्णी हा इ. स. १०६ च्या सुमारास राज्यावर आला. गादीवर आल्याबरोबर त्यानें आंध्राची गेलेली सत्ता पुन्हां स्थापन करण्याचे जोराचे प्रयत्न सुरू केले. त्यानें क्षहरातांची सत्ता नष्ट करून त्यांचा मुलूख इ. स. १२४ च्या सुमारास आपल्या राज्यास जोडला. या विजयाचें चिन्ह म्हणून त्यांचींच नाणीं घेऊन त्यांवर या आंध्र राजानें पुन्हा आपला शिक्का मारला. ‘ शक–पल्हवादि जातिविहीन परकीय लोकांच्या हीन संस्कृतीपासून वैदिक संस्कृति व बौद्धसंप्रदाय यांचें संरक्षण करणारा व जातिसंस्था पुन्हा प्रस्थापित करणारा ’ अशी स्वत:विषयीं प्रौढी या राजानें मारली आहे. महाराष्ट्र, उत्तर कोंकण, वऱ्हाड, गुजराथ, माळवा इत्यादि देशांत त्यानें पुन्हां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आंध्र साम्राज्य स्थापिलें. " शक, ग्रीक व पार्थियनांचा नाश करणारा (शक–यवन–पल्हव–निषूदन), क्षहरातांचा नाश करणारा व सातवाहन वंशाची कीर्ति पसरविणारा (सातवाहन–कुल–यशःप्रतिष्ठापनकर) " असें या राजाचें वर्णन त्याची आई गौतमी बलश्री हिनें केलें आहे. कार्ल्यांच्या लेण्यांतील एका शिलालेखांत गौतमीचा हा आनंद खोदून ठेवला आहे. गौतमी ही राजर्षि शिवस्वाती शातकर्णीची बायको. ती आदर्श आर्य स्त्री व आदर्श माता होती. नाशिक येथील एका लेण्यांत नहपानाचा जांवई, पुणें व नाशिक जिल्ह्याचा त्यावेळचा क्षत्रप ऋषभदत्त, याच्या ताब्यांतील कांहीं प्रदेश गौतमीपुत्रानें दुसऱ्या कोणास तरी दान दिल्याचा उल्लेख आहे. ही दानाज्ञा त्यानें आपल्या विजयी सैन्याच्या एका तळावरून दिली होती. या स्वाऱ्यांच्या वेळीं गौतमीपुत्र हा सतत नाशिक प्रदेशांतील गोवर्धन जिल्ह्यांतील बेणाकटक (बेणा नदीच्या तीरावर) असल्याचे उल्लेख सांपडतात. बहुधा क्षहरातांच्या स्वारीच्या वेळचा हा उल्लेख असावा. वरील दानाज्ञेंत कराजिक हें मामाळ प्रदेशांतील (पुणें जिल्ह्यांतील) गांव उत्तर महाराष्ट्रांत सामिल केल्याचें लिहिलें आहे. अपरांत, अनूप, सुराष्ट्र, कुकुर, आकर, अवन्ति हे प्रदेश नहपानापासून यावेळीं मिळाले असावेत.

या प्रदेशाखेरीज ऋषिक (कृष्णेवरील ऋषिकनगर), अश्मक (हैद्राबाद-मधील बोधनच्या आसपासचा प्रदेश), मूलक (गोदावरीवरील प्रतिष्ठान म्हणजेच पैठण ही राजधानी असलेला प्रदेश) आणि विदर्भ (वऱ्हाड) यावरही त्याचा ताबा होता. शिवाय विंध्य व सातपुडा, ऋक्षवत् (माळव्याच्या दक्षिणेकडील विंध्याची रांग), पारियात्र (पश्चिम विंध्य व अरवली), सह्य (निलगिरीच्या उत्तरेकडील सह्यादि), मलय (त्रावणकोर), महेन्द्र (पूर्वे-कडील घाट आणि दक्षिण हिंदुस्थानाभोंवतालचे इतर पर्वत यांवरही त्याचा ताबा असल्याचा उल्लेख आहे. " ज्याचे घोडे तिन्ही समुद्रांचें (बंगालचा उपसागर, अरबी समुद्र, हिंदी समुद्र) पाणी प्याले आहेत (त्रि-समुद्र-तोय- पीत -वाहन)" असें गौतमीपुत्राचें वर्णन आढळतें.

गौतमीपुत्र शातकर्णीच्या मृत्यूनंतर क्षहरातापासून त्यानें जिंकलेला प्रदेश बहुधा कार्दमिकांनीं परत जिंकून घेतला असावा. कारण उज्जयिनी ही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चष्टन राजाची राजधानी होती असें टॉलेमीनें म्हटलें आहे. जुनागड येथील शिलालेखांत (इ. स. १५०) रुद्रदामननें आपला प्रदेश गौतमीपुत्रापासून परत मिळविल्याचा उल्लेख आहे. कान्हेरी येथील शिलालेखांत रुद्रदामननें आपली मुलगी दक्षमित्रा ही वासिष्ठीपुत्र शातकर्णी (बहुधा पुलुमायीचा सहोदर) याला दिल्याचा उल्लेख आहे. हा बहुधा गौतमी पुत्राचा मुलगा असावा. याचा अर्थ आंध्रांनीं वैवाहिक संबंध जोडून आपला मुलुख वांचविण्याचा प्रयत्न केला असावा असा होतो; पण तें साधलेलें दिसत नाहीं.

पुलुमायी शालिवाहन (वासिष्ठीपुत्र) (इ. स. १३५–१६३) :

पुलुमायीचे शिलालेख नाशिक, कार्ले, अमरावती व कृष्णा जिल्ह्यांत सांपडले आहेत. कृष्णा नदीच्या मुखाजवळील प्रदेश पुलुमायीनें स्वतः जिंकलेला असावा. त्याचप्रमाणें बेल्लारी जिल्हा त्यानेंच सातवाहनांच्या सत्तेखालीं आणला असावा. आंध्रापथ व सातवाहनीय प्रदेश हीं नांवें या प्रदेशाला याच कालांत पडलीं असावींत.

उत्तरेकडील विजयामुळें हुरळून जाऊन रुद्रदामन् दक्षिणेकडे चाल करून आला तेव्हां मात्र शालिवाहनानें मोठ्या नेटानें प्रतिकार करून त्याला उत्तरेंत पिटाळून लावलें.

शालिवाहन नांवाचा जो शक दक्षिण हिंदुस्थानांत आज प्रचलित आहे तो पुलुमायीनें सुरू केला असावा असा कांहीं इतिहासकारांचा तर्क आहे; परंतु तो शक इ. स. ७८ पासून सुरू होतो. म्हणजे पुलुमायीच्या कारकीर्दीशीं त्याचा मेळ घालतां येत नाहीं. यावरून इतर कांहीं संशोधक म्हणतात कीं, कनिष्कानें हा शक प्रथम सुरू केला. कारण कनिष्काचा काळ (इ. स. ७८ ते १२०) आहे. तेव्हां हा मेळ जमणें शक्य दिसतें. उत्तरेंत चालू असलेल्या कनिष्काच्या या शकालाच शालिवाहन हें बिरुद जोडून पुलुमायीनें तो आपला शक म्हणून चालू केला असण्याची शक्यता दिसते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यज्ञश्री शातकर्णी (इ. स. १६८ ते १९७) :

पुलुमायीनंतर आंध्र घराण्यांतील विशेष महत्त्वाचा राजा यज्ञश्री शातकर्णी हा होय. याचीं रुप्याचीं नाणीं क्षत्रपांच्या नाण्यांच्या नमुन्यावर आहेत. यावरून यज्ञश्रीनें क्षत्रपांबरोबरच्या लढाईत यश मिळवून जित प्रदेशांतील लोकांसाठीं हीं नाणीं पाडलीं असावींत असें वाटतें. यज्ञश्रीनें पाडलेलीं व पूर्वेकडील प्रांतांत चालू असलेलीं शिशाचीं व ब्रॉझचीं ओबडधोबड नाणीं पुष्कळ सांपडतात. त्याच्या कांहीं बडोदा, गुजराथ व काठेवाड येथील नाण्यांवर जहाजाचेंही चित्र आढळतें. यावरून त्याची सत्ता जमिनीपलीकडे समुद्रावरही होती असें अनुमान निघतें. त्याच्यासंबंधींचे शिलालेख महाराष्ट्र, नाशिक, कान्हेरी, उत्तर कोंकण व कृष्णेच्या खोऱ्यांत छिन्नगंजम् येथें सांपडतात. अपरांताची राजधानी शूर्पारक (सोपारा) येथिल रुप्याच्या नाण्यांवर राजमुद्रा आहे. एरव्हीं कोणत्याही सातवाहनाच्या नाण्यांवर राजमुद्रा नसते. दुसऱ्या बाजूस किरणें असलेल्या सूर्याची मुद्रा आहे. या मुद्रा पश्चिमेकडील शकक्षत्रपांच्या असत. यावरून यज्ञश्रीनें अपरांत, पश्चिम हिंदुस्थान व नर्मदेचें खोरें येथून शकक्षत्रपांचें समूळ उच्चाटन केलें असावें.

यानंतर विजय (इ. स. २०३–२०९), चंद्रश्री (चंडश्री) (इ. स. २०९–२१९), चौथा पुलुमायी (इ. स. २१९–२२७) हे तीन राजे होऊन आंध्र घराणें लयास गेलें.

पुराणांवरून पाहातां आंध्र घराण्यानें एकंदर ४५६–४६० वर्षें राज्य केलें असावें. आंध्र राजांची संख्या तीस दिलेली आहे तीही बरोबर वाटते. कुशानांचा शेवट, सस्सनांचा उदय व आंध्रांचा विलय या गोष्टी परस्परांवर अवलंबून असाव्यात असें दिसतें.

नर्मदेच्या दक्षिणेकडे पश्चिम समुद्रापासून पूर्व समुद्रापर्यंतच्या विस्तृत प्रदेशावर आंध्रांचें साम्राज्य पसरलें होतें. दक्षिणेंतील या पहिल्या साम्राज्यानें उत्तरेकडेही सत्ता स्थापन करून नेहमींचा पायंडा मोडला असेंच म्हणावें लागेल. आंध्रांच्या साम्राज्यांत बौद्ध व हिंदु लोकांना समानतेनें वागविलें जात होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ते स्वतः वैदिक धर्माभिमानी असूनही त्यांनीं बौद्ध धर्माला उत्तेजन व साहाय्य दिलें. त्यांच्या कारकीर्दींत कार्लें, अजिंठा, वेरूळ व नाशिक इत्यादि ठिकाणीं डोंगरांतून विहार, स्तूप व लेणीं खोदलीं गेलीं. शक स्वाऱ्यांचा प्रचंड झंझावात आंध्रांनीं आपल्या छातीवर घेऊन मागें लोटला. नाहींतर रुद्रदामनच्याच कारकीर्दींत दक्षिण हिंदुस्थान शकमय झाला असता.

हिंदुस्थानांतील राजवंशांमध्यें आंध्रांचें (सातवाहनांचें) स्थान अग्रगण्य आहे. प्रत्येक पुराणांत सातवाहनांची वंशावळ दिलेली असल्यामुळें त्यांचा राजकीय दर्जा प्रथम श्रेणींत असल्याचें दिसतें. पुराणांत समाविष्ट झालेल्या राजवंशापैकीं या एकाच घराण्याबद्दल मुद्रा व शिलालेख इत्यादि प्रत्यक्ष साधनांचा पुरावा मिळतो. राज्यकर्ते, राज्यकाल व राज्यविस्तार या दृष्टींनीं हें घराणें अनुपमेय आहे. दक्षिणेंत पहिली राजकीय संघटना, पहिली चलनपद्धति, नाण्यांवर राजाचें नांव नमूद करण्याची पद्धत याच घराण्यानें रूढ केली. यांच्याच कारकीर्दींत चिरंतन शिल्पकृती निर्माण झाल्या. प्राकृताला राजाश्रयच नव्हे तर राजकर्तृत्व यांनींच दिलें. परकीयांचें उच्चाटण, परचक्रनिवारण, यज्ञसंस्कृतीचा पुरस्कार, चातुर्वर्ण्याचा पुनरुद्धार, धार्मिक सहिष्णुता या बाबतींतील त्यांचें कर्तृत्व चिरंजीव आहे.

इसवी सनाचें तिसरें शतक हें हिंदुस्थानच्या इतिहासांतील ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीनें पाहातां पूर्ण अज्ञात आहे. पौराणिक याद्यांतून ऐतिहासिक सत्य हुडकून काढणें अशक्य झालें आहे. म्हणून कांहींतरी तर्क लढवीत बसण्यापेक्षां इ. स. २२० ते ३२० हा अज्ञातकाल म्हणून मानणें बरें.

तामीळ राज्यें :

कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दक्षिणेकडील प्रदेश तामीळ देश म्हणून प्रसिद्ध आहे. हा भाग द्राविड संस्कृतीचें केंद्रस्थान म्हणून आजही सर्वश्रुत आहे. तामीळ परंपरेप्रमाणें अगस्त्य ऋषीनें उत्तरेंतून येऊन या भागांत आर्यसंस्कृतीचा प्रसार केला. पाणिनीचें व्याकरण व अशोकाचे शिलालेख यांतून चोल, पांड्य व चेर या तामीळ राजघराण्यांचा उल्लेख येतो. शंगम् या जुन्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तामीळ वाङ्मयांतून इसवी सनाच्या सुरुवातीच्या काळांतील तामीळ इतिहास थोडासा उपलब्ध होतो. चोल, चेर व पांड्य या तीन राज्यांमध्यें राजकीय वर्चस्वासाठीं अखंड झगडा चालत असे. त्यामध्यें शाश्वत विजय कोणालाच मिळाला नाहीं. राजांच्या कर्तबगारीप्रमाणें तामीळ राष्ट्राचें सार्वभौमत्व आलटूनपालटून या तीन राज्यांकडे जात असे. अशा कांहीं कर्तबगार राजांचीं नांवें शंगम् वाङ्मयांत चमकतात.

करिकाल चोल :

तामीळनाडांतील पहिला नांव घेण्यासारखा प्राचीन राजा म्हणजे चोल राजा करिकाल (कृष्णपाद) हा होय. शंगम् वाङ्मयांतून त्याच्याबद्दल अनेक आख्यायिका आढळतात. शत्रूच्या कैदेतून सुटका करून घेऊन त्यानें अकरा सरदारांच्या मदतीनें तंजावरच्या पूर्वेस अकरा मैलांवर वेण्णी येथील लढाईत पांड्य व चेर यांच्या संयुक्त सैन्याचा पराभव केला व तामीळ देशावर चोलांचें अधिराज्य स्थापन केलें. राज्यांतील अनेक लुटारू टोळ्यांचाही त्यानें बंदोबस्त केला. पुढें संधि साधून त्यानें लंकेवरही स्वारी केली व तेथील राजाचा पराभव करून १२००० सिंहली नागरिकांना पकडून आणिलें व कावेरीच्या मुखाजवळील पुहार बंदराच्या बांधणीच्या कामाला लाविलें. चोलांची राजधानी उरयपूर (त्रिचिनापल्लीजवळ) होती. नद्यांना धरणें बांधून कालव्यांच्या साह्यानें शेतीला पाणीपुरवठा करून तामीळ देश समृद्ध करण्याची अभिनव कल्पना यानेंच प्रथम अंमलांत आणली. कावेरी नदीच्या त्रिभुज प्रदेशाच्या वरच्या बाजूस पाणी अडवून सुप्रसिद्ध वेण्णार कालव्यानें दक्षिण तंजावरच्या नापीक प्रदेशांत पाणी खेळविण्याचें काम याच्याच कारकीर्दींत पुरें झालें. दक्षिणेंतील अनेक कालवे हे चोलांच्या लोकोपयोगी कृत्यांचीं जिवंत स्मारकें आहेत. व्यापार, उद्योगधंदे व कला यांना त्यानें उत्तेजन दिलें. न्यायबुद्धि, वैदिक धर्माला पाठिंबा व तामीळ वाङ्मयास उत्तेजन याशाठीं करिकाल चोल प्रसिद्ध आहे. युद्धांत पराक्रमानें व शांतताकालांत लोकोपयोगी कृत्यांनीं चमकणारा करिकाल हा चोलांचा श्रेष्ठ राजा होय.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नंतरचा प्रसिद्ध राजा म्हणजे सेंगनान चोल हा इ. स. तिसऱ्या शतकांत होऊन गेला. तो शैव पंथाचा अभिमानी असून तामीळ देशांत त्यानें सत्तरांवर शिवालयें बांधलीं होतीं असा उल्लेख येतो.

सेंगुत्तुवन चेर :

पश्चिमेकडील मलबार प्रांत हा केरलांचा देश होय. अशोकाच्या शिलालेखांत यांचा केरलपुत्र असा उल्लेख येतो. इ. स. दुसऱ्या शतकांत सेंगुत्तुवन हा पराक्रमी चेर राजा होऊन गेला. चोल घराण्यांतील भाऊबंदकींत यानें यशस्वी मध्यस्थी करून चोलांना आपलें अंकित केलें. समुद्रावरील चांचेगिरीचा बंदोबस्त करून सबंध मलबार किनारा दर्यावर्दी व्यापारास सुरक्षित केला. याच सुमारास अरबी समुद्रांतील व्यापारी वाऱ्यांचा शोध लागून मलबार ते अरबस्थान अशी थेट व्यापारी वहातूक सुरू झाली व केरल देशाची सुबत्ता वाढीस लागली. सेंगुत्तुवन हा धर्माचा व विद्येचा मोठा भोक्ता असून अनेक विद्वानांना त्यानें राजाश्रय दिला. याचा धाकटा भाऊ आदिगल यानें ‘ सिलप्पडिकारम् ’ हें सुप्रसिद्ध तामीळ महाकाव्य रचिलें. या महाकाव्याचा नायक सेंगुत्तुवन हाच आहे असा समज आहे. त्यानें पट्टिनीदेवीचें देऊळ बांधलें. त्याच्या उद्‌घाटनप्रसंगीं अनेक तामीळ राजे उपस्थित होते. लंकेचा राजा पहिला गजबाहु हाही त्यावेळीं चेरांच्या वंजी या राजधानीस आल्याचा उल्लेख आहे. इसवी सनाच्या पहिल्या शतकांत प्रसिद्ध खिस्ती मिशनरी सेंट थॉमस् या भागांत आला होता व त्यानें सात ठिकाणीं चर्चेस् बांधलीं अशी खिस्ती परंपरा आहे.

नेदुंजेलियन पांड्य :

वेल्लार नदीच्या दक्षिणेस पदुकोटापासून केप कामोरिनपर्यंतच्या प्रदेशास पांड्यदेश म्हणतां येईल. पांड्य राजांची राजधानी मदुरा इतिहासप्रसिद्ध आहे. पांड्यांचा प्रसिद्ध राजा नेदुंजेलियन इ. स. तिसऱ्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला. तो लहान वयांतच गादीवर आला. त्यामुळें चोल,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चेर व इतर अनेक राजांनीं संगनमतानें पांड्य देशाविरुद्ध उठावणी करून मदुरेवर चाल केली. पण नेदुंजेलियनानें तलैयालंगानम् येथील लढाईत शत्रूच्या संयुक्त सेनेचा धुव्वा उडवून पांड्यांची अधिसत्ता तामीळ देशावर स्थापन केली. 'तलैयालंगानम्‌चा विजयी वीर' म्हणून तामीळ वाङ्मयांत तो प्रसिद्ध आहे. तो ब्राह्मण धर्माचा पुरस्कर्ता असून त्यानें अनेक वैदिक यज्ञ केले होते. तो विद्येचा भोक्ता असून अनेक कवींना त्यानें राजाश्रय दिला होता. त्याच्याच प्रेरणेनें व आश्रयानें मदुरा येथें तिसरी विद्वत्सभा (शंगम्) भरली होती. सहाव्या शतकांत पल्लवांचा उदय होईपर्यंत पांड्यांची अधिसत्ता दाक्षिणेंत टिकली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण अठरावें

अराजक कालाचें समालोचन

राजकीय सिद्धांत :

परकीय आक्रमणें व देशांतील अराजक यांमुळें देशाची होणारी दुर्दशा लक्षांत घेऊन राजसत्ता प्रबल करण्याकडे विचारवंतांचा ओढा होता. परकीय राज्यकल्पनांचीही त्यांत भर पडून राजसत्ता निरंकुश ठेवण्याचा प्रयत्न होऊं लागला, व तसे राजकीय सिद्धांत या काळांत मांडले जाऊं लागले. महाभारतांतील राजधर्मप्रकरणांत 'राजा हा परमेश्वरी अंश आहे' असें विवेचन आहे. मनुस्मृतीनेंही याच सिद्धांताचा पुरस्कार केला. (महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ।) समाजाच्या कल्याणासाठीं राजा आहे या गोष्टीवर कौटिल्यानें भर दिला होता. परकीय आक्रमणामुळें राजसत्ता क्षत्रियेतर जमातींत गेल्यामुळें राजसत्तेनें वर्णाश्रमधर्माचें प्रजेकडून पालन करून घ्यावें, धर्मसत्तेला राजसत्ता जबाबदार व उत्तरदायी आहे, व ब्राह्मणांच्या अनुशासनानेंच राजानें राज्य करावें असे विचार मनूनें मांडिले आहेत. दुष्ट राजाविरुद्ध बंड करून उठण्याचा व त्याचा वध करण्याचा प्रजेचा हक्क आतां मागें पडला, व त्याऐवजीं जुलमी राजसत्तेला परलोकांचें अदृष्ट भय घालण्यांत येऊं लागलें. राजा म्हणजेच राज्य नसून तो राज्याचा एक घटक आहे. राजा, अमात्य, देश, दुर्ग, कोश, सैन्य व मित्र हीं राज्याचीं सात अंगें समजलीं जात; म्हणजे एक निश्चित प्रदेश, सुयोग्य व्यवस्था, आर्थिक स्वयंपूर्णता, संरक्षणाचीं साधनें व इतर राज्यांच्या अस्तित्वाला मान्यता ह्या गोष्टी राज्याला आवश्यक समजल्या जात.

सर्वत्र राजसत्ताक राज्यें होतीं. राजहीन गणराज्यांचे कांहीं उल्लेख वाङ्मयांत व आलेखांत आढळतात. राजसत्तेच्या वाढत्या महत्त्वाचें गमक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजांच्या बिरुदांत आपणांस पाहावयास सांपडतें. पूर्वींच्या राजांना 'राजा' व 'सम्राट' एवढींच बिरुदें असत. पण या काळांत परकीयांच्या अनुकरणानें व राजाच्या महत्त्वामुळें मोठमोठाल्या उपाधि राजे लोक आपल्या नांवाला लावूं लागले. उदा. राजाधिराज (इराणी-शहेनशहा), धर्ममहाराज, चक्रवर्ती इ. कनिष्क स्वताला देवपुत्र (चिनी) व कैसर (रोमन) अशीं बिरुदेंही लावीत असे. राजांच्या महत्त्वाप्रमाणेंच राण्यांचेंही महत्त्व वाढून त्यांच्या बिरुदांतही वाढ झाली. महादेवी म्हणून त्यांचा उल्लेख होऊं लागला. रोमन लोकांच्या सहवासानें राजांचे पुतळे उभारणें व देवालयांतून राजप्रतिमांची पूजा करणें या गोष्टीही क्वचित् आढळूं लागल्या. भासाच्या प्रतिमा नाटकांत अशाप्रकारचा उल्लेख आढळतो.

राज्यव्यवस्था :

राजा हा सर्वाधिकारी असे. राज्यांतील सर्वश्रेष्ठ व्यक्ति म्हणून राजाला मान मिळे. मंत्रिपरिषद् राजाला मदत करीत असे. तथापि पूर्वींप्रमाणें परिषदेचे निर्णय राजावर बंधनकारक नसत. युवराज व इतर राजपुत्र यांना राज्यकाभारांत वाढतें स्थान देण्यांत येऊं लागलें. परकीय वर्चस्वामुळें क्षत्रप व महाक्षत्रप नांवाचे अधिकारी प्रसिद्धीस आले. शकांनीं राजपद मिळाल्यावरही आपल्या जुन्या क्षत्रप संज्ञाच कायम ठेविल्या. परकीयांचें भारतीकरण झपाट्यानें होत होतें व त्यामुळें रुद्रदामन्सारखे शकराजेही अर्थशास्त्राचाच आदर्श स्वतांपुढें ठेवण्यांत धन्यता मानीत. राज्यकारभाराचीं वेगवेगळीं खातीं असून त्यांवर स्वतंत्र अधिकारी असत. बरेचसे सुभेदार व सरंजामदार स्वतंत्रपणें पण मांडलिक म्हणूनच सत्ता गाजवीत असत. शककुशानांचीं राज्यें अशा सरंजामी पद्धतीवरच आधारलेलीं होतीं. स्थानिक कारभार हा पुष्कळसा स्वतंत्रपणेंच चाले. राजाला वार्षिक करभार दिल्यानंतर इतर सर्व बाबतींत ग्रामसंस्था मुखत्यार असे.

धार्मिक परिस्थिति :

(१) वैदिक धर्म—वैदिक धर्माला या काळांत थोडे बरे दिवस लाभले. पुष्यमित्र शुंगानें अश्वमेध करून मौर्यकालांत बंदी घातलेला यज्ञधर्म पुनः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुरू केला. शातवाहन व तामीळ राजांनींही अनेक यज्ञ करून वैदिक धर्मालाच पाठिंबा दिला. परंतु राजाश्रय मिळूनही यज्ञप्रधान वैदिक धर्म लोकप्रिय होऊं शकला नाहीं. उपनिषदांचें आध्यात्मिक तत्त्वज्ञान व बौद्धजैनांची नैतिक शिकवण यामुळें यज्ञीय हिंसा सामान्य जनांना पटेनाशी झाली. यज्ञधर्म सामान्य माणसाला परवडणाराही नव्हता. पश्चिम भारतांत भक्तिपंथाचा उगम व प्रसार झाला होता. भारतामध्यें आलेल्या नवीन लोकांना भारतीय समाजांत सामावून घेणें आवश्यक झालें होतें. त्या लोकांनीं आपल्या धर्मकल्पना आपल्याबरोबर भारतांत आणिल्या होत्या. या सर्वांचा संकलित परिणाम होऊन वैदिक धर्माचें स्वरूप बदलूं लागलें. नास्तिक पंथांशीं टक्कर देण्यासाठीं वैदिक धर्मानें भक्तिपंथांशीं जुळतें घेतलें. त्यामुळें वैदिक धर्माचें स्वरूप पालटून त्यास आतां हिंदु धर्माचें स्वरूप येऊं लागलें. वैदिकधर्म व भक्तिपंथ यांचा समन्वय घालून नवीन धर्म लोकप्रिय करण्यासाठीं पुराणें निर्माण झालीं. अनेक परकीय राजांनीं या नवीन धर्माचा स्वीकार केला. त्यामुळें परकीय लोकांचें भारतीकरण सहज होऊन अराजक दूर होण्यास मदत झाली. या नवीन धर्मानें अवतारांची कल्पना मांडून अनेक देवदेवतांना वैदिक धर्मांत समाविष्ट करून घेण्याची सोय निर्माण केली. त्यामुळें हिंदुधर्म सर्वसमावेशक होऊं शकला. श्रौत यज्ञांच्या ऐवजीं स्मार्त यज्ञ सांगितले गेले. अहिंसावृत्ति समाजांत लोकप्रिय ठरली होती. तिला खूष करण्यासाठीं यज्ञामध्यें पशूंची हिंसा करण्याऐवजीं देवतांना उद्देशून पशूंना मोकळें सोडणें वा पिष्टपशूंवर यज्ञीय संस्कार भागविणें असे नवे पर्याय सांगितले जाऊं लागले. नवीन जमातींचें भारतीकरण सुकर होण्यासाठीं कुलधर्म सर्वश्रेष्ठ ठरविले गेले. नीति, सदाचार, सर्वभूतांवर प्रेम, त्याग या सद्गुणांवर भर देऊन नवीन धर्म लोकप्रिय होऊं शकला. वैदिक धर्मांत स्त्रिया व शूद्र यांना यज्ञयागांचा अधिकार नव्हता. त्यामुळेंच हे वर्ग नास्तिक पंथांकडे आकृष्ट झाले होते. त्या वर्गांना हिंदुधर्मांत धार्मिक अधिकार देण्यांत आले. जपतप, पूजा, व्रतवैकल्यें हीं सर्वांस खुलीं ठेवण्यांत आलीं. पुराणग्रंथांचें पठणश्रवण करण्याचा अधिकारही सर्वांस मिळाला. हिंदुधर्म अधिक उदार व संग्राहक बनला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्धधर्म :

शुंग-कण्वांच्या उदयामुळें पूर्वभारतांत बौद्धधर्माला थोडासा प्रतिरोध निर्माण झाला. तथापि बौद्धधर्माची लोकप्रियता कमी झाल्याचें दिसत नाहीं. नवीन लोकांमध्यें बौद्धधर्माचा चांगला प्रसार झाला. मिनँडर व कनिष्क या सम्राटांनीं बौद्धधर्म स्वीकारल्यामुळें त्या धर्माची प्रतिष्ठा वाढली आणि मध्य व पश्चिम आशियांतील देशांतही बौद्धधर्माचा प्रचार व प्रसार सुलभ झाला. कनिष्कानें चौथी धर्मपरिषद् भरवून लौकिक बौद्धधर्मास उत्तेजन दिलें. दक्षिण भारतांतही सातवाहन, इक्ष्वाकु व तामीळ राज्यें यांमध्यें बौद्धधर्म भरभराटीस पोहोंचला होता. अनेक शकक्षत्रपांनींही स्तूप व विहार बांधण्यांत धन्यता मानल्याचे उल्लेख आहेत.

महायान पंथ :

बौद्धधर्माच्या मूळच्या स्वरूपांत या काळापर्यंत पुष्कळच फरक पडला होता. दुसऱ्या धर्मपरिषदेपासूनच विनयाच्या अर्थासंबंधीं बौद्धभिक्षूंत मत-भेद निर्माण होऊन फाटाफुटीस सुरुवात झाली होती. अशोकाच्या काळींही संन्यासमार्गापेक्षां नैतिक आचरणावर भर देण्यांत येऊन स्वर्गप्राप्तीसाठीं भिक्षू व उपासक या दोघांनींही प्रयत्न करावा असें प्रतिपादण्यांत येऊ लागलें. गौतमबुद्धानें पुरस्कारिलेलें ' निर्वाण ' हें क्रमाक्रमानें मिळवावयाचें दूरचें ध्येय म्हणूनच शिल्लक राहिलें. भारतांतील भक्तिपंथांचा प्रसार व परकीय लोकांना आकर्षक वाटेल असें स्वरूप धर्माला देण्याची आवश्यकता इत्यादि अनेक गोष्टींची परिणति बौद्धधर्मांत एका नवीन पंथाचा उगम होण्यांत झाली. चौथ्या धर्मपरिषदेनें या नवीन पथाचें स्वागत करून त्याचें स्वरूप निश्चित केलें. यापुढें हाच पंथ सर्वत्र लोकप्रिय झाला. या नवीन पंथास महायान म्हणतात. तत्पूर्वींच्या जुन्या मताच्या बौद्ध संप्रदायास हीनयान म्हणून संबोधतात.

महायान ही बौद्धधर्मांतील एक उदार सुधारकी चळवळ होती. नवीन पंथांत गौतमबुद्ध ही मानवी विभूति राहिली नव्हती; तर तो एक सर्व-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शक्तिमान् देवाधिदेव बनला होता. त्याच्या सांनिध्यांतील प्रत्येक वस्तूला पावित्र्य प्राप्त झालें. त्याचे भौतिक अवशेष पुरून उभारलेले स्तूप आतां तीर्थयात्रेचीं स्थानें बनलीं. सम्राट् अशोकानें अशा धार्मिक स्थळांच्या यात्रा केल्याचें आपण पाहिलेंच आहे. भक्तिकल्पनांचा स्वीकार नवीन पंथानें केला. बुद्धाची भक्ति केल्यास ईश्वरी कृपा होऊन पापक्षय होऊं शकतो असें सांगण्यांत येऊं लागलें. सर्वसंगपरित्याग करून संन्यासमार्गी अर्हत्–जीवन कंठण्याची व स्वप्रयत्नानें पापक्षय घडवून आणण्याची आवश्यकताच उरली नाहीं. संसारी जनांनाही बुद्धभक्ति केल्यास स्वर्गप्राप्ति मिळण्याची सोय झाली. बुद्धदेव युगायुगांत जन्म घेऊन प्राणिमात्रांच्या उद्धारासाठीं झटत असतो. गौतमबुद्ध मृत धर्मगुरु न राहतां अमर उद्धारक बनला. बोधिसत्त्व नांवाचे अनेक संतमहात्मे प्राप्त झालेलें निर्वाणपद नाकारून जगदुद्धारार्थ संचार करीत असतात. जगांतील शेवटचा जीव मुक्त झाल्याशिवाय स्वतः निर्वाणपद उपभोगावयाचें नाहीं अशी त्यांची प्रतिज्ञा आहे. प्रार्थना, पूजा, श्रद्धा व भक्ति यांनीं त्या बोधिसत्त्वांना संतुष्ट करून सामान्य जनांनाही स्वर्ग-प्राप्ति होते. प्रत्येक व्यक्तीला स्वकर्माचे परिणाम भोगलेच पाहिजेत हें जुनें कर्मतत्त्व जाऊन ईश्वरी कृपेनें व्यक्तीच्या पापपुण्यांत बदल घडवून आणितां येतो असें सोयिस्कर तत्त्व प्रतिपादण्यांत आलें. सद्धर्मपुंडरीक या महायान ग्रंथांत प्रत्येक व्यक्ति अनंत जन्मांतून प्रगत होत शेवटीं बुद्ध होईल व निर्वाण मिळवील असें आश्वासन देण्यांत आलें आहे.

या नवीन पंथानें शिष्टजनांना वश करण्यासाठीं संस्कृत भाषेचा स्वीकार करून तीमध्यें ग्रंथरचना केली. अनेक देवदेवतांना सामावून घेऊन नवीन लोकांत धर्मप्रसार करण्याची शक्यता निर्माण केली. ग्रीकांच्या सहवासानें गांधारदेशांत प्रगत झालेल्या कलेचा पुरस्कार करून बुद्धमूर्तींची पूजा रूढ केली, व सामान्य जनांच्या धर्मभावनेला साकार स्वरूप दिलें. या मूर्तिपूजेच्या अनुषंगानें मंत्रतंत्रांना साहजिकच मान्यता प्राप्त झाली.

ख्रि. पू. पहिल्या शतकांत आंध्रप्रदेशांत महायान पंथाचा उदय झाला असावा. त्यानंतर कनिष्काच्या काळीं त्यास मान्यता मिळाली. इ. स. पहिल्या व दुसऱ्या शतकांत अश्वघोष, नागार्जुन, आर्यदेव, असंग व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वसुबंधु यांच्या ग्रंथांनीं त्या पंथाचा विकास झाला. (१) धर्मशून्यता (भौतिक वस्तूंचें मिथ्यात्व) व पुद्गलशून्यता (आत्मादि कल्पनांचें मिथ्यात्व), (२) अनेक बुद्ध व बोधिसत्व यांचें अस्तित्त्व, (३) नाना देवदेवतांची उपासना (४) निर्वाणप्राप्तीसाठीं मंत्रांचा उपयोग हीं महायान पंथाचीं वैशिष्ट्यें आहेत.

महायान व हीनयान :

(१) महायान पंथ सुधारक, उदार व भक्तिमार्गी आहे, तर हीनयान पंथ सनातनी, कर्मठ व संन्यासमार्गी आहे. (२) संसारांत राहूनही सदाचारानें सर्वजनहितार्थ झटणारा बोधिसत्त्व हें महायानपथाचें ध्येय, तर सर्वसंगपरित्याग करून स्वप्रयत्नानें निर्वाणासाठीं झटणारा अर्हत् हें हीनयान पंथाचें ध्येय आहे. (३) आत्मक्लेशावर हीनयानाचा भर आहे तर भक्ति हें महायान पंथाचें साधन आहे. (४) गौतमबुद्ध हा मृत धर्मगुरु आहे. प्रत्येकालाच बुद्धत्व प्राप्त होऊं शकत नाहीं असें हीनयान पंथ मानतो, तर गौतम ही अमर दैवी विभूति असून प्रत्येकाला बुद्धत्व प्राप्त होतें असें महायान पंथ सांगतो. (५) हीनयान पंथाची पाली ही धर्मभाषा आहे, तर महायान पंथाचे ग्रंथ संस्कृतमध्यें लिहिलेले आहेत. (६) बुद्धाचे अवतार व मूर्तिपूजा महायान पंथ शिकवितो. तो समावेशक असल्यानें स्थानिक परिस्थित्यनुसार स्वरूप बदलण्याचा लवचिकपणा महायान पंथांत आहे. पण त्यामुळेंच महायान पंथाचें स्वरूप विशुद्ध राहूं शकलें नाहीं. त्यांतही कर्मकांड व तांत्रिक पंथाच्या गोष्टी शिरल्या व त्याच शेवटीं बौद्धधर्माच्या भ्रष्टतेस कारणीभूत झाल्या. सध्यां महायान पंथ मध्य व पूर्व आशियांत अस्तित्वांत आहे, तर दक्षिणेकडील सिलोनमध्यें हीनयान पंथाचा प्रचार आहे.

जैनधर्म :

बौद्धसंप्रदायाप्रमाणेंच जैनधर्माचा प्रभाव आतां मध्यदेशांत पडेनासा झाला. तथापि खि. पू. दुसऱ्या शतकांत कलिंगाच्या खारवेल राजानें जैनधर्मास राजाश्रय देऊन त्याच्या प्रसारास साह्य केलें. त्यामुळें त्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'जैन अशोक' असें म्हणतात. शंगम् वाङ्मयाच्या काळांत तामीळ प्रदेशांतही जैनधर्माचा प्रसार झालेला होता. तथापि, मथुरा व उज्जयिनी हा पश्चिमेकडील विभागच जैनधर्माचें मुख्य केंद्र बनला. तेथेंच जैन कला वाढली. इ. स. ७९ च्या सुमारास जैन श्रमणकांतील मतभेद कळसास पोहोंचले व श्वेतांबर व दिगंबर असे सुधारक व सनातनी पक्षांचे दोन पंथ या धर्मांत स्पष्टपणें निर्माण झाले. जैन कालकाचार्य कथानकावरून माळव्यांत जैनधर्म भरभराटीस होता व परकीयांनाही या धर्माची दीक्षा दिली जात होती. महाक्षत्रप पहिला रुद्रसिंह याच्या गिरनार शिलालेखांत केवली यतींचा आदरपूर्वक उल्लेख आहे.

भागवत धर्म :

भक्तिधर्माचा उगम भारतांत निश्चित केव्हां झाला हें सांगतां येत नाहीं. तथापि ऋग्वेदांतील वरुणसूक्तांमध्यें व्यक्तविलेल्या भावना व उपनिषदांमधील उपासनामार्ग यावरून भक्तिधर्माचें मूळ वैदिक धर्मांतच आहे असें वाटतें. मानवी मनाला व्यक्त देवतांबद्दल निश्चित आस्था व श्रद्धा वाटते. पितृपूजेंतून यमपूजेचा उपक्रम पाहिल्यावर विभूतिपूजेंतून भक्तिधर्माचा उगम सहजच संभवतो. यज्ञधर्माच्या पिछेहाटीबरोबरच अव्यक्त वैदिक देवतांचें महत्त्वही कमी होऊं लागलें व नवीन देवतांच्या वाढीस वाव मिळाला.

यदुवंशाच्या सात्वत किंवा वृष्णि कुलामध्यें वासुदेव नांवाचा थोर पुरुष होऊन गेला असावा. वीरपूजेच्या पद्धतीनुसार सात्वत कुलामध्यें वासुदेव-पूजा सुरू झाली. यदुवंशांत सूर्यदेवतेचें पूजन होत असे. त्याच देवतेशीं वासुदेवाचें नातें लावून देण्यांत आलें. वासुदेवाच्या उपासकांचा उल्लेख पाणिनीच्या अष्टाध्यायींत आहे. ऋग्वेदामध्यें विष्णु ही आदित्यदेवता असून तिचा त्रिपाद विक्रम प्रसिद्ध आहे. ऋग्वेदकाळामध्यें जरी विष्णु क्षुद्र देवता होती तरी लौकरच तिला महत्त्व प्राप्त झालें. ब्राह्मणग्रंथांतून विष्णु यज्ञरूप असल्याचें वर्णन आहे. यज्ञधर्माच्या भरभराटीबरोबर विष्णूचेंही महत्त्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
वाढलें. उपनिषदांतून विष्णूचा पुरुष नारायण असा उल्लेख येतो, व नारायणाची उपासना कित्येक उपनिषदांतून सांगितली आहे. छांदोग्य उपनिषदामध्यें आंगिरसकुलोत्पन्न घोर ऋषीनें देवकीपुत्र कृष्णाला सांगितलेला उपदेश दिला आहे. घोर व कृष्ण हे गुरुशिष्य सूर्योपासक होते. घोरांगिरसानें द्रव्ययज्ञाचा निषेध करून सदाचारावर भर दिलेला आहे. जीवनांतील प्रत्येक कृत्य म्हणजे यज्ञकर्म आहे व तद्वारां परमेश्वरप्राप्ति होऊं शकते. तप, दान, आर्जव, अहिंसा व सत्यवचन या सद्गुणांचें आचरण करावें, मृत्युसमयीं अक्षरब्रह्माचें ध्यान केल्यास सद्गति मिळत, इ. तत्त्वज्ञान घोरऋषीनें प्रतिपादिलें आहे. सूर्योपासक सात्वतांनीं याच मार्गाचें आचरण करून घोरशिष्य देवकीपुत्र कृष्ण व वासुदेव यांचें ऐक्य कल्पिलें असावें. सूर्योपासनेची परिणति भागवत धर्मांत झाली असावी. तैत्तिरीय संहितेंत वार्ष्ण गोत्रल नांवाच्या आचार्यांचा उल्लेख येतो. यमुनेच्या प्रदेशांतील हा ऋषि गोपालकृष्ण म्हणून प्रसिद्धीस आला असावा.

सात्वतांच्या वासुदेव-कृष्ण देवाची वैदिक विष्णुदेवतेशीं एकरूपता प्रतिपादण्यास सुरुवात झाली, ही वैष्णव धर्माच्या उत्क्रांतीची पहिली मोठी पायरी होय. या वेळेपासूनच वासुदेवपंथ वैष्णवधर्म म्हणून प्रसिद्धीस आला. शतपथ ब्राह्मणांत पुरुष नारायणानें पंचरात्रसत्र करून सर्व प्राणिमात्रांमध्यें श्रेष्ठता प्राप्त करून घेतली व तो सर्व प्राणिमात्रांच्या ठायीं वास करूं लागला असा उल्लेख आहे. या पांचरात्रिक नारायणाचें व वासुदेव-कृष्ण-विष्णु देवतेचें ऐक्य होऊन विष्णुनारायण ही एक देवता बनली. ही वैष्णव धर्माची दुसरी पायरी होय. यादवकुलाचा वाढता विस्तार व देशांतर यामुळें यमुनेच्या खोऱ्यांतून या वैष्णव धर्माचा प्रसार गुजराथ, कोंकण व विदर्भ प्रांतांत झाला. खि. पू. दुसऱ्या शतकांत भारतांत घुसलेल्या आभीरादि गोपालक जमातींच्या समावेशामुळें कृष्णाभोंवतीं गोकुळांतील बालपणींच्या कथा निर्माण झाल्या असाव्यात. महाभारत व भगवद्गीता यांनीं भागवत धर्माला विधायक तत्त्वज्ञान देऊन तो धर्म लोकप्रिय केला. पुराणांनीं वैदिक धर्म व वैष्णवधर्म यांची सांगड घालून हिंदुधर्माचा पाया घातला. वेदविरोधी बौद्धजैनादि धर्मांशीं टक्कर देतांना ब्राह्मणधर्माला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
लोकप्रिय पंथांची मदत घेणें भागच होते, व त्यांतूनच या ऐक्य कल्पनेची निर्मिति झाली असावी. विष्णु ही अत्यंत लोकप्रिय पौराणिक देवता बनली.

राजपुतान्यांतील घोसुंडि येथील शिलालेखांत (खि. पू. २००) संकर्षण व वासुदेव यांच्या देवळांचा उल्लेख आहे. म्हणजे नवीन धर्म मूर्तिपूजक होता. भक्तिमार्ग सर्वांसच खुला असल्यानें व आचरण्यास सोपा असल्यानें तो बौद्ध-जैनांशीं टक्कर देऊन यशस्वी होऊं शकला. परकीय जमातींनाही आत्मसात् करण्यास तो समर्थ बनला. 'इंद्र आपल्या मायेनें नाना रूपें धारण करतो,' 'सर्व देव एकच असून भिन्न नांवांमुळें निरनिराळे दिसतात;' या वैदिक कल्पनांमधूनच अवतारकल्पनेचा उगम झाला व त्यामुळें वासुदेव—कृष्ण-विष्णु-नारायण यांच्या एकतेचें समीकरण मांडणें सुलभ झालें. अनेक परकीय देवताही या अवतारकल्पनेमुळें वैदिक देवतांचींच भिन्न रूपें आहेत असें प्रतिपादून परकीयांना वैदिक धर्मांत सामावून घेणें शक्य झालें. या भक्तिमार्गाचा प्रसार परकीयांत झाल्याचा पुरावाही आपणांस मिळतो. भागभद्र या शुंग राजाच्या दरबारीं आलेल्या हेलिओडोर या ग्रीक वकिलानें भागवत धर्माचा स्वीकार करून देवदेव वासुदेवाच्या सन्मानार्थ गरुडध्वज स्तंभ उभारला असा उल्लेख बेसनागर (ग्वाल्हेर) येथील शिलालेखांत (खि. पू. २००) आहे. दक्षिणेस सातवाहनांच्या शिलालेखां-तूनही भागवत वैष्णवांचा उल्लेख येतो.

या भक्तिपंथांनीं वैदिक यज्ञधर्माऐवजीं स्मार्त धर्म रूढ केला. साकार देवतेची पूजा प्रचलित करून मूर्तिपूजा सुरू केली. ईश्वरी कृपेची कल्पना मांडून कर्मकल्पना शिथिल केली. पापी माणसालाही ईश्वरी भक्तीमुळें सद्गति प्राप्त होते; स्वतःच्या पापकर्मांच्या परिणामाची निष्कृति त्यास मिळते असें प्रतिपादन केलें. हा भक्तिमार्ग सर्वांस अनिर्बंध खुला करून सामाजिक समतेचा पुरस्कार केला.

शैवपंथ :

वैष्णव पंथाप्रमाणें शैवपंथाचीं बीजें वैदिक वाङ्मयांत हुडकतां येतात. वेदपूर्व कालांतही शैव पंथाचीं मुळें सांपडतात. ऋग्वेदांत रुद्र हा भयंकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

देव म्हणून वर्णिला आहे. त्याच्या अवकृपेमुळें मानवी जीवनांत अनेक संकटें व दुःखें निर्माण होतात. त्यानें त्रास देऊं नये म्हणून त्याची उपासना करीत. एकंदरींत ऋग्वेदामध्यें रुद्र ही क्षुद्र देवता आहे. अथर्ववेदांतून रुद्राचा शिव, महादेव म्हणून उल्लेख येतो; व समाजांतील खालच्या थरांत शिवोपासना प्रचलित असावी असें वाटतें. यजुर्वेदामध्यें रुद्राच्या शिव स्वरूपाचा विकास दिसून येतो. शतरुद्रीयामध्यें रुद्राचीं शंभर नांवें आहेत व त्यावरून रुद्रस्वरूपाचा चांगलाच विकास झाल्याचें दिसतें. श्वेताश्वतर उपनिषदामध्यें रुद्र महादेव स्वरूपांत विकसित झाला. रुद्र-शिव उपासना विशिष्ट पंथाची नसून आर्यांमध्यें सार्वत्रिक असावी. या रुद्र-शिव कल्पनेमध्यें डोंगरी अनार्यांचा देव व सैंधव संस्कृतींतील पशुपति यांची भर पडून सध्याचें शंकर देवतेचें स्वरूप बनलें आहे.

भागवत पंथाच्या उदाहरणानें स्वतंत्र शैव पंथाची सुरुवात ख्रि. पू. दुसऱ्या शतकांत झाली असावी असें वाटतें. महाभारतामध्यें पाशुपत किंवा माहेश्वर पंथाचा उल्लेख येतो. पतंजलीच्या महाभाष्यांत शिवभागवतांचा उल्लेख आहे. कांहीं कुशान राजांनींही शैवपंथ स्वीकारला होता असें त्यांच्या नाण्यांवरील मुद्रांवरून दिसतें. याच कालांत शिवाच्या मूर्तिपूजे-ऐवजीं लिंगपूजा रूढ झाली.

इतर पंथ :

यांखेरीज अनेक देवतांचे भक्तिपंथ या काळांत प्रचलित होते. शक्ति किंवा दुर्गा, गणपति, स्कंद किंवा कार्तिकेय, ब्रह्मा, सूर्य या देवतांचे उपासक समाजांत होते. समाजांतील खालच्या थरामध्यें यक्ष, गंधर्व, नाग, भूतपिशाचें व पशुपक्षी यांच्या उपासनाही रूढ होत्या.

याच कालामध्यें ज्यू लोकांनीं भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर वसाहती केल्या. ख्रिस्ती धर्मप्रचारक सेंट थॉमस यानें भारतांत येऊन गोंडोफर्नेस या पार्थियन राजाला ख्रिस्ती धर्माची दीक्षा दिली. तेथून तो मलबार किनाऱ्यावर उतरला व मलबारांत त्यानें ख्रिश्चन धर्माचा प्रसार केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सामाजिक परिस्थिति :

या अराजक कालांत समाजजीवनामध्यें खूपच बदल घडून आला. परकीयांच्या आक्रमणामुळें सामाजिक अस्थैर्य निर्माण झालें. नवीन लोकांना भारतीय समाजांत सामावून घेण्याचा प्रश्न निर्माण झाला. अनेक धर्मपंथ प्रचलित असलेल्या भारतीय समाजामध्यें धर्ममतांमुळें समाजाच्या घडणींत कांहींच बदल होत नसे. एकाच कुटुंबांत बौद्ध, वैष्णव, शैव किंवा सौर पंथांचीं माणसें गुण्यागोविंदानें राहूं शकत असत.

जातिसंस्था :

या काळांत जातिसंस्थेचें प्राबल्य खूपच वाढलें. आनुवंशिकतेवरून व्यक्तींचें सामाजिक स्थान निश्चित करणारी ही पद्धति होती. आहार व विवाह या बाबतींत विशिष्ट नियमांनीं बांधलेली, सजातीय पण गोत्रबाह्य विवाह करणारी, उच्चनीचतेच्या कल्पनांनीं जखडलेली, अनेक स्वयंशासित मानव गटांची समाजरचना जातिव्यवस्थेला अभिप्रेत आहे. जाति व वर्ण या भिन्न कल्पना आहेत. जातिव्यवस्था कशी निर्माण झाली असावी तें निश्चित सांगतां येणें कठीण आहे. वर्णसंकरामुळें जातींची उत्पत्ति झाली अशी स्मृतींची कल्पना आहे. धंद्यावरून अगर मानववंशांच्या मिश्रणामुळें जाती उत्पन्न झाल्या असाव्यात असें कांहींजण समजतात. पितृपूजेच्या देवक पद्धतीवरून जातींचा उगम झाला असेल असेंही कित्येक समजतात; तर जातिसंस्था अनार्यांपासून आर्यांनीं घेतली असाही दुसऱ्यांचा दावा आहे. जातिसंस्थेचीं मुळें अनार्यांच्या धार्मिक कल्पनांत आहेत. प्रत्येक मानवगटाची एक रक्षक देवता असून, त्या मानवगटाच्या जीवनांत थोडाहि अनधिकृत फरक केला तरी त्याचे वाईट परिणाम त्या मानवगटास भोगावे लागतात. या कल्पनेंतूनच सजातीय विवाह व आनुवंशिक धंदा यांची कल्पना रूढ झाली असावी.

जातिसंस्थेचे गुणदोष :

(१) जातिसंस्था ही श्रमविभागणी, सहकार्य व सहजीवन या तत्त्वांवर आधारलेली आहे. समाजांतील प्रत्येक घटकाला समाजांत स्थान प्राप्त व्हावें;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुणवैषम्यामुळें कोणालाही स्पर्धेच्या जीवनानें निर्वंश केलें जाऊं नये अशी व्यवस्था जातिसंस्था करते. (२) समाजाच्या सर्व गरजा पुरविल्या जाव्यात; समाजाला आवश्यक अशी नवीन पिढी वाढवावयाची व अशा रीतीनें सामाजिक चुरस व वैषम्य टाळावयाचें हा जातिव्यवस्थेचा विशेष आहे. (३) या व्यवस्थेंत प्रत्येक गटांत सामाजिक एकता व समता स्थापली जाते; पैसा अगर आनुवंशिक गुण यांमुळें समाजांत उच्चनीच भेद पडत नाहींत. (४) प्रत्येक व्यक्तीचें सामाजिक स्थान व व्यवसाय निश्चित होऊन तदनुरूप शिक्षण देतां येणें शक्य होतें; त्यामुळें कोणाच्याही जीवनांत अपेक्षाभंग वा निराशा उत्पन्न होत नाहीं. (५) पिढ्यान्‌पिढ्या धंदा चालत असल्यानें व्यावसायिक कौशल्याची वाढ झाली. (६) वांशिक शुद्धता राहूं शकली. (७) परकीयांचा भारतीय समाजांत समावेश करून घेणें सोपें झालें. त्यामुळें अराजक कालांतही भारतीय समाज टिकूं शकला, व भारतीय संस्कृति चिरंतन होऊं शकली. (८) प्रत्येक जाति आपल्या गटांत सामाजिक नीतिनियमांची कसोशीनें अंमलबजावणी करते; त्यामुळें व्यक्तिजीवन शुद्ध राहूं शकतें. (९) जातिव्यवस्थेंत कर्तव्य किंवा धर्म यांवर भर आहे, त्यामुळें सामाजिक सद्गुणांची जोपासना होते व व्यक्तीचें चारित्र्य योग्य दिशेनें बनत जातें. (१०) आत्यंतिक व्यक्तिस्वातंत्र्य व आत्यंतिक समाजनियंत्रण याचा सुवर्णमध्य जातिव्यवस्थेंत आहे. प्रत्येक जातीमध्यें व्यक्तीव्यक्तींत स्पर्धा असूं शकते, पण जातीजातींत सहकार्यच राखलें जातें.

(१) जातिसंस्था जन्मजात उच्चनीचतेवर उभारलेली असल्यानें सामाजिक विषमता निर्माण होते. (२) व्यक्तिगत कर्तृत्वाला जातिव्यवस्थेंत वाव मिळत नाहीं. नालायक ब्राह्मण किंवा लायक महार यांचा प्रश्न जातिसंस्था सोडवूं शकत नाहीं. (३) व्यक्तीच्या गुणांना मान न मिळाल्यानें निराशा, द्वेष, मत्सर यांची वाढ होऊन सामाजिक अशांति निर्माण होते. (४) समाजांत एकतेची, एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण होऊं शकत नाहीं. प्रत्येकजण आपापल्या जातीपुरतेंच पाहतो. (५) जातिव्यवस्थेंत व्यक्तीचा आहारविहार, विवाह व व्यवसाय नियंत्रित

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यानें व्यक्तिस्वातंत्र्य मारलें जातें. जातिसंस्था लोकशाहीविरोधी आहे. (६) अस्पृश्यतेमुळें एका मोठ्या गटाचे सामाजिक हक्क हिरावून घेतले गेले. शूद्रांचें जीवन अत्यंत कष्टमय व करुणास्पद झालें आहे. (७) जातिव्यवस्थेंत सनातनी प्रवृत्तीचा परिपोष होतो. कोणत्याहि क्षेत्रांत नवीन धाडस करणें, नवीन व्यवसाय करणें अगर सुधारलेली जीवनपद्धति अनुसरणें या गोष्टी अशक्य होतात. त्यामुळें भारतीय समाजाची प्रगति खुंटली व आधुनिक जगांत तो मागें पडला. (८) जातिसंस्थेनें विविध गटांमध्यें एक प्रकारचे पडदे निर्माण होऊन जातीजातींतील दळणवळण बंद पडलें आहे. हिंदूंना परकीयांशीं मोकळेपणानें मिसळून वागतां येत नाहीं व त्यामुळें जागतिक बंधुभाव व ऐक्य यांची वाढ होऊं शकत नाहीं.

समाजजीवन :

या अराजक कालांत अनेक परकीय लोक स्वतंत्र जाति म्हणून हिंदु समाजांत सामावून घेण्यांत आले. या गटवार धर्मांतरामुळें वांशिक व सांस्कृतिक संघर्ष टाळतां आले. प्रत्येक गटाची अंतर्गत संस्कृति कायम ठेवूनही त्यांचें उदात्तीकरण करण्याचे प्रयत्न केले गेले. ब्राह्मणांना महत्त्व प्राप्त झालें. त्यांचा आदर्श सर्व समाजांपुढें ठेवण्यांत आला. समाजाचे शिक्षक व नियंत्रक म्हणून ब्राह्मणांना मान मिळूं लागला. त्यांचें स्थान टिकविण्यासाठीं त्यांना देव मानण्यापर्यंत समाजप्रवृत्ति निर्माण केली गेली. स्मृति व पुराणें यांतून ब्राह्मणांचा मोठेपणा वर्णिला आहे. प्रत्येक जातीचे आचारविचारांचे नियम याच काळांत ठरविले गेले.

वर्णाश्रमधर्म मागें पडून जातिधर्म व कुलधर्म यांना प्राधान्य प्राप्त झालें. हिंदु झालेल्या परकीयांच्या अनेक अवैदिक चालीरीती केवळ जातिधर्म म्हणून त्या त्या गटांत कायम ठेवण्यांत आल्या. सजातीय विवाहांवर भर देण्यांत येई. अनुलोम विवाह अद्यापिही होत असत. हिंदु राजांनीं शक–कुशानांच्या राजकन्यांशीं विवाह केल्याचे उल्लेख शिलालेखांतून आढळतात. दाक्षिणात्यांमध्यें मातुलकन्या–परिणयाची चाल रूढ होती.

स्त्री-स्वातंत्र्याचा या काळांत संकोच होत गेला. संसार सोडून स्त्री संन्यासमार्गाकडे वळल्यास संतति व स्थैर्य या दोन्ही दृष्टींनीं समाजास धोका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निर्माण होतो, म्हणून स्त्रीला संसारांतच गुंतवून ठेवण्याची आवश्यकता भासूं लागली. अविवाहित तरुण स्त्रिया आपल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करतात असें समाजास दिसून आलें. म्हणून विवाह व संसार हेंच स्त्रियांचें क्षेत्र निश्चित करण्यांत आलें. कुमारिकेला स्वातंत्र्याची संधि मिळूं नये म्हणून ऋतुप्राप्तीच्या आंत विवाह करावा असा दंडक घातला गेला. या बालविवाहामुळें मुलींच्या शिक्षणाची व संस्कारांची आबाळ होऊं लागली. विवाह हाच स्त्रीचा उपनयनसंस्कार आहे असें मनुस्मृति सांगते. विवाहोत्तर पतीशीं एकनिष्ठ राहून पातिव्रत्य धर्माचें आचरण करण्याची जबाबदारी स्त्रीवर टाकण्यांत आली. या राजकीय व सामाजिक अस्थिरतेच्या काळांत स्त्रियांचें संरक्षण करण्याची जबाबदारी पिता, पति व पुत्र यांवर टाकण्यांत आली. तिनें स्वतंत्रपणें वागूं नये असा मनूनें दंडक घातला. (न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ।) या विचाराबरोबरच स्त्री ही पुरुषाची अर्धांगी, मित्र, सल्लागार व तत्त्वज्ञ आहे. त्यामुळें तिला अतिशय आदरानें वागविलें पाहिजे हाही विचार स्मृतींत सांगितला आहे.

समाजाच्या नैतिक मूल्यांत वाढ होऊन पूर्वींची नियोगपद्धति त्याज्य ठरविली गेली. पातिव्रत्यकल्पनेच्या वाढीमुळें विधवांना पुनर्विवाह करण्याची बंदी होती. पतिनिधनानंतर विधवेनें संन्यासवृत्तीनें राहावें असा दंडक होता. अशा स्त्रीच्या योगक्षेमाची व्यवस्था करणें जरूर झालें. स्त्रीला स्वतंत्र धन नसल्यास वैधव्यजीवन सदाचारानें कंठणें तिला कठीण आहे ही गोष्ट ध्यानांत घेऊन स्त्रीधनाची कल्पना याज्ञवल्क्यस्मृतीनें प्रथम मांडली. बालविवाहामुळें बालविधवांचाही प्रश्न निर्माण होऊन त्याची सोडवणूक समाजास करावी लागली. शकांनीं सतीची चाल या काळांत हिंदुस्थानांत आणली. पुढील काळांत तीच चाल समाजांत रूढ होऊं लागली.

गणिकांचें सामाजिक स्थान या काळांत टिकून राहिलें. गणिकेच्या घरीं जाऊन काव्यशास्त्रविनोदांत कालक्रमणा करणें शिष्टसंमत होतें. तत्कालीन गणिकाही चतुर, कलाभिज्ञ व विद्वान् असत. वात्स्यायनाच्या वर्णनावरून तत्कालीन सामाजिक नीतिमत्तेचा दर्जा पुष्कळच खालावलेला होता असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिसतें. वात्स्यायनानें रेखाटलेलें नागरकाचें चित्र सुसंस्कृत पण फॅशनेबल खुशालचेंडू नागरिकाचें वर्णन आहे.

याच काळांत हिंदु कायद्याला सुव्यवस्थित रूप दिलें गेलें व त्याची प्रगति झाली. मनुस्मृतीमध्यें प्रथम धर्मशास्त्राचे विवरण आढळतें. त्यानंतर इतर बृहस्पति, याज्ञवल्क्य व नारद इत्यादि धर्मशास्त्रें लिहिलीं गेलीं; कौटिल्याच्या अर्थशास्त्रांतही कायदाविषयक बरीच माहिती मिळते. श्रुति (वेद), स्मृति, थोरांच्या चालीरीती, स्वतःची मनःप्रवृत्ति हीं कायद्याचीं प्रमाणें आहेत असें मनु म्हणतो. कायद्यांत वरचेवर सुधारणा करणें अवश्य होतें. तें हळू-हळू कां होईना, निरनिराळ्या नवनवीन धर्मशास्त्रांच्या द्वारें व धर्मसभा भरवून होत असे. मनूनें धर्मव्यवहाराचे अठरा विषय सांगितले असून तेच अर्थशास्त्रांतही आहेत.

करडी वागणूक, कानउघाडणी, दंड, शारीरिक शिक्षा असे शिक्षेचे चार प्रकार असत. हद्दपार करणें हाही एक प्रकार असे. अदंड्यांना शिक्षा व दंड्यांना सोकळें सोडणाऱ्या राजाची दुष्कीर्ति होते व तो परलोकाला मुकतो असें म्हटलें आहे. अपराध्याची जात लक्षांत घेऊन शिक्षा कमी-अधिक दिली जात असे. कर्जावरील व्याजाचे दरही जातीप्रमाणें कमी-अधिक असत. संपत्तीची व मालमत्तेची वांटणी बापाच्या मृत्यूनंतर होत असे. राजानें न्याय न दिल्यास त्याचा नाश होतो. (धर्मो रक्षति रक्षितः ।) असा मनूचा दंडक असे. राजाला न्यायाच्या कामांत त्याचे अनुभवी सल्लागार व ब्राह्मण साहाय्य करीत. पवित्र, सदाचरणी, कर्तव्यरत माणसाच्या पुराव्याला महत्त्व असे. साक्षीदारास शपथ घ्यावयास लावीत.

आर्थिक परिस्थिति :

परकीयांच्या आगमनामुळें नवीन कलाकौशल्य व बाजारपेठा यांची भर पडून शेती, उद्योगधंदे व व्यापार यांची या काळांत भरभराटच झाली. शेती व पशुपालन हाच अधिकांश लोकांचा व्यवसाय होता. सुधारलेलें बीबियाणें व खतें पुरविणें, अवर्षणाच्या काळांत तगाई देणें, पाटबंधारे बांधून शेतीला पाणीपुरवठा करणें या कामीं सरकारही लक्ष घालीत असे व त्यामुळें शेतीची समृद्धि होती. शेतीच्या मालाला चांगली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजारपेठ मिळत असल्यानें शेतकरी सुखी होता. ग्रामसंस्थांच्या स्वायत्ततेमुळें राजसत्तेच्या उलथापालथींचा फारसा परिणाम ग्रामीण जीवनावर होत नसे. शेतकऱ्याला वेगवेगळ्या प्रकारचे कर द्यावे लागत.

वाङ्मयांत व आलेखांत अनेक व्यवसायांचे उल्लेख येतात. खाजगी उद्योगधंद्यांवर भर होता तरीही कांहीं धंदे सरकारीही असत. निरनिराळ्या व्यावसायिकांच्या संघटनांची खूपच प्रगति झाली होती. अराजक कालामुळें अशा संघटनांची आवश्यकता होती व त्यांना भरपूर स्वायत्तताही मिळाली. या श्रेणी केवळ सभासदांच्या हितसंबंधांकडेच लक्ष ठेवीत नसून सार्वजनिक हितार्चीं कामेंही करीत. श्रेणीच्या नांवानें दानधर्म करून विहार, चैत्य, स्तूप इ. बांधले गेल्याचे उल्लेख आहेत. या श्रेणींना भरपूर स्थैर्य असल्यामुळें सामान्य लोकही अशा श्रेणींमध्यें ठेवी ठेवीत. पुष्कळदां कायम ठेवी ठेवून त्यांच्या व्याजांतून विशिष्ट धर्मकृत्यें करण्याचें काम श्रेणीकडेच सोंपवीत. जुन्नर, नाशिक येथील शिलालेखांतून असे विश्वस्त निधी उभारल्याचे उल्लेख आहेत. भारतीय मालाला परदेशी बाजारपेठा मिळाल्यानें येथील उद्योगधंदे भरभराटींत होते.

खि. पू. दुसऱ्या शतकांत पार्थियाच्या साम्राज्याचा उदय झाल्यानें व सीरियांतील अराजकानें भारताचा जमिनीवरून पश्चिमेशीं होणारा व्यापार मंदावला व समुद्रमार्गाचें महत्त्व वाढलें.समुद्रमार्ग किनाऱ्याकिनाऱ्यानें तांबड्या समुद्रापर्यंत जात असे व तेथून सोमाली बंदरांतून तो ईजिप्त व रोम येथें जाई. रोमचें साम्राज्य आशिया व ईजिप्त येथवर पसरल्यानें या पश्चिमी व्यापारास उत्तेजन मिळालें. ऑगस्टस सीझरला पांच भारतीय व्यापारी शिष्टमंडळांनीं भेट देऊन भारतीय व्यापाराला रोमन साम्राज्यांत सवलती मिळविल्या. इ. स. ४५ च्या सुमारास हिप्पालस या व्यापाऱ्यानें अरबी समुद्रावरील व्यापारी वाऱ्यांचा शोध लावल्यानें तांबड्या समुद्रांतून मलबार किनाऱ्याशीं थेटचें सागरी दळणवळण सुरू झालें व त्यामुळें व्यापार वाढला.

भारतांतून खालील माल पश्चिमी देशांकडे निर्यात होत असे. वाघ, सिंह, माकडें इ. पशु; पोपट, मोर इ, पक्षी; कातडीं, लोंकर, कस्तुरी, हस्तिदंत, मोती, रेशीम, मिरची, आलें, मसाल्याचे पदार्थ, नीळ, चंदन,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साखर, मलमल, सुती कापड, तांदूळ, सागवान लांकूड, औषधी वनस्पति, हिरें, माणकें, चैनीच्या वस्तू, इ. इ.; पश्चिमेकडून भारतांत सुंदर दासी, प्रवाळ, लिनन, दारू, शिसें, तांबें, कथील, कांच, चांदी, सोनें इ. इ. माल आयात होई. आयातीपेक्षा निर्यात जास्त असल्यानें लाखों रुपयांचीं रोमन नाणीं भारतांत येत असत. प्लिनी या ग्रंथकाराच्या अंदाजाप्रमाणें भारतांत दरसाल सहा लक्ष पौंडांची रोमन संपत्ति येत असे. भारतीय चैनीच्या वस्तू वापरण्याचें या काळीं रोमन लोकांना जणूं वेडच लागलें होतें.

हा परदेशी आयात-निर्यात व्यापार पूर्वपश्चिम किनाऱ्यावरील मोठ्या बंदरांतून चालत असे. सिंधूच्या मुखाजवळील बहर्दीपूर, भडोच, सोपारा, कल्याण, मुझिरिस (क्रँगानोर), कोट्टायम्, कोरकै, नेगापट्टम्, कावेरी-पट्टम्, पुलिकत, मच्छलीपट्टम्, ताम्रलिप्ति इ. व्यापारीं बंदरें प्रसिद्ध होतीं. देशांतही प्रसिद्ध बाजारपेठा होत्या. त्यांना जोडणारे राजमार्ग अस्तित्वांत होते.

नाणीं :

भारताची अतिप्राचीन चलनपद्धति मनुस्मृतींतील वजनें व मापें यांवर आधारलेली होती. त्याचें मूल प्रमाण 'रत्ति' किंवा गुंजा हें असें. सोन्याचें प्रमाणभूत नाणें ८० रत्तींचें असे. पुराण, धरण (३२ रत्ति) हीं व त्यांहून लहान चांदीचीं नाणीं असत.

ख्रिस्तपूर्व ५०० ते ३०० या कालांत तांबें हा धातु नाण्यासाठीं वापरांत येऊं लागला. ख्रिस्तपूर्व ४०० या कालांत स्वस्तिक, बोधिवृक्ष, विहार इत्यादि ठसे मारलेलीं नाणीं रूढ होतीं. या नाण्यांवर इराणी नाण्यांचा परिणाम स्पष्ट दिसतो, तरी बैल, हत्ती इत्यादि भारतीय प्रतीकेंही त्यांवर असत.

ख्रिस्तपूर्व पहिल्या व दुसऱ्या शतकांत शुंग राजांच्या नाण्यांवर ब्राह्मी लिपींत लिहिलेलें असे. शुंगांच्या दहा राजांचीं नांवें त्यांच्या निरनिराळ्या नाण्यांवर आढळून आलीं आहेत. मथुरा येथील नाण्यांवर दोन्हीं बाजूंस ठसे उमटविलेले असत. या सर्व नाण्यांवर परकीय राजवटीचा परिणाम दिसत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माळव्यांतील नाणीं प्रथम प्रथम Punch-marked व नंतर ठसे उमटविलेलीं असत. येथील नाणक-कला भारतीय होती, परंतु खिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत त्यांवर ग्रीकांची छाप पडल्यासारखी दिसते व त्यांत पुढें विशेष प्रगति दिसते.

भारतांतील ग्रीक राजांच्या नाण्यांवर त्यांच्या राजांचीं नांवें आढळतात. या नाण्यांवर राज-मुख-मुद्रा असून द्विभाषिक मजकूर असे. नाणीं वर्तुळाकार असून तीं इराणी किंवा भारतीय वजनाचीं असत. चांदीचीं नाणीं दोन किंवा अर्धा द्राम वजनाचीं असत. डिमेट्रियस्चीं नाणीं तांब्याचीं असून त्यांवर ग्रीक व खरोष्ठी लिपींत मजकूर असे. युक्रेटिडिस, अॅपोलोडस् व मिनँडर यांच्या नाण्यांचा प्रचार इ. स. च्या पहिल्या शतकांत भडोचपर्यंत झाला होता. यावरील मुखमुद्रा स्पष्ट व भावनिदर्शक आहेत. दुसऱ्या बाजूस बैल व हत्ती यांचे ठसे आहेत. ग्रीकांच्या नाण्यांवर ग्रीक व भारतीय संस्कृतीचा संगम झालेला दिसतो. भारतीय वैशिष्ट्य चटकन् ध्यानांत येतें.

शक व पार्थियन (पल्हव) यांच्यापैकीं मॉएझ्चीं नाणीं तांब्याचीं असून त्यावर ग्रीक देवता व हत्तीच्या डोक्याचा छाप असे. यांपैकीं एका नाण्यावर मॉएस् घोडेस्वार म्हणून दिसतो. गोंडोफेर्नेसच्या नाण्यांवर घोडेस्वार व शिव आढळतो. क्षत्रप अश्ववर्मन्चें नांव त्याच्या नाण्यांवर असून मजकूर द्विभाषिक असे.

पश्चिम भारतांतील शक क्षत्रपांपैकीं नहपान व चष्टन यांचीं नाणीं ग्रीकांच्या द्राम या वजनाचीं असून त्यांवर खरोष्ठी व नागरी लिपींत मजकूर असे. या नाण्यांवर एका बाजूस चैत्य असून दुसऱ्या बाजूस शक दिलेला असे. रुद्रदामन्चा नातू जीवदामन् (इ. स. १५०–२००) याच्या कारकीर्दींतील नाण्यांवर नाण्यांचा प्रचलनारंभकाल दिला आहे.

कुशान राजांच्या नाण्यांवर रोमची छाप दिसते. पहिल्या कॅडफिसस्च्या कारकीर्दींत नाणीं तांब्याचीं असून बैल व बॅक्ट्रियन उंट यांचा छाप त्यांवर असे. दुसऱ्या कॅडफिसस्चीं नाणीं स्टॅटेर (= दीनार = रोमन दिनेरियस्) वजनाचीं असत. पायास अढी घालून बसलेला राजा, राजमुद्रा, सिंहासनाधिष्ठित राजा, दोन घोड्यांच्या रथांत बसलेला राजा, वेदीवर हव्य ठेवीत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असलेला राजा, कुशानांचा लांब झगा व गिलजिटचे गुडघ्यापर्यंतचे बूट घातलेला व डोक्यावर हॅट, दुसऱ्या बाजूस शिव असे ठसे असत. कनिष्काच्या नाण्यांवर अपभ्रष्ट ग्रीक भाषेंत मजकूर असून हेलियस इ. ग्रीक देवता, शिव, इराणी अथ्रो (अग्नि) व ओएडो (वायु) या देवता व बुद्ध राजा यांच्या मुद्रा असत.

हुविष्काच्या नाण्यांवर सिंहासनस्थ व गजारूढ राजा व अनेक देवतांचे ठसे असत. वासुदेवाच्या कारकीर्दीत शिव व नंदी यांचा ठसा नाण्यांवर असे. यौधेयांच्या नाण्यांत कनिष्कांच्या ताम्र नाण्यांचें अनुकरण आढळतें.

आंध्रांचीं (सातवाहनांचीं) नाणीं कृष्णा-गोदावरी जिल्हे, उत्तर कोंकण, मध्यप्रदेश, माळवा येथें आढळतात. त्यांचीं जुनीं नाणीं खि. पू. १५० च्या सुमाराचीं असून तीं पोटिन (Billon) व शिसें यांचीं असत. त्यांवर ब्राह्मी लिपींत लेख असून, चैत्य, धनुष्य, हत्ती यांचे ठसे असत. गौतमीपुत्र शातकर्णी यानें विजयोत्सवासाठीं नहपानाचीं नाणीं पुन्हां ओतवून घेतलीं. यज्ञश्री शातकर्णी याच्या नाण्यांवर जहाजाचा ठसा आढळतो. तो आरमाराचा निदर्शक असावा.

तामीळ प्रदेशांतील राजांचीं नाणीं सोन्याचीं व विशिष्ट वजनाचीं असत. तीं Punch-marked असून पेल्याच्या आकाराचीं असत. इ. स. २०० पर्यंत हीं नाणीं प्रचारांत असून त्यांना 'पद्मटंक' म्हणत. या प्रदेशांत खि. पू. पहिल्या शतकांत रोमन सोन्याचीं नाणीं प्रचारांत होतीं. इ. स. ३०० च्या सुमारास तांब्याचीं जहाज असलेलीं नाणीं अस्तित्वांत होतीं. यांत आंध्रांचें अनुकरण दिसतें.

सारांश, या काळांतील भारतीय नाणक पद्धतीवर ग्रीकांची छाप दिसते; परंतु पुढें संपूर्ण भारतीकरण झालें आहे. कुशान कालांत तर केवळ भारतीयताच दिसते. नाणक-कला ही भारतांतच उगम पावली व शिल्पकारही भारतीयच होते हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

शिक्षण :

या कालांत झालेल्या धर्मसूत्रांमध्यें या कालांतील शिक्षणपद्धतीवर बराच प्रकाश पडतो. शिक्षणामध्यें धार्मिक ध्येय व्यक्तिविकास यांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विशेष भर असे. त्यामुळें त्यांतील विधिनियमांना बरेंच महत्त्व असे. शिक्षणासाठीं विद्यार्थ्याला आपला संपूर्ण जीवितक्रम बदलावा लागे. आई-वडिलांचें घर सोडून गुरूच्या–आध्यात्मिक पित्याच्या–घरीं राहावयास जावें लागे.

विद्यार्थ्याच्या पांचव्या वर्षी विद्यारंभ नांवाचा समारंभ करीत. यावेळीं त्यानें मुळाक्षरें व देवतांच्या प्रार्थना शिकावयाच्या असत. कौटिल्याच्या मतें यावेळीं लेखन व गणित हींही शिकवण्यास प्रारंभ होई. यानंतर उपनयन हा विद्यार्थ्यांच्या जीवनांतील कलाटणी देणारा समारंभ असे. मनु तर त्याला ‘ ब्रह्मजन्म ’ (आध्यात्मिक जन्म) म्हणतो. कारण सावित्री (गायत्री) ही माता व गुरु हा आतां पिता झालेला असतो. या ब्रह्मचर्यावस्थेंत विद्यार्थ्याला अत्यंत कडक शिस्तींत गुरुगृहीं राहावें लागे. शुल्क घेऊन शिकविणाऱ्या गुरूस ‘ उपपातकी ’, ‘ वृत्तिक ’ असें म्हणून हिणविलें आहे. कांहीं चुकार विद्यार्थ्यांना हें आयुष्य मानवत नसे. त्यांना ‘ खट्वारूढ (खाटेवर लोळणारा) ’ असें म्हणत. वरचेवर गुरुगृह बदलणाऱ्यास ‘ तीर्थकाक (तीर्थोतीर्थी हिंडणारा कावळा) ’ असें म्हणत. मुली आहेत म्हणून गुरुगृहीं शिकणाऱ्यांना ‘ कुमारी-दाक्षाः ’ असें संबोधीत. उत्तम शिक्षकाला ‘ यौजनशतिक (शेंकडो योजनांवरून ज्यांच्याकडे विद्यार्थि आकृष्ट होतात असें) ’ म्हणत. उपाध्याय म्हणजे स्वतःच्या उदरनिर्वाहा-साठीं वेद व वेदांगें यांचा कांहीं भाग शिकविणारा, तर आचार्य म्हणजे कांहींही शुल्क न घेतां संपूर्ण वेदवेदांगाचें अध्यापन करणारा.

लेखनकला :

या काळांत लेखनकला पूर्ण प्रगत झाली होती. ब्राह्मी ही प्राचीन लिपी अशोकाच्या शिलालेखांत आढळते. तिच्यापासून आजच्या भारतांतील बऱ्याच लिपी अस्तित्वांत आल्या. ॲक्मेनियन सम्राटांच्या ॲरेमिक लिपी-पासून खरोष्ठी निघाली. ती उजवीकडून डावीकडे अशी लिहिली जात असे. वायव्य सरहद्द प्रांतांतून ती मध्य आशियांत गेली व इ. सनाच्या तिसऱ्या चौथ्या शतकानंतर ती प्रचारांतून गेली. संस्कृत भाषा खि. पू. दुसऱ्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri
शतकापासून विशेष प्रचारांत येऊं लागली. रुद्रदामन्‌चा संस्कृत शिलालेख इ. स. १५० च्या सुमारास संस्कृतचें प्राबल्य सुचवितो. महायानपंथीयांनीं आपल्या धार्मिक ग्रंथांसाठीं व धर्मेतर गोष्टींसाठीं संस्कृत भाषेचाच उपयोग केला.

लेखनकला अस्तित्वांत येऊनही शिक्षण मौखिक पद्धतीनेंच चाले. सर्व ग्रंथ स्मरणांत ठेवणें याला महत्त्व दिलें जात असे. ब्राह्मण, बौद्ध व इतर पंथ यांची अशीच समजूत होती. यांत लिखित ग्रंथापेक्षां प्रत्यक्ष गुरूला शिक्षण पद्धतींत विशेष महत्त्व आहे; त्याचें कर्तव्य केवळ ज्ञान देणें हें नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचा विकास करणें हेंही होतें असेंही त्यांचें मत असावें व तें योग्यच होतें.

अभ्यासक्रम :

संपूर्ण वैदिक वाङ्मय, धर्मशास्त्रें (स्मृति), इतिहास, पुराण, संन्याशासाठीं वैखानस-सूत्र, दण्डनीति, आन्वीक्षिकी, (तत्त्वचिकित्सा), नास्तिक शास्त्रें, अर्थशास्त्र व तत्सम शास्त्रें हे विषय मनूनें अभ्यासक्रमांत गोवले आहेत; तर कौटिल्य म्हणतो : आन्वीक्षिकी, दण्डनीति, त्रयी विद्या (तीन वेद) वार्ता, (अर्थशास्त्र, शेती, व्यापार इ.) हे चार विषय अभ्यासक्रमांत प्रमुख होत. राजपुत्रांसाठीं लष्करी शिक्षण, इतिहास, पुराण, इतिवृत्त, आख्यायिका, उदाहरण, धर्मशास्त्र व अर्थशास्त्र हे विषय असत. बौद्धांच्या मिलिंदपन्हांत या विषयांची एक लांबचलांब यादी दिली आहे. मिलिंदाला यांपैकीं कितीतरी विषयांचें ज्ञान असल्याचा उल्लेख आहे.

व्यावसायिक शिक्षणासंबंधीं नारदस्मृतींत माहिती मिळते. अशा शाळांत प्रवेश मिळविण्यासाठीं काय नियम असत याचीही माहिती दिली आहे. या शिक्षणामुळेंच शिल्पादि हस्तव्यवसायांत प्राचीन भारताची चांगली प्रगति झाली होती. चौसष्ट कला ह्या या व्यावसायिक शिक्षणांतूनच निर्माण झाल्या होत्या.

वाङ्मय :

या काळांत भारतांतील विविध भागांत विविध विषयांवरील वाङ्मयाचें भरघोस पीक आलें. दक्षिणेकडील तामीळ वाङ्मयाचा आरंभ याच काळांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतो. संस्कृत भाषेचें महत्त्व पुनः वाढून ती राजभाषा बनली. अनेक परकीयांचे आलेखही संस्कृत भाषेंत या काळीं कोरले गेले. बौद्धांच्या महायान पंथानेंही संस्कृत-भाषेचाच आश्रय केला संस्कृतोत्पन्न अनेक प्राकृत भाषा उत्पन्न होऊन त्यामध्येंही वाङ्मयनिर्मिति होऊं लागली. ज्ञानांच्या विविध शाखांचें वाङ्मय या काळांत निर्माण झालें.

जुन्या धर्मसूत्रांना नवीन स्वरूपांत समाजापुढें ठेवण्याची आवश्यकता परकीयांच्या आगमनामुळें निर्माण झाली होती. हिंदु धर्माला व समाजाला काळाला साजेसें रूप देण्याचा सनातनी प्रयत्न आपणांस मनुस्मृतींत आढळतो. अत्यंत प्रमाणभूत असा हा हिंदूंचा धर्मग्रंथ आहे. जुन्या मानवधर्मसूत्रावर मनुस्मृति आधारलेली आहे. या ग्रंथाचीं अनेक संस्करणें होऊन त्यांत वेळोवेळीं भर पडलेली असावी असा विद्वानांचा तर्क आहे. स्मृतिग्रंथामध्यें आचार, व्यवहार व प्रायश्चित्त या तीन गोष्टींचा विचार असतो. मनुस्मृतीमध्यें वर्णधर्म व आश्रमधर्म, संस्कार, विधवाधर्म, राजधर्म, पतिपत्नीधर्म, दिवाणी व फौजदारी कायदे, जातिसंस्थेची निर्मिति, प्रायश्चित्त व तत्त्वज्ञान यांचा विचार केलेला आहे. मनु हा मानवजातीचा आद्यपुरुष समजला गेल्यानें या स्मृतिग्रंथाला फार प्रामाण्य आलें आहे. भारताबाहेर आग्नेय आशियांतही या स्मृतीचा प्रसार झाला होता. वर्णसंकर, राजाचें देवत्व, स्त्रीस्वातंत्र्याला अमान्यता, नियोगनिषेध, आश्रमसमन्वय, इ. वैशिष्ट्यपूर्ण कल्पना मनूनें सांगितल्या आहेत.

दुसरा प्रसिद्ध स्मृतिकार याज्ञवल्क्यही या काळाच्या अखेरीस झाला असावा. याज्ञवल्क्यानें मनुस्मृतींतील नियम सुसूत्र व थोडक्यांत सांगितले आहेत. न्यायदान व न्यायालयांतील व्यवहार या बाबतींत याज्ञवल्क्यानें पुष्कळच विस्तार केला आहे. हिंदु कायद्याच्या बाबतींत ही स्मृति अधिक प्रमाण मानतात. स्त्रीधनाची कल्पना, विधवेला वारशाचा अधिकार, वेगवेगळ्या दर्जाचीं न्यायालयें व त्यांतील कायदे यांचा विचार हीं या स्मृतीचीं वैशिष्ट्यें म्हणून सांगतां येतील.

भरताचें नाट्यशास्त्र हा भारतीय नाट्यशास्त्रावरील प्राचीन ग्रंथ इ. सनाच्या सुरुवातीस लिहिला गेला असावा. नाट्य हा पांचवा वेद भरतानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानिला आहे. अभिनय, पोशाख, रस, भाषा, नाट्यगृह, काव्यशास्त्र, प्रेक्षक इ. विविध तात्त्विक व तांत्रिक विषयांवरील विवेचन भरतानें केलें आहे. संस्कृत नाटकांचा सांचा भरतानें ठरवून दिला.

वात्स्यायनाचीं कामसूत्रें इसवी सनाच्या तिसऱ्या शतकांत लिहिलीं गेलीं. भारतीय कामशास्त्रावरील तो प्राचीन व प्रमाण ग्रंथ आहे. भारतीय सभ्यतेचें चित्रण त्यांत आहे. मनुष्यस्वभावाच्या विकृतीचा वात्स्यायन निषेध करतो. त्यानें दिलेले देश्योपचार बोधप्रद आहेत. समान सामाजिक थरांतील वधू-वरांचे विवाहच सुखप्रद होतात असें त्यानें स्पष्ट सांगितलें आहे. प्रेमविवाहास त्याचा विरोध नव्हता. त्यानें रेखाटलेल्या नागरक-वृत्तावरून तत्कालीन सामाजिक नीतिमत्ता किती खालावली होती याची कल्पना येते.

खि. पूर्व दुसऱ्या शतकांत भास हा पहिला मोठा संस्कृत नाटककार होऊन गेला. त्याच्या तेरा नाटकांपैकीं 'स्वप्नवासवदत्त' व 'प्रतिमा' हीं प्रसिद्ध आहेत. साधी व सोपी भाषा, सरस व समर्पक संवाद यांमुळें त्या काळीं भासाचीं नाटकें फारच लोकप्रिय ठरलीं. कालिदासाच्या वाङ्मयावरही त्याचा परिणाम झाला आहे. शूद्रकाचें 'मृच्छकटिक' नाटक भासाच्या 'चारुदत्त' नाटकावर आधारलेलें आहे.

पाणिनीय सूत्रांचें विवरण व शुद्धीकरण करणारें 'महाभाष्य' लिहिणारा पतञ्जलि पुष्यमित्र शुंगाचा समकालीन होता. त्याच्या ग्रंथानें व्याकरणशास्त्र परिणत दशेस पोहोंचलें. सोपी व सुबोध भाषा, दैनंदिन व्यवहारांतील उदाहरणें यांमुळें व्याकरणासारखा क्लिष्ट विषयही त्यानें मनोरंजक केला आहे. प्राचीन टीकापद्धतीचा आदर्श नमुना या दृष्टीनेंही या ग्रंथास महत्त्व आहे.

चरक व सुश्रुत यांच्या ग्रंथांनीं आयुर्वेदशास्त्राचा पाया घातला गेला. चरक हा कनिष्काचा राजवैद्य होता. वात-पित्त-कफ हे त्रिधातु व त्रिदोष यांचा भारतीय सिद्धांत त्यानें मांडला. त्याचें शारीरविज्ञान बरेंच प्रगत झालेलें दिसतें. मध्ययुगांत चरकसंहिता इराण व अरबस्थान या देशांतही लोकप्रिय झाली होती. सुश्रुतसंहिता हाही तितकाच महत्त्वाचा, लोकप्रिय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व प्रमाणभूत ग्रंथ आहे. यामध्यें शल्यतंत्र व त्यांचीं उपकरणें यांवर दोन साविस्तर प्रकरणें आहेत. त्यानें शस्त्रक्रियेचीं १२८ हत्यारें सांगितलीं आहेत. भारतीय वैद्यकशास्त्र चीनपासून अरबस्थानापर्यंत मान्यता पावलें होतें.

रामायण व महाभारत या आर्षकाव्यांचें संस्करण याच कालांत झालें. छंदःशास्त्रावर पिंगलानें 'छंदःसूत्रें' रचलीं (खि. पू. २००). कांहीं पुराणेंही या कालांतच लिहिलीं गेलीं. गार्गीसंहिता हा ज्योतिषशास्त्रावरील ग्रंथ या काळांत झाला असून त्यावर ग्रीकांची छाप दिसत नाहीं. त्यांतील युगपुराण प्रकरण ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचें आहे.

भारतीय षड्दर्शनांचे आकरग्रंथ याच काळांत रचले गेले असावेत. भारतीय दर्शनांचा उगम वैदिक वाङ्मयांत होतो. औपनिषदिक तत्त्वज्ञानाला पद्धतशीर स्वरूप देण्याचे अनेक प्रयत्न झाले. त्यांतूनच षड्दर्शनांचा जन्म झाला. हीं षड्दर्शनें तर्काधिष्ठित, रचनात्मक व विवेचक आहेत.

कपिलांचें सांख्यदर्शन :

सांख्य हें वैचारिकदृष्ट्या स्वतंत्र तत्त्वज्ञान आहे. तें द्वैतवादी आहे. पुरुष व प्रकृति हीं दोन अनादि तत्त्वें आहेत. पुरुष हा नित्य, चेतन, साक्षी व कर्तृत्वशून्य आहे. प्रत्येकाचा जीवात्मा स्वतंत्र असल्यानें सांख्य अनेक पुरुष मानतात. सत्त्व, रजस् व तमस् या तीन गुणांची प्रकृति बनलेली आहे. या त्रिगुणांच्या साम्यावस्थेंत सृष्टि नसते. पण पुरुषाच्या दृष्टीनें प्रकृतीची साम्यावस्था ढळते व परिणतीस सुरुवात होते. या निर्मितींत महत् अथवा बुद्धि हें पहिलें तत्त्व; नंतर 'अहंकार' व त्यापासून पांच ज्ञानेंद्रियें, पांच कर्मेंद्रियें व अकरावें मन व पांच तन्मात्रें यांची उत्पत्ति होते. तन्मात्रापासून पंचमहाभूतें उत्पन्न होतात. याप्रमाणें प्रकृतीपासून जगताची उत्पत्ति सांख्यांनीं वर्णिली आहे. अज्ञानामुळें पुरुष प्रकृतीच्या या खेळाशीं तादात्म्य पावतो व संसारबंधनांत अडकतो. प्रकृतीपासून आपण भिन्न आहोंत असें जीवाला ज्ञान झालें कीं जीव मुक्तच आहे. हें भिन्नतेचें ज्ञान होण्यासाठीं व बुद्धि स्थिर करण्यासाठीं योगमार्गाचा अवलंब

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणें आवश्यक आहे. अशा रीतीनें योगशास्त्र हें सांख्यशास्त्राचें अंग आहे. सांख्यदर्शनांत ईश्वराला अस्तित्व नसल्यानें तें मत मागें पडलें. पौराणिक तत्त्वज्ञानावर सांख्यमताची दाट छाया आहे. ईश्वरकृष्णाची सांख्यकारिका (इ. स. १५०) हा सांख्यदर्शनाचा प्रमाणग्रंथ आहे.

पतञ्जलीचें योगशास्त्र :

योगशास्त्राची गणना खरें पाहिलें असतां तत्त्वज्ञानांत होत नाहीं. शरीरशास्त्र हा योगाचा आधार. यमनियम, आसन, प्राणायाम इत्यादींमुळें प्राणवायूचें नियंत्रण करून चित्तवृत्तीचा निरोध करणें म्हणजे योग होय. ध्यान, धारणा, प्रत्यवहार व समाधि हे योगामुळें साध्य होतात, व समाधीमुळें आत्मसाक्षात्कार होतो. मोक्षप्राप्तीसाठीं योगसाधनेची आवश्यकता अनेक इतर दर्शनेंही सांगतात. योगदर्शन ईश्वराचें अस्तित्व मानतें म्हणून त्यास सेश्वर सांख्य म्हणतात. पतञ्जलीचीं योगसूत्रें हा योगशास्त्राचा प्रमाणग्रंथ आहे.

गौतमाचें न्यायशास्त्र:

तत्त्वज्ञानामुळें मोक्षप्राप्ति होते असें न्यायशास्त्र प्रतिपादन करतें. तें तत्त्वज्ञान म्हणजे काय हें तर्कशुद्ध रीतीनें गौतमानें विवेचिलें आहे. प्रमाणपद्धतीचा विचार या शास्त्रांत प्रामुख्यानें केला आहे. गौतमाचीं न्यायसूत्रें (खि. पू. दुसरें शतक) हीं या शास्त्राचीं प्रमाणसूत्रें आहेत. ईश्वराचें अस्तित्व, अनेक जीवात्मे, व अणूपासून सृष्टीची उत्पत्ति इ. गोष्टी गौतमानें प्रतिपादिल्या आहेत. तर्कशुद्ध, विवेचक व शास्त्रीय प्रमाणपद्धतीमुळें इतर दर्शनेंही न्यायशास्त्र ज्ञानाच्या क्षेत्रांत प्रमाण मानतात.

कणादाचें वैशेषिक दर्शन :

कण-वादाचा (अणुवाद) पुरस्कार केला म्हणून याला कणाद, कणभक्ष इ. निंदाव्यंजक नांवें पडलीं. वैशेषिक सूत्रें इ. स. च्या दुसऱ्या शतकांत रचलीं गेलीं असावींत. हें दर्शन भौतिकवादी आहे. भौतिक विश्वाची द्रव्य–गुण–कर्म–सामान्य–विशेष व समवाय अशी सहा पदार्थांत विभागणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून त्यांच्या यथार्थज्ञानानें मोक्षप्राप्ति होते असें हें दर्शन सांगतें. पंचमहाभूतांचे सूक्ष्म अणू असून त्यांच्या संघांत-विघातामुळें सृष्टीची उत्पत्ति व विलय होतो. 'विशेष' हा स्वतंत्र पदार्थ मानल्यावरून यास वैशेषिक दर्शन असें नांव पडलें.

जैमिनीचें पूर्वमीमांसादर्शन :

वेदांचा कर्मविधिपर अर्थ लावण्यासाठीं हें शास्त्र निर्माण झालें. वेदांचें अपौरुषेयत्व व शब्दप्रामाण्य हे दोन महासिद्धांत जैमिनीनें प्रस्थापित केले आहेत. विस्कळित वैदिक वचनांचा सुसंगत अर्थ लावण्याचें त्यानें एक शास्त्रच तयार केलें. तात्त्विक विचारांकडे त्यानें लक्ष दिलेलें नाहीं. कोणत्याही ग्रंथाचा अर्थ कसा लावावा याचें एक शास्त्रच बनविल्यामुळें तें इतर सर्व शास्त्रें प्रमाण मानतात. विशेषतः स्मृतिग्रंथांची एकवाक्यता करण्यास मीमांसेचा फार उपयोग होतो. जैमिनि खि. पू. तिसऱ्या अगर चौथ्या शतकांत होऊन गेला.

बादरायणाचें वेदांतदर्शन :

उपनिषदांमधून एक सुसंगत तत्त्वज्ञान बादरायणानें निर्माण केलें. त्याचीं वेदान्तसूत्रें अथवा ब्रह्मसूत्रें खि.पू. पहिल्या शतकांत लिहिलीं गेलीं असावींत. जीव, जगत् व परमात्मा यासंबंधींच्या उपनिषदांतील परस्परविरोधी वचनांचा यानें मेळ घालून दिला. हें शास्त्र जीवसृष्टीची मीमांसा प्रामुख्यानें करतें. जीवात्मा व परमात्मा हे एकच आहेत. 'अहं ब्रह्मास्मि' असा आत्मसाक्षात्कार झाला म्हणजे बद्ध जीव मुक्त होऊन ब्रह्मांत विलीन होतो. या वृत्तींत जगाला स्थान राहात नाहीं. जगत् हें या दृष्टीनें मायानिर्मित असून ऐक्यज्ञानानंतर ही माया नष्ट होते. हें दर्शन ईश्वराचें अस्तित्व मान्य करतें.

जीवशिवाच्या परस्परसंबंधांत पुढें मतभेद निर्माण होऊन द्वैत, अद्वैत, द्वैताद्वैत, विशिष्टाद्वैत व शुद्धाद्वैत असे वेदांती संप्रदाय निर्माण झाले. या सर्वांचा आधार म्हणजे प्रस्थानत्रयी (उपनिषदें, गीता व ब्रह्मसूत्रें) होत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या षड्दर्शनांच्या संगमांतून भगवद्गीतेचें सुंदर तत्त्वज्ञान तयार झालें. पुराणांनीं हीं दर्शनें सामान्य जनांपर्यंत पोहोंचविण्याचें काम केलें आहे. पूर्वपरंपरा संकलित करणारीं कांहीं पुराणेंहीं याच कालांत लिहिलीं गेलीं आहेत.

हिंदूंच्या प्रमाणें या कालांत बौद्धांचेंहि बरेंच वाङ्मय निर्माण झालें. बौद्धांच्या हीनयान पंथाचें धर्मवाङ्मय ख्रि.पू. तिसऱ्या शतकांतच पूर्ण झालें होतें. यानंतर 'मिलिंदपन्ह' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. मिनँडर व नागसेन यांच्यांतील प्रश्नोत्तरांवर आधारलेला हा ग्रंथ आहे. यापुढील काळांत महायानपंथानें संस्कृत भाषा ग्रंथांचें माध्यम म्हणून स्वीकारली. 'सद्धर्मपुंडरीक' हा महायान तत्त्वज्ञानाचा प्रमुख ग्रंथ या काळांत निर्माण झाला. यांत बुद्ध हा परमेश्वर आहे असें प्रतिपादन केलें आहे.

अश्वघोष :

हा इ. स.च्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत होऊन गेला. मूळचा ब्राह्मण असून यानें बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. हा महायान पंथाचा प्रवक्ता होता. महाकाव्य, रसात्मक काव्य व नाट्यकाव्य यांचा उत्पादक म्हणून हा प्रसिद्ध आहे. साकेत हें याचें जन्मस्थान असावें. आपल्या विद्वत्तेनें त्यानें त्या काळच्या विद्वानांना भारून टाकलें होतें. बुद्धचरित व सौंदरनंद हीं महाकाव्यें यानें लिहिलीं. बुद्धशिष्य सारिपुत्त व मौद्गलायन यांच्या धर्मप्रवेशाबद्दलच्या कंड्यांवर सडेतोड टीका करणारें 'सारिपुत्रप्रकरण' या नांवाचें याचें नाटक प्रसिद्ध आहे. हा कनिष्काच्या पदरीं असावा. तेथें यानें 'सूत्रालंकार' हा ग्रंथ लिहिला. 'वज्रसूचि' हा जातिपद्धतीचे वाभाडे काढणारा व दुसरा 'शतपंचाशतिक' हे ग्रंथ त्यानें येथेंच लिहिले. 'महायानश्रद्धोत्पाद' हा ग्रंथ व वेश्याजीवनावर दोन नाटकें यानें लिहिलीं. या सर्व वाङ्मयसंभारावरून त्याची मिल्टन, गटे, कान्ट, व्होल्टेअर यांच्याशीं तुलना केली जाते.

नागार्जुन :

इ. स. च्या दुसऱ्या शतकांत हा झाला. बौद्धधर्मप्रसारक, ग्रंथकार व भारतीय रसायनशास्त्रांतील एक मोठा संशोधक म्हणून हा प्रसिद्ध आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हा मूळचा ब्राह्मण होता, परंतु रसविद्येकरितां तो बौद्ध झाला. याच्या महायानपंथांत भक्तियोग आढळतो. त्यानें चारी वेद व सर्व शास्त्रांचें अध्ययन केलें होतें. तो मोठा मांत्रिक होता. यानें महायानपंथाचा प्रसार दक्षिणेंत केला. त्यानें प्रज्ञापारमिता, माध्यमिकसूत्रें, ' अकुतोभया ' नांवाची टीका इत्यादि ग्रंथ लिहिले. याच्या ' शून्यवादावरील विवेचनामुळें ब्रॅड्लेच्या ' आभास व सत्य (Appearance and Reality) ' या तत्त्वज्ञानाची आठवण होते.

याशिवाय आर्यशूराची ' जातककथामाला ', आर्यदेवाची ' चतुःशतिका ' असंगाचा ' महायानसूत्रालंकार ' इ. ग्रंथ याच काळांत लिहिले गेले. इ. स. च्या दुसऱ्या शतकांत ' अवदानशतक ' हा ग्रंथ लिहिला गेला.

प्राकृत ग्रंथ :

या कालांत हालाची ' गाथासप्तशती ' व गुणाढ्याची ' बृहत्कथा ' हे दोन प्राकृत ग्रंथ तयार झाले. हाल व सप्तशती यासंबंधींची माहिती पूर्वीं येऊन गेली आहे. बृहत्कथा हा ग्रंथ पैशाची भाषेंत लिहिला आहे. गुणाढ्य हा सातवाहनांचा प्रधान होता अशी आख्यायिका आहे. बृहत्कथेवरून सोमदेवानें कथासरित्सागर व क्षेमेंद्रानें बृहत्कथामंजरी लिहिली.

शंगम् वाङ्मय :

प्राचीन तामीळ वाङ्मय शंगम् वाङ्मय म्हणून प्रसिद्ध आहे. शंगम् या विद्वत्सभा असून प्रसिद्ध फ्रेंच अकादामीच्या धर्तीवर त्यांचें कामकाज चालत असे. पांड्य राज्यामध्यें अशा तीन शंगम् असल्याचा दाखला मिळतो. हा काळ ' शंगम् काल ' म्हणून तामीळ इतिहासांत प्रसिद्ध असून तामीळ वाङ्मयाचें सुवर्णयुग मानला जातो. विविध, विपुल व चिरंजीवी ग्रंथरचना या काळांत झाली. शास्त्रें व कला यांना उत्तेजन मिळून व तामीळ देशाचा व्यापार वाढून देशांत सुबत्ता व समृद्धि खेळत होती.

पहिली शंगम् जुन्या मदुरेला पांड्य राजांच्या आश्रयाखालीं भरली होती. तिनें ४४९९ लेखकांच्या ग्रंथांचें परीक्षण करून त्यांना पुरस्कार दिला. दुसरी शंगम् कवाटपुरम् येथें होती. या सभेनें ३७०० कवींना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरस्कार दिला. तोल्काप्पिअर यानें लिहिलेला तामीळ भाषेचा मूर्धन्य व्याकरणग्रंथ तोल्काप्पियम् यास याच शंगम्‌नें मान्यता दिली. तोल्काप्पियर यास तामीळ भाषेचा पाणिनि समजतात. तिसरी शंगम् उत्तर मदुरा येथें पांड्य राजांच्या आश्रयाखालीं भरली होती. नक्कीरर हा त्याचा अध्यक्ष होता. त्याला तामीळ भाषेचा जॉन्सन म्हणून संबोधतात. तिरुवल्लुवराचें कुरळ हें एक सर्वोत्कृष्ट महाकाव्य आहे. दोन हजार वर्षांपूर्वीच्या तामीळ संस्कृतीचें चित्र त्यांत पाहावयास मिळतें. सिलप्पीडकारम् व मणिमेखलाइ हीं आणखी दोन प्रसिद्ध प्रेमकाव्यें आहेत. सिलप्पडिकारम्‌मध्यें दुर्दैवी कोवलन् व त्याची पतिनिष्ठ पत्नी कन्नकी यांची हृदयस्पर्शी कथा वर्णिली आहे. आपल्या सुंदर व विशुद्ध पत्नीला सोडून कोवलन् माधवी नांवाच्या वेश्येच्या नादीं लागला. पण दौलत गमावून बसल्यावर पश्चातापदग्ध होऊन तो आपल्या प्रेमळ पत्नीसह मदुरेस गेला. तेथील पांड्य राजानें चुकून कोवलन्‌च्या शिरच्छेदाचा हुकूम फर्माविला. त्याच्या वधामुळें दुःखी झालेल्या साध्वी कन्नकीनें हृदय पिळवटून काढणारा शोक केला. शेवटीं तिनें राजाला शाप देऊन मदुरेचा नाश केला. स्वर्गामध्यें प्रेमिकांची भेट झाली. कन्नकी ही तामीळ राष्ट्राची पातिव्रत्यदेवता बनली आहे.

याखेरीज अनेक काव्यें या काळांत रचलीं गेलीं. त्या सर्वांतून तत्कालीन तामीळ जीवनाचें उत्तम चित्रण आढळतें. तामीळ देशावर त्या काळांतही आर्यसंस्कृतीचा किती खोलवर ठसा उमटला होता हें त्यावरून स्पष्ट होतें. तामीळ वाङ्मयांतील राजकीय, सामाजिक व धार्मिक आदर्श संस्कृत वाङ्मयांतूनच घेतलेले आहेत.

मौर्यकालाशीं तुलना केली असतां या काळांत वाङ्मयाच्या बाबतींत उल्लेखनीय प्रगति झाली असेंच म्हणावें लागेल. धार्मिक वाङ्मयाचा या कालांत खूपच विस्तार झाला. तत्त्वज्ञानात्मक वाङ्मयाला व्यवस्थित स्वरूप दिलें गेलें. धर्मसूत्रें, धर्मशास्त्रें म्हणजे हिंदु कायदा व रूढी यांचा पायाच होय. रामायण–महाभारतांचा तर भारतावर चिरस्थायी परिणाम झाला आहे. भासाचीं नाटकें व अश्वघोषाचें काव्य पुढील काळांतील ग्रंथकारांना आदर्श झालीं आहेत. शास्त्रीय वाङ्मय या काळांत जेवढें झालें तितकें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संस्कृतांत आजतागायत झालें नाहीं. वैद्यकशास्त्रावरचे प्रमाणभूत ग्रंथ याच काळांत लिहिले गेले. सारांश, या काळांत वाङ्मयाचें 'एव्हरेस्ट' गांठलें गेलें होतें.

धार्मिक गुहाशिल्प :

भारतीय कला ही सर्वसामान्यपणें धर्माची परिचारिका आहे असें म्हटलें जातें; आणि शिल्पकलादि कलांच्या बाबतींत हें अगदीं तंतोतंत खरें आहे. त्यामुळें शहरें वगैरेपेक्षां ह्या शिल्पाकडे टिकाऊपणाच्या दृष्टीनें विशेष काळजी घेतलेली दिसते. अक्षय, चिरायु, भव्य व सुंदर स्मारक स्तंभ उभारण्याचा संकल्प सम्राट् अशोकानें केला होता. बुद्धदेवाच्या उपासने-करितां बहुसंख्य स्तूप त्याच्या कारकीर्दींत निर्माण झाले. अशा स्तूपांपैकीं भारहूत व सांची येथील उघड्या मैदानांत उभारलेले स्तूप (खि. पू. १५०) आजही पाहावयास मिळतात. हे स्तूप अर्धपिंडाकृति आहेत. अर्ध-पिंडाकृति गोल रचनापद्धति (Half-round Dome) भारतीय वास्तु-शिल्पांत अशोकाच्या कालांत प्रथमच गोंवली गेली. अशा स्तूपांभोंवतीं संरक्षणार्थ दगडी सुंदर कठडा व प्रवेशाकरितां चार मुख्य दिशांस चित्रांकित व भव्य द्वारें अथवा तोरणें उभारीत. स्तूप हें बुद्धदेवाचें चिन्ह किंवा प्रतीक असे. यांत बुद्धाचा किंवा शिष्याचा एखादा अवशेष ठेवलेला असे. या स्तूपाशीं संबंध असलेले विटांनीं बांधलेलें एक चैत्य (उपासनेसाठीं सभागृह) जवळच असे. सह्याद्रीच्या पोटांत कोरलेलीं विशाल व सोज्ज्वल चैत्यें सातवाहनकालांतील आहेत. या कालांत कलाकौशल्याचे ओघ उत्तरे-कडून वाहात आले. अशोकाच्या मृत्यूनंतर पाऊणशें वर्षांनीं पश्चिम सह्याद्रीच्या श्रेणींत लेणीं पोखरण्याची प्रथा पुन्हा जोरावली. मौर्यांचे स्तूप उघड्या मैदानांत तर सातवाहनांचे स्तूप व चैत्य सह्याद्रीच्या काळवथर (Trap) या एकजीवि कातळांत पोखरण्यांत आले. हे स्तूप मौर्यकालीन स्तूपांपेक्षां लहान झाले व चैत्य विशाल झाले. मौर्यकालीं स्तूपाभोंवतीं कठडा असे. आतां कठडा अलंकारिक बनला होता. कार्लें येथील चैत्य (खि. पू. १ लें शतकाअखेर) सर्वांत मोठा व जुन्नर, नाशिक, अजिंठा, येथील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व ओरिसांतील जैनांचे चैत्य हेहीं याच काळांत बांधले गेले. सोपाऱ्यानजीक व अमरावतीच्या मैदानांतील स्तूप, तसेंच जगय्यपेट्टा व नागार्जुनकोंडा येथील स्तूप हे उत्तरकालीन म्हणजे इ. स. १३० ते २०० या काळांतील आहेत. डोंगरांत पोखरलेल्या लेण्यांत असला म्हणजे त्याला चैत्य म्हणतात. ज्या लेण्यांत स्तूप नाहीं ते विहार (संघाराम) होय. भाजे येथील विहार खि. पू. दुसऱ्या शतकांतील आहे. बोधगया येथील स्तूप खि. पू. पहिल्या शतकाच्या आरंभांतील म्हणजे शुंग-कण्व काळांतील आहेत. जुन्नरचें गणेशलेणें, कोंडाणें, पितळखोरें, नाशिक येथील विहारही खि. पू. आहेत. सारांश, गुहाशिल्प या काळांत अशोककालाहून अधिक प्रमाणांत निर्माण झालें. कनिष्काच्या कारकीर्दींत पेशावर येथें बुद्धावशेषांवर बांधलेल्या उंच इमारतींसंबंधीं उल्लेख पूर्वीं आलाच आहे.

दगडावरील उथळ नक्षीकाम (Basreliefs) :

शुंग-कण्वकालांतील भारहूत, बोधगया, सांची, उदयगिरि व खंडगिरीचे डोंगर येथील गुहावास्तूंच्या कठड्यावरील उथळ नक्षीकाम हें जातककथांवर आधारलेलें शिल्प आहे. यांतही बुद्ध हा प्रतीकात्मक असतो—त्याची मूर्ति दिसत नाहीं. हें शिल्प म्हणजे बुद्धजीवनावर आधारलेला एक चित्रपट किंवा नकाशाच असतो. क्षत्रप राजे गादीवर येईपर्यंत या कलेची भरभराट होती. नंतर कुशान राजांच्या कारकीर्दीपर्यंत कला अवनत झालेली दिसते. एका सरळ वाहत्या ओघांत जीवित चित्रित करणें हें शुंगकलेचें एक वैशिष्ट्य आहे. वेगवेगळ्या पवित्र्यांत व प्रवृत्तींत मानवाकृति दाखविण्याचें कौशल्य अप्रतिम आहे. बोधगयेंतील शिल्पांत मानवाकृतीला चैतन्य आल्यासारखें वाटतें. सांची स्तूपांवर पशुपक्षी, वनस्पति इत्यादि शिल्पाची भर पडलेली दिसते. भारतीय शिल्पकाराचें खरें अंतर्मन भारहूत व सांची येथील स्तूपांत आढळतें. यक्षयक्षिणी, चवरी ढाळणारी स्त्री, द्वारपाल व गौतमबुद्ध यांचे मनुष्याकृति पुतळे खि. पू. ५० ते खिस्तोत्तर ५० या कालांतील आहेत. मथुरेंतील यक्षिणींचे पुतळे इ. स. च्या दुसऱ्या शतकांतील आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गांधारदेशीय शिल्पकला (खि. पू. ५० ते इ. स. ५००) :

प्रत्यक्ष मिळालेल्या शिल्पवस्तूवरून गांधारदेश व पंजाब हीं भारतीय कलेचीं भरभराटीस आलेलीं केंद्रेंच होतीं असें म्हणतां येईल. भौगोलिक दृष्ट्या हा प्रदेश परकीयांची संगत घडावी व छाप पडावी अशाच ठिकाणीं वसलेला होता. ग्रीक, इराणी, रोमन, शक व कुशान इत्यादि परकीय या प्रदेशांशीं संबद्ध होते; परंतु आश्चर्य असें कीं, ही ग्रीक-बौद्ध कला ग्रीकांच्या नंतरच दृग्गोचर होऊं लागली. या कलेचे आश्रयदाते हे मध्य आशियांतील शक व कुशान हे होते. यांनींच आपल्या ग्रीक पूर्वसूरींची संस्कृति व परंपरा स्वतःबरोबर आणून तिचा प्रतिपाळ व प्रचार येथें केला. पेशावर हें या कलेचें प्रमुख केंद्र होतें. बुद्धाच्या सूर्तींमध्यें राजपुत्र बुद्ध, अस्थिपंजर बुद्ध, ज्ञानी बुद्ध इत्यादि प्रकार आढळतात. नक्षीकामांत बुद्धाच्या संन्यासकथा, मोहकथा, जन्मकथा खोदल्या गेल्या आहेत. पण या सर्व शिल्पाच्या वस्तूमध्यें यांत्रिकता दिसते, त्या जिवंत वाटत नाहींत हा ग्रीक कलेचा मोठा दोष होता. हा दोष पुढें शक-कुशानांनीं व भारतीयांनीं काढून टाकलेला दिसतो. कुशान कालांत (इ. स. ५० ते २००) वस्त्रांवरील घड्या इत्यादि बाबतींत शिल्पकलेंत बारकावा आला, पण आकृति ठेंगण्या, खुजट, ओबडधोबड, रांगड्या झाल्या. तिसऱ्या शतकाच्या अखेरीस गांधार कलेला उजळा मिळाला. वास्तवता, भावसूचकता, मनुष्याकृतींचें वैशिष्ट्य हीं या काळच्या शिल्पांत दिसूं लागलीं. बौद्धांनीं या प्रगत कलेला उचलून धरलें. मध्य आशिया व चीन येथें हीच कला बौद्धांनीं नेली. गंगा-यमुना खोऱ्यांतील कलेचें थोडें सत्त्व याच वेळीं या गांधार-कलेंत मिसळलें गेलें. गांधारकला म्हणजे शक-कुशानांनीं, इराणी लोकांनीं आपापल्या रुचीप्रमाणें बदल करून, भारतीय पार्श्वभूमीवर व भारतीय विषयांना साजेल अशा स्वरूपांत ग्रीक कलेचा पूर्वेकडील प्रवेश. भारतीय दृष्टिकोणांतून पाहिल्यास गांधारकलेमुळें भारतीयांना स्वतःचें जीवित, धर्म, मूर्तिकला परकीयांपासून निवडून घेतलेल्या पोशाखांत कशीं दिसतात हें पाहाण्याची संधि मिळाली असें म्हणतां येईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मथुरादेशीय शिल्प (इ. स. १५० ते ३००) :

मथुराशिल्पाच्या वैशिष्ट्याची खूण म्हणजे त्यांत वापरलेला शिक्री येथील तांबडा दगड. गांधारदेशीय बुद्धमूर्तींत या कलेनें सुधारणा केली. कांहीं शिल्पांत रोमन छाप आढळते. स्तंभावरील उथळ नक्षीकाम, यक्षिणी, अर्धनग्न अप्सरा, नट्टापट्टा करणारी स्त्री यांतील कला एतद्देशीय आहे. स्त्रियांच्या आकृतींतील स्वाभाविक हावभाव, भावनासूचकता, उठावदार उरोज व नितंब, हाताचा व मानेचा तिरकसपणा यांमुळें या शिल्पांत जिवंतपणा वाटतो. पुरुषांचे पुतळेही खऱ्या हाडामांसाचे वाटतात.

वेंगी, (नागार्जुन कोंडा इ. ठिकाणचें शिल्प) (खि. पू. १५० ते इ. स. ४००):

कृष्णा-गोदावरी जिल्ह्यांतील शिल्पकलेचे प्राचीन नमुने,—विशेषतः जगय्यपेटा, नागार्जुनकोंडा, अमरावती येथें आढळणारे—यांना 'वेंगी' असें म्हणत. यांतील आकृति भारहूत व सांचीसारख्याच आहेत; पण भावसूचकता अधिक आहे. मानवाकृति अधिक उंच व कृश व अवयव लांबट आहेत. वेंगीकलेचे शिल्पकार संगमरवरी दगडाला प्राधान्य देत असत असें दिसतें.

गुंटूरजवळील अमरावतीच्या शिल्पांत बारकावे अधिक आहेत. येथील स्तूप, कठडा व त्यावरील शिल्प (इ. स. १५०–२५०) यांत बुद्धजीवितावरील कथा खोदल्या आहेत. येथेंही बुद्धाची मूर्ति नाहीं, प्रतीक आहे. भारतीय कलावेलीवरील हें एक सुकुमार पुष्प आहे असें या शिल्पाचें वर्णन केलें जातें. वेंगीकला ही भारतीय परंपरानिदर्शक आहे. भारहूत, सांची येथील शिल्प व गुप्त आणि पल्लवकालीन शिल्प यांतील दुवा म्हणजे वेंगी कला. या शिल्पांत धार्मिकता, संन्यस्त वृत्ति, कडक नीतिनियम यांचें चित्रण मुळींच नाहीं. ही कला स्वाभाविकतेंत व शृंगारांत निर्भय असून जीवनांतील आनंद तिच्यांत ओसंडतांना दिसतो. मानवाकृतीला येथें प्राधान्य दिसतें. त्यांच्या हालचालींत विलक्षण लवचिकपणा वाटतो. मथुराशिल्पापेक्षां या शिल्पांतील आकृति उठावदार व हुबेहूब वाटतात. अवयवांचा रेखीवपणा व प्रमाणबद्धता या कलेंत विशेष दिसते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चित्रकला :

भारतीयांना चित्रकला फार पुरातन कालापासून अवगत आहे. वेदोपनिषदापासून कालिदास-भवभूतींच्या वाङ्मयापर्यंत चित्रकलेचे उल्लेख आढळतात. मैत्र्युपनिषद् व गाथासप्तशती यांत भित्तिचित्रांचा उल्लेख आहे. वात्स्यायनाच्या कामसूत्रांत चित्रकलेच्या सहा अंगांचा उल्लेख आहे. अजिंठ्याच्या लेण्यांतील भित्तिचित्रें बऱ्याच सुस्थितींत आहेत. बुद्धाच्या जीवनांतील व पूर्वजन्मांतील आणि जातक लोककथांतील प्रसंग हे या चित्रांचे मुख्य विषय होत.

माती, शेण, ताग व तूस यांच्या वस्त्रगाळ मिश्रणाचा पातळ गुळगुळीत गिलावा लेण्याच्या ताशीव भिंतीवर चढवावयाचा आणि त्यावर शिंपल्यापासून तयार केलेल्या चुन्याचा, अंड्याच्या टरफलाएवढ्या जाडीचा चकचकीत थर चढवावयाचा आणि तो ओलसर आहे तोंवर त्यावर रसचित्रें काढावयाचीं अशी या भारतीय चित्रकारांची पद्धति होती. चित्रांत फक्त सहा रंगांचा उपयोग केला आहे. दीड हजारांहून अधिक वर्षें लोटलीं तरी चित्रांची लकाकी अजून ताजीतवानी आहे. बाह्यरेषा, शरीरसौष्ठव, यथार्थदर्शन, भावदर्शन, रंगसंगति, आणि संधान (composition) या बाबतींत हीं चित्रें अप्रतिम आहेत. येथें हजारों व्यक्तींचीं चित्रें रंगविलीं आहेत; पण आकृति, आसन व वर्ण यांत तोचतोचपणा आढळत नाहीं. जीवसृष्टींतील व्यक्तिमात्राच्या ठेवणींत असतो तसाच फरक येथील व्यक्तीव्यक्तींत दिसतो. चित्रें सजीव वाटतात. छदन्त जातकांतील 'हत्तींचे सुळे व राणीचें वैराग्य' हें भित्तिचित्र विशेष नांवाजण्यासारखें आहे. क्र. १७ या लेण्यांतील 'राजकन्येचें प्रसाधन' हेंही एक उत्कृष्ट चित्र आहे.

अजिंठ्याच्या एकेका लेण्याचें बारकाईनें निरीक्षण करणारास पंधरापंधरा दिवसही पुरणार नाहींत. संख्या एवढीच या चित्रांची प्रशस्ति नाहीं. गुणांच्याही मानानें यांचा दर्जा उच्च आहे. कोठेंही न्यून राहाणार नाहीं अशा आकृति व विसंगति वाटणार नाहीं अशी पार्श्वभूमि व रंगसंगति हीं अपूर्व आहेत. या चित्रकारांची सूक्ष्म निरीक्षणशक्ति व कुंचल्याचें कौशल्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यांची मुक्तकंठ प्रशंसा जागतिक कीर्तीच्या कलाकारांनीं केली आहे. श्री. ग्रिफिथ्स म्हणतात कीं, समकालीन चित्रांशीं तुलना केलीं असतां तीं जगांतील उत्कृष्ट चित्रांच्या तोडीचीं ठरतील. श्री. लॉरेन्स बिन्यन म्हणतात कीं, आशियामधील प्राचीन कलेचा उद्भव अजिंठ्याच्या चित्रांतूनच झाला आहे.

'टेराकोटा' आकृति— खि. पू. २०० ते इ. स. १००:

या शुंग-कण्वकालांत तयार झालेल्या पाषाणाकृतींत बऱ्याच स्त्री प्रतिकृति आहेत. सालंकृत, कृश, भव्य चेहेऱ्याच्या ऊर्ध्वार्धाकृति (Busts), फडफडणारे पदर, अलंकृत केशपाश हीं या टेराकोटा आकृतींचीं वैशिष्ट्यें आहेत. बक्सर, पाटलिपुत्र व मथुरा येथील आकृति याच कालांत तयार झाल्या आहेत. यावर ग्रीकांची छाप दिसते. मथुरा येथील पुरुषाकृतीवर शककुशान कालांतील कलेचा परिणाम दिसतो.

विविध भांडीं :— पंजाब, गंगायमुना खोरें व व मथुरा येथें कुशान काळांतील भांडीं सांपडलीं आहेत. त्यांवर त्रिरत्न, स्वस्तिक इ. नक्षीकाम आढळतें. दक्षिण हिंदुस्थानांत सांपडलेल्या भांड्यांत कृष्णा जिल्ह्यांतील भांड्यांवरून लोहयुग ते सातवाहन काल यांमधील विविध प्रकार दिसतात. रंगीत पात्रें विशेषतः हैद्राबाद, म्हैसूर, बेल्लारी, अनंतपूर येथें सांपडलीं असून तीं खि पू. ३००–१०० या काळांतील असावींत. नेवासें, कऱ्हाड, ब्रह्मपुरी (कोल्हापूर) येथील उत्खननांतही या काळांतील भांड्यांचे अवशेष सांपडले असावेत

त्या काळची जडावाच्या दागिन्यांची कला ही तक्षशिला व पाटलीपुत्र येथें सांपडलेल्या सोनेंचांदीच्या दागिन्यांवरून अनुमानितां येतें. तसेंच, खि.पू. दुसरें शतक ते इ. स. तिसरें शतक यांतील पाषाणावरील शिल्पकला, आकृति व हस्तिदंतावरील शिल्प यांवरूनही या कलेचें आस्तित्व सिद्ध होतें. दिल्लीजवळील इ. स. चौथ्या शतकांतील चंद्रराजाच्या लोहस्तंभावरून तत्कालीन प्रगत धातुकामाची कल्पना येते. हस्तिदंतावरील नक्षीकाम सांची येथील दरवाजावरून अनुभवितां येते. या शिल्पकारांना दंतकार किंवा दंतघातक असें म्हणत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या सर्व कलाविलासाचा विचार करतां असें म्हणतां येईल कीं, या सर्व कलांच्या बाबतींत (गांधार-शिल्प वगळून) थोडी ग्रीक व इराणी छाप दिसते. मात्र मूळ कला भारतीयच होत्या. त्या येथीलच शिल्पकारांच्या हृदयांत व श्रद्धेत उगम पावल्या होत्या. आध्यात्मिक (धार्मिक) कल्पना व अगाढ निसर्गप्रेम हीं भारतीयांचीं वैशिष्ट्यें असल्यामुळें ग्रीक कलेच्या यांत्रिकपणाची तिच्यावर पडलेली छाप टिकूं शकली नाहीं. कारण, ग्रीक व भारतीय प्रवृत्ति व प्रकृति अगदीं भिन्न आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण एकोणिसावें

गुप्त साम्राज्य

राजकीय परिस्थिति :

इ. स. दुसऱ्या शतकाच्या अखेरीस आंध्र व कुशान साम्राज्यें नामशेष झालीं, व देशांत स्वतंत्र राज्यांची संख्या बेसुमार वाढली. या छोट्या राज्यांत चालणाऱ्या सततच्या लढायांनीं देशांतील शांतता पार नष्ट झाली. शक, कुशान, नाग व वाकातक यांच्यामध्यें उत्तर हिंदुस्थानाची चिरफाड झाली होती. प्रबल मध्यवर्ती सत्तेच्या अभावीं सर्वत्र अंदाधुंदी पसरली होती. परकीय आक्रमकांनीं अनेक सामाजिक व धार्मिक प्रश्न निर्माण केले होते. त्यांच्या सोडवणुकीसाठीं भारताला राजकीय स्थिरता व शांतता यांची अत्यंत आवश्यकता होती. या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर गुप्त साम्राज्यानें भारताच्या इतिहासांत अद्वितीय कामगिरी बजाविली. राजकीय स्थिरता, सुबत्ता व शांतता यांचें नवें युग निर्माण केलें; देशाच्या सर्वांगीण प्रगतीचा अवरुद्ध प्रवाह संचलित केला; ज्ञान व विज्ञान, कला व वाङ्मय, व्यापार व उद्योग यांची वाढ केली. एकंदरींत भारताच्या भरभराटीचें सुवर्णयुग निर्माण केलें. गुप्तकालाचा शाश्वत छाप भारतीय संस्कृतीवर उमटला आहे.

पहिला चंद्रगुप्त (इ. स. ३२०–३३०) :

गुप्त घराण्याचा पूर्वेतिहास अद्यापि अज्ञात आहे. गुप्त घराण्याचा संस्थापक महाराज श्रीगुप्त हा इ. स. तिसऱ्या शतकाच्या उत्तरार्धांत पाटलीपुत्राजवळच्या लहानशा प्रदेशाचा अधिराज होता. त्यानें चिनी प्रवाशांसाठीं मगधामध्यें एक विहार बांधून त्याला चोवीस गांवांचें उत्पन्न तोडून दिलें होतें असें इत्सिंग या चिनी प्रवाशानें लिहून ठेविलें आहे. त्याचा पुत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महाराज श्रीघटोत्कच हा कर्तृत्ववान् राजा होऊन गेला. त्याचा पुत्र महाराजाधिराज चंद्रगुप्त. हा गुप्त साम्राज्याचा खरा संस्थापक आहे. त्याचें राज्य साकेत, प्रयाग व मगध एवढ्या विस्तीर्ण भूप्रदेशावर पसरलें होतें. चंद्रगुप्तानें लिच्छवी राजकन्या कुमारदेवी हिच्याशीं लग्न केलें होतें. गुप्तांच्या कांहीं नाण्यांवर चंद्रगुप्त व कुमारदेवी या दोघांचीं नांवें व चित्रें असून दुसऱ्या बाजूस ' लिच्छव्यः ' असा लेख आहे. त्यावरून या विवाहाला गुप्त घराण्यांत फार महत्त्व होतें असें दिसतें. या विवाहानें चंद्रगुप्ताला वैशालीचें राज्य व लिच्छवी जमातीची मदत मिळाली असें वाटतें. राज्यारोहणाच्या निमित्तानें त्यानें इ. स. ३२० फेब्रुवारीमध्यें गुप्तसंवत् सुरू केला. अशा रीतीनें तो शककर्ता झाला. हा गुप्तसंवत् नवव्या शतकापर्यंत भारताच्या कांहीं भागांत वापरला जाई. तसेंच त्यानें ' महाराजाधिराज ' असें अधिसत्तानिदर्शक बिरुद लावण्यास सुरुवात केली. इ. स. ३३० मध्यें तो मरण पावला.

अखंड विजयी समुद्रगुप्त (इ. स. ३३०–३८०) :

चंद्रगुप्तानंतर त्याचा मुलगा समुद्रगुप्त गादीवर आला. अलाहाबाद येथील अशोकाच्या स्तंभावर समुद्रगुप्ताच्या प्रशस्तीचा आलेख सांपडला आहे. त्यावरून त्याच्या दिग्विजयाची व स्वभावाची चांगली माहिती मिळते. बापाचा आवडता मुलगा असल्यानें लहानपणापासूनच त्याचें शिक्षण चांगल्या प्रकारचें झालें. अनेक शास्त्रांत व युद्धकलेंत तो निष्णात झाला. बापाच्या हाताखालीं त्यानें अनेक लढायांत भाग घेतला होता. त्याच्या कर्तबगारीमुळें संतुष्ट होऊन चंद्रगुप्तानें राजदरबारांत आपला वारस म्हणून समुद्रगुप्ताची नेमणूक जाहीर केली होती. या निवडीचें दरबारांतील सभ्यांनीं सहर्ष स्वागत केलें, तर कांहीं नातलगांना विषाद वाटला. या वर्णनावरून गादीवर येतांना समुद्रगुप्ताला आपल्या असंतुष्ट भावांशीं झगडा करावा लागला असावा असा कांहीं विद्वानांचा तर्क आहे. तथापि लवकरच सर्व विरोध नाहींसा करून समुद्रगुप्तानें आपलें आसन बळकट केलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



पृष्ठें : २४१ व २४५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्तर हिंदुस्थानांत यावेळीं अनेक छोटीं राज्यें स्वतंत्रपणें वागत होतीं. त्यांच्या पुंडाईचा मगधालाही उपसर्ग होई. अहिच्छत्राचा अच्युत, मथुरेचा नागसेन व पद्मावतीचा गणपतिनाग या तीन बड्या राजांचा समुद्रगुप्तानें पराभव करून गंगेच्या खोऱ्यांत आपला वचक बसविला. उत्तरेकडे याप्रमाणें आपलें स्थान बळकट केल्यावर त्याच्या विजिगीषु मनानें दक्षिणेवर मोहीम करण्याचें ठरविलें. नर्मदा व गोदावरी यांच्या दरम्यान वाकाटकांचें प्रबळ राज्य होतें. त्यांच्याशीं संघर्ष टाळून त्यानें महाकोसल, ओरिसा यामधून मुसंडी मारून दक्षिणेस कांचीपर्यंत स्वारी केली. या मोहिमेंत त्यानें बारा राजांचा पराभव करून त्यांना गुप्तांची अधिसत्ता मान्य करावयास लावली. कोसलाचा (रायपूर, बिलासपूर, संबळपूर) महेंद्र, महाकान्ताराचा व्याघ्रराज, कोरलाचा मन्तराज, पिष्टपुराचा (पिठापुरम्-गोदावरी जिल्हा) महेंद्रगिरी, कोट्टूरचा स्वामिदत्त, एरंडपल्लाचा दमन, कांचीचा विष्णुगोप, अवमुक्ताचा नीलराज, वेंगीचा हस्तिवर्मन्, पालक्काचा उग्रसेन, देवराष्ट्राचा कुबेर व कुस्थलपुराचा (उत्तर अर्काट जिल्हा) धनंजय हे ते राजे होते. यांतील बऱ्याचशा राज्यांचीं भौगोलिक स्थानें अद्याप निश्चित झालेलीं नाहींत. त्यामुळें तो महाराष्ट्रापर्यंत आला होता कीं पूर्व किनाऱ्यानेंच परत गेला हें सांगतां येत नाहीं. तरीही त्यानें मिळविलेला विजय मोठाच होता व त्यामुळें गुप्तांची सत्ता दक्षिणेस कांचीपर्यंत प्रस्थापित झाली.

समुद्रगुप्त दक्षिणेंत गेला ही संधि साधून आर्यावर्तातील नऊ राजांनीं संगनमत करून गुप्त सत्तेविरुद्ध बंड पुकारलें. अच्युत, नागसेन व गणपतिनाग यांखेरीज या बंडखोरींत रुद्रदेव, मतिल, नागदत्त, चंद्रवर्मन् (पुष्कर किंवा पोखरण), नंदी व बलवर्मन् हे राजेही सामील झाले होते. तेव्हां समुद्रगुप्तानें बंडखोरांविरुद्ध कडक लष्करी मोहीम करून कौशांबीच्या मैदानांत त्यांच्या एकत्र सेनेचा धुव्वा उडविला व त्यांचीं राज्यें खालसा करून गुप्त साम्राज्यास जोडून टाकलीं. त्यामुळें गुप्तांचा दरारा वाढला व सरहद्दीवरील समतत (टिप्पेरा जिल्हा), दवाक (नौगांग जिल्हा), कामरूप (गौहत्ती जिल्हा) नेपाळ व कर्तृपूर (कुमाऊन व रोहिलखंड) या राज्यांनीं व मालव (जयपूर),

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आर्जुनायन (भरतपूर) यौधेय, मद्रक (सियालकोट), आभीर (झांशी), सनकानीक (भिलसा) इ. नऊ गणराज्यांनीं गुप्तांची सत्ता मान्य करून खंडणी दिली. त्याहीपलीकडे सरहद्दीवरील राजांनीं नजराणे पाठवून समुद्रगुप्ताशीं सख्य केलें. कुशान राजे देवपुत्रशाही, शाहानुशाही, शक, मुरुंड, गांधार व वंग या राज्यांखेरीज सिलोनच्या मेघवर्ण राजानें आपल्या वकिलाबरोबर बराचसा नजराणा पाठवून समुद्रगुप्ताशीं स्नेह जोडला व मगधांत बुद्धगया येथें सिंहली यात्रेकरूंसाठीं एक धर्मशाळा व विहार बांधण्याची परवानगी मिळविली.

समुद्रगुप्तानें आपलें साम्राज्य वाढवितांना एक विशिष्ट दृष्टि ठेवल्याचें दिसतें. खंडप्राय भारतांत एकछत्री मध्यवर्ती सत्ता टिकविणें कठीण आहे हें त्यानें ओळखलें. म्हणून फक्त आर्यावर्तांतील राज्यें जिंकून त्यांवर प्रत्यक्ष अंमल सुरू केला. त्यामुळें गंगेच्या खोऱ्याचा विस्कळीतपणा जाऊन मध्यवर्ती सत्ता बलिष्ठ झाली. त्यापलीकडे त्यानें मांडलिक राज्यें निर्माण केलीं, त्यांना अंतर्गत स्वायत्तता देऊन संतुष्ट ठेवलें, व त्याही पलीकडे मित्रराष्ट्रांचें मंडळ तयार केलें. अशा रीतीनें त्यानें साम्राज्याची भक्कम पायावर उभारणी केली.

या दिग्विजयानंतर समुद्रगुप्तानें अश्वमेध यज्ञ करून आपल्या सार्वभौमत्वाची द्वाही फिरविली. तन्निमित्त अश्वमेध घोड्याची प्रतिकृति असलेलीं सोन्याचीं नाणीं पाडलीं. ' चिरोत्सन्न–अश्वमेध–प्रहर्ता ' अशा गौरवपर शब्दांनीं त्याच्या वंशजांच्या आलेखांतून समुद्रगुप्ताचा उल्लेख येतो. यावरून तो वैदिक धर्माचा अभिमानी असून त्या धर्माच्या पुनरुज्जीवनासाठीं त्यानें प्रयत्न केला असावा असें सहजच दिसतें. त्याच्या नाण्यांवर अनेक वैदिक देवतांचीं चित्रें सांपडतात.

समुद्रगुप्ताचें प्रभावी व्यक्तिमत्व शौर्यापुरतें मर्यादित नव्हतें. हरिषेणाच्या प्रशस्तीमध्यें समुद्रगुप्त कुशाग्र बुद्धिमत्तेचा असून अनेक शास्त्रांचा ज्ञाता होता असा उल्लेख आहे. तो उच्च दर्जाचा कवि (कविराज) असून मोठमोठे पंडितही त्याच्या काव्याची स्तुति करीत. ललितकलेचाही त्याला व्यासंग होता. त्याच्या कांहीं नाण्यांवर मांडीवर वीणा घेतलेलें त्याचें चित्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे, यावरून तो कलांचा भोक्ता होता हें खासच; विद्या व विद्वान् यांचा तो त्रहाता होता व अनेक विद्वानांना त्यानें आपल्या दरबारांत आश्रय दिला होता. प्रसिद्ध बौद्धपंडित वसुबंधु हा त्याच्या पदरीं होता. समुद्रगुप्तानें विविध प्रकारचीं व छापाचीं नाणीं पाडलीं आहेत. त्या नाण्यांच्या सुबकतेवरून त्या काळांतील कलेच्या प्रगतीची चांगली कल्पना येते. समुद्रगुप्ताच्या पराक्रमी जीवनामुळें व्हिन्सेंट स्मिथ यानें त्यास ' भारतीय नेपोलियन ' म्हणून गौरविलें आहे. परंतु नेपोलियनपेक्षां चारित्र्य व कर्तबगारी यामध्यें समुद्रगुप्त श्रेष्ठ होता.

वैभवशाली दुसरा चंद्रगुप्त (इ. स. ३८०–४१४):

समुद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर त्याचा ज्येष्ठ मुलगा रामगुप्त गादीवर आला. तो अत्यंत नेभळट व भित्रा होता. माळव्याचा शकराजा रुद्रसिंह यानें उठाव करून रामगुप्तावर स्वारी केली व त्याला कैचींत पकडलें. तेव्हां स्वाभिमानशून्य रामगुप्तानें त्याचें आधिपत्य मान्य केलें, व आपली राणी ध्रुवदेवी त्याच्या जनानखान्यांत पाठविण्याचें कबूल करून स्वतःची सुटका करून घेतली. समुद्रगुप्ताचा दुसरा मुलगा चंद्रगुप्त यास ही वार्ता कळतांच त्यानें ध्रुवदेवीचा व गुप्त साम्राज्याचा मान राखण्यासाठीं साहस करण्याचें ठरविलें. त्यानें स्वतःच ध्रुवदेवीचा वेष करून शकराजाच्या जनानखान्यांत प्रवेश मिळविला व त्याचा वध करून सर्व प्रसंग निभावून नेला. त्यामुळें साहाजिकच चंद्रगुप्त लोकप्रिय झाला. नंतर त्यानें रामगुप्ताचा वध करून गादी बळकावली व ध्रुवदेवीशीं विवाह लाविला. ही आख्यायिका खरी नसावी असा अनेक इतिहासकारांचा दावा आहे

समुद्रगुप्ताला अनेक पुत्रपौत्र होते, व त्यानेंच आपला वारस म्हणून चंद्रगुप्ताची निवड केली होती अशीही माहिती मिळते. चंद्रगुप्ताला बापाकडून विशाल साम्राज्याचा वारसा मिळाला होता व देशांत सर्वत्र शांतता व सुबत्ता नांदत होती. मात्र, पश्चिमेकडे माळवा, गुजराथ व सौराष्ट्र येथें शकांची दृढमूल झालेली सत्ता गुप्त साम्राज्याला सलत होती. त्या सत्तेचें निर्दालन करण्याचा चंद्रगुप्तानें निश्चय केला. हें युद्ध दीर्घकाळ चाललें होतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चंद्रगुप्ताला बरींच वर्षें माळव्यांत उज्जयिनी येथें आपला तळ ठोकून राहावें लागलें. या वेळीं तिसरा रुद्रसिंह हा शकराजा तेथें राज्य करीत होता. वारसाबद्दलचे तंटे, अंतर्गत कलह व सरदारांची स्वतंत्र वृत्ति यांमुळें शक साम्राज्य अगदीं खिळखिळें झालें होतें. त्यामुळें इ. स. पांचव्या शतकाच्या सुरुवातीस रुद्रसिंहाचा पराभव करुन सर्व शक साम्राज्य गुप्त साम्राज्यास जोडून घेण्यांत चंद्रगुप्त यशस्वी ठरला. या विजयामुळें प्रतिस्पर्धी शक-सत्तेचा नाश झाला व उत्तरेकडे गुप्त साम्राज्य निष्कंटक झालें. माळवा, गुजराथ व सौराष्ट्र हे सुपीक प्रांत गुप्त साम्राज्यास जोडले गेले. पश्चिम किनाऱ्यावरील सागरी व्यापार गुप्तांच्या हातांत आला. पश्चिमेकडील रोमन साम्राज्याशीं गुप्तांचा संबंध आला. या विजयामुळें चंद्रगुप्तानें विक्रमादित्य हें बिरुद धारण केलें. उज्जयिनीचा सुप्रसिद्ध शकारि विक्रमादित्य राजाशीं चंद्रगुप्ताचा संबंध जोडला गेला, व दोघेही एकच असावेत अशी नंतरच्या काळांत प्रसिद्धी झाली. कदाचित् चंद्रगुप्ताच्या विजयावरूनच शकारि विक्रमादित्य ही दंतकथेंतील व्यक्ति निर्माण झाली असावी.

चंद्रगुप्तानें अत्यंत धोरणीपणानें तत्कालीन बलाढ्य राजघराण्याशीं वैवाहिक संबंध जोडून आपली सत्ता बळकट केली. मध्यदेशांतील नागराजाची कन्या कुबेरनागा हिच्याशीं त्यानें विवाह केला होता. तिची कन्या प्रभावती गुप्ता ही वाकाटक राजा दुसरा रुद्रसेन यास देऊन वाकाटकांशीं सख्य जोडलें. नाग व वाकाटक यांचें भौगोलिक स्थान व लष्करी सामर्थ्य लक्षांत घेतां शककुशानांवर स्वाऱ्या करण्यापूर्वीं नाग व वाकाटक राजघराण्यांशीं वैवाहिक संबंध जोडून आपली पिछाडी सुरक्षित करण्यांत चंद्रगुप्तानें राजकीय दूरदर्शीपणाच दाखविला. कुंतल देशाचा राजा काकुत्स्थवर्मन् कदंब याच्या कन्येशींही त्यानें विवाह लाविल्याचा उल्लेख आढळतो.

दिल्लीच्या लोहस्तंभावरील आलेखांत उल्लेखिलेला चंद्रराजा दुसरा चंद्रगुप्त असावा असा अनेक विद्वानांचा तर्क आहे. तें खरें मानल्यास, चंद्रगुप्तानें पूर्वेकडे वंग देशावर स्वारी करुन तो देश गुप्त साम्राज्यास जोडला. पश्चिमेकडे त्याच्या विजयी सैन्यानें सिंधुनदीचीं सात मुखें ओलांडून वाल्हीक देश पादाक्रांत केला. भारतीय सम्राटानें बल्ख (बॅक्ट्रिया) प्रांतावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आक्रमण केल्याचें हें एकच ऐतिहासिक उदाहरण होय. त्या प्रदेशांतील कुशानांना चंद्रगुप्तानें आपले मांडलिक बनवले असावें. दुर्दैवानें या स्वारीची अधिक माहिती आपणांस उपलब्ध नाहीं. समुद्रगुप्तानें सुरू केलेलें साम्राज्य-वर्धनाचें कार्य चंद्रगुप्तानें परिपूर्ण केलें. हिंदुकुशपासून आराकानपर्यंत व हिमालयापासून नर्मदेपर्यंत गुप्तांचा एकछत्री अंमल चालत होता. साम्राज्याची उभारणी इतकी भक्कम झाली होती कीं, पुढील पन्नास वर्षांचा काळ अत्यंत शांततेचा गेला. याच काळांत उज्जयिनी ही गुप्त साम्राज्याची पश्चिमेकडील राजधानी ठरली गेली.

चंद्रगुप्त हा वैदिक धर्माचा अभिमानी होता. पश्चिमेकडील विजयानंतर वैदिक पद्धतीनुसार सार्वभौमत्वनिदर्शक अश्वमेध यज्ञ करून त्यानें आपलें यश प्रसिद्ध केलें. सोनें, चांदी व तांबें यांचीं विविध नाणीं त्यानें पाडलीं. त्या नाण्यांवर लक्ष्मी, गरुड, शंख इ. मुद्रा आहेत. तो स्वतःला परमभागवत म्हणवून घेत असे. अन्यधर्मीयांनाही त्यानें उदार आश्रय दिला होता. त्याच्याच कारकीर्दींत प्रसिद्ध चिनी यात्रेकरू फाहेन यानें भारतांत इ. स. ४०० ते ४११ असा दहा वर्षें प्रवास केला. त्यांपैकीं सहा वर्षें तो गुप्त साम्राज्यांत फिरत होता. त्यानें आपलें प्रवासवर्णन लिहून ठेविलें आहे. भारतांतील सर्व गोष्टींकडे त्यानें बौद्धांच्या धार्मिक दृष्टिकोनांतून पाहिलें असल्यानें राजकीय इतिहासाबद्दल त्यावरून फारशी माहिती मिळत नाहीं. मध्यदेशाबद्दल तो लिहितो कीं, लोक सुखी व समृद्ध होते. त्यांवर सरकारी बंधनें फारच कमी असून शिक्षा फार सौम्य असत. ब्राह्मणधर्माची चलती असून बौद्धधर्माला उतरती कळा लागली होती. प्रजेच्या कल्याणासाठीं सरकारी प्रयत्न होत असत. व्यापार व उद्योगधंदे भरभराटींत होते. देशांत आर्थिक सुबत्ता नांदत होती. विद्याकलांना राजाश्रय मिळून भारताच्या सुवर्णयुगाची सुरुवात याच कालांत झाली.

कुशल सेनानी, धोरणी मुत्सद्दी, भारतांतील परकी शकसत्तेचा निर्दालक, प्रजाहितदक्ष, विद्या-कलांचा भोक्ता असा हा वैभवशाली चंद्रगुप्त भारतीय इतिहासांत अमर ठरला. तो इ. स. ४१४ च्या सुमारास वारला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पहिला कुमारगुप्त (इ. स. ४१४–४५५) :

चंद्रगुप्ताच्या मृत्यूनंतर ध्रुवदेवीचा मुलगा कुमारगुप्त गादीवर आला. वडिलार्जित साम्राज्य त्यानें उत्तम प्रकारें संरक्षिलें. या वेळीं गुप्तांची सत्ता कळसास पोहोंचली होती. देशांत सर्वत्र सुबत्ता व शांतता नांदत होती. येथील समृद्धीमुळें बाहेरच्या राज्यांतील श्रेणीही या साम्राज्यांत येऊन स्थायिक होत व भरभराटीस येत अशीं उदाहरणें आहेत. या काळांतील गुप्तांच्या अधिकाऱ्यांचे विविध आलेख उपलब्ध होतात. त्यावरून राज्य-व्यवस्थेची उत्तम कल्पना येते. कुमारगुप्तानें अश्वमेध यज्ञ करून आपल्या नांवाचीं विविध नाणीं पाडलीं. तो स्वतःस महेंद्रादित्य ही पदवी लावीत असे. तो कार्तिकेयाचा उपासक असून त्यांच्या नाण्यांवरही कार्तिकेयाची प्रतिमा आहे.

त्याच्या कारकीर्दीच्या अखेरच्या काळांत नर्मदा विभागांतील पुष्यमित्र टोळ्यांनीं उठाव केला व गुप्तांची सत्ता धोक्यांत आगली. पैसा व सैन्य यांच्या जोरावर त्यांनीं गुप्त सैन्यालाही दाद दिली नाहीं. शेवटीं युवराज स्कंदगुप्त जातीनें मोहिमेवर गेला. निकराच्या प्रयत्नानंतर पुष्यमित्रांचा पुंडावा मोडून काढण्यांत त्यास यश आलें. त्यामुळें गुप्त घराण्याची राज्य-लक्ष्मी स्थिर झाली. स्कंदगुप्त लढाईत गुंतला असतांनाच इ. स. ४५५मध्यें कुमारगुप्त मरण पावला. गुप्तांचें साम्राज्य चाळीस वर्षें अभंग टिकवून धरलें व गुप्तांचें सामर्थ्य व दरारा कायम टिकविला ही कुमारगुप्ताची मोठीच कर्तबगारी आहे.

स्कन्दगुप्त (इ. स. ४५५ ते ४६७) :

कुमारगुप्ताच्या मृत्युसमयीं स्कंदगुप्त हजर नसल्यानें वारसाबद्दल थोडीशी गडबड झाली असावी. पण विजयी स्कंदगुप्त परतल्यानंतर त्यानें राज्याधि-कार हातीं घेतला. गादीवर आल्याबरोबर त्याला नवीन रानटी शत्रूंशीं लढा द्यावा लागला. मध्यआशियांतील हूणांच्या क्रूर भटक्या टोळ्यांनीं वायव्येकडून भारतांत घुसून गुप्त साम्राज्यावरच हल्ले करण्यास सुरुवात केली. स्कंदगुप्तानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हूणांच्या रानटी टोळ्यांचा पूर्ण पराभव करून त्यांना पिटाळून लाविलें. या भीषण व दीर्घकाल चाललेल्या रणकंदनामुळें सरकारी तिजोरीवर खूपच ताण पडला. स्कंदगुप्ताचीं सुवर्णनाणीं फारशीं आढळत नाहींत, व जीं आढळतात तीं एकाच प्रकारचीं आहेत. यावरून या लढायांमुळें सरकारी खजिना रिता झाल्याचें प्रत्ययास येतें. हूणांचा नाश करून स्कंदगुप्त भारताचा थोर त्राता ठरला. त्यानें साम्राज्याचा कारभार दक्षतेनें हांकला व सर्वत्र आपली पकड कायम ठेवली. या विजयामुळें त्यानें स्वतांला विक्रमादित्य हें बिरुद लावलें. गिरनार येथील पर्णदत्ताच्या आलेखावरून असें समजतें कीं, तो तेथें गुप्तांचा गव्हर्नर असतांना इ. स. ४५५ च्या सुमारास सुप्रसिद्ध सुदर्शन तलावाचा बांध फुटून प्रदेश जलमय होण्याची भीति निर्माण झाली असतांना त्यानें तातडतोब तलावाची डागडुजी केली व एक विष्णुमंदिर बांधलें. स्कंदगुप्तानें काशीजवळ भितारी येथें एक विष्णुध्वज स्तंभ उभारून आपला कीर्तिलेख कोरून ठेविला आहे. त्याच्या काळांत गुप्त साम्राज्याची एकता टिकून सर्वत्र सुबत्ता नांदत होती. दुर्दैवानें हा पराक्रमी सम्राट् इ. स. ४६७ मध्यें मरण पावला.

शेवटचे गुप्त राजे :

स्कंदगुप्ताच्या मृत्यूनंतर आलेल्या राजांची विशेषशी माहिती मिळत नाहीं. नाणीं व शिलालेख यांमधून अनेक गुप्त राजांचीं नांवें आढळतात. यावरून राजघराण्यांतच यादवी व फाटाफूट निर्माण झाली असावी अशी शंका येते. इ. स. ४७७ पर्यंतच्या दहा वर्षांत तीन गुप्त राजे होऊन गेले. त्या वर्षीं बुधगुप्त हा गादीवर आला. बंगालपासून माळव्यापर्यंतच्या प्रदेशावर गुप्तांची अधिसत्ता प्रस्थापित करण्यांत त्यानें यश मिळविलें. त्यापलीकडील प्रांत स्वतंत्र होण्याच्या मार्गावर होते. काठेवाड व बुंदेलखंड येथील सरदार गुप्तांची सत्ता नाममात्रच मानीत होते. वाकाटकांनींहि गुप्त प्रदेशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. गुप्त साम्राज्याच्या आणीबाणीच्या काळांत गुप्त सत्ता टिकवून धरण्याचा त्यानें निकरानें प्रयत्न केला. तो इ. स. ५०० च्या सुमारास मरण पावला. त्यानंतर बंगालमध्यें वैन्यगुप्त व बुंदेलखंडांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भानुगुप्त यांनीं स्वतंत्रपणें कारभार चालविला. बुधगुप्ताचा भाऊ नरसिंहगुप्त बालादित्य हा पाटलिपुत्राच्या गादीवर आला. याच्या कारकीर्दींत हूणांनीं भारतांत उच्छाद मांडिला. हूणराजा तोरमाण व त्याचा पुत्र मिहिरगुल यांच्याशीं नरसिंहगुप्ताला मुकाबला करावा लागला. नरसिंहगुप्तानें इतर भारतीय राजांच्या सहकार्यानें मिहिरगुलाचा पराभव करून भारता-वरील हूणांचें संकट टाळलें.नरसिंहगुप्त हा बौद्धधर्माचा अभिमानी असून त्यानें नालंदा येथें एक मोठा संघाराम बांधला व नालंदा विद्यापीठाचा पाया घातला बालादित्याच्या मृत्यूनंतर गुप्त सत्तेस उतरती कळा लागून ती लवकरच संपुष्टांत आली. काठेवाडांत मैत्रक, कनोजला मौखरि व इतर राज्यें अस्तित्वांत येऊन त्यांनीं गुप्त सत्तेचा शेवट केला.

गुप्त सत्तेच्या विनाशाचीं कारणें :

(१) स्कंदगुप्तानंतरचे राजे कर्तृत्वहीन निघाले. त्यांच्या नालायकीमुळें इतरांचें फावलें. पहिल्या गुप्त सम्राटांनीं ज्येष्ठ पुत्र वारसा डावलून आपला वारस निवडण्याची पद्धति सुरू केली होती. कर्तबगार सम्राटांना तें जमलें, पण नंतरच्या काळांत वारसासाठीं राजपुत्रांमध्यें चुरस व यादवी निर्माण झाली. बरेच वेळां राजपुत्र हे सरदारांच्या हातांतील बाहुलीं बनलीं. मध्य-वर्ती सत्तेच्या दुर्बलतेचा फायदा घेऊन सरहद्दीवरच्या अधिकाऱ्यांनीं आपली स्वतंत्र सत्ता पुकारली. (२) मांडलिक राजे व प्रांतीय सुभेदार यांनीं गुप्त सत्तेविरुद्ध बंडें करून आपलें स्वातंत्र्य पुकारल्यावर त्यांचा बंदोबस्त करण्या-इतकें सामर्थ्य व धैर्य गुप्त राजांच्या अंगीं नव्हतें. (३) वंशपरंपरा एकाच घराण्यांत अधिकार ठेवण्याची पद्धति गुप्तांनीं अवलंबिली. त्यामुळें अधिकारी शिरजोर झाले. (४) सेवेबद्दल इनामें देण्याची व लष्करी चाकरीबद्दल वतनें देण्याची पद्धति गुप्तांनीं चालू केली. त्यामुळें प्रबळ सरंजामदार वर्ग निर्माण झाला व तो मूळ सत्तेला डोईजड झाला. (५) परकीय आक्रमणें : पुष्यमित्र व हूण यांच्या स्वाऱ्यांमुळें गुप्त साम्राज्य खिळखिळें झालें. त्यांना थोपवून धरण्यांत स्कंदगुप्ताला जरी यश मिळालें, तरी हूणांचें संकट कायमचें नाहींसें झालें नाहीं. तोरमाण व मिहिरगुल यांनीं गुप्त साम्राज्याचे लचके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोडून गुप्तांची प्रतिष्ठा व दरारा नाहींसा केला. (६) आर्थिक विपन्नता, आपसांतील यादवी व परकीयांशीं युद्धें यांमुळें सरकारी तिजोरीवर ताण पडून सुसज्ज खडें सैन्य ठेवणें गुप्तांना जड झालें. अनेकदां गुप्तांना आपल्या चलनाचें अवमूल्यन करावें लागलें. (७) प्रबळ राजघराण्यांशीं वैवाहिक संबंध जोडून आपलें वर्चस्व कायम राखण्याचें शहाणपणाचें धोरण दुसऱ्या चंद्रगुप्तानंतर पाळलें गेलें नाहीं. उलट, साम्राज्याच्या पडत्या काळांत वाकाटक सत्तेशीं गुप्तांचें वितुष्ट आलें. त्यामुळें संकटकाळीं कोणीही साहाय्यकर्ता गुप्त राजांना राहिला नाहीं.

हूणलोक :

ख्रिस्तपूर्व दुसऱ्या शतकांत चीनच्या पश्चिम सरहद्दीवर टोळ्या करून राहणारी हूण ही एक भटकी व लुटारू जमात होती. शक व युएची लोकांना पश्चिमेकडे रेटीत इ. स. तिसऱ्या शतकांत ते बॅक्ट्रियापर्यंत येऊन पोहोंचले. त्यांच्यापैकीं एक शाखा पश्चिमेकडे युरोपांत घुसली व ॲटिला या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं तिनें रोमन साम्राज्याचा विध्वंस केला. श्वेतहूण नांवाची दुसरी शाखा इराण व भारत इकडे वळली. हिंदुकुश ओलांडून हूण टोळ्या पंजाबांत घुसल्या. तेव्हां स्कंदगुप्तानें इ. स. ४६० च्या सुमारास त्यांचा पराभव करून ही लाट थोपवून धरली. इ. स. ४८४ मध्यें इराणच्या फिरोझ राजाचा वध करून हूणांनीं मध्य आशियांत विशाल साम्राज्य स्थापन केलें. त्यामुळें भारताकडे येण्याचा त्यांचा मार्ग निष्कंटक झाला. इ. स. ४९० च्या सुमारास तोरमाण या सेनापतीच्या नेतृत्वाखालीं हूणांनीं जोरदार मुसंडी मारून माळवा व जबलपूरपर्यंतचा प्रदेश जिंकला. त्यानें महाराजाधिराज ही पदवी धारण करून हूणांचें राज्य भारतांत स्थापन केलें. पश्चिमेकडून मोकाट सुटलेला हूणांचा लोंढा थोपविण्यास गुप्तांची दुर्बल सत्ता असमर्थ ठरली. तोरमाणाचें राज्य उत्तर प्रदेश, राजपुताना, पंजाब, काश्मीर व अफगाणिस्थान या विस्तृत प्रदेशावर पसरलें होतें. इ. स. ५०२ मध्यें तोरमाणानंतर त्याचा मुलगा मिहिरगुल गादीवर आला. शाकल किंवा सियालकोट ही त्याची राजधानी होती. इ. स. ५१०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्या सुमारास माळव्यामध्यें भानुगुप्तानें त्याचा पराभव केला तरीही त्याची सत्ता पंजाबांत कायमच राहिली. तो अत्यंत क्रूर व जुलमी होता. त्याची कारकीर्द जाळपोळ व लुटालूट यांनीं भरलेली आहे. इ. स. ५२० च्या सुमारास चिनी राजानें पाठविलेल्या सोंग युन या वकिलानें मिहिरगुलाची गांधार देशांत भेट घेतली. मिहिरगुलास भारताचा ॲटिला व मानव-जातीचा शाप म्हणून संबोधतात. इ. स. ५३० मध्यें मिहिरगुलानें पुनरपि मध्य देशावर हल्ले करण्यास सुरुवात केली. शेवटीं मगधाचा राजा नरसिंह-गुप्त बालादित्य यानें अनेक मांडलिकांच्या साहाय्यानें इ. स. ५३३ मध्यें मिहिरगुलाचा पराभव केला. कनोजच्या मौखरि राजांनींही हूणांना निकराचा प्रतिकार केला. यानंतर माळव्याच्या यशोधर्मन् या पराक्रमी राजानें मिहिरगुलाचा सणसणीत पराभव करून त्यास आपल्या दरबारांत वांकावयास लाविलें. मिहिरगुल हा शैवपंथी होता व त्यानें बौद्धधर्माच्या अवशेषांचा नाश केला. इ. स. ५४० च्या सुमारास मिहिरगुल मेला. त्यानंतर हूणसत्ता नष्ट झाली.

हूणांच्या अनन्वित जुलमांनीं हूणसत्ता कधींच स्थिरपद होऊं शकली नाहीं. इराणमध्येंही हूणांची सत्ता इ. स. ५१३ च्या सुमारास झुगारून देण्यांत आली. पुढें नौशिरवान या ससानियन राजानें इ. स. ५६५ मध्यें हूणांचा पुरा बीमोड करून मध्य आशियांतील त्यांची सत्ता नष्ट केली; त्यामुळें तिकडून हूणांच्या नवीन टोळ्या भारतामध्यें येण्याचें थांबलें. भारतांतील हूणांनीं भारतीय संस्कृतीचा स्वीकार करून ते भारतीय लोकांत मिसळून नामशेष झाले. हूणांच्या स्वाऱ्यांमुळें गुप्तांची सत्ता खिळखिळी होऊन नाश पावली. वायव्य भारतांतील बौद्धधर्माला जोराचा तडाखा बसला व अनेक स्तूप व विहार यांचा हूणांनीं विध्वंस केला. त्यामुळें भारतांतून बौद्ध धर्माचें जवळजवळ उच्चाटन झालें. त्यांच्या मिश्रणामुळें हिंदुधर्माच्या अभिमानी कडव्या व लढाऊ अशा रजपूत लोकांचा उदय झाला. मुसल-मानांचें भारतावरील आक्रमण थोपवून धरण्यांत या लोकांनीं पुढें महनीय कामगिरी बजाविली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माळव्याचा यशोधर्मन् :

गुप्तांच्या पडत्या काळांत माळव्यांत यशोधर्मन् राजा प्रसिद्धीस आला. त्याचें पूर्ववृत्त कांहींच उपलब्ध नाहीं. मंदसोर येथील दोन आलेखांवरून त्याच्या कर्तृत्वाची माहिती मिळते. ब्रह्मपुत्रेपासून महेंद्र पर्वतापर्यंत व हिमालयापासून पश्चिम समुद्रापर्यंत त्यानें साम्राज्य स्थापन केल्याचा अतिशयोक्तिपूर्ण उल्लेख त्या आलेखांत आहे. हूण राजा मिहिरगुल याचा त्यानें पराभव केला होता. तथापि गुप्तांचें साम्राज्य किंवा हूणांची सत्ता तो नाहींशी करूं शकला नाहीं हें सत्य आहे. त्याचा लष्करी विजय क्षणभंगुर ठरला व त्याच्या मृत्यूनंतर त्याचें राज्य विलयास गेलें. त्याच्या नेत्रदीपक यशामुळें मांडलिक राजांना गुप्त सत्तेविरुद्ध उठाव करण्यास स्फूर्ति मिळाली. गुप्त साम्राज्याचा दरारा नष्ट केल्यानें गुप्त साम्राज्याच्या विनाशास त्यानें हातभार लावला.

वाकाटक घराणें :

दक्षिणेंतील आंध्रसत्तेच्या विनाशानंतर अनेक राजघराणीं ठिकठिकाणीं उदयास आलीं. त्यांत विदर्भाचें वाकाटक घराणें विशेष प्रसिद्धीस आलें. वाकाटक घराण्याचा संस्थापक विंध्यशक्ति नांवाचा ब्राह्मण होता. त्याचा पुत्र पहिला प्रवरसेन यानें अनेक यज्ञ केले व सम्राट् ही पदवी धारण केली. त्याचा नातू पहिला रुद्रसेन यानें नर्मदा ते कृष्णा नदीपर्यंतच्या मुलुखांत आपली सत्ता दृढ केली. तो महाभैरवाचा उपासक होता. महाराज पहिला पृथ्वीसेन (इ. स. ३४०–३९०) यानें कुंतलदेशापर्यंत वाकाटकांची सत्ता वाढविली. त्याचा पुत्र महावैष्णव दुसरा रुद्रसेन (इ. स. ३९०–३९५) यानें दुसऱ्या चंद्रगुप्ताची कन्या प्रभावती गुप्ता हिच्याशीं विवाह केला होता. माळव्यांतील शकक्षत्रपांचा निःपात करण्यास वाकाटकांनीं गुप्त राजाला खूपच मदत केली. रुद्रसेन अल्पायुषी मेल्यानें मुलांच्या अज्ञानकालांत राजमाता प्रभावती हिनें राज्याधिकार आपल्या हातीं घेतले. त्यामुळें साहजिकच वाकाटकांच्या दरबारीं गुप्तांचें वर्चस्व वाढलें. वाकाटक व्यवहारतः गुप्तांचे मांडलिकच बनले. प्रभावती गुप्ताबरोबर कालिदासही कांहीं काळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाकाटकांच्या दरबारीं आला होता. तेथें असतांना रामगिरी पर्वतावरून त्यानें आपल्या प्रिय पत्नीस संदेश देणारें मेघदूत काव्य रचलें अशी आख्यायिका आहे. प्रभावती गुप्ताचा पुत्र दुसरा प्रवरसेन याला कालिदासानेंच शिकविलें होतें. कालिदासाच्या मदतीनें या प्रवरसेनानें सेतुबंध नांवाचें प्राकृत महाकाव्य रचलें. हा प्रवरसेन स्वतःचा परममाहेश्वर म्हणून दानपत्रांत उल्लेख करतो. यानंतरच्या काळांत गुप्तांचें वाकाटकांशीं चांगले संबंध राहिले नसावेत. वाकाटक घराण्याचा शेवटचा प्रसिद्ध राजा हरिषेण (इ. स ४६५–५००) यानें पुष्कळ लढाया करून विस्तृत साम्राज्य स्थापिल्याचा उल्लेख आढळतो. त्यानें कुंतल, माळवा, दक्षिण कोसल, कलिंग, त्रिकूट, (उत्तर कोंकण), लाट (दक्षिण गुजराथ) व आंध्र इ. देश जिंकले होते. हूणांच्या स्वाऱ्या व गुप्तांचा पडता काळ यामुळें हें शक्य झालें असावें. यानंतर वाकाटक सत्ता सहाव्या शतकांत नष्ट झाली.

वाकाटकांनीं विद्या-कलांना उत्तेजन दिलें. अनेक प्राकृत ग्रंथांचें कर्तृत्व वाकाटक राजांना दिल्याचें आढळतें. संस्कृत वाङ्मयांत प्रसिद्धि पावलेली सुप्रसिद्ध वैदर्भी रीति ही वाकाटकांचें अमर स्मारकच होय. अजिंठा येथील बरेचसे शिल्प व चित्रें ही वाकाटकांच्या उदार आश्रयानेंच पूर्ण होऊं शकली गुप्तकालांतील सुवर्णयुगाचा प्रत्यय समकालीन वाकाटक राज्यांतही आपणांस येतो.

इतर राज्यें :

गुप्तांच्या अवनतीच्या काळांत मैत्रकांनीं सौराष्ट्रांत वलभी येथें . स्वतंत्र राज्य स्थापिलें. या घराण्यांतील तिसरा राजा द्रोणसिंह यानें जुनी मांडलिकत्वनिदर्शक सेनापति ही पदवी टाकून दिली व महार ाज ही स्वातंत्र्यनिदर्शक पदवी धारण केली. मैत्रकांनीं माळवा, गुज राथ, उत्तर कोंकण येथपर्यंतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखालीं आणला होता. इ. स. सहाव्या व सातव्या शतकांत वलभीचें साम्राज्य पश्चिम भा रतांत प्रसिद्ध होतें. सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत दुसरा ध्रुवसेन वलभी चा राजा असतांना कनोजच्या हर्षवर्धनाशीं त्याचा झगडा झाला. शेव ीं उभयतांचा तह होऊन हर्षवर्धनानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपली मुलगी ध्रुवसेनास देऊन त्याच्याशीं सख्य जोडलें. आठव्या शतकाच्या अखेरीस सिंधच्या अरबांनीं या साम्राज्याचा शेवट केला. वलभीच्या राज्यांत भृगुकच्छ व वलभी हीं दोन आंतरराष्ट्रीय व्यापाराचीं बंदरें असल्यानें या राज्यांत सुबत्ता असे. वलभीचे अनेक राजे शैवपंथी असले तरी परधर्मसहिष्णु होते. सातव्या शतकांत ह्युएनत्सांगनें या राज्यास भेट दिली व तेथील ऐश्वर्य व सुबत्ता पाहून समाधान व्यक्तविलें. दुसरा ध्रुवसेन हा बौद्धधर्मी होता. इत्सिंग आपल्या प्रवासवर्णनांत वलभीच्या प्रसिद्ध विद्यापीठाचा पश्चिम भारतांतील नालंदा असा गौरवपर उल्लेख करतो. वलभी विद्यापीठाच्या पदवीधरांना राज्यामध्यें मोठ्या अधिकाराच्या जागीं नेमीत. यावरून तेथें विविध विषयांचें शिक्षण दिलें जात असावें. सौराष्ट्रांतील श्रीमंत व्यापारी व मैत्रकराजे यांनीं या विद्यापीठाला उदार आश्रय दिला होता.

याच काळांत कनोजच्या परिसरांत मौखरि घराणें प्रसिद्धीस आलें. या घराण्यांतील राजांनीं हूणांशीं लढा दिला व त्यांना पश्चिमेस थोपवून धरलें. या घराण्यांतील प्रसिद्ध राजा ईश्वरवर्मन् याच्या जौनपूर येथील शिलालेखावरून असें दिसतें कीं, त्यानें माळव्याच्या यशोधर्मन् राजाचा पराभव केला होता. तसेंच सहाव्या शतकांत आंध्र व सौराष्ट्र येथील राजांनीं उत्तरेकडे स्वारी केल्यावर त्यांना पिटाळून लावून उत्तरेचें स्वातंत्र्य अबाधित राखण्याची महनीय कामागिरी त्यानें बजावली. त्याचा मुलगा ईशानवर्मन् यानें महाराजाधिराज ही पदवी धारण केली. आंध्र, गौड व शूलिक (चोल) राजांचा पराभव करून त्यानें आपली सत्ता गंगेच्या खोऱ्यांत टिकवली. या घराण्यांतील शेवटचा राजा ग्रहवर्मन् यानें स्थानेश्वरच्या प्रभाकरवर्धनाची मुलगी राज्यश्री हिच्याशीं विवाह केला होता. माळव्याचा राजा देवगुप्त यानें गौडराजा शशांक याच्या मदतीनें कनोजवर स्वारी करून ग्रहवर्म्याला ठार मारलें व मौखरि घराण्याचा शेवट केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण तिसावें

गुप्तकालाचें समालोचन

(इ. स. ३०० ते ६००)

राज्यव्यवस्था :

स्वदेश व स्वधर्म यांचें रक्षण करण्यासाठीं व समाजाच्या स्थैर्यासाठीं स्थिर राजसत्तेची आवश्यकता होती. त्यामुळें राजसत्ता प्रबल करण्याकडे, राजाचे अधिकार व महत्त्व वाढविण्याकडेच विचारवंतांची प्रवृत्ति होती. राजा हा मनुष्यरूपी देवच आहे ही कल्पना समाजांत पक्की रुजली होती. राजानें प्रजेच्या तंत्रानें वागण्याचें कारण नाहीं; प्रजेच्या हितासाठीं कर्तव्य-बुद्धीनें झटलें म्हणजे राजधर्म पार पाडला अशी समजूत होती. समुद्र-गुप्ताच्या अलाहाबाद प्रशस्तीमध्यें समुद्रगुप्त हा पृथ्वीवरील देवता आहे असा स्पष्ट उल्लेख येतो. भक्तिपंथांच्या प्रसारामुळें हा देवकल्पनेला उजळा मिळाला. राजसत्ता वंशपरंपरा झाल्यानें प्रजेच्या नियंत्रणाबाहेर गेली. परकीय राजांच्या अनुकरणानें भारतीय राजेही मोठमोठालीं बिरुदें लावूं लागले. गुप्त राजांच्या बिरुदावलींत राजाधिराज, परमराजाधिराज, महाराजाधिराज, परमभट्टारक, परमदैवत, परमेश्वर इ. महत्त्वनिदर्शक व देववाचक बिरुदें आढळतात. राजाच्या गौरवामुळें राजद्रोह पाप ठरलें, प्रजेला धर्ममर्यादेंत ठेवणें हें राजाचें कर्तव्य ठरलें.

राजाच्या खालोखाल युवराजाचें स्थान होतें. राजसत्ता वंशपरंपरेप्रमाणें बापाकडून थोरल्या मुलाकडे जात असे. कित्येक गुप्त राजांनीं या वारसा-क्रमांत बदल करून आपला वारस निवडण्याची पद्धति पाडली. अर्थात् ती सार्वत्रिक झाली नाहीं. राजांच्या अनुकरणानें राजपुत्रही स्वतःचा महाराज-पुत्र देवभट्टारक इ उल्लेख करीत. तसेंच मोठाल्या अधिकाऱ्यांनाही महत्त्व-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दर्शक पद लावण्यांत येऊं लागलें. या काळांतील शिलालेख व ताम्रपट यांतून महादण्डनायक, महासांधिविग्रहिक, महाबलाधिकृत, महाप्रतीहार इ. अधिकारपदांचीं नांवें आढळतात.

राजव्यवस्था नोकरशाही पद्धतीची होती. राज्यकारभाराचीं वेगवेगळीं खातीं असून त्यांवर राजाला जबाबदार असे अधिकारी नेमले जात. कांहीं महत्त्वाचे हुद्दे वंशपरंपरागत एकाच कुटुंबांत चालत असल्याचें दिसतें. हरिषेणाच्या कुटुंबांत सांधिविग्रहिकांचें काम तीन पिढ्या चालत आलें होतें. अर्थात् यामुळें दोन तोटे होत. कार्यक्षमता पिढ्यान्‌पिढ्या एका कुटुंबांत टिकत नाहीं. दुसरें, राजसत्तेला न जुमानण्याकडे अशा अधिकाऱ्यांची सहज प्रवृत्ति होई. मुलकी व लष्करी अधिकार पुष्कळदां एकाच व्यक्तीकडे सोंपविण्यांत येत. हरिषेण हा सांधिविग्रहिक, कुमारामात्य व महादण्डनायक होता. या अधिकाराच्या केंद्रीकरणामुळें राजसत्तेला धोका निर्माण होई.

राजाला सल्लामसलत देण्यासाठीं मंत्रीपरिषद् असे. परंतु तिचे अधिकार नाममात्र राहिले होते. केंद्रसत्ता व प्रांत यांच्यांतील संबंध राखण्यासाठीं कुमारामात्य व आयुक्त नांवाचे अधिकारी असत. राज्यांतील प्रांतांना भुक्ति म्हणत व त्यावर उपरिक नांवाचा राजप्रतिनिधि असे. पुष्कळदां राजपुत्रच प्रांताधिपति असत. ते स्वतःला महाराजपुत्र परमभट्टारक अशा पदव्या लावीत. प्रांताचे विषय नांवाचे भाग पाडीत, व त्यावर विषयपति किंवा कुमारामात्य नांवाचे अधिकारी नेमीत. गुप्तांच्या सत्तेच्या विकेंद्रीकरणांच्या धोरणानुसार पुष्कळदां उपरिकच विषयपतीची नेमणूक करीत. विषयपतीच्या कार्यालयास विषयाधिकरण म्हणत. विषयपतीला सल्लामसलत देणारे अधिष्ठानाधिकरण प्रत्येक विषयाच्या राजधानीस असे. या अधिकरणांत नगरश्रेष्ठी, सार्थवाह, प्रथमकुलिक व प्रथमकायस्थ हे चार प्रतिनिधि असत. विषयांतर्गत मंडल, भोग व ग्राम हे विभाग असत, व त्यावर अनुक्रमें मंडलाधिपति, भोगपति व ग्राम्यक हे अधिकारी असत. ग्राम्यक ग्राममहत्तरांच्या सल्ल्यानें गांवाचा कारभार पाही. मांडलिक राजांना अंतर्गत कारभारामध्यें कमीअधिक प्रमाणांत स्वायतता असे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फाहेनच्या प्रवासवर्णनावरून आपणांस अधिक महत्त्वाची माहिती मिळते. मुलकी अधिकारी व सैन्य यांना नक्त तनखा देण्यांत येई. प्रजेवर कोणतींही जुलमी नियंत्रणें किंवा जाचक कर नव्हते. प्रजेला अनिर्बंध संचार-स्वातंत्र्य व व्यवसायस्वातंत्र्य होतें. सरकारी जमिनीचें उत्पन्न, जमीनमहसूल, जकाती, कर व खंडणी वगैरे सरकारी उत्पन्नाच्या बाबी होत्या. संरक्षण, पाटबंधारे, रस्तेदुरुस्ती, न्यायदान, इ. बाबींवर खर्च होत असे. राज्याचा बंदोबस्त चोख असल्यानें फाहेनला आपल्या प्रवासांत कोठेंही चोरांचा उपद्रव झाला नाहीं. गुन्हेगारांना सौम्यपणें वागविलें जाई. फांशीची शिक्षा कोणालाच देत नसत. गुन्हेगारांना गुन्ह्याच्या मानानें दंड केला जाई. एकंदरींत राज्यांतील लोक सुखी व संपन्न होते. अनेक दानपत्रांतून सुबत्तेचें चित्र आपणांस पाहावयास मिळतें. धर्मशाळा, अन्नछत्रें, पाणपोया व धर्मार्थ दवाखाने यांचा फाहेननें उल्लेख केला आहे.

धार्मिक परिस्थिति :

वैदिक धर्म : गुप्त राजे ब्राह्मणधर्मानुयायी असल्यानें वैदिक धर्माला उत्तेजन मिळालें. वेदाध्ययन व वेदरक्षण दक्षतेनें होत असे. अनेक राजे-रजवाड्यांनीं वैदिक यज्ञ केल्याचे उल्लेख त्यांच्या आलेखांतून व दानपत्रांतून आढळतात. याच काळांत वैदिक धर्माचें हिंदुधर्मांत पूर्ण रूपांतर झालें. वेदांची अंतिम सत्ता तत्त्वतः मान्य करूनही पुराणांनीं मूर्तिपूजेचा व भक्तीचा प्रसार भारतांत केला. ब्रह्मा, विष्णु व महेश या त्रयीला प्राधान्य प्राप्त झालें. अनेक वैदिक देवता लुप्तप्राय झाल्या अगर नवीन स्वरूपांत रूपांतरित झाल्या. अनेक नवीन देवदेवता अस्तित्वांत आल्या. धर्मांचें स्वरूप भपकेबाज व लोकप्रिय झालें. स्नान, दान, व्रतें, होम, संस्कार, तीर्थयात्रा, देवपूजा यांमधून सामान्य जनतेस धर्माची अभिव्यक्ति होऊं लागली. पौराणिक कथांच्याद्वारें या गोष्टी लोकप्रिय करण्याचे प्रयत्न झाले.

गुप्त कालांत भागवतधर्माची वाढ झाली. अवतारकल्पनेची वाढ होऊन विष्णूच्या अनेक अवतारांची पूजा प्रचलित झाली. अवतारांची संख्याही वाढूं लागली. वराह, वामन, नरसिंह व वासुदेव या चार अवतारांपासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रारंभ होऊन वेगवेगळे अवतार व अवतारांचे अवतार कल्पिण्यांत आले. विष्णुपत्नी श्री किंवा लक्ष्मी ही कल्पना नव्यानें रूढ झाली. सांख्यांची पुरुषप्रकृतिद्वैताची कल्पना व शाक्तपंथाचा उदय या गोष्टीस कारणीभूत झाल्या असाव्यात.

शैवपंथाचीही या काळांत वाढ झाली. भारतीय राजांनीं शैव-वैष्णवांना सारख्याच समानतेनें वागविलें. हूण राजांनीं शैवपंथाचा स्वीकार केला. मिहिरगुल हा कडवा शैव बनला व बौद्धधर्मांचा त्यानें आपल्या राज्यांत छळ केला. याच काळांत सौरपंथाचा प्रसार झाला. भविष्यपुराणावरून असें समजतें कीं, मग ब्राह्मणांनीं श्वेतद्वीपाहून हा भक्तिमार्ग भारतांत आणिला. सौरपंथाच्या वाढींत शकांचा संबंध असावा असें वाटतें. मुलतान येथें सूर्यमंदिरांत सूर्याची सुवर्णमूर्ति होती. मंदसोर येथेंही विणकरांच्या संघानें इ. स. ४३६ मध्यें सूर्यमंदिर बांधल्याचा उल्लेख आहे.

शाक्तपंथाचा प्रसार हा या काळाचा विशेष आहे. वैदिक वाङ्मयांतून अंबिका ही रुद्राची बहीण म्हणून वर्णिली आहे. उपनिषदांतून उमा हैमवतीचा उल्लेख आढळतो. भक्तिमार्गांत या देवता साकार झाल्या व त्यांच्या रूपांविषयीं अनेक कथा निर्माण झाल्या. देवी ही आदिशक्ति व मूलप्रकृति समजली गेली. सांख्य व वेदान्त तत्त्वज्ञानांनीं प्रकृति व माया यांच्या कल्पना रूढ केल्या होत्या. त्या सर्वांचा परिपाक होऊन असुरमर्दिनी दुर्गा, महालक्ष्मी, सरस्वती, चामुंडा इ. देवींचीं रूपें तयार झालीं. गिरिजनांमध्यें शक्तिपूजा प्रचलित असल्याचा हरिवंशांत उल्लेख आहे. वेदपूर्व मातृका-पूजेचाहि अंतर्भाव या पंथांत होऊन तो परिपूर्ण झाला. शिवपार्वतीचा संबंध जोडला जाऊन शाक्तपंथ या कालांत प्रभावी बनला. स्कंद, गणेश, यम, कुबेर इ. देवतांचीही पूजा याच काळांत रूढ झाली.

या सर्व पंथांचा हिंदुधर्मांत समावेश करून घेतल्यामुळें तो लोकप्रिय झाला. या समावेशामुळें पंथोपपंथ एकत्र शांततामय सहजीवन जगूं शकले.

१७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्धधर्म :

मध्य आशिया व वायव्य भारत या विभागांत बौद्ध धर्माचा जोर होता. इ. स. दुसऱ्या शतकांत चिनी बादशहानें बौद्ध धर्माचा स्वीकार केल्यापासून त्या धर्माचा पूर्व आशियांत चांगलाच प्रसार झाला. इ. स. ३४२ मध्यें बौद्ध धर्मानें कोरियांत प्रवेश केला व इ. स ५२२ मध्यें जपानमध्यें बौद्धधर्म सुरू झाला भारतांतून बाहेर पडून अनेक त्यागी भिक्षु व भिक्षुणी यांनीं धर्मप्रचाराचें कार्य जोमानें व उत्साहानें केलें. त्यामुळें आग्नेय आशियामध्येंही बौद्ध धर्म प्रचलित झाला. भारताबाहेर बौद्ध धर्म वाढत असतांना खुद्द भारतांत मात्र त्याचा जोर कमी झाला. गुप्तादि राजांनीं ब्राह्मणधर्माचा पुरस्कार केल्यानें बौद्धांचा राजाश्रय तुटला. पुढें हूणांच्या अत्याचारानें बौद्धांचें फारच नुकसान झालें.

महायानपंथानें संस्कृत भाषा, मूर्तिपूजा व भक्ति यांचा स्वीकार करून बौद्धधर्म लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. तरीही मध्यदेशामध्यें बौद्ध धर्माचा जोर ओसरत होता. कारण कपिलवस्तु व बुद्धगया ही बौद्धांचीं धार्मिक क्षेत्रें उजाड पडल्याचा उल्लेख फाहेन' करतो. अनेक बौद्ध विद्वानांचें लक्ष या काळांत धर्मप्रसारापेक्षां तत्त्वज्ञान व सदाचार यांवर केंद्रित झालें होतें. त्यामुळें वादविवाद व संशोधन या द्वारां नवीन सिद्धांत प्रस्थापित करण्यावर त्यांचा भर होता. या कामीं त्यांना राजे व श्रीमंत लोक यांचा उदार आश्रय मिळाला. बौद्धविहार शिक्षणांचीं केंद्रें बनलीं. त्या मधून सर्वधर्मीयांना आचारधर्म, तत्त्वज्ञान इ. शिक्षण देण्यांत येई. अशाच एका संघारामांतून नालंदा विद्यापीठाचा जन्म झाला. या विद्वानांनीं विपुल ग्रंथरचना करून भारतीय वाङ्मयांत फार महत्त्वाची भर घातली. दुर्दैवानें त्यांपैकीं बरेचसें ग्रंथभांडार चिनी व तिबेटी भाषांतरांतूनच फक्त उपलब्ध होतें. या विचारमंथनांतूनच चार बौद्ध तत्त्वदर्शनें निर्माण झालीं.

मूर्तिपूजा रूढ झाल्यानें चैत्य, स्तूप, विहार, लयन हीं विविध ठिकाणीं बांधलीं गेलीं. अनेक प्रकारच्या मुद्रा असलेल्या बुद्धाच्या मूर्ति याच काळांत निर्माण झाल्या. अवलोकितेश्वर, अमिताभ, मंजुश्री इ. बोधिसत्त्वांच्याही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मूर्ति बनविल्या जाऊन त्यांची पूजा करीत. भक्तिपंथाच्या प्रभावामुळें तारा, श्रीमहादेवी इ. देवताही या बोधिसत्त्वांबरोबर पूजिल्या जात.

जैनधर्म :

बौद्धधर्माप्रमाणेंच जैनधर्मालाही या काळांत ओहोटी लागली होती. जैनांचा राजाश्रय सुटल्यानें या काळांत जैनधर्म पश्चिम व दक्षिण भारतांत स्थिरावला. तेथें त्यास राजाश्रय मिळाला. शिवाय व्यापारी, सावकार इ. वर्गांतही जैनधर्माला पुष्कळ अनुयायी मिळाले. तामीळ देशांत जैनधर्माचा चांगला प्रसार होता. शंगम् वाङ्मयांत जैनधर्मीयांचा पुष्कळ उल्लेख आढळतो. तथापि धर्मांतर घडवून आणण्याचा उत्साह जैनांनीं फारसा कधींच दाखविला नाहीं. श्वेतांबर जैनांची दुसरी धर्मपरिषद् वीरसंवत् ९८० (इ. स. ५१२) मध्यें काठेवाडांतील वलभी येथें देवर्धिगाणि यांच्या अध्यक्षतेखालीं भरली होती. या परिषदेनें जैन आगम निश्चित केला. सध्यां प्रचलित असलेला ४५ ग्रंथांचा जैन आगम हा या परिषदेचें फळ होय. जैनधर्मांतही या काळांत अनेक पंथ निर्माण झाले. जैन धर्मानें तीर्थंकरांची देव म्हणून पूजा करण्यास आरंभ केला. त्यामुळें जैन देवालयें, पूजा-समारंभ, मूर्तिपूजा इ. गोष्टी जैनधर्मांत घुसल्या. एकंदरींत भक्तिपंथाचा प्रभाव जैनांवरही पडला. पण जैन हे अधिक सनातनी वृत्तीचे असल्यानें बौद्धांइतका त्यांचा इतिहास खळबळीचा झाला नाहीं. अनेक जैनपंथांनीं प्राकृत भाषाच वापरून धर्मप्रचार केल्यानें प्राकृत भाषांची या कालांत वाढ झाली.

सामाजिक परिस्थिति :

गुप्तांच्या अधिसत्तेखालीं उत्तर भारताचें एकीकरण झाल्यानें अराज-काचा अंत होऊन देशांत शांतता नांदूं लागली. समाजाला स्थैर्य प्राप्त होऊन अराजक कालांत विस्कटलेली समाजाची घडी पुनः नीट घालण्यांत आली. जातिसंस्था अधिकाधिक प्रगत होऊन जातींचीं कर्तव्यें व आंतर-जातीय संबंध यांना निश्चितता येऊं लागली. आंतरजातीय विवाह

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्याचीं उदाहरणेंही आढळतात. प्रभावती गुप्ता ही वैश्य राजकन्या दुसरा रुद्रसेन या ब्राह्मण वाकाटक राजाला दिली होती. कदंबांच्या ब्राह्मण घराण्यांतील राजकन्या गुप्तांच्या वैश्य घराण्यांत दिली होती. इक्ष्वाकु घराण्यांतील ब्राह्मण राजानें उज्जनियीच्या शकक्षत्रपाच्या मुलीशीं विवाह केला. अशा आंतरजातीय विवाहांमुळेंच हूणादि परकीय टोळ्यांचें हिंदुकरण सुलभ झालें.

पण ही उदारता हळूहळू नाहींशी होऊन समाज अधिकाधिक कर्मठ व कडक बनत होता. राजसत्तेकडून धर्मरक्षण होण्याची फारशी आशा नसल्यानें समाजानें तशी व्यवस्था करून ठेवली. ब्राह्मण हे समाजाचे नेते ठरले. प्रत्येक जातींचीं कर्तव्यें सांगणें व आपल्या आचरणानें इतरांना उदाहरण घालून देणें हें ब्राह्मणांचें काम होतें. (वर्णानां ब्राह्मणो गुरुः ।) त्यामुळें ब्राह्मणांचें महत्त्व वाढून त्यांच्या ठिकाणीं देवत्व कल्पिण्यांत येऊं लागलें. ब्राह्मणांच्या आचारविचारांत कर्मठपणा व सोवळेपणा वाढला. ब्राह्मणांचा योगक्षेम चालण्यासाठीं त्यांना दान देण्याचें महत्त्व प्रतिपादन केलें गेलें. पुराणांतून दानांची फार स्तुति केली आहे.

या समाजरचनेंत ब्राह्मण हे सर्वश्रेष्ठ व चांडाल हे कनिष्ठ ठरून इतर जातींची उच्चनीचता ठरविली गेली. या उच्चनीचतेचा हेतु हलक्या जातींच्या आचारविचारांचें उदात्तीकरण (Sublimation) करणें एवढाच होता. चांडालांना कनिष्ठ स्थान प्राप्त झाल्यानें त्यांच्यावर अनेक सामाजिक निर्बंध घातले गेले. त्यांतूनच अस्पृश्यतेची वाढ झाली. चांडाल गांवाबाहेर राहात. त्यांच्या सांवलीनेंही विटाळ होई. आंतरजातीय अन्नोदकाचा व्यवहारही निर्बंधित केला गेला. आपल्याहून हलक्या जातीचें अन्नोदक वरच्या जातीनें घेऊं नये असें ठरविण्यांत आलें. पण व्यवसायाचें स्वातंत्र्य अद्यापिही होतें. चांडालाखेरीज इतरांना कोणताही व्यवसाय करतां येई. वेदाध्ययनाचा अधिकार ब्राह्मणांपुरताच मर्यादित केला गेला.

स्त्रियांचा वेदाध्ययनाचा अधिकार नष्ट झाल्यानें त्यांचें उपनयनही होईनासें झालें. उपनयनाऐवजीं विवाह हेंच त्याचें जीवितध्येय ठरलें गेलें. उपनयन हें आठव्या वर्षीं प्रशस्त असल्यानें मुलींच्या विवाहाचेंही तेंच इष्ट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वय ठरलें. ऋतुप्राप्तीपूर्वी कन्येचा विवाह करावा असा आदेश स्मृतींतून देण्यांत आला. पुराणांतून ही वयोमर्यादा कमी करण्याचीच प्रवृत्ति दिसून येते. बालविवाहामुळें बालविधवांचा प्रश्न समाजापुढें आला. नियोगपद्धति गर्हणीय ठरली व पुनर्विवाहाची बंदी होती. विधवांनीं भिक्षुणींप्रमाणें व्रतस्थ राहून कालक्रमणा करावी असें सांगण्यांत आलें. पुराणांतून स्त्रियांसाठीं अनेक व्रतवैकल्यें सांगितलीं आहेत. परकीयांच्या अनुकरणानें सतीची चाल प्रचलित झाली. इ. स. ५१० मध्यें गुप्तांचा मांडलिक गोपराज याची स्त्री सती गेल्याचा शिलालेख आहे. अर्थात् ही चाल समाजामध्यें फारशी लोकप्रिय नसावी. स्त्रीधनाची वाढ होऊन स्त्रियांना अधिक आर्थिक हक्क मिळाले. विभक्त कुटुंबांतील विधवेला नवऱ्याच्या इस्टेटीमध्यें आजीवन उपभोगाचे हक्क मिळाले.

संयुक्त कुटुंबपद्धति प्रचलित होती. कुटुंबांतील कर्त्या पुरुषाला सर्वाधिकार असत. इतर दायादांच्या हितास बाध येईल अशा रीतीनें वडिलोपार्जित मालमत्तेची विल्हेवाट त्यास करतां येत नसे. या काळांत पति हा स्त्रीचा देव आहे (Apotheosis of Husband) ही कल्पना रूढ झाली. पौराणिक कथांच्या द्वारें ती रुजविली गेली अभिव्यचारी पातिव्रत्य हा मोठा सद्‌गुण ठरला. पतित स्त्रीला शिक्षा करण्याचा व प्रसंगीं टाकून देण्याचा अधिकार पताला मिळाला. पण स्त्रीनें कोणत्याही परिस्थितींत पतीचा त्याग करूं नये असा निर्बंध होता. वेदधर्म स्त्रीशूद्रांना प्रतिषिद्ध होता तरी पौराण-धर्माचीं द्वारें सर्वांनाच खुलीं होतीं.

सामाजिक नीतिनियमांची असलबजावणी राजसत्तेकडून होण्याची शाश्वति नसल्यानें पुराणांतून स्वर्गनरकाच्या कल्पना प्रामुख्यानें मांडल्या गेल्या. सामाजिक नीतिनियम मोडणें हें पाप असून त्याबद्दल नरकवासाची शिक्षा होते.

फाहेनच्या वर्णनावरून समाजांत अहिंसाप्रवृत्ति वाढली होती असें दिसतें. तो लिहितो कीं, ' सबंध देशांत कोणीहि जिवंत प्राण्याला मारीत नाहीं, दारू पीत नाहीं, व कांदालसूणही खात नाहीं. ' अर्थात् ही अतिशयोक्ति आहे. ब्राह्मणांखेरीज इतर जातींत मांसाहार सर्रास चालत असे. श्रीमंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोक परदेशी उंची दारू पीत, तर गरीब लोक देशी दारूवर आपली तल्लफ भागवीत. परकीयांच्या अनुकरणानें श्रीमंतांच्या पोशाखांत बदल झाल्याचें दिसतें. भारतीय राजे शकांप्रमाणें कोट, ओव्हरकोट व लांब तुमानी घालीत. सामान्य लोकांत धोतरें वापरण्याचीच पद्धत होती. कांहीं थोड्या स्त्रिया शकपद्धतीप्रमाणें जाकीट, ब्लाऊझ व फ्रॉक घालीत. सामान्यपणें सुती कापडच सर्व लोक वापरीत. श्रीमंतांचे कपडे रेशमी असत. स्त्री-पुरुषांना अलंकारांचें सारखेंच वेड होतें. सोनें, चांदी, मोतीं व माणकें यांचे अलंकार वापरीत. विविध नमुन्याचे मोहक हार, कंबरपट्टा, कर्णाभरणें, व बाजूबंद, बांगड्या, तोडे इ. अलंकार स्त्रिया वापरीत. कर्णाभरणें, आंगठ्या, केयूर, अंगद, इ. पुरुषांचे अलंकार असत. पावडर व रंग लावून नट्टापट्टा करण्यांत येई. केशभूषेच्या विविध आकर्षक पद्धति अजिंठ्याच्या चित्रांमध्यें आढळतात. वेळ समजण्यासाठीं घटिकायंत्र वापरीत. सोंगट्या व बुद्धिबळें हे आवडते खेळ होते. मुलेंमुली कंदुकक्रीडा करीत. शिकार, बैल, कोंबडीं यांच्या झुंजी हीं करमणुकीचीं साधनें होतीं. यात्रा, नाटकें, तमाशे इ. मुळें लोकजीवन रंगदार होई. गुप्त काळांत एकंदरींत समाज सुखी होता.

आर्थिक परिस्थिति :

शेतकी व तदनुषंगिक उद्योगधंदे हेंच भारताच्या आर्थिक जीवनाचें दृश्य या काळांत आपणांस पाहावयास मिळतें. शेतीची पद्धति पुष्कळच सुधारली होती. कालवे व पाटबंधारे यांत वाढ झाली होती. खतें व सुधारलेलीं बीबियाणें वापरीत. या सर्वांचा परिणाम शेतीच्या उत्पन्नवाढींत झाला. वेगवेगळीं पिकें वेगवेगळ्या प्रदेशाचीं वैशिष्ट्यें होतीं. कापडाचा धंदा भारतांत भरभराटलेला होता. क्षौम (लिनन), चित्रपट्ट (छापील रेशमी कापड), पुलकबंध (रंगीत कापड), पुष्पपट्ट (छापील सुती कापड), दुकूल (रेशमी कापड), अंशुक (मलमल), बदर (सुती कापड) इ. कापडाचे विविध प्रकार या काळांत आढळतात. सोनार व जवाहिरे यांच्या कलेंतही खूप प्रगति झाली होती. बारीक कलाकुसरीचीं कामें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊं लागलीं होतीं. वेगवेगळे धातू शुद्ध करणें व ओतकाम करणें यांमध्यें पूर्णता आली होती. दिल्ली येथील लोहस्तंभ हें या काळाचें अविस्मरणीय स्मारक आहे.

भारताचा अंतर्गत व बाह्य व्यापारही भरभराटींत होता. गुप्तांच्या एकछत्री अंमलामुळें व सौम्य राज्यपद्धतीमुळें व्यापारावर फारशीं जाचक सरकारी बंधनें नव्हतीं. अनेक व्यापारी शहरें या कालांत भरभराटीस आलीं. त्यांना जोडणारे राजमार्ग सुस्थितींत ठेविले जात. नद्यांचाही व्यापारासाठीं उपयोग केला जाई. सागरी वहातुक पुष्कळच सुधारली होती. ५०० माणसें नेऊं शकतील अशीं मोठीं जहाजें बिनधोकपणें सागरावर प्रवासी व माल यांची नेआण करीत. पश्चिमेस रोमन साम्राज्य व पूर्वेकडे आग्नेय आशिया व चीन-जपान यांच्याशीं भारताचा मोठ्या प्रमाणावर व्यापार चाले. भारताच्या मध्यवर्ती स्थानामुळें पूर्वपश्चिमेचा दलाली (Entrepot) व्यापारही भारतांत चाले. भारतीय व्यापारी शिष्टमंडळें ऑरेलियन, कॉन्स्टन्टाइन, जस्टिनीयन इ. रोमन बादशहांना भेटलीं होतीं व भारतीय व्यापाऱ्यांसाठीं त्यांनीं सवलती मिळविल्याचे उल्लेख आहेत. इ. स. ४७० मध्यें भारतीय ब्राह्मण अलेक्झांड्रिया बंदरांत रोमन कॉन्सल सेव्हेरसच्या घरीं राहिले होते. चौथ्या शतकांत युफ्राटिस नदीच्या खोऱ्यांत भारतीय व्यापाऱ्यांच्या वसाहती झाल्या होत्या.

व्यावसायिक व व्यापारी संघटना याही काळांत प्रबळ होत्या. मोठमोठ्या व्यापारी शहरीं व्यापारी महामंडळे (Chamber of Commerce) होतीं. गण, पूग व श्रेणि यांच्या लेखी घटना असत, व श्रेणीच्या कार्यकारी समितींत तीन वा पांच निवडलेले प्रतिनिधी असत. गण, पूग, श्रेणि यांना राजदरबारीं प्रतिनिधित्व असे. तसेंच त्यांनीं केलेल्या नियमांना सरकारी मान्यता मिळे. सभासदांमधील व्यापाराबद्दलचे तंटे मिटविण्याचें काम श्रेणि करीत असे. गणद्रव्याचा अपहार करणारा, गणामध्यें फूट पाडणारा, गणकार्याला अडथळा करणारा यांना शिक्षा होत असे. गणद्रव्यावर समायिक मालकी असे. पुष्कळशा श्रेणी ठेवी स्वीकारीत व विश्वस्त म्हणून कायम निधीची व्यवस्थाही पाहात असत. तसेंच, श्रेणीच्या नांवानें देवळें बांधणें, विहीर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खोदणें, पाणपोई चालविणें इ. दानधर्माचीं कामेंही केलीं जात. संभूय-समुत्थान (Joint Venture) बद्दलचे सविस्तर नियम स्मृतिग्रंथांतून दिलेले आहेत.

फाहेन लिहितो कीं, ' या देशांत मोठमोठीं शहरें आहेत. येथील लोक श्रीमंत व सुखी आहेत. परोपकार करण्यामध्यें ते एकमेकांचें अनुकरण करतात. अनाथ, अपंग, विधवा व गरीब यांसाठीं देशांत ठिकठिकाणीं धर्मार्थ दवाखाने आहेत. ' यावरून देशांतील आर्थिक सुबत्तेची चांगलीच कल्पना येते.

शिक्षण व वाङ्मय :

या काळांत शिक्षण हें मुख्यतः ब्राह्मणांच्या हातांत होतें. विद्वान् ब्राह्मणांना दिलेलीं अनेक दानपत्रें सांपडलीं आहेत. ब्राह्मण अग्रहार हीं शिक्षणाचीं केंद्रेंच होतीं. दरिद्री राहूनही विद्यादानाचें कार्य करण्याचा उत्साह व कर्तव्यबुद्धि ब्राह्मणांनीं दाखविली. बौद्धविहारांतून शिक्षणाचा प्रसार होई. तामीळ देशांत उच्च शिक्षण देणाऱ्या घटिका (महाविद्यालय) असत. काशी, पाटलीपुत्र, मथुरा, नालंदा, नासिक, प्रतिष्ठान, कांची हीं शहरेंही शिक्षणाचीं केंद्रें म्हणून प्रसिद्ध होतीं. तक्षशिलेचें शैक्षणिक महत्त्व कमी झालें होतें वेद, पुराणें, इतिहास, धर्मशास्त्र, व्याकरण, तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान, ज्योतिष इ. अनेक विषय शिकविले जात. धंदेशिक्षण हें बहुधा कारागिराच्या घरींच घ्यावें लागे. शिल्प, चित्र, आलेख, स्तंभ इ. या कालांतील अवशेषांवरून वेगवेगळ्या कलांचें शिक्षण देण्याची कांहीं तरी व्यवस्था निश्चित असावी असें वाटतें. शक्रादित्य (पहिला कुमारगुप्त) राजानें नालंदा विद्यापीठाची स्थापना केली असें ह्युएनत्सांग सांगतो.

या काळांत ब्राह्मी लिपीपासून नागरी लिपी प्रचारांत आली. संस्कृत भाषेला राजाश्रय मिळाला व ती विद्येची भाषा ठरली व त्यामुळें तिचा प्रसार वाढला. देशांत वेगवेगळ्या प्राकृत भाषा प्रचलित असल्यानें संस्कृत ही आंतरप्रांतीय व्यवहाराची राष्ट्रभाषा बनली. वाङ्मयाच्या विविध शाखांत संस्कृत भाषेंत विपुल ग्रंथनिर्मिति झाली. महायान पंथानेंही संस्कृत भाषेचाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आश्रय केला. जैनांनीं मात्र प्राकृत भाषा कायम ठेवली. ज्ञानाच्या विविध क्षेत्रांत या काळीं आश्चर्यकारक प्रगति झाली. स्थैर्य, सुबत्ता व प्रगति यांमुळें या काळास सुवर्णयुग म्हणून संबोधतात. हा काल पुनरुज्जीवनाचा नव्हता; तर या काळांत भारताच्या संस्कृतिवृक्षाला मोहोर आला होता. तो फळा-फुलांनीं लहरला होता. भारताच्या संस्कृतीचें वैभवशाली चित्र या काळांत पाहावयास सांपडतें.

पुराणें :

बहुतेक महत्त्वाचीं पुराणें या काळांत नव्यानें लिहिलीं गेलीं. पुराणां-मध्यें विश्वाची उत्पत्ति व प्रलय, वंशावळी, मन्वंतरें व वंशचरित्रें हीं असतात असें अमरकोश सांगतो. यावरून सध्यांचीं पुराणें मूळ स्वरूपांत आपणांपुढें नाहींत हें निश्चित. अठरा पुराणें व तितकींच उपपुराणें आहेत असें पुराणांतच सांगितलें आहे. पुराणांचे मूळचे कर्ते सूत असा-वेत. पण नंतरच्या काळांत पुरोहितवर्गानें आपणांस सोयिस्कर असा फरक त्यांत केला. त्यामुळेंच सध्यांचीं पुराणें विशिष्ट देवता किंवा तीर्थ यांची तरफदारी करतांना आढळतात.

पुराणांचें ऐतिहासिक महत्त्व आतां सर्वमान्य झालें आहे. अनेक राज-वंशांची माहिती पुराणांवरूनच मिळते. वायु, ब्रह्मांड, मत्स्य व विष्णु हीं पुराणें या दृष्टीनें उपयुक्त आहेत. हिंदूंची सृष्ट्युत्पत्तिविषयक मतें पुराणग्रंथांतच पाहावयास मिळतात. परकीयांचें भारतीकरण करून त्यांना हिंदुधर्मांत सामावून घेण्यामध्यें पुराणांनीं फार महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. वैदिक धर्माची पिछेहाट होऊन पाखंड धर्म बळावत असतांना वैदिक धर्माला लोकप्रिय स्वरूप देऊन हिंदुधर्माची उभारणी पुराणांनींच केली आहे. जाति-संस्थेची भक्कम पायावर उभारणी करून जातिधर्मांचें निरूपण केलेलें पुराणांतच सांपडतें. नवीन काळाला अनुरूप असे आचारधर्म पुराणांनींच प्रचारांत आणिले. लोकविशिष्ट असे जुने आचार कलिवर्ज्यप्रकरणांत टाकून व जुन्याला विरोधी असे प्रचलित आचार आपद्धर्म म्हणून स्वीकारून जुन्यानव्याची सांगड घालण्याचा पुराणांनीं उपक्रम केला. नवीन लोकांबरो-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर आलेल्या नवीन देवतांना अवतार कल्पनेच्या योगानें हिंदुधर्मांत सामावून घेतलें व त्यांचें उदात्तीकरण केलें. भक्तिपंथांत प्रसिद्धीस आलेल्या देवांना व पूजापद्धतींना लोकप्रिय करण्याचें महान् कार्य पुराणांनींच बजाविलें आहे. विष्णु व शिव या हिंदुधर्माच्या मूर्धन्य देवता पुराणांनींच महत्पदास नेल्या आहेत. जप, तप, पूजा, दान, व्रतवैकल्यें इ. पुराणांनींच निर्माण केलीं आहेत. मूर्तिपूजा व देवालयें यांना पुराणाच्या द्वारें विशिष्ट स्वरूप प्राप्त झालें आहे. पुराणांनीं हिंदुधर्माचीं तीर्थक्षेत्रें निर्माण केलीं. हीं क्षेत्रें भारतांतील सर्व भागांत कल्पिल्यामुळें हिंदुधर्म हा खऱ्या अर्थानें भारताचा राष्ट्रधर्म बनला आहे. पुराणश्रवणाचा अधिकार सर्व जातींस असल्यानें ज्ञानाचा प्रसार स्त्रीशूद्रांतही होण्याची व्यवस्था झाली आहे. पौराणिक कथांनीं भारतीय कला व वाङ्मय यांना अनंत विषय पुरविले आहेत. सांख्य-वेदान्तादि तत्त्वदर्शनें पुराणांनीं सामान्य जनांपर्यंत पोहोंचविलीं.

नारद, बृहस्पति, कात्यायन व व्यास इ. स्मृतिग्रंथ या काळांत लिहिले गेले. नारद स्मृतीमध्यें स्त्रियांना विशिष्ट परिस्थितींत पुनर्विवाहाची परवानगी दिली आहे. बृहस्पति स्मृतींतून गण व श्रेणी यांच्या घटनेसंबंधीं सविस्तर माहिती मिळते. कात्यायन स्मृतीनें न्यायालयांतील कामकाजपद्धति तपशीलवार दिलेली आहे. वादी, प्रतिवादी, साक्षीदार, लेखी पुरावा, भोगवटा, तपासणी इत्यादींचें विस्तृत विवेचन त्यामध्यें आढळतें. व्यासाचें योगभाष्य, वात्स्यायनाचें न्यायभाष्य, प्रशस्तपादाचा पदार्थधर्मसंग्रह, शबराचें मीमांसाभाष्य इ. तत्त्वज्ञानग्रंथ या कालांत निर्माण झाले

कविकुलगुरु कालिदास हा चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या पदरीं होता असा कांहीं विद्वानांचा दावा आहे. परंतु विक्रमसंवत् स्थापणाऱ्या मालवाधीश विक्रमादित्याच्या दरबारांत तो होता अशी परंपरा आहे. म्हणून तो खि. पू. पहिल्या शतकांत होऊन गेला असावा हें मत अधिक ग्राह्य वाटतें. त्याच्या ग्रंथाखेरीज कालिदासाचा जीवनवृत्तांत कांहींच उपलब्ध नाहीं. कालिदासाच्या नांवावर तिसापेक्षां अधिक ग्रंथ लावलेले आढळतात. तथापि त्याचे सात ग्रंथ सर्वमान्य झाले आहेत. ऋतुसंहार या भावकाव्यांत सहा ऋतूंचें बहारदार वर्णन आहे. मेघदूत या दुसऱ्या भावकाव्यांतील विरही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यक्षाचा प्रियेस संदेश अमर झाला आहे. कल्पनाविलास व भावनांचें हळुवार रेखाटन यामुळें मेघदूत लोकप्रिय ठरलें. कुमारसंभव व रघुवंश हीं दोन महाकाव्यें त्यानें लिहिलीं. कुमारसंभवामध्यें विशुद्ध प्रेमाचा आदर्श वर्णिला आहे. शिवपार्वतीचा विवाह होऊन तारकासुराचा वध करण्यासाठीं कुमार कार्तिकेयाचा जन्म झाला ही कथा यांत आली आहे. रघुवंश हें काव्य कालिदासाच्या परिणत प्रज्ञेचा विलास आहे. रघुवंशांतील राजांचीं वर्णनें यांत आहेत. कालिदासानें मालविकाग्निमित्र, विक्रमोर्वशीय व शाकुंतल हीं तीन नाटकें लिहिलीं आहेत. अग्निमित्राच्या दरबारी प्रेमप्रकरणावर पहिल्या नाटकाची उभारणी आहे. पुरूरवा व उर्वशी यांच्या अद्भुतरम्य प्रेमावर दुसरें नाटक आधारलें आहे. शाकुंतल ही कालिदासाची अमर कृति आहे. शकुंतलेचें विशुद्ध प्रेम, उदात्त त्याग व स्वर्गीय संगम यांचें कलात्मक चित्रण या नाटकांत आहे. आजच्या जागतिक वाङ्मयांत शाकुंतलाची गणना केली जाते.

विशाखदत्ताचें मुद्राराक्षस हें संस्कृत वाङ्मयांतील वैशिष्ट्यपूर्ण नाटक आहे. नंदवंशाचा उच्छेद करून चंद्रगुप्ताचें राजपद स्थिर करण्यासाठीं चाणक्यानें केलेल्या प्रयत्नाचें सुंदर चित्रण यांत आहे. स्वामिभक्त नंदामात्य राक्षस यानें नंदवंशाची पुनः स्थापना करण्यासाठीं केलेले मुत्सद्दी प्रयत्न चाणक्यानें आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेनें हाणून पाडले. चाणक्य नीतीचें यांत यथातथ्य दर्शन होतें. नाटकांतील स्वभावचित्रण सुंदर साधलें आहे. शूद्रक राजाचें मृच्छकटिक हें एक सामाजिक नाटक आहे. एका वेश्याकन्येच्या प्रेमाची कथा त्यांत रंगविली आहे. भरपूर विनोद, रेखीव स्वभावचित्रण व सफाईदार संवाद यामुळें हें नाटक फार लोकप्रिय झालें आहे.

भारवीचें किरातार्जुनीय हें संस्कृत पंचमहाकाव्यांतील तिसरें काव्य आहे. शंकराजवळून पाशुपतास्त्र मिळविण्यासाठीं अर्जुनानें केलेल्या प्रयत्नांचें यांत वर्णन आहे. हें एक अलंकारप्रचुर विदग्ध काव्य आहे. यांत कवित्वापेक्षां पांडित्याचा प्रकर्ष अधिक दिसतो. दण्डीचें दशकुमारचरित हें गद्यकाव्य आहे. समाजांतील खालच्या थराचें यांत सम्यग् दर्शन होतें. पांडित्यप्रचुर भाषा, गौडी रीति व शब्दांची नवलाई यामुळें हा ग्रंथ फारसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकप्रिय होऊं शकला नाहीं. काव्यादर्श हा साहित्यशास्त्रावरील एक महत्त्वाचा ग्रंथ दंडीनें लिहिला आहे. सुबंधूचें वासवदत्ता हें एक गद्यकाव्य आहे. वासवदत्ता व कंदर्पकेतु यांच्या अद्भुत प्रेमाची कथा यांत सांगितली आहे. श्लिष्ट शब्दप्रयोग, समासप्राचुर्य, पाल्हाळिक वर्णनें यांमुळें हा ग्रंथ सामान्य वाचकांस दुर्बोध वाटतो.

पशुपक्ष्यांच्या गोष्टींच्या द्वारें नीतिशिक्षण देण्याच्या कल्पनेंतून Fable literature चा उगम झाला. पुनर्जन्म मानणाऱ्या भारतांत ही गोष्ट सहज सिद्ध होऊं शकली. विष्णुशर्मा ब्राह्मणाचा पंचतंत्र हा उपलब्ध संस्कृत वाङ्मयांतील या तऱ्हेचा पहिला कथासंग्रह आहे. कथेंतून कथा गुंफण्याची विशिष्ट पद्धति लेखकानें स्वीकारली आहे. जगांतील बहुतेक सर्व भाषांत या ग्रन्थाचीं भाषांन्तरें झालीं आहेत. जगांतील अशा कथांची आदिजननी भारत असून तेथूनच या कथांचा प्रसार जगभर झाला. पैशाची भाषेंतील बृहत्कथा हा गुणाढ्याचा कथासंग्रह इ. स. दुसऱ्या शतकांतील असावा; पण तो सध्यां उपलब्ध नाहीं. अकराव्या शतकांत झालेल्या त्याच्या संक्षिप्त संस्कृत आवृत्त्या बृहत्कथामंजरी व कथासरित्सागर या उपलब्ध आहेत.

अमरसिंहाचें नामालिंगानुशासन हा शब्दकोश याच काळांत रचला गेला. संस्कृत भाषेंत हा अमरकोश फार लोकप्रिय ठरला आहे. मध्य आशियामध्यें सांपडलेला नवनीतकम् हा औषधसंग्रह व वृद्धवाग्भटाचा अष्टांगसंग्रह हे आयुर्वेदावरील ग्रंथ याच काळांतील होत. वाग्भटानें आयुर्वेदाला व्यवस्थेशीर वळण लावून त्याची वाढ केली चरक-सुश्रुत-वाग्भट हे आयुर्वेदाचे महान् आचार्य आहेत. पालकाप्याचा हस्त्यायुर्वेद व शालिहोत्राचें अश्वशास्त्र हे पशुवैद्यकाचे ग्रंथ या काळांत लिहिले गेले.

वराहमिहिर हा महान् खगोलशास्त्रज्ञ सहाव्या शतकाच्या पूर्वार्धांत प्रसिद्धीस आला. त्याच्या पंचसिद्धान्तिका या ग्रंथांत तत्कालीन पांच ज्योतिषसिद्धांतांचें वर्णन आहे. या पांच प्रणाली पैतामह, रोमक, पौलिश, वाशिष्ठ व सूर्य या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांपैकीं रोमक व पौलिश सिद्धांत ग्रीकांच्यापासून घेतलेले आहेत. इतरही प्रणालींवर ग्रीकांची थोडी-बहुत छाप आहे. सूर्यसिद्धांत हाच भारतांत टिकून राहिला आहे. वराह-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मिहिराचा फलज्योतिषावरील बृहत्संहिता हा प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे एक विश्वकोश आहे. फलज्योतिषाच्या दृष्टीनें जगांतील सर्व गोष्टींचा विचार यांत आला आहे. बृहद्विवाहपटल व स्वल्पविवाहपटल हे विवाहमुहूर्तासंबंधीं त्याचे ग्रंथ आहेत. बृहज्जातक व लघुजातक हे होराशास्त्रावरील त्याचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. कुंडलींतील ग्रहस्थानांवरून व्यक्तीचें भविष्य वर्तविणें हें शास्त्र भारतीयांनीं ग्रीकांपासून उचललें आहे.

आर्यभटाचा आर्यभटीय (इ.स.४९९) हा ज्योतिषावरील दुसरा महत्त्वाचा ग्रंथ आहे. ग्रह गोल व गणित या ज्योतिषाच्या तिन्ही भागांचा सखोल विचार आर्यभटानें केला आहे. गणिताध्यायामध्यें त्यानें मूळक्रिया, घातक्रिया, क्षेत्रफळ, घनफळ, श्रेढीव्यवहार, बीजनित्यकें (algebraic identities) व अनेकांतिक समीकरणें यांचा विचार केला आहे. तसेंच त्रिकोणमिति व बैजत्रिकोणमिति यांचाही विकास या ग्रंथांत आढळतो. दशमान पद्धतीचा पहिला उपयोग आर्यभटाच्या ग्रंथांत आहे. पृथ्वी गोल असून आपल्या आंसाभोंवतीं फिरते, भूच्छायेमुळें ग्रहणें होतात, इ. आधुनिक सिद्धांत आर्यभटानें पांचव्या शतकांतच मांडले होते.

वसुबंधु हा बौद्ध पंडित समुद्रगुप्ताच्या पदरीं होता. यानें विज्ञानवादाची वाढ करून त्यास व्यवस्थित स्वरूप दिलें. त्याचा अभिधर्मकोश हा बौद्ध तत्त्वज्ञान, मानसशास्त्र व नीतिशास्त्र यांवरील महत्त्वाचा ग्रन्थ आहे. तर्कशास्त्राचीही त्यानें वाढ केली. त्याची शिष्यशाखा मोठीं व प्रसिद्ध आहे. त्याचा शिष्य दिङ्नाग हा बौद्ध न्यायशास्त्राचा जनक म्हणून ओळखला जातो, व अद्यापिहि पूर्व आशियामध्यें हेंच न्यायशास्त्र प्रसिद्ध आहे. वसुबंधूचा थोरला भाऊ असंग हा विज्ञानवादाचा जनक म्हणून समजला जातो. चंद्रव्याकरणाचा जनक चंद्रगोमिन् हा न्यायशास्त्रीविशारद पंडित होता. बुद्धाच्या शिकवणीचें तर्कशुद्ध विवरण बुद्धघोषाच्या विसुद्धिमग्गो या पाली ग्रंथांत आलें आहे. त्यानें त्रिपीटकावर विस्तृत टीका लिहिल्या आहेत. त्याचे विसाहून अधिक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. बुद्धदत्त हा प्रसिद्ध टीकाकार या काळांत होऊन गेला. बुद्धपलित व चंद्रकीर्ति हे शून्यवादाचे ग्रंथकार आहेत. आर्यशूराचा जातकमाला हा काव्यग्रंथ चौथ्या शतकांत लिहिला

पुस्तकालय
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गला. दीपवंश व महावंश हे पालीभाषेंतील सिलोनी इतिहासग्रंथ सहाव्या शतकांत पूर्ण झाले. भारतीय विद्वानांचें लक्ष तर्कज्ञान व वादविवाद यांत याकाळीं विशेषत्वानें लागलेलें दिसतें.

जैनांचे धर्मग्रंथ निश्चित करण्यासाठीं इ. स. ३१३ मध्यें मथुरा येथें व इ. स. ५१२मध्यें वलभी येथें अशा दोन धर्मसभा झाल्या. त्यामुळें श्वेतांबरांचा आगम निश्चित झाला. या परिषदांमधून आगमावर निर्युक्ति, चूर्णी इ. प्राकृत भाष्यग्रंथ लिहिण्यास उत्तेजन मिळालें. या काळांत उमास्वाति, सिद्धसेन हे मौलिक विद्वान् आचार्य होऊन गेले. उमास्वातीचें तत्त्वार्थाधिगमसूत्र व सिद्धसेनाचें न्यायावतार हे प्रसिद्ध संस्कृत ग्रंथ आहेत. प्राकृतमध्येंही जैनांनीं विपुल ग्रंथरचना केली आहे.

एकंदरींत हा काल वाङ्मयाच्या उत्कर्षाचा होता. वाङ्मयाच्या विविध शाखा, शास्त्रें, तत्त्वदर्शनें व धर्मपंथ यांचें विपुल वाङ्मय या काळांत निर्माण झालें. देशाची आर्थिक समृद्धि व राजाश्रय हीं यास कारणीभूत असावींत. या काळाची तुलना इंग्रजी इतिहासांतील पहिल्या एलिझाबेथचा काळ किंवा रोमच्या इतिहासांतील ऑगस्टस् सीझरचा काळ व ग्रीक इतिहासांतील पेरिक्लीसचा काळ यांच्याशीं करतां येईल.

कलाविलास :

राजकीय स्थैर्य व आर्थिक समृद्धि यामुळें गुप्त काळांत कलाकौशल्याची पुष्कळच वाढ झाली. स्थापत्य, शिल्प व चित्र या कलांमध्यें विशेष प्रगति झाली. या काळांतील बऱ्याचशा कलाकृति हूण व मुसलमान यांच्या रानटी स्वाऱ्यांमुळें विनष्ट झाल्या आहेत. स्तूप, चैत्य व विहार हे स्थापत्याचे प्रकार या काळांतही प्रचलित होते. या काळानें जरी जुन्या परंपरा चालविल्या तरीहि हा काळ एका नवीन युगाचा प्रवर्तक ठरला. सारनाथ येथील धमेक स्तूप एका वर्तुलाकार भरीव दगडी गोलावर नळकांड्यासारखें विटांचें बांधकाम करून १२८ फूट उंचीपर्यंत नेला आहे. कोरीव चैत्यांमध्यें आतां मध्यभागीं कोरीव खांबाच्या दोन ओळी आणि भिंती व आढें यांवरील चित्रकाम यांची भर पडली. अजिंठा येथील क्रमांक १६, १७ व १९च्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुहा या पद्धतीचीं उदाहरणें आहेत. चैत्यगृह व देवळें यांवर सुरवातीस सपाट छप्पर असे. पुढें पुढें देवळाच्या गर्भगृहावर गोलार्ध शिखर बांधण्याची पद्धति रूढ झाली. भितरगांव येथील देवळावर पिरामिडच्या आकाराचें शिखर आहे व त्याच्या बाहेरच्या भिंतीवर पार्थिव पटांवर पौराणिक कथांचें चित्रण आहे. देवगड येथील दशावतार मंदिरावर चाळीस फूट उंचीचें शिखर आहे. हीच पद्धत पुढें उत्तर भारतांत रूढ झाली.

भारतीय शिल्पकलेचा (Sculpture) प्रकर्ष या काळीं झाला व तिचा ठसा सर्व आशियाभर उमटला. भडक निसर्गवाद किंवा विचित्र संकेतवाद यां दोन्हीपासून हें शिल्प अलिप्त आहे. सौष्ठव व सद्‌गुण यांचें मनोहर मिश्रण करून या काळांतील आदर्श निर्माण झाले. बुद्धमूर्तीचे विविध नमुने या कालांत तयार झाले. तंत्रप्रकर्ष व आध्यात्मिक भावनांचा आविष्कार यांचा सुंदर मिलाफ सारनाथ येथलि उपदेशक बुद्धाच्या मूर्तींत आढळतो. हिंदूंच्या देवतांचीं रूपेंसुद्धां गुप्त काळांतच ठरलीं गेलीं. या मूर्तींमध्यें प्रमाणबद्ध शरीरसौष्ठव व आध्यात्मिकतेचा आविष्कार करणारें मोहक प्रसन्न मुख हीं आढळतात. कोरीव मानवाकृतींना या काळांत प्राधान्य मिळालें. या सर्व आकृति प्रमाणबद्ध, रेखीव व चैतन्ययुक्त कोरल्या असल्यानें त्यांमध्यें सौंदर्य व लालित्य यांचा सुंदर समन्वय आढळतो उदयगिरी येथील वराहमूर्ति हीं या तंत्राचा उत्कृष्ट नमुना आहे. देवगड येथील देवळावर राम व कृष्ण यांच्या जीवनांतील अनेक कथा कोरलेल्या आहेत. गजेंद्रमोक्ष, शेषशायी विष्णु व नरनारायण हीं शिल्पेंही आकर्षक आहेत. मातीचीं चित्रें सामान्य व्यवहारांतही विपुल प्रमाणांत वापरलीं जात. मोठमोठीं पुरुषाकृति मृण्मय चित्रें भाजून तयार केलेलीं आहेत. चित्रांवरील रंगसंगति अनुकरणीय आहे. या काळांतील शिल्पांवर परकीयांची कांहींही छाप दिसत नाहीं.

धातूच्या ओतकामामध्येंही या काळांत आश्चर्यकारक प्रगति झाली. सुलतानगंज येथील बुद्धाची ताम्रप्रतिमा ७$\frac{1}{2}$ फूट उंच असून एक टन वजनाची आहे. तिचें कलात्मक सौंदर्य वाखाणण्यासारखें आहे. नालंदा येथें बुद्धांचा ८० फूट उंचीचा तांब्याचा पुतळा असल्याचा उल्लेख आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिल्ली येथील लोहस्तंभ धातुकामाची परमावधि आहे. त्याची उंची २३ फूट ८ इंच असून तळाचा व्यास १६·४इंच आहे. पंधराशें वर्षें हें लोखंड पावसापाण्यांत असून अद्यापिही त्याला गंज चढला नाहीं. इतकें प्रचंड ओतकाम युरोपांतील कोणत्याही कारखान्यांत विसाव्या शतकापर्यंत होऊं शकत नव्हतें.

या काळांतील चित्रकला अजिंठा, बाघ व सिगिरि येथें पहावयास सांपडते. अजिंठा येथील सर्व लेण्यांतून पूर्वीं भित्तिचित्रें होतीं. पण आज ७।८ लेण्यांतूनच तीं शिल्लक राहिलीं आहेत. या चित्रांतून बुद्ध व जातक-कथा यांचें चित्रण आहे. मुख्य चित्रांना उठाव देण्यासाठीं पशुपक्षी व वनस्पति यांचीं विविध चित्रें सभोंवार रेखाटलीं आहेत. त्यांतील प्रमाण-बद्धता, कल्पनारम्यता व आकर्षकता उल्लेखनीय आहे. प्रा. ग्रिफिथ लिहितात, ' अजिंठा येथील कारागिरी प्रशंसनीय आहे. मोठाल्या वक्राकार रेषा कुंचल्याच्या एकाच फटकाऱ्यांत पण प्रमाणशीर काढलेल्या आहेत. चित्रकाराचा हात अविचालित आत्मविश्वासानें फिरतो. पुष्कळ ठिकाणीं रंगकाम भक्कम झालें आहे. या ठिकाणीं चैतन्यपूर्ण कला आहे. मानवा-कृतींचीं मुखें भावपूर्ण, अवयव चलाभास व मोहक आहेत. उमललेलीं फुलें, गगनांत भराऱ्या मारणारे पक्षी, बागडणारे, लढणारे किंवा ओझीं वाहणारे पशु, सर्व अगदीं नैसर्गिक आहेत. पोशाखांचें तंत्र हळुवारपणें हाताळलें आहे.' अजिंठ्याच्या चित्रांत भारतीय जीवनाचें प्रतिबिंब आहे. त्यामध्यें राजपुत्र व संन्यासी, सरदार व हुजरे, विविध व्यवसायांतील स्त्री-पुरुष, बागा व जंगलें, गांवें व शहरें या सर्वांचें दर्शन आपणांस होतें. अतिवास्तववाद कोठेंही नाहीं. सर्वत्र आध्यात्मिकतेचा छाप उठलेला आहे. सतराव्या लेण्यांतील ' मरणोन्मुख राजकन्या ' हें चित्र कारुण्यानें ओथंबलेलें आहे.

नाणीं :

गुप्त साम्राज्याच्या उत्कर्ष कालांत विविध प्रकारचीं नाणीं पाडलीं गेलीं. बहुतेक सर्व नाणीं आकार, वजन व कला या बाबतींत प्रमाणशीर आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांची सुबकता व विविधता प्रशंसनीय आहे. कलेच्या बाबतींत परकीय आदर्शच पाळले जात. राजांच्या आकृतींवर ग्रीक कल्पनांची छाप आहे, तर पोशाखाच्या बाबतींत शक-कुशानांचें अनुकरण आहे. नांवें कोरतांना चिनी पद्धतीप्रमाणें उभीं एकाखालीं एक लिहिलीं आहेत.

समुद्रगुप्ताचीं आठ प्रकारचीं सुवर्णनाणीं सांपडलीं आहेत. ध्वज नाण्यांवर एका बाजूस गरुडध्वज व दुसऱ्या बाजूस राजाचें चित्र आहे. चित्रांतील पोशाख कुशान पद्धतीचा आहे. धनुर्धर, परशु, कच या नाण्यांवर एका बाजूस लक्ष्मीचें चित्र आहे. अश्वमेध नाण्यांवर एका बाजूस घोड्याचें चित्र आहे. वीणा नाण्यावर एका बाजूस लक्ष्मी व दुसऱ्या बाजूस मांडी घालून वीणा वाजवीत बसलेल्या राजाचें चित्र आहे. नाण्यांवरील मजकुरांत राजाचें शौर्य, अजिंक्यता व पृथ्वीजय यांचें वर्णन आहे. अश्वमेध नाण्यांवर ' चिरोत्सन्न-अश्वमेध-प्रहर्ता ' असा उल्लेख आहे.

दुसऱ्या चंद्रगुप्तानें नऊ प्रकारचीं नाणीं पाडलीं असून, त्या प्रत्येकावर एका बाजूस गरुड व दुसऱ्या बाजूस धनुर्धारी, सिंहघातक, छत्रधारी, घोडेस्वार इ. राजमुद्रा आहेत. पहिल्या कुमारगुप्तानें मयूरछाप नाणीं पाडलीं. त्यावर एका बाजूस मयूराधिष्ठित कार्तिकेय व दुसऱ्या बाजूस मोराला चारणारा राजा यांचीं चित्रें आहेत. प्रताप, हस्त्यारोही इ. त्याचीं अन्य सुवर्णनाणीं आहेत. त्याच्या चांदीच्या नाण्यांवर मोर वा गरुडचिन्ह आहे. स्कन्दगुप्ताच्या नाण्यांमध्यें सोन्याची शुद्धता कमी झाली. त्यानें नंदीछाप व होमकुंड छाप हीं दोन नवीं नाणीं पाडलीं. एकंदरींत, नाण्यांच्या बाबतींत शुद्धता, वजन व कला या बाबतींत उत्तरोत्तर ऱ्हास झाल्याचें दिसतें.

सांस्कृतिक उत्कर्षाचीं कारणें :

(१) गुप्तांच्या सार्वभौम सत्तेमुळें उत्तर भारताला राजकीय स्थैर्य प्राप्त झालें. गुप्तांनीं केवळ सार्वभौमत्वाची अभिलाषा धरली. मांडलिक राजांना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अंतर्गत स्वायत्तता दिली. बलाढ्य राजांशीं वैवाहिक संबंध जोडून त्यांना आपलेसे केले. त्यामुळें देशांत शांतता नांदूं लागली. (२) भारताचा परदेशांशीं वाढता व्यापार होत असल्यामुळें देशांत बाहेरून विपुल संपत्ति येत होती. त्यामुळें समाजांत सधनता वाढली होती. (३) गुप्त राजे विद्या-कलांचे भोक्ते होते. त्यांनीं कलाकौशल्याचीं कामें यांना मदत दिली. वाकाटक, इक्ष्वाकु इ. राजघराण्यांनींही कलाकौशल्याला उदार आश्रय व उत्तेजन दिलें. (४) भक्तिधर्मामुळें स्थापत्य व शिल्प या कलांना उत्तेजन मिळालें. (५) परकीयांशीं घनिष्ठ संबंध घडून नवें रक्त, नव्या कल्पना व संस्कृतीची देवाण घेवाण यामुळें सांस्कृतिक प्रगति झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण एकविसावें

गुप्तोत्तर काळ

सम्राट् हर्षवर्धन (इ. स. ६०६–६४७)

गुप्त साम्राज्य मोडकळीस आल्यावर इ. स. सहाव्या शतकांत उत्तर भारतांत अनेक लहानमोठीं राज्यें उदयास आलीं. कुरुक्षेत्राच्या प्रसिद्ध भूमीवर स्थानेश्वर येथें वर्धनांनीं आपलें राज्य स्थापिलें. या घराण्याचा संस्थापक पुष्पभूति नांवाचा एक शिवभक्त राजा होता. त्या शतकाच्या उत्तरार्धांत महाराज आदित्यवर्धन यानें मगध राजकन्या महासेनगुप्तादेवीशीं विवाह करून आपलें महत्त्व वाढविलें. त्यांचा मुलगा प्रभाकरवर्धन यानें पंजाब, माळवा, राजपुताना, सिंध येथवर स्वाऱ्या करून आपलें राज्य वाढविलें व परमभट्टारक महाराजाधिराज हीं बिरुदें धारण करून आपल्या सार्वभौमत्वाची द्वाही फिरविली. बाणभट्टानें हर्षचरित्रांत प्रभाकरवर्धनाच्या पराक्रमाचें मोठें अलंकारिक वर्णन केलें आहे. स्थानेश्वरचें राज्य गंगा नदीच्या खोऱ्यांत प्रवेश करण्याचें द्वार असल्यानें वर्धनांना हूणांच्या प्रबल शक्तीशीं निकराचा सामना देऊन त्यांना पंजाबांत थोपवून धरावें लागलें. प्रभाकरवर्धनास राज्यवर्धन व हर्षवर्धन (जन्म इ. स. ५९०) हे दोन पुत्र होते; व कन्या राज्यश्री ही कनोजचा राजा ग्रहवर्मा यास दिली होती. इ. स. ६०४ च्या सुमारास पंजाबांतील हूणांचा पुंडावा मोडण्यासाठीं युवराज राज्यवर्धन यास पाठविण्यांत आलें. राजपुत्र हर्षवर्धनही कांहीं घोडदळ घेऊन भावाच्या मदतीस गेला. त्यांच्यामागें प्रभाकरववर्धन आजारी पडल्यानें हर्ष परतला. थोड्याच दिवसांत प्रभाकरवर्धन मृत्यु पावला. हूणांवर विजय मिळवून परतलेल्या राज्यवर्धनास गादीवर बसविण्यांत आलें. त्याच सुमारास कनोजहून बातमी येऊन थडकली कीं, माळव्याचा राजा देवगुप्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यानें कनोजवर स्वारी करून गृहवर्म्यास ठार मारलें व राज्यश्रीस बेड्या घालून कैदेंत टाकलें. राज्यकारभार धाकट्या भावांवर सोंपवून राज्यवर्धनानें ताबडतोब माळव्यावर स्वारी केली व देवगुप्ताचा पराभव केला. पण देवगुप्ताचा मित्र गौडराज शशांक यानें विश्वासघातानें राज्यवर्धनास ठार मारलें.

भावाच्या मृत्यूनंतर दि. २६ फेब्रुवारी ६०६ रोजीं हर्षवर्धन गादीवर आला. भावाच्या मृत्यूचा सूड घेऊन राज्यश्रीची सुटका करण्याची शपथ त्यानें घेतली व ताबडतोब तो मोहिमेवर निघाला. या सुमारास शशांकाचा शेजारी व शत्रु प्राग्ज्योतिषाचा (आसाम) राजा कुमार भास्करवर्मा यानें हर्षाकडे आपला दूत पाठवून समान शत्रूविरुद्ध लढण्यासाठीं सहकार्य देण्याचें आश्वासन दिलें व हर्षाशीं कायम मैत्रीचा तह केला. कनोजजवळ हर्षानें देवगुप्ताचा पराभव केला. या सुमारास देवगुप्तानें राज्यश्रीस सोडून दिलें तेव्हां ती उद्विग्न चित्तानें विंध्याद्रीच्या जंगलांत निघून गेली. शशांकाचा समाचार घेण्यासाठीं सेनापति भंडी यास पाठवून हर्ष स्वतः राज्यश्रीच्या शोधासाठीं विंध्य पर्वताकडे वळला. अनेक प्रयत्नांनंतर पेटत्या चितेवर स्वतःस जाळून घेण्याच्या तयारींत असलेल्या राज्यश्रीस शोधून काढण्यांत हर्षाला यश आलें. तिची समजूत घालून त्यानें तिला परत आणलें. गृहवर्म्यास औरस पुत्र नसल्यानें हर्ष कनोजचा राज्यकारभार पाहूं लागला. नंतर इ. स. ६१२ च्या सुमारास कनोजचें राजपद घेऊन तेथेंच त्यानें आपली राजधानी नेली.

यानंतर हर्षवर्धन साम्राज्यवर्धनाच्या मोहिमेवर निघाला. ह्युएनत्सांग लिहितो : ‘ त्यानें पंचभारतांत (पंजाब, कनोज, मिथिला, बंगाल, ओरिसा) अखंड मोहीम केली. आपलें राज्य वाढविलें. शेवटीं त्याच्या सैन्यांत ६०,००० हत्ती, एक लक्ष घोडदळ व असंख्य पायदळ जमलें. शेवटचीं तीस वर्षें त्यानें शांततेनें कारभार केला. ’ या मोहिमेंत हर्षाला आपलें उद्दिष्ट साध्य करतां आलेलें दिसत नाहीं. कारण, त्याचा शत्रु गौडाधिप शशांक हा इ. स. ६१९ पर्यंत स्वतंत्रपणें दक्षिण बंगालचा कारभार पाहात असल्याचा उल्लेख आहे. इ. स. ६२०–६३० च्या दरम्यान हर्षानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिणेवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला. पण बदामीचा चालुक्य राजा दुसरा पुलकेशी यानें तो प्रयत्न उधळून लाविला. त्यानंतर हर्षानें पश्चिमेकडें वलभीचें राज्य जिंकण्याचा प्रयत्न केला. यावेळीं मैत्रक घराण्यांतील दुसरा ध्रुवसेन राज्य करीत होता. त्याचा पराभव होऊन तो दक्षिणेस पळून गेला. त्यानंतर हर्षानें त्याला आपली मुलगी देऊन त्याच्याशीं सख्य केलें व त्याला आपल्या छापेखालीं आणिलें. इ. स. ६४१ मध्यें त्यानें आपला एक वकील चिनी बादशहाच्या दरबारीं पाठविला. इ. स. ६४३ मध्यें त्यानें कोंगोडा (गंजम जिल्हा) राज्यावर स्वारी करून तें जिंकिलें. त्याच वर्षी चिनी वकील कनोजच्या दरबारीं आला. इ. स. ६४६ मध्यें दुसरा चिनी वकील भारतांत आला. पण इ. स. ६४७ च्या प्रारंभींच हर्षवर्धन मरण पावला व राज्यांत अराजक माजलें.

हर्षाचें साम्राज्य पूर्वपंजाव (जालंदरच्या पश्चिमेस), उत्तर प्रदेश, बिहार, प. बंगाल, ओरिसा या प्रदेशांवर पसरलें होतें. पूर्वेस आसामचा राजा भास्करवर्मा त्याचा मित्र होता व पश्चिमेस वलभीचें राज्य माळवा, गुजराथ, सौराष्ट्र व कच्छ यांवर पसरलें होतें. दोन्हीही राजे हर्षाचे व्यवहारतः मांडलिक होते.

वर्धन घराणें भारतीय धर्मसहिष्णुतेचें उत्तम उदाहरण आहे. या घराण्याचा संस्थापक पुष्पभूति शैव होता. हर्षाचे वडील व आजोबा सूर्योपासक होते. राज्यवर्धन व राज्यश्री हीनयान बौद्धपंथी असून हर्षवर्धन शैवमतानुयायी होता. त्याच्या आलेखांत त्याचा उल्लेख ‘ परममाहेश्वर ’ असा आढळतो. परंतु राज्यश्री व दिवाकरमित्र यांच्या सहवासानें हर्षाचा ओढा बौद्धमताकडे लागला. इ.स. ६२० नंतर तो केव्हां तरी बौद्धानुयायी झाला. इ. स. ६४३ च्या प्रारंभीं चिनी यात्रेकरू ह्युएनत्सांगशीं त्याची गांठ पडली. त्याच्या प्रभावी व्यक्तिमत्वानें हर्ष महायानपंथी बनला. बौद्धधर्माची महति पटविण्यासाठीं हर्षानें ह्युएनत्सांगच्या अध्यक्षतेखालीं एक सर्वधर्मपरिषद् भरविली. त्यामध्यें ह्युएनत्सांगनें आव्हानपूर्वक बौद्धमत मांडलें. हर्षाच्या भीतीनें ह्युएनत्सांगला प्रकट विरोध झाला नाहीं. तथापि त्याच्या खुनाचा प्रयत्न झाला व त्याबद्दल हर्षानें शेंकडों लोकांना कठोर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिक्षा ठोठाविल्या. बुद्धाच्या शिकवणीप्रमाणें अहिंसा धर्माचा प्रसार त्यानें केला; प्राणिहत्या कमी करण्याबद्दल हुकूम सोडले. मांसाहार निषिद्ध ठरविला. बुद्ध विहार बांधले, चैत्य व स्तूप उभारले; सार्वजनिक दवाखाने, धर्मशाळा, पाणपोया, अन्नसत्रें इ. दानधर्माचीं कृत्यें केलीं. दर पांच वर्षांनीं तो आपली संपत्ति गोरगरिबांना वांटून देई. इ. स. ६४३ मधील सहाव्या दानप्रसंगीं प्रयाग येथें ह्युएनत्सांग उपस्थित होता.

हर्ष जसा साहसी योद्धा व कुशल सेनानी होता, तसाच तो विद्वानांचा भोक्ता व स्वतः अभिजात कवि होता. सूर्यशतकाचा कर्ता मयूर कवि, हर्षचरित् व कादंबरी यांचा कर्ता बाणभट्ट व बौद्ध पंडित दिवाकरमित्र इ. अनेक विद्वानांचा तो आश्रयदाता होता. त्यानें नागानंद, प्रियदर्शिका व रत्नावली या तीन नाटिका लिहिल्या आहेत. तंत्रदृष्ट्या रत्नावली आदर्श नाटक आहे. याखेरीज सुप्रभातस्तोत्र, व अष्टमहाश्रीचैत्यस्तोत्र हीं बौद्ध स्तोत्रें हर्षानें लिहिलीं आहेत. नालंदा विद्यापीठांतील विद्वानांचाही परामर्श तो वारंवार घेत असे.

राज्यव्यवस्था :

गुप्तकालीन राज्यपद्धति याही काळांत चालू होती. दानपत्रांतून महाक्षपटालिक सामन्तमहाराजांचा उल्लेख येतो. त्यावरून कांहीं सामंत राजांना राज्यांतील अधिकारावर नेमलें असावें असें वाटतें. तसेंच महाक्षपटालिक या अधिकाऱ्याच्या उल्लेखावरून राज्यामध्यें व्यवस्थित दप्तर ठेवलें जात होतें. राज्याचे भुक्ति (प्रांत), विषय (जिल्हा), भोग (महाल), ग्राम इ. विभाग असत. विषयपति, भोगपति, आयुक्तक, प्रतिपालक पुरुष इ. विविध अधिकाऱ्यांचा उल्लेख येतो. हर्ष हा अत्यंत उद्योगी, न्यायप्रिय व दयाळू राजा होता. राज्यकारभारावर देखरेख ठेवण्यासाठीं तो जातीनें साम्राज्यांत फिरत असे. लोकसेवक या नात्यानें प्रजेला जास्तींत जास्त सुख देण्यासाठीं तो झटत असे.

प्रजेला पुष्कळ व्यक्तिस्वातंत्र्य असून वेठीची पद्धति बंद होती. सरकारी जमिनीच्या उत्पन्नापैकीं $\frac{1}{2}$ फक्त राज्यकारभारावर खर्च करण्यांत येई. उरलेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पैसा दानधर्म व विद्याकलांना राजाश्रय देण्यासाठीं खर्च होई. अधिकाऱ्यांना इनामें देण्याची पद्धति अनुसरली जाई. न्यायदान कसोशीनें केलें जाई. फौजदारी गुन्ह्यांबद्दल कडक शासन करण्यांत येई. सर्वत्र न्यायकरणिक नांवाचे न्यायाधीश नेमलेले होते. राज्यांत एकंदरींत असुरक्षितता जास्त होती. कारण ह्युएनत्संगला तीनदां जिवावरच्या प्रसंगांतून जावें लागलें. सर्व गोष्टींचा विचार करतां हर्षाची राज्यव्यवस्था त्या परिस्थितींत उत्तमच होती.

असा हा कुशल राज्यकर्ता व विजयी योद्धा इ. स. ६४७ च्या सुरुवातीस मरण पावला. हर्षाचा ध्येयवाद व्यवहारनिष्ठ असल्यानें सुमारें ४० वर्षें त्याला उत्तर भारतांत एकछत्री साम्राज्य स्थापितां आलें. त्याच्या धार्मिक वृत्तीवरून व बौद्ध धर्माला त्यानें दिलेल्या उत्तेजनावरून ' भारताचा दुसरा अशोक ' ही सार्थ पदवी त्यास देतां येईल. हर्ष निपुत्रिक वारल्यानें त्याच्या एका प्रधानानें कनोजची गादी बळकावली. त्यामुळें हर्षाचें राज्य मोडकळीस आलें.

हर्षोत्तर उत्तर भारताचा इतिहास :

हर्षाच्या मृत्यूनंतर आदित्यसेन या गुप्त राजानें पूर्व भारतांत आपलें साम्राज्य स्थापन केलें. महाराजाधिराज ही पदवी धारण करून अश्वमेध यज्ञ केला. पूर्वेस टिपेरापर्यंत त्याचें राज्य पसरलें होतें. आणखी शंभर वर्षें त्याचें राज्य टिकलें. या घराण्यांतील राजांनीं नालंदा विद्यापीठाला पुष्कळ मदत दिली.

इ. स. ७२५ च्या सुमारास यशोवर्मन् नांवाचा एक साहसी योद्धा कनोजच्या गादीवर आला त्यानें गुप्तांचा पराभव करून आपलें साम्राज्य पूर्वेकडे वाढविलें. दक्षिणेस विंध्य पर्वतापर्यंत त्यानें स्वाऱ्या केल्या. इ. स. ७३१ मध्यें त्यानें वकील पाठवून चीनशीं राजकीय संबंध प्रस्थापित केले. राजपुताना व पूर्वपंजाब हे प्रांत जिंकून काश्मीरपर्यंत सरहद्द वाढविली. काश्मीरच्या ललितादित्य नामक राजाच्या मदतीनें तिबेटवर स्वारी केली व तिबेटच्या कचाट्यांतून नेपाळ देश सोडविला. पुढें ललितादित्याची महत्त्वा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कांक्षा वाढून त्या दोघांत वितुष्ट आलें. त्यामुळें लढाई होऊन इ. स. ७४० च्या सुमारास यशोवर्मन्‌चा पराभव झाला. त्यानंतर त्याचें राज्य विलयास गेलें. यशोवर्मन् स्वतां चांगल्यापैकीं कवि असून भवभूति व वाक्पतिराज यांचा आश्रयदाता होता. वाक्पतिराजानें आपल्या ' गौडवहो ' या प्राकृत काव्यांत यशोवर्म्याच्या स्वाऱ्यांचें वर्णन केलें आहे

यानंतर माळव्यामध्यें भीनमल येथें गुर्जरप्रतिहार घराणें प्रसिद्धीस आलें. या घराण्यांतील दुसरा नागभट्ट या राजानें कनोज जिंकून तेथें आपली राजधानी नेली (इ. स. ८१६). मिहिरभोज (इ. स. ८४०–९०) हा या घराण्यांतील प्रसिद्ध राजा होता. त्यानें गुर्जरांचें साम्राज्य स्थापन केलें. त्याच्या साम्राज्यांत पूर्वपंजाब, राजपुताना, माळवा, गुजराथ, काठेवाड, उत्तर प्रदेश व विंध्यप्रदेश एवढा विस्तीर्ण प्रदेश मोडत होता. सुलेमान या अरब प्रवाशानें त्याच्या राज्यव्यवस्थेबद्दल प्रशंसोद्गार काढले आहेत. त्याच्या रौप्य नाण्यांवर आदिवराह व प्रभास या त्याच्या पदव्या आढळतात. त्याचा पुत्र पहिला महेंद्रपाल (इ. स. ८९०–९०८) हा बापासारखाच कर्तबगार निघाला. त्यानें पूर्वेकडे मगध व उत्तर बंगाल हे प्रांत जिंकून आपलें साम्राज्य वाढविलें. सुप्रसिद्ध संस्कृत कवि व नाटककार राजशेखर हा त्याच्या दरबारीं होता. यानंतरच्या काळांत गुर्जरांच्या सत्तेस उतरती कळा लागली.

भारताच्या उत्तर टोकास असलेल्या काश्मीरचा इतिहास कल्हणानें आपल्या राजतरंगिणी नामक ग्रंथांत लिहून ठेविला आहे. गुप्तोत्तर काळांत काश्मीरचें राज्य स्वतंत्र होऊन तेथील राजे उत्तर भारताच्या राजकीय घडामोडींत ढवळाढवळ करूं लागले. काश्मीरच्या कर्कोटक राजघराण्यांतील प्रसिद्ध पुरुष मुक्तापीड ललितादित्य हा होय (इ. स. ७२४–७६०). त्यानें काश्मीरला आशियांतील प्रबळ सत्ता बनविली. कनोजच्या यशोवर्म्याचा पराभव करून पूर्वेस बंगालपर्यंतचा मुलूख पादाक्रांत केला. त्याच्या तिबेट व बदकशान येथील स्वाऱ्या यशस्वी ठरल्या. काबूलचे राजे त्याचे मित्र बनले. सिंधमधील अरबांचा त्यानें पराभव केला होता. चीनशीं त्यानें स्नेहाचे संबंध प्रस्थापित केले होते. अशा रीतीनें चीनपासून नर्मदेपर्यंत व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



पृष्ठें : २७७ व २८०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बंगालपासून हिंदुकुश पर्वतापर्यंत त्याचें विजयी नांव दुमदुमत होतें. स्वतां हिंदु असूनही त्यानें बौद्धधर्मास उदार राजाश्रय दिला. मुक्तापीडाचा नातू जयापीड (इ. स. ७७५–८०६) यानें आजोबाचें साम्राज्य टिकवून धरलें. तो विद्येचा भोक्ता असून अनेक पंडितांना त्यानें राजाश्रय दिला. शेवटीं शेवटीं तो लोभी व जुलमी बनला. अनेक कर बसवून प्रजेला त्यानें पिळवटून काढलें. यानंतरच्या काश्मीरच्या इतिहासास केवळ स्थानिक महत्त्व आहे.

आठव्या शतकाच्या उत्तरार्धांत बंगालमध्यें पाल घराणें उदयास आलें. हर्षाच्या मृत्यूनंतर बंगालमध्यें सुमारें दीडशें वर्षें अंदाधुंदी होती. या अराजकाचा नायनाट करून पहिला गोपाल (इ. स. ७६५–७६९) यानें बंगालमध्यें स्थिरपद राज्य स्थापलें. तो बौद्ध असून नालंदाजवळ ओदन्तपुरी येथें त्यानें एक विद्यापीठ स्थापन केलें. त्याचा पुत्र धर्मपाल यानें कनोजपर्यंत स्वारी केली, व बंगालचें राज्य वाढविलें. त्यानें विक्रमशील या प्रसिद्ध बौद्ध विद्यापीठाची स्थापना केली. बापाचें साम्राज्य देवपाल (इ. स. ८१५–८५४) यास टिकवितां आलें नाहीं. गुर्जर प्रतिहारांच्या वाढत्या सत्तेमुळें पाल घराण्यास उतरती कळा लागली. सुवर्णद्वीपाच्या शैलेंद्र राजाच्या विनंतीवरून देवपालानें नालंदा येथील विहारास पांच गांवें इनाम दिल्याचा उल्लेख आहे. यावरून जाव्हा, सुमात्रा या दूरच्या राज्यांशीं बंगालचे संबंध स्नेहाचे होते असें स्पष्ट दिसतें.

चालुक्य घराणें :

वाकाटकांच्या पडत्या काळांत दक्षिणेस विजापूर जिल्ह्यांतील बदामी येथें चालुक्य घराण्याची स्थापना झाली. या घराण्यांतील दुसरा राजा कीर्तिवर्मन् (इ. स. ५६६–५९७) यानें कदंब सत्तेचा शेवट केला. तसेंच कोंकणांतील मौर्य व दक्षिणेकडील नलांचा पराभव करून आपलें साम्राज्य वाढविलें. यानंतरचा प्रसिद्ध राजा महाराज दुसरा पुलकेशी (इ. स. ६१०–६४२) हा होय. चुलत्याशीं लढून त्यास गादी मिळवावी लागली. पण या भाऊबंदकीमुळें जिंकलेले प्रांत स्वतंत्र झाले. पुलकेशीनें स्वपराक्रमानें दक्षिणेस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कदंबांची राजधानी वनवासी जिंकली व म्हैसूरच्या गंगघराण्याचा पराभव केला. उत्तरेस कोंकणांतील मौर्यांची नाविक सत्ता नष्ट केली. लाट, मालव व गुर्जर हे प्रांत जिंकले. जेव्हां हर्षवर्धनानें नर्मदा ओलांडून दक्षिणेवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला तेव्हां पुलकेशीनें त्याचा संपूर्ण पराभव करून त्याचा प्रयत्न हाणून पाडला. त्यानंतर पुलकेशीनें दक्षिण कोशल व कलिंग देश जिंकले. तेथून पिष्टपुराचा किल्ला घेऊन तेथील राजघराण्याचा नाश केला. वेंगी जिंकून पल्लवांचा धुव्वा उडविला व कांचीपर्यंत आपलें सैन्य नेलें. कावेरी ओलांडून पांड्य, चोल व केरळ यांच्याशीं सख्य जोडलें. अशा रीतीनें एका मागोमाग विजय मिळवून तो दक्षिणाधिप बनला. त्याची कीर्ति दिगंत पसरली. इराणचा बादशहा दुसरा खुश्रु यानें त्यास वकिलाबरोबर नजराणा पाठवून त्याची मैत्री संपादली. इ. स. ६४१ मध्यें पुलकेशीचें वैभव व कीर्ति कळसास पोहोंचली होती. चिनी प्रवासी ह्युएनत्संग यानें पुलकेशीबद्दल गौरवोद्गार काढले आहेत. परंतु पहिला नरसिंहवर्मन् पल्लव यानें पल्लवांचें सामर्थ्य वाढवून पुलकेशीवर पुनः स्वारी केली. पुलकेशी युद्धांत मारला गेला. पल्लवांनीं पूर्वीच्या पराभवाचा कलंक धुऊन काढला व बदामी राजधानी लुटून उध्वस्त केली. अशा रीतीनें पुलकेशीचा दुःखद अंत झाला. त्याचा धाकटा मुलगा पहिला विक्रमादित्य यानें त्याही कठीण परिस्थितींत स्वपराक्रमानें चालुक्य घराण्यास वर काढलें व जुनें साम्राज्य पुनः प्रस्थापित केलें. त्यानें तीन पल्लव राजांचा पराभव करून खुद्द कांची राजधानी जिंकली, व पल्लवांकडून करभार घेतला. पुढें दक्षिणेंत जाऊन पांड्य, चोल व केरळ यांचा पराभव केला व समुद्रवलयांकित दक्षिणेचा सम्राट् बनला. परंतु लवकरच पल्लवांनीं आपलें गतवैभव मिळविलें व विक्रमादित्याचा पराभव करून बदामीचा नाश केला. विक्रमादित्यानें आपला धाकटा भाऊ जयसिंह यास गुजराथचा सुभेदार नेमलें होतें. विक्रमादित्य इ. स. ६८१ मध्यें मरण पावला. त्याचा मुलगा विजयादित्य (इ. स ६८१–६९६) हाही बापासारखा पराक्रमी निघाला. त्यानेंही दक्षिणदिग्विजय केला. उत्तरेवरही त्यानें स्वारी करून उत्तराधिपाचा पराभव केला. सिलोन व पर्शिया येथील राजांनाही त्यानें मदत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केल्याचा उल्लेख शिलालेखांत आढळतो. त्याचा पुत्र विजयादित्य (६९६-७३३) यानें शांततेनें राज्यकारभार केला. इ. स. ७३१ च्या सुमारास पल्लवांचा पुनः पराभव करून त्यानें जब्बर खंडणी वसूल केली. नंतर आलेला दुसरा विक्रमादित्य (इ. स. ७३३–७४७) यानें पल्लवांचा पराभव करून कांची नगरी जिंकली. तेथील मंदिरांना देणग्या देऊन आपलें यश तेथील देवालयांतून कोरविलें. नंतर दक्षिणदिग्विजय करून धनुष्कोडी येथें विजय-स्तंभ उभारला. याच्या कारकीर्दींत सिंधमधील अरबांनीं उत्तर गुजराथ जिंकून दाक्षिणेवर स्वारी करण्याचा प्रयत्न केला. परंतु गुजराथच्या चालुक्य सुभेदारानें त्यांचा फडशा उडवून मुसलमानांच्यापासून दक्षिणेचें संरक्षण केलें. विक्रमादित्याच्या मृत्यूनंतर चालुक्य सत्तेस उतरती कळा लागली व दक्षिणेची सार्वभौम सत्ता राष्ट्रकूट घराण्याकडे गेली.

राष्ट्रकूट घराणें :

राष्ट्रकूट हे महाराष्ट्राचे मूळचे रहिवासी असून बरेच दिवस ते चालुक्याचे अंकित होते. या घराण्यांतील दंतिदुर्ग यानें स्वातंत्र्य पुकारून नवीन घराण्याची स्थापना केली (इ. स. ७४७). त्यानें गुर्जर राज्य व माळव्यांतील गुर्जरप्रतीहारांचें राज्य जिंकून मध्यप्रदेशापर्यंत आपली सत्ता वाढविली. इ. स. ७५३ मध्यें चालुक्याच्या सत्तेशीं त्याचा संग्राम होऊन त्यांत चालुक्यांचा पराभव झाला व राष्ट्रकूटांची सत्ता दक्षिणेस सर्वत्र पसरली. दंतिदुर्गाच्या मृत्यूनंतर त्याचा चुलता कृष्ण गादीवर आला. चालुक्य राजानें पुनः एकदां आपलें राज्य मिळविण्याचा निकराचा प्रयत्न केला. पण त्याचा पराभव होऊन चालुक्य सत्ता कायमची नष्ट झाली (इ. स. ७६०). कृष्ण राजानें राष्ट्रकूटांच्या साम्राज्याची भक्कम उभारणी केली. त्यानेंच वेरूळचें सुप्रसिद्ध कैलासमंदिर खोदविलें. यापुढील राजांनीं भारताची सार्वभौम सत्ता मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यामध्यें त्यास गुर्जरप्रतीहार व पाल घराण्यांशीं उत्तरेंत झगडा द्यावा लागला. तिसरा राष्ट्रकूट राजा ध्रुव (इ. स. ७७९–७९३) यानें विंध्य पर्वत ओलांडून उत्तरेवर स्वारी केली, व गुर्जरप्रतीहार राजा वत्सराज याचा पराभव करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यास राजपुतान्याच्या वाळवंटांत पळवून लावलें. नंतर पूर्वेकडे वळून पाल राजा धर्मपाल याचा पराभव करून तो भारताचा सम्राट् झाला. यानंतरचा राजा तिसरा गोविंद (इ. स. ७९४–८१३) यास सुरुवातीस थोरल्या भावांशीं वारशाचें युद्ध करावें लागलें. या भाऊबंदकीमुळें अनेक सामंत राजे स्वतंत्र झाले व उत्तरेकडील साम्राज्य सोडून द्यावें लागलें. सहा वर्षांनीं त्याचें आसन स्थिर झाल्यावर त्यानें सार्वभौम सत्ता पुनः प्रस्थापित करण्याचा चंग बांधला. इ. स. ८०३ मध्यें पल्लव व पूर्वेचें चालुक्य घराणें यांचा पराभव करून दक्षिणेंतील आपलें स्थान त्यानें बळकट केलें. नंतर उत्तरेकडे मुलुखगिरी करण्यासाठीं तो बाहेर पडला. तेथें त्यानें गुर्जर राजा दुसरा नागभट व बगालचा धर्मपाल यांचा पराभव करून सर्व गंगेचें खोरें आक्रमण केलें. दक्षिणेंत परतल्यावर गंग व पल्लव राजांविरुद्ध पुनः मोहीम केली व कांची शहराचा ताबा घेतला. त्याच्या पराक्रमाचा दरारा वाटून सिलोनच्या राजानेंही त्यास नजराणा पाठवून त्याची सत्ता मान्य केली. यामुळें राष्ट्रकूटांची सार्वभौम सत्ता आसेतुहिमाचल पसरली.

गोविंदाच्या मृत्यूनंतर त्याचा अल्पवयी पुत्र अमोघवर्ष (इ. स. ८१४-८८०) गादीवर आला. त्यामुळें सामंत राजे पुनः स्वतंत्र झाले व खुद्द अमोघवर्षास कांहीं काळ राज्य सोडून जावें लागलें. पुढें तो वयांत आल्यावर त्यानें पुनः गादी मिळविली. इ. स. ८६० मध्यें त्यानें वेंगीच्या विजयादित्य राजाचा पराभव केला. त्यानें पश्चिमेच्या गंगांचें स्वातंत्र्य मान्य केलें. एकंदरींत तो शांततेचा भोक्ता असल्यानें राजकारणांत त्यानें आक्रमक वृत्ति दाखविली नाहीं. हिंदु असूनही त्यानें जैनधर्माला उदार आश्रय दिला. त्यानें मान्यखेट येथें राष्ट्रकूटांची राजधानी हालविली. त्यानें कन्नड भाषेमध्यें ग्रंथरचनाही केल्याचें प्रसिद्ध आहे. यानंतर राष्ट्रकूटांची सत्ता अवनतीस गेली.

कांचीचें पल्लव घराणें :

शंगम् काळानंतर तामीळ देशांत पल्लव घराणें प्रसिद्धीस आलें. त्यांचें मूळ निश्चित रीतीनें अनुमानितां येत नाहीं. इसवी सनाच्या सुरुवातीस ते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शातवाहनांचे अंकित म्हणूव कृष्णेच्या दक्षिणेस राहात असावे. शातवाहनांच्या अस्तानंतर ते स्वतंत्र होऊन दक्षिणेंत कांची येथें त्यांनीं स्वतंत्र राज्य स्थापिलें. समुद्रगुप्तानें चौथ्या शतकांत कांचीच्या विष्णुगोपाचा पराभव केला. पुढें दीडशें वर्षें उत्तरेकडील कलभ्रांच्या आगमनामुळें सर्वत्र अराजक माजलें. या काळांतहि कांचीचें शैक्षणिक व धार्मिक महत्त्व टिकून राहिलें. अराजकाचा नाश करून सिंहविष्णु (इ. स. ५७५–६००) यानें पल्लवांची सत्ता पुनः प्रस्थापित केली. कावेरीपर्यंतचा मुलूख त्यानें जिंकला व अवनिसिंह ही पदवी धारण केली. चोल, पांड्य व कलभ्र यांचा त्यानें पराभव केला व सार्वभौमत्वाच्या चढाओढींत पल्लवांचें पदार्पण झालें. यानंतरचा राजा पहिला महेंद्रवर्मन् (६००–६३०) कर्तबगार निघाला. दक्षिणेंत त्यानें त्रिचनापल्लीपर्यंत आपली सत्ता वाढविली. तो स्वतां कवि असून गायन व शिल्पकलांचा भोक्ता होता. त्यानें बापासारख्याच अनेक पदव्या धारण केल्या. तो अष्टपैलू होता असें त्याच्या विविध कामांवरून दिसतें. प्रथमतः तो जैनधर्मी होता व त्यावेळीं त्यानें अन्यधर्मीयांचा छळ केला. नंतर अप्पर या संताच्या शिकवणीनें तो शैवपंथी बनला. त्यानें अनेक देवळें बांधलीं. तसेंच चित्र व नृत्यकलांनाही उत्तेजन दिलें. त्यानें लिहिलेलें संस्कृत प्रहसन उपलब्ध आहे. महाराष्ट्रांतील चालुक्य राजांशीं त्यास अनेक वर्षें झगडावें लागलें. पहिला नरसिंहवर्मन् (इ. स. ६३०–६६८) यानें दुसऱ्या पुलकेशीशीं लढून त्याचा पराभव केला, व चालुक्य राजधानी बदामीवर हल्ला करून लुटालूट केली व ती राजधानी उध्वस्त केली (इ. स. ६४२). सीलोनवर दोनदां नाविक स्वाऱ्या करून आपल्या आश्रित राजपुत्रास तेथील गादी मिळवून दिली. मामल्लपुर येथें समुद्रकिनाऱ्यावरील खडकांत त्यानें कांहीं देवळें खोदविलीं. याच्या कारकीर्दींत ह्युएनत्सांगनें कांचीस भेट दिली. दाक्षिणात्यांच्या विद्याप्रियतेची चिनी प्रवासी फार स्तुति करतो. तेथील राजविहारांत १०,००० बौद्ध भिक्षु राहात होते. तथापि दक्षिणेकडे जैनधर्म प्रभावी होता. पहिला परमेश्वरवर्मन् (इ. स. ६७०–६९५) याच्या कारकीर्दींत विक्रमादित्य चालुक्य थेट कांचीवर चालून आला व कांची घेऊन त्रिचनापल्लीपर्यंत त्यानें आक्रमण केलें. परंतु शेवटीं त्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हुसकून लावण्यांत परमेश्वरवर्म्याला यश मिळालें. यानेंच मामल्लापुर येथें गणेशरथ बांधिला. तो शैवपंथी असून त्यानें अनेक शिवमंदिरें बांधलीं. दुसरा नरसिंहवर्मन् (६९५–७२२) याची कारकीर्द शांततेची झाली. त्यानें कांची येथील प्रसिद्ध कैलासनाथ मंदिर व मामल्लपूर येथें एक रथ बांधिला. विविध कलांना त्यानें उत्तेजन दिलें. नंदिवर्मन् पल्लवमल्ल (इ. स. ७३०–८००) यास चालुक्य राजा विक्रमादित्य याच्याशीं लढण्यांत अपयश आलें व कांची चालुक्याच्या हातीं पडली. तेव्हां त्यानें कुंभकोणम्-जवळ नंदिपुर येथें राजधानी नेली. दक्षिणेंतील पांड्य राजा राजसिंह याच्याशीं त्यास दीर्घकाळ झगडावें लागलें. राष्ट्रकूट दंतिदुर्गानेंही कांचीवर स्वारी करून तें शहर जिंकलें. नंतर पल्लवराजानें मांडलिकत्व कबूल केल्यावर त्याच्याशीं सख्य केलें. नंदिवर्मन् वैष्णवपंथी होता. सुप्रसिद्ध वैष्णव संत तिरुमंगाइ अलवार याच काळांत होऊन गेला. कांची येथील मुक्तेश्वर व वैकुंठपेरूमल ही मंदिरें नंदिवर्म्यानें बांधलीं.

यानंतरच्या पल्लव राजांची शक्ति पांड्य राजांशीं लढण्यांत क्षीण झाली व शेवटीं दक्षिणेंतील अधिसत्ता चोल घराण्याकडे गेली.

पांड्य घराणें :

पांड्य घराण्याच्या उदयास अरिकेसरि मारवर्मन् (इ. स. ६७०-७१०) याच्यापासून सुरुवात होते. त्यानें केरळ व इतर लहान राज्यें जिंकून पांड्यांचें राज्य वाढविलें. व चालुक्य राजाच्या मदतीनें परमेश्वरवर्मन् पल्लवाचा पराभव केला. त्यानें चोल राजकन्येशीं विवाह केला व तिच्या सांगण्या-वरून शैव संत संबंधर यास मदुरेस बोलाविलें. त्याच्या शिकवणीनें अरि-केसरीनें जैनधर्माचा त्याग करून शैवपंथाची दीक्षा घेतली व जैनांचा छळ केला. मारवर्मन् पहिला राजसिंह (इ. स. ७३५–७६५) यानें सबंध कावेरी मुलूख जिंकला व नंदिवर्मन् पल्लवमल्लाला कचाट्यांत पकडलें. इ. स. ७५० मध्यें त्यानें गंग व चालुक्य यांच्या संयुक्त सेनेचा पराभव केला. यानें अनेक महादानें केल्याचा उल्लेख आहे. यानंतर गादीवर आलेला जटिल परांतक वरगुण (इ. स. ७६५–८१५) यानें अनेक लढाया करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पांड्यांचें साम्राज्य वाढविलें. पल्लव व केरळ यांचा पराभव करून त्यानें कावेरीच्या दक्षिणेकडील व दक्षिण मलबारचा मुलुख आपल्या साम्राज्यास जोडिला. त्यानें अनेक शिव व विष्णु देवालयें बांधलीं. महान् वैष्णव संत माणिक्य वाचकर हा वरगुणाचा कांहीं दिवस प्रधानामात्य होता. श्रीमार श्रीवल्लभ (इ. स. ८१५-८६५) यानें गंग, चोल, पल्लव व मगध यांच्या संयुक्त सैन्याचा कुंभकोणमूच्या लढाईत धुव्वा उडविला व पूर्वघाट व कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशावर स्वामित्व स्थापन केलें. नंतर त्यानें सीलोनवर स्वारी करून उत्तरेकडील प्रांतांत लुटालूट केली व राजधानीची जाळपोळ केली. श्रीमाराचे अखेरचे दिवस मोठ्या दुःखांत गेले. नृपतुंग पल्लवराजानें त्याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला. सीलोनी सैन्यानें मदुरा जिंकून पांड्य राजाची दाणादाण उडविली. यानंतर पांड्य राजांची सत्ता दुर्बल होत गेली व शेवटीं चोलांच्या साम्राज्यांत पांड्य राज्य विलीन झालें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण बाविसावें

गुप्तोत्तर कालाचें समालोचन

राजकीय सिद्धांत :

भारताच्या राजकीय सिद्धांतामध्यें या काळांत फारशी महत्त्वाची भर पडली नाहीं. देशांत वाढतें राजकीय अस्थैर्य होतें. कोणत्याही एका सत्तेची हुकमत फार काळ टिकली नाहीं. त्यामुळें संकुचित राजनिष्ठा वाढीस लागून राष्ट्रनिष्ठेचा उदय भारतांत होऊं शकला नाहीं. राजांची महत्त्वाकांक्षा वाढून मोठमोठीं बिरुदें लावण्याची पद्धति वाढली. 'महाराजाधिराज', 'परमेश्वर', 'परमभट्टारक' या सामान्य पदव्या झाल्या. 'सत्याश्रय', 'पृथ्वीवल्लभ', 'सत्यसंध', 'महेंद्रविक्रम' इत्यादि बिरुदें चालुक्य, पल्लव इ. दाक्षिणेंतील राजे आपल्या नांवापुढें लावीत असत. पुराणें व शुक्रनीति या ग्रंथांतून राजाचें देवत्व हिरिरीनें पुरस्कारिलें आहे. शुक्रनीतीमध्यें प्रजातंत्र राज्याच्या कांहीं जुन्या कल्पनाही सांगितलेल्या आहेत. उदा. 'ब्रह्मदेवानें प्रजेचा सेवक म्हणून राजास निर्माण केलें व महसूल हा राजाचा पगार ठरविला.' 'विद्वान् राजानेंही मंत्र्यांच्या सल्लामसलतीवांचून कोणतीही गोष्ट करूं नये.' 'कोणतीही गोष्ट करण्यापूर्वीं संबंधित खात्यांच्या मंत्र्यांकडून लेखी मतें मागवावींत व बहुमत अनुकूल असल्यासच ती गोष्ट करावी.' 'प्रजा व राजपुरुष यांच्या विवादांत राजानें नेहमीं प्रजेचीच बाजू घ्यावी.' 'दुर्बल, नीतिभ्रष्ट व दुर्वर्तनी राजाचा प्रजेनें त्याग करावा.' परंतु एकंदरींत अनियंत्रित राजसत्तेकडे वाढता कल होता. आचारधर्माचें वाढतें महत्त्व व नाना धर्मपंथांचा उदय यामुळें प्रजेंतील विद्वानांचें लक्ष धर्म व तत्त्वज्ञान यांच्या अभ्यासाकडे लागलें व राज्यशास्त्राची प्रगति खुंटली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यव्यवस्था :

या धामधुमीच्या काळांत राजे लोक स्वतः लढायांत भाग घेत. सैन्याचें नेतृत्व स्वीकारून दूरवर मोहिमेस जात. त्यामुळें मंत्री व राजपुरुष या नोकरशाहीवर राज्यकारभाराची सारी मदार असे. त्यांच्या वाढत्या महत्त्वाचें एक गमक म्हणजे या काळांतील आलेखांमध्यें अनेक अधिकाऱ्यांचा उल्लेख आढळतो. तसेंच, सत्तेचें विकेंद्रीकरण होणें अपरिहार्य होतें. विषयपति, ग्रामकूट, ग्रामसभा यांच्या हातीं अधिक सत्ता होती. महाजन व नगरें यांना स्वायत्ततेच्या सनदा राजाकडून मिळाल्याचीं उदाहरणें चालुक्यांच्या इतिहासांत आहेत. या नोकरशाही कारभारामध्येंही चांगल्या परंपरा निर्माण झाल्या होत्या. राज्यकारभाराचीं वेगवेगळीं खातीं असून त्यांवर जबाबदार मंत्र्यांची नेमणूक होई.

राज्याचे देश (प्रांत) व विषय, आहार वा राष्ट्र (जिल्हा) व ग्राम, नगर इ. विभाग असत व त्यावर देशाधिप, विषयपति, राष्ट्रिक, ग्रामकूट, ग्रामभोजक इ. अधिकारी विविध राज्यांतून असत. राज्याच्या उत्पन्नाचें प्रमुख साधन जमिनीचा महसूल असे. महसूल ठरविण्यासाठीं जमिनीची मोजणी करून आकार ठरविला जाई. याखेरीज व्यापार व उद्योगधंदे यांवर कर व जकाती असत. दक्षिणेंतील कांहीं राज्यांतून राजाच्या लहरीप्रमाणें विविध कर द्यावे लागत. साखर व मीठ यांवरही करआकारणी होई. मिळकतीवर वारसाकर द्यावा लागे. जंगलें, खाणी, डोंगर व नद्या हीं सरकारी मालकीचीं असत व तेथील उत्पन्नाचे लिलांव केले जात.

न्यायदानाच्या बाबतींत लेखी पुराव्यास महत्त्व देण्यांत येई. पुराव्याच्या अभावीं विविध प्रकारचीं दिव्यें करावीं लागत. न्यायाच्या कामीं जातीप्रमाणें कमीअधिक सवलती मिळत. बरेचसे तंटे जातिपंचायत वा श्रेणीमार्फतच मिटत असत, व जातिपंचायतीनें केलेल्या शिक्षेस राजमान्यताही मिळे. दिवाणी व फौजदारी गुन्हे एकाच न्यायाधिशापुढें चालत. राज्यकारभारांत मुलकी व लष्करी अधिकारी वेगवेगळे नसत. कामाचा मोबदला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणून वस्तुरूपानें पगार दिला जाई वा जमिनीचें उत्पन्न तोडून देण्यांत येई. त्यामुळें सरंजामदारांचा प्रबल वर्ग निर्माण झाला व राजकीय अस्थैर्यांत त्यांनीं भरच घातली. पुष्कळदां प्रांतावर नेमलेले राजपुत्र स्वतंत्र शाखा स्थापीत व मध्यवर्ती सत्तेला विरोध करून ती दुर्बल करीत.

दक्षिण भारतांत या काळांत ग्रामसभांची वाढ झाली. गांवाच्या सीमेंत राज्याचे सर्व अधिकार अशा सभा उपभोगीत. वेगवेगळ्या राज्यांत या ग्रामसभांची वेगवेगळी घटना आढळून येते. कोठें मतदान पद्धतीनें ही निवड होई, तर कोठें गांवांतील प्रमुख व्यक्ति (महाजन) मिळून ग्रामसभा बनत असे. या ग्रामसभेचें कामकाज स्थानिक देवालयाच्या मंडपांत चाले. वेगवेगळ्या कामांसाठीं विविध समित्या असत. या समित्यांची निवड लोकशाही पद्धतीनें होई. ग्रामसभेस स्वतःची मालमत्ता असे. गांवांतील भांडणतंटे मिटविण्याचे व गुन्हेगारांना शिक्षा करण्याचे अधिकार असत. धर्मादाय व विश्वस्त निधीची व्यवस्था ग्रामसभा पाही. स्थानिक बाजाराची व्यवस्था व करवसुली हीं कामें सभा करी. गांवांतील लोकांकडून सार्वजनिक कामांसाठीं सक्तीनें काम करून घेण्याचा सभेस अधिकार असे. गांवांतील पिण्याचें पाणी, शेतीचा पाणीपुरवठा, तळीं व उद्यानें, रस्ते यांची व्यवस्था सभा पाहात असे. स्थानिक परिस्थित्यनुरूप सरकारी करांत फेरबदल करण्याचा अधिकार ग्रामसभेस असे. गांवांतील देवळांची व्यवस्था, शिक्षण, पाठशाळा, धर्मशाळा इ. कामें ग्रामसभेस करावीं लागत. चोर-दरोडेखोरांपासून व परचक्रापासून गांवाचें रक्षण करण्यामध्येंही सभेसच पुढाकार घ्यावा लागे. सरकारमार्फत ग्रामसभेचे हिशेब तपासले जात व जनद्रव्यापहार करणाऱ्यास कडक शासन केलें जाई. याप्रमाणेंच जिल्हा व प्रांत यांच्याही महासभा असल्याचा उल्लेख चोलांच्या आलेखांतून आढळतो. प्रतिनिधीमार्फत लोकशाही चालविण्याची ही अभिनव कल्पना दक्षिण भारताची देणगी आहे.

धार्मिक परिस्थिति :

हिंदुधर्म : वेदांचें प्रामाण्य मानूनही पुराणांनीं वैदिक धर्माला नवीन स्वरूप दिलें होतें. राजे लोकांनीं अनेक वैदिक यज्ञ केले तरी यज्ञमार्ग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकप्रिय झाला नाहीं. पुराणांनीं सांगितलेला व्रतवैकल्यें, स्नान, जप, दान व भक्ति यांचा धर्म समाजांत रुजला होता. मूर्तिपूजा व देवालयें यांची वाढ होऊन हिंदुधर्माला विशाल सामाजिक स्वरूप प्राप्त झालें. शैव व वैष्णव पंथांनीं आपल्या सोप्या भक्तिमार्गामुळें सामान्य जनतेच्या मनाची पकड घेतली. दक्षिणेंतील बहुतेक राजांनीं हिंदुधर्माला आश्रय देऊन त्याच्या प्रसारास मदत केली. कुमारिलभट्ट व शंकराचार्य यांनीं तात्त्विक क्षेत्रांत बौद्ध व जैन मतांचें खंडण करून हिंदुधर्माचा जोरदार पुरस्कार केला. दक्षिणेकडे झालेल्या नायनार (शैव) व आलवार (वैष्णव) या तामीळ संतांनीं आपल्या भक्तिरसपूर्ण कवनांनीं शैव-वैष्णव पंथांच्या प्रसारामध्यें महत्त्वाचें कार्य केलें आहे. अप्पर, ज्ञानसंबंधर व सुंदरमूर्ति यांचीं भक्तिकाव्यें तामीळ शैवांचे धर्मग्रंथ बनले आहेत. तिरुमंगाई, नम्मालवार इ. वैष्णव भक्तांनींही लोकांना भक्तिमार्गाकडे वळविण्याचें महान् कार्य केलें. मठ व मंदिरें यांनींही या कामीं उल्लेखनीय कामगिरी बजाविली आहे. सामान्य जनतेस धर्माचें स्वरूप मूर्ति व देवळें यांतूनच व्यक्त होत असतें.

शैव-वैष्णव पंथांमध्यें अनेक उपपंथ या काळांत निर्माण झाले. शैवांच्या कापालिक, पाशुपत, कालामुख इ. कांहीं पंथांतून कांहीं वामाचारही रूढ झाले. उत्तरेकडे पूर्वभारतांत तांत्रिक धर्माचा वाढता प्रसार झाला. शाक्त-पंथानें स्त्रीशक्तीला प्राधान्य देऊन प्रचलित केलेला भक्तिमार्ग वामाचारामध्यें रूपांतरित होणें अटळ होतें. सूर्य, गणेश, कार्तिकेय इ. देवतांच्या उपासनाही लोकप्रिय होत होत्या. पुराणांनीं देशभर अनेक तीर्थक्षेत्रें निर्माण केलीं होतीं. त्यांची तीर्थयात्रा करण्याची वाढती प्रवृत्ति दिसून येई. बौद्ध व जैन धर्मांतील कांहीं चांगल्या गोष्टी हिंदुधर्मानें स्वीकारल्या व शेवटीं बुद्धालाच विष्णूचा अवतार ठरवून टाकलें व यामुळें हिंदुधर्माच्या वाढीस मदत झाली.

अवतारकल्पनेचा खूपच विस्तार होऊन देवतांचे विविध अवतार व त्यांच्या उपासना प्रचलित झाल्या. विविध पंथांमधील संघर्ष टाळण्यासाठीं संयुक्त देवता व देवताद्वंद्वांची कल्पना प्रचारांत आली. याच कल्पनेंतून लक्ष्मीनारायण, अर्धनारीनटेश्वर, हरिहर, दत्तात्रेय, त्रिमूर्ति, हरनारायण, ब्रह्म, राधाकृष्ण या देवतांचा जन्म झाला. देवतामाहात्म्यें, स्थानमाहात्म्यें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीर्थमाहात्म्यें लिहिलीं जाऊन या सर्वांना लोकप्रिय करण्याचा सहेतुक प्रयत्न झाला.

राजकीय जीवनांत राजाचें देवत्व स्थिरतर झाल्यावर धार्मिक क्षेत्रांतही गुरूचें देवत्व प्रतिपादण्याकडे प्रवृत्ति वाढली. सद्गुरूवांचून धार्मिक जीवन अशक्य आहे असाही उपदेश होऊं लागला. ब्राह्मण हे सर्व वर्णांचे गुरु असल्यानें भूदेव आहेत असें आग्रहानें प्रतिपादन होऊं लागलें. सर्व वर्णाश्रमांचे आचार ब्राह्मणांनीं निश्चित करावेत. कोणत्याही देवाच्या उपासनेंत ब्राह्मणास अग्रस्थान द्यावें असे नियम झाले.

बौद्ध धर्म :

गुप्त काळानंतर बौद्धधर्माची पीछेहाट होत गेली. हर्षवर्धनानें बौद्ध धर्माचा स्वीकार करून त्यास राजाश्रय दिला तरीही बौद्धधर्मास जुनें वैभव प्राप्त झालें नाहीं. बंगालमध्यें पाल घराण्याच्या आश्रयानें कांहीं काल तो धर्म टिकला. तरी नंतर आलेल्या सेन राजांनीं हिंदु धर्माचा पुरस्कार केल्यानें बौद्ध धर्मास उतरती कळा लागली. आठव्या शतकांत सिंधमध्यें मुसलमानी सत्ता सुरू होऊन बौद्ध धर्माची तेथून हकालपट्टी झाली. नेपाळमध्येंही शैवपंथाशीं संमिश्रण होऊनच बौद्ध पंथ टिकूं शकला. दक्षिण भारतांत चालुक्य, राष्ट्रकूट, होयसळ, पल्लव, पांड्य इ. राजांनीं शैव वा वैष्णव पंथाचा पुरस्कार केला. त्यामुळें बौद्ध पंथ केवळ तुरळक स्वरूपांत कांहीं ठिकाणीं शिल्लक राहिला.

बौद्ध धर्माच्या ऱ्हासाचीं कारणें :

बौद्ध धर्माला जन्मस्थानींच विलयास जावें लागल्याचा चमत्कार घडल्यामुळे त्याची कारणमीमांसा विचारणीय आहे. अनेक विद्वानांनीं निरनिराळीं कारणें दिलेलीं आहेत. कोणत्याही धर्मपंथाच्या ऱ्हासाचा निश्चित काल सांगणें कठीण असलें, तरी गुप्तोत्तर कालांत बौद्ध धर्माचें भारतांतून उच्चाटन झालें हें सत्य आहे. (१) बौद्ध धर्माचा राजाश्रय तुटला. गुप्त काळापासून वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन होऊन बौद्ध धर्म मागें पडला. या काळांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बहुतेक राजांनीं शैव, वैष्णव इ. पंथांचा स्वीकार करून हिंदुधर्माचा पुरस्कार केला. हर्ष व कांहीं पाल राजे याखेरीज इतरांकडून बौद्धधर्मास उत्तेजन मिळालें नाहीं. या काळांतील ताम्रपट, शिलालेख, दानपत्रें पहिल्यास या म्हणण्याची सत्यता पटेल. भारतामध्यें बौद्धधर्मीयांचा छळ झाल्याची उदाहरणें क्वचितच आढळतात. भारतीय परंपरेंतील बहुतेक राजे परधर्मसहिष्णु होते. त्यामुळें बौद्ध धर्मास भारतांतून बळजबरीनें हद्दपार केलें हें विधान अज्ञानमूलक आहे. (२) हूण व इस्लाम यांचीं आक्रमणें. या आक्रमकांनीं बौद्धांचे विहार व मंदिरें यांचा विध्वंस करून लुटालूट केली व शेंकडों भिक्षूंना ठार मारलें. बौद्ध धर्माचा आधार संघाराम व विहार होते. त्यांच्या नाशाबरोबर बौद्ध धर्माचाही नाश ओढवला. हूणांनीं केलेल्या विध्वंसाचें करुण वर्णन ह्युएनत्सांगनें केलें आहे. (३) बौद्धधर्मांतील वाढते मतभेद. बौद्धधर्मामध्यें आचार व तत्त्वज्ञान यांवरून अनेक पंथभेद निर्माण झाले व परस्परांशीं वादविवाद करण्यांतच त्यांची शक्ति खर्च होऊन धर्मप्रसाराकडे दुर्लक्ष झालें. (४) बौद्ध पंथांची आध्यात्मिक अवनति—गौतमबुद्ध हा जगाला निर्वाणमार्ग दाखविणारा कळकळीचा आचार्य ही कल्पना जाऊन तो दैवी विभूति बनला. त्याच्याभोंवतीं काल्पनिक कथांचें जाळें विणलें गेल्यानें त्याचें प्रभावी व्यक्तिमत्व झांकलें गेलें. बौद्धधर्मानें लोकांना खूष करण्यासाठीं अनेक हलक्या गोष्टींचा स्वीकार करून धर्माची शुद्धता घालविली. महायान पंथानें भक्तिमार्गाचा स्वीकार करून बुद्धभक्तीची शिकवण दिली. त्यामुळें चारित्र्यशुद्धतेवरील जोर कमी झाला. शाक्तपंथाच्या सहवासानें बौद्धपंथांतही वामाचार सुरू झाले. भिक्षूनें स्त्रीसंग करण्यासही हरकत नाहीं असें म्हणण्यापर्यंत अनाचार बोकाळला. संघास मिळालेल्या देणग्यांमुळें संघ खुशालचेंडू, आळशी व अनाचारी लोकांचें आश्रयस्थान होऊन बसला व त्याची प्रचाराची शक्ति नष्ट झाली. अंतर्गत भ्रष्टतेमुळें बौद्ध धर्म विनाशाच्या गर्तेकडेच जात होता. (५) ब्राह्मणधर्माचें पुनरुज्जीवन. जुन्या वैदिक धर्मानें भक्तिपंथांचा स्वीकार करून आपला कायापालट केला व नवीन धर्म आकर्षक, सोपा व संग्राहक बनला. पुराणांनीं लोककथांच्या द्वारें तो लोकप्रिय केला. कुमारिलभट्ट, शंकराचार्य इ. महान् आचार्यांनीं तत्त्वज्ञानाच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षेत्रांत बौद्ध धर्माची दुर्बलता सिद्ध करून लोकांचीं मनें हिंदु तत्त्वज्ञानाकडे आकर्षून घेतलीं. बौद्ध धर्मातील कांहीं चांगल्या गोष्टींचा हिंदुधर्मानें स्वीकार केला. (६) परकीय आक्रमकांना अहिंसक बौद्धधर्म पचण्यासारखा नसल्यानें बौद्धधर्माचा प्रसार त्यांच्यांत होऊं शकला नाहीं. (७) महायान पंथानें संस्कृत भाषा, मूर्तिपूजा, श्रद्धा व भक्ति यांचा स्वीकार केल्यानें तो भक्तिपंथाच्या अगदीं जवळ आला होता. वैष्णवांनीं बौद्धावतार मान्य केल्यानें महायान व वैष्णव यांतील फरक नाहींसा होऊन महायान म्हणजे वैष्णवांचाच उपपंथ ही भावना जनतेंत फैलावली. हीनयान पंथांतील कडक आचारांमुळें त्याची शैवपंथाशीं तुलना होऊन शैवपंथाचाच भाग म्हणून त्याची गणना झाली. अशा रीतीनें हिंदुधर्मानें बौद्ध धर्माला आत्मसात् केल्यानें त्याचें स्वतंत्र अस्तित्व नाहींसें झालें.

बौद्ध धर्माचे परिणाम :

(१) राजकीय एकीकरणास मदत झाली. (२) बौद्ध धर्मप्रसारामुळें आशियांतील देशांशीं भारताचा दीर्घकाल घनिष्ठ संबंध आला. (३) अहिंसावृत्ति, शाकाहाराची आवड व शांतताप्रियता यांची भारतांत वाढ झाली. (४) वैदिक कर्मकांड व यज्ञयाग यांच्याबद्दल अप्रियता निर्माण झाली. मोठ्या प्रमाणावर धर्मप्रचार करून धर्मांतर घडवून आणण्याची वृत्ति वाढली. (५) मूर्तिपूजा, देवळें, उत्सवसमारंभ, तीर्थयात्रा, दानधर्म यांची वाढ झाली. (६) बौद्धविहारांनीं शिक्षणक्षेत्रांत महनीय कामगिरी बजावली आहे. दृष्टीची विशालता, विद्याप्रेम व अविश्रांत बौद्धिक प्रयत्न, अखंड ज्ञानसाधना यांमुळें त्यांची कीर्ति दिगंत पसरून भारताचें नांव उज्ज्वल झालें. (७) स्त्रियांच्या सामाजिक स्थितींत सुधारणा झाली. याज्ञवल्क्यासारख्या कट्टया स्मृतिकारालाही स्त्रीधनाची कल्पना पुरस्कारावी लागली. जातिभेदाचें बंड मोडून सामाजिक समता स्थापण्याच्या प्रयत्नांना बौद्ध धर्मानें स्फूर्ति दिली. (८) तत्त्वज्ञान अधिक लोकाभिमुख बनलें. त्याचा अभ्यास सामान्य जनाच्या आटोक्यांत आला. (९) भारतीय स्थापत्य, शिल्प इ. कलांना उत्तेजन मिळालें व अनेक कलाकृति निर्माण झाल्या.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

(१०) शाकाहार व अहिंसा यांच्या पुरस्कारामुळें क्षात्रवृत्तीचा ऱ्हास होऊन परकीय आक्रमणास भारतदेश सहज बळीं पडला.

जैन धर्म :

ब्राह्मणधर्माच्या वाढत्या प्रसारामुळें गंगेच्या खोऱ्यांतून जैन धर्माची पीछेहाट झाली होती. पश्चिमेस मैत्रक व गुर्जर राजांनीं जैन धर्माचा स्वीकार करून त्या धर्मास राजाश्रय दिल्यामुळें पश्चिम माळवा, गुजराथ, काठेवाड या ठिकाणीं जैनधर्माचा चांगला प्रसार झाला. सहाव्या ते आठव्या शतका-पर्यंत दक्षिणेंत जैनांची भरभराट होती. अनेक राजघराणीं, त्यांचे अमात्य व सामन्त राजे यांनीं जैनधर्माला चांगल्या रीतीनें वागविलें. पुष्कळदां जैनाचार्यांना आश्रय देऊन त्यांच्या धर्मप्रसारास या राजांनीं साहाय्यच केलें. म्हैसूरचे गंग राजे हे स्वतः जैनधर्मी होते. कदंबराजांनीं स्वतः जरी जैन धर्माचा स्वीकार केला नाहीं तरी त्यांच्या प्रजेमध्यें जैनधर्मीयांचा भरणा असल्यानें त्या राजांनीं जैन धर्मास पुष्कळच मदत केली. चालुक्य राजांनीं जैन धर्मास उदारतेनें वागविलें. सुरुवातीस पांड्य व पल्लव राजेही जैनपंथी होते. पुढें शैवधर्माच्या वाढत्या व आक्रमक प्रसारामुळें दक्षिणेंतून जैन धर्माची पीछेहाट झाली. राष्ट्रकूट राजांनीं जैन धर्मास आश्रय दिला होता. या काळांत जैन संघामध्यें प्रादेशिक भेद निर्माण झाले. श्रमणकांच्या आचारविचारांत फरक पडून चैत्यवासी, वनवासी, स्थानकवासी इ. जैनांचे उपपंथ निर्माण झाले. तीर्थंकरांची पूजा, मूर्तिपूजा, देवळें व चैत्य बांधणी, उत्सव-समारंभ इ. गोष्टींचा जैनांनीं स्वीकार करून आपला धर्म बराचसा लोकाभिमुख केला. तथापि, एकंदरींत जैनांनीं बरीच सनातनी वृत्ति दाखविली. जैन संघ व उपासक यांच्यामधील संबंध अधिक निकटचे व सहकार्याचे राहिले. जैन गृहस्थांनीं सर्व सुखदुःखांमध्यें श्रमणकांचें संरक्षण केलें. जैनांची अहिंसा व कडक आचारपद्धति यांमुळें त्यांस मोठ्या प्रमाणावर अनुयायी कधींच मिळाले नाहींत व तशी अपेक्षाही जैनांनीं केली नाहीं. परकीय आक्रमणामध्यें बौद्धांपेक्षां जैनांचें नुकसान कमी झालें. त्यामुळें गुजराथ व कर्नाटक येथें जैनधर्म टिकून राहूं शकला. भारतीय तत्त्वज्ञान व तर्कशास्त्र, स्थापत्य,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिल्प व चित्रकला, संस्कृत, कन्नड व तामीळ वाङ्मय यांमध्यें या काळांत जैनांनीं महत्त्वाची भर घातली आहे.

इतर धर्म :

सातव्या शतकांत इराणचें राज्य अरबी मुसलमानांनीं जिंकून घेतल्यावर अनेक पारशी कुटुंबें इराण सोडून भारताच्या आश्रयास आलीं. इ. स. ७३५ मध्यें त्यांनीं गुजराथेंत संजाण येथें वसाहत केली. अनेक वर्षें तेथेंच ते एतद्देशियांशीं गुण्यागोविंदानें वागून राहिले. ते शरणार्थी म्हणून आल्यानें भारतामध्यें धर्मप्रसार करण्याचा त्यांनीं प्रयत्न केला नाहीं.

आठव्या शतकांत मुसलमानांनीं भारतावर झेप घालून सिंधप्रांत जिंकला. भारतीय धर्मापेक्षां इस्लामधर्म मागासलेला असल्यानें तो भारतामध्यें लोकप्रिय झाला नाहीं. मुसलमानी धर्माचा या काळांत झालेला सर्व प्रसार तलवारीच्या जोरावर झालेला आहे. त्यामुळें भारतामध्यें या काळांत त्यानें मूळ धरलें नाहीं.

इ. स. च्या पहिल्या कांहीं शतकांत ज्यू व ख्रिश्चन लोकही मलबार किनाऱ्यावर स्थायिक झाले होते. पण भारतीय इतिहासांत त्यांनीं महत्त्वाची भर त्या काळांत घातली नाहीं.

सामाजिक परिस्थिति :

या काळांत जन्मजात जातिव्यवस्था समाजामध्यें दृढमूल झाली. जाती व उपजाती यांची संख्या वाढती होती. या वाढत्या संख्येबरोबरच उच्च-नीचतेचें बंडही वाढत होतें. त्यामुळें क्षुद्र संकुचितपणा व अलिप्तता वाढली. अनुलोम विवाहाचा निषेध होऊं लागला. आहाराच्या बाबतींत भिन्नभिन्न गटांमध्यें आलेलें वैचित्र्य व देशांतराची वाढ यामुळें नवनवीन जाति जन्मास आल्या. जातीजातींत अन्नोदकाच्या व्यवहारावर बंधनें निर्माण झालीं. सहविवाह व सहभोजन निषिद्ध ठरलें. पुराणें व धर्मशास्त्रें यांनीं या बाबतींत सविस्तर नियम घालून दिले आहेत.

समाजामध्यें ब्राह्मणांचें वर्चस्व वाढलें. प्रत्येक संस्काराच्या प्रसंगीं, पूजा व यात्रा यांच्यावेळीं ब्राह्मणमुखानें सर्व धर्मकृत्यें व्हावींत व ब्राह्मणास दान-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिणा देऊन संतोषवावें असें शिकविलें गेलें. ब्राह्मण्य हें सदाचाराऐवजीं जन्मावर अवलंबून असे. (जरी ब्राह्मण असे पातकी । तरी वंद्य तो असे तिन्ही लोकीं ॥)

शूद्र व चांडाल यांचे सामाजिक हक्क हिरावून घेतले गेले, व त्यांना बरीचशी अनुदार वागवणूक मिळूं लागली. उच्च जातींमध्यें व्यवसायस्वातंत्र्य पुष्कळच होतें, पण हीनजातींना विशिष्ट व्यवसायांची परवानगी नसे. चांडालांना गांवाबाहेर राहावें लागे. गांवांतील विशिष्ट विभागांतून विशिष्ट जातींचीच वस्ती असे. मोठ्या शहरांतून या नियमांची अंमलबजावणी कसोशीनें होऊं शकत नसे.

विवाहामध्यें अनेक बंधनें पाळावीं लागत. मुलांमुलींचे विवाह लहानपणींच करण्याची वाढती प्रवृत्ति होती. अनेक स्मृतिग्रंथांतून शक्य तितक्या लवकर विवाह करण्याबद्दल आदेश दिलेला आहे. मुलीला समजूं लागण्याच्या आंतच तिचा विवाह करावा. (यावत् लज्जां न जानाति यावत् क्रीडति पांशुभिः । तावत्कन्या प्रदातव्या नो चेत् पित्रोः अधोगतिः ॥) याच्याही पुढें जाऊन यमस्मृतिकार सांगतात कीं, जन्मल्याबरोबरच मुलीचा विवाह करावा. (जातमात्रा प्रदातव्या कन्या तु सदृशे वरे ।) यावरून बालविवाहाची चाल रूढ झाली होती असें दिसतें. विवाह ठरवितांना जात, गोत्र, प्रवर इत्यादिकांच्या बरोबरच आतां पत्रिका पाहण्याची पद्धति रूढ झाली होती. सप्तपदी झाल्यानंतर विवाहाची पूर्तता होते असें मत प्रभावी बनलें होतें. विवाहामध्यें वरदक्षिणा म्हणून हुंडा घेण्याची पद्धत होती. पण ती फार मर्यादित होती. मुलीचे पैसे घेऊं नयेत असा शास्त्रनियम असला, तरी जातिधर्म वा देशाचार म्हणून त्यासही मान्यता होती. बालविवाह होत असल्यामुळें वधूवरांना निवडीचें स्वातंत्र्य नसे. शेवटीं शेवटीं राजपूत घराण्यांत क्वचित् स्वयंवराची पद्धत आढळून येते. विवाहानंतर स्त्रीनें पतीला देवाप्रमाणें भजावें (पतिर्देवो हि नारीणाम् ।) व त्याच्याशीं निष्ठापूर्वक राहावें असें अनेक पुराणांतून सांगितलें आहे. पति देव झाल्याबरोबर पातिव्रत्याची कल्पना वाढली. केवळ याच जन्मीं पतिनिष्ठा असावी असें नव्हे, तर जन्मोजन्मीं त्याच पतीशीं निष्ठा राहावी म्हणून उपदेश केला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेला. त्यासाठीं अनेक व्रतवैकल्यें सांगितलीं गेलीं. या पातिव्रत्य कल्पनेमुळें नियोगपद्धति अजिबात प्रचारांतून गेली. विधवांचा पुनर्विवाह निषिद्ध मानला गेला. बालविवाहामुळें बालविधवांचा प्रश्न महत्त्वाचा बनला व तो सोडविण्याचा प्रयत्न करावा लागला. या काळाच्या सुरुवातीस वसिष्ठ स्मृतीनें बुद्धिप्रधान भूमिकेवरून या प्रश्नाचा विचार केला. जोंपर्यंत परस्पर रतिसंभोग सुरू होत नाहीं तोंपर्यंत विवाहपूर्ति होत नाहीं, म्हणून बाल-विधवा पुनर्विवाह्य आहे असें त्याचें मत दिसतें. परंतु सनातनी पक्षाला हें मत मान्य नव्हतें. त्या पक्षानें अतिरेकीपणानें वाङ्निश्चयापासून पतिपत्नीचें नातें सुरू होतें असा पुकारा केला, व तेंच मत समाजामध्यें प्रभावी ठरलें. त्यामुळें विधवांचा प्रश्न तीव्रतर झाला. बौद्ध व जैन धर्मांनीं धार्मिक आत्महत्त्या पुण्यकारक ठरवून एक नवा मार्ग समाजास दाखवून दिला. पातिव्रत्याच्या कल्पनेची त्यास जोड मिळाली. शक, आभीर इ. टोळ्यां-मधून सतीची पद्धति प्रचलित होतीच. तिचें अनुकरण होऊन इ. स. चौथ्या शतकापासून हिंदु समाजांत ही पद्धति सुरू झाली. कांहीं पुराणांनीं या पद्धतीचा पुरस्कार करून सतीला अनेक अदृष्ट फलें मिळतात असें सांगून ती चाल लोकप्रिय करण्याचा प्रयत्न केला. तरीदेखील अनेक विधवांच्या बाबतींत अपवाद केले गेले. ब्राह्मणी, गर्भिणी, बालपुत्रा अशा विधवांनीं सती जाऊं नये. यावरून फक्त क्षत्रिय जमातींतच ही चाल रूढ होऊं शकली. बौद्ध व जैन भिक्षुणींनीं स्त्रीजीवनाचा एक नवा आदर्श दाखविला होता. हिंदु विधवांच्या बाबतींत तोच आदर्श उपदेशिला गेला. पतिनिधना-नंतर विधवेनें संन्यस्त वृत्तीनें पतीच्या स्मृतीशीं एकनिष्ठपणानें राहावें, उंचीं वस्त्रें व अलंकार, केशभूषा व शरीरभूषा टाळावी असा आचार तिच्या-साठीं सांगितला गेला. याचीच पुढील पायरी म्हणजे भिक्षुणीप्रमाणेंच विधवेनेंही केशवपन करून घ्यावें. स्वतःचा चेहरा विद्रूप करून घेऊन तिनें समाजांत राहावें. भिक्षुणीप्रमाणेंच विधवा ही अमंगल व अशुभदर्शनी ठरली. आठव्या शतकापासून मुसलमानांच्या सहवासानें हिंदुसमाजांत पडदा-पद्धति येऊं लागली. अर्थात् तिचा प्रभाव फारसा सार्वत्रिक कधींच झाला नाहीं. दक्षिणेकडे केशवपन व उत्तरेकडे सती व पडदा या पद्धति रूढ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्या. विधवांच्या स्त्रीधनामध्यें मात्र या काळांत चांगली सुधारणा झाली. पतीच्या मालमत्तेमध्यें तिला पोटगीचा हक्क होताच; परंतु पतीनें स्वखुषीनें दिलेलें धन, आईबाप, भाऊबहिणी इ. नातलगांकडून मिळालेलें धन यावर तिची एकट्याचीच मालकी मान्य करण्यांत आली. या धनामध्यें स्थावर-जंगमादि सर्व गोष्टींचा अंतर्भाव होऊं लागला. स्थावर धनाची तिला खरेदीविक्री करून विल्हेवाट लावण्याचा अधिकार देण्यांत आला. स्त्री-धनाचा वारसा मुलीकडे जावा हें मान्य झालें.

वंशसातत्य टिकविण्यासाठीं पुत्रप्राप्ति आवश्यक मानली गेली. निपुत्रिक असणें हें अभाग्याचें मानलें गेलें. नियोगपद्धति निषिद्ध झाल्यावर औरस पुत्राभावीं क्षेत्रजपुत्राची शक्यता नष्ट झाली. त्यामुळें समाजांत निपुत्रिकानें दत्तकपुत्र घेण्याची चाल वाढत्या प्रमाणावर होती. अपत्यसंगोपन व पुत्र-शिक्षण याबद्दल आईबाप काळजी घेत. एकत्र कुटुंबपद्धति प्रचारांत असून कुटुंबांतील मंडळींचें परस्परांशीं प्रेमाचे व आपुलकीचे संबंध असत. कुटुंबां-तील प्रत्येकजण आपल्या कुवतीप्रमाणें द्रव्यार्जन करी व आपल्या गरजे-प्रमाणें खर्च करी. कुटुंबांतील कर्त्या पुरुषाला कुटुंबनियंत्रणाचे विशेष अधिकार होते. स्त्रीशिक्षण कुटुंबांतच होई. देवळांतून होणाऱ्या पुराण, प्रवचन, कीर्तन यांच्या द्वारां स्त्रियांमध्यें शिक्षणाचा प्रसार होई. आठव्या शतकांत इस्लामनें आक्रमण करून सक्तीनें अनेक हिंदूंना बाटविलें. त्यांना स्वधर्मांत परत घेण्याचा प्रश्नही या काळाच्या अखेरीस उत्पन्न झाला. सिंधु नदीच्या कांठीं लिहिलेल्या देवलस्मृतीनें या बाबतींत उदारवृत्ति दाखवून यास अनुकूलता दर्शविली. तथापि हें मत सर्वमान्य होऊं शकलें नाहीं. समाजांतील वाढते भेद व संकुचित वृत्ति यामुळें सामाजिक एकता खुरटून गेली. या सामाजिक ऐक्याच्या जाणिवेअभावीं भारतीय समाज परकीय आक्रमणास बळीं पडूं शकला.

आर्थिक परिस्थिति :

देशांतील राजकीय अस्थिरतेचा आर्थिक सुबत्तेवर फारसा प्रतिकूल परिणाम झाला नाहीं. शेती, कापड विणणें, साखर बनविणें, रेशीम, सोनारकला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिल्पी, सुतारी इ. अनेक व्यवसाय ऊर्जितावस्थेंत होते. मालाला मागणी चांगली असल्यानें उठाव झटपट होई. भरपूर किंमत मिळे व पैसा खेळता राही. त्यामुळें जनतेची क्रयशक्ति भक्कम होती. देशांतील विविध भागांत हवापाणी व जमिनीचा मगदूर यांच्या अनुरोधानें विविध प्रकारचीं पिकें काढलीं जात. शेतीच्या अवजारांत याकाळीं चांगली प्रगति झाली होती. ह्युएनत्सांगच्या वर्णनावरून शेतकरी कष्टाळू, उद्योगी व सुखी होता असें दिसतें. व्यवसाय व जात यांची सांगड घातली गेल्यानें व्यावसायिक नीतीची कसोशीनें अमलबजावणी होई. व्यावसायिकांच्या संघटना जातिपंचायती म्हणून काम करीत. भारताचा बाहेरील देशांशीं व्यापार भरभराटीस होता. ‘हे लोक धाडसी असून अनेक देशोदेशीं फिरत; खुष्की व समुद्रमार्गावरून सहा खंडांतील देशांना भेटी देत; हत्ती, घोडे, हिरे–माणकें, सुगंधी द्रव्यें, औषधें इ. अनेक वस्तूंचा किरकोळ व घाऊक व्यापार करीत.’ अशा प्रकारचा गौरवपर उल्लेख भारतीय व्यापाऱ्यांबद्दल तत्कालीन ग्रंथांतून आढळतो. आठव्या शतकांत अरबांनीं रोमन साम्राज्याचा नाश करून स्पेनपासून भारतापर्यंत अरबी साम्राज्य स्थापन केलें. त्यामुळें भारताच्या पश्चिमेकडील व्यापाराला पुनः जोरदार चालना मिळाली. भारतीय वस्तूबरोबर भारतीय विचार, व्यापाऱ्यांबरोबर भारतीय विद्वान्‌ही अरबी साम्राज्यांत मान्यता पावले. भारत पुनरपि सुवर्णभूमि बनला. अनेक अरबी व्यापाऱ्यांनीं भारताच्या सधनतेचा गौरवपर उल्लेख केला आहे. महंमद कासीमनें आठव्या शतकांत सिंधपंजाबवर स्वारी करून हजारों मण सोनें लुटून नेलें. पूर्वेकडेहि भारतीय व्यापाऱ्यांच्या वसाहती ठिकठिकाणीं पसरल्या होत्या. व्यापाऱ्यांबरोबरच भारतीय संस्कृतीनेंही आग्नेय आशिया आत्मसात् केला. तेथील राजांशीं भारतीय राजांचे राजकीय व सांस्कृतिक संबंध या काळांत घडून आले.

शिक्षण व शैक्षणिक संस्था :

भारतीयांनीं आपल्या शिक्षणाचें ध्येय ज्ञानसाधना, शील, व्यक्तिविकास व सामाजिक वारशाचें संरक्षण असें चतुर्विध ठेविलें होतें. त्या ध्येयाला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुसरून शिक्षणपद्धति व शिक्षणसंस्था निर्माण झाल्या. घरामध्यें किंवा नगरामध्यें शिक्षणाला अनुकूल वातावरण मिळूं शकत नाहीं. म्हणून भारतीय शिक्षणसंस्था–आश्रम, गुरुकुलें, विद्यापीठें–शहराबाहेर असत. शिक्षणामध्यें केवळ बौद्धिक विकासावर भर देण्यांत येत नसे. गुरुशिष्यांचा जास्तींत जास्त संबंध येण्यासाठीं विद्यार्थ्यानें गुरुगृहीं राहण्याची पद्धति होती. गुरुसेवा करून विद्यार्थी विद्या संपादन करी. गुरुगृहीं गरीब-श्रीमंत असा विद्यार्थ्यांच्यामध्यें भेद केला जात नसे. गुरुगृहीं विद्यार्थ्यांची राहण्या-जेवण्याची मोफत सोय असल्यानें गरीब परंतु होतकरू विद्यार्थ्यांसही विद्यार्जन निश्चिंतपणें करतां येई. समाजही अशा शिक्षकांचा वारंवार समाचार घेऊन त्यांस सर्व प्रकारचे साह्य देई. भारतीय राजेही विद्वत्संभावना करून, पंडितांना राजाश्रय देऊन, शिक्षणविषयक आपलें कर्तव्य बजावीत. याप्रमाणें शिक्षणास मदत देऊनही समाज वा राजसत्ता शिक्षणाच्या अंतर्गत व्यवस्थेंत कधींही ढवळाढवळ करीत नसे. भारतीय आचार्यही साधी राहणी व उच्च विचारसरणी असा आपला जीवनादर्श ठेवून बाणेदारपणें आपलें स्वातंत्र्य अबाधित राखीत. शिक्षकवर्गाला आर्थिक स्पर्धेच्या क्षेत्रा-पलीकडे ठेवून समाजही त्यास विशुद्ध राहणी राखण्यास मदत करी. संपत्तीवर व्यक्तीचा सामाजिक दर्जा ठरत नसल्यानें लक्ष्मीहीन सरस्वती भक्तांनाही समाजांत प्रतिष्ठा व मानमान्यता मिळे. विद्वान् कधींही राज-सत्तेपुढें आपलें मस्तक लववीत नसत.

मुलांच्या शिक्षणास वर्णमालेपासून सुरुवात होई. नंतर सिद्धिरस्तु नांवाचा द्वादशाध्यायी ग्रंथ अभ्यासिला जाई. पुढें धातुपाठ, उणादिसूत्रें, अष्टधातु इ. शिकत. व्याकरणाचा अधिक अभ्यास काशिकावृत्ति, महा-भाष्य, वाक्यपदीय इ. आकरग्रंथांच्या साह्यानें केला जाई. सर्वसाधारणपणें विद्यार्थ्यांना शब्दविद्या (व्याकरण), शिल्पस्थानविद्या, चिकित्साविद्या, हेतु-विद्या व आत्मविद्या यांचा अभ्यास शिकविला जाई. वेद, वेदांगें, सांख्य-योग इ. तत्त्वज्ञान, बौद्धधर्मग्रंथ इत्यादिकांचाही अभ्यास शिकविला जाई. ज्योतिष व वैद्यक, लष्करी शास्त्रें व विविध कला यांचेंही शिक्षण दिलें जाई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या काळांत अनेक विद्यापीठें प्रसिद्धीस आलीं. बाणभट्टानें आपल्या हर्षचरितांत विंध्य पर्वतांतील दिवाकरमित्राच्या आश्रमाचें मोठें मनोरम वर्णन दिलें आहे. त्या आश्रमांत अनेक प्रांतांतील बौद्ध भिक्षु, नाना पंथांचे उपासक, दिगंबर व श्वेतांबर जैन, जटिल, मुंडक, कापिल, कृष्णभक्त, ब्रह्मचारी, तार्किक, वेदांती, नैय्यायिक, धातुवादी, धर्मशास्त्री, पौराणिक, वैयाकरणी, मीमांसक, पांचरात्रिक, पाशुपत इ. विविध पंथांचे व तत्त्वांचे लोक एकत्र राहात, आपापल्या तत्त्वांचें निरूपण करीत, परमताविरुद्ध शंका व प्रश्न करीत, वादविवाद, अभ्यास व मनन करून ज्ञानाची एकनिष्ठेनें सर्वजण उपासना करीत. ह्युएनत्सांगही भारतीय विद्वानांचें ज्ञान व शील याबद्दल फार आदरानें लिहितो. सातव्या शतकांत पश्चिमेस वलभी व पूर्वेस नालंदा हीं विद्यापीठें प्रसिद्धीस आलीं. दोन्ही ठिकाणीं बौद्ध विहारांतून या विद्यापीठांचा उगम व विकास झाला. राजाश्रय मिळून त्याची भरभराट झाली. तेथील विद्वानांची कीर्ति दिगंत पसरून त्यांना आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झालें. अनेक गुप्त राजे, हर्षवर्धन, यशोवर्मन्, पाल राजे व जाव्हांतील शैलेंद्र राजे यांनीं नालंदा विद्यापीठास भरपूर अर्थसाहाय्य दिलें. या ठिकाणीं विद्यार्थ्यांना राहणें, जेवण व शिक्षण फुकट देण्यांत येई. सातव्या शतकांत या विद्यापीठांत १०,००० विद्यार्थी शिक्षण घेत होते व १५१० शिक्षक विद्यादानाचें कार्य करीत. बौद्ध विहार असूनही या ठिकाणीं वेदवेदांगें, हिंदु, जैन तत्त्वज्ञान इ. यांचाही अभ्यास केला जाई. विद्यार्थी व शिक्षक यांना राहण्यासाठीं व ग्रंथालयासाठीं भव्य व उत्तुंग इमारती बांधलेल्या होत्या. विद्यापीठाच्या आवारांत उद्यानें, क्रीडाक्षेत्रें, स्नानगृहें इ. चीही सोय केली होती. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यापूर्वीं द्वारपंडितांकडून त्यांची कडक चांचणी घेतली जाई. या चांचणींत शेंकडा ३० विद्यार्थी जेमतेम उत्तीर्ण होत. विद्यापीठांतील ज्ञानसाधना, विद्येबद्दलची कळकळ व शिस्त वाखाणण्यासारखी होती. धर्मपाल, शीलभद्र, शांतरक्षित इ. अनेक विद्वान् व कर्तबगार कुलगुरु या विद्यापीठास लाभले. त्यामुळें त्याची कीर्ति सर्व आशियाभर पसरून दूरदूर देशाहून अनेक विद्यार्थी शिक्षणासाठीं येथें येत. येथून शिक्षित होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाहेर पडलेल्या पंडितांना सर्वत्र मान मिळे. नालंदा बौद्धजगाचें 'ऑक्सफर्ड' बनलें होतें.

वलभी, कांची, अनुराधापुर, पाटलिपुत्र, काशी, उज्जयिनी, प्रतिष्ठान येथेंही लहानमोठीं शिक्षणकेंद्रें होतीं. बंगालच्या देवपालराजानें आठव्या शतकांत भागलपूर जिल्ह्यांत विक्रमशील विद्यापीठ स्थापिलें. या ठिकाणीं विशेषेंकरून बौद्ध तांत्रिक विद्येचा अभ्यास होई. या विद्यापीठांतून अतीश दीपंकरासारखे चतुरस्त्र विद्वान् बाहेर पडले. तिबेटच्या लामानें त्यास सन्मानपूर्वक तिबेटमध्यें बोलावून नेलें व तिबेटमधील बौद्ध धर्माची पुनर्घटना करविली. पाल घराण्यांतील गोपाल यानें ओदन्तपुरी येथें स्वतंत्र विद्यापीठ स्थापिलें.

या विद्यापीठांखेरीज ठिकठिकाणच्या बौद्ध व जैन विहारांतून भिक्षु व सामान्य जन यांना शिक्षण दिलें जाई. हिंदूंच्या मंदिरांतून पाठशाला चालविल्या जात विविध विषय शिकविण्यासाठीं देवळांना इनामें व निधि दिले जात. विशेषतः दक्षिणेंतील प्रशस्त मंदिरांतून हें विद्यादानाचें कार्य फार समाधानकारक चालविलें जाई. सामान्य जनांनादेखील मंदिरांतील पुराण, कीर्तन, प्रवचनद्वारां भारतीय संस्कृतीची ओळख करून दिली जाई. मंदिरांतील शिल्पकला म्हणजे पौराणिक धर्माचें दृक्‌शिक्षणच होतें. दक्षिणेकडे वेगवेगळ्या आचार्यांच्या मठांतून व घटिकांतून शिक्षण देण्याची व्यवस्था असे. ग्रामसभा व जिल्हासभा यादेखील शिक्षणासाठीं निधि पुरविण्याची जबाबदारी चांगल्याप्रकारें पार पाडीत.

व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या स्वतंत्र संस्था नव्हत्या व त्यांची गरजही भासत नसे. वंशपरंपरागत व्यवसाय चालत असल्यानें प्रत्येक धंद्यांतील कसब नवीन पिढीला जुन्या पिढीकडून घरच्याघरींच मिळूं शकत असे. एकत्र कुटुंबपद्धतीचाही या कामीं चांगला उपयोग होई. पुष्कळदां धंद्यामध्यें दुसऱ्याच्या हाताखालीं उमेदवारी करून व्यवसायाचें ज्ञान मिळे. अशी उमेदवारी करीत असतांना केलेल्या कामाचा मोबदला विद्यार्थ्यास देण्यांत येई.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भारतीय शिक्षणाचे सुपरिणाम भारतीयांच्या जीवनांत पाहावयास मिळतात. भारतीयांबद्दल लिहितांना ह्युएनत्सांग म्हणतो : 'ब्राह्मण व क्षत्रिय निर्दोष व निर्दंभ, शुद्ध व सात्त्विक चारित्र्याचे व मितव्ययी आहेत. सामान्य जनांबद्दल बोलावयाचें तर, जरी ते स्वभावतःच थोडेसे अविचारी असले, तरी प्रामाणिक व उदार असतात. पैशाच्या बाबतींत त्यांच्यामध्यें कोणताच कावा नसतो व न्याय देण्याच्या बाबतींत ते दयाळू आहेत. त्यांचें वर्तन कपटी वा विश्वासघातकी नाहीं. आपल्या शपथेशीं व वचनांशीं ते प्रामाणिक असतात.'

वाङ्मय :

सातव्या शतकाच्या सुरुवातीस हर्षवर्धनानें लिहिलेल्या नाटकाचा व स्तोत्रांचा उल्लेख मागें केलाच आहे. आठव्या शतकांत भवभूति होऊन गेला. तो पदवाक्यप्रमाणज्ञ व वेदवेदांतादि शास्त्राध्ययन केलेला होता. त्यानें महावीरचरित व उत्तररामचरित हीं रामायणावर आधारित दोन नाटकें लिहिलीं आहेत. उत्तररामचरितांतील भाषा लालित्यपूर्ण व सुबोध असून त्यामध्यें करुणरसाचा प्रकर्ष झाला आहे. त्या एकाच नाटकानें भवभूतीला अमर करून कालिदासाच्या पंक्तींत आणून बसविलें आहे. याखेरीज भवभूतीनें मालतीमाधव नांवाचें नाटक लिहिलें आहे. त्यांतील लांबलचक वर्णनें, समासप्राचुर्य, अपरिचित शब्दांमुळें येणारी क्लिष्टता लक्षांत घेऊनही तें नाटक नाट्यगुणांनीं भरलेलें आहे असेंच म्हणावें लागेल. प्रेमविषय हाताळतांना कालिदासाच्या शैलीची सूचकता व संयम भवभूतीच्या ठिकाणीं दिसून येत नाहीं. पण भवभूतीच्या नाटकांत काव्यगुण भरपूर आहेत. त्यामुळें त्याची नेहमीं कालिदासाशीं तुलना केली जाते. या शतकाच्या उत्तरार्धांत भट्टनारायणानें द्रौपदीकेशाकर्षणावर आधारित वेणीसंहार हें नाटक लिहिलें आहे. त्यांतील स्वभावचित्रण व करुण रसाचा आविष्कार उल्लेखनीय आहे. भवभूतीप्रमाणेंच भाषेचा बोजडपणा व पांडित्याखालीं दडपलें गेलेलें नाट्य म्हणून या नाटकाचें वर्णन करावें लागेल. नवव्या शतकांतील मुरारीचें अनर्घराघव नाटक उल्लेखनीय आहे. दहाव्या शतकांतील राजशेखरानें रामायण महाभारतावर आधारित बरींच नाटकें लिहिलीं आहेत. तथापि त्याचें विद्धशालभंजिका व प्राकृत कर्पूरमंजरी हीं नाटकें प्रसिद्ध आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माघकवीचें संस्कृत महाकाव्य 'शिशुपालवध' आठव्या शतकांत लिहिलें गेलें. परंपरेप्रमाणें उपमा, अर्थगौरव व पदलालित्य हे तीनही काव्य-गुण माघकाव्यांत आहेत. माघाची भाषा फार समृद्ध आहे. त्याची विद्वत्ता सखोल आहे. वेगवेगळे काव्यबंध वापरण्यांत तो अत्यंत कुशल आहे. एकंदरींत त्याच्या ठिकाणीं काव्याची कृत्रिमता जास्त आहे. सातव्या शतकाच्या सुरुवातीस व्याकरणाचे नियम सुबोध व सोदाहरण सांगणारें भट्टि-काव्य किंवा रावणवध हें बऱ्यापैकीं काव्य लिहिलें गेलें. भर्तृहरीचें शृंगार-नीति-वैराग्यशतकत्रय हें सुंदर व ओजस्वी काव्य आहे. आठव्या शतकांत अमरुकवीचें शृंगारिक काव्य अमरुशतक लिहिलें गेलें. प्रेमिकांच्या विविध अवस्थांचें रसपूर्ण वर्णन या काव्यांत मनोरम रीतीनें केलें आहे.

बाणभट्टाची अमर 'कादंबरी' संस्कृत गद्यकाव्याचें उत्तम उदाहरण आहे. अचूक शब्दप्रयोग, लालित्यपूर्ण भाषा, प्रदीर्घ वाक्यरचना, समास-प्राचुर्य, पेटीसदृश कथाव्यूहरचना, अर्थगौरव व पदलालित्य, प्रदीर्घ वर्णनें व अलंकारांची आवड इत्यादि गुणदोषसमुच्चयामुळें 'कादंबरी' असामान्य ग्रंथ झाला आहे. बाणाच्या हर्षचरिताचा उल्लेख मागेंच केला आहे. दहाव्या शतकांत गद्यवाङ्मयाचा एक नवीन प्रकार–चम्पू वाङ्मय–निर्माण झाला. राष्ट्रकूटांचा आश्रित त्रिविक्रमभट्ट यानें नलचंपू व मदालसाचंपू लिहिलें तर सोमदेवानें सुप्रसिद्ध यशस्तिलकचंपू लिहिला.

भर्तृहरीनें संस्कृत व्याकरणाच्या तत्त्वज्ञानावर वाक्यपदीय हा अपूर्व ग्रंथ लिहिला. पतंजलीच्या महाभाष्यावर सरल टीका लिहिणारे जयादित्य व वामन यांची 'काशिकावृत्ति' सातव्या शतकांतच लिहिली गेली. चिनी विद्वान् काशिकावृत्तीवरून संस्कृत शिकत असा उल्लेख इत्सिंग करतो.

वाग्भटाची अष्टांगहृदयसंहिता आयुर्वेदावरील महत्त्वाचा ग्रंथ आहे. माधवाकरानें रुग्विनिश्चय माधवनिदान नांवाचा रोगशास्त्रावर ग्रंथ लिहिला आहे. ब्रह्मगुप्त हा प्रसिद्ध गणिती व ज्योतिषी सातव्या शतकांत होऊन गेला. ज्योतिष विषयांत तो जुन्या मताचा दिसतो. आर्यभटाच्या सिद्धांतावर त्यानें कठोर टीका केली आहे. पृथ्वीचें भ्रमण व ग्रहणें या बाबतींतील त्याचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विचार अशास्त्रीय आहेत त्याचे ब्रह्मसिद्धांत, खंडखाद्य व ध्यानग्रह हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. गणितामध्यें त्यानें बरीच प्रगति केली आहे. द्विघात व त्रिघात, वर्गमूळ, व्याज, श्रेढीपद्धति, त्रिकोण व वर्तुळ, घनभूमिति, ऋणराशि व धनराशि, करणीगत राशि (surd), विविध प्रकारचीं समीकरणें, आवर्तक चौकोन इ. गणितविषय त्यानें मांडले आहेत. मानसार नांवाचा शिल्पशास्त्रावरील जुना ग्रंथ सातव्या शतकांत लिहिला गेला ध्वन्यालोक हा साहित्यशास्त्रावरील महत्त्वाचा ग्रंथ आनंदवर्धनानें नवव्या शतकांत लिहिला. ध्वनि हाच काव्याचा आत्मा आहे असा त्याचा सिद्धांत आहे. धनंजयानें नाट्यशास्त्रावर दशरूपक नांवाचा छोटा ग्रंथ दहाव्या शतकांत लिहिला. शुक्रनीति व सोमदेवाचें नीतिवाक्यामृत हे अर्थशास्त्रावरील ग्रंथ या काळांत लिहिले गेले. परंतु त्यांत फारसें वैचारिक नाविन्य नाहीं.

मीमांसासूत्रांवर टीका लिहून तत्त्वज्ञान निर्माण करणारा व मीमांसेचें एक विशिष्ट प्रभाकरमत मांडणारा प्रभाकर हा मीमांसक सातव्या शतकाच्या पूर्वार्धांत होऊन गेला. त्या शतकाच्या उत्तरार्धांत सुप्रसिद्ध मीमांसक व भाट्टमताचे संस्थापक कुमारिलभट्ट होऊन गेले. त्यांचा जन्म दक्षिणेस झाला असावा. अनेक द्राविडी व यावनी भाषांमध्यें ते पारंगत होते. त्यांनीं बौद्ध भिक्षूचा वेष घेऊन बौद्ध गुरूंजवळ बौद्ध मतांचें प्रथम अध्ययन केलें व नंतर तीं मतें चूक असल्याचें साधार सिद्ध केलें. गुरुद्रोहाच्या या पातकाच्या क्षालनार्थ वृद्धपणीं त्यांनीं स्वतांस जाळून घेतलें अशी आख्यायिका आहे. सर्व भारतभर फिरून अनेक वादविवादांत त्यांनीं बौद्धांचा पराजय करून वैदिक धर्माचें पुनरुज्जीवन केलें. वेद हे अपौरुषेय असून त्यांचें प्रामाण्य निरपवाद आहे. वेदाज्ञेप्रमाणेंच व्यवहार केला पाहिजे; आजन्म वर्णाश्रमधर्माचें पालन हेंच इहपर हितावह आहे असे त्यांनीं सिद्धांत मांडले. बौद्ध धर्माचा पाडाव करण्यामध्यें त्यांनीं महत्त्वाची कामगिरी बजावली आहे. त्याचे श्लोकवार्तिक, तंत्रवार्तिक व टुप्टीका हे तीन टीकाग्रंथ प्रसिद्ध आहेत

बौद्धविरोधी चळवळीची पूर्तता श्रीशंकराचार्य यांनीं केली. त्यांचा जन्म इ. ७८८ मध्यें केरळ प्रांतांत नंबुद्री ब्राह्मणाच्या कुळांत झाला. लहानपणींच वडील वारल्यानें आईनेंच त्यांचें संगोपन व शिक्षण केलें अल्प-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वयांतच सर्व शिक्षण पूर्ण करून त्यांनीं धर्मप्रसार करण्यासाठीं संन्यास स्वीकारला. नंतर काशीस जाऊन तेथील पंडितांना वादामध्यें जिंकलें. त्यांनीं आपल्या मतांच्या स्पष्टीकरणार्थ अनेक उपनिषदें, भगवद्गीता व वेदांतसूत्रें यांवर भाष्यग्रंथ लिहिले आहेत. त्यांची भाषा सुबोध पण ओजस्वी आहे. नंतर त्यांनीं स्वमतप्रसारार्थ सर्व भारतभर संचार केला व ठिकठिकाणच्या प्रसिद्ध विरोधी पंडितांस वादांत जिंकून आपलें मत प्रस्थापित केलें. कुमारिलभट्टाच्या अनुयायी मंडनमिश्र स त्यांच्यापुढें हार खावी लागली. त्यांनीं काश्मीरमधील शैवमताची पुनर्घटना करून त्याचा पुरस्कार केला. बौद्ध धर्मांतील अहिंसा व संन्यास हीं लोकप्रिय तत्त्वें त्यांनीं स्वीकारली. तसेंच, व्यावहारिक जगाचें मिथ्यात्व व प्रचारकांची संघटना या गोष्टी त्यांनीं उचलिल्या. यामुळें त्यांचे टीकाकार त्यास प्रच्छन्न बौद्ध म्हणून हिणवितात. त्यांनीं बौद्धांचा शून्यवाद, चार्वाकाचा भोगवाद, कणादाचा जडवाद यांवर प्रखर हल्ला चढविला. त्यांनीं मायावादाचा पुरस्कार करून अद्वैतमताची स्थापना केली. भावनेला न रुचणारें पण बुद्धीला पटणारें असें हें तत्त्वज्ञान आहे. आधुनिक जगाचें तत्त्वज्ञान अद्वैत मताच्यापुढें अद्यापि प्रगत झालें नाहीं. आपल्या मताचा कायमचा प्रसार व्हावा व देशभर एकच धार्मिक सत्ता असावी या हेतूनें त्यांनीं भारताच्या चार दिशांस चार मठ स्थापन केले. उत्तरेस बद्रीकेदार, दक्षिणेंत शृंगेरी, पश्चिमेस द्वारका व पूर्वेस पुरी येथें ते चार मठ आहेत. या मठांनीं धर्माचार्यांचें कार्य आजवर केलें आहे. शंकराचार्य वयाच्या अवघ्या बत्तिसाव्या वर्षीं इ. स. ८२० मध्यें बद्रीकेदार येथें मृत्यु पावले.

नवव्या शतकांत वाचस्पतिमिश्र हे षड्दर्शनावरील महान् भाष्यकार होऊन गेले. अचूक दृष्टि, सखोल विद्वत्ता, सफाईदार भाषा व सुबोध रीति यामुळें त्यांचे ग्रंथ लोकप्रिय झाले आहेत.

आठव्या शतकांत कनोजचा राजा यशोवर्मन् याचा आश्रित वाक्पतिराज यानें गौडवहो (गौडवध) हें प्राकृत काव्य लिहिलें. काव्याची भाषा सुगम व अकृत्रिम रचना असल्यानें काव्य वाचनीय झालें आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तामीळ भाषेमध्यें शैव नायनार व वैष्णव आलवार संतांनीं विपुल भक्तिकाव्यें लिहिलेलीं आहेत. या काव्यांतून भक्ताच्या हृदयाची आर्तता, मुक्तीची आत्यंतिक इच्छा व देवाला सर्वस्व त्याग या गोष्टी प्रामुख्यानें आढळतात. यामुळें या काव्यसंहिता म्हणजे तामीळ भाषेंतील भक्तिवेद बनले आहेत. सर्व शैव काव्यांची संहिता तिरुमंगाई म्हणून प्रसिद्ध आहे. त्यामध्यें ज्ञानसंबंध, अप्पर व सुंदर यांच्या काव्यांचा संग्रह (तेवारम्), माणिक्यवाचकर याचें तिरुवाचकम् व इतर कवींचीं काव्यें आहेत. नालायिर प्रबंधम् या वैष्णव वेदामध्यें सर्व आलवारांच्या भक्तिकाव्यांचा संग्रह आहे.

चिनी प्रवासी :

ह्युएनत्सांग इ. स. ६०० मध्यें जन्मला. वयाच्या विसाव्या वर्षी त्यानें भिक्षुवृत्तीचा स्वीकार केला. बौद्ध धर्मग्रंथांच्या चिनी भाषांतरावर असंतुष्ट होऊन त्यानें भारताला भेट देण्याचें ठरविलें. प्रवास परवान्याची अट चुकवून तो इ. स. ६२९ मध्यें भारतांत येण्यास निघाला व इ. स. ६४५ मध्यें चीनदेशीं परतला. तो ज्ञानाचा कट्टा उपासक असून तीक्ष्ण बुद्धीचा, अत्यंत कष्टाळू व धार्मिक वृत्तीचा होता. त्यानें भारतांतील बहुतेक सर्व राज्यांना भेट दिली. या प्रवासांत त्याच्यावर तीनदां प्राणसंकट कोसळलें होतें; पण त्यांतून तो सुदैवानें सुखरूप निसटला. त्यानें आपल्या अनुभवांची व पाहिलेल्या परिस्थितीची सुसंगतवार व उद्बोधक माहिती लिहून ठेवली आहे. बौद्ध धर्मावरील प्रेमामुळें बौद्धधर्मीयांच्या बाबतींत त्याचें वर्णन अतिशयोक्तिपूर्ण असतें. तथापि, सातव्या शतकांतील भारतीय इतिहासाच्या अभ्यासास त्याच्या प्रवासवर्णनाची चांगली मदत होते. ‘ भारतीय लोक साधे, सरळ व सच्चे आहेत. विद्येकरितां माळवा व मगध देश फार प्रसिद्ध आहेत. वलभीची वस्ती दाट असून तेथें अगणित संपत्ति आहे. गंगायमुनांच्या संगमावर रोज शेकडों माणसें जलसमाधि घेतात. या देशांतील लोकांची अशी समजूत आहे कीं, तांदुळाच्या एका दाण्यावर राहून उपवास केला व येथें संगमावर येऊन जलसमाधि घेतली कीं स्वर्ग मिळतो ’. ‘ कनोजचे लोक सुखी व संतुष्ट असून त्यांचीं घरें धनसंपन्न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व भरभक्कम होतीं. ते स्वभावानें प्रामाणिक व निष्कपटी असून त्यांना पाहतांच ते सज्जन व कुलीन आहेत याची खात्री पटे'. 'महाराष्ट्रांतील लोक मानी व शूर आहेत. उपकाराबद्दल ते कृतज्ञ असतात व अन्यायाबद्दल खुनशी असतात. संकटांत सांपडलेल्या शरणागतासाठीं ते आत्मबलिदान करतील; तसेंच, आपला अपमान करणाऱ्याचा सूड घेण्यासाठीं रक्त सांडण्यासही तयार असतात. त्यांचे शूर योद्धे बेहोष होऊन लढाईमध्यें शिरतात.' इ. विविध प्रकारची माहिती त्यानें लिहून ठेवली आहे. त्याच्या विद्वत्तेनें दिपून जाऊन हर्षवर्धनानें आपल्या दरबारीं त्याचा मोठा सत्कार केला व त्यास सर्व प्रकारची मदत दिली. तो आल्या वाटेनेंच इ. ६४५ मध्यें खुष्कीच्या मार्गानें चीनमध्यें परतला. तेथें चिनी बादशाहानेंही त्यास गौरविलें. त्यानें आपलें उर्वरित आयुष्य बौद्धग्रंथांचीं चिनी भाषांतरें करण्यांत घालविलीं.

तिसरा चिनी यात्रेकरू इत्सिंग हा इ. स. ६७३ ते ६८८ पर्यंत पधरा वर्षें भारतांत होता. त्यानेंहि भारतांतील बऱ्याच भागांना भेट दिली होती. वलभी येथील विद्यापीठाचा तो मोठ्या गौरवानें उल्लेख करतो. तेथें अनेक पंथांचे पंडित वादविवादासाठीं येत असत. नालंदा येथील विद्यापीठांत त्यानें तीन वर्षें घालविलीं. त्या विद्यापीठाबद्दल त्यानें विपुल माहिती दिलेली आहे. परत जातांना त्यानें सिलोन, जाव्हा, सुमात्रा इ. देशांना भेटी दिल्या. त्यानेंही आपलें प्रवासवर्णन लिहून ठेवलें आहे. पण बौद्धांच्या धार्मिक दृष्टींतून त्यानें सर्व वर्णन दिलेलें असल्यामुळें राजकीय इतिहास समजण्यासाठीं त्या वर्णनाचा फारच थोडा उपयोग होतो.

कलाविलास :

या काळामध्यें भारतीय कलेची चांगलीच वाढ झाली. लेणीं व कोरीव शिल्प, मंदिरें, मूर्ति व चित्रकला यांची खूपच प्रगति झाली. लेण्यांची कला उत्कर्षाच्या परमोच्च बिंदूस पोंहोचली होती. वेरूळचीं ब्राह्मणलेणीं, घारापुरी व साष्टी येथील कोरीव देवळें व मामल्लापुर येथील अखंड कोरीव रथ हीं या कलेचीं उत्तम उदाहरणें आहेत. वेरूळचें सुप्रसिद्ध कैलासलेणें राष्ट्रकूट कृष्णराजाच्या कारकीर्दींत कोरलें गेलें. एका डोंगरांत १६० × २८०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फूट भाग खोदून एक भव्य व अखंड दगडी देवालय निर्माण केलें आहे. त्यामध्यें प्रशस्त सभामंडप व अनेक कोरीव खांब आहेत. 'भारतीय शिल्पकलेची एक नमुनेदार व प्रेक्षणीय अमरकृति' अशा शब्दांनीं फर्ग्युसननें त्याचें वर्णन केलें आहे. दशावतार लेण्यांत भव्य पौराणिक चित्रें कोरलेलीं आहेत. रावणका खाई लेण्यांतील विलासिनीचें स्त्रीसौंदर्य आकर्षक आहे. दुमारलेण्यामध्यें १५ फूट उंच व ५ फूट जाडीचे प्रचंड कोरीव खांब आहेत. घारापुरी येथील लेणें १३०×१२९ फूट असून तेथील भव्य त्रिमूर्ति जगद्विख्यात आहे. वेरूळच्या जैन लेण्यांमध्यें या कलेची अवनति झालेली दिसून येते. मामल्लापुर येथील अखंड कोरीव रथ त्यामानानें लहान आहेत. सर्वांत मोठा ४२ × ३५ फूट असून ४० फूट उंच आहे. धर्मराज रथ हा बौद्ध विहाराची प्रतिकृति आहे, तर गणेशरथ चैत्यगृहाची प्रतिकृति आहे. त्या सर्वांवर देव, स्त्रीपुरुष व पशु यांच्या कोरीव आकृति अत्यंत आकर्षक व डौलदार आहेत. तेथेंच एका कड्यावर ९० फूट लांब व २३ फूट उंच असा विशाल गंगावतरणाचा देखावा कोरलेला आहे. त्यामध्यें अनेक देवता, मनुष्यें, प्राणी, चतुर्भुज शिव, तपानें कृश झालेला भगीरथ इ. इ. विविध मूर्ति आहेत. तेथेंच उर्ध्वबाहु तापसी मांजर कोरलेलें असून त्याच्या पायाशीं भोळसर उंदीर खेळत आहे.

लेण्यांची परिणति बांधीव देवळांत झाली. दक्षिणेकडे राजसिंह पल्लवाच्या कारकीर्दींत मामल्लापुर येथें वेलामंदिर, ईश्वर व मुकुंद मंदिर, तसेंच कांची येथें कैलासनाथ व वैकुंठ पेरुमल मंदिर बांधलें गेलें. कांची येथील देवळें पल्लव कालांतील प्रगल्भ व परिणत कलेचीं उत्तम उदाहरणें आहेत. गर्भगृहावर मनोऱ्यासारखें प्रचंड विमानशिखर असून देवळाच्या बाहेरील बाजूस प्रत्येक इंच जागेंत कोरलेलीं चित्रें आहेत. तंजावर येथील राजराजेश्वर मंदिर इ. स. १००९ मध्यें बांधून पूर्ण झालें. ५०० × २५० फूट अशा विस्तृत प्रांगणामध्यें देऊळ बांधलेलें असून, त्याच्या चारी बाजूंस प्राकार आहे व पूर्वेस उंच गोपुर आहे. ८२ चौरसफूट चबुतऱ्यावर गर्भगृह असून त्यावरील विमान २०० फूट उंच आहे. विमान १३ मजली उंच असून मनोऱ्याप्रमाणें निमुळतें होत गेलें आहे. शेवटीं घुमटाकार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कळस आहे. विमानावर सर्व बाजूंस कोरीव चित्रें आहेत. या चोलकाळामध्यें ओतीव मूर्तिकलाही प्रगल्भ दशेस पोंहोंचली होती. सुप्रसिद्ध नटराज मूर्ति ही या कलेचा उत्कृष्ट नमुना होय. दक्षिणेकडील देवळांमध्यें गर्भागारावर मनोऱ्यासारखें उंच विमान, गर्भागारासमोर सभामंडप व त्यावरही विमान; कित्येकदां प्रवेशगृह असून त्यावरही लहान विमान असतें. बाजूच्या प्रांगणाभोंवतीं प्राकार असतो, व त्या प्राकाराच्या एक वा अनेक बाजूंस गोपुरें असतात. तामीळ देशाला ' गोपुरांचा प्रदेश ' असें सार्थ नांव देतां येईल. या देवळांतून कोरीव शिल्पाची प्रगति झालेली दिसते.

झांशीच्या आग्नेयेस १०० मैलांवर खजुराहो येथील देवळें औदीच्य पद्धतीचीं आहेत. प्रत्येक देऊळ एका रुंद व भक्कम चबुतऱ्यावर उभारलेलें आहे. देवळाच्या प्रत्येक भागावर स्वतंत्र शिखर असून गर्भगृहावरील शिखरांहून इतर शिखरें उतरतीं असतात. प्रत्येक शिखर घुमटाकार असून वर निमुळतें होत जातें. शिखराच्या बाहेरील सर्व भाग कोरीव शिल्पांनीं भरलेला असतो. एकट्या कंदर्य महादेवाच्या देवळावर ६५० सुंदर शिल्पकृति आहेत. विश्वनाथाच्या देवळाचें शिखर १०० फूट उंच आहे. सागर जिल्ह्यांत एरण येथील मंदिरेंही याच काळांतील आहेत. मार्तंड येथील सूर्यमंदिर काश्मिरी पद्धतीचा उत्कृष्ट नमुना आहे. एका चौकोनी प्रांगणांत मुख्य मंदीर उभें आहे. त्याच्यापासून स्वतंत्र असा सभामंडप त्या प्रांगणांतच आहे. भुवनेश्वर येथील मुक्तेश्वर, राजाराणी व लिंगराज हीं देवालयें ओरिसा पद्धतीचीं आहेत. लिंगराज मंदिराचें शिखर १६० फूट उंच आहे. पुराणांनीं देवदेवतांच्या मूर्तींचे आकार, अलंकार, आयुधें इ. सर्व ठरवून दिल्यामुळें मूर्तिकलेची प्रगति कांहींशी खुंटल्यासारखी झाली

वेरूळच्या लेण्यांमध्यें या काळांतील चित्रकाम दिसून येतें. पुदुकोट्टा जिल्ह्यांतील सित्तन्नवसल येथें पल्लवकालीन चित्रकलेचे अवशेष सांपडले आहेत. चित्रांमध्यें अप्रतिम लावण्य व सफाई दिसून येते. दहाव्या शतकांत बंगालमध्यें धीमान व वीतपाल असे विख्यात चित्रकार होऊन गेले. त्यांनीं निर्माण केलेली चित्रपद्धति बंगालमध्यें अनेक वर्षें टिकून राहिली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण तेविसावें

बृहत्तर भारत

भारतीय संस्कृतीची भारताच्या भूसीमेंत वाढ होत असतांनाच भारतीयांचा संबंध बाह्य जगाशीं आला. भारताच्या जुन्या जगांतील मध्यवर्ती स्थानामुळें पूर्व व पश्चिम यामधील मालांची भारतच बाजारपेठ असे. व्यापाराच्या निमित्तानें अनेक भारतीय आग्नेय आशियास जात. त्या भागांत कल्पनातीत सोनें, हिरेंमाणकें आहेत अशी त्यांची समजूत होती, व म्हणून त्या भागास ' सुवर्णभूमि ', ' सुवर्णद्वीप ' या नांवांनीं संबोधीत. तेथील मसाल्याच्या पदार्थांना तर सर्वत्रच मागणी असे. म्हणून या दूरच्या प्रदेशांत अनेक भारतीय स्वतांचें नशीब काढण्यासाठीं वा व्यापारासाठीं जात. त्यांच्याबरोबरच थोर भारतीय संस्कृतीनें त्या भागांत प्रवेश केला.

अशोकाच्या वेळेपासून अनेक बौद्ध भिक्षु व ब्राह्मण धर्मप्रसाराच्या विशाल भावनेनें स्वदेश सोडून या प्रदेशांत आले. त्यांच्या मागोमाग अनेक धाडसी क्षत्रियही नशीब काढण्यासाठी येथें आले. विविध कारणांमुळें भारतीयांचा अखंड ओघ या प्रदेशाकडे अनेक शतकें चालू होता. त्यांनीं येथें आपल्या वसाहती स्थापिल्या. तद्देशीयांशीं विवाहसंबंध करून ते तेथेंच स्थायिक झाले. त्यामुळें भारतीय संस्कृति हळूहळू या भागांत पसरली व जीवनाचीं सर्व क्षेत्रें तिनें आक्रमण केलीं. तद्देशीयांचें भारतीकरण इतकें परिपूर्ण झालें कीं, तद्देशीयांनीं भारताचा धर्म, भाषा, समाजरचना, आचारविचार, चालीरीति इ. इ. सर्व गोष्टी स्वीकारल्या. तद्देशीय आलेख व वास्तूंचे अवशेष, दंतकथा व वाङ्मय व बौद्ध जातककथा, चिनी प्रवाशांचीं वर्णनें या सर्वांवरून या वसाहतीकरणाची माहिती मिळते. मुख्यतः भारताच्या पूर्वकिनाऱ्यावरून अनेक मार्गांनीं, व्यापारी धर्मप्रचारक व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



पृष्ठ : ३१२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धाडसी वीर आग्नेय आशियास जात. तद्देशीय दंतकथांतून वंग, मगध, कलिंग येथील लोकांनीं तेथें वसाहती स्थापन केल्याचे उल्लेख येतात.

मलाया :

मलाया द्वीपकल्पांत भारतीयांच्या वसाहती इ. सनाच्या सुरुवातीसच स्थापन झाल्या होत्या. चिनी बखरींवरून असें समजतें कीं, इ. स. ५१५ च्या सुमारास मलायांतील भगदत्त राजानें चिनी बादशहासाठीं एक पत्र देऊन आदित्य नांवाचा आपला राजदूत चीनला पाठविला होता. केदाह-जवळ पांचव्या शतकांतील बुद्धस्तूप व संस्कृत आलेख सांपडला आहे. अशोकाच्या एका वंशजानें मलायांतील लिगोर येथें वसाहत स्थापिल्याची मलायांतील परंपरा आहे. इतरत्रही अनेक संस्कृत आलेख सांपडले आहेत. त्यांपैकीं एकांत रक्तमृत्तिकेचा (रंगमती, बंगाल) रहिवासी महानाविक बुधगुप्ताचा उल्लेख आहे. तेथें शैव, वैष्णव व बौद्ध हे तीन्ही भारतीय धर्म प्रचलित होते. सुमात्रांतील शैलेंद्रांचें साम्राज्य अनेक शतकें मलायावर होतें. इ. स. १०२५ मध्यें पहिला राजेंद्र चोल यानें केदाहवर स्वारी करून मलायाचा पश्चिम किनारा जिंकला.

सुमात्रा :

सुवर्णद्वीपांतील सुमात्रा हें सर्वांत मोठें बेट असून त्यास श्रीविजय हें प्राचीन नांव होतें. ख्रि. पू. दुसऱ्या शतकांत भारतीयांनीं तेथें पहिली वसाहत स्थापन केली. इ. स. सातव्या शतकांतील आलेखांवरून असें दिसतें कीं, श्रीजयनास या बौद्ध राजाच्या कारकीर्दींत श्रीविजयाचें साम्राज्य मलाया, बांका इ. ठिकाणीं पसरलें होतें. त्यामुळें त्याचें राजकीय व व्यापारी महत्त्वही खूप वाढलें. चिनी प्रवासी इत्सिंग हा सहा महिने सुमात्रांतील बुद्धविहारांत राहिला व त्यानें संस्कृत व्याकरणाचा तेथें अभ्यास केला. नालंदा विद्यापीठाचा कुलगुरु धर्मपाल यानें सातव्या शतकांत सुमात्रास धांवती भेट दिली. आठव्या शतकांत शैलेंद्र घराण्यानें तेथें आपली सत्ता स्थापून आपलें साम्राज्य जाव्हा, मलाया, कांबोडिया व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दक्षिण समुद्रांतील बेटांवर प्रस्थापित केलें. शैलेंद्र बौद्धधर्मी असून चीनशीं व भारतांतील चोल व पाल राजांशीं त्यांचे राजकीय सलोख्याचे संबंध होते. नागापट्टम व नालंदा येथें त्यानीं विहार बांधले. विक्रमशील विद्यापीठाचा कुलगुरु अतीश दीपंकर यानें सुमात्रामध्यें दहा वर्षें बौद्धधर्माचा अभ्यास केला. शैलेंद्रांच्या नाविक सत्तेनें चोल राजांशीं संघर्ष केला व त्यांत शैलेंद्रांचा पराभव झाला. जाव्हांतील बोरोबुदुर येथील प्रचंड बौद्ध स्तूप शैलेंद्रांच्या वैभवाचें अमर स्मारक आहे.

जाव्हा :

जाव्हा अथवा यवद्वीप येथील दंतकथेप्रमाणें हस्तिनापुराच्या पराशर, व्यास व पांडुदेव यांनीं जाव्हामध्यें वसाहती स्थापन केल्या व राज्य केलें. इ. स. ५६ मध्यें जाव्हामध्यें हिंदुराज्य स्थापन झालें. तेथील कालगणना शालिवाहन शकाप्रमाणें इ. स. ७८ पासून सुरू होते. देववर्मा राजानें इ. स. १३२ मध्यें चीनमध्यें शिष्टमंडळ पाठविल्याचा उल्लेख आहे. इ. स. ४१४ मध्यें फाहेन चीनला परत जातांना तो पांच महिने जाव्हांत राहिला होता. त्यावेळीं तेथें हिंदुधर्माचें वर्चस्व असल्याचा तो उल्लेख करतो. इ. स. ४२४ मध्यें काश्मीरचा विरक्त राजपुत्र गुणवर्मा यानें जाव्हा येथील राजाला बौद्धधर्माची दीक्षा दिली. पूर्णवर्मा राजानें ब्राह्मणांना हजार गोदानें दिल्याचा उल्लेख बटेव्हिया येथील एका संस्कृत आलेखांत आहे. आठव्या शतकांत मध्य जाव्हामध्यें हिंदुराज्य होतें. संजय राजाचा एक संस्कृत आलेख (इ. स. ७३२) सांपडला आहे. त्यांत तो शैव असून त्यानें शिवलिंगाची स्थापना केली व त्याचे वडील मनूप्रमाणें राज्य करीत असा उल्लेख आहे. यानंतर जाव्हा शैलेंद्र साम्राज्याचा भाग बनलें. या काळांत तेथें भव्य व विशाल कलाकृति निर्माण झाल्या. इ. स. ७७८ मध्यें कलसन येथें तारादेवीचें बौद्धमंदिर (Chandi Kalasan) बांधलें गेलें. इ. स. ९२५ नंतर संजयाचें शैव घराणें पुनः स्वतंत्र झालें. या पुनरुस्थापनाच्या काळांत कवि भाषेंतील वाङ्मयास आरंभ झाला. कवि भाषेंत रामायण रचलें गेलें. पूर्व जाव्हातील धर्मवंश या राजानें महाभारताच्या भाषांतरास उत्तेजन दिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इ. स. बारावें शतक हें जाव्हाच्या इतिहासांतील वैभवशाली सुवर्णयुग आहे. या काळांत हिंदु परंपरेवर आधारलेली जाव्हाची संस्कृति निर्माण झाली.

बाली :

चिनी इतिहासावरून असें दिसतें कीं, कौंडिण्यनामक हिंदु घराणें बाली बेटावर इ. सनाच्या सहाव्या शतकांत राज्य करीत होतें. तेथें सातव्या शतकांत बौद्ध धर्माचा प्रसार झाला होता असें इत्सिंग लिहितो. बाली बेटानें आपली प्राचीन भारतीय संस्कृति आजही बऱ्याच प्रमाणांत जिवंत राखली आहे.

बोर्निओ :

या बेटावर इ. स. चौथ्या शतकांतील चार यज्ञीय यूप सांपडले असून, त्यावरील स्तंभालेखांत कौंडिण्य राजाचा नातू राजा मूलवर्मा यानें केलेल्या बहुसुवर्णक यज्ञाचा व गोदानांचा उल्लेख आहे. यावरून चौथ्या शतकांत तेथें वैदिक धर्म प्रचलित होता असें निश्चित अनुमान करतां येतें. नंतर एका गुहेमध्यें अनेक हिंदु व बौद्ध देवतांच्या दगडी मूर्ति सांपडल्या आहेत. इ. स. बाराव्या शतकांत हें बेट जाव्हाच्या हिंदु साम्राज्याचा भाग बनलें होतें.

या सुवर्णद्वीपांतील राज्यव्यवस्था भगवान् कामंदक याच्या राजनीती-प्रमाणें चालत असे. मनुसंहितेंत सांगितल्याप्रमाणें राजा हा देवाचा अवतार असून राजसत्ता अनियंत्रित आहे ही भावना होती. राजाच्या हाताखालीं अनेक मंत्री व अधिकारी असत. धर्माधिकरण नांवाचे न्यायाधिकारी असत, व धर्माध्यक्ष धार्मिक संस्थांची व्यवस्था पाहात. मांडलिक राजांना अंतर्गत स्वायत्तता असे.

या सर्व बेटांतील समाजरचना मनुस्मृतींतील चातुर्वर्ण्यपद्धतीवर केलेली होती. अनुलोम विवाह प्रचलित होते, पण प्रतिलोम विवाहास बंदी होती. अनुलोम विवाहांतील अपत्यांना पितृसावर्ण्य मिळे. ब्राह्मणांत शैव व बौद्ध असे भेद असत. बालिबेटांत आजही सतीची पद्धति आहे. स्त्रियांना पूर्ण

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजकीय हक्क असून त्या राज्यकारभार करूं शकत. कांहीं स्त्रिया राजमंत्री झाल्याचा उल्लेख येतो. स्वयंवरपद्धति प्रचारांत होती. विवाहविधांमध्यें हिंदु विवाहाचें बरेंच अनुकरण दिसून येतें. प्रेतें जाळण्याची पद्धति असून नंतर प्रेताची राख नदींत वा समुद्रांत टाकून देत.

संस्कृत वाङ्मयाचा या बेटांतून विशेष अभ्यास होई. तेथील आलेखां-वरून व कोरीव शिल्पांत चित्रित केलेल्या पौराणिक प्रसंगांवरून हें सहज दिसून येतें. जुन्या जाव्हानीज् वाङ्मयांत संस्कृत काव्याचे सर्व नियम पाळलेले असून विशुद्ध भारतीय विषयच ग्रथित केले आहेत. जाव्हामधील रामायणाचा शेवट रामसीतेच्या मधुर मीलनांत झाल्याचें वर्णिलें आहे. धर्मवंश राजाच्या कारकीर्दींत (इ. स. ९९६) महाभारताचें गद्य भाषांतर करण्यांत आलें. कण्वकवीनें अर्जुनविवाह नांवाचें कविभाषेंतील महाकाव्य रचलें. जयवर्ष राजाच्या कारकीर्दींत रुक्मिणीस्वयंवराच्या कथवर कृष्णायन नांवाचें काव्य लिहिलें गेलें. याखेरीज भारतयुद्ध, हरिवंश, स्मरदहन, संगसत्यवान्, सारसमुच्चय इ. अनेक काव्यें लिहिलीं गेलीं.

भारतीय धर्माची पूर्ण छाप या वसाहतींवर पडली होती. अनेक पौराणिक देवतांची पूजा प्रचारांत होती. शिव ही मुख्य देवता असून महादेव व महाकाल या स्वरूपांत त्या देवतेची पूजा होई. याखेरीज पार्वती, गणेश, विष्णु, अगस्त्य इ. अनेक देवताही प्रचारांत होत्या. अनेक हिंदु देवतांच्या मूर्ति सांपडल्या आहेत. महायान पंथाचा प्रभाव या बेटांत जास्त होता. धर्मपाल व अतीश दीपंकर या नालंदा विद्यापीठाच्या कुलगुरूंनीं सुवर्णद्वीपांत येऊन बौद्धग्रंथांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. अनेक बौद्ध-शिल्पांचे अवशेष सर्वत्र सांपडतात. भारतीय महायान पंथाप्रमाणें येथेंही तांत्रिक पूजापद्धति सुरू झाली व शेवटीं बौद्धपंथ हिंदुधर्मांत विलीन होऊन बाली बेटांत आज शैव व बौद्ध ब्राह्मण असे ब्राह्मणांचेच दोन भेद उरले आहेत. शिव व बुद्ध यांचे संबंध इतके जवळचे आहेत कीं, बुद्धाला शिवाचा धाकटा भाऊ समजतात. धर्मामध्यें पदंडा (= पंडा = पुरोहित) वर्गाचें फार महत्त्व आहे. त्याच्याकडून सर्व धार्मिक संस्कार करवून घ्यावे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लागतात. भारताप्रमाणें गृह्योक्त संस्कार आजही बाली बेटावर प्रचलित आहेत. प्रत्येक घरांत देवघर असतें. देवळांतूनही पूजा चालतें. पितृपूजा किंवा मृत व्यक्तीचें श्राद्ध करण्यांत येतें. त्यासाठीं पंचामृत, तीळ, दर्भ इ. वापरतात. तोयतीर्त किंवा तीर्थ पवित्र मानलें जातें.

इकडील देवळांना चंडी म्हणतात. प्रवनम् खोऱ्यांत एका ठिकाणीं २५० लहानमोठीं बौद्धमंदिरें सांपडलीं आहेत. इ. स. ७५०–८५० या काळांत शैलेंद्र राजांच्या मदतीनें बोरोबुदुर येथील भव्य व प्रचंड बौद्ध स्तूप बांधला गेला. बोरोबुदुरचें शिल्प नऊ पायऱ्यांनीं वर चढत गेलें आहे. त्यापैकीं खालील सहा पायऱ्या चौरस असून वरील तीन वर्तुळाकार आहेत. प्रत्येक वरची पायरी गॅलरीसारखी असून तीवर जाण्यासाठीं आंतील बाजूनें जिने आहेत. गॅलरीच्या भिंतींवर सर्व बाजूंनीं कोरीव शिलापट आहेत. असे सुमारें १५०० शिलापट (Sculptured panels) असून त्यांची लांबी दोन मैल भरेल. त्या शिलापटांवर बुद्धजीवनांतील प्रसंग कोरलेलें आहेत. अनेक प्रसंग जातक व अवदान कथांवरून घेतलेले आहेत. या वास्तूमध्यें भाविक जसजसा वर चढत जातो, तसतसा त्याला आपण उन्नत आध्यात्मिक प्रदेशांत जात असल्याचा भास होतो. या वास्तूंतील खालच्या भागांवर शिल्पाची लयलूट आहे, तर वर तें प्रमाण अगदीं कमी होतें व शेवटच्या गॅलरीवर एकही शिलापट नाहीं. जणूं बौद्ध तत्त्वज्ञानांतील महान् शून्यतेचाच पाठ शिल्पकार आपल्या कृतीमधून भाविकास देत आहे. या कलाकृतीचें वर्णन 'दगडांतील महाकाव्य, एक अद्वितीय बौद्धस्तूप' अशा शब्दांनीं केलें जातें. हिंदु देवळांवर पल्लव व चोल शिल्पकलेची छाप आहे. लारा जोंग्रांग येथे लहानमोठीं १५६ हिंदु देवालयें आहेत. त्यावर रामायण व महाभारतांतील प्रसंग कोरलेले आहेत.

चंपा :

कांबोडियाच्या पूर्वेस दक्षिण अनामच्या प्रांतास पूर्वी चंपा म्हणत असत. या भागांत भारतीयांचा प्रवेश खिस्तपूर्व कालांतच झाला. चंपांतील पहिलें हिंदुराज्य श्रीमार राजानें इ. स. दुसऱ्या शतकांत स्थापिलें. तेथील मूळच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लोकांना चाम म्हणतात. या राज्याची राजधानी अमरावती प्रांताच्या (उत्तर चंपा) इंद्रपूर शहरीं होती. या राजांची चिनी सरकारशीं वारंवार युद्धें होत.

व्होचन येथील इ. स. दुसऱ्या शतकांतील यूपावर सम्राट् अशोकाच्या पद्धतीचा आलेख कोरलेला आहे. सुवर्णद्वीपांतील हा अतिप्राचीन संस्कृत आलेख आहे. इ. स. ३४० मध्यें चंपामध्यें नवें राजघराणें गादीवर आलें. या घराण्यांतील भद्रवर्मन् (इ. स. ३८०–४१३) राजानें 'धर्ममहाराज' ही पदवी धारण केली. त्याची सत्ता अमरावती (उत्तर भाग) व विजय (मध्यभाग) या प्रांतावर होती. तो शैवपंथाचा पुरस्कर्ता असून त्यानें मिसन येथें भद्रेश्वरस्वामींचें शिवालय बांधलें. चाम लोकांचें तें राष्ट्रीय मंदीर बनलें होतें. राजाच्या नांवावरून देवळाचें नांव ठेवण्याची ही प्रथा पुढें सर्रास सुरू झाली. हा राजा चतुर्वेदी व बहुश्रुत होता. त्याचा मुलगा गंगाराज यानें राजत्याग करून आपलें उर्वरित आयुष्य भारतांत गंगा-नदीच्या कांठीं घालविल्याचा उल्लेख एका संस्कृत आलेखांत आहे. या उदाहरणावरून भारताच्या सांस्कृतिक वर्चस्वाची कल्पना येते. नंतरचा राजा रुद्रवर्मन् (इ. स. ५२९) हा स्वतःला ब्रह्मक्षत्रिय म्हणवून घेतो. त्याचा पुत्र शंभुवर्मन् याच्या कारकीर्दींत चिनी सैन्यानें चपादेशावर स्वारी करून पुष्कळ लूट नेली. इ. स. नवव्या शतकांत दुसरा इंद्रवर्मन् नांवाचा राजा इंद्रपुर येथें राज्य करीत होता. त्यानें भद्रेश्वर मंदिराचा जीर्णोद्धार करून त्यांस इंद्रभद्रेश्वर असें नांव दिलें. त्यानें शंकर-नारायण देवतेला संपन्न देणग्या दिल्या. त्यानंतर आलेला हरिवर्मन् राजा 'राजाधिराज श्रीचंपापुरपरमेश्वर वीर जयश्री हरिवर्मन्' असा स्वतःचा उल्लेख करतो. त्यानें हिंदु व बौद्ध व्याकरण व षड्दर्शनें यांचा सखोल अभ्यास केला होता. तो भगवतीचा शाक्त उपासक असून त्या देवीची एक भव्य मूर्ति त्यानें आपल्या राजधानींत उभारलीं होती. यानंतर आलेले राजे स्वतःस भृगुऋषीचे वंशज म्हणवीत. या घराण्याचा संस्थापक दुसरा इंद्रवर्मन् हा स्वतःला शैव म्हणवीत असे. तथापि त्यानें एक बौद्धविहार व चैत्यगृह बांधल्याचा उल्लेख आहे. इ. स. ११३९ मध्यें तिसरा हरिवर्मन् नांवाचा राजा मेल्यावर त्याच्या चार राण्या त्याच्या चितेवर सती गेल्याचा उल्लेख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे पुढें कांबोडियानें चंपाराज्यावर आक्रमण केलें, व तेराव्या शतकांत मोंगली हल्ल्याला चम्पाराज्य बळी पडलें.

चंपादेशावर वेगवेगळ्या हिंदु घराण्यांनीं एक हजारावर वर्षें राज्य केलें. त्यांची राज्यव्यवस्था हिंदुपद्धतीची होती. राजाला सल्ला देण्यासाठीं मंत्रिमंडळ असे. शेतीच्या उत्पन्नाचा $\frac{1}{6}$ सारा वसूल केला जाई. शेतांचें उत्पन्न पुष्कळदां देवळांना लावून दिलें जाई. मनु व नारद स्मृतीप्रमाणें न्यायदान केलें जाई. या काळांत स्थानिक चाम लोकांचें पूर्णपणें हिंदुकरण झालें होतें. समाजरचना चातुर्वर्ण्यावर आधारलेली होती. तथापि ब्राह्मण–क्षत्रियांत विवाह होत. रुद्रवर्मन् स्वतःला ब्राह्मक्षत्रिय म्हणवून घेई. ब्राह्मणांना समाजांत देवाप्रमाणें मान दिला जाई, व ब्रह्महत्त्या महापातक गणिलें जाई. उच्चवर्णीयांना विशेष अधिकार व हक्क असत. विवाहपद्धति व पतिपत्नी संबंध पूर्ण भारतीय स्वरूपाचें होतें. सतीची पद्धतही रूढ होती. भारतीय वाङ्मयाचा अभ्यास केला जाई. संस्कृत ही तेथील राजभाषा होती. शैवपंथाचा जोर असून अनेक शैव मंदिरें बांधलीं गेलीं. भद्रेश्वरलिंग ही राष्ट्रीय देवता मानली जाई. बौद्ध धर्माचाही प्रसार तेथें होता. उत्खननांत अनेक बौद्धमूर्ति सांपडल्या आहेत. धर्मसहिष्णुता असल्यामुळें धार्मिक संघर्ष कधींच झाले नाहींत.

फूनान :

सध्यांच्या कांबोडिया व कोचीन–चायना प्रदेशास पूर्वीं फूनान म्हणत. कौंडिन्य नांवाच्या द्रवीड ब्राह्मणानें इ. सनाच्या पहिल्या शतकांत पहिली भारतीय वसाहत फूनानमध्यें स्थापन केली. स्थानिक रानटी लोकांना त्यानें सुसंस्कृत जीवनाचा मार्ग दाखविला. इ. स. २४५ मध्यें येथील राजानें गंगाकांठच्या भारतीय राजाकडे आपला वकील पाठविला होता. या काळांत फूनानचें साम्राज्य सयाम, लाओस व मलाया द्वीपकल्प येथपर्यंत पसरलें होतें. इ. स. पांचव्या शतकाच्या प्रारंभीं भारतांतून वसाहतवाल्यांची आणखी एक टोळी फूनानमध्यें आली व तेथील लोकांचें हिंदुकरण पूर्ण झालें. इ स. ४८४–५१४ या काळांत कौंडिन्य घराण्यांतील जयवर्मन् राजा होऊन गेला. हा राजा महेश्वरभक्त होता. चीनशीं त्याचे अत्यंत स्नेहाचे संबंध होते. सहाव्या शतकाच्या अखेरीस कांबोडियाच्या राजानें हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्य बळकाविलें. फूनानमध्यें लिहिण्यासाठीं भारतीय वर्णमाला वापरीत. संस्कृत भाषा व वाङ्मय यांचा अभ्यास होत असे. तेथील लोकांचे विवाह व मृत्युसंस्कार चंपाराज्याप्रमाणें भारतीय पद्धतीनें होत. भारतीय पद्धतीच्या मूर्ति व देवळें बांधलीं गेलीं. इ. स. सहाव्या शतकापर्यंत फूनान भारतीय संस्कृतीचा घटक बनला.

कांबोडिया (कंबुज देश) :

तद्देशीय दंतकथेप्रमाणें आर्यदेशांतील कंबु स्वायंभुव राजानें तेथील नाग लोकांवर राज्य स्थापिलें व त्यांना सुसंस्कृत बनविलें. त्याच्या नांवावरून या देशास कंबुज-कांबोडिया म्हणतात. येथील पहिला ऐतिहासिक राजा श्रुतवर्मन् यानें लिंगपर्वताच्या पायथ्याशीं श्रेष्ठपुर येथें स्वतंत्र राज्य स्थापन केलें. त्या पर्वतावर राजघराण्याची कुलदेवता भद्रेश्वर शिव याचें मंदीर होतें. इ. स. ५७० मध्यें रुद्रवर्मन् राजाच्या पदरीं आयुर्वेदनिपुण असे ब्रह्मदत्त व ब्रह्मसिंह नांवाचे दोन राजवैद्य होते. याच्या शिलालेखांत त्याची तुलना दिलीपाशीं केली आहे. (यस्य सौराज्यमद्यपि दिलीपस्येव विश्रुतम् ।) इ.स. ५९० मध्यें भववर्मन् राजानें चंपाराज्याचा नाश करून महाराजाधिराज ही पदवी धारण केली. भवपुर हें नवें नगर स्थापून तेथें राजधानी नेली. त्यानें शैव व वैष्णव पंथांना उत्तेजन दिलें. तो स्वतः लिंगोपासक असून त्यानें शिवालयांतून रामायण, महाभारत व पुराणें वाचण्याची पद्धति सुरू केली. तसेंच शंभु-विष्णु (हरिहर) या संयुक्त देवतेची मूर्ति स्थापली. इ. स. ६१६ मध्यें गादीवर आलेल्या ईशानवर्मन् राजानें अनेक वैदिक यज्ञ केले, संन्यास-धर्माला उत्तेजन दिलें व अनेक आश्रमांची उभारणी केली. इ. स. ६३९ मध्यें दुसरा भववर्मन् राजानें एका चतुर्भुजा देवीची मूर्ति स्थापन केली. या घराण्यांतील शेवटचा राजा पहिला जयवर्मन् यानें बौद्ध धर्माला राजाश्रय दिला. आठव्या शतकामध्यें या राज्याचीं दोन शकलें झालीं. जाव्हामधील शैलेंद्र घराण्याची सत्ता कांहीं काळ कांबोडियावर होती. नवव्या शतकाच्या प्रारंभीं दुसऱ्या जयवर्मन् राजानें (इ. स. ८०२-८६९) शैलेंद्र राजांचें जूं झुगारून दिलें व कांबोडियाचें स्वातंत्र्य प्रस्थापित केलें. त्यानें भारतांतून हिरण्यदाम नांवाच्या विद्वान् तांत्रिकाला बोलावून आणलें. या ब्राह्मणानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रसिद्ध देवराजपंथ सुरू केला. या राजानें हरिहरालय व अमरेंद्रपुर या नवीन राजधान्या वसविल्या. या राजाचें नांव कांब्रोडियांतील अनेक उत्तम गोष्टींशीं दंतकथांतून निगडित झालेलें आढळतें. सुप्रसिद्ध अंगकोर थोम ही राजधानी त्यानेंच वसविली व तेथील अनेक देवालयें त्यानें बांधलीं. तो स्वतांस कंबुजराजेंद्र म्हणवीत असे, व तेंच तेथील राजांचें बिरुद झालें.

यानंतर इंद्रवर्मन् (इ. स. ८७७–८८९) यानें कांबोडियाचें नवीन राजघराणें सुरु केलें. त्यानें अनेक शिवालयें बांधलीं, शिवमूर्तींची स्थापना केली व ब्राह्मण संन्याशांसाठीं आश्रम बांधले. कांबोडियामध्यें अत्यंत भव्य राजवट यशोवर्मन् (इ. स. ८८९–९१०) याची झाली. त्याच्या कारकीर्दींतील अनेक संस्कृत आलेख उपलब्ध आहेत. तो स्वतः नानाशास्त्रकाव्यनिपुण होता, व त्यानें संस्कृत वाङ्मयाच्या अभ्यासास उत्तेजन दिलें. पतंजलीच्या महाभाष्यावर त्यानें टीका लिहिली. यानें यशोधरपुर (अंगकोर थोम) नांवाची राजधानी स्थापन केली. ही पुढें अनेक शतकें कांबोडियाची राजधानी होती. त्यामुळें त्या ठिकाणीं अनेक देवळें व शिल्पकृति निर्माण झाल्या. बेयनचें शिवालय व यशोधर तलाव हीं त्या राजाचीं स्मारकें आहेत. भारतीय संस्कृतीच्या प्रसाराचें महत्त्वाचें कार्य या देवळांनीं व आश्रमांनीं केलें. राजेंद्रवर्मन् (इ. स. ९४४–९६८) यानें महायान पंथाला राजाश्रय दिला व बौद्ध धर्मप्रसार केला. पहिला सूर्यवर्मन् (इ. स. १००२–१०४९) हा षड्दर्शनें, भाष्यें, काव्य व धर्मशास्त्र इ. विषयांमध्यें प्रवीण होता. त्यानें अनेक विद्वानांना आपल्या दरबारीं आश्रय दिला होता. दुसरा सूर्यवर्मन् (इ. स. १११२–११५२) हा दुसरा फार मोठा राजा होऊन गेला. त्यानें कांबोडियाचें साम्राज्य व दरारा यांना पुनः उजळा दिला. त्याचा गुरु दिवाकरपंडित याच्या सांगण्यावरून त्यानें अनेक यज्ञ केले. त्यानें सुप्रसिद्ध अंगकोर वट (नगरवत्) हें भव्य विष्णुमंदिर बांधलें. कांबोडियाचा शेवटचा थोर राजा सातवा जयवर्मन् (११८१–१२२१) यानें अंगकोर थोम (नगरधाम) ही नवी राजधानी वसविली. तिच्या भोंवतीं उंच प्राकार व ११० फूट रुंदीचा खंदक होता. नगरींतील रस्ते

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१०० फूट रुंद असून सरळ होते. त्यानें बांधलेल्या देवळांच्या व्यवस्थेसाठीं ६६,६२५ लोक काम करीत होते. देवळांतून ४३९ आचार्य शिक्षण-दानाचें कार्य करीत होते. त्याच्या राज्यांत ७९८ देवळें व १०२ हॉस्पिटलें होतीं. राजानें १२१ वह्निगृहें (धर्मशाळा) बांधल्या होत्या. यानंतर कंबुजराज्य अवनतीस पोहोंचलें.

कांबोडियाची राज्यपद्धति अर्थशास्त्राप्रमाणें आंखली होती. राजा हा सर्वश्रेष्ठ असून त्याच्या मदतीस मंत्री व अनेक अधिकाऱ्यांची श्रेणि असे. ' राजा हा ईश्वरी अंश आहे ' असा उल्लेख आलेखांतून वारंवार येतो. राज्यामध्यें भारतीय नांवें असलेलीं अनेक नगरें होतीं. ठिकठिकाणीं विप्र-शाला (पंडितसभा), सरस्वती (शाळा), पुस्तकाश्रम (ग्रंथालय), सत्र (अभ्यागतगृह), आरोग्यशाला व वह्निशाला होत्या. शैवपंथ प्रमुख धर्म होता. विष्णुपूजाही लोकप्रिय होती. अनेक पौराणिक देवदेवता प्रचलित होत्या. उपनिषदांचें तत्त्वज्ञान व गुह्यतंत्रकर्म यांचाही प्रसार होता. अनेक भारतीय शास्त्रें व विद्या यांचा अभ्यास होत असे, व विद्वान् ब्राह्मण अध्ययन, अध्यापन करण्यांत कृतकृत्यता मानीत. अनेक संस्कृत आलेखांवरून संस्कृत काव्य, साहित्य व शास्त्रें यांच्या अभ्यासाची कल्पना येते. भारतापासून दूर असलेल्या या देशांत विविध भारतीय पंथांचें तत्त्वज्ञान, रामायण, महाभारत व पुराणें, अनेक संस्कृत वाङ्मयशाखा यांचें सखोल ज्ञान पाहिल्यावर आश्चर्यानें मति गुंग होते. पाणिनि, पतंजलि, वात्स्यायन, विशालाक्ष, प्रवरसेन, मयूर, सुश्रुत, गुणाढ्य इ. अनेक संस्कृत ग्रंथकारांचा उल्लेख आलेखांतून येतो. धर्म हा तेथील जीवनाचा व संस्कृतीचा मध्यबिंदु होता. धर्मौदार्य तेथील राजांच्या व प्रजेच्या अंगीं पूर्णपणें बाणलें होतें. देवराजपंथ हें तेथील धर्माचें दुसरें वैशिष्ट्य आहे. ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यांत सर्रास विवाह होते व ब्राह्मणांच्या आध्यात्मिकतेची छाप सर्वत्र पडे. भारताशीं सतत स्नेहपूर्ण संबंध असल्यानें भारतीय संस्कृतीची भर अखंड पडत असे. विवाह व यात्रा या निमित्तानें अनेक कांबोडियन लोक भारतांत जात असत. राजेलोक व श्रीमंत यांच्या औदार्यानें राज्यांत शेंकडो आश्रम बांधले गेले. तेथें ज्ञानसाधना करणारे हजारो विद्वान् राहात. त्यांच्या योग-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षेमासाठीं लोकांनीं भरपूर मदत केली होती. भारतांतील प्राचीन ऋषींच्या आश्रमाची आठवण व्हावी इतकें पावित्र्य या आश्रमांतून असे. या भागांतील प्राचीन देवळें गुप्त पद्धतीप्रमाणें बांधलेलीं आहेत. जणूं भारतांतूनच शिल्पी व कारागीर तेथें नेऊन त्यांच्याकडून तीं मंदिरें व मूर्ति तयार करवून घेतल्या.

अंगकोरवट हें एक भव्य विष्णुमंदीर इ स.च्या बाराव्या शतकांत बांधलें गेलें. या मंदिराभोंवतीं अडीच मैल लांब व ६५० फूट रुंद असा एक खंदक असून त्यावर ३६ फूट रुंदीचा दगडी पूल आहे. मुख्य मंदिर तीन टप्प्यांनीं २१० फूट उंच झालें आहे. बांधणी द्राविड पद्धतीप्रमाणें मनोऱ्यासारखी आहे पहिल्या टप्प्यावरील गॅलरी ८०० × ६७५ फूट आहे. सर्व मंदिरावर कोरीव शिल्प असून त्यामध्यें रामायण, महाभारत व हरिवंश यांतील प्रसंग कोरलेले आहेत. मारीचवध, वालियुद्ध, गोवर्धनोद्धारण, स्मरदहन, समुद्रमंथन इ. विविध चित्रें शिल्पकलेचा उत्कर्ष दाखवितात. सर्व शिल्प चलाभास व चैतन्ययुक्त वाटतें.

पुनर्जन्म, कर्मविपाक, अवतार, चतुर्युग, सती, पुराणवाचन, इ. भारतीय वैशिष्ट्यें येथें पूर्णपणें रुजलीं होतीं. यावरून या प्रदेशांत गेलेले भारतीय हे संख्येनें विपुल, गुणांनीं श्रेष्ठ, बुद्धीनें तरल, वृत्तीनें दिलदार, आचरणानें सर्वसंग्राहक होते. एवढेंच नव्हे, तर भारताचे ते खरेखुरे सांस्कृतिक प्रतिनिधि होते यांत शंका वाटत नाहीं.

सयाम (श्यामदेश) :

सयाममध्यें भारतीयांच्या वसाहती इ. स. पहिल्या शतकापासूनच व्हावयास सुरुवात झाली असावी. इ. स. आठव्या शतकांतील शिलालेखावरून असें समजतें कीं, तामीळ वैष्णव समुद्रमार्गानें सयामला आले होते. त्यांनीं व्यापार करतां करतां भारतीय संस्कृतीचाही प्रसार केला. सयाममधील अनेक गांवांना भारतीय नांवें दिलेलीं आढळतात. इ. स. च्या तेराव्या शतकापर्यंत सयाम कांबोडियाच्याच ताब्यांत होता. युनान प्रांतास पूर्वीं विदेहराज्य म्हणत व त्याची मिथिला ही राजधानी होती. तेथील राजा स्वतांस पूर्वाधिपमहाराज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ही पदवी लावीत असे. इ. स. नवव्या शतकांत मागध चंद्रगुप्त यानें सयाममधील बौद्ध धर्मास उजळा दिला. इ. स.च्या तेराव्या शतकांत इंद्रादित्य यानें स्वतंत्र राज्याची स्थापना केली. त्याची राजधानी सुखोदयनगरी होती. त्याचा मुलगा राम कामांग यानें अनेक छोट्या राज्यांचा बीमोड करून सयामचें ऐक्य प्रस्थापित केलें. प्रजेला सुख देण्यासाठी राज्यांत अनेक सुधारणा केल्या. प्रजेस अविलंबित न्याय मिळण्यासाठीं राजवाड्याबाहेर घंटा बांधून ठेवली. या काळांत सयाम समृद्ध व सुखी देश होता. तो राजा बुद्धधर्मी असून राज्यांत त्यानें विहार व चैत्यगृहें बांधलीं. यानंतर इ. स. १३४७ मध्यें श्रीसूर्यवंश राममहाधर्म राजाधिराज हा राजा गादीवर आला. तो बौद्ध असूनही त्यानें शिव व विष्णु यांच्या मूर्ति स्थापन केल्या. त्याच्या मृत्यूनंतर अयोध्या येथें नवीन राजघराणें उदयास आलें व तें इ. सन १७६७ पर्यंत टिकलें. तेथील राजे स्वतांस रामाधिपति म्हणवीत.

सयाममध्यें बौद्धधर्माचें प्राबल्य होतें व पाली ही तेथील धर्मभाषा होती. सयामी राजे मूर्ति व देवालयें बांधण्यांत मोठेपणा मानीत. सयामचा धर्म, भाषा, लिपी, रीतिरिवाज यावर आजही भारतीय छाप दिसते. सयाममध्यें बौद्धधर्माचा प्रवेश इ. स. ४२२ मध्यें झाला, व आज तो धर्म सयामचा राष्ट्रीय धर्म आहे. तेथील लिपी गुप्त लिपीवरून तयार झालेली आहे. लोकांचे रीतिरिवाज भारतीय वळणावर आहेत. तेथील राजे आपल्या नांवामागें आजही ‘ राम ’ हें बिरुद लावतात, व तेथील लोकसभेला राजपांडीयसभा म्हणतात. सयामच्या राष्ट्रीय ग्रंथसंग्रहालयांत ५००० पेक्षां अधिक जुने संस्कृत ग्रंथ आहेत. तेथील मूर्तिकार हिंदु देवतांच्या मूर्ति बनवितात.

ब्रह्मदेश :

बंगालमधून खुष्कीच्या मार्गानें व दक्षिण भारतांतून समुद्र मार्गानें भारतीय संस्कृतीचा प्रवेश ब्रह्मदेशांत झाला. इ. स. १४७६ मधील एका आलेखांत दक्षिण ब्रह्मदेशांत गोल (गौड) लोकांची संस्कृति खि. पू. तिसऱ्या शतकांत असल्याचा उल्लेख आहे. रंगून व पेगू यांमधील प्रदेशास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उत्कलदेश असें नांव होतें. रामावती, असितांजननगर (रंगूनजवळ), कुसिमनगर (Bassein), रामपूर (मौलमेन), मुत्तिममंडल (मार्ताबान) इ. हिंदुनगरें अस्तित्वांत होतीं. उत्तर ब्रह्मदेशांत प्यू लोकांचें राज्य असून त्यांची राजधानी श्रीक्षेत्र होती. तेथील राजांचीं हरिविक्रम, सिंहविक्रम, सूर्यविक्रम, श्रीप्रभुवर्म, जयचंद्रवर्म अशीं शुद्ध संस्कृत नांवें आढळतात. हे राजे स्वतःस महाराज ही पदवी लावीत. या राज्यांत बौद्धधर्माचा प्रसार झालेला असून अनेक बुद्धमूर्ति व विहार होते. तेथील संगीतवाद्यें भारतीय पद्धतीचीं होतीं.

आराकानमध्यें काशीच्या एका राजपुत्रानें पहिलें भारतीय राज्य स्थापिलें. इ. स. आठव्या शतकांत महासेनचंद्र यानें वैशाली येथें नवीन राजघराणें स्थापन केलें. या घराण्यांतील वीरचंद्र, नीतिचंद्र प्रीतिचंद्र इ. राजांचीं नाणीं उपलब्ध झालीं आहेत. आनंदचंद्राच्या एका आलेखांत या श्रीधर्मराजानुजवंशाची वंशावळ दिली आहे. आनंदचंद्र स्वतः बौद्ध असून त्यानें अनेक विहार व चैत्य बांधले.

इ. स. १०४४ मध्यें मध्य ब्रह्मदेशांत अनिरुद्ध नांवाचा राजा अरिमर्दनपुर (पेगन) येथील गादीवर आला. त्यावेळेस उत्तर ब्रह्मदेशांत अरि नांवाच्या वामाचारी तांत्रिक बौद्धपंथांचें फार वर्चस्व होतें. धर्मदर्शी नांवाच्या ब्राह्मण भिक्षूनें त्या राजास बौद्ध थेरवादाची दीक्षा दिली. त्यामुळें अनिरुद्ध राजानें अरि पंथाचा नायनाट केला व ब्रह्मदेशांतील बौद्धधर्म सुधारला. या राजानें थेटनच्या मॉन राजांचा पराभव केला. श्रीक्षेत्र (प्रोम) शहराचा विध्वंस केला व तेथील पागोडांतील अनेक अवशेष आपल्या राजधानीस आणिले. त्यानें वैशालीच्या भारतीय राजकन्येशीं विवाह केला होता. त्यानें अर्ध्याहून अधिक ब्रह्मदेशांत राजकीय ऐक्य निर्माण केलें. अनेक विहार व पागोडा बांधून बौद्धधर्मप्रसारास साह्य केलें. त्याच्या कारकीर्दीत ब्रह्मदेशांत मॉन लोकांच्या संस्कृतीचा परिणाम झाला. अनिरुद्ध हा 'बौद्ध धर्माचा रक्षक' म्हणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. त्यानें सुप्रसिद्ध सूझिगोन पागोडा बांधावयास सुरुवात केली. अरिमर्दनपुर राज्यांत इ. स. ११९२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
पुस्तकालय गुरुकुल काँगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मध्यें सिलोनी बौद्धधर्म आणिला गेला व लौकरच मूळच्या महायान पंथाचें तेथून उच्चाटन झालें व हीनयान पंथ रूढ झाला.

या काळामध्यें ब्रह्मदेशांतून हिंदुधर्मांचा लोप झाला व बौद्धधर्मांचा सार्वत्रिक प्रसार झाला. पाली वाङ्मयाचा अभ्यास व निर्मिति होऊं लागली. बुद्धजीवनांशीं संबंधित स्थळें व घटना या ब्रह्मदेशांत आणिल्या गेल्या, व ब्रह्मी राजघराण्याची वंशावळ शाक्य जमातीपर्यंत जोडण्यांत आली. त्यामुळें अनेक भारतीय भौगोलिक नांवें ब्रह्मदेशाच्या भूमीवर आढळून येतात.

सिलोन :

या देशाचे भारताशीं फार प्राचीन कालापासून सांस्कृतिक संबंध आहेत. सिलोनचा पहिला राजा विजय यानें सिलोनमध्यें भारतीय संस्कृति रुजविली. सिलोनची लिपी ब्राह्मी लिपीपासून तयार झाली असून सिंहली भाषेचें पाली भाषेशीं विशेष साम्य आहे. अशोकानें सिलोनला बौद्ध धर्मांची दीक्षा दिली. अशोकाचा समकालीन तिस्स या सिलोनी राजानें (ख्रि. पू. २४७–२०७) बौद्ध धर्मांचा स्वीकार केला व आपल्या अनुराधापुर राजधानींत महाविहार नांवाचा संघाराम बांधला व प्रसिद्ध बोधिवृक्षाची फांदी लावली. यानंतर तेथें बौद्धधर्म चांगलाच फोंफावला व सिलोनचा राष्ट्रीय धर्म बनला. मेघवर्ण या सिलोनी राजाचे (इ. स. ३५२–३७९) समुद्रगुप्ताशीं स्नेहपूर्ण संबंध होते. त्यानेंच सिलोनी यात्रेकरूंसाठीं बुद्धगया येथें विहार बांधिला. कलिंग देशांतून त्यानें बुद्धाचा दांत मिळविला. बुद्धघोष या भारतीय पंडितानें सिलोनी बौद्धधर्मांची भक्कम पायावर पुनर्घटना केली. या काळांत सिगिरिय येथें काढलेल्या चित्रांवर गुप्त कलेची छाप दिसून येते. नंतरच्या काळांत पल्लव, पांड्य, चेर व चोल या तामीळ राजांनीं सिलोनवर अनेक वेळां स्वाऱ्या केल्या व कांहीं काळ राज्यही केलें. चोल स्वामित्वाच्या काळांत सिलोनमध्यें शैव, वैष्णव पंथांचीं मंदिरें बांधलीं गेलीं व त्या धर्मांचा प्रचारही झाला. शेवटीं सिलोन स्वतंत्र झाल्यावर विजयबाहु राजानें (इ. स. १०५६–१११

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुनः बौद्धधर्माची प्रस्थापना केली. अनेक स्तूपे व संघाराम बांधले गेले. महावंश व दीपवंश या पाली ग्रंथांतून भारत व सिलोन यांच्यांतील ऐतिहासिक संबंधाविषयीं माहिती मिळते. हेच संबंध पुढेंही कायम टिकले. त्यामुळें आजही सिलोनमध्यें भारतीय संस्कृतीचे जिवंत अवशेष दिसून येतात.

भारताचा पश्चिमेकडील जगाशीं जो संबंध ऐतिहासिक कालीं आला होता तो केवळ व्यापार–उदीमाच्या निमित्तानेंच आलेला होता. त्यामुळें दोन्ही बाजूंनीं थोडीशी सांस्कृतिक देवाण–घेवाण एवढाच याचा परिणाम झाला. परंतु उत्तर, पूर्व व आग्नेयेकडील प्रदेशांशीं भारताचे संबंध हे याहून फारच वेगळ्या स्वरूपाचे होते. या प्रदेशांत प्रथम भारतीय प्रचारक गेले व तेथील विस्तृत प्रदेशावर आपल्या संस्कृतीची छाप त्यांनीं पाडली. आणि यामुळेंच त्या काळीं ‘ बृहत्तर भारत ’ निर्माण झाला होता असें म्हणतां येईल.

स्वतःची जुनी संस्कृति असलेला वरील विभागांतील एकमेव प्रदेश म्हणजे चीन हा होय. या चीनशीं भारताचें तीन मार्गांनीं दळणवळण चाले. पहिला खुष्कीचा मार्ग अफगाणिस्तानवरून हिंदुकुश पर्वतावरील खिंडींतून बॅक्ट्रियास पोहोंचून, तेथून मध्य आशियास व नंतर चीनच्या पश्चिम सीमेस पोहोंचणारा होता. दुसराही खुष्कीचाच मार्ग असून तो पूर्वभारतांतून उत्तर ब्रह्मदेश व तेथून नैऋत्य चीनच्या प्रदेशांत जाणारा होता. तिसरा जलमार्ग असून तो इंडोचायना व ईस्ट इंडीज बेटांच्या किनाऱ्या किनाऱ्यानें जाणारा होता. सामान्यतः याच मार्गांनीं भारताचा सांस्कृतिक व वसाहतींचा विकास त्या काळीं होत असे.

अफगाणिस्तान :

सिंधु नदी व हिंदुकुश पर्वत यांच्यामधील प्रदेश सांस्कृतिक दृष्ट्या भारताचाच आहे असें समजलें जात असे. ऋग्वेदांत कुभा (काबूल) सुवास्तु (स्वात), क्रुमु (कुरम), गोमती (गोमल) या नद्या व दाशराज्ञ युद्धांत भाग घेतलेल्या अलिन, भलान आणि पक्थ इत्यादि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

टोळ्यांचीं नांवें येतात. यांवरून पंजाबांतील आर्यांचा अफगाणिस्तानशीं घनिष्ठ संबंध होता असें दिसतें. परंतु आर्य जसजसे पूर्वेकडे सरकूं लागले तसतसे हे संबंध कमीकमी होऊं लागले. इराणी, ग्रीक, पार्थियन (पल्हव), शक आणि कुशान यांची छाप पडूनही अफगाणिस्तानचा पूर्वेकडील प्रदेश हा भारताचा एक राजकीय प्रदेश आहे व त्याच्या इतर प्रदेशांत भारतीय संस्कृतीचीच विशेष छाप आहे असें समजलें जात असे. मौर्यांची अफगाणिस्तान व बलुचिस्तान यांवर दृढ सत्ता होती आणि बौद्ध व हिंदु (वैदिक) संस्कृतींचा त्या प्रदेशावर जो पगडा बसला होता तो मुसलमानांच्या आगमनापर्यंत कायम होता. अफगाणिस्तान व बलुचिस्तान येथील राजवंश, नाणीं व शिलालेख, कलाकुसर, धर्म आणि वाङ्मय ह्यांचें संपूर्ण स्वरूप भारतीय असून राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या हे प्रदेश भारताचेच अविभाज्य घटक आहेत असें लिखित ऐतिहासिक पुराव्यावरून म्हणतां येते. खिस्तपूर्व दोन शतकें व खिस्तोत्तर दोन शतकांपर्यंत या प्रदेशाला 'श्वेत हिंदुस्थान' म्हणत असत.

मध्य आशिया :

अशोकाच्या धर्मप्रचाराचा उत्साह दांडगा असल्यामुळें हिंदुकुश पर्वताच्या पलीकडील प्रदेशावरही भारतीय संस्कृतीची मुद्रा स्पष्ट दिसते. या प्रदेशांत नंतर आलेल्या ग्रीकादि परकीयांनीं हिंदुधर्माचा स्वीकार केला होता. भारतीय लिपि व भारतीय भाषा यांचाच ते वापर करीत. बौद्धधर्म व भारतीय संस्कृति यांची छाप खिस्तपूर्व कालांतही पार्थियन, युएची इत्यादि मध्यआशियाच्या लोकांवर पडली होती. काश्गर, यार्कंद, खोतान, तुर्फान, येंची इत्यादि प्रदेशांत भारतीय वसाहती असल्याचे उल्लेख आढळतात. या सर्व प्रदेशांत बौद्धधर्माचा पगडा होता. बुद्धमूर्ति व स्तूपांचे भग्नावशेष, विहार, संस्कृत, प्राकृत व इतर मध्यआशियांतील भाषांत व ब्राह्मी–खरोष्टी लिप्यांत लिहिलेले बौद्ध सांप्रदायिक ग्रंथ इत्यादि गोष्टींवरून हें सिद्ध होतें.

खोतान हें भारतीय वसाहतींचें एक प्रमुख केंद्र असावें; कारण, एका खरोष्टी शिलालेखांत 'महाराज राजाधिराज विजितसिंह' या खोतानी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राजाचा उल्लेख आहे. एका बाजूस चिनी अक्षरें व दुसऱ्या बाजूस प्राकृत भाषेंतील अक्षरें अशीं ४० नाणीं येथें सांपडलीं आहेत. अशोकाचा मुलगा कुष्टन (कांहींच्या मतें कुणाल) हा खोतान वंशाचा मूळ पुरुष होता. कुष्टनाचा मुलगा येउल हा इ. स. च्या पहिल्या शतकांत येथें राज्य करीत असावा. येउलनंतर 'विजित' हीं आद्याक्षरें असलेले अनेक राजे झाले. विजितसंभवाच्या कारकीर्दींत खोतानमध्यें बौद्धधर्म आला. इ. स. २२०–२६४ या काळांत विजितधर्मानें राज्य केलें. गोमती–विहार हें खोतान-मधील एक प्रबळ बौद्ध-केंद्र होतें.

कुच हेंही भारतीय संस्कृतीचें एक प्रमुख केंद्र होतें. येथील राजांचीं नांवें सुवर्णपुष्प, हरिपुष्प, हरदेव, सुवर्णदेव अशीं होतीं. अनेक बौद्ध विहार येथें होते. यावेळीं संस्कृत व्याकरण कातंत्रपद्धतीनें शिकलें जात असे. कुच या देशाच्या पलीकडे काराशार (अग्निदेश) येथें भारतीय वसाहत होती. इंद्रार्जुन, चंद्रार्जुन अशीं येथील राजांचीं नांवें आहेत. कुबेर, त्रिमुख, गणेश यांच्या प्रतिमा असलेल्या मुद्रा येथें सांपडलेल्या असून हीनयान व महायान बौद्ध धर्माचें येथें प्राबल्य होतें. खोतानपासून १३ मैलांवर असलेल्या गांवीं धम्मपद हा प्रसिद्ध धर्मग्रंथ सांपडला. हा ग्रंथ खरोष्ठी लिपींत असून इ. स. च्या पहिल्या किंवा दुसऱ्या शतकांत लिहिला गेला असावा. उदानवर्ग हा बौद्ध सर्वास्तिवादी संस्कृत ग्रंथ, सारीपुत्रप्रकरण या नाटकाचा शेवटचा भाग हीं याच प्रदेशांत सांपडलीं आहेत.

धर्म आणि वाङ्मय याप्रमाणेंच कलेच्या बाबतींतही मध्य आशियावर भारताची छाप पडली होती. काबूल खोऱ्यांतील स्तूप व येथील स्तूप यांत शिल्पकलेच्या दृष्टीनें साम्य आढळतें. गांधारदेशीय ग्रीको–बुद्ध कलेचा येथील वास्तूंवर बराच परिणाम झालेला दिसतो.

चीन :

महाभारत व मनुस्मृति यामध्यें या देशाचा उल्लेख असून चिनी रेशमी कापडाच्या (चीनांशुक) विविध प्रकारांचा उल्लेख अर्थशास्त्रांत आहे. खि. पूर्व कालांत खुष्कीच्या व जलमार्गानें भारत व चीन यांत व्यापार चालत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्याचे उल्लेख सांपडतात. म्हैसूर येथें सांपडलेल्या चिनी नाण्यांवरून खि. पू. दुसऱ्या शतकांतही जलमार्गानें व्यापार चालत असावा असें दिसतें. या व्यापाराबरोबर बौद्ध धर्माचें तत्त्वज्ञानही चीनमध्यें नेलें गेलें. खि. पू. दुसऱ्या शतकामध्यें युएची राज्यकर्त्यांनीं कांहीं बौद्ध हस्तलिखित ग्रंथ चिनी राजांना दिल्याचा उल्लेख आढळतो. हॅन घराण्याच्या मिंग-टी या राजांच्या कारकीर्दींत (इ. स. ६५) भारतांतून बौद्ध भिक्षू धर्मरत्न व काश्यप मातंग हे अगणित हस्तलिखित बौद्ध ग्रंथ घेऊन या राजाकडे आले. येथें त्यांनीं त्या ग्रंथांचें चिनी भाषेंत भाषांतर केलें. या राजाश्रयामुळें मध्य आशियांतील निरनिराळ्या देशांचे बौद्ध प्रचारक चीनमध्यें येऊं लागले. यानंतर लोकोत्तम, धर्मरक्ष हे प्रचारक आले. चीनमध्यें कॉनफ्यूशियस्चें तत्त्वज्ञान प्रचलित असूनही बौद्ध धर्माविषयीं लोकांना आपुलकी वाटूं लागली. वू (इ. स. २६५–२९०) आणि मिन् (इ. स. ३१३-३१६) या चिनी राजांच्या कारकीर्दींत अनेक बौद्ध मठ स्थापन केले गेले. यावेळीं एकूण बौद्धांची संख्या ३७०० होती.

वू राजानें आपल्या राज्यांत प्राणि-हिंसा बंद केली. त्याला ' चीनचा अशोक ' म्हणत. फाहेन ह्युएन्त्सांग, इत्सिंग, इत्यादि चिनी प्रवासी बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठीं भारतामध्यें आले होते. इ. स. १४७–१६७ या काळांत भारताचे राजदूत दाक्षिण समुद्रांतून चीनला आल्याचा उल्लेख आहे. इ.स.४२४मध्यें गुणवर्मन् हा काश्मीरचा बौद्ध राजपुत्र यवद्वीपांतून येथें आला व आपल्या चित्रकलेनें आणि भाषांतरित ग्रंथांनीं त्यानें बौद्ध-धर्माचा प्रचार केला. इ.स.९७२मध्यें चिनी 'तिपिटक'हा ग्रंथ लिहिला गेला. त्याला स्वतः राजानें प्रस्तावना लिहिली होती. या ग्रंथांत बौद्धांच्या आठ संप्रदायांचा उल्लेख आहे. कॉनफ्यूशियस तत्त्वज्ञ चू-शी यानें कर्मवादाचा स्वीकार केला होता. चिनी कला व शिल्प यांत भारतीय मार्दव व धीर-गंभीरता दिसते.

टोंकीन :

बौद्धधर्म व भारतीय संस्कृतीचा आणखी पुढें प्रचार होण्यास चीन देशाचा भारताला फार उपयोग झाला. मंगोलिया, कोरिया व जपान येथेंही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बौद्ध मताचा प्रचार होऊं लागला. इ. स. च्या दुसऱ्या व तिसऱ्या शतकांत बौद्धमताचा टोंकिनमध्यें प्रसार होऊं लागला असावा. इ. स. १९४-१९५ मध्यें माओ-त्सेउ या राजानें बौद्ध धर्माचा स्वीकार केला. इ. स. २९० मध्यें जीवक नांवाचा बौद्धप्रचारक येथें आला होता.

तिबेट :

हिमालयासारखा दुर्लंघ्य प्रदेश मध्यें असूनही भारत व तिबेट या देशांमध्यें इ. स. च्या सातव्या शतकापासून स्नेहाचे सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झाले होते. बौद्ध धर्म तिबेटांत जाईपर्यंत तेथील लोक रानटी व नरभक्षक होते. इ. स. च्या सातव्या शतकांत राजा स्रोन-त्सान-गँपो यानें बौद्ध-धर्माला आपला राज्यधर्म बनविलें. यानंतर एक शतकानें देत्सन राजानें आपला पुरोहित शांतरक्षित याच्या सांगण्यावरून नालंदा येथील पद्म-संभवाला बोलाविलें. त्यानें तेथें लामासंप्रदाय स्थापन केला. हा संप्रदाय म्हणजे शैव-उपासना, तिबेटी पिशाचोपासना व महायान बौद्ध पंथ याचा त्रिवेणी संगम आहे. इ. स. च्या अकराव्या शतकांत विक्रमशिला विद्यापीठाचा अतिस (तिष्य ?) हा तिबेटमध्यें जाऊन त्यानें लामापंथाची सुधारणा केली. तिबेटमध्यें बौद्धस्तूप, विहार, शिल्पवास्तु व चित्रकलेचे नमुने भरपूर आहेत. तिबेटी कला व वाङ्मय यांना भारतापासूनच स्फूर्ति मिळाली आहे. ज्या संस्कृत ग्रंथांचीं हस्तलिखितें भारतांत दुर्मिळ झालीं आहेत त्यांचीं तिबेटी भाषांतरें येथें आढळतात.

कोरिया :

बौद्धधर्मानें चीनवर सांस्कृतिक विजय मिळवून पुढें कोरियांत प्रवेश केला व तेथें इ. स. ६००—१००० पर्यंत तो प्रभावी होता. इ. स. ५३८ मध्यें कोरियाच्या राजानें जपानच्या सम्राटाला बुद्धाची मूर्ति व संदेश पाठविला. संदेशांत तो म्हणतो : "अनुयायांचें अपरिमित कल्याण करणारा असा हा सर्वोत्तम बौद्ध धर्म भारतापासून कोरियापर्यंतच्या सर्व प्रदेशांत मान्यता पावला आहे."

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जपान :

बोधिधर्म नांवाचा प्रचारक जपानमध्यें गेल्यावर तेथील राजा शोटोकू (याला ' जपानचा अशोक ' म्हणत) यानें त्याचें स्वागत केलें व बौद्ध-धर्म हा राज्यधर्म केला. कोरियांतील बौद्ध प्रचारकांचा त्यानें उपयोग करून घेतला व चीनमध्यें या धर्माच्या अभ्यासासाठीं त्यानें विद्यार्थी पाठविले. इ. स. च्या आठव्या शतकांत बोधिषेण जपानांत गेला व या धर्माला त्यानें दृढमूल केलें. जपान्यांच्या मूळ तत्त्वज्ञानावर व कलेवर बौद्ध धर्माचा बराच प्रभाव पडलेला दिसतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण चोविसावें

संस्कृतीचा वारसा व वैशिष्ट्यें

ग्रीस व भारत :

युरोपांतील प्राचीन महत्त्वाची संस्कृति ग्रीस देशाची आहे. शिकंदराच्या स्वारीपासून भारताचा ग्रीक-यवनांशीं निकटचा संबंध येऊं लागला. त्यानंतर ग्रीक सेनानी मिनँडर यानें पाटलीपुत्रापर्यंत झेप मारली व शाकल (सियालकोट) येथें आपलें राज्यही स्थापन केलें. यानंतरही बॅक्ट्रियांतील ग्रीकांशीं भारतीयांचा संबंध राहिला. पुढें रोमन साम्राज्यांत ग्रीस विलीन झाल्यावरही अलेक्झांड्रियामार्फत भारताचा ग्रीक संस्कृतीशीं संबंध येत होता. या सर्व संबंधांतून दोन्ही राष्ट्रांत संस्कृतीची देवाणघेवाण झाली आहे. परकीयांमधील चांगल्या गोष्टी घेण्याची उदार व संग्राहक वृत्ति भारतीयांनीं दाखविली आहे. नाणककला, मूर्तिकला व ज्योतिषविद्या या क्षेत्रांमध्यें भारतानें ग्रीसपासून कांहीं गोष्टी घेतल्या आहेत. भारतांतील जुन्या नाण्यांचा आकार, त्यांवरील चित्रें व लेख हीं ओबडधोबड असत. ग्रीकांशीं संबंध आल्यावर त्यांच्या अनुकरणानें भारतांतहि ग्रीक पद्धतीचीं सुबक, गोलदार नाणीं पाडण्यांत येऊं लागलीं. ग्रीकांच्या सहवासामुळें वायव्य भारतांतील बरीचशीं नाणीं द्विभाषिक होतीं.

ग्रीसमध्यें मूर्तिकला परमोत्कर्षास पोहोंचली होती. त्यांच्या नेतृत्वाखालीं वायव्य भारतांत गांधारशिल्प प्रसिद्धीस आलें. त्यामध्यें ग्रीकपद्धतीनें भारतीय विषय हाताळले आहेत. अर्थात् भारतांत सर्वत्र पसरलेल्या मथुरा शिल्पावर मात्र ग्रीकांचा प्रभाव दिसून येत नाहीं. ज्योतिषामध्यें ताजिक-शास्त्र हें यवनांपासून घेतलें आहे असें आमचे ज्योतिषी मान्य करतात. वराहमिहिराच्या पंचसिद्धान्तिकेंत रोमक सिद्धांत व पौलिश सिद्धांत अशीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दोन पाश्चात्य सिद्धांताचीं नांवें आहेत. यावनी जातकांतूनही भारतीयांनीं पुष्कळच उचल केली आहे. वराहमिहिराच्या बृहज्जातकांत सुमारें छत्तीस ग्रीक संज्ञांचा उल्लेख आहे. उदा. क्रिप, जितूम, रिष्फ, यामित्र, त्रिकोण, हेलि, होरा, केमद्रुम इ. फलज्योतिषामध्यें ग्रीकांचें ऋण भारतास मान्य केलेंच पाहिजे. गर्गाचार्यांनीं याबद्दल फार विचारार्ह दृष्टिकोण मांडला आहे. 'यवनांच्यामध्यें हें शास्त्र सुप्रतिष्ठित असल्यानें तेहि ऋषिवत् पूज्य होत.'

भारतांत ग्रीक संस्कृतीचा प्रसार करण्याचें विशाल ध्येय उराशीं बाळगून शिकंदर बादशाहा येथें आला. येथील मुलूख जिंकल्यावर त्यानें ठायीं ठायीं ग्रीकांच्या वसाहती वसविल्या. पण भारतीयांनीं ग्रीक संस्कृति उचलण्याऐवजीं ग्रीकांनींच भारतीय संस्कृति उचलली व ग्रीक वसाहती भारतीय संस्कृतींत गडप झाल्या. ग्रीक लोकांनीं भारतीय धर्म स्वीकारला होता. ग्रीक राजा मिनँडर हा बौद्ध बनला, तर ग्रीक वकील हेलिओडोरानें भागवत धर्माचा स्वीकार केला. भारतीय कल्पनांचा प्रसार खुद्द ग्रीसमध्येंही झाला होता. ख्रि. पू. पांचव्या शतकांत झालेल्या पायथागोरस या ग्रीक पंडितानें धर्म, तत्त्वज्ञान व गणित यांमध्यें मांडलेलीं मतें ग्रीक कल्पनांशीं विरोधी व भारतीय कल्पनांशीं हुबेहुब जुळणारीं आहेत. पुनर्जन्म, मोक्ष, वैराग्य या कल्पना त्यास मान्य होत्या. इंद्रियनिग्रह करून वैराग्य वृत्तीनें राहावें, अहिंसा पाळावी, मांसाहार करूं नये इत्यादि आचारधर्म त्यानें सांगितला आहे. ऑर्फियस या नादब्रह्म निर्माण करणाऱ्या ग्रीक तत्त्ववेत्त्याच्या पंथांतही पुनर्जन्म, समाधि व आत्म्याची ब्रह्मावस्था, मोक्षावस्था व अमरत्व, ब्रह्मांड, संसारचक्र वगैरे अनेक शुद्ध भारतीय कल्पना आढळतात. सुप्रसिद्ध ग्रीक तत्त्वज्ञ प्लेटो यानेंही आत्म्याचें अमरत्व, पुनर्जन्म, वैराग्य, चातुर्वर्ण्यव्यवस्था इत्यादि भारतीय मतें मांडलीं आहेत.

ख्रिश्चानिटी व भारत :

बायबलांत वर्णिलेल्या अनेक कथांचें जातक कथांशीं विलक्षण साम्य असून त्या कथा बौद्ध ग्रंथांतून घेतलेल्या असाव्यात याबद्दल कोणालाही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संशय वाटत नाहीं. बार्लाम व जोसाफत (बोधिसत्त्व) हे ख्रिश्चन संतमालिकेंत गोंवले आहेत. पाद्र्यांचें ब्रह्मचर्य, पापाचा कबुलीजबाब, संतावशेषांची पूजा या गोष्टी बौद्ध धर्मातूनच घेतलेल्या आहेत. नव प्लेटो पंथाचा संस्थापक प्लोटिनस यानें विशुद्ध भारतीय वेदांत सांगितला आहे.नोस्टिक पंथही ज्ञानमार्गाचा उपदेश करतो व अनेक वेदांती कल्पनांची छाप त्यावर पडलेली आहे. ख्रिस्ती धर्मांतील देहदंड कल्पना व कर्मठपणा भारताला शोभण्यासारखा आहे.

जगाला दिलेला वारसा :

(१) बौद्धधर्म : बौद्धधर्म भारतांतून नामशेष झाला असला तरी जगांत आज सर्वांत अधिक लोकसंख्या बौद्धांचीच आहे. या पंथाच्या प्रसारामुळें पूर्व आशियांतील अनेक भागांमध्यें वैचारिक क्रांति घडून आली व संस्कृतीची वाढ झाली. (२) सहिष्णु बुद्धीनें सर्वांचा समन्वय करून संग्राहक वृत्तीनें राहण्याचें भारतीयांचें कसब संघर्षामुळें पोळलेल्या जगाला तारक ठरेल. शांततापूर्ण सहजीवनाचा आदर्श घालून देणारा भारत जगाचा मार्गदर्शक ठरला आहे. (३) व्यक्ति व समाज यांचे परस्पर संबंध निश्चित करून दोघांचाही अविरोध विकास घडवून आणणारी वर्णाश्रम धर्माची भारतीय कल्पना अभ्यासार्ह आहे. (४) जागतिक लोककथांना भारतानें पशुपक्ष्यांच्या कथा पुरविल्या आहेत. जातककथा, बृहत्कथा व पंचतंत्र यांतून अनेक कल्पनांची उसनवारी निरनिराळ्या देशांनीं केलेली आहे. इ. स. सहाव्या शतकांत पंचतंत्राचें पेहेलवीमध्यें भाषांतर झालें. नंतर अरबीमध्यें व अकराव्या शतकांत ग्रीकमध्यें होऊन या ग्रंथांतील कथा सर्व युरोपभर पसरल्या आहेत. (५) गणितामध्यें भारतीय आंकडे, शून्य, दशांशपद्धति, बीजगणित ही भारताची जगाला अमूल्य देणगी आहे. अरबीमार्फत भारतीय गणिताचा प्रसार सर्व युरोपभर झाला आहे. (६) आयुर्वेदशास्त्र, औषधीवनस्पतिसंग्रह व रसायनशास्त्र. भारतांत आयुर्वेदाची उपासना फार निष्ठेनें झाली आहे. चरक व सुश्रुत यांनीं दोन हजार वर्षांपूर्वी केलेली प्रगति अभिमानास्पद होती. प्राचीन काळीं भारतीय

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भिषजांची कीर्ति सर्वत्र दुमदुमत होती. पोटांतून औषध देणें, औषधांसाठीं धातु व वनस्पति वापरणें, शल्यतंत्र वगैरे अनेक गोष्टी भारतानेंच जगास शिकविल्या आहेत. (७) भगवद्गीता, शाकुंतल इ. अनेक संस्कृत ग्रंथ जागतिक वाङ्मयाचीं भूषणें ठरलीं आहेत. (८) प्रतिनिधींच्यामार्फत लोकशाही पद्धतीनें गांवाचा कारभार चालविण्याची पद्धति तामीळ देशांत इ. स. आठव्या शतकापासून प्रचलित होती. (९) अध्यात्म व तत्त्वज्ञान या बाबतींत भारताची कीर्ति अद्यापही दिगंत पसरली आहे. जगाचें व जीवनाचें गूढ उकलण्याचा भारतीयांचा प्रयत्न निःसंशय अनुकरणीय आहे. शंकराचार्यांच्या अद्वैत वेदांतापलीकडे जगांतील तत्त्वज्ञान अद्यापही प्रगत झालें नाहीं.

भारतीय संस्कृतीचीं वैशिष्ट्यें :

आतांपर्यंतच्या केलेल्या भारतीय संस्कृतीच्या अभ्यासावरून या संस्कृतीचे कांहीं विशेष चटकन् नजरेस येतात. या संस्कृतीचें पहिलें वैशिष्ट्य म्हणजे समन्वयाची प्रवृत्ति होय. गेल्या पांच हजार वर्षांच्या इतिहासांत ज्या ज्या वेळीं वैयक्तिक वा सामाजिक जीवनांत संघर्ष निर्माण झाले त्या प्रत्येक वेळीं या संस्कृतीनें समन्वयाचें उदार धोरण स्वीकारलेलें दिसून येतें. आर्यांच्या आगमनानंतर येथें त्यांचा अनार्यांशीं भीषण संग्राम झाला. पण या संघर्षाचा शेवट अनार्यांचा वंशच्छेद करण्यामध्यें झाला नाहीं. चातुर्वर्ण्याची कल्पना काढून अनार्यांनाही आर्यांच्या समाजरचनेंत सामावून घेण्यांत आलें. आर्य-अनार्य शांततामय सहजीवन जगूं लागले. पुढें ब्राह्मणें व उपनिषदें यांनीं अनुक्रमें यज्ञीय कर्ममार्ग व तत्त्वचिंतनाचा ज्ञानमार्ग यांचा उपदेश केला. एकानें आमरण गृहस्थजीवन पुरस्कारिलें, तर दुसऱ्यानें सर्वसंगपरित्यागाचा उपदेश केला. या दोन प्रवृत्ति-निवृत्ति मार्गांचा समन्वय आश्रमव्यवस्थेनें घालून दिला. प्रत्येक व्यक्तीनें चार आश्रमांच्या मार्गांतून जाण्याचा उपदेश करून ऐहिक सुखाचें सामाजिक ध्येय व मोक्षाचें वैयक्तिक ध्येय यांचा समन्वय घातला गेला. भारतामध्यें वारंवार बाहेरून निरनिराळ्या टोळ्यांनीं आक्रमणें केलीं व त्या टोळ्या येथें येऊन स्थायिक झाल्या. त्यांचे आचारविचार भारतीयां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



तंजावर येथील शिवालय (दक्षिणी पद्धत) पृ : ३१०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



बोरोबुदुर (जाव्हा) येथील बौद्ध स्तूप (शैलेंद्रकाल इ. स. ७५० – ८५०) पृष्ठ : ३१७

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri



कंदर्य महादेव देवालय खजुराहो (बुंदेलखंड) (औदीच्य पद्धत) पृष्ठ : ३११

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चैत्य-मंडप (कार्लें) (ख्रि. पू. पहिलें शतक) पृष्ठ : २३२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

दुसऱ्या कॅडफिसिसचें नाणें. पृष्ठ : १८७

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसऱ्या चंद्रगुप्ताचें सिंहविक्रम नाणें. पृष्ठ : २७३



नव्या अश्मयुगांतील हत्यारें. पृष्ठ : १२



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

वृषभ-मुद्रा (सिंधु-संस्कृति)
पृष्ठ : २४

पशुपति-मुद्रा (सिंधु-संस्कृति)
पृंष्ठ : २५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar



शेषशायी भगवान् विष्णु
(कोरीव शिल्प – देवगड) पृष्ठ : २७१

स्तम्भशीर्ष (अशोकस्तंभ – सारनाथ) पृष्ठ : १६

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महत्त्वाच्या विशेष नांवांची सूची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महत्त्वाच्या विशेष नांवांची सूची

(आंकडे पृष्ठांकाचे आहेत)

अग्नि	५८	अश्वघोष	२२९
अग्निमित्र	१७३–४	अश्वमेध	१७२, २७३
अंगकोर थोम	३२१–२	अश्विनौ	५९
अंगकोर वाट	३२१, ३२३	अष्टाध्यायी	१४५
अजातशत्रु	११८–१२०	अष्टांग हृदयसंहिता	३०५
अजिंठा चित्रकला	२३६–७, २७२	असंग	२६९
		आनंदवर्धन	३०६
ॲग्नेस्	१७७	आंध्र	१९३–९
अतीश दीपंकर	३०३	आंध्रभृत्य	१९३–९
अथर्ववेद	७०–१	आरण्यकें	७२
अजित केशकंबली	१२९	आर्य–आगमन, मूलस्थान, इ.	२८-११२
अनिरुद्ध	३२५		
अफगाणिस्तान	३२७–८	आर्यभट	२६९
अभिधर्मकोश	२६९	आर्यशूर	२६९
अमरसिंह	२६८	आलवार	३०८
अमरुशतक	३०५	इत्सिंग	३०९, ३१३
अर्थशास्त्र	१६७–८	इंद्र	५७–८
अनर्घराघव	३०४	इंद्रवर्मन्	३२१
अवतार–कल्पना	२९१	इराणी आक्रमण	१२२–४
अवंती	११४	इस्लाम	२९६
अशोक	१५०–५	उपनिषदें	७२–३, ९८–९
अश्मयुग-जुनें	९-११	उमास्वाति	२७०
अश्मयुग–नवें	११–१५	उषस्	६०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऋग्वेद	६६–७	क्षहरात	१८३
ऋषभदत्त	१८३–४	खजुराहो	३११
ओदंतपुरी	३०३	खट्वारूढ	२२२
कणाद	२२७–८	खारवेल	१७९-८०
कण्व	१७४	खोतान	३२८–९
कनिष्क	१८८–९१	गांधार शिल्पकला	२३४
कपिल	२२६	गार्गी संहिता	२२६
करिकाल चोल	२००–०१	गुप्त साम्राज्य	२३९–७४
कर्पूरमंजरी	३०४	गृहस्थाश्रम	८६-७
कल्हण	२८०	गोशाल मख्खलीपुत्त	१२८-९
कॅडाफिसस पाहिला	१८६	गोंडोफर्नेस	१७७
,, दुसरा	१८७	गौडवहो	३०७
कांबोडिया (कंबुज देश)	३२०-१	गौतम न्यायशास्त्र	२२७
कादंबरी	३०५	गौतमबुद्ध	१२९-३७
कार्दमक	१८४	गौतमीपुत्रं शातकर्णी	१९५-७
कालिदास	२६६–७	गोपुरांचा प्रदेश	३११
काशिकावृत्ति	३०५	ग्रीक	१७४-६
किरातार्जुनीय	२६७–८	ग्रीक आक्रमण	१२४-७
कुमारगुप्त पहिला	२४६	घारापुरी त्रिमूर्ति शिव	३१०
कुमारिलभट्ट	३०६	घोसुंडी शिलालेख	२११
कुरुपांचाल	७७	चंडी	३१७
कुशान	१८६–९२	चरक	२२५
कैकुश्रु	११२	चष्टन कार्दमक	१८४
कैलास लेणें	३०९	चंद्रगोमिन्	२६९
कोरिया	३३१	चंद्रगुप्त पहिला	२३९
कोसल	११५-६	,, दुसरा	२४३-५
कौटिल्य	१६७–८	चंद्रगुप्त मौर्य	१४७-५०
क्षत्रिय	८३	चंद्रव्याकरण	२६९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चंपा ३१७-८
चालुक्य घराणें २८१-२
चीन ३२९-३०
जपान ३३२-३
जातक-कथा १६८
जाति-संस्था २१३-५
जाव्हा ३११-२
जैन धर्म १३९-४१-२०८-०९, २५९, २९५-६
जैमिनि २२८
ज्यू २९६
टॉलेमी २५६
टुप्टीका ३०६
टेराकोटा आकृति २३७
टॉंकिन ३३०-१
तत्त्वार्थाधिगमसूत्र २७०
ताजिकशास्त्र ३३३
तामीळ राज्यें १९९-२०२
तिपिटक ३३०
तिबेट ३३१
तिरुमंगाइ ३०८
तृत्सु ३०-३१
त्रिविक्रमभट्ट ३०५
थॉमस सेंट १७७
दशरूपक ३०६
दस्यु ३१-२
दांडेकर, रा. ना. ५६
दाशराज्ञ युद्ध ३०-१
दिङ्नाग २६९
धनंजय ३०६
ध्वन्यालोक ३०६
नंदवंश १२०-१
नहपान क्षहरात १८३
नागरक-वृत्त २२५
नागार्जुन २२९-३०
नाणीं-नाणकशास्त्र २१९-२१
नामालिंगानुशासन २६८
नायनार ३०८
नालंदा ३०२-३
नेदुंजेलियन पाण्ड्य २०१-२
न्यायशास्त्र २२७
पंचजन ३०
पंचतंत्र २६८
पंचसिद्धांतिका २६८
पणि ३२
पतंजलि २२५-२२७
पदंडा ३१६
पद्मटंक २२१
परममाहेश्वर २७७
पल्लव घराणें २८४-५
पल्हव १७६-८
पाणिनि १४५
पांड्य २७६-७
पार्थियन १८६-८
पाल घराणें २८१
पिंगल २२६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुराणें २६५–६
पुष्पभूति २७५
फाहेन १७०,२५६,२६१
पुलुमायी शालिवाहन १९७
पुष्यमित्र १७१–२
पूर्वमीमांसा २२८
प्रभाकर ३०६
प्रांझ् बोस ३
फूनान ३१९–२०
बादरायण ८
बालि (बलिद्वीप) ३१५
बिंदुसार १५०
बृहत्संहिता २६९
बोगाझकोइ इष्टिकालेख २९
बोरोबुदुर ३१७
बोर्निओ ३१५
बौद्धधर्म २०६-८, २५८, २९२-५
ब्रह्मचर्याश्रम ८५-६
ब्रह्मदेश ३२४-६
ब्रह्मावर्त ७६
ब्राह्मण ८३, २६०
ब्राह्मणग्रंथ ७१–२
ब्राह्मी लिपी २६४
भगवद्गीता १११-२
भट्टनारायण ३०४
भट्टिकाव्य ३०५
भरत ३०-१
भरताचें नाट्यशास्त्र २२४-५
भवभूति ३०४
भागवतधर्म २०९-११, २५६
भारतवर्ष ३१, बृहत्तर भारत (प्रकरण २३)
भारवि २६७–८
भास २२५
भूमक क्षहरात १८३
मगध ११६-८
मथुरा शिल्प २३५
मध्यमपंथ ३३७
मनुस्मृति २२४,३१५
मलाया ३१३
महाक्षपटलिक २७८
महापद्म १२०
महाभारत १०५–११
महाभाष्य २२५
महायान २०६–८
महावीरचरित ३०४
महावीर वर्धमान १३७-९
माघ ३०५
माधवनिदान ३०५
मामल्लापुरम् ३१०
मालतीमाधव ३०४
मुद्राराक्षस २६७
मुरारि ३०४
मेगॅस्थिनीस १५८,१६१,१७०, १७८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोहेंजोदारो (प्रकरण तिसरें)
मौएझ् १७७
यजुर्वेद ६७-८
यज्ञश्री शातकर्णी १९८-९
यवद्वीप ३१४-४
यशोधर्मन् २५१,२७९
यशोवर्मन् ३२१
याज्ञवल्क्य स्मृति २२४
युएची १८६
योगशास्त्र २२७
यौजनशतिक २२२
राजतरंगिणी २८०
राजशेखर ३०४
राज्यश्री २७६
रामायण १००-१०५
राष्ट्रकूट २८३-५
रुद्रदामन् १८४-६
वत्स ११४-५
वराहमिहिर २६८-९
वरुण ५९
वसुबंधु २६
वाकाटक २५१-२
वाक्पतिराज ३०७
वाचस्पतिमिश्र ३०७
वात्स्यायन २२५
वानप्रस्थाश्रम ८७
वासिष्क १९१
वासुदेव (पहिला) १९१-२
विक्रमशील ३०३
विक्रम संवत् १८२
विद्धशालभंजिका ३०४
विशाखदत्त २६७
विसुद्धिमग्ग २६९
वृज्जि ११६
वेणीसंहार ३०४
वेद ६४ इ.
वेदांगें ७४
वेदांत २२८
वेरूळ लेणीं ३११
वैशेषिक २२७
वैश्य ८३-४
शक १८१-६
शक वर्षगणना १८२
शंकराचार्य ३०६-७
शंगम् वाङ्मय २३०-२
शबर २६६
शाक्तपंथ २५७
शातकर्णी १९४
शिकंदर १२४-७
शिशुपालवध ३०५
शुंग घराणें १७१-४
शूद्र ८४
शूद्रक २२५
शैलेंद्र साम्राज्य ३१३-४
शैव पंथ २११-२, २५७,२९१
श्रीविजय (सुमात्रा) ३१३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

षड्दर्शनें २२६-९
सत्रप शक १८३-६
सभा ८०
समिति ८०
समुद्रगुप्त २४०-३, २७३
संजय बेलट्ठिपुत्त १२९
संजाण २९६
संन्यासाश्रम ८७-८
सयाम (श्याम देश) ३२३-४
संस्कृतभाषा २६४
संस्कृति १-२, वारसा व वैशिष्ट्यें (प्रकरण चोविसावें), सनातन संस्कृति ३४०
सातवाहन १९३-९
सामवेद ६९
सांख्यदर्शन २२६
सांस्कृतिक इतिहास ४
सिमुक १९३
सिलोन ३२६-७
सुदर्शन तलाव १७०
सुमात्रा ३११-१३
सुवर्णद्वीप ३०८
सुश्रुत २२५
सूर्यदेवता ५९-६०
सेंगुत्तुवन चेर २०१
सेनगुप्त ४४
सैंधव संस्कृति १६-२७
स्कंदगुप्त २४६-७
स्त्रीधन २९९
स्मिथ् १२७-१७८
हराप्पा १६
हर्षवर्धन २७५-८१
हिंदुधर्म २०५, २५७, २९०-१
हीनयान २०८
हुविष्क १९१
हूण २४९-५०
ह्युएनत्सांग २६४, २७६-७, ३०२, ३०४-६, ३०८-९

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

राजगुरु, पुणे २.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar